# त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व

ऑस्वाल्ड चेम्बर्स

## MY UTMOST FOR HIS HIGHEST

*By Oswald Chambers*

## My Utmost for His Highest

### त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व

Marathi-PB
2014/3M
ISBN 978-81-909506-8-8

My Utmost For His Highest ( Regd. )
Copyright by **Oswald Chambers Publications Association Ltd.**
Original Edition Copyright 1935 by Dodd, Mead and Company, Inc.
renewed By Oswald Chambers Publications Association Ltd.

Published by **Indian Evangelical Mission**, Bangalore
by special arrangement with
**Discovery House Publishers,**
3000 Kraft Avenue SE, Grand Rapids, Michigan
49512 USA.

All rights reserved

Printed in India

Unless otherwise indicated Scripture quotations are from Holy Bible printed by Bible Society of India

Printed at Matha Printers, Bangalore
Tel: 09886809060, e-mail: mathaprints@gmail.com



कव्हर डिझाइन : व्हिजुअल्स कन्सेप्ट : जॉन टेन टेन
...ऑस्वाल्ड चेम्बर्स ह्यांनी असे दाखवले आहे :
माझे सर्वस्व हे आमच्या विशेषतः आमच्या इच्छेच्या शरणागतीतून उत्तम प्रकारे व्यक्त होते; त्याची सर्वोच्च श्रेष्ठता त्याच्या वधस्तंभातून उत्तम रीतीने व्यक्त होते तसेच त्रैक देवावर खरी प्रीती करण्यासाठी आणि या गोष्टी समजून घेण्यासाठी आम्हांला पवित्र आत्म्यावर अवलंबून राहिले पाहिजे.



# त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व

सुवर्ण ग्रंथ

**ऑस्वाल्ड चेम्बर्स**

अनुवादक :

**प्रा. विश्वनाथ गोठोस्कर**

**My Utmost for His Highest**

त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व


आभार

ऑस्वाल्ड चेम्बर्स पब्लिकेशन असोसिएशन लि. क्रूवे, यु. के.
डिस्कव्हरी हाऊस  पब्लिशर्स, ग्रँडरॅपिडस, मि, युएसए
इंडियन इव्हँजेलिकल मिशन, बंगळुरु, कर्नाटक,भारत

प्रा. विश्वनाथगोठोस्कर
श्रीमती विद्यालक्ष्मी गोठोस्कर
कु. समर्पिता गिरगावकर
डॉ. आर. राजकुमार
नितीन डॅनियल डोंगरे
जॉन टेन टेन

माथ अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट, ले. ऑस्वाल्ड चेम्बर्स (१८७४- १९१७) आणि अद्ययावत अर्थानुवाद मुळ रुपात वाचण्यासाठी पाहा www.utmost.org ऑस्वाल्ड चेम्बर्स ह्यांचे जीवन चरित्र, विविध भाषातील भाषांतरे व अधिक माहितीसाठी द ऑस्वाल्ड चेम्बर्स पब्लिकेशन असोसिएशन लिमिटेड यांच्या वेबसाईटला भेट द्या : http://www.oswaldchambers.co.ut

# ऑस्वाल्ड पती–पत्नीविषयी थोडक्यात

ऑस्वाल्ड चेम्बर्स हे १८७४ मध्ये स्कॉटलंडमध्ये जन्मले. रॉयल कॉलेज ऑफ आर्ट आणि युनिव्हर्सिटी ऑफ एडिंबरा येथे त्यांचे शिक्षण झाले. साहित्य, काव्य यामध्ये विलक्षण गती असूनही वयाच्या बावीसाव्या वर्षी पाळक होण्यासाठी देव आपल्याला पाचारण करीत आहे असे त्यांना वाटले. त्यांनी थिऑलॉजिक कॉलेजमध्ये अभ्यास केला नंतर एका छोट्या थिऑलॉजिकल कॉलेजमध्ये दुनून येथे शिक्षण दिल्यावर त्यांनी उपदेश संदेश देण्याची सेवा सुरु केली. त्यांची ही सेवा ब्रिटन, अमेरीका आणि जपान येथे झाली. अमेरिकेमध्ये नोकरी आणि साहस यांच्या शोधात गेलेल्या एका तरुणीकडे लक्ष देण्याची चेम्बर्स ह्यांना विनंती केली होती.

गरट्रुड हॉब्ज (पुढे या मिसेस ऑस्वल्ड चेम्बर्स झाल्या) हिला लहानपणापासून दरवर्षी ब्रॉंकायटिसचे झटके येत असत. घरी आईला मदत करावी आणि मोठी बहीण व भाऊ ह्यांना त्यांचे शिक्षण पुढे चालू ठेवता यावे, म्हणून तिने शाळा सोडली. तिने विटमन लघुलिपी शिकून घेतली. ती पूर्ण वेळ काम करण्यास तयार झाली तेव्हा ती दर मिनिटाला २५० शब्द या वेगाने लघुलिपीत लिहित असे. तिचा लिहिण्याचा हा वेग बहुतेक लोकांच्या बोलण्यापेक्षा अधिक जलद होता. आता १९०८ मध्ये ती बोटीने अमेरिकेला चालली होती. बोटीवर तिला भेटलेल्या गृहस्थाविषयी तिला खूपच कुतूहल वाटत होते.

सफर संपली त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला. पण आता त्यांची पत्रापत्री सुरु झाली. आपले एकमेकांवर प्रेम आहे याची त्यांना लगेच जाणीव झाली. पुढे यथावकाश, १९१० मध्ये त्यांचे लग्न झाले.

## बायबल कॉलेज

बायबल कॉलेज सुरु कारावे ही आपल्यासाठी देवाची इच्छा आहे असे दोघांनाही वाटले. पण आरंभी तशी चिन्हे दिसेनात. ऑस्वाल्ड अनेक ठिकाणी शिकवीत असे आणि बिडी (ऑस्वाल्डचे आपल्या पत्नीला दिलेले लाडके नाव) त्यांच्या व्याख्यानाची टिपणे लघुलिपीत घेत असे. आपण लोकांना पत्राद्वारे शिकवावे हे त्यांच्या लक्षात आले.

परंतु १९१० च्या डिसेंबरमध्ये नॉर्थसाईट, क्लॅपहॅम बॉमन, लंडन येथे त्यांना एक मोठे घर मिळाले. सर्व व्यवस्था झपाट्याने झाली आणि अगदी लवकरच ऑस्वल्ड आणि बिडी तेथे राहावयास गेली. पहिल्या निवासी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यास ती दोघे तयार होती.

बिडीने आपल्या घरी अनेक मिशनरी आणि पाहुणे ह्यांचे स्वगात केले. विसाव्याची आणि विश्रांतीची गरज असलेल्यांसाठी तिचे घर नेहमी उघडे असे. तिने साधारणपणे आपल्या संपूर्ण आयुष्यात ही सेवा चालू ठेवली.

## इजिप्त

पहिल्या महायुद्धाला तोंड लागले तेव्हा आता देव आपणाला पुढे जाण्यास सांगतो आहे असे ऑस्वाल्डला वाटू लागले. त्या वेळी आपल्या देशाची सेवा कशी करता येईल याचा

ते विचार करु लागले. त्यांनी प्रार्थना केली, “हे प्रभू, मी याठिकाणी आहे, त्यासाठी मी तुझी स्तुती करतो. पण माझ्या अंतःकरणात प्रश्न उभे राहातात. तू माझ्यासाठी हेच ठिकाण नेमले आहे काय? तुझ्या इच्छेप्रमाणे करताना माझे मन स्थिर ठेव मला अधार दे. माझ्या मनातल्या अस्वस्थपणामुळे मला माझे येथील कार्य संपले असे वाटत असेल तर मला साहाय्य कर भलत्या शंका घेऊन तुझ्याविरुद्ध पाप करु नये यासाठी माझ्या मनाला स्वस्थता दे.”

या बाबतीत देवाचे पाचारण स्वीकारुन त्यांनी लंडन सोडले आणि ते सैन्याचे चॅप्लेन (आचार्य) होण्यासाठी ऑक्टोबर १९१५ मध्ये इजिप्तला गेले. बिडी त्यांची अडीच वर्षांची मुलगी कॅथलीन हिच्यासह डिसेंबर १९१५ मध्ये इजिप्तला गेल्या.

१९१७ मध्ये ऑस्वाल्डवर शस्त्रक्रिया करुन त्यांचे अपेंडिक्स काढले. या शस्त्रक्रियेनंतर काही गुंतागुंत झाली, त्यातच त्यांना मृत्यू आला. त्यांच्या पत्नीने लंडनमध्ये घरी ही वार्ता तारेने कळवली. तारेमध्ये, “ऑस्वाल्ड, त्याच्या सान्निध्यात.” एवढेच शब्द होते. तोफ वाहून नेण्याच्या गाड्यावर त्यांची शवपेटी ठेवली. १०० सैनिकांनी ती ओढून नेली. सैन्यातील अधिकारी होते त्यांनी शवपेरी वाहून नेली. शस्त्रे खाली करुन सर्वजण अंत्ययात्रेत चालत होते. सर्वांच्या प्रीतीस व आदरास पात्र झालेल्या या मनुष्याला वाहिलेली ही आदरांजली होती. अंत्यसंस्काराच्या वेळी बिडीने “मी माझी दृष्टी पर्वतांकडे लावतो” हे गीत निवडले होते. ऑस्वाल्ड चेम्बर्स ह्यांना त्यांच्या मृत्यूपूर्वी १ वर्ष अगोदर १९१३ मध्ये ब्रिटिश वॉर मेडल WWI 1914- 1918 हे पदक प्रदान केले होते.

**माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट- त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व**

बिडी आपल्या चार वर्षांच्या कॅथलीनसह इंग्लंड येथे परत आली. ती येथे स्थायिक झाली आणि आपल्या पतीच्या व्याख्यानांची घेतलेली टिपणे संपूर्ण लिहून काढण्याचे काम तिने सुरु केले. ही टिपणे ती मित्रमैत्रिणी, परिचित लोक आणि मागेल त्याला पाठवत असे. तिने लवकरच या पुस्तिकांचे एक पुस्तक तयार केले. यातूनच पुढे ऑस्वाल्ड चेम्बर्स पब्लिकेशन्सचा जन्म झाला.

“माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट” हे पुस्तक प्रथम १९२७ मध्ये प्रकाशित केले. तेव्हापासून सतत त्याच्या आवृत्यावर आवृत्या प्रकाशित होत आहेत. हे चिंतन मननाचे पुस्तक दररोज नियमाने वाचणाऱ्या लाखो लोकांना आशीर्वाद मिळाले आहेत.

बिडी १९६६ मध्ये देवाकडे गेली. देवाने आपल्याकडे सोपवलेली सेवा आपण पूर्ण केली याचे तिला समाधान मिळाले होते. आता ऑस्वाल्ड चेम्बर्स पब्लिकेशन्स असोसिएशन ही सेवा पुढे चालू ठेवत आहे.

आता हे पुस्तक जगातील सुमारे ५० भाषांमध्ये उपलब्ध आहे; फ्रेंच, जर्मन, हिब्रू (मसीही यहुद्यांनी अनुवाद केलेले) ग्रीक, पोलीश इत्यादी. भारतामध्ये हे पुस्तक आता हिंदी, तेलगु, मल्यालम्, खासी, कानडी, तामीळ, गुजराथी आणि ओरिया या भाषांमध्ये उपलब्ध आहे तसेच अगदी अलीकडे बंगाली, मिझो आणि मराठी या भाषांमध्ये उपलब्ध झाले आहे.

**प्रशंसापत्र**

इंडियन इव्हँजेलिकल मिशन बंगलोर, श्री जॉन टेनटेन ह्यांच्या सहकार्याने ऑस्वॉल्ड चेम्बर्स ह्यांनी लिहिलेले **"माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट"** हे प्रशंसेस पात्र असलेले मननाचे पुस्तक भारतीय भाषांमध्ये प्रसिद्ध करत आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

या पुस्तकाचा मराठी अनुवाद "**त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व**" या नावाने प्रा. विश्वनाथ गोठोस्कर ह्यांनी अत्यंत उत्कृष्टरीत्या केला आहे. या कामी त्यांची कन्या विद्यालक्ष्मी हिने साहाय्य केले. तसेच त्यांची नात समर्पिता हिने मूळ हस्तलिखित छपाईसाठी तयार करुन या कामी मोठा हातभार लावला. ही गोष्टदेखील कौतुकास्पद आहे.

"त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व" हा ग्रंथ गूढ व गहन आणि विचार परिप्लुत आहे. लेखकाने मोठ्या कळकळीने लिहिलेल्या या ग्रंथाचे वाचनही तेवढयाच कळकळीने केले पाहिजे कारण येथे ख्रिस्ती विश्वासाचे मर्म उलगडले आहे. हे मर्म आहे प्रभू येशू ख्रिस्ताबरोबर आणि त्याचबरोबर त्रैक देवाच्या वचनाच्या, पवित्र शास्त्राच्या प्रेरित ज्ञानाच्या आधारे अर्थपूर्ण नाते जोडणे महत्त्वाचे आहे.

मी आपणा सर्वांना आग्रहपूर्वक आवाहन करतो की आपण हा ग्रंथ नियमितपणे वाचावा आणि वाचन मननासाठी हा क्रम सतत ठेवावा. दरवर्षी आपण ही मनने पुन्हापुन्हा कितीही वेळा वाचली तरी प्रत्येक वेळी आपणाला नव्याने काही समजले असे खात्रीने वाटेल. ग्रंथाचे आवरण आणि प्रत्येक पानावरील प्रतीक चित्र हे सर्वच "त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व" या शीर्षकाला शोभणारे आहे. "माझे सर्वस्व" या शब्दांनी आपले अधीन होणे सूचित होते आणि त्याची "सर्वोच्च श्रेष्ठता" आपण वधस्तंभावर पाहतो.

इंडियन इव्हँजेलिकल मिशन, प्रा. विश्वनाथ गोठोस्कर आणि या महाकार्याशी संबंधित सर्वांचे या सुंदर ग्रंथासाठी मी मनःपूर्वक कौतुक करतो आणि हा महत्त्वपूर्ण ग्रंथ आमच्यासाठी आमच्या मराठी भाषेत उपलब्ध करुन दिल्याबद्दल प्रशंसा करतो.

आपला,
रेव्ह. अभिजित ससाणे
ऑक्झिलरी सेक्रेटरी
द बायबल सोसायटी ऑफ इंडिया
मुंबई

# प्रकाशकाचे मनोगत

प्रिय मित्र,

ऑस्वाल्ड चेम्बर्स ह्यांच्या जगप्रसिद्ध “माय आटमोस्ट फॉर हिज हायेस्ट” या मनन ग्रंथाचा मराठी अनुवाद “त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व” या नावाने आपल्या हाती देताना, द इंडियन इव्हँजेलिकल मिशनला आनंद वाटतो. हे पुस्तक यापूर्वीच हिंदी, तेलगू, मल्यालम, खासी, गुजराथी, ओरीया, बंगाली तसेच मिझो, तामीळ आणि कानडी या भारतीय भाषांमध्ये आयईएमच्या द्वारे उपलब्ध झाले आहे.

त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व हे पुस्तक आमच्या देशांतील भाषांमध्ये उपलब्ध व्हावे या एकाच विचाराने प्रेरित होऊन जॉन टेनटेन ह्यांनी (निना आणि योहान जॉन कुन्नेनकेरिल) या पुस्तकाचे अनुवाद, प्रकाशन आणि वितरण या सर्व कामात प्रभावी सल्ला मसलत देऊन समन्वय साधला आहे. त्यांनी हे काम कोणत्याही अर्थप्राप्तीची अपेक्षा न ठेवता केवळ प्रभूच्या गौरवासाठी निरपेक्ष वृत्तीने केले आहे. त्यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद देणे हे आमचे कर्तव्य आहे.

“त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व” या पुस्तकाच्या वितरणातून येणारे पैसे आयईएमच्या कार्यासाठी वापरायचे आहेत. आपल्या सेवाकार्याच्याद्वारे आमच्या त्र्येक देवाविषयी सर्वांना सांगणे हे आमचे प्रथम कर्तव्यच आहे जशी स्वतःवर तशी देवावर आणि दुसऱ्यांवर प्रीती करा ही महत्त्वाची आज्ञा देवाने दिली आहे.

१९६५ मध्ये स्थापन झालेली आयईएम ही संस्था देवाच्या कृपेने त्याच्या गौरवासाठी सर्व आघाड्यांवर भरीव कार्य करीत प्रगतीपथावर आहे. आयईएमच्या कार्याविषयी आमची वेबसाईट www.iemoutreach.org पाहावी.

आयईएमच्या कार्यासाठी प्रार्थना करा आणि या सेवेत सहभागी व्हा हे आमचे विनम्र आवाहन आहे. “त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व” पुस्तकाच्या द्वारे तुम्हांला आशीर्वाद मिळतील हे आम्ही खात्रीपूर्वक सांगतो.

प्रभूच्या सेवेमध्ये आपला

रेव्ह. जॉन वेस्ली

जनरल सेक्रेटरी, इंडियन इव्हँजेलिकल मिशन, ३८ लँगफोर्ड रोड, बंगळुरु ५६००२५.

iemhq@vsnl.com
www.iemoutreach.org

# प्रास्ताविक

आॅस्वाल्ड चेम्बर्स ह्यांच्या “माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट” या जगप्रसिद्ध पुस्तकाचा “त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व” हा मराठी अनुवाद आपल्या हाती देताना माझे अंतःकरण आनंदाने ओतप्रोत भरले आहे.

चिंतन मननाचा हा अद्‌भुत अभिजात ग्रंथ यापूर्वीच ५० भाषांमध्ये अनुवादरुपाने उपलब्ध आहे. यावर्षी हे पुस्तक मराठी भाषेत प्रसिद्ध झाले आहे. याशिवाय ते हिंदी, तेलगू, तामीळ, कानडी, मिझो, बंगाली, मल्यालम, गुजराथी आणि इतर भाषांमध्ये अगोदरपासून उपलब्ध आहे.

पवित्र शास्त्राचे नियमितपणे हेतुपूर्वक वाचन, अध्ययन करणे ही आमची मूलभूत गरज आहे, त्याशिवाय या उत्कृष्ट पुस्तकाचे वाचन व मनन केल्याने आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताबरोबर तुमचे अधिक दृढ आणि अधिक फलदायी नाते जुळेल.

निना आणि योहान जॉन कुन्नेनकेरिल ह्यांचे कौतुक करुन आभार मानलेच पाहिजेत. जॉन टेनटेन या नावाने त्यांनी प्रीतीस्तव या महान कार्याचा भार उचलला आहे. रागिणी आणि मी, आम्हा उभयतांचा आणि त्यांचा गेल्या वीस वर्षांपासून घनिष्ट परिचय आहे. मैत्री आहे. आम्हा उभयतांचा प्रार्थनापूर्वक विश्वास आहे की या कार्यातून विपुल फळ मिळेल.

ख्रिस्तामध्ये,

डॉ. आर. राजकुमार
कार्यकारी संचालक, लोगोस मिनिस्ट्रीज, न्यू दिल्ली.
www.logos-ministeries.com

# जॉन टेन टेन ह्यांचे मनोगत

प्रिय वाचक,

आमच्या देशी भाषांमध्ये "माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट" या पुस्तकाचे भाषांतर, प्रकाशन आणि वितरण या कार्यात आम्हांला सहभागी होता आले याचा आम्हांला अभिमान वाटतो. खरोखर हा परमेश्वराने आम्हांला दिलेला मोठा आशीर्वादच आहे.

या कार्यामध्ये आम्हांला ज्यांच्याबरोबर सहभागी होता आले त्या सर्वांबद्दल प्रथम कृतज्ञता व्यक्त करुन त्यांना धन्यवाद देतो. ऑस्वाल्ड चेम्बर्स पब्लिकेशन्स असोसिएशन लि. द डिस्कव्हरी हाऊस पब्लिशर्स, आमचे प्रिय भाषांतरकार प्रा. विश्वनाथ गोठोस्कर आणि प्रकाशक द इंडियन इव्हँजेलिकल मिशन या सर्वांचे मनःपूर्वक आभार. ओसीपीएलचे रेव्ह. जॉन बेनेट ह्यांचे विशेष आभार. त्याचप्रमाणे रेव्ह. जॉन वेस्ली आणि आयईएममधील सहकारी ह्यांचे आभार.

व्यावसायिक क्षेत्रामध्ये बारा वर्षे, काही काळ सहकारी दुग्धव्यवसायात कार्य केल्या नंतर पुढे सोळा वर्षे धार्मिक क्षेत्रात (बायबल सोसायटी ऑफ इंडिया), अलाहाबाद, उत्तर प्रदेश येथे सेवा केल्याने आम्हाला परमेश्वराने आपल्या कृपेने आमच्या स्वतःच्या जॉन टेनटेन या नावाने अत्यल्प सेवा करण्याची शक्ती व संधी मिळाली आहे. त्याच्या वचनातून आणि आमच्या वैयक्तिक अनुभवातून आम्ही जाणून आहो की हे उत्तम आणि विपुल जीवन आमचा त्र्येक देव, देवपिता, देवपुत्र आणि देव पवित्र आत्मा ह्याच्याशी दृढ नाते जोडल्याने मिळते.

या पुस्तकाच्या द्वारे आम्हांला आशीर्वाद मिळाले आणि तुम्हांलाही विपुल आशीर्वाद मिळतील असा आमचा विश्वास आहे.

निना आणि योहान जॉन कुन्नैनकेरील

जॉन टेन टेन
२०२ रांका पार्क अपार्टमेंटस, बंगळुरु ५६००२७
yohankjohn@gmail.com



**Oswald Chambers 1874-1917**

ऑस्वाल्ड चेम्बर्स ह्यांचे व्यक्तिमत्त्व प्रौढ, परिपक्व असून त्यांचे आध्यात्मिक सुज्ञान प्रशंसनीय होते. पवित्र शास्त्राचे शिक्षक म्हणून ते जगभर प्रसिद्ध होते. त्यांच्या लेखांमध्ये लक्षावधी लोकांना प्रेरणा मिळाली आहे. १९१७ मध्ये ते प्रभूकडे गेले परंतु आपल्या साहित्यातून ते आजही वाचकांबरोबर यथार्थतेने सुस्पष्ट संवाद साधत आहेत.

Oswald Chambers was a man of remarkable spiritual wisdom and maturity. As a Bible teacher, he was renowned throughout the world, and his writings have inspired millions of Christians through the ages. Although he died in 1917, he continues to speak to readers with striking relevance and clarity.

## मुद्यावर ठाम राहा

**“…मी कशानेही लाजणार नाही, तर पूर्ण धैर्याने नेहमीप्रमाणे आताही, जगण्याने किंवा मरण्याने, माझ्या शरीराच्या द्वारे ख्रिस्ताचा महिमा होईल ही जी माझी अपेक्षा व आशा तिच्याप्रमाणे…होईल” (फिलिप्पै १:२०).**

**त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व.** “…मी कशानेही लाजणार नाही ही जी माझी अपेक्षा…” आमच्या जीवनाच्या ज्या ज्या भागात आम्ही त्याच्या अधीन व्हावे असे त्याने सांगितले आहे त्यानुसार आम्ही येशूच्या अधीन झालो नाही तर आम्हा सर्वांच्या माना लाजेने खाली झुकतील. पौल येथे जणू सांगतो आहे “त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व, त्याच्या गौरवासाठी माझे सर्वोत्तम हेच माझे निश्चित उद्दिष्ट आहे.” या प्रकारचा निग्रही निश्चय करण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती असली पाहिजे; त्यात चर्चेचा वा युक्तिवादाचा प्रश्नच येत नाही. त्याक्षणी, आपली इच्छा सर्वस्वी अधीन केली पाहिजे आणि त्यात कशानेच बदल संभवत नाही. आपण विनाकारण स्वतःचे विचार करीत बसतो आणि तो निश्चय करण्यास कचरतो आणि म्हणतो आम्ही येथे दुसऱ्यांचा विचार करीत आहोत. येशूचे पाचारण आम्ही स्वीकारले, आज्ञापालन केले तर त्याचा दुसऱ्यांवर काय परिणाम होईल, त्यांना किती किंमत मोजावी लागेल, त्याचा गंभीरपणे विचार केला तर आमच्या आज्ञापालनाचा अर्थ काय ते तुला समजत नाही असे देवाला सांगतो! लक्षात ठेवा, मुद्यावर ठाम राहायचे! त्याला सर्व काही पूर्णपणे माहीत आहे. दुसरा प्रत्येक विचार बाजूला ठेवा. त्याच्या सर्वोच्च श्रेष्ठतेसाठी माझे सर्वस्व, हाच एक विचार मनाशी दृढ धरून देवासमोर राहा. मी दृढ निश्चय करून ठरवले आहे, मी सर्वस्वी आणि पूर्णपणे त्याच्याचसाठी, फक्त त्याच्यासाठीच आहे.

**त्याच्या पवित्रतेसाठी माझा दुर्दम्य निश्चय.** “जगणे असो की मरणे त्याने काहीच फरक पडत नाही!” (पाहा फिलिप्पै १:२१). देवाच्या इच्छेप्रमाणे करण्याचा नेमका निश्चय पौलाने केला होता. आपल्या निश्चयापासून तो कशानेही ढळणार नव्हता. देवाच्या इच्छेप्रमाणे करण्याचा निर्णय करण्यापूर्वी आमच्या जीवनात काही पेचप्रसंग येणे गरजेचे आहे. देवाच्या सौम्य सूचनांकडे आम्ही कानाडोळा करतो म्हणूनच असे घडते. आम्ही सर्वस्व त्याला समर्पण केले पाहिजे अशा स्थितीत तो आम्हांला आणतो आणि मग आम्हांला होय अगर नाही असा निर्णय घेणे भाग पडते. मग आमच्या जीवनात तो निर्णायक क्षण देतो. तुमच्यावर असा प्रसंग कोणत्याही प्रकारे आला असेल तर तुमची इच्छा येशूला कायमची सादर समर्पण करा.

जानेवारी २

## कुठे जायचे ते माहीत नसताना तुम्ही जाल का?

**“आपण कोठे जातो हे ठाऊक नसताही तो निघून गेला” (इब्री ११:८).**

तुम्ही कधी याप्रकारे “निघून गेला आहात?” गेला असाल तर तुम्ही काय करत आहात या प्रश्नाला सरळ उत्तर देता येणार नाही. ख्रिस्ती सेवाकार्यात “यातून तुम्ही काय साध्य करणार?” या प्रश्नाचे उत्तर देणे अतिकठीण आहे. तुम्ही काय करणार, काय अपेक्षा आहे हे तुमचे तुम्हांलाच माहीत नसते. आपण काय करतो आहो ते देवाला माहीत आहे, एवढेच तुम्हांला ठाऊक असते. देवावर सर्वस्वी भरंवसा ठेवून तुमच्या जीवनात प्रत्येक बाबतीत असे “निघून जाण्यास” तयार आहात का हे सतत तपासून पाहा, देवाविषयीची तुमची वृत्ती प्रवृत्ती चौकसपणे तपासा. अंतःकरणाची ही प्रवृत्ती तुमचे कुतूहल सदोदित जागे ठेवील; कारण पुढच्या क्षणी देव काय करणार हे तुम्हांला माहीत नसते. दररोज सकाळी झोपेतून उठल्यानंतर “बाहेर जाण्याची” नवी संधी मिळत असते, देवावरचा भरंवसा दृढ करण्यास प्रसंग मिळतो. “आपल्या जिवाची... आपल्या शरीराची चिंता करीत बसू नका...” (लूक १२:२२). म्हणजेच तुम्ही “निघून जाण्यापूर्वी” ज्यांचा विचार करीत होता त्या गोष्टींची चिंता करु नका.

देव काय करणार आहे हे तुम्ही देवाला विचारीत आहात काय? ते तो तुम्हांला कधीच सांगणार नाही. आपण काय करणार ते देव तुम्हांला सांगत नाही. आपण कोण आहोत ते तो तुम्हांला प्रकट करतो. चमत्कार करणाऱ्या देवावर विश्वास आहे ना? आणि त्याला संपूर्ण समर्पण करुन, सर्वस्वी त्याच्या अधीन होऊन तुम्ही “निघून जाल” ना? आणि मग तो करतो त्या कशाचेही तुम्हांला तिळमात्र नवल वाटणार नाही.

तुम्ही देवाच्या अगदी निकट असता तेव्हा तुम्ही ज्याला ओळखता तोच देव नेहमी असतो यावर विश्वास ठेवा. मग चिंता करणे, निरर्थक आणि अपमानकारक आहे हे तुमच्या लक्षात येईल. देवावर विसंबून, अवलंबून “निघून जाण्यास” सतत तयार असणे हीच तुमच्या जीवनाची नित्य प्रवृत्ती असावी; मग तुमच्या जीवनाला पवित्र, अनुपम सौंदर्याचा लाभ होईल आणि त्यामुळे येशूला समाधान होईल. तुमची मते, तत्वे आणि खात्री यांच्या द्वारे “बाहेर निघून जाण्यास” शिका. अनुभव घ्या. मग तुमच्या आणि देवाच्यामध्ये कसलाही आडपडदा उरणार नाही अशा विश्वासाच्या टप्प्यावर तुम्ही याल.

## जानेवारी ३

### ढग व अंधार

**“ढग व अंधार त्याच्याभोवती आहेत...” (स्तोत्र ९७:२).**

देवाच्या आत्म्याने ज्याचा नवा जन्म झालेला नाही असा मनुष्य तुम्हांला सांगेल की येशूची शिकवण अगदी साधीसोपी आहे. पण पवित्र आत्म्याने त्याचा बाप्तिस्मा झाला की “ढग व अंधार त्याच्याभोवती आहेत” हे त्याच्या लक्षात येईल. येशू ख्रिस्ताची शिकवण काय आहे ते आम्ही अगदी जवळून पाहिले की हे प्रथमच आपल्या लक्षात येते. देवाच्या आत्म्याचा प्रकाश आमच्या अंतःकरणात पडला की त्याच्याद्वारे येशूची शिकवण काय आहे ते आम्हांला पूर्णपणे समजेल. ही शिकवण समजण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. आमच्या प्रासंगिक, धार्मिक पायांवरचे प्रासंगिक धार्मिक जोडे कधीच काढून ठेवले नसतील तर देवाकडे जाताना आम्ही आमची अवाजवी अनौपचारिकता बाजूस ठेवली नसेल तर आम्ही देवाच्या सान्निध्यात कधी गेलो आहो का नाही हे समजणे कठीण आहे. जे लोक थिल्लरपणे आणि मनात आदर न ठेवता देवाकडे येऊ पाहतात त्यांना येशू ख्रिस्ताचा परिचयच कधी झालेला नसतो. येशू ख्रिस्त काय करतो ते समजल्याने होणाऱ्या मनमोकळ्या अत्यानंदाचा अनुभव घेतल्यावरच तो कोण आहे ते लक्षात येण्याचा अभेद्य “अंधार” समोर येतो.

येशूने म्हटले, “मी जी वचने तुम्हांला सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत” (योहान ६:६३). एकाकाळी पवित्र शास्त्र म्हणजे आपल्यासाठी अमुक एवढे शब्द असे होते, “ढग व अंधार”, मग अचानक ते शब्द आत्मा आणि जीवन असे होतात कारण येशू त्याच शब्दांनी पुन्हा आमच्याशी बोलतो. तेव्हाच आमच्या परिस्थितीने ते शब्द नवे होतात. देव आमच्याशी याप्रकारे बोलतो. दृष्टांतांनी आणि स्वप्नांनी नाही, तर शब्दांनी बोलतो. मनुष्य देवाकडे अगदी सहज सोप्यामार्गाने, शब्दांनी जातो.

## मला आपल्यामागे आताच का येता येणार नाही?

**"पेत्र त्याला म्हणाला, 'प्रभुजी, मला आपल्यामागे आताच का येता येणार नाही?'" (योहान १३:३७).**

काही वेळा असे प्रसंग येतात की तेव्हा तुम्हांला करायचे असते ते करता येत नाही आणि असे का तेही समजत नाही. देव प्रतीक्षा करण्यास लावतो. त्याचे कारण मात्र कळवत नाही अशा वेळी वाट पाहा, उगाच सटरफटर कामे करु नका. तुम्हांला पवित्रीकरणाचा, पापापासून वेगळे ठेवून शुद्ध करण्याचा अर्थ शिकवण्यासाठीच हा प्रतीक्षेचा काळ असेल; अगर पवित्रीकरणाची प्रक्रिया सुरु झाल्यावर सेवा म्हणजे काय ते शिकवण्यासाठी हे वाट पाहणे असेल. देवाने सूचना दिल्याशिवाय उगाच पुढेपुढे धावू नका. तुम्हांला किंचित शंका असली तर तो मार्गदर्शन देणार नाही. शंका आली तर थांबा.

देवाची इच्छा काय आहे ते पहिल्याने तुम्हांला अगदी स्पष्टपणे दिसेल. मैत्री तुटणे, व्यवसायातील नाते संपणे अगर आपण केले पाहिजे अशी देवाची स्पष्ट इच्छा असणारे दुसरे काही. पण असे वाटते म्हणून लगेच तसे करु नका. तसे केले तर अडचणी उभ्या राहतील आणि त्यांचा गुंता सोडवायला अनेक वर्षे लागतील. देवाने नेमलेल्या वेळेची वाट पहा त्या योग्यवेळी योग्य ते करील, तुम्हांला दुःख होणार नाही की पदरी निराशा येणार नाही. देव आपल्या इच्छेनुसार तरतूद करणार असतो, तेव्हा देवाला कृती करु द्या. तुम्ही वाट पहा.

पेत्राने देवाची वाट पाहिली नाही. परीक्षा कोठे कशी होईल ते त्याने आपल्या मनाशी ठरवले. पण अनपेक्षितपणे पारख झाली. "आपल्यासाठी मी माझा प्राण देईन." पेत्र हे प्रामाणिकपणे पण अज्ञानाने बोलला. येशूने त्याला उत्तर दिले, "... तू तीन वेळा मला नाकारशील तोपर्यंत कोंबडा आरवणार नाही" (१३:३८). हे पेत्राविषयीच्या गाढ ज्ञानातून सांगितले होते. हे ज्ञान स्वतः पेत्राला नव्हते. त्याला आपली स्वतःची ओळख नव्हती किंवा त्याला स्वतःच्या क्षमतेबद्दल पुरती खातरी नव्हती. येशूकडे आकर्षित होण्यास, त्याच्या अपार मोहकतेने भारावले जाण्यास स्वाभाविक निष्ठा पुरेशी आहे. पण त्यामुळे आपण त्याचे शिष्य कधीच होणार नाही. स्वाभाविकभक्ती येशूला नाकारील, त्याला खरोखरी अनुसरणे म्हणजे काय हे समजण्यास असली भक्ती नेहमीच अपुरी पडते.

## जानेवारी ५

### येणारे शक्तिशाली जीवन

**“येशूने उत्तर दिले, ‘मी जेथे जातो तेथे तुला आता माझ्यामागे येता येणार नाही; पण तू नंतर येशील’” (योहान १३:३६).**

आणि असे बोलल्यावर त्याने त्याला म्हटले, “माझ्यामागे ये” (योहान २१:१९). तीस वर्षांपूर्वी येशूने म्हटले होते, “माझ्यामागे चला” (मत्तय ४:१९). आणि पेत्र ताबडतोब उठून त्याच्यामागे गेला. त्याला येशूचे अनिवार आकर्षण वाटले. तेव्हा त्याला अनुसरण्यासाठी पवित्र आत्म्याच्या साहाय्याची गरज भासली नाही. पुढे चालताचालता तो एका ठिकाणी येऊन त्याने येशूला नाकारले, त्याचे अंतःकरण दुभंगले मग त्याला पवित्र आत्मा मिळाला. येशूने पुन्हा म्हटले, “माझ्यामागे ये.” आता पेत्राच्यासमोर प्रभू येशू ख्रिस्ताशिवाय दुसरे कोणीच नाही. पहिल्याने “माझ्यामागे ये” म्हटले त्यात गूढ काहीच नव्हते ते बाह्यतः अनुसरणे होते. येशू आता आंतरिक समर्पण करुन अधीन होण्यास सांगतो आहे (पहा २१:१८).

या दोन प्रसंगांच्या दरम्यान पेत्राने शापोच्चार करुन व शपथा वाहून येशूला नाकारले (पहा मत्तय २६:६९–७५). परंतु नंतर त्याचे अवसान संपूर्णपणे गळाले. त्याची स्वयंपूर्णता संपली. आता तो कोणत्याच प्रकारे स्वतःवर अवलंबून राहणार नव्हता. आता निराधार अवस्थेत पुनरुत्थित प्रभू त्याला देणार होता ते सर्व स्वीकारण्यास तयार होता. “... त्याने त्यांच्यावर फुंकर टाकला आणि त्यांना म्हटले, ‘पवित्र आत्म्याचा स्वीकार करा’” (योहान २०:२२). देवाने तुमच्यामध्ये केलेल्या बदलावर काही झाले तरी विसंबून राहू नका. प्रभू येशू ख्रिस्तावर आणि तो देतो त्या आत्म्यावरच अवलंबून राहा.

आमची सर्व वचने, अभिवचने आणि ठराव या सर्वांचा शेवट अखेर नकारातच होतो; कारण ते प्रत्यक्षात आणण्याची शक्ती आमच्यात नाही. आम्ही केवळ मानसिक दृष्टीनेच नव्हे तर सर्व प्रकारे स्वतःच्या शेवटास येतो तेव्हाच आम्ही “पवित्र आत्म्याचा स्वीकार” करु शकतो. *“पवित्र आत्म्याचा स्वीकार करा”* यात आक्रमणाचा विचार आहे. आज तुमच्या जीवन प्रवाहाला वळण देणारा एकच, प्रभू येशू ख्रिस्त हाच आहे.

जानेवारी ६

## उपासना

**“मग तो तेथून निघाला आणि बेथेलच्या पूर्वेकडे डोंगर होता तेथे जाऊन त्याने डेरा दिला. त्याच्या पश्चिमेस बेथेल होते व पूर्वेस आय होते; तेथे त्याने परमेश्वराची वेदी बांधली आणि परमेश्वराची प्रार्थना केली”** (उत्पत्ती १२:८).

देवाने तुम्हांला दिलेले सर्वोत्तम त्याला देणे हीच उपासना आहे. तुमच्याकडे सर्वात चांगले आहे त्याचे तुम्ही काय करता ते नीट पहा. ते जपा. देवासमोर बसून चिंतन करा, उपासनेची कृती करण्यासाठी तो आशीर्वाद त्याला अर्पण करा. तो स्वतःसाठी जपून ठेवला तर भाड्यांत साठवलेला मान्ना नासला तसा हा आत्मिक आशीर्वाद नासेल (पहा निर्गम १६:२०). देव कोणताच आध्यात्मिक आशीर्वाद खास तुमच्यासाठी राखून ठेवू देणार नाही. दुसऱ्यांना आशीर्वाद होण्यासाठी तो त्याला परत दिलाच पाहिजे.

बेथेल हे देवाबरोबरच्या सहभागितेचे चिन्ह आहे; आय हे जगाचे चिन्ह आहे. अब्राहामाने या दोहोंच्या दरम्यान जाऊन “त्याने आपला डेरा दिला.” देवासाठी उघडपणे केलेल्या सेवेचे मोजमाप आम्ही त्याच्याबरोबर एकांतात सहभागितेतून एकपणाची जवळीक किती साधतो त्याच्या आधारे होते. उपासना करण्यास झपाट्याने पुढे येणे व तेवढ्याच झपाट्याने मागे येणे हे नेहमी चूकच आहे. देवाची उपासना करण्यासाठी नेहमीच भरपूर, विपुल वेळ असतो. एकांत समयासाठी दिवस राखून ठेवणे हा सापळाच होण्याची शक्यता असते. त्यामुळे देवासह दररोज एकांतात शांत वेळ देण्याची गरज नाही असा समज होऊ शकतो. याच कारणाने त्याच्याबरोबर निवांत वेळ देता यावा म्हणून योग्य ठिकाणी आपण “आपला डेरा दिला पाहिजे.” जगाबरोबर कितीही व्यस्त असलो तरी या निवांत वेळाची उपेक्षा करु नये. उपासना, प्रतीक्षा आणि कार्य अशा उपासनेच्या तीन पातळ्या नाहीत. तरी पण आपल्यापैकी काहीजण आत्मिक बेडकांप्रमाणे उपासनेपासून प्रतीक्षेकडे आणि प्रतीक्षेकडून कामाकडे उड्या मारत जातात. या तीनही बाबी एकच अशा एकत्र असाव्या ही देवाची इच्छा आहे. आमच्या प्रभूच्या जीवनात या नेहमी सुसंगतपणे, एकामेळाने एकत्रच होत्या. आपण ही शिस्त अंगी बाणवली पाहिजे हे काही एका रात्रीत घडून येत नाही.

जानेवारी ७

## येशूच्या निकट सान्निध्यात

**“येशूने त्याला म्हटले, “फिलिप्पा मी इतका काळ तुम्हांजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस का?” (योहान १४:९).**

हे शब्द बोल लावण्यासाठी वा आश्चर्य व्यक्त करण्यासाठी उच्चारले नाहीत. येशू फिलिप्पाला आपल्या निकट येण्यासाठी उत्तेजन देत होता. परंतु येशूच्या निकट जाणे वाटते तेवढे सोपे नाही. पेंटेकॉस्टच्या अगोदर येशूने भुतांवर अधिकार दिला आणि संजीवन घडवण्याची शक्ती दिली एवढीच त्यांची येशूशी जवळीक होती (पहा लूक १०:१८-२०). ही जवळीक काही कमी होती असे नाही! पण पुढे ते येशूच्या अधिक निकट येणार होते. “... मी तुम्हांला मित्र म्हटले आहे...” (योहान १५:१५). या पृथ्वीवर खरी मैत्री क्वचितच मिळते. एखाद्याशी विचार, मन, अंतःकरण आणि वृत्ती यांनी समरुप होणे ही खरी मैत्री आहे. आमची आणि येशूची अशी जिव्हाळ्याची मैत्री जुळावी अशीच जीवनाची एकंदर रचना व योजना केली आहे. आम्हांला त्याचे आशीर्वाद मिळतात, आम्हांला त्याचे वचन माहीत आहे हे खरे पण आपण त्याला खरोखर ओळखतो का?

येशूने म्हटले, “... मी जावे हे तुमच्या हिताचे आहे...” (योहान १६:७). त्यांना अधिक निकट, जवळ आणावे यासाठीच त्याने ते नाते सोडले होते. एखादा शिष्य त्याच्याबरोबर निकट चालण्यासाठी आपला वेळ देतो तेव्हा त्याला, येशूला, आनंद होतो. फळ देणे हा येशू ख्रिस्ताशी निकटची जवळीक असल्याचा दृश्य परिणाम आहे हेच शास्त्रलेखांतून दाखवले आहे (पहा योहान १५:१–४).

आपण येशू ख्रिस्ताबरोबर जवळीक साधली की आम्ही कधीच एकटे एकाकी असणार नाही तसेच आम्हांला कोणी समजून घेणार नाही, कोणी ममता करणार नाही असे कधीही वाटणार नाही. आपण सतत आपल्या अंतःकरणातील तळमळ त्याच्यापुढे सांगावी तो आम्हांला भावनावश अगर केविलवाणा समजणार नाही आमचे ऐकून घेईल. खरोखरी येशूच्या निकट असलेला ख्रिस्ती मनुष्य कधीही स्वतःकडे लक्ष वेधून घेणार नाही. तर संपूर्णपणे येशूच्या अधीन असलेल्या जीवनाचे प्रमाण दाखवील. जीवनाच्या प्रत्येक भागाचे येशूकडून गाढ समाधान मिळवल्यानंतर हेच अनुभवास येते. येशूबरोबर जवळीक साधणाऱ्यांना मिळणारा सक्षम शांत समतोलच या जीवनातून प्रत्ययास येतो.

जानेवारी ८

## माझे यज्ञार्पण जिवंत आहे काय?

**“अब्राहामाने तेथे वेदी उभारिली,... आणि आपला पुत्र इसहाक यास बांधून वेदीवरच्या लाकडांवर ठेवले.” (उत्पत्ती २२:९).**

ह्या प्रसंगातून आम्ही करतो त्या चुकीचे चित्रच समोर येते. देवाला आमच्याकडून हवे असणारे अर्पण मृत्यू हेच आहे असे आपण समजतो. पण देवाला मरणाच्या द्वारे यज्ञार्पण हवे असते. त्यामुळे येशूने केले ते आम्हांला करता येते, म्हणजेच आमची जीवने अर्पण करणे शक्य होते.

“प्रभुजी, मी आपल्याबरोबर... मरणासही तयार आहे” (लूक २२:३३) असे नाही तर, “माझे जीवन देवाला अर्पण करता यावे यासाठी तुझ्या मरणाबरोबर समरुप होण्यास मी तयार आहे.”

काही गोष्टी वर्ज्य कराव्या अशी देवाची इच्छा आहे असे आम्ही समजतो! देवाने अब्राहामाला ही चूक करण्यापासून आवरले, शुद्ध केले आणि आमच्याही जीवनात तेच कार्य सुरु आहे. काही वर्ज्य करावे यासाठी देव आम्हांला वर्ज्य करण्यास सांगत नाही तर तो जवळ असावी अशा एकाच गोष्टीसाठी म्हणजे त्याच्यासह जीवनासाठी काही वर्ज्य करण्यास सांगतो. खरे तर येथे आमची जीवने रोखून धरणारी बंधने सैल करण्याचाच काय तो अवकाश आहे. येशूच्या मरणाशी समरुप झाल्याने ही बंधने सैल होतात; लगेच सुटतात मग आपण देवाबरोबर नाते जोडतो आणि त्यायोगे आपली जीवने त्याला अर्पण करतो.

आपले जीवन देवाला मरणासाठी देण्याने त्याला काहीच लाभ नाही. तुम्ही त्याला, “जिवंत यज्ञ” म्हणून हवे आहात. येशूच्या द्वारे तारलेले आणि पवित्र केलेले तुमचे सर्व शक्तिसामर्थ्य त्याला हवे आहे (रोम १२:१). देवाला हेच मान्य होणारे अर्पण आहे.

जानेवारी ९

## अंतरंगाची प्रार्थनापूर्वक तपासणी

**“तुमचा आत्मा, जीव व शरीर ही निर्दोष अशी संपूर्णपणे राखली जावोत” (१ थेस्सल ५:२३).**

“तुमचा आत्मा...” पवित्र आत्म्याचे महान कार्य आमच्या जीवित्वाच्या खोल गाभ्यामध्ये सुरु असते. तेथवर आम्ही पोचू शकत नाही. स्तोत्र १३९ वाचा. स्तोत्रकर्त्याचा भावार्थ आहे “हे परमेश्वरा तू प्रातःकाळचा देव आहेस, मध्यरात्रीचा देव आहेस, पर्वत शिखरांचा देव आणि महासागराचा देव आहे. परंतु माझ्या आत्म्याची क्षितिजे प्रातःकाळाच्या क्षितिजांपेक्षा कितीतरी दूर आहेत, रात्रीच्या घनांधकाराच्याही पलीकडे पोचणारी आहेत, ती कोणत्याही पर्वत शिखरांच्यापेक्षा उंच आहेत, निसर्गातील कोणत्याही सागराच्या खोलीपेक्षा अधिक खोल आहेत. तू या सर्वांचा देव आहेस. तर तू माझाही देव हो, मला उंचावर पोचता येत नाही, अथांगाचा थांग घेता येत नाही, माझे हेतू मलाच सापडत नाहीत, माझी स्वप्ने मी खरी करु शकत नाही. माझ्या देवा, मला शोध, माझी तपासणी कर.”

आम्ही पोचू शकत नाही त्याही पलीकडे जाऊन आमच्या विचारांना बळकटी देऊन ते राखणे देवाला शक्य आहे यावर आमचा विश्वास आहे काय? *“... त्याचा पुत्र येशू ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करते”* (१ योहान १:७). आम्ही फक्त जाणीवेच्या पातळीवर शुद्ध होतो असा या वचनाचा अर्थ असेल तर देव आमची कीवच करील. पापाने जाणीवा बोथट झालेला माणूस म्हणेल, मला तर त्याची अजिबात जाणीव नाही. पण आमच्या आत्म्याला पापापासून शुद्ध होण्याचा अनुभव येण्यासाठी “तो प्रकाशात आहे तसे आपणही प्रकाशात चालले पाहिजे” (१:७). येशू ख्रिस्ताच्या जीवनाचे पोषण करणारा आत्मा आमच्या आत्म्याच्या जीवनाचे पोषण करील. पवित्र आत्म्याच्या अद्‌भुत शुद्धतेने देव आमचे रक्षण करील तेव्हाच आमचा आत्मा, जीव आणि शरीर येशूचे परत येणे होईपर्यंत सत्याने राखण्यात येईल, देवाचा दृष्टीने त्याला दंडाज्ञा नाहीच.

देवाच्या थोर, महान व भरीव सत्यांवर आम्ही वारंवार आमच्या मनापासून मनन, चिंतन केले पाहिजे.

जानेवारी १०

## डोळे उघडणे

**“मी तुला त्यांच्याकडे पाठवतो,.... तू त्यांचे डोळे उघडावे आणि त्यांना पापांची क्षमा व्हावी” (प्रेषितांची कृत्ये २६:१७–१८).**

येशू ख्रिस्ताच्या शिष्याने दिलेल्या संदेशाचे खरे सार सांगणारे संपूर्ण नव्या करारातील हे सर्वात उत्तम उदाहरण आहे :

“त्यांच्या पापांची क्षमा व्हावी...” या शब्दांतून देवाच्या सार्वभौम कृपेचे पहिले कार्य सारांशरुपाने सांगितले आहे. एखादी व्यक्ती आपल्या वैयक्तिक ख्रिस्ती जीवनात अपयशी होते तेव्हा त्याला कधीच काही मिळालेले नसते हेच त्याचे कारण आहे. एखाद्या व्यक्तीचे तारण झाल्याचे एकमेव चिन्ह हेच की त्याला येशू ख्रिस्तापासून काहीतरी मिळालेले असणे. देवाचे सेवक म्हणून लोकांचे डोळे उघडावे हेच आमचे काम आहे. डोळे उघडले की त्यांना अंधारापासून प्रकाशाकडे वळता येईल. पण हे काही तारण नाही हे मागे वळणे आहे. जागृत मानवप्राण्याचा हा फक्त प्रयत्न आहे. आणि बहुसंख्य तथाकथित ख्रिस्ती लोक असेच आहेत असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. त्यांचे डोळे उघडे आहेत. पण त्यांना काहीच मिळालेले नाही. पालट होणे हे पुनरुज्जीवन नाही. आज आपल्या उपदेशांमध्ये या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होते आहे. एखादी व्यक्ती नव्याने जन्मते तेव्हा त्याला तशी जाणीव होते ती त्याच्या स्वतःच्या निर्णयामुळे नव्हे तर सर्वसमर्थ देवाकडून त्याला काहीतरी देणगी मिळालेली असते म्हणून लोक नवस करतात, वचने देतात आणि ती सर्व पुरी करण्याचा त्यांचा निश्चयही असतो पण हे काही तारण नाही. तारण म्हणजे येशू ख्रिस्ताच्या अधिकाराने देवाकडून काहीतरी स्वीकारण्यास म्हणजे पापक्षमा स्वीकारण्यास सुयोग्य स्थळी आम्हांला आणले जाते.

याच्या मागोमाग देवाचे कृपेचे दुसरे महान कार्य होते : “... पवित्र झालेल्या लोकांमध्ये वतन मिळते.” पवित्रीकरणामध्ये नव्याने जन्मलेली व्यक्ती स्वतःवरचा आपला हक्क जाणूनबुजून येशू ख्रिस्ताला देते आणि दुसऱ्यांसाठी चाललेल्या देवाच्या सेवाकार्याशी स्वतःला सर्वस्वी समरुप करते.

जानेवारी ११

## आज्ञापालन माझे भुर्दंड दुसऱ्यांना?

**"पुढे ते त्याला घेऊन जात असता कोणीएक कुरेनेकर शिमोन शेतावरुन येत होता... आणि त्याला येशूच्या मागे तो वाहण्यास लावले" (लूक २३:२६).**

आपण देवाच्या आज्ञा पाळल्या तर त्यासाठी आम्हांला जेवढी किंमत द्यावी लागेल. त्याहून अधिक किंमत दुसऱ्यांना द्यावी लागेल. प्रभूवर आमची प्रीती असेल तर आमच्या आज्ञापालनाची किंमत अजिबात द्यावी लागत नाही. ते सर्व आनंदाचे काम असते. पण त्याच्यावर प्रीती न करणाऱ्या दुसऱ्यांना बरीच किंमत द्यावी लागते. आम्ही देवाच्या आज्ञा पाळल्या तर त्यामुळे दुसऱ्यांच्या योजनांना खीळ बसते. ते जणू आमची थट्टा करत म्हणतात, "हाच का तुमचा ख्रिस्ती विश्वास?" त्यांचे क्लेश आपणाला मुळातच नाहीसे करता येतील पण आम्हांला देवाच्या आज्ञा पाळायच्या तर ते अशक्य त्यांना किंमत द्यावीच लागणार.

आमचे आज्ञापालन दुसऱ्यांना महागात पडते तेव्हा आमचा मानवी गर्व पुढे येतो आणि आम्ही म्हणतो, "मी कधीच कोणाहीकडून काही घेणार नाही;" पण ते घ्यावेच लागते नाहीतर देवाची अवज्ञा करणे भाग पडते. आमचे दुसऱ्यांशी असलेले नातेसंबंध स्वतः प्रभूचे होते त्याहून वेगळे असावेत असे म्हणण्याचा हक्क आम्हांला नाही (पहा लूक ८:१—३).

सर्व किंमत चुकवणे आम्ही स्वतःवर घेतो तेव्हा आमची आध्यात्मिक प्रगती खुंटते आणि प्रत्यक्षात हे अशक्यच आहे. देवाच्या विश्वव्यापी संकल्पांप्रमाणे आम्ही गुंतलो आहो. त्यामुळे आम्ही त्याच्या आज्ञा पाळतो त्याचा परिणाम दुसऱ्यांवर होतोच. आम्ही विश्वासूपणे देवाचे आज्ञापालन करु आणि स्वतंत्र होण्याचे नाकारल्याने होणारी मानहानी आनंदाने सोसू का? का आपण नेमके याच्या उलट करुन असे म्हणू "माझ्यामुळे मी दुसऱ्यांना त्रास होऊ देणार नाही?" मनात आणले तर देवाची आज्ञा आम्ही पाळणार नाही आणि त्यामुळे परिस्थितीत एकदम बदल होईल, पण त्यामुळे देवाला दुःख होईल, आमचा प्रभू खिन्न होईल, परंतु देवाची आज्ञा पाळली तर आमच्या आज्ञापालनाचे परिणाम ज्यांना दुःखद ठरले आहेत त्यांची देव काळजी घेईल. आपण सरळ आज्ञा पाळाव्या आणि सर्व परिणाम त्याच्या हाती सोपवावे.

देवाच्या आज्ञा पाळल्याबद्दल तुम्ही कोणते परिणाम होऊ देणार, कोणते नाही ते पाहून तशी अट त्याला घालण्याचा मोह टाळा; सावध राहा. देवाला आदेश देण्याचा विचार चुकूनही मनात आणू नका.

## जानेवारी १२

### तुम्ही कधी देवाबरोबर एकांतात राहिला आहात?

**“एकांती तो आपल्या शिष्यांना सर्वकाही समजावून सांगत असे” (मार्क ४ः३४).**

**त्याच्याबरोबर आमचा एकांतवास.** येशू आम्हांला एकीकडे घेऊन सर्वकाही सर्वकाल उलगडून सांगत नाही. तो आम्हांला समजू शकेल त्याप्रमाणे एकंदर गोष्टींची फोड करुन सांगतो. दुसऱ्यांची जीवने आमच्यासाठी आदर्श कित्ते आहेत परंतु आपण आमच्या आत्म्यांचे परीक्षण करावे ही देवाची अपेक्षा आहे. हे अगदी मंद गतीने चालणारे कार्य आहे. त्याची गती एवढी मंद आहे की एखादा पुरुष किंवा स्त्री त्याच्या संकल्पानुसार होण्यासाठी त्याला सर्व वेळ आणि सर्वकाळ कार्य करावे लागते. आमच्या स्वतःच्या स्वभावाचे सखोलभाग त्याला पाहू देऊन आमच्या नजरेस आणू दिले की मगच तो आमचा उपयोग करुन घेईल. आमच्या स्वतःबद्दलचे आमचे अज्ञान आश्चर्यकारक आहे! समोर दिसत असूनही आमच्यामधील गर्व, मत्सर, आळस आम्हांला उमगत नाहीत. परंतु आमच्यामध्ये आपले कृपेचे कार्य सुरु करण्याआधी येशू आम्ही धरुन ठेवले आहे ते आम्हांला उघड करुन दाखवील. मोठ्या धैर्याने अंतरंगात डोकावून पाहण्यास आमच्यापैकी कितीजण शिकले आहेत?

आपण स्वतःला ओळखतो हा विचार मनातून काढून टाकला पाहिजे. हाच उरला सुरला अहंकार आहे. हा जाता जात नाही पण तो घालवलाच पाहिजे. आम्ही कसे आहोत ते एका देवाशिवाय अन्य कोणीही जाणत नाही. अहंकार हा आमच्या आध्यात्मिक जीवनाला सर्वात मोठा शाप आहे. देवाच्या नजरेने आम्ही कसे दिसतो याची किंचितशी चुणूक आपल्याला दिसली तर “अरेरे! मी किती अपात्र आहे!” असे आपण कधीच म्हणणार नाही. हे सांगण्याची गरजच नाही, हे आमच्या लक्षात येईल. पण आम्ही अपात्र आहो अशी लवमात्र शंका मनात असेपर्यंत देव आम्हांला जवळ घेत राहील आणि अखेर तो आम्हांला एकांतात नेईल. अंतरंगामध्ये किंचितसा जरी गर्वाचा आमचा अवशेष उरला असेल तर येशू आम्हांला काहीच शिकवू शकणार नाही. बौद्धिक अहंकार घायाळ झाला की निराशा वाटते, अंतःकरण भग्न होते आणि तो आम्हांला वारंवार हाच अनुभव देईल. आमच्यामधील चुकीच्या इच्छा, आकांक्षा, आमच्या मनातही कधी आल्या नव्हत्या, पण अंतरंगात असणाऱ्या गोष्टी तो उघड करील. आणि यासाठी तो आम्हांला एकांती नेईल असे स्वप्नातही वाटले नव्हते. पण त्यांच्यासंबंधात देव आम्हांला एकांती नेतो तेव्हा पूर्वी दाखवलेल्या पण कसलाच परिणाम करु न शकणाऱ्या गोष्टी अगदी स्पष्ट होतात.

## जानेवारी १३

### तुम्ही कधी देवाबरोबर एकांतात राहिला आहात?

**“तो ऐकांती असता... त्यांनी त्याला दाखल्यांविषयी विचारिले” (मार्क ४:१०).**

**आमच्याबरोबर त्याचा एकांत.** दुःख, क्लेश, हृदयभंग, मोह, आजार, निराशा अगर फोल आशा आणि विफल इच्छा, तुटलेली मैत्री किंवा नवी मैत्री यांच्या द्वारे देव आम्हांला एकट्याला एकांती नेतो तेव्हा आमच्या तोंडून शब्दही येत नाही, आम्ही एकही प्रश्न विचारु शकत नाही. अशा वेळी तो आम्हांला शिकवतो. येशू ख्रिस्ताने बारा जणांना प्रशिक्षण कसे दिले ते पाहा. लोकसमुदाय नव्हे तर शिष्य गोंधळले होते. त्याचे शिष्य त्याला सतत प्रश्न विचारत होते आणि तोही त्यांना सतत उलगडा करुन सांगत होता. पण त्यांना पवित्र आत्मा मिळेपर्यंत तो सांगत होता ते उमगेलच नाही (पहा योहान १४:२६).

देवाबरोबर प्रवास करताना फक्त एकाच बाबतीत तो तुमच्याशी स्पष्टपणे वागतो. त्याला तुमच्या आत्म्याला वळण लावायचे असते. दुसऱ्यांच्या जीवनातील दुःखे, अडचणी आणि संकटे तुम्हांला पुरेपूर गोंधळात टाकतात. दुसऱ्या व्यक्तीच्या अडचणी आम्हांला समजतात असे आम्हांला वाटते. पण आमच्याही जीवनामध्ये त्याच उणीवा आहेत. तेच दोष आहेत हे देव दाखवून देतो आमच्यामध्ये व्यापक प्रमाणात अज्ञान आणि हेकेखोर हेकटपणा आहे. हे पवित्र आत्मा आम्हा प्रत्येकाला प्रकट करतो. परंतु येशू आम्हांला एकांती नेतो तेव्हाच ते शक्य असते. आता आम्ही त्याच्याबरोबर एकांतात आहोत का? किंवा आमचे विचार, आमच्या कल्पना, मैत्री, आमच्या देहाची काळजी यांचीच आम्हांला अधिक आस्था आहे? आम्ही आमचे बौद्धिक प्रश्न संपवून, थांबवून त्याच्यासह एकांतात एकट्याने गेलो तरच तो आम्हांला शिकवील, आमच्याशी हितगूज करील.

## देवाने बोलावलेले

**“तेव्हा मी प्रभूची वाणी ऐकली ती अशी, ‘मी कोणाला पाठवू? आमच्यासाठी कोण जाईल?’ तेव्हा मी म्हणलो, ‘हा मी आहे, मला पाठीव’” (यशया ६:८).**

देवाने हा प्रश्न थेट यशयाला विचारला नव्हता. यशयाने ते बोलणे ऐकले “... आमच्यासाठी कोण जाईल?” देवाचे पाचारण काही थोडक्या निवडक लोकांसाठी नाही तर प्रत्येकालाच बोलावले आहे. देवाचे बोलावणे मी ऐकतो की ऐकत नाही ते माझ्या श्रवणशक्तीवर आणि मी नेमके काय ऐकतो ते माझ्या आध्यात्मिक स्थितीवर अवलंबून आहे. “बोलावलेले पुष्कळ आहेत, निवडलेले थोडके आहेत” (मत्तय २२:१४). आपण निवडलेले आहो हे फारच थोडे प्रमाणाने सिद्ध करतात. येशू ख्रिस्ताच्या द्वारे ज्यांनी देवाबरोबर नाते जोडले आहे त्यांची आध्यात्मिक स्थिती पालटली आहे. कान उघडलेले आहेत तेच निवडलेले आहेत. तेच “आमच्यासाठी कोण जाईल?” असे सतत विचारणारी “प्रभूची वाणी” ऐकतात. तथापि देव एखाद्याला “आता तू जा” असे सांगत नाही. त्याने यशयावर आपली इच्छा लादली नाही. यशया देवाच्या सान्निध्यात होता. देवाचे बोलणे त्याच्या कानी पडले. आणि त्यावर त्याने संपूर्ण मोकळेपणे सांगितले, “हा मी आहे. मला पाठीव.”

देव माझ्यावर जाण्याची सक्ती करील, अगर मला “जा” असे विनवून सांगले असले विचार मनातून ताबडतोब काढून टाका. आमच्या प्रभूने आपल्या शिष्यांना पाचारण केले तेव्हा त्याने त्यांच्यावर बाहेरुन अनिवार दडपण आणले नाही. “माझ्यामागे चला” हे दोनच शब्द (मत्तय ४:१९) शांत पण आग्रहपूर्वक उच्चारले होते. ज्यांना उद्देशून हे सांगितले त्यांचे प्रत्येक ज्ञानेंद्रिय हे शब्द ऐकण्यास आतुर होते. आम्हीही स्वतःला देवाच्या सान्निध्यात नेण्याची मोकळीक पवित्र आत्म्याला दिली तर यशयाने ऐकली तशी “प्रभूची वाणी” आमच्याही कानी पडेल आणि आम्हीही अगदी पूर्ण मोकळेपणे म्हणू, “हा मी येथे आहे! मला पाठव.”

## जानेवारी १५

### तुम्ही श्वेतवस्त्रे परिधान करता का?

**“आपण त्याच्याबरोबर पुरले गेलो... ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यांतून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे” (रोम ६:४).**

प्रथम “श्वेत अत्यंसंस्कार” जुने जीवन पुरल्याशिवाय कोणालाही संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव येत नाही. मरणाच्याद्वारे हा बदलाचा महत्त्वपूर्ण क्षण आलाच नसेल तर मग पवित्रीकरण हे केवळ क्षणात विरणारे स्वप्नच राहील. एकच पुनरुत्थान असलेले “श्वेत मरण” होणे गरजेचे आहे. हे येशू ख्रिस्ताच्या जीवनात पुनरुत्थान होणे असे आहे. अशा या जीवनाला काहीही पराभूत करु शकणार नाही. हे एकाच उद्देशाने देवाशी एकपणा साधणारे आहे. त्याची साक्ष देणे हाच येथे उद्देश आहे.

खरोखर तुमचे शेवटले दिवस आले आहेत? तुमच्या मनामध्ये असे विचार अनेकदा आले असतील, पण त्यांचा खरोखर अनुभव आला आहे? उत्साहाने, आनंदाने कोणी मरत नाही अगर अंत्ययात्रेलाही जात नाही. तुमचे जीवित्व संपणे हेच मरण आहे. देवाशी सहमत होऊन तुमचे सतत धडपड, आटापिटा करणारे ख्रिस्ती जीवन संपवले पाहिजे. आम्ही कबरस्तानात जाण्याचे टाळतो, स्वतःचे मरण सतत नाकारतो. हे धडपडी, खटपटीने होणार नाही यासाठी मरणाच्या अधीन होणे जरुर आहे. हे मरणे आहे, त्याच्या “मरणात बाप्तिस्मा घेणे आहे” (रोम ६:३).

तुम्ही तुमचे “श्वेत अंत्यसंस्कार” केले आहेत? का तुम्ही अगदी राजरोस साळसूदपणे स्वतःच्या आत्म्याची फसवणूक करीत आहात? हा माझ्या जीवनाचा शेवटचा दिवस असा क्षण तुमच्या जीवनात आला आहे? तुमच्या जीवनात मागे वळून पहा. एखादी जागा, एखादा क्षण आहे का? की त्याच्याविषयी अपार कृतज्ञतेने म्हणता येईल, “होय याच क्षणाला, ‘माझ्या श्वेत अंत्यसंस्कारच्या’ वेळी मी देवाबरोबर करार केला” असे प्रामाणिकपणे म्हणता येईल काय?

“देवाची इच्छा ही आहे की तुमचे पवित्रीकरण व्हावे...” (१ थेस्सल ४:३). ही देवाची इच्छा आहे हे स्पष्टपणे तुमच्या लक्षात आले की स्वाभाविक प्रतिसाद म्हणून तुम्ही पवित्रीकरणाच्या प्रक्रियेसाठी आनंदाने पुढे याल. तो “श्वेत अंत्यसंस्कार” करुन घेण्यास तुम्ही राजी आहात का? या पृथ्वीवरचा आजचा हा दिवस तुमचा शेवटचा दिवस आहे हे देवाचे सांगणे तुम्हांला मान्य आहे ना? होकाराचा हा क्षण तुमच्यावरच अवलंबून आहे.

जानेवारी १६

## देवाची स्वाभाविक वाणी

**“तेव्हा मी प्रभूची वाणी ऐकली ती अशी, मी कोणाला पाठवू? आमच्यासाठी कोण जाईल? तेव्हा मी म्हणालो, हा मी आहे, मला पाठीव” (यशया ६:८).**

आपण देवाच्या पाचारणाविषयी बोलतो तेव्हा आपल्याला पाचारण करणाऱ्याच्या स्वभावाचा बहुधा विसर पडतो, खरे तर हीच सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. आज आम्हा प्रत्येकाला बोलावणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. यातील काही आवाहनांना प्रत्युत्तर मिळते तर इतर काही हाका, आवाहाने ऐकलीही जाणार नाहीत. हे आवाहन बोलावणाऱ्याच्या स्वभावाला अनुरुप असते आणि आमच्यामध्ये त्याच्या स्वभावाचा अंश असला तरच ते आवाहन आमच्या कानी पडेल. देवाचे आवाहन देवाच्या स्वभावाला अनुसरुन असते, आमच्या स्वभावाप्रमाणे नसते. देव मोठ्या कृपेने त्याच्या आवाहनाचे धागे आमच्या जीवनामध्ये विणतो. आणि ते फक्त आम्हीच ओळखू शकतो. एखाद्या विशिष्ट जिव्हाळ्याच्या विषयासंबंधाने देवाच्या वाणीचे धागेदोरे आमच्यापर्यंत येतात आणि त्याविषयी दुसऱ्या कोणाचा अभिप्राय, मत घेणे निरर्थक आहे. देवाच्या पाचारणासंबंधी आम्ही जे करायचे ते पूर्णपणे आमच्या व त्याच्यामध्येच असले पाहिजे.

देवाचे आवाहन, पाचारण हे माझ्या स्वभावाचे प्रतिबिंब नाही. माझ्या वैयक्तिक इच्छा आणि माझा स्वभाव यांचा विचारही करण्याचे कारण नाही. माझी स्वतःची गुणवता आणि स्वाभाविक वृती, प्रवृत्ती यांच्याकडे लक्ष देऊन मला काय करता येईल त्याचाच विचार करत राहिले तर मला देवाचे आवाहन कधीच ऐकू येणार नाही. पण देवच स्वतःशी माझे योग्य नाते जुळवतो तेव्हा मीही यशया होता त्याच स्थितीमध्ये असेन. यशयाचे सूर देवाच्या सुरांशी पूर्णपणे जुळले होते, कारण नुकताच त्याला एका गंभीर प्रसंगाचा अनुभव आला होता. त्यामुळे देवाचे आवाहन त्याच्या अंतःकरणाला भिडले, आत्म्यापर्यंत पोचले. आमच्यापैकी बहुतेकजणांना आपणा स्वतःशिवाय दुसरे काहीही ऐकू येत नाही. देव काय सांगतो, ते काहीही आम्हांला ऐकू येत नाही. पण देवाचे ऐकता येईल अशा ठिकाणी आम्हांला आणले जाते तेव्हा आमचा संपूर्णपणे पालट झालेला असतो.

## स्वाभाविक जीवनाचे आवाहन

**“...त्याला आपल्या पुत्राला माझ्या ठायी प्रगट करणे बरे वाटले...” (गलती १:१५–१६).**

देवाचे आवाहन हे एखाद्या विशिष्ट प्रकारे त्याची सेवा करण्याचे पाचारण नव्हे. देवाच्या स्वभावाशी माझा संबंध असतो त्याच्या आधारे मला त्याच्या आवाहनाचा उमज पडेल आणि त्याच्यासाठी खरोखर काय करावे असे मला वाटते ते समजेल. देवाचे पाचारण, आवाहन हा त्याच्या स्वभावाचा अविष्कार आहे. त्यानुसार मला करावयाची सेवा माझ्या योग्य असते आणि ती माझ्या स्वभावाची अभिव्यक्ती असते. स्वाभाविक जीवनाचे पाचारण प्रेषित पौलाने सांगितले आहे : “... देवाला आपल्या पुत्राला माझ्याठायी प्रगट करणे बरे वाटले अशासाठी की, मी परराष्ट्रीयांमध्ये त्याच्या सुवार्तेची घोषणा करावी (म्हणजे *विशुद्ध गंभीरपणे त्याचे गूज कळवावे).*

प्रीती आणि भक्ती यांनी परिपूर्ण असलेल्या जीवनातून ओसंडून जाणारा वर्षाव सेवेचाच असतो. पण नेमके सांगायचे तर त्यासाठी आवाहन नसतेच. या नात्यामध्ये मी जे आणतो ती सेवाच असते आणि तेच देवाच्या स्वभावाशी माझ्या समरुप होण्याचे प्रतिबिंब असते. सेवा माझ्या जीवनाचा स्वाभाविक भागच होता. देव स्वतःशी माझे योग्य नाते जुळवतो. त्यामुळे मला त्याचे पाचारण नीट समजते आणि मी माझ्या परमप्रीतीच्या प्रेरणेने स्वतः होऊन त्याची सेवा करतो. देवाची सेवा ही समजून उमजून दिलेली प्रीतीची देणगी असते आणि ती देवाचे ऐकणाऱ्या स्वभावाकडून येते. सेवा माझ्या स्वभावाची अभिव्यक्ती आहे आणि देवाचे पाचारण, आवाहन त्याच्या स्वभावाची अभिव्यक्ती आहे. तेव्हा त्याचा स्वभाव मला मिळतो आणि त्याचे आवाहन कानी पडते. त्याची दिव्यवाणी त्याच्या आणि माझ्या स्वभावांमधून दुमदुमते आणि ते दोन सेवेमध्ये एक होतात. देवाचा पुत्र स्वतःला माझ्यामध्ये प्रकट करतो आणि त्याच्यावरील भक्तीमुळे सेवा हिच माझ्या दैनंदिन जीवनाची दिशा होते.

## जानेवारी १८

# “प्रभू आहे”

**“थोमाने त्याला म्हटले, माझा प्रभू व माझा देव!” (योहान २०:२८).**

येशू तिला म्हणाला, “मला प्यावयाला पाणी दे” (योहान ४:७). आमच्यापैकी कितीतरी जण येशू ख्रिस्ताने आपली तहान शमवावी म्हणून अपेक्षेने प्रतीक्षा करत आहेत. वास्तविक पाहता आपणच त्याचे समाधान केले पाहिजे. आपण आपली जीवने ओतणे गरजेचे आहे. या कामी संपूर्ण जीवित्त्व गुंतवले पाहिजे. आमचे समाधान करण्यासाठी त्याच्याकडे पाहता नये. “तुम्ही माझे साक्षी व्हाल...” (प्रे. कृ. १:८). याचा अर्थ आहे आमची जीवने विशुद्ध, कसलीच तडजोड न करणारी आणि त्याच्यावरील संपूर्ण, मनमोकळ्या भक्तीने भरलेली असावी. यामुळेच प्रभू येशूचे समाधान होईल आणि तो आम्हांला जेथे कोठे पाठवील तेथे आम्ही त्याची सेवा करु.

येशू ख्रिस्तावरील तुमच्या अपार निष्ठेच्या आड अन्य काही येऊ नये यासाठी चित्त नित्य सावध ठेवा. आम्ही त्याच्यासाठी करतो ती सेवाच खऱ्या भक्तीची जबर स्पर्धक आहे. आमची संपूर्ण जीवने त्याच्या चरणी वाहण्यापेक्षा त्याची सेवा करणे अधिक सोपे आहे. देवाचे समाधान हेच त्याच्या पाचारणाचे उद्दिष्ट आहे; त्याच्यासाठी नुसते काही केल्याने हे समाधान मिळणार नाही. देवासाठी लढाई करण्यास आम्हांला पाठवलेले नाही. देवाच्या लढायांमध्ये त्याने आमचा उपयोग करावा यासाठी आम्हांला पाठवले आहे. आम्ही खुद्द येशू ख्रिस्ताला वाहून घेतले आहे त्याहून अधिक प्रमाणात सेवेसाठी वाहून घेतले आहे काय?

## दृष्टी आणि अंधकार

**“सूर्यास्ताच्या सुमारास अब्रामास गाढ निद्रा लागली तेव्हा घोर भीती, निबिड अंधकार त्याच्यावर पडाला” (उत्पत्ती १५:१२).**

परमेश्वर ख्रिस्ती माणसाला दृष्टी देतो तेव्हा तो “त्याला जणू आपल्या हाताच्या छायेत लपवतो” (यशया ४९:३). अशा वेळी शांत राहून ऐकणे हेच पवित्र जनाचे कर्तव्य असते. प्रकाशाचा अतिरेक झाला की “अंधारी येते” आणि तीच ऐकण्याची वेळ असते. अंधकाराच्या वेळी प्रकाश पाठवण्यासाठी देवाची वाट न पाहता तथाकथित चांगला सल्ला ऐकणे याचे उत्तम उदाहरण उत्पत्ती १६ मधील अब्राम आणि हागार ह्यांच्या वृत्तांतात आहे. देव दृष्टी देतो आणि मागोमाग अंधार येतो; तेव्हा थांबा, वाट पाहा. देवाने नेमलेला समय येण्याची वाट पाहिली तर त्याने दिलेला दृष्टांत तो तुमच्या जीवनात साकार करील. देवाचे वचन पूर्ण करण्यास त्याला मदत करु नका. अब्रामाने तेरा वर्षे स्तब्धतेचा काळ अनुभवला. या सर्व वर्षांत त्याची स्वयंपूर्णता लयास गेली. स्वतःच्या व्यवहारज्ञानावर विसंबून राहण्यापलीकडे तो पोचला होता. स्तब्धतेची ही वर्षे शिस्त लावण्याचा काळ होती; देवाच्या अवकृपेचा काळ अशी नव्हती. आपले जीवन आनंद आणि आत्मविश्वास यांनी भरले आहे असा बहाणा करण्याची अजिबात गरज नाही. देवाची प्रतीक्षा करा, त्याचा आश्रय घ्या (पहा यशया ५०:१०-११).

मी देहावर थोडा तरी भरंवसा ठेवतो काय? माझ्या स्वतःवर आणि देवाच्या इतर लोकांवर भरंवसा ठेवण्यापलीकडे मी गेलो आहे का? माझ्या जीवनातील अन्य सुखानंद, पुस्तके अगर प्रार्थना यांच्यावर मी आपला भरंवसा ठेवला आहे का? का मी देवाच्या आशीर्वादांवर नव्हे तर खुद्द **त्याच्यावर** आपला भरंवसा ठेवला आहे ना? “मी सर्वसमर्थ देव आहे...” एल शद्दय, सर्वशक्तिमान देव (उत्पत्ती १७:१). देव खरा आहे हे आम्हांला समजावे याचसाठी आम्हांला शिस्त लावण्यात येते. देव वास्तविक खरा आहे, हे आम्हांला समजले की त्यापुढे तुलनेने लोक फिके पडतात ते वास्तवाच्या छाया असे होतात. आणि दुसऱ्या पवित्र जनांनी काही केले आणि म्हटले तरी देवावर अढळपणे स्थिरावला आहे तो कधीही कशानेच ढळत नाही, ढळणार नाही.

## जानेवारी २०

### तुम्ही प्रत्येक गोष्टीसाठी ताजेतवाने आहात का?

**“येशू त्याला म्हणाला, मी तुम्हांला खचित सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही” (योहान ३:३).**

कधीकधी आम्ही अगदी ताजेतवाने आणि प्रार्थना सभेसाठी जाण्यास उत्सुक असतो पण जोडे पुसणे, पॉलिश करणे अशा हलक्या कामांना आम्ही कंटाळतो.

आत्म्याने पुन्हा जन्मणे हे देवाचे अचूक कार्य आहे. ते वाहत्या वाऱ्याएवढे गूढ आणि खुद्द देवासारखे आश्चर्यकारक आहे. याचा आरंभ कोठे होते ते आम्हांला समजत नाही ते आमच्या अंतरात्म्याच्या गूढगर्भी खोल दडलेले आहे. वरुन नवा जन्म होणे हा टिकाऊ, चिरंतन आणि सनातन आरंभ आहे. यामुळे विचार करणे, बोलणे आणि जगणे यात सदोदित एका प्रकारचे ताजेपण असते. देवाच्या जीवनाच्या गूढ आश्चर्याचा सतत प्रत्यय येतो. शिळे नीरसपण हे आमच्या जीवनात काही तरी बिघडले आहे, देवाच्या सुराशी आमचा सूर जुळलेला नाही हेच दाखवते. आम्ही स्वतःला म्हणतो, “मला हे आताच केले पाहिजे नाहीतर कधीच होणार नाही!” हीच शिळेपणाची पहिली खूण आहे. या क्षणाला तुम्हांला काय वाटते? ताजेतवाने वाटते का आपण शिळे शुष्क असे काहीतरी करावे म्हणून मनात धुंडाळीत आहोत? ताजेपण आज्ञापालनाने नव्हे तर पवित्र आत्म्यापासून मिळते. आज्ञापालन केल्याने तो “प्रकाशात आहे तसे आपणही प्रकाशात राहतो...” (१ योहान १:७).

देवाबरोबरच्या तुमच्या नात्यात बिघाड येऊ नये म्हणून सावध राहा. हे नाते अगदी ईर्ष्यावान होऊन सांभाळा, जपा. येशूने प्रार्थना केली : “जसे आपण एक आहो तसे त्यांनीही एक व्हावे,” मध्ये कसलाच आडपडदा नको (योहान १७:२२). तुमचे जीवन येशू ख्रिस्तासाठी सतत खुले ठेवा. तुमच्या जीवनाचा उगम देवापासून आहे का कोणत्या अन्य स्रोतापासून आहे? तसे असेल तर सावध राहा. ताजेपणा आणि ताकद यासाठी तुम्ही दुसऱ्या कशावर तरी अवलंबून असाल तर त्याचे सामर्थ्य कधी लोप पावले ते तुम्हांला अजिबात समजणार नाही.

आत्म्याने नवा जन्म होणे हे आपल्याला वाटते, समजते त्याहून कितीतरी अधिक आहे. यामुळे आम्हांला नवी दृष्टी मिळते आणि आम्ही नेहमी ताजे, टवटवीत असतो. आम्हांला देवाच्या जीवनाचा अखंड पुरवठा होतो त्यामुळे आम्ही पूर्णपणे ताजेतावने राहतो.

## देवाला आठवते, त्याची आठवण करा

**“परमेश्वर असे म्हणतो की, तुझे तारुण्यातले प्रेम… याचे मला स्मरण आहे” (यिर्मया २:२).**

मी पूर्वी होते तसाच देवाविषयी आतुरतेने उत्सुक असतो का? किंवा देवाने माझ्याविषयी उत्सुक असावे, मला दयेने वागवावे अशी माझी अपेक्षा आहे. माझ्या जीवनातील प्रत्येक गोष्ट त्याला आनंदित करते का? अगर माझ्या मनाप्रमाणे घडत नाही म्हणून मी सतत तक्रारीच्या सुरात कुरकूर करतो? देवाला काय प्रिय आहे याचा ज्या व्यक्तीला विसर पडला आहे, तिला कधीही आनंद होणार नाही. प्रभू येशूलाही गरजा आहेत आणि आपणाला त्या पुऱ्या करता येतात हे समजणे किती थोर आहे! “मला प्यावयाला पाणी दे” (योहान ४:७). गेल्या आठवड्यात मी त्याला कितीशी दया दाखवली? त्याच्या नावलौकिकाला साजेल असे माझे जीवन आहे का? त्याचे प्रतिबिंब माझ्या जीवनातून दिसते?

देव आपल्या लोकांना सांगत आहे “आता तुम्ही माझ्या प्रेमात नाही पण मला आठवते एकदा तुमचे माझ्यावर प्रेम होते.” तो म्हणतो, “तुझे तारुण्यातील प्रेम, वाङ्निश्चयाच्या वेळचा तुझा अनुराग. याचे मला स्मरण आहे” (यिर्मया २:२). माझी येशू ख्रिस्तावर आरंभी होती तशी व तेवढी प्रीती आजही ओतप्रोत ओसंडत आहे काय? त्यावेळी मी स्वतः त्रास सोसून त्याच्यावरील माझ्या निष्ठेचे प्रत्यंतर दिले. मी फक्त त्याचाच विचार करत होतो त्या समयाचे स्मरण कधी त्याला होते काय? आता मी तेथेच आहे का? का त्याच्यावरील खऱ्या प्रीतीऐवजी मानवी ज्ञानाला जवळ केले आहे? मी त्याच्यावरील गाढ प्रीतीमुळे देहभान विसरलो आहे? तो नेईल तिकडे जाण्यास मी तयार आहे? तो कोठे नेतो ते मी पाहात नाही आणि तिकडे लक्षही देत नाही काय? किंवा मी त्याची किती सेवा करावी याचा विचार करताना मला किती मानसन्मान मिळतो आणि मिळावा त्याचा विचार करीत बसतो का?

देवाला माझ्याविषयी आठवते त्याचे स्मरण मी करतो तेव्हा तो पूर्वी मला होता तसा नाही हेही माझ्या लक्षात येते आणि हे घडते तेव्हा त्यातून माझी मला वाटणारी लाज आणि मानखंडना मी सोसावी कारण त्यामुळे ईश्वरप्रेरित दुःख होते आणि “ईश्वरप्रेरित दुःख, तारणदायी पश्चात्तापास कारणीभूत होते…” (२ करिंथ ७:१०).

जानेवारी २२

## मी देवाकडे वळत आहे का?

**"...माझ्याकडे वळा, उद्धार पावा..." (यशया ४५:२२).**

देवाने स्वतः आमच्याकडे यावे आम्हांला आशीर्वाद द्यावे आणि आमचे तारण करावे अशी आमची अपेक्षा आहे का? तो म्हणतो, "मजकडे वळा आणि उद्धार पावा..." आत्मिक दृष्टीने पाहता देवावर चित्त एकाग्र करणे फार कठीण आहे आणि त्याच्या आशीर्वादामुळे तर ते अधिकच बिकट होते. संकटे आली की आमच्या नजरा साहजिकच देवाकडे वळतात अन्य पर्यायच नसतो. पण त्याच्या आशीर्वादांमुळे आमचे लक्ष विचलित होऊन भलतीकडे जाते. डोंगरावरील प्रवचनातून एकच मुख्य धडा शिकवला आहे. आमचे सर्व लक्ष आस्था वगैरे आकळून संकुचित करावे आणि आपले मन, अंतःकरण व देह हे तीनही एकवटून येशू ख्रिस्तावर केंद्रित व्हावे. "मजकडे वळा..."

ख्रिस्ती व्यक्ती कशी असावी, दिसावी याचे एक मानसचित्र आपल्यापैकी अनेकांनी मनोमन चितारलेले असते. आपण दुसऱ्यांच्या जीवनात ही प्रतिमा पाहतो आणि देवाकडे आमचे लक्ष लागण्याच्या मार्गात तो एक अडथळाच येतो. हे काही तारण नव्हे, ते एवढे सहजसोपे नाही. तो स्पष्टपणे सांगतो, "मजकडे वळा, उद्धार पावा... तुमचे तारण झाले आहे." कधीतरी तुमचे तारण होईल असे तो म्हणत नाही. आम्ही सर्व लक्ष त्याच्यावर केंद्रित केले तर आम्ही जे शोधत आहो ते आम्हांला सापडेल. आम्ही भांबावून जातो, त्याच्यावर चिडतो. पण तो तरीही सांगतो, "मजकडे वळा; उद्धार पावा." आम्ही देवाकडे वळलो की आमच्या अडचणी, आमची संकटे, उद्याविषयीच्या आमच्या चिंता सर्वसर्व धुक्याप्रमाणे विरुन जाईल, मात्र आपण त्यासाठी देवाकडे वळले पाहिजे.

जागे व्हा, निद्रा सोडा, देवाकडे वळा, त्याच्याकडे पहा. आपल्या आशा त्याच्यावर आधारा, त्याचीच आशा धरा. तुमच्यावर इतर कोणतीही दडपणे असोत, कितीही जबर मोह आपल्या पाशात अडकवण्यास पुढे सरसावोत त्या सर्वांना नेटाने दूर करा आणि त्याच्याकडे पहा. "मजकडे वळा..." तुम्ही वळाल त्याच क्षणी तुमचे तारण होईल.

जानेवारी २३

## निरखल्याने रुपांतर

**“परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे प्रतिबिंब पाहत आहो... आपले रुपांतर होत असता आपण त्याच्याशी समरुप होत आहो” (२ करिंथ ३:१८).**

संपूर्णपणे आच्छादनरहित उघडे असे देवासमोर राहिल्याने ख्रिस्ती व्यक्तीचे जीवन दुसऱ्यासाठी आरशाप्रमाणे होते आणि आपण हेच थोर गुणलक्षण उघडपणे दाखवू शकतो. आत्मा आम्हांला परिपूर्ण करतो तेव्हा आमचे रुपांतर होते आणि देवाला पाहून आम्ही जणू आरसे होतो. कोणी एखादा प्रभूचे गौरव पाहत आहे का हे आपल्याला लगेच समजेल कारण तो प्रभूच्या स्वतःच्या स्वरुपाचे प्रतिबिंब पाडतो हे आपल्या अंतरात्म्याला जाणवते. तुमच्यामधील हे प्रतिबिंब कशानेही मलिन अथवा पुसट होऊ नये, त्याला डाग अगर कलंक लागू नये म्हणून जपा. काहीतरी चांगल्याचा त्यावर डाग पडेल, ते चांगले असले तरी सर्वोत्तम नाही.

आमची जीवने देवासाठी संपूर्णपणे उघडलेली असण्यावर लक्ष केंद्रित करावे हाच सर्वात महत्त्वाचा नियम आहे आम्ही स्वतः हाच नियम पाळावा. इतर सर्व गोष्टी, कामकाज, कपडेलत्ते, खाणेपिणे सर्व एकीकडे ठेवावे. प्रापंचिक गोष्टीत गुंतून गेल्याने देवाकडे लक्ष लावण्याचे कामी व्यत्यय येतो. आपण नेमस्तपणे त्याच्याकडे पाहात असावे, त्यात खंड पडू नये. आमची जीवने सर्वतोपरी अंतर्बाह्य आध्यात्मिक राहतील याची दक्षता घ्यावी. इतर गोष्टी त्यांच्या क्रमाने येवोत, जावोत तिकडे लक्ष देऊ नये. दुसरे लोक आमच्यावर टीका करतील तर त्यांना तसे यथेच्छ करु दे. परंतु “ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले तुमचे जीवन” (कलस्सै ३:३) कशानेही पुसट, मलिन व फिकट होऊ देऊ नका. सांभाळा, घाईगडबडीची राहणी आणि जीवनशैली यामुळे त्याच्यामध्ये वसती करुन राहण्यास बाधा येऊ नये. असा व्यत्यय येऊ देणे सहजसोपे आहे. पण आपण सतत सावध राहणे आवश्यक आहे. व्यत्यय येण्यापूर्वीच तो रोखावा. “आरशातल्याप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे प्रतिबिंब” सतत कसे पाहावे, पाहात राहावे हाच ख्रिस्ती जीवनातील धडा शिकून घेणे अवघड आणि कठीण आहे.

जानेवारी २४

## देवाचे दुर्दम्य उद्दिष्ट

**“मी तुला एवढ्यासाठी दर्शन दिले आहे...” (प्रेषितांची कृत्ये २६:१६).**

दिमिष्काच्या वाटेवर पौलाने पाहिलेला दृष्टांत केवळ क्षणिक भावनायुक्त अनुभव नव्हता. तो एक दृष्टांत असून त्यामधून त्याला अगदी स्पष्ट आणि जोरदार सूचना दिल्या होत्या. पौलाने म्हटले, “मी तो स्वर्गीय दृष्टांत अवमानिला नाही” (प्रे. कृ. २६:१९). आमच्या प्रभूने पौलाला सांगितले त्याचा मथितार्थ असा “तुझ्या संपूर्ण जीवनावर आता माझा ताबा आहे. तुला आज माझ्याखेरीज अन्य ध्येय नाही, उद्देश नाही आणि हेतूही नाही,” आणि प्रभू आम्हांलाही सांगतो आहे, “तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले व तुम्हांला नेमले आहे...” (योहान १५:१६).

आम्ही नव्याने जन्मतो तेव्हा आम्ही आत्मिक असलो तरच येशूची आमच्याबद्दल काय इच्छा आहे त्याचे दृष्टांत आम्ही पाहतो. त्या “स्वर्गीय दृष्टांतांचा अवमान” आमच्याकडून होऊ नये याची आम्ही काळजी घ्यावी. त्या दृष्टांताप्रमाणे कार्य करणे जमेल का नाही अशी शंकाही घेऊ नये. देवाने जगाचा उद्धार केला आहे हे सत्य मनोमन कबूल करणे पुरेसे नाही. तसेच, येशूने केलेले सर्व कार्य पवित्र आत्मा माझ्या जीवनात प्रत्यक्षात आणेल हे जाणणेही पुरेसे नाही. पौलाला घोषणा करण्यासाठी एखादा सिद्धांत अगर संदेश दिला नव्हता. येशू ख्रिस्ताबरोबर त्याचे वैयक्तिक, सुस्पष्ट आणि सर्वस्वी अधीन करुन घेणारे नाते जोडले होते. प्रे. कृ. २६:१६ हे वचन प्रचंड प्रभावशाली आहे. “... सेवक व साक्षी असे तुला नेमावे...” आणि हे मान्य करण्याशिवाय गत्यंतर नाही. येथे वैयक्तिक नात्याशिवाय आणखी काहीच नाही. पौल उद्देशाला नव्हे तर व्यक्तीला वश झाला होता. तो सर्वस्वी येशू ख्रिस्ताचा होता. त्याला अन्य काही दिसत नव्हते. तसेच त्याचे जीवन येशू ख्रिस्ताशिवाय अन्य कशाहीसाठी नव्हते. “कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभवर खिळलेला येशू ख्रिस्त ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरु नये असा मी ठाम निश्चय केला” (१ करिंथ २:२).

## देवासाठी जागा असू दे

**“देवाला आपल्या पुत्राला माझ्याठायी प्रकट करणे बरे वाटले...” (गलती १:१५–१६).**

देवाचे सेवक या नात्याने त्याच्यासाठी जागा ठेवण्यास, देवाला मोकळीक, कार्य करु देण्यास वाव देण्यास शिकून घेणे आवश्यक आहे. आम्ही योजना करतो, एकंदर परिस्थिती लक्षात घेतो आणि अटकळ करतो हे असे अगर ते तसे घडेल. पण देवाच्या मर्जीस येईल त्याप्रमाणे पुढे येऊन कार्य करण्यासाठी आपण त्याला मोकळीक देण्यास विसरतो. आमच्या ध्यानीमनी नसताना आणि जराही अपेक्षा नसताना अचानक देव आमच्या सभेमध्ये अगर संदेशामध्ये आला तर? आम्हांला नवल वाटेल? आम्ही चकित होऊ? देव अगदी विशिष्ट प्रकारे येईल अशी अपेक्षा ठेवू नका. पण त्याची प्रतीक्षा करा, त्याचा शोध करा. त्याच्यासाठी जागा घ्यायची तर तो अमुकच प्रकारे येईल असे नाही पण त्याच्या इच्छेने येईल हे पक्के लक्षात ठेवावे. आपण देवाला कितीही जवळून ओळखत असलो तर तो कोणत्याही क्षणाला येईल हा महत्त्वाचा धडा शिकावा. “अचानक आश्चर्यकारक रीतीने” या महत्त्वाच्या मुद्याकडे आम्ही लक्ष देत नाही. परंतु देव अन्य कोणत्याच प्रकारे कार्य करत नाही. अचानक एकाएकी देव आमच्या जीवनात येतो. “देवाला बरे वाटले तेव्हा...”

आपले जीवन सतत देवाच्या संपर्कात ठेवा. त्याचे अद्‌भुत सामर्थ्य कोणत्याही क्षणी अनुभवास येईल. सतत, प्रत्येक श्वासागणिक अपेक्षा ठेवा आणि देवाला बरे वाटेल त्याप्रमाणे त्याने यावे म्हणून त्याच्यासाठी जागा ठेवा.

जानेवारी २६

## पुन्हा पाहा आणि समर्पण करा

**“जे रानातील गवत... त्याला जर देव असा पोषाख घालतो, तर, तो विशेषेकरुन तुम्हांला पोषाख घालणार नाही काय?” (मत्तय ६:३०).**

येशूचे एखादे साधे विधानही आम्हांला कोड्यात टाकते; कारण आपण कधीच साधेसरळ नसतो. येशूसारखे साधे सरळ आम्ही केव्हा होणार? आणि तो आम्हांला कसा समजणार? आपण त्याच्या आत्म्याचा स्वीकार करावा त्याला ओळखून त्याच्यावर विसंबावे. तो आपल्या वचनाचे सत्य आम्हांला कळवीत असताना त्याचे आज्ञापालन करावे. “जे रानातील गवत... त्याला... देव असा पोषाख घालतो”, तर, तो विशेषेकरुन तुम्हांला पोषाख घालणार नाही काय? आम्ही आमच्या स्वर्गीय पित्याचे “विशेषेकरुन” सामर्थ्य विसरतो मग “संसाराच्या चिंता” मनात गर्दी करतात (मत्तय १३:२२).

“आकाशातील पाखरांकडे निरखून पहा” (६:२८). ती आपल्या उपजत बुद्धीने वावरतात. ती देवच त्यांना देतो, त्यांच्यावर त्याचे लक्ष असते. येशूने म्हटले की तुमचेही देवाशी असे नाते असेल आणि तुमच्यामध्ये असणाऱ्या त्याच्या आत्म्याचे तुम्ही ऐकाल तर देव नक्कीच तुमचीही काळजी घेईल, तुम्हांला सांभाळील.

“रानातील फुले पाहा...” (६:२). त्यांचे बी पडते तेथे ती उगवून वाढतात. देव आम्हांला ठेवतो तेथे वाढण्यास आमच्यातील अनेकजण नकार देतात. म्हणूनच आम्ही कोठेच मुळावलेले नसतो. येशूने म्हटले आहे,  आमच्या अंतरंगातील देवाच्या जीवनाचे ऐकले तर तो आमची सर्व प्रकारे काळजी घेईल. येशूने आम्हांला खोटे सांगितले का? त्याच्या अभिवचनानुसार “विशेषेकरुन”चा अनुभव तुम्हांला आला आहे का? नसेल तर देवाने आम्हांला दिलेले जीवन आम्ही जगत नाही, गोंधळवणारे विचार, प्रपंचाची चिंता यांनीच आमचे मन भरले आहे. आम्ही सर्वतोपरी त्याची सेवा करण्याकडे दुर्लक्ष करीत देवाला फालतू प्रश्न विचारण्यात वेळ वाया दवडतो. समर्पित होणे म्हणजे देवाने ज्यासाठी नेमले आहे तेच करण्याकडे लक्ष लावणे आणि अन्य कशाहीवर चित्त गेलेच तर ते रोखून मागे आणणे. हा एकच एक अनुभव नसून  तर सतत चालणारी प्रक्रिया आहे. मी स्वतःला सतत इतर गोष्टींपासून वेगळे करुन दररोज जीवनातील हर एक क्षणाला देवाकडे पाहतो आहे काय?

## पुन्हा नीट पहा आणि विचार करा

**“आपल्या जीवाविषयी...चिंता करत बसू नका...” (मत्तय ६:२५).**

पुन्हा पुन्हा देणे जरुर आहे असा हा इशारा पहा “... संसाराची चिंता व द्रव्याचा मोह” आणि इतर गोष्टींची वासना यामुळे आमच्यामधील देवाचे जीवन गुदमरते (मत्तय १३:२२). या आक्रमक लाटांचा मारा अखंड चालू असतो. समोरुन होणारा भडिमार कपडे आणि अन्न यांविषयी नसला; तो पैसा, पैशांची चणचण, कदाचित, मित्र, मित्र नसणे आणि यातील काही नसेल तर एकंदर अवघड परिस्थिती हाही चिंतेचा विषय होतो. हे आक्रमण संथपणे होत असते आणि बघताबघता ते सर्व महापुराच्या लोंढ्याप्रमाणे चालून येईल. अर्थात त्यावर इलाज म्हणून देवाच्या आत्म्याला या सर्वाविरुद्ध आघाडी उघडण्यास मोकळीक दिली पाहिजे.

“ह्यास्तव मी तुम्हांला सांगतो की, आपल्या जीवाविषयी... चिंता करीत बसू नका...” आपण फक्त एकाच गोष्टीकडे, आपल्या त्याच्याशी असलेल्या नात्याकडे लक्ष ठेवावे. पण आमचे व्यवहारज्ञान मोठ्याने ओरडते “हे भलतेच काय! जगायचे कसे, काय खायचे, काय प्यायचे त्याचा विचार मला केलाच पाहिजे!” येशू म्हणतो तसे करण्याचे कसलेच कारण नाही. तुम्ही म्हणाल त्याचे म्हणणे ठीक आहे. पण त्याला माझी परिस्थिती माहीत आहे का? पण आमची परिस्थिती कशी काय आहे ते आमच्यापेक्षा येशूला अधिक चांगले माहीत आहे. आम्ही खाणेपिणे हेच जीवनातील इतिकर्तव्य असे समजून सतत तो एकच ध्यास घेऊन बसणे बरोबर नाही हेच येशूचे म्हणणे आहे. जीवनात हे का ते, ते का हे असे निर्णायक पेच येतात तेव्हा देवाबरोबरचे नाते सांभाळण्याकडे संपूर्ण लक्ष द्या, तेच महत्त्वाचे.

“ज्या दिवसाचे दुःख त्या दिवसाला पुरे” (६:३४). आज तुमच्यावर कोणते संकट आले आहे? तुम्हांला कसली चिंता लागली आहे? कोणती भुतावळ तुम्हांला भेडसावते आहे? तुमच्या जीवनात डोकावून कोण विचारते आहे “उद्याचे काय? महिन्याभराने काय होईल? येत्या पावसाळ्यासाठी साठवणी करुन ठेवायची ना?” या कोणत्याही गोष्टीची चिंता करु नका असे येशू सांगतो. पुन्हा पुन्हा पाहा आणि विचार करा. तुमचा स्वर्गीय पिता “विशेषेकरुन” करणार त्यावर लक्ष केंद्रित करा (६:३०).

जानेवारी २८

## “येशूचा एवढा छळ कोणी का करावा?”

**“शौला, शौला, माझा छळ का करतोस?” (प्रेषितांची कृत्ये २६:१४).**

देवासाठी जगताना आपल्या मनात येईल ते व तसे करावे असा निश्चय तुम्ही केला आहे काय? “पवित्र आत्म्याने व अग्नीने बाप्तिस्मा” झाल्याशिवाय या पेचातून आमची सुटका होणारच नाही (मत्तय ३:११). हेकेखोरपणा आणि हटवादीपणा हे येशूवर नेहमीच आघात करतात. यामुळे दुसरे कोणीच दुखावले जात नाही पण यामुळे त्याचा आत्मा नेहमी जखमी होतो. आम्ही हटवादी, आपले तेच खरे करणारे असतो. आमचीच इच्छा पुरी करु पाहतो तेव्हा आम्ही येशूला दुखावतो. आमचे हक्क मिळवण्याचा आग्रह धरतो, ते मिळावेत म्हणून हट्ट धरतो तेव्हा आम्ही त्याचा छळ करतो. जेव्हा आम्ही स्वतःवरच विसंबून राहातो तेव्हा आम्ही पद्धतशीरपणे खळबळ माजवतो आणि त्याच्या आत्म्याला खिन्न करतो. आणि आम्ही सतत येशूचाच छळ करतो आहो हे अखेरीस समजले की मग आमच्या दुःखाला पारावर उरत नाही.

देवाचे वचन मी सांगत असताना ते माझ्यामध्ये तीक्ष्ण, धारदार आणि खोलवर भेदून जाणारे आहे काय? अगर मी शिकवण्याचा बहाणा करतो आणि प्रत्यक्षात माझे जीवन तसे नाही अगदी वेगळे आहे हे उघड होते काय? मी इकडे पवित्रीकरणाचे शिक्षण देतो पण माझी स्वतःची प्रवृत्ती सैतानाची असल्याचे दाखवतो का? हाच सैतानी आत्मा येशूचा छळ करणारा आहे ना? आपण पित्याबरोबर एक आहो या एकाच सत्याची जाणीव येशूच्या आत्म्याला आहे. तो आम्हांला सांगतो “मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जूं आपणावर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे तुमच्या जीवाला विसावा मिळेल” (मत्तय ११:२९). मी जे काही करतो ते सर्व त्याच्या आणि माझ्या एकपणावर आधारलेले असावे, धार्मिक होण्याच्या स्वतःच्या हटवादीपणावर आधारलेले नसावे. याचा अर्थ हाच की दुसऱ्यांनी माझा उपयोग करुन घ्यावा, मला वगळावे, मला डावलून पुढे जावे आणि हे त्याच्यासाठी मी सोसले, सहन केले तर मी येशू ख्रिस्ताचा छळ होण्यास प्रतिबंध करीन.

## जानेवारी २९

### कोणी एवढा अज्ञानी कसा असेल!

**“प्रभो, तू कोण आहेस?” (प्रेषितांची कृत्ये २६:१५).**

“परमेश्वराने मला... बळकट धरुन बजावून सांगितले...” (यशया ८:११). आमचा प्रभू बोलतो त्यापासून सुटका कशी ती नाहीच. तो नेहमी अधिकाराने येतो आणि आमच्या जाणीवेला कह्यात घेतो. देवाची वाणी थेट तुम्हांला भिडली आहे का? भिडली असेल तर तिच्या बोलण्याचा आग्रही, जवळिकीचा सूर नक्कीच तुमच्या लक्षात आलाच असेल, तो याच प्रकारे बोलतो, तुम्हांला चांगली अवगत असणारी भाषाच तो बोलतो. तो तुमच्या कानांच्या नव्हे तर तुमच्या परिस्थिती द्वारे तुमच्याशी बोलतो.

आमच्या स्वतःच्या खात्रीवर असलेला आमचा निश्चयी भरंवसा उलथून नष्ट करणे देवाला भाग पडते. आपण म्हणतो, “मी हेच केले पाहिजे, हे मला चांगले माहीत आहे!” आणि अचानक देवाची वाणी समजते, आमच्या अज्ञानाची खोली आमच्यासमोर उघड होते. आम्ही त्याची सेवा करायची असे ठरवतो त्यातूनच त्याच्याविषयीचे आमचे अज्ञान प्रकट करतो. आम्ही येशूची सेवा करतो, त्यावेळी आमची वृत्ती त्याची नसते. त्याचे समर्थन करुन आम्ही त्याला दुखावतो. त्याचे म्हणणे, त्याचे मागणे आम्ही सैतानाच्या वृत्तीने पुढे करतो. आमचे शब्द ठीक, बरोबर असतात; पण शब्दांच्या मागाची वृत्तीप्रवृत्ती वैऱ्याची असते. “त्याने वळून त्यांस धमकावले व म्हटले ‘तुम्ही कसल्या वृत्तीचे आहा हे तुम्हांला समजत नाही’” (लूक ९:५५). आमच्या प्रभूच्या अनुयायांच्यामध्ये त्याची वृत्ती कशी कोणती असावी ते १ करिंथ १३ मध्ये सांगितले आहे.

मी माझ्या पद्धतीने येशूची सेवा करणार अशा निग्रही निश्चयाने मी त्याचा छळ तर करत नाही ना? मी माझे कर्तव्य केले असे मला वाटले आणि ते करताना त्याला दुखावले असेल तर मी माझे कर्तव्य केलेच नाही असे खात्रीने समजावे. सेवा करण्याच्या माझ्या रीतीतून सौम्य व शांत वृत्ती निपजणार नाही फक्त आत्मसंतुष्टतेची प्रवृत्तीच दिसेल. जे काही त्रासदायक तेच आमचे कर्तव्य असे आम्ही समजतो! हे आमच्या प्रभूच्या वृत्तीच्या जवळपास तरी येईल काय? तो म्हणतो, “हे माझ्या देवा, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यास मला आनंद आहे...” (स्तोत्र ४०:८).

**जानेवारी ३०**

## पेच आज्ञापालनाचा

**“हा दृष्टांत एलीस कळविण्याचे शमुवेलास भय वाटेल” (१ शमुवेल ३:१५).**

देव कधीही नाट्यमय रीतीने बोलत नाही पण सहज गैरसमजास कारण होईल अशा प्रकारे बोलत असतो. मग आपणाला वाटते, “ती खरेच देवाची वाणी होती का?” “परमेश्वराने मला आपल्या हाताने बळकट धरुन... सांगितले” असे यशयाने सांगितले (यशया ८:११). खुद्द देवाचा सार्वभौम हात नसेल तर त्याच्यापासून आमच्यापर्यंत काहीही येणार नाही. कार्य करणारा त्याचा हात आम्हांला दिसतो का? का एकंदर गोष्टी आपोआप घडतात?

“हे परमेश्वरा बोल,” असे म्हणण्याची सवय अंगवळणी पाडावी. मग आपले जीवन रोमांचक होईल (१ शमुवेल ३:९). परिस्थितीचे दडपण येते तेव्हा म्हणावे, “हे परमेश्वरा, बोल” आणि ऐकण्यासाठी वेळ द्या. देव बोलला होता त्या समयाची आठवण करा. तेव्हा त्याने काय म्हटले ते आठवते का? तो लूक ११:१३ प्रमाणे बोलला का १ थेस्सल ५:२३ प्रमाणे बोलला? आम्ही ऐकत राहिलो की आमचे कान संवेदनशील होतील आणि येशूप्रमाणे आम्हांलाही देव काय सांगतो ते सदोदित ऐकू येईल.

देवाने मला काय सांगितले ते मी माझ्या “एली”ला सांगावे का? आणि नेमका येथेच आम्हांला आज्ञापालनाचा पेच पडतो. आम्ही जणू हौशी ईश्वर होतो आणि म्हणतो मला “एलीचे” रक्षण केलेच पाहिजे. आपले “एली” म्हणजे आमच्या माहितीचे प्रतिष्ठित लोक. एलीला सांग किंवा सांगू नको असे देवाने शमुवेलाला सांगितले नाही. तो निर्णय स्वतः शमुवेलालाच घ्यावा लागला. देवाने तुम्हांला सांगितलेल्या संदेशाने तुमचा “एली” दुखावेल. पण दुसऱ्याच्या जीवनात येणाऱ्या दुःखाक्लेशाला प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नात तुम्ही स्वतः आणि देव ह्यांच्यात अंतराय निर्माण होईल. एखाद्याचा उजवा हात तोडला जाणे अगर उजवा डोळा उपटून काढणे याला तुम्ही प्रतिबंध करु पाहिलात तर त्यात तुम्हांलाच धोका आहे हे विसरु नका” (पहा मत्तय ५:२९–३०).

देवाने तुम्हांला स्वतः समोर काही ठरवण्यास सांगितले असेल तर त्याविषयी दुसऱ्या कोणाला सल्ला विचारु नका. तुम्ही सल्ला विचारलात तर बहुधा सरळ सैतानाच्या पक्षात जाल. “... तेव्हा मानवाची मसलत” घेतली नाही (गलती १:१५).

## जानेवारी ३१

### तुमचे पाचारण तुम्हांला माहीत आहे?

**“...देवाच्या सुवार्तेकरिता वेगळा केलेला...” (रोमकरांस पत्र १:१).**

आम्हांला प्रामुख्याने पवित्र पुरुष आणि स्त्रिया होण्यास नव्हे तर देवाच्या सुवार्तेची घोषणा करण्यासाठी पाचारण केले आहे. देवाची सुवार्ता हीच चिरंतन सत्यता आहे हे ओळखणे सर्वात महत्त्वाचे आहे. सत्यता म्हणजे मानवी चांगुलपणा नव्हे, पवित्रता नव्हे अगर स्वर्ग वा नरकही नव्हे. सत्यता हा उद्धार आहे हे नीट लक्षात घेणे हीच आजच्या ख्रिस्ती सेवकाची जिव्हाळ्याची गरज आहे. सेवक म्हणून तारण, उद्धार ही एकच सत्यता आहे हे प्रकटीकरण आपण आत्मसात केले पाहिजे. व्यक्तिगत पवित्रता हा तारणाचा परिणाम आहे कारण नव्हे. आपण मानवी चांगुलपणावर विश्वास ठेवला तर कसोटीची, परीक्षेची वेळ आली की आमचे अवसान नक्कीच गळणार.

आपण स्वतःच स्वतःला वेगळे केले असे पौलाने म्हटले नाही. “ज्या देवाने मला... वेगळे केले... त्याला... बरे वाटले” (गलती १:१५) असे म्हटले. पौलाला स्वतःच्या स्वभावामध्ये विशेष रस नव्हता आणि जोवर आमची दृष्टी आमच्या स्वतःच्या वैयक्तिक पवित्रतेवर खिळलेली आहे तोवर तारणाच्या परिपूर्ण सत्यतेचे आकलन आम्हांला होणार नाही. ख्रिस्ती सेवक चुकतात, अपयशी होतात कारण देवाला जाणून घेण्याच्या इच्छेपेक्षा स्वतःच्या पवित्रतेची इच्छा ते अधिक मानतात. “आज माझ्या सभोवार असलेल्या मानवी जीवनाच्या अमंगळपणावर इलाज म्हणून तारणाच्या सत्यतेवर भर देण्यास मला सांगू नका. मी माझ्या स्वतःच्या दृष्टीने अधिक वांछनीय, प्रिय व्हावे यासाठी देवाने काही करावे ही माझी इच्छा आहे.” या प्रकारचे भाषण करावे, हे देवाच्या सुवार्तेची सत्यता माझ्यापासून खूप दूर आहे, तिचा स्पर्शही अद्याप मला झालेली नाही, याचे चिन्हच आहे. यात सर्वतोपरी देवाच्या मर्जीवर सोपवून दिल्याचा लवलेशही नाही. माझे सर्व लक्ष माझ्या स्वतःच्या स्वभावावर खिळले आहे तर देव माझी सुटका, तारण करणार नाही. पौलाला स्वतःची जाणीव अजिबात नव्हती. तो देवाला पूर्णपणे समर्पित सर्वस्वी त्याच्या अधीन झालेला व देवासाठी वेगळा झालेला होता. त्याच्या मनीमानसी देवाच्या सुवार्तेची घोषणा करणे हा एकच उद्देश होता (पहा रोम ९:३).

**फेब्रुवारी १**

## देवाचे पाचारण

**“ख्रिस्ताने मला बाप्तिस्मा करावयास नाही तर सुवार्ता सांगावयास पाठवले...” (१ करिंथ १:१७).**

देवाचे पाचारण सुवार्ता सांगण्यासाठी आहे असे पौलाने येथे सांगितले आहे, पौलाच्या लेखी “सुवार्ता” म्हणजे काय ते समजून घेतले पाहिजे. आमच्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये पापमुक्तीची सत्यता हीच सुवार्ता आहे. पवित्रीकरण हेच आमच्या उपदेशाचे उद्दिष्ट करण्याकडे आमचा कल असतो. पौल वैयक्तिक अनुभवाचा उल्लेख उदाहरण म्हणून करतो उद्दिष्ट म्हणून नव्हे. तारणाचा अगर पवित्रीकरणाचा संदेश देण्यासाठी आमचे पाचारण नाही. येशू ख्रिस्ताला उंच करावे यासाठी आम्हांला पाचारण आहे (पहा योहान १२:३२). मला पवित्रजन करण्यासाठी तारणामध्ये येशू ख्रिस्ताने परिश्रम केले असे म्हणणे अन्यायाचे आहे. येशू ख्रिस्ताने संपूर्ण जगाच्या मुक्तीसाठी आणि ते पुन्हा संपूर्णपणे पूर्ववत करुन देवाच्या राजासनासमोर सादर करण्यासाठी परिश्रम केले. आम्हांला तारणाचा अनुभव येतो यावरुन त्याच्या सत्यतेच्या सामर्थ्याची खात्री पटते; परंतु हा अनुभव केवळ अनुषंगिक आहे, तो काही तारणाचा उद्देश नाही. देव मनुष्य असता तर तारण आणि पवित्रीकरण व्हावे यासाठी अखंडपणे होणाऱ्या आमच्या विनवण्या आणि प्रार्थना ऐकून ऐकून त्याला कंटाळा आला असता. आपल्या स्वतःसाठी अनेक वस्तू मागून घेऊन आणि अमुकतमुक गोष्टीपासून आम्हांला सोडव, आमची सुटका कर असे रात्रंदिवस सांगून आम्ही त्याच्या सामर्थ्यावर ओझी लादतो! पण देवाच्या सुवार्तेच्या सत्यतेचा आधार काय आहे ते आम्हांला समजले की आमच्या किरकोळ खासगी कुरकूरी, तक्रारी आणि मागण्या सांगून त्याला त्रास देणार नाही.

देवाच्या सुवार्तेची घोषणा करणे ही पौलाची एकच उत्कट इच्छा होती. याच एका उद्देशाच्या परिपूर्तीसाठी त्याने, निराशा, मनोभंग, छळणूक वगैरे सर्व धीराने सोसले आणि काही झाले तरी देवाच्या सुवार्तेवर निष्ठा ठेवून तो ठाम राहिला.

## पाचारणाची अटळ शक्ती

**“मी सुवार्ता सांगितली नाही तर माझी केवढा दुर्दशा होणार!” (१ करिंथ ९:१६).**

देवाचे पाचारण ऐकण्यास चुकू नका, दक्ष राहा. तारण पावलेल्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या तारणाची साक्ष देण्यासाठी पाचारण केले आहे. अर्थात हे पाचारण वेगळे आणि उपदेश, संदेश सांगण्यासाठी पाचारण वेगळे. उपदेश करताना उपयोगी पडेल असे हे केवळ उदाहरण आहे. या वचनामध्ये पौलाने सुवार्ता सांगण्याच्या सक्तीच्या पाचारणाने त्याच्या जिवाला लागलेल्या ओढीचा उल्लेख केला आहे. देवाने त्यांना तारणासाठी पाचारण केले आहे. त्यांना सुवार्ता सांगण्याच्या पाचारणाविषयी पौलाने म्हटले आहे ते लागू करण्याचा प्रयत्न करु नका. तारणप्राप्ती करुन घेण्याएवढे दुसरे सोपे काहीच नाही. कारण ते देवाचे सार्वभौम कार्य आहे. “मजकडे वळा आणि उद्धार पावा...” (यशया ४५:२२). आमच्या प्रभूने शिष्य होण्यासाठी ठेवलेली अटच तारणासाठी ठेवलेली नाही. ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या द्वारे आम्हांला तारण मिळते. पण शिष्य होण्यासाठी त्याबरोबर एक पर्याय असतो; “जर कोणी...” (लूक १४:२६).

पौलाचे सांगणे आम्हांला येशू ख्रिस्ताचे दास, सेवक करण्यासंबंधात आहे. आम्ही सेवक होणार का, कुठे जाणार, काय करणार याविषयी आम्हांला विचारलेलेच नाही. देव स्वतःला संतुष्ट करण्यासाठी आम्हांला मोडलेली भाकर आणि ओतलेला द्राक्षारस असे करतो. “सुवार्तेसाठी वेगळे केलेले” म्हणजे देवाचे पाचारण ऐकण्यास सिद्ध केलेले (रोम १:१). कोणालाही हे पाचारण ऐकू आले की अंतरंगात ख्रिस्ताच्या नावाला साजेल अशी क्लेशकारक ओढ लागते. एकाएकी प्रत्येक इच्छा, आकांक्षा, जीवनातील प्रत्येक वासना आणि प्रत्येक दृष्टी हे सर्व पूर्णपणे पुसून विझवले जाते. आणि “सुवार्तेसाठी वेगळे केलेले,” एवढेच काय ते उरते. एकदा हे पाचारण आले की मग ती दिशा सोडून अन्य दिशेला वळणाऱ्या जिवाची दुर्दशाच होणार! देवाची सुवार्ता सांगावी अशी खरोखरी तीव्र इच्छा असणारा/री पुरुष अथवा स्त्री आहे का नाही हे आपल्या प्रत्येकाला समजावे आणि हेच बायबल ट्रेनिंग कॉलेजच्या अस्तित्वाचे प्रयोजन आहे. देवाच्या पाचारणाने तुमच्या मनाची पकड घेतली की त्यात अन्य पाचारणांचे अडथळे येऊ नयेत याविषयी सावध राहा.

**फेब्रुवारी ३**

## “जगाचा गाळ” होणे

**“आम्ही जगाचा गाळ असे आजपर्यंत झालो आहो” (१ करिंथ ४:१३).**

हे शब्द काही अतिशयोक्ती नाहीत. आम्ही स्वतःला सुवार्तेचे सेवक समजतो. आमच्या बाबतीत हे शब्द खरे नसण्याचे एकच कारण आहे. ते असे, या शब्दांचे नेमके सत्य पौल विसरला किंवा त्याचा गैरसमज झाला हे नसून आम्ही खूपच सावध व दक्ष असतो, आमच्या इच्छा सांभाळण्यात आम्हांला रस आहे आणि आम्ही “जगाचा गाळ” होण्याचे नाकारतो हे कारण आहे. “... ख्रिस्ताच्या क्लेशातले जे उरले आहे ते मी आपल्या देहाने... भरुन काढीत आहे” (कलस्सै १:२४). हा पवित्रीकरणाचा परिणाम नाही तर वेगळे झाल्याचा पुरावा आहे. “देवाच्या सुवार्तेला वेगळा केलेले...” (रोम १:१).

“प्रियजनहो, तुमची पारख होण्यासाठी जी अग्निपरीक्षा तुम्हांवर आली आहे तिच्यामुळे आपणांस काही अपूर्व झाले असे वाटून त्याचे नवल मानू नका” (१ पेत्र ४:१२). आमच्यासमोर येणारे सर्व चमत्कारिक आहे असे म्हटले तर आपण भित्रे बुजरे आहो हेच त्याचे कारण आहे. आम्ही स्वतःच्या इच्छा आणि वासना यांच्याकडे एवढे लक्ष देतो की आम्ही चिखलाला स्पर्शही करत नाही आणि म्हणतो, “मी वश होणार नाही, नमणार नाही, वाकणार नाही. ताठ राहणार” आणि असे करण्याची सक्ती नाहीच. तुमचे कसेबसे तारण होईल! “सुवार्तेसाठी वेगळा केलेला” अशी तुमची देवाने गणना करण्यास तुम्हांला नकार देता येईल किंवा तुम्हांला असेही म्हणता येईल “मला जगाचा गाळसाळ समजले तरी हरकत नाही सुवार्तेची घोषणा होणे महत्त्वाचे आहे.” देवाच्या सुवार्तेच्या सत्यतेसाठी रक्तसाक्षी होण्यास येशू ख्रिस्ताचा खरा सेवक आनंदाने तयार असतो. एखाद्या नैतिक व्यक्तीवर तिरस्काराने अनीती, बेईमानी, खोटेपणा यांचे आरोप केले तर तो/ती निराशेने तोंड फिरवतो आणि असे आरोप करणाऱ्याकडे अजिबात लक्ष देत नाही. परंतु देवाच्या तारणदायी सत्यतेचे अद्भुत पाहा, अतिशय दीन आणि अधम अपराध्यालाही त्याच्या अथांग प्रीतीचा थांग लागणार नाही. माझ्यामधून एक उत्तम नव्या नवलाचा माणूस करावा यासाठी नव्हे तर, *“आपल्या पुत्राला माझ्याठायी प्रगट करावे”* म्हणून असे पौलाने म्हटले आहे (गलती १:१६).

**फेब्रुवारी ४**

## त्याच्या सामर्थ्याचे बळेच वश करणारे वैभव

**“ख्रिस्ताची प्रीती आम्हांला आवरुन धरते”** (२ करिंथ ५:१४).

पौलाने म्हटले ख्रिस्ताच्या प्रीतीने मला दाबले, दडपले, नमवले, जणू पकडीत पकडले आहे. देवाच्या प्रीतीच्या पकडीत गच्च धरले जाणे म्हणजे काय ते आपल्यापैकी क्वचितच कोणी जाणते. अनेकदा आपण आपल्या अनुभवाच्याच कबजाता असतो. इतर कोणत्याही नाही पण फक्त एकाच गोष्टीने, देवाच्या प्रीतीने पौलाला पकडीत धरले होते. “ख्रिस्ताची प्रीती आम्हांला आवरुन धरते...” एखाद्या स्त्रीच्या अगर पुरुषाच्या जीवनातून कानी पडणारे हे शब्द अगदी अचूक असतात. त्या व्यक्तीच्या जीवनात देवाच्या प्रीतीचा मुक्त संचार आहे हे पक्के समजावे.

देवाच्या आत्म्याने आम्ही नव्याने जन्मतो तेव्हा आमची साक्ष देवाने आमच्यासाठी केले त्यावरच सर्वथा आधारलेली असते; आणि ते यथार्थच आहे. परंतु “पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल...” (प्रे. कृ. १:८). आणि मग सर्व बदलेले, ते पूर्वीचे तुमच्यापासून कायमचे दूर केले जाईल. मग तेव्हाच “... तुम्ही माझे साक्षी व्हाल” असे येशू पुढे म्हणाला त्याचा अर्थ तुम्हांला समजू लागेल. येशू काय करु शकतो त्याचे साक्षी नाही कारण ते तर आधारभूत व सर्वश्रुत आहे. पण “... माझे साक्षी...” व्हाल. घडणाऱ्या सर्व गोष्टी जणू त्यालाच घडत आहेत असे आम्ही समजू. आम्हांला शिव्या मिळाल्या, ओव्या मिळाल्या, छळ झाला, शाबासकी मिळाली, बक्षीस मिळाले तर ते सर्व त्यालाच मिळाले आहे. येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याच्या वैभवाने ज्याला सर्वस्वी आवरुन वश केले आहे तोच त्याच्यासाठी हा पवित्रा घेऊन ठाम उभा राहिल, अन्य कोणालाही ते जमणार नाही. फक्त हीच गोष्ट महत्त्वाची आहे आणि आम्हा ख्रिस्ती सेवकांना हे सर्वात शेवटी उमगते हेही एक नवलच आहे. आपणाला देवाच्या प्रीतीने पकडले आहे, असे पौल म्हणतो; आणि त्यामुळेच त्याने केले ते तो करु शकला. लोकांनी आपल्याला शहाणा म्हटले वेडा म्हटले तरी त्याची त्याला पर्वा नव्हती. देवाच्या येणाऱ्या न्यायाविषयी लोकांना सावध करावे आणि “ख्रिस्ताच्या प्रीती”विषयी सांगावे हेच त्याचे इतिकर्तव्य होते. “ख्रिस्ताच्या प्रीतीला” संपूर्णपणे समर्पित असल्यानेच तुमच्या जीवनातून फळ मिळेल आणि त्यावर नेहमी देवाच्या पावित्र्याचा आणि सामर्थ्याचा शिक्का असेल तेथे तुमच्या व्यक्तिगत पवित्रतेची निशाणीही आढळणार नाही.

**फेब्रुवारी ५**

## तुम्ही यज्ञार्पण म्हणून अर्पिले जाण्यास तयार आहा?

**“तुमच्या विश्वासाचा यज्ञ व सेवा होताना जरी मी स्वतः अर्पिला जात आहे तरी मी त्याबद्दल आनंद मानतो व तुम्हा सर्वांबरोबर आनंद करितो” (फिलिप्पै २:१७).**

दुसऱ्या विश्वासणाऱ्याच्या कामासाठी तुम्ही स्वतःचे अर्पण होऊ देण्यास तयार आहात का? दुसऱ्यांचा विश्वास आणि सेवाकार्य यासाठी पेयार्पण म्हणून आपले जीवन ओतण्यास तुमची तयारी आहे का? किंवा तुम्ही असे तर म्हणत नाहीना आता या क्षणाला अर्पिला जाण्यास मी तयार नाही आणि देवाची सेवा कशी करावी हे त्याने मला सांगू नये. माझ्या अर्पणाची जागा आणि समय माझा मी ठरवणार. त्यावेळी काही ठराविक लोकांनी माझे अर्पण पाहून, “वा! वा! भले शाबास!” असे म्हटले पाहिजे.

वीर पुरुष म्हणून तुमची संभावना होत असेल तर देवाने नेमलेल्या सेवेच्या मार्गाने चालणे ठीक वाटते. पण देवाने तुमच्यासाठी नेमलेला सेवेचा मार्ग धरला तर त्यात तुम्हांला लोकांच्या पायाखालचे “पायपुसणे” होण्याची वेळ आली तर त्यासाठी तयारी आहे ना? “दैन्यावस्थेत राहणे मला समजते…” (फिलिप्पै ४:१२) असे म्हणण्यास तुम्हांला शिकवावे हा देवाचा उद्देश असेल कदाचित. या प्रकारे अर्पिले जाण्यास तुम्ही तयार आहात? पाण्याच्या एका थेंबाएवढेही स्वतःचे मोल नाही असे गणून घेण्याची तुमची तयारी आहे? तुम्ही ज्यांची सेवा केलीत त्यांचे स्मरण लोक करतात पण सेवा करणारे तुम्ही लोकांच्या खिजगणतीत नाही एवढे नगण्य, शून्याहून कमी होण्यास तुम्ही तयार आहात? देत राहण्यात, शेवटचा बिंदू असेपर्यंत ओतले जाण्यास तुमची तयारी आहे? अंगात त्राण उरले नाही तरी सेवा करीत राहण्यास राजी आहात? सेवा करुन घेणे नव्हे तर सेवा करणे हेच तुमचे उद्दिष्ट आहे काय? काही पवित्र जनांना आपली पवित्र वृत्ती शाबूत ठेवून हलकी कामे करता येत नाहीत कारण अशी सेवा करणे आपल्या पवित्र प्रतिष्ठेला शोभणारे नाही असे त्यांना वाटते.

**फेब्रुवारी ६**

## यज्ञार्पण म्हणून अर्पिले जाण्यास तयार आहा?

**"कारण आता माझे अर्पण होत आहे..." (२ तीमथ्य ४:६).**

अर्पण म्हणून ओतले जाण्यास तुम्ही तयार आहात? हे तुमच्या भावनेने नव्हे तर इच्छेने करावयाचे कार्य आहे. आपण देवासाठी अर्पिले जाण्यास तयार आहो हे त्याला सांगा. मग कसलीही तक्रार, कुरकूर न करता होणाऱ्या परिणामांचा स्वीकार करा. देव तुम्हांला खासगीतच पेच प्रसंगातून नेतो. देव तुमच्या वाट्याला आणील ते सर्व परिणाम मान्य करा. देवाने आणलेल्या पेचातून दुसरे कोणीही तुमच्या मदतीला येणार नाही. बाहेरुन तुमचे जीवन आहे तसे ठीक दिसेल; पण जो काही फरक होतो आहे तो तुमच्या इच्छाशक्तीत आहे. इच्छेमध्ये पेचाचा अनुभव आला की मग त्याचा बाहेरुन काय परिणाम होईल, त्यासाठी किती किंमत पडेल याचा विचारही तुम्ही करणार नाही. तुमच्या इच्छेच्या पातळीवर प्रथम तुम्ही देवाबरोबर सहकार्य केलेत तर ठिक, नाहीतर परिणामी तुम्हांला तुमचीच कीव करणे भाग पडेल.

"उत्सवाचा यज्ञपशू वेदीच्या शिंगांना दोऱ्यांनी बांधा"(स्तोत्र ११८:२७). वेदीवर ठेवले जाण्यास आनंदाने तयार व्हा, विस्तवातून जाण्यास तयारीत असा. वेदीवरुन सूचित होणारे सर्व हवन, शुद्धीकरण आणि वेगळे होणे अनुभवण्यास सामोरे जा. देवाच्या दिशेने नसलेले सर्व विचार, उद्देश आणि इच्छा नाहीशी करण्यास हयगय करु नका. पण हे काढून टाकणे तुम्हांला जमणार नाही, देवच ते करील. तुम्ही फक्त "यज्ञपशू दोऱ्यांनी वेदीच्या शिंगांना बांधा" आणि अग्नी प्रज्वलित केला की आत्मदयेच्या चिखलात स्वतःची कीव करत लोळू नका. एकदा अग्निपरीक्षा झाली की मग तुम्हांला उदास, निराश करुन त्रास देईल असे काहीही उरणार नाही. पुन्हा नव्याने पेचप्रसंग आला तर पूर्वीप्रमाणे आता तो तेवढा तीव्र असणारच नाही. तुमच्या जीवनात पुढे कोणती अग्निपरीक्षा आहे?

आपण अर्पण म्हणून ओतले जाण्यास तयार आहो हे देवाला सांगा आणि देवाविषयी तुम्ही पाहिलेली सर्व स्वप्ने तंतोतंत तशीच आहेत हे तुम्हांला प्रत्यक्ष अनुभवाने समजेल.

**फेब्रुवारी ७**

## आध्यात्मिक निराशा

**“परंतु इस्राएलाची मुक्ती करणारा तो हाच आशी आमची आशा होती. शिवाय ह्या सर्व गोष्टी झाल्याला आज तिसरा दिवस आहे” (लूक २४:२१).**

या शिष्यांनी सांगितलेली सर्व वस्तुस्थिती बरोबर होती; परंतु त्यातून त्यांनी काढलेले निष्कर्ष मात्र अयोग्य होते. आध्यात्मिक दृष्टीने निराशेस कारण होणारी प्रत्येक गोष्ट चुकीची असते. माझ्या मनावर काही दडपण असेल तर त्याचा दोष माझ्यावरच आहे, देवावर किंवा अन्य कोणावर नाही. निराशा दोन कारणांनी येते, एकतर मी माझी वासना पूर्ण केलेली असते अगर तिचे समाधान केलेले नसते. दोन्ही बाबतीत निराशा हा एकच परिणाम होतो. वासना म्हणजे “आताच्या आता माझे समाधान करा!” आध्यात्मिक वासना म्हणजे “मला देवाकडून उत्तर हवे” वास्तविक पाहता आपण देवाचा शोध करावा. तोच उत्तर देतो. देव काय करील अशी मला आशा आणि भरवंसा आहे? तो “तिसरा दिवस” आज आहे का? माझ्या अपेक्षेप्रमाणे त्याने अद्याप केले नाही का? मग मी निराश होऊन देवाला दोष देणे योग्य आहे का? देवाने आमच्या प्रार्थनेचे उत्तर दिलेच पाहिजे असा आग्रह धरला तर आमची वाट चुकलीच आहे, तोल ढळला आहे असे समजावे. आपण देवाच्या सान्निध्यात राहावे हाच प्रार्थनेचा उद्देश आहे. त्यासाठीच प्रार्थना करायची, उत्तर मिळवण्यासाठी नव्हे. शारीरिक दृष्टीने ठीकठाक असणे आणि मनात निराशा असणे हे केवळ अशक्य कारण निराशा, उदासीनता हे आजाराचे लक्षण आहे. आध्यात्मिक दृष्टीनेही हे खरेच आहे. आध्यात्मिक दृष्टीने निराशा चूकच आहे आणि त्याचा दोष आमच्यावरच आहे.

स्वर्गातून दृष्टांत येण्याची वाट आम्ही पाहतो, देवाचे सामर्थ्य पाहण्यासाठी आम्हांला पृथ्वी  हलवून सोडणारे चमत्कार हवे असतात आणि आमची निराशा हेच आमच्या या अपेक्षेचे प्रमाण आहे. परंतु आमच्या आसपासचे लोक आणि दररोज घडणाऱ्या सामान्य घटना यांच्यातून देव कार्य करतच असतो हेच आमच्या लक्षात येत नाही. आम्ही आज्ञापालन केले आमच्या अगदी हाताशी असलेले काम आम्ही केले तर आम्ही त्याला पाहू. जीवनातील रोजच्या व्यवहारातून पुढे येणाऱ्या सर्वसामान्य गोष्टीतून येशू ख्रिस्ताचे वैभवी देवत्व प्रकट होते हे समजणे देवाचे अद्भुत प्रकटीकरणच आहे!

**फेब्रुवारी ८**

## पवित्रीकरणाची किंमत

**“शांतीचा देव स्वतः तुम्हांस पूर्णपणे पवित्र करो...” (१ थेस्सल ५:२३).**

आम्ही प्रार्थनेतून आम्हांला पवित्र कर अशी देवाला विनंती करतो तेव्हा त्याचा वास्तविक अर्थ काय आहे व तो आपणाला पूर्ण करता येईल का असा विचारही करत नाही. *पवित्रीकरण* हा विषय आम्ही अगदी सहजपणे घेतो. पवित्रीकरणाचे मोल मोजण्यास आमची तयारी आहे का? यासाठी आमच्या सर्व लौकिक, प्रापंचिक इच्छा, आकांक्षा यांच्यावर कडक नियंत्रण ठेवणे हीच किमंत द्यावी लागते. एवढे झाल्यावर आमच्या सात्विक, देवविषयक इच्छा, आकांक्षा यांची जोपासना करणे अगत्याचे आहे. पवित्रीकरण म्हणजे देवाच्या विचारदृष्टीवर आपली दृष्टी सर्वस्वी केंद्रित करणे. आमचा देह, जीव व आत्मा यांच्या सर्व शक्ती केवळ देवाच्या कारणासाठी राखून ठेवणे हीही पवित्रीकरणाची किंमत आहे. देवाने आम्हांला ज्यासाठी वेगळे करुन ठेवले आहे ते सर्व देवाला आमच्यामध्ये करु देण्यास आमची तयारी आहे काय? तसेच त्याने आपले कार्य पूर्ण केल्यास येशूप्रमाणे देवासाठी स्वतःला वेगळे करण्यास तयार आहोत काय? “मी... त्यांच्याकरता स्वतःला समर्पित करतो” (योहान १७:१९). आमच्यापैकी काहीजणांनी पवित्रीकरणाचा अनुभव घेतलेला नाही, याचे कारण हेच की देवाच्या दृष्टीने पवित्रीकरणाचा अर्थच आम्हांला समजलेला नसतो. पवित्रीकरण म्हणजे येशूबरोबर एक करण्यात येणे म्हणजे त्याचे नियंत्रण करणारा स्वभाव आमचेही नियंत्रण करील. त्यासाठी मोजावी लागणारी किंमत देण्यास आम्ही तयार आहो काय? त्यासाठी जे देवाचे नाही ते किंमत म्हणून संपूर्णपणे द्यावे लागेल.

वरील वचनातील पौलाच्या प्रार्थनेमध्ये सर्वस्वी, समरस होण्यास आम्ही तयार आहोत? “हे प्रभू मला, कृपेने तारण मिळालेल्या या पाप्याला, तू शक्य त्या सर्व प्रकारे पवित्र कर” असे मनापासून विनवण्यास आम्ही तयार आहोत का? येशू पित्याबरोबर एक आहे. तसे आम्हीही त्याच्याबरोबर एक व्हावे यासाठी त्याने प्रार्थना केली (पहा योहान १७:२१–२३). एखाद्याच्या जीवनामध्ये पवित्र आत्म्याच्या प्रभावाचे निखळ प्रमाण म्हणजे येशू ख्रिस्ताशी समरुप असल्याचे दिसणे. आमच्यामध्ये पवित्र आत्म्याचे कार्य व्हावे यासाठी स्वतःला वेगळे करुन ठेवण्यास आम्ही तयार आहो काय?

## तुम्ही आध्यात्मिक दृष्टीने थकला आहात काय?

**“परमेश्वर हा सनातन देव... थकतभागत नाही” (यशया ४०:२८).**

दमणे थकणे म्हणजे आमचा जोम, उत्साह व ताकद पूर्णपणे संपणे, अंगात त्राण न उरणे. आध्यात्मिक दमणूक पापाने नव्हे तर सेवेने होते. तुमच्या गरजा कोठून कशा भागतात त्यावरच तुमचे दमणे, थकणे अवलंबून असते. “माझ्या मेंढरांस चार,” असे येशूने पेत्राला सांगितले (योहान २१:१७). पण मेंढरांना चारण्यास येशूने पेत्राला काहीही दिले नाही. भाकर मोडणे व द्राक्षारस ओतणे या प्रक्रिया होणे म्हणजे तुम्हीच दुसऱ्या लोकांच्या जीवात्म्यांचे पोषण होणे. ते स्वतः देवाकडून पोषण घेण्यास शिकेपर्यंत तुम्हीच त्यांचे पोषण असाल. तुमच्यामध्ये अगदी अखेरचा बिंदू असेपर्यंत ते तुमच्यापासून स्वतःचे पोषण करुन घेतील. पण तुमच्याकडील पोषक पुरवठा पुन्हा पूर्ववत भरावा नाहीतर तुम्ही पूर्णपणे थकाल, तुमचा शक्तिपात होईल. दुसरे लोक थेट प्रभू येशूच्या जीवनातून स्वतःचे पोषण करण्यास शिकतील तोपर्यंत त्यांना तुमच्या जीवनाचे पोषण घ्यावे लागेल. त्याची कोकरे व मेंढरे आणि तो स्वतः, ह्यांच्यासाठी आमचे सर्वोत्तम तेच देणे हे आमचे परमकर्तव्य आहे. या संबंधात आम्ही देवाचे ऋणी आहो.

देवाची सेवा करताकरता तुम्ही थकला आहात? स्वतःला रिक्त केले आहे? तर मग तुमच्या इच्छा, आशा वगैरे सर्वांचे नवीकरण होऊ दे. सेवा करण्याची कारणे कोणती ते जाणून घ्या. हे कारण तुमच्या स्वतःच्या समजुतीवर आधारले आहे? तुमची प्रीती व भक्ती यांच्या आधाराकडे सतत मागे वळून पाहा. तुमच्या शक्तीचा उगम कोठे आहे ते लक्षात घ्या. “हे प्रभू मी एवढा थकलो आहे की काय सांगू!” अशी कुरकूर करण्याचा हक्क तुम्हांला नाही. तुम्ही सेवा करुन दमावे, थकावे याचसाठी त्याने तुमचे तारण केले, तुम्हांला वेगळे करुन पवित्र केले आहे. देवासाठी जरुर धावपळ करुन थकून भागून जा. पण लक्षात ठेवा तुमच्या सर्व गरजा पुरवणारा तोच आहे. “माझे सर्व उगम तुझ्याचठायी आहेत” (स्तोत्र ८७:७).

**फेब्रुवारी १०**

## देवाला पाहण्याची तुमची शक्ती अंधारली आहे काय?

**"आपले डोळे वर करुन पाहा; ह्यांना कोणी उत्पन्न केले?" (यशया ४०:२६).**

यशया संदेष्ट्याच्या काळामध्ये मूर्तींच्या तोंडाकडे पाहून पाहून लोकांच्या कल्पनाशक्तीची उपासमार झाली होती. परंतु यशयाने त्यांना वर आकाशाकडे पाहण्यास लावले. आम्ही देवाची मुले असलो तर आमच्यासाठी निसर्गामध्ये प्रचंड भांडार आहे, ते शुद्ध व पवित्र आहे हे आपल्याला उमगेल. वाऱ्याच्या प्रत्येक झुळकीतून देव आम्हांला स्पर्श करतो. प्रत्येक सूर्योदय व सूर्यास्त, आकाशातील ढग, प्रत्येक उमलणारे फूल, कोमेजणारे पान यांच्यातून देव आमच्याबरोबर संपर्क साधत असतो. परंतु आमची बधिर झालेली कल्पनाशक्ती वापरु लागलो आणि त्याचे चित्र मनात उभे केले तर हे सर्व आपणाला समजेल.

आपले सर्व विचार व कल्पना नियंत्रणात ठेवणे हीच आत्मिकदृष्टी केंद्रित केल्याची कसोटी आहे. तुमचे चित्त मूर्तीच्या मुखावर खिळले आहे ? ही मूर्ती तुम्ही स्वतः आहात? हे तुमचे काम आहे? सेवकाने कसे असावे त्याविषयी ही तुमची कल्पना आहे? हा तुमचा तारणाचा पवित्रीकरणाचा अनुभव आहे? तसे असेल तर देवाला पाहण्याची तुमची क्षमता आंधळी झाली आहे. संकटे, अडचणी आल्या की हतबल होऊन तुम्हांला अंधारात चाचपडावे लागेल. तुमची दृष्टी अंधारली असेल तर तुमच्या अनुभवाकडे न पाहता देवाकडे पहा. तुम्हांला देवाची गरज आहे. स्वतःपलीकडे पहा. तुमच्या मूर्तींच्या तोंडांकडे पाहू नका. तुमच्या विचारांना, कल्पनांना अंध करणारी प्रत्येक गोष्ट दूर ठेवा. जागे व्हा. उठा आणि यशयाने केलेली कानउघाडणी मनावर घ्या. तुमचे विचार आणि दृष्टी मुद्दाम देवाकडे वळवा.

प्रार्थनेमध्ये व्यर्थता वाटयाला येते याचे एक कारण आम्ही आपली कल्पनाशक्ती गमावली आहे. स्वतःला निश्चयाने देवासमोर ठेवण्याची कल्पनाही करवत नाही. दुसऱ्यांबरोबर व्यक्तिगत संपर्क साधण्यापेक्षा मध्यस्थी करण्याच्या संबंधात मोडलेली भाकर व ओतलेला द्राक्षारस होणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या स्वतःपलीकडे जाता यावे आणि आजवर कधी न अनुभवलेले नातेसंबंध समजावे, त्यात स्थिर व्हावे यासाठीच देव पवित्रजनांना कल्पनाशक्ती देतो त्यामुळे शरीराची दृष्टी थकली तरी मनाच्या नेत्रांनी सर्व पाहता येते.

**फेब्रुवारी ११**

## तुमचे मन देवावर स्थिर झाले आहे?

**“ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्यास तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुजवर असतो” (यशया ४०:३).**

तुमचे मन देवावर स्थिर झाले आहे का त्याची गळचेपी झाली आहे? हयगय केल्याने मनाची उपासमार होते, सेवकाला जीवनात दुबळेपण व थकवा सोसावा लागतो. स्वतःला देवासमोर ठेवण्यासाठी आपल्या मनाचा उपयोग कधीच केला नसेल तर तसे करण्याची सुरुवात आताच करा. देवाने तुमच्याकडे येण्याची वाट पाहण्याचे काहीच कारण नाही. तुमचे विचार आणि नेत्र मूर्तींवरुन काढा, देवाकडे वळा आणि उद्धार पावा (यशया ४५:२२).

तुमचे सर्जनशील मन ही देवाने दिलेली सर्वात मोठी देणगी आहे आणि ती सर्वस्वी त्यालाच समर्पण केली पाहिजे. आपण “प्रत्येक कल्पना अंकित करुन तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास...” लावावी (२ करिंथ १०:५). संकटे परीक्षा येतील तेव्हा हीच तुमची जमेची बाजू, विश्वासाची ठेव असेल. तेव्हा तुमचा विश्वास व देवाचा आत्मा एकत्र मिळून कार्य करतील. तुमचे विचार, कल्पना देवाच्या योग्यतेचे होतील तेव्हा त्यांची तुलना निसर्गात घडणाऱ्या सर्व गोष्टींशी करा. उदाहरणार्थ, सूर्योदय व सूर्यास्त, चंद्र व चांदणे, ऋतुबदल वगैरे. तुमचे विचारही देवाकडून येतात हे तुम्हांला जाणवेल. मग तुमचे मन उतावळ्या विचारांच्या दावणीला बांधलेले न राहता नेहमी देवाच्या सेवेसाठी उपयोगी पडेल.

“आम्ही आमच्या पूर्वजांप्रमाणे पाप केले आहे... (आणि)... तुझ्या दयेच्या कृत्यांचे स्मरण केले नाही” (स्तोत्र १०६:६, ७). मग आपली स्मृती जागवा. “पण देव आता माझ्याशी बोलत नाही” असे म्हणून नका. तो बोलेलच. तुम्ही कोणाचे आहा, कोणाची सेवा करता ते लक्षात घ्या. आपल्या स्मरणशक्तीला उत्तेजन द्या. देवावरील तुमचे प्रेम दसपटीने वाढेल, तुमच्या मनाची आता गळचेपी होणार नाही, उपासमारीने ते हैराण होणार नाही. ते ताजेतवाने, उत्साही होईल आणि आशा अवर्णनीय तेजाने झळकत राहील.

फेब्रुवारी १२

## तुम्ही देव सांगतो ते ऐकता आहात ना?

**ते मोशेला म्हणाले, "आमच्याशी तूच बोल, म्हणजे आम्ही ऐकू,देव आमच्याशी न बोलो, तो बोलला तर आम्ही मरु" (निर्गम २०:१९).**

आम्ही जाणीवपूर्वक, जाणून बुजून देवाची अवज्ञा करत नाही. आम्ही सरळ त्याचे ऐकतच नाही. देवाने आमच्यासाठी आपल्या आज्ञा दिल्या आहेत, पण आम्ही त्याकडे दुर्लक्ष करतो. त्याची अवज्ञा करण्यासाठी वा मुद्दाम त्याच्या आज्ञा मोडाव्या म्हणूनही नव्हे. आम्ही खरोखर त्याच्यावर प्रीती करत नाही त्याचा मान ठेवत नाही हेच त्याचे कारण आहे. "माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल"(योहान१४:१५). आम्ही सतत देवाचा अवमान करतो हे लक्षात आले तर त्याची उपेक्षा केल्यामुळे आम्हाला स्वतःची लाज वाटेल.

"आमच्याशी तूच बोल,... देव आमच्याशी न बोलो,..." देवाचे नाही तर त्याच्या सेवकांचे ऐकणे पसंत करुन देवावर आमची प्रीती नाही हेच आम्ही दाखवतो. वैयक्तिक साक्षी ऐकणे आम्हांला आवडते पण स्वतः देवाने आमच्याशी बोलावे हे आवडत नाही. देव आमच्याबरोबर बोलला तर त्यात एवढे घाबरण्यासारखे काय आहे? देव आमच्याशी बोलेल तेव्हा एकतर तो सांगतो त्याप्रमाणे करणे आम्हांला भाग आहे अगर आज्ञा पाळणार नाही असे त्याला स्पष्टपणे सांगितले पाहिजे. पण देवाचे सेवक आमच्याशी बोलतात ते सरळ सोपे असते. त्यात आज्ञापालनाची सक्ती नसते, आज्ञा पाळा वा न पाळा. आपण म्हणतो "तुम्ही सांगता तो तुमचाच विचार आहे. पण देवाचे सत्य बहुधा हेच, असेच असेल हे मी नाकारीत नाही".

देवाची उपेक्षा करुन मी सतत त्याचा अपमान करतो आहे काय? तो मात्र सर्व वेळ मला स्वतःचे मूल म्हणून प्रेमाने वागवतो आहे! अखेरीस एकदा जरी मी त्याचे ऐकले तर त्याच्यावर मी लादलेले अपमानाचे ओझे माझ्याच माथ्यावर येते. मग पश्चात्तापी अंतःकरणाने मी म्हणतो, "हे प्रभू, मी एवढा भावनाशून्य आणि उद्धट व हेकट का बरे होतो?" देवाचे ऐकले की त्याचा नेहमी हाच परिणाम होतो. अखेर त्याचे ऐकल्याने होणारा आनंद त्याचे लवकर न ऐकल्याबद्दल वाटणाऱ्या शरमेने फिका पडतो.

**फेब्रुवारी १३**

## निष्ठापूर्वक ऐकणे

**"शमुवेल म्हणाला, 'बोल, तुझा दास ऐकत आहे'" (१ शमुवेल ३:१०).**

देवाने सांगितलेली एक गोष्ट मी नीट, काळजीपूर्वक लक्ष देऊन ऐकली आहे. म्हणजे तो सांगेल ते सर्व मी ऐकेनच असे नाही. तो सांगतो तिकडे लक्ष न दिल्याने त्याच्यावर माझी प्रीती नाही, मी त्याचा आदर करीत नाही, माझे मन व अंतःकरण त्याच्यासाठी कठीण आहे हेच दाखवतो. माझ्या मित्रावर माझे प्रेम असेल तर त्याला काय हवे ते मला मनोमन समजते. आणि येशूने म्हटले, "तुम्ही माझे मित्र आहा..." (योहान १५:१४). या आठवड्यात माझ्या प्रभूची एखादी आज्ञा मी मोडली आहे काय? ती येशूची आज्ञा आहे हे लक्षात आले असते तर मी ती मुद्दाम मोडली नसती. परंतु आमच्यातले बहुतेक जण देवाची घोर अवज्ञा करतात. त्याला जराही मान देत नाहीत, कारण तो सांगतो ते आम्ही ऐकतच नाही. जणू काही तो आमच्याशी कधी बोललाच नाही असे आम्ही समजतो.

माझ्या आत्मिक जीवनाचे एकच ध्येय आहे. येशूबरोबर एवढे समरुप व्हायचे की नेहमी देव सांगतो ते मला ऐकता येईल आणि देव नेहमी माझे ऐकतो हे मला समजेल (पहा योहान ११:४१). मी येशू ख्रिस्ताशी संयुक्त असलो तर ऐकण्याच्या निष्ठेतून मी सदोदित देवाचे ऐकतो. एखादे फूल, झाड अगर देवाचा एखादा सेवक मला देवाचा संदेश सांगतील. पण माझे लक्ष इतरत्र गुंतल्याने मला ते ऐकूच येत नाही. मला देवाचे ऐकायचे आहे. पण माझ्या जीवनात यथार्थ प्रकारे निष्ठा ठेवलेली नाही. माझी निष्ठा आहे माझ्या आवडीच्या गोष्टीवर, सेवेवर आणि विचारावर. देवाला वाटते ते तो बोलेल. मला ते ऐकूच येणार नाही. पण देवाच्या मुलाची प्रवृत्ती अशी हवी, "बोल, तुझा दास ऐकत आहे." ऐकण्याविषयीची ही इच्छा आणि निष्ठा मी जोपासली नसेल तर देवाची वाणी कधीकधी माझ्या कानी पडेल, इतर वेळी मी जणू बहिरा होतो कारण माझे लक्ष दुसऱ्या गोष्टींकडे असते. या गोष्टी केल्याच पाहिजेत असे मला वाटते. देवाच्या मुलाचे जीवन, आचरण असे नसते. आज तुम्ही देवाची वाणी ऐकली आहे काय?

## ऐकण्याची शिस्त

**“जे तुम्हांस अंधारात सांगतो ते उजेडात बोला आणि तुमच्या कानांत सांगितलेले जे तुम्ही ऐकता ते धाब्यांवरुन घोषित करा” (मत्तय १०:२७).**

ऐकावे आणि आज्ञापालन कसे करावे ते शिकण्यासाठी कधीकधी देव आम्हांला अंधकाराच्या शिस्तीच्या अनुभवातून नेतो. गाणारे पक्षी अंधारात गायला शिकलेले असतात आणि देवाचे बोलणे आम्ही ऐकण्यास शिकेपर्यंत तो आम्हांला “आपल्या हाताच्या छायेत” (यशया ४९:२) ठेवतो. “जे मी तुम्हांला अंधारात सांगतो...” देव तुम्हांला अंधारात ठेवतो तेव्हा लक्ष द्या आणि तोंड बंद ठेवा. तुम्ही तेथे आहात तोवर गप्प राहा. तुमची परिस्थिती किंवा देवाबरोबरचे तुमचे जीवन या बाबतीत तुम्ही आता अंधारात आहात का? तसे असेल तर शांत राहा. अंधारात आपले तोंड उघडले तर तुमचे मन ताळ्यावर नसताना बोलाल. अंधार हा ऐकण्याचा समय असतो याविषयी दुसऱ्या लोकांशी बोलू नका. अंधाराचे कारण समजण्यासाठी पुस्तके वाचू नका. फक्त देवाचे ऐका. आज्ञापालन करा. दुसऱ्या लोकांबरोबर बोललात तर देव सांगतो ते तुम्हांला ऐकू येणार नाही. अंधारात असताना ऐका देव तुम्हांला दुसऱ्या कोणासाठी तरी मोलवान संदेश देईल. प्रकाशात गेल्यावर तो संदेश सांगा.

अंधाराचा समय संपल्यावर प्रत्येक वेळी आम्हांला अपमान व आनंद यांचा मिश्र अनुभव येणे जरुरीचे आहे. फक्त आनंदच असेल तर आपण खरोखर देवाची वाणीच ऐकली का? हा माझा प्रश्न आहे. देवाचे बोलणे ऐकल्याबद्दल आनंदाचा अनुभव येणे आवश्यक आहे. पण इतक्या उशीरा त्याचे ऐकले याची लाजही वाटली पाहिजे. शरमेने मान खाली गेली पाहिजे. मग पोटतिडकीने आम्ही म्हणू, “देव मला सांगत होता ते ऐकून समजण्यास मी किती मंद आणि मठ्ठ होतो!” तथापि देव आज व आताच नव्हे तर कित्येक दिवसापासून आठवड्यापासून हेच आम्हांला सांगत होता. एकदा का तुम्ही त्याचे ऐकले की तो तुम्हांला शरमेची, मानभंगाची देणगी देतो; त्यामुळेच तुमचे अंतःकरण मृदू, कोमल होते. या देणगीमुळे तुम्ही नेहमी देव बोलतो त्याक्षणी, आत्ताच त्याचे ऐकाल.

## फेब्रुवारी १५

### “मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे?”

**“... कोणी स्वतःकरता मरत नाही” (रोम १४:७).**

आध्यात्मिक दृष्टीने तुम्ही दुसऱ्यांसाठी देवाला जबाबदार आहात हे तुम्हांला कधी उमगले आहे काय? उदाहरणार्थ, माझ्या खासगी जीवनात मी देवापासून जरा बाजूस वळलो तर माझ्या आजूबाजूच्या प्रत्येकाला त्याचे परिणाम सोसावे लागतात. “आम्हांला त्याच्याच बरोबर स्वर्गात बसवले” आहे (इफिस २:६). “एक अवयव दुखावला तर त्याच्याबरोबर सर्व अवयवांना सोसावे लागते...” (१ करिंथ १२:२६). तुम्ही लौकिक स्वार्थ, मानसिक बेफिकीरी, नैतिक दुर्लक्ष अगर आत्मिक दुबळेपण यांना वाव दिलात तर तुमच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांनाच सोसावे लागणार. त्यावर तुम्ही विचारता एवढ्या उच्च मापदंडाला अनुसरुन जगण्यास कोण पुरे पडणार? कोण पात्र आहे? “... आमच्या अंगची पात्रता देवाकडून आली आहे” (२ करिंथ ३:५) आणि ती केवळ देवाकडूनच आहे.

“तुम्ही माझे साक्षी व्हाल” (प्रे.कृ. १:८). येशू ख्रिस्तासाठी आपली मानसिक, नैतिक आणि आत्मिक ताकद अगदी शेवटच्या कणापर्यंत खर्ची घालण्यास आपणांपैकी कितीजण तयार आहेत? देवाने वापरलेल्या “साक्षी” या शब्दामागे एवढा व्यापक अर्थ आहे. पण त्यासाठी वेळ लागतो; तेव्हा धीर धरा. देवाने आम्हांला येथे पृथ्वीवर का ठेवले आहे? आमचे तारण आणि पवित्रीकरण एवढ्याचसाठी? नाही. त्याच्या सेवेसाठी कार्य चालू राहावे यासाठी मोडलेली भाकर आणि ओतलेला द्राक्षारस होण्याची माझी तयारी आहे काय! या युगासाठी, या जीवनासाठी माझी किंमत शून्य असावी आणि स्त्री पुरुषांना प्रभू येशू ख्रिस्ताचे शिष्य करावे या एकचा उद्देशासाठी असण्याची माझी तयारी आहे का? त्याने केलेल्या माझ्या अवर्णनीय अद्‌भुत तारणाबद्दल त्याचे अभार मानण्यासाठी मी माझे जीवन देवाच्या सेवेसाठी अर्पण करतो. त्याची सेवा करण्यास नकार दिला तर देव आमच्यापैकी कोणालाही एकीकडे ठेवील अशी शक्यता आहे, हे विसरु नका. “... मी दुसऱ्यांस घोषणा केल्यावर कदाचित मी स्वतः पसंतीस न उतरलेला असा ठरेन” (१ करिंथ ९:२७).

## आध्यात्मिक पुढाकाराची प्रेरणा

**“जागा हो व मेलेल्यांतून ऊठ ...” (इफिस ५:१४).**

सर्वच पुढाकार, पहिले पाऊल उचलण्यास तयार असणे देवाच्या प्रेरणेने होते असे नाही. कोणीतरी तुम्हांला म्हणते, “बसलास काय ऊठ चालू लाग! तुमची नाखुषी धरा आणि द्या भिरकावून आणि कर्तव्य आहे, केलेच पाहिजे ते करा!” सामान्य मानवी पुढाकार हा असा असतो. पण देवाचा आत्मा येऊन आम्हांला सांगतो, “उठ आणि काम सुरु कर.” मग अचानक लक्षात येते हा पुढाकार, हे सांगणे ईश्वरप्रेरित आहे.

तरुणपणी आपणा सर्वांची स्वप्ने असतात, आशा, आकांक्षा असतात. पण लवकरच लक्षात येतो ही स्वप्ने, आकांक्षा वगैरे पूर्ण करण्यास आवश्यक ते बळ आपल्याकडे नाही. आम्हांला करावेसे वाटते ते करता येत नाही. मग आमची स्वप्ने, आशा आणि आकांक्षा सर्व मेल्या असे आपण समजतो. पण देव येतो व म्हणतो, “जागा हो व मेलेल्यांतून ऊठ...” देव प्रेरणा देतो तेव्हा ती एवढे अद्‌भुत सामर्थ्य घेऊन येते की खरेच “मेलेल्यांतून उठण्यास” आम्हांला शक्ती मिळते. आम्ही उठतो आणि अशक्य ते चुटकी सरशी करतो. आध्यात्मिक पुढाकाराविषयी महत्त्वाची, लक्षणीय गोष्ट म्हटली तर आम्ही “उठून चालू लागतो” तेव्हाच जीवन व सामर्थ्य मिळते. देव आम्हांला जिंकणारे जीवन देत नाही आम्ही *विजय मिळवण्यास आरंभ केला* की तो आम्हांला *जीवन देतो.* देव प्रेरणा देऊन सांगतो, “जागा हो व मेलेल्यांतून ऊठ,” असे सांगतो तेव्हा आम्ही स्वतः उठले पाहिजे. देव आम्हांला उठवणार नाही. वाळलेल्या हाताच्या माणसाला आमच्या प्रभूने म्हटले, “आपला हात पुढे कर” (मत्तय १२:१३). त्या माणसाने तसे केले तेव्हा त्याचा हात बरा झाला. पण यात त्याला पुढाकार घ्यावा लागला. विजय मिळवण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला तर देवाची प्रेरणा आम्हांला आहे असे आढळेल कारण तो आम्हांला लगेच जीवनाचे सामर्थ्य देतो.

**फेब्रुवारी १७**

## उदासीनतेच्या विरोधात पुढाकार घेणे

**"ऊठ, हे खा"** (१ राजे १९:५).

या शास्त्रपाठातील दिव्यदूताने एलीयाला दृष्टांत दिला नाही, शास्त्रलेख उलगडून सांगितले नाही अगर आणखी दुसरे काही अद्‌भुत केले नाही. त्याने एलीयाला एक साधी गोष्ट करण्यास सांगितले. दूताने आणलेले अन्न त्याने उठून खायचे होते. आम्हांला कधीच उदास वाटले नाही तर आम्ही जिवंत असणारच नाही! जड वस्तूंना कधी उदास वाटत नाही. माणसांना कधीच उदास वाटले नसले तर आम्हांला सुख, अत्यानंद काय कसा असतो ते समजलेच नसते. जीवनामध्ये काही गोष्टींचा उद्देश आम्हांला उदास करणे हाच असतो. उदाहरणार्थ, मरण व मरणाशी संबंधीत गोष्टी, आपले आत्मपरीक्षण करताना आपणाला उदासीनतेची बाधा होऊ शकते. हे जरुर लक्षात ठेवावे.

देवाचा आत्मा आमच्याकडे येतो तेव्हा तो आम्हांला गौरवी, वैभवी दृष्टांत देत नाही. तो आम्हांला अगदी सामान्य गोष्टी करण्यास सांगतो. उदासीनता आमचे चित्त विचलित करते. देवाच्या सृष्टीतील नित्याच्या मनोरंजक गोष्टींकडे आमचे दुर्लक्ष होते. पण देव पुढे येतो तेव्हा तो प्रेरणा देतो. आम्हांला अगदी साध्यासाध्या गोष्टी करण्यास सांगतो. एवढ्या साध्या सोप्या गोष्टीत देवाला काय आस्था असणार असे आम्हांला वाटते पण त्या करताना त्यांच्यातून त्याचे अस्तित्व आम्हांला जाणवते. यातून येणारी प्रेरणा आम्हांला उदासीनतेच्या विरोधात ठाम उभे राहण्यास पुढाकार घेण्यास प्रवृत्त करते. पण आपण पहिले पाऊल उचलणे आवश्यक आहे आणि ते देवाच्या प्रेरणेने पुढे टाकले पाहिजे. परंतु आमची उदासीनता दूर करण्याचा आम्ही काही प्रयत्न केला तर ती उदासीनता अधिकच गडद होईल. पण देवाचा आत्मा अंतःप्रेरणेने आम्हांला काही करण्यास सांगतो आणि आम्ही ते केले की त्याच क्षणाला उदासीनतेची नावनिशाणी देखील उरत नाही. आम्ही ऊठून आज्ञापालन केले की जीवनाच्या एका उच्च पातळीवर आम्ही प्रवेश करतो.

**फेब्रुवारी १८**

## निराशेच्या विरोधात पुढाकार घेणे

**“उठा, आपण जाऊ...” (मत्तय २६:४६).**

गेथशेमाने बागेत शिष्य झोपी गेले. वास्तविक या वेळी तरी त्यांनी जागे राहणे गरजेचे होते. आपण काय केले, आपले चुकले हे लक्षात आले आणि ते निराश झाले. बदलता येणार नाही असे काही आपल्याकडून घडले हे समजले की आपण निराश होतो. आपण म्हणतो, “झाले. ते आता संपले आणि सगळे नासले, पुन्हा प्रयत्न करण्यात काय अर्थ आहे?” या प्रकारची निराशा अपवादच आहे असे म्हटले तर ती आपली चूकच होईल. तसे पाहता हा सामान्य मानवी अनुभव आहे. उत्तम संधी आली होती पण आपण ती साधली नाही हे लक्षात आले की, आपण निराशेच्या गर्तेत जणू गडप होतो. पण येशू पुढे येऊन प्रेमाने सांगतो त्याचा मतितार्थ असा, “आता झोप घ्या. ती संधी तर गेली. कायमची गेली, त्यात तुम्हांला बदल करता येत नाही. पण ऊठा, आपण पुढे जाऊ आणि काम करु.” म्हणजेच गेला भूतकाळ जाऊ दे. त्याला येशूच्या मधुर मिठीत झोपू दे आता अजिंक्य भविष्याकडे त्याच्याबरोबर जाऊ या.

आम्हा प्रत्येकाच्या जीवनात असे अनुभव येतील. आमच्या जीवनात घडणाऱ्या घटनांनी आमच्यावर निराशेची वेळ येईल. त्यातून स्वतःला बाहेर काढणे, वर उचलणे आम्हांला जमणार नाही. येथील उदाहरणात शिष्यांनी करु नये ते केले होते. येशूबरोबर जागे राहून लक्ष ठेवण्याऐवजी ते झोपी गेले. पण त्यांची निराशा झटकून टाकण्यासाठी आमचा प्रभू त्यांच्याकडे आध्यात्मिक पुढाकार घेऊन आला. त्याने त्यांना सांगितले त्याचा भावार्थ असा “ऊठा, यापुढे करायचे आहे ते करा.” देवाने आम्हांला प्रेरणा दिली आहे तर पुढे काय करायचे आहे? त्याच्यावर भरंवसा ठेवून त्याने केलेल्या उद्धाराच्या आधाराने प्रार्थना करणे.

गतकाळातील अपयशामुळे तुमच्या पुढच्या पावलाचा कधी पराभव होणार नाही याची दक्षता घ्या.

**फेब्रुवारी १९**

## कंटाळवाण्या कामाच्या विरुद्ध पुढाकार घेणे

**“ऊठ, प्रकाशमान हो…” (यशया ६०:१).**

कंटाळवाण्या, नीरस कामाच्या विरोधात पुढाकार घेताना आपल्याला जणू देव नाहीच असे समजून पहिले पाऊल उचलले पाहिजे. देवाचे साहाय्य मिळेल म्हणून वाट पाहण्यात काही अर्थ नाही. तो साहाय्य करणार नाही. पण एकदा आम्ही ऊठून पुढे सरसावलो की तो जवळच आहे असे दिसेल. देव आम्हांला आपली प्रेरणा देतो तेव्हा एकाएकी पुढाकार घेणे हे नैतिक कर्तव्य होते. त्यानुसार आज्ञापालन केले पाहिजे. मग आम्हांला काही न करता स्वस्थ आरामात पडून राहणे जमणार नाही आम्ही ऊठून आज्ञा पाळल्या पाहिजेत. आम्ही ऊठून प्रकाशमान झालो की कंटाळवाणी कामेही झळाळून दिव्य तेजाने चकाकतात.

आमच्या स्वभावातील अस्सलपणा पारखण्यासाठी कंटाळवाणी कामे करणे ही एक उत्तम कसोटी आहे. कंटाळवाणी कामे आम्ही ज्याला आदर्श कामे म्हणतो त्याच्या पासंगालाही पुरणार नाही. कंटाळवाणे काम अतिशय हीन, कष्टाचे, दमणूक करणारे, घाणेरडे असते. असे काम करण्याचा प्रसंग ओढावलाच तर आमच्या आध्यात्मिकतेची लगेच पारख होते. आध्यात्मिक दृष्टीने आम्ही खरे अस्सल आहो का नाही ते क्षणार्धात समजेल. योहान १३ वाचा. या अध्यायात देहधारी देव सर्वात कंटाळवाणे, हलके व दीन काम करताना आपणाला दिसतो. हे या प्रकारचे सर्वात श्रेष्ठ उदाहरण आहे. येथे येशूने मासेमारी करणाऱ्या कोळ्यांचे पाय धुतले आहेत. पुढे त्याने त्यांना सांगितले, “… मी प्रभू व गुरु असूनही जर तुमचे पाय धुतले तर तुम्हीही एकमेकांचे पाय धुतले पाहिजेत” (योहान १३:१४). कंटाळवाण्या, नीरस कामावर देवाचा प्रकाश पडून ते उजळून निघायचे तर त्यासाठी देवाच्या प्रेरणेची गरज आहे. काही बाबतीत एखादी व्यक्ती एखादे काम ज्याप्रकारे करते त्यामुळेच ते सदोदित पवित्र व शुद्ध होते. ते एखादे अतिसामान्य काम असेल, पण आपण ते केलेले पाहिल्यावर ते वेगळेच होते. परमेश्वर आमच्याद्वारे काही करतो तेव्हा त्याचे रुपांतरच करतो. आमचा प्रभू, आमचे मानवी रक्तमांसाचे शरीर घेऊन त्याचे रुपांतर करतो. आता प्रत्येक विश्वासणाऱ्याचा देह “पवित्र आत्म्याचे मंदिर” झाला आहे (१ करिंथ ६:१९).

**फेब्रुवारी २०**

## दिवास्वप्न पाहण्याच्या विरोधात पुढाकार घेणे

**“उठा, आपण येथून जाऊ” (योहान १४:३१).**

एखादी गोष्ट व्यवस्थित करण्यासाठी दिवास्वप्न पाहणे योग्य आहे, पण ते काम करत असताना दिवास्वप्न पाहणे चूक आहे. या शास्त्रपाठामध्ये आमच्या प्रभूने आपल्या शिष्यांना महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्यावर तो त्यांना म्हणेल की आता जा आणि सर्वांवर मनन चिंतन करा असे आपणाला वाटते. पण आळसात बसून दिवास्वप्न पाहणे येशूला पसंत नव्हते. देवाकडे जावे आणि आमच्यासंबंधात त्याची इच्छा काय आहे ते जाणून घ्यावे हाच आमचा उद्देश असेल तर दिवास्वप्न पाहणे योग्य व मान्य आहे. परंतु आम्हांला करण्यास सांगितले आहे ते न करता दिवास्वप्न पाहत राहण्याकडे आम्ही लक्ष लावले तर ते मान्य होणार नाही. देव त्यावर आशीर्वाद देणार नाही. या प्रकारे दिवास्वप्ने पाहण्याला देव प्रतिबंध करील आणि स्वतः पुढाकार घेऊन आम्हांला कामाला लावील. तो आम्हांला साधारणपणे असे सांगेल “नुसते बसू नका; गप्प उभे राहू नका, चालत राहा, कार्य होऊ दे.”

“तुम्ही रानात एकांती चला” (मार्क ६:३१) असे त्याने आम्हांला सांगितल्यावर आपण शांतपणे त्याची प्रतीक्षा केली तर ते त्याची इच्छा जाणून घेण्यासाठी केलेले चिंतन आहे. पण देव एकदा बोलल्यावर पुन्हा दिवास्वप्ने पाहात राहणे योग्य नाही. वेळीच सावध व्हा. तुमची सर्व स्वप्ने, आनंद आणि सुख यांचा उगम देवापासूनच असावा. त्याने सांगितले असेल ते सर्व करण्याकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. तुमचे कोणावर प्रेम असेल तर सर्व वेळ त्या व्यक्तीविषयी स्वप्ने पाहत बसू नका. उठा आणि त्या व्यक्तीसाठी काही करा. आम्ही हेच करावे अशी येशू ख्रिस्ताची अपेक्षा आहे. देव बोलला, ते आपण ऐकले आणि त्यानंतर दिवास्वप्ने पाहत बसलो तर आपला त्याच्यावर विश्वास नाही हेच दिसून येईल.

**फेब्रुवारी २१**

## त्याच्यावर खरेच तुमची प्रीती आहे?

**"हिने माझ्यासाठी एक सत्कृत्य केले आहे" (मार्क १४:६).**

आपण ज्याला प्रीती वा प्रेम म्हणतो त्याचा आवाका आमच्या स्वतःपलीकडे पोचत नसेल ते खरोखरी प्रेम नाही आणि प्रीतीही नाही. सावधगिरी, सुज्ञता, चतुर, समंजस आणि कधीच टोकाला न जाणारी ही प्रीतीची लक्षणे आहेत असे आपणाला वाटले तर खरा अर्थ समजलाच नाही. यातून ममता, आपुलकीची भावना हे पुढे येईल; परंतु हे काही प्रीतीचे अचूक वर्णन नाहीच.

देवासाठी पुढे होऊन तुम्ही काही हिरीरीने केले आहे का? ते उपयुक्त आहे किंवा ते करणे तुमचे कर्तव्य आहे वा त्यात तुम्हांला काही मिळणार आहे, या कोणत्याच कारणाने नव्हे तर तुमची त्याच्यावर प्रीती आहे म्हणून करायचे? देवाला मोलवान, उपयुक्त अशा गोष्टी तुम्ही त्याला देऊ शकाल याची तुम्हांला जाणीव आहे काय? त्याने साधलेल्या महान तारणाचे थोरमहत्त्व कसे किती आहे याचे चिंतन करत, स्वप्ने पाहत बसला आहात का? आणि त्याच्यासाठी करावयाच्या गोष्टीकडे सर्वस्वी डोळेझाक केली आहे. मी अद्‌भुत कामांविषयी बोलत नाही, साध्या सोप्या मानवी गोष्टींविषयी बोलतो. ज्यामुळे तुम्ही सर्वस्वी देवाच्या अधीन झाला आहात याचे देवाला प्रमाण पटवणाऱ्या गोष्टी, बेथानी येथील मरीयेने प्रभू येशूच्या अंतःकरणात उत्पन्न केले ते तसेच तुम्हीही उत्पन्न केले आहे काय? "हिने माझ्यासाठी एक सत्कृत्य केले आहे."

काही वेळा, प्रसंग असे असतात की आम्ही अधीनतेचे लहानसहान प्रमाण त्याला समर्पण करतो का हे तो पाहत असतो. पवित्रतेपेक्षा आम्ही त्याच्या अधीन असणे अधिक महत्त्वपूर्ण आहे. आमची प्रीती किती खरी आहे हे दाखवणे हाच त्यात उद्देश असतो. वैयक्तिक पवित्रतेकडे अधिक लक्ष दिल्याने आमची दृष्टी स्वतःवर केंद्रित होते आम्ही चालतो, बोलतो, दिसतो कसे इकडेच सर्व लक्ष लावतो, चुकून माकून देवाचा अपमान, अपराध होऊ नये याबद्दल सतत जपत राहतो. "पूर्ण प्रीती भीती घालवून देते..." (१ योहान ४:१८). आपण देवाला पूर्णपणे समर्पित झालो की भयभीती, धास्ती उरत नाही. "माझा काही उपयोग आहे काय?" उपयोग असण्यानसण्याचा प्रश्नच येत नाही. स्वतः देवाला आम्ही मोलवान असावे हा मुद्दा आहे. आम्ही एकदा देवाच्या सर्वस्वी अधीन झालो की तो नेहमी आमच्या द्वारे कार्य करील.

फेब्रुवारी २२

## आत्मिक चिकाटीची शिस्त

**“शांत व्हा आणि लक्षात ठेवा की मीच देव आहे” (स्तोत्र ४६:१०).**

चिकाटी धरणे हे टिकून राहण्यापेक्षा अधिक आहे. चिकाटी म्हणजे टिकून राहणे, आम्ही ज्याच्या शोधात आहो ते मिळेल, घडेल याची निश्चित खात्री आहे. चिकाटी म्हणजे नुसतेच बिलगून राहणे नव्हे. आमच्या हातातून निसटेल आणि पडेल अशी धास्तीही नव्हे. आमच्या वीराचा पराभव होणार हे मान्य करण्यास अजिबात तयार नसणे, काही झाले तरी या मतापासून मागे न फिरणे हीच चिकाटी आहे. आमचा नाश होईल याचे आम्हांला फारसे भय वाटत नाही पण काहीतरी घडून येशू ख्रिस्त पराभूत झाला तर काय? हीच आमची सर्वात मोठी भीती आहे. तसेच आम्हांला हेही मोठी भय आहे की आमचा प्रभू प्रीती, न्याय, क्षमा आणि मनुष्यांमध्ये दया, ममता यांच्या पक्षाने उभा आहे ते सर्व अखेरीस विफल होईल आणि ते सर्व आम्हांला असाध्य होईल. शिवाय आत्मिक चिकाटीसाठी पाचारण आहेच. याच्या आधाराने लोंबकळत राहण्यासाठी नव्हे तर सरळ उठून काम करण्यासाठीच हे पाचारण आहे; आणि देवाचा पराभव कधीही होणार नाही हे पक्के लक्षात ठेवावे.

आता या क्षणी आमच्या आशांना निराशेचा अनुभव येत असेल तर आता त्यांची शुद्धी होत आहे हाच त्याचा अर्थ आहे. मानवी मनाची प्रत्येक आशा देवासाठी आणि उदात्त असेल तर ती नक्की पूर्ण होईल. परंतु देवाची प्रतीक्षा करताना येणारा ताण हाच सर्वात मोठा आणि जबरदस्त ताण आहे. तो परिपूर्ण करतो, जीवनात परिपूर्ती आणतो कारण, “धीराविषयीचे माझे वचन तू राखले आहे...” (प्रकटी ३:२०).

आत्मिक चिकाटीने, सतत धीर धरा.

फेब्रुवारी २३

## सेवा करण्याचा निश्चय

**“मनुष्याचा पुत्र सेवा करुन घ्यावयास नाही, तर सेवा करावयास... आला आहे” (मत्तय २०:२८).**

येशूने आणखी म्हटले आहे, “... मी तर तुम्हांमध्ये सेवा करणाऱ्यासारखा आहे” (लूक २२:२७). सेवा करण्याविषयीचे पौलाचे विचार आमच्या प्रभूच्या विचारासारखेच होते, “येशू प्रीत्यर्थ आम्ही तुमचे दास आहो अशी स्वतःची घोषणा करतो” (२ करिंथ ४:५). सेवाकार्यासाठी पाचारण झालेली व्यक्ती इतर सर्वांच्यापेक्षा वेगळी आहे असे आपण समजतो. पण येशू ख्रिस्ताच्या सांगण्याप्रमाणे त्याला दुसऱ्यांच्यासाठी “पायपुसणे” होण्यासाठी पाचारण झालेले आहे. पौलाने म्हटले आहे, “दैन्यावस्थेत राहणे मला समजते...” (फिलिप्पै ४:१२). आपले जीवन दुसऱ्यांसाठी शेवटचा बिंदू असेपर्यंत ओतले जावे हीच पौलाची सेवेची कल्पना आहे. यात त्याची स्तुती होवो वा निंदा, त्याने काहीच फरक पडत नाही. येशूला ओळखत नाही असा एक जरी माणूस असला तरी त्याला येशूची ओळख होईपर्यंत पौल स्वतःला त्याचा ऋणकरी समजे. पौलाच्या सेवेमागे मुख्य प्रेरणा दुसऱ्यांवरील प्रीती नसून येशू वरील प्रीती होती. मानवतेच्या कारणासाठी आमची भक्ती आणि निष्ठा असेल तर आमचा लगेच पराभव होऊन मानभंग होईल. कारण आपणाला बहुत करुन पदोपदी दुसऱ्यांकडून अपमान सोसावा लागून कृतघ्नतेचा अनुभव येईल. परंतु देवावरील प्रीती या प्रेरणेने आम्ही सेवा करीत असलो तर लोकांची उपेक्षा कृतघ्नपणा आकाशापर्यंत पोचली तरी एकमेकांची सेवा करण्याच्या आमच्या कार्यात त्याचा अजिबात अडथळा येणार नाही.

ख्रिस्ताने आपल्याला कसे वागवले, कोणती वागणूक दिली ते पौलाला पूर्णपणे उमगले होते; दुसऱ्यांची सेवा करण्याच्या त्याच्या निश्चयाचे हेच रहस्य होते... त्याने म्हटले आहे “मी... पूर्वी निंदक, छळ करणाराा व जुलमी होतो...” (१ तीमथ्य १:१३). थोडक्यात दुसऱ्या लोकांनी पौलाला कितीही वाईट वागणूक दिली तरी ज्याप्रकारे दारुण द्वेषभाव मनी धरुन सूडबुद्धीने पौलाने येशू ख्रिस्ताचा छळ केला तसा व तेवढा त्याचा छळ कोणी केला नाही. आमचे अपुरेपण, पाप आणि स्वार्थ यांची पराकाष्ठा असतानाही येशूने आमची सेवा केली हे एकदा आमच्या लक्षात आले की त्याच्यासाठी दुसऱ्यांची सेवा करण्याच्या निर्धारापासून आम्ही अजिबात ढळणार नाही.

फेब्रुवारी २४

## बलिदानातील आनंद

**"मी तुमच्या जीवासाठी फार आनंदाने खर्च करीन व मी स्वतः सर्वस्वी खर्ची पडेन" (२ करिंथ १२:१५).**

"पवित्र आत्म्याने आमच्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव केला" (रोम ५:५) की मग आम्ही जाणूनबुजून दुसऱ्यांच्या जीवनांविषयी येशूला वाटणाऱ्या आस्था आणि उद्देशांशी समरुप होऊ लागतो. येशूला प्रत्येक व्यक्तीमध्ये रस आहे. ख्रिस्ती सेवेमध्ये स्वतःचा स्वार्थ साधून इच्छा पुऱ्या करण्याचा कसलाच अधिकार नाही. ख्रिस्ताबरोबरच्या आमच्या नात्याची हीच एक मोठी कसोटी आहे. माझ्या मित्रासाठी मी माझा प्राण द्यावा हाच बलिदानाचा आनंद आहे (पहा योहान १५:१३). मी माझे जीवन उधळून देत नाही तर राजीखुशीने, जाणीवपूर्वक त्याच्यासाठी आणि दुसऱ्या लोकांबद्दल त्याला वाटणाऱ्या आपुलकीसाठी देतो. लोकांना ख्रिस्तासाठी जिंकून घ्यावे या एकाच उद्देशाने पौलाने आपले जीवन खर्ची घातले. त्याने लोकांना स्वतःकडे नव्हे तर आपल्या प्रभूकडे आकर्षित केले. पौलाने म्हटले, "... मी सर्वांना सर्वकाही झालो आहे, ... मी सर्व प्रकारे कित्येकांचे तारण साधावे" (१ करिंथ ९:२२).

पवित्र जीवन विकसित करण्यासाठी आपण नेहमी देवासह एकांती असले पाहिजे असे एखाद्याला वाटते तेव्हा त्याचा दुसऱ्यांना काही उपयोग होत नाही. तो जणूकाही स्वतःला एखाद्या पुतळ्यासारखा चौथऱ्यावर उभा करतो आणि इतरांपासून स्वतःला सर्वस्वी अलिप्त ठेवतो. पौल पवित्र व्यक्ती होता. पण तो कोठेही गेला तरी ख्रिस्ताने त्याच्या जीवनाचा त्याला हवा तसा उपयोग करुन घ्यावा यासाठी पौलाने त्याला मोकळीक दिली होती. आमच्यापैकी अनेकजण आपली स्वतःची उद्दिष्टे साधण्यात गुंतलेले असतात. त्यामुळे येशूला आमच्या जीवनाचा त्याच्या इच्छेनुसार उपयोग करता येत नाही. परंतु आम्ही त्याला सर्वस्वी समर्पण केले की आमच्याकडे साध्य करण्यासाठी स्वतःचे उद्दिष्ट उरतच नाही. "पायपुसणे" कसे व्हावे ते पौलाला चांगले माहीत होते. याचे त्याला वैषम्य नव्हते, कारण येशूवरील निष्ठा व भक्ती हीच त्याच्या जीवनाची प्रेरणा होती. आमचीही निष्ठा, भक्ती असते, पण ती येशूवर नसते तर त्याला स्वतःचे संपूर्ण समर्पण न करता आत्मिक स्वातंत्र्य मिळेल अशा गोष्टींवर असते. पौलाने स्पष्टपणे सांगितले, "माझे बंधुजन... ह्यांच्यासाठी मी ख्रिस्तापासून शापभ्रष्ट व्हावे हे शक्य असते तर तशी इच्छा केली असती" (रोम ९:३). पौलाच्या अंगी शहाणपण, तर्कबुद्धी उरलीच नव्हती काय? तसे मुळीच नव्हते. प्रेमात पडलेल्या व्यक्तीसाठी वरील विधान अतिशयोक्तीचे नाहीच आणि पौलाची तर येशू ख्रिस्तावर गाढ प्रीती होती.

## सेवेतील गरीबी

### “...मी तुम्हांवर अतिशयच प्रीती करतो म्हणून तुम्ही माझ्यावर कमी प्रीती करता की काय?” (२ करिंथ १२:१५).

स्वाभाविक मानवी प्रेमाला परतफेडीची अपेक्षा असते. पण पौल येथे म्हणतो, “तुम्ही माझ्यावर प्रीती करा न करा पण मी संपूर्णपणे कंगाल आणि दरिद्री होण्यास तयार आहे, दारिद्र्यात खितपत पडेन ते केवळ तुमच्यासाठी नव्हे तर तुम्हांला देवाकडे नेता यावे यासाठी.” आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहीत आहे; तो धनवान असता तुम्हाकरता दरिद्री झाला (२ करिंथ ८:९). आमच्या प्रभूचे सेवेविषयी होते तेच पौलाचेही विचार होते. स्वतःला कितीही किंमत मोजावी तरी त्याला त्याची पर्वा नाव्हती. पौलालाही सेवा करण्यातच आनंद होता.

आज संस्था म्हणून असणाऱ्या मंडळीला देवाचा सेवक येशूसारखा असावा असे वाटत नाही. दुसऱ्यांची सेवा केल्याने देवाची सेवा होते हा येशूचा विचार. येशू ख्रिस्ताने समाजसेवा केली तशी कोणीच करु शकणार नाही. त्याच्या राज्यात सर्वांचा सेवक सर्वात मोठा असेल हे त्याने सांगितले (पहा मत्तय २३:११). सुवार्ता सांगण्यास तयार असणे हे नव्हे तर शिष्यांचे पाय धुण्यासारखे काम करण्यास तयार असणे हेच पवित्र जनाचे लक्षण आहे. मानवी दृष्टीने अगदी हलकी कामे करण्यास तयार असणे महत्त्वाचे, कारण अशा गोष्टीच देवाला सर्वस्वी महत्त्वाच्या आहेत. दुसऱ्या लोकांच्या जीवनात देवाला रस आहे, तो टिकावा यासाठी आनंदाने आपले जीवन खर्ची घालण्यास तयार होता. त्यासाठी कितीही किंमत पडली तरी त्याला त्याची फिकीर नव्हती. आम्ही तर सेवा करण्यापूर्वी आपला स्वार्थ पाहतो. “देव मला तिकडे जायला सांगतो खरे पण पगाराचे काय? कुठे राहायचे? तिकडचे हवापाणी कसे आहे? माझ्या मदतीला कोण?” देवाची सेवा करण्याचे आमचे विचार अगदी उथळ आहेत. पण प्रेषित पौलापुढे असे कोणतेच प्रश्न, अडचणी नव्हत्या. नव्या कराराच्या काळातील पवित्र जन येशूच्या विचाराने असावा तसे होण्याचा पौलाचा प्रयत्न होता. केवळ सुवार्तेची घोषणा करण्यात तो समाधानी नव्हता. त्याला मोडलेली भाकर व ओतलेला द्राक्षारस होऊन स्वतःला सेवेसाठी येशू ख्रिस्ताच्या हाती सोपवायचे होते.

**फेब्रुवारी २६**

## येशूविषयी आमचे गैरसमज

**“ती त्याला म्हणाली, ‘महाराज, पाणी काढावयास आपल्याजवळ पोहरा नाही व विहीर तर खोल आहे’” (मत्तय ४:११).**

देवाच्या वचनातील अद्‌भुत सत्यांनी मी प्रभावित झालो. पण ती सत्ये मी माझ्या जीवनात आत्मसात करीन अशी त्याने अपेक्षा करु नये! येशू ख्रिस्ताचे गुण व शक्ती ह्यांच्या आधारे त्याच्याकडे पाहताना स्वतःला धार्मिक दृष्टीने श्रेष्ठ समजण्याकडे आमची प्रवृत्ती असते. त्याची ध्येये उच्च आहेत पण वास्तवाशी त्याचा काही संबंध नाही हेच समोर होते म्हणजे तो म्हणतो तसे प्रत्यक्षात येत नाही. आमच्या जीवनाच्या या व त्या भागात आपणापैकी प्रत्येक जण येशूविषयी असेच म्हणतो. येशूविषयीच्या या शंका आणि गैरसमज देवापासून दूर नेणाऱ्या प्रश्नांचा विचार करताना आमच्यापुढे येतात. आमचा त्याच्याशी व्यवहार कसा आहे ते सांगताना दुसरे विचारतात, “जगण्यासाठी पुरेसा पैसा कोण देणार? तुम्हांला हवे नको ते कोण पाहणार?” आमची परिस्थिती जरा अवघड आहे, तुलाही ती तशीच वाटेल असे आम्ही येशूला सांगतो तेव्हाच मनात संशय आणि शंका येतात आम्ही म्हणतो, “प्रभूवर विश्वास ठेवा” हे म्हणणे सोपे आहे, पण जगायचे कसे ते समजले पाहिजे. शिवाय येशूकडे तर पाणी काढायला पोहरा पण नव्हता. आम्हांला या सगळ्या गोष्टी द्यायला त्याच्याकडे साधने हवीत ना?” आणि “माझ्या मनात येशूविषयी काही गैरसमज नाहीत. शंका आहे ती माझ्याबद्दल” असे म्हणून धार्मिक दांभिकपणाचे प्रदर्शन करु नका. प्रामाणिकपणे सांगायचे तर स्वतःविषयी शंका, कुशंका कधीच नसतात; कारण आम्हांला काय करता येते, काय नाही ते नेमके ठाऊक असते. पण येशूविषयी आम्हांला शंका वाटते आणि आम्हांला जमणार नाही ते त्याला करता येते या विचाराने आमचा अभिमान दुखावला जातो.

तो सांगतो ते कसे करणार याचाच शोध घेताना मनात शंका येतात. माझ्या स्वतःच्या उणेपणातून शंका उपस्थित होतात. माझ्यामध्ये शंका आहेत असे आढळले तर त्या उघड करुन मी स्पष्टपणे ते सर्व कबूल केले पाहिजे, “हे प्रभू, मला तुझ्याविषयी शंका आल्या. तुझ्या शक्तीवर नव्हे तर माझ्याच शक्तीवर मी अवलंबून होतो. माझ्या अल्पबुद्धीला अनुसरुन मी तुझे अपरंपार सामर्थ्य लक्षात घेण्याचा प्रयत्न केला.”

## फेब्रुवारी २७

# येशूचे सेवाकार्य दुबळे केले

**“मग ते जिवंत पाणी आपल्याजवळ कोठून?” (योहान ४:११).**

“विहीर तर खोल आहे” त्या शोमरोनी स्त्रीला वाटत होते त्यापेक्षा ती खूपच खोल होती (४:११). मानवी जीवन, स्वभाव यांची खोली आणि तुमच्यामधील “विहीरींची” खोली लक्षात घ्या. तुम्ही येशूच्या सेवाकार्याला मर्यादा घालून ते दुबळे करता काय? त्यामुळे त्याला तुमच्या जीवनात काही कार्य करता येत नाही. समजा तुमच्या अंतःकरणात काही शल्ये, अडचणी खोल दडलेल्या आहेत. येशू तुम्हांला सांगतो, “तुमचे अंतःकरण अस्वस्थ होऊ नये...” (योहान १४:१). यावर तुम्ही शंका घेत म्हणता, “पण प्रभूजी, विहीर फार खोल आहे. त्यातून तुम्ही शांती आणि समाधान कसे आणणार?” बरोबर आहे. मानवी जीवनाच्या विहिरीतून येशू काहीच वर काढू शकत नाही. तो त्यावरुन खाली आणतो. आम्हीच इस्राएलाच्या पवित्र प्रभूला मर्यादा घालतो. गतकाळात आमच्यासाठी त्याला करु दिले ते आठवतो आणि म्हणतो, “अर्थात देवाला हे काम करता येईल अशी माझी अपेक्षा नाहीच...” येशूच्या सामर्थ्याची कसोटी पाहणारी गोष्ट तो सहज करील यावर आम्ही, येशूच्या शिष्यांनी विश्वास ठेवला पाहिजे. तो सर्वसमर्थ आहे याचा आम्हांला विसर पडतो तेव्हाच आम्ही त्याची सेवा, त्याचे कार्य दुर्बळ करतो. हे दुबळेपण त्याच्यामध्ये नसून आमच्यामध्ये आहे. आमचे सांत्वन करावे, आम्हांला सहानुभूती दाखवावी यासाठी आम्ही येशूकडे येतो. पण आमचा सर्वसमर्थ देव म्हणून त्याच्याकडे जाण्यास आम्ही तयार नसतो.

ख्रिस्त सर्वसमर्थ आहे हे आम्ही ओळखले नाही याच कारणाने आमच्यापैकी काहीजण ख्रिस्ती धर्मविश्वासाची हिणकस उदाहरणे आहोत. आमच्यामध्ये ख्रिस्ती गुणलक्षणे आहेत, पण येशू ख्रिस्ताच्या अधीन आणि त्याला समर्पित होणे आमच्यापासून खूपच दूर आहे. बिकट परिस्थिती येते, अडचणी वाढतात तेव्हा आम्ही “अर्थात यात त्याला काहीही करता येणार नाही असे म्हणून त्याचे कार्य दुबळे करतो” आमच्या विहीरीच्या तळापर्यंत पोचण्यासाठी आम्ही धडपडतो. स्वतःसाठी पाणी मिळवू पाहतो. “पण हे जमणारच नाही,” असे म्हणून स्वस्थ बसू नका. सावध व्हा. येशूकडे पाहिले तर सर्वकाही करता येईल हे लक्षात ठेवा. तुमच्या अपुरेपणाची विहीर फार खोल आहे. पण प्रयत्न करा, स्वतःकडे न पाहता येशूकडे पाहा.

## “आता तुम्ही विश्वास धरता काय?”

**“... असा आम्ही विश्वास धरतो. येशूने त्यांना उत्तर दिले, आता तुम्ही विश्वास धरता काय?” (योहान १६:३०-३१).**

“आता... आम्ही विश्वास धरतो.” पण येशूने विचारले, “आता तुम्ही विश्वास धरता काय? पहा अशी वेळ येत आहे... की... तुम्ही... मला एकटे सोडाल” (योहान १६:३०-३२). अनेक ख्रिस्ती सेवकांनी येशू ख्रिस्ताला एकटे सोडून केवळ कर्तव्य म्हणून त्याची सेवा करण्याचा यत्न चालवला आहे. कदाचित स्वतःच्या तारतम्याने गरज म्हणून त्यांनी सेवा चालवली असेल. येशूच्या पुनरुत्थित जीवनाचा अभाव हेच याचे कारण आहे. आपल्या स्वतःच्या धार्मिक समजुतीवर अवलंबून आमच्या जिवाने देवाशी जवळीक साधणे संपवले आहेत (पहा नीती ३:५-६). हे धिटाईने केलेले पाप नसून याला काही शिक्षा सांगितली नाही. पण येशू ख्रिस्ताविषयीच्या आपल्या ज्ञानाची गळचेपी केली आहे आणि स्वतःसाठी अडचणी, क्लेश आणि दुःख स्वतःवर ओढवून घेतो हे लक्षात आले की मग लाजेने चूर होऊन माघारी फिरणे भाग पडते.

खरे तर आता आहे त्यापेक्षा खूपच अधिक खोल खोल पातळीवर आपण येशूच्या पुनरुत्थित जीवनावर विसंबून राहणे आवश्यक आहे. आमच्या शहाणपणानुसार निर्णय करण्याऐवजी आपण प्रत्येक गोष्टीत त्याचा सल्ला घेण्याची सवय अंगी बाणवली पाहिजे. आम्ही घेतलेल्या निर्णयाला तो आशीर्वाद देणारच नाही कारण ते त्याला मान्य असतील असे नाही. आमचे निर्णय वास्तवाशी फारकत घेतलेले असतात. आम्ही केवळ कर्तव्यबुद्धीने काही केले तर येशू ख्रिस्ताशी स्पर्धा करणाऱ्या मापदंडानुसार वागतो हेच सिद्ध होईल. आम्ही उद्धट, अहंकारी होतो. प्रत्येक बाबतीत काय करायचे ते आम्हांला माहीत आहे असा तोरा आम्ही मिरवतो. आमच्या जीवनाच्या राजासनावर येशूचे पुनरुत्थित जीवन बसवण्याऐवजी तेथे आम्ही आमची कर्तव्यबुद्धी ठेवली आहे. आपल्या विवेकभावाच्या अगर कर्तव्यबुद्धीच्या “प्रकाशात चाला” असे आम्हांला सांगितलेले नाही तर “तो प्रकाशात आहे तसे आपण प्रकाशात चालावे” (१ योहान १:७) असे सांगितले आहे. कर्तव्यभावनेने आपण काही करतो तेव्हा आमच्या कृत्यांची कारणे दुसऱ्यांना समजावून सांगणे सोपे असते. परंतु प्रभूचे आज्ञापालन म्हणून काही करतो तेव्हा “आज्ञापालन केले” याहून अन्य स्पष्टीकरण नसते. यामुळेच पवित्र जनांविषयी गैरसमज होऊन त्यांचा उपहास होतो.

फेब्रुवारी २९

## प्रभूने तुमच्यासाठी काय करावे? तुमची इच्छा काय आहे?

**“मी तुझ्यासाठी काय करावे म्हणून तुझी इच्छा आहे? तो म्हणाला, प्रभो, मला पुन्हा दृष्टी यावी” (लूक १८:४१).**

तुमच्या जीवनात असे काही आहे का, की ज्यामुळे तुम्ही आणि दुसरे लोकही अस्वस्थ होतात. तसे असेल तर त्याची तड तुम्हांला लावता येणार नाही. “तेव्हा त्याने गप्प राहावे म्हणून पुढे चालणाऱ्यांनी त्याला दटावले; तरी तो अधिकच ओरडून म्हणाला...” (लूक १८:३९). तुम्ही प्रभूच्या समोर येईपर्यंत हाका मारत राहा. व्यवहारज्ञानच श्रेष्ठ असे समजू नका. असंतोष दाबून ठेवून स्वस्थ बसायचे हे व्यवहारज्ञानाला श्रेष्ठ समजणे आहे. येशूने आमच्यासाठी काय करावे असे तो विचारतो तेव्हा तो व्यावहारिक मार्गाने नव्हे तर अलौकिक प्रकारे कार्य करतो हे विसरु नका.

गतकाळात आम्ही आमच्या प्रभूला आमच्यासाठी करु दिले तेवढेच लक्षात ठेवल्याने आम्हीच त्याला मर्यादा घालतो. आपण म्हणतो, “त्यात मी चुकलो आणि नेहमीच चुकणार.” मग काय हवे ते मागतच नाही; म्हणतो, “हे कर असे देवाला सांगणे अगदी पोरकटपणाचे आहे!” आणि खरेच ते अशक्य असले ते करावे म्हणून देवाला विनंती केलीच पाहिजे आणि ते करणे अशक्य नसेल तर त्यातून विशेष असा आग्रह पुढे येणारच नाही. सर्वस्वी अशक्य ते देव सहज करील हे पक्के समजा.

त्या माणसाला त्याची दृष्टी मिळाली. आपल्या जुन्या जीवनाचा मागमूस देखील कोठे राहू नये एवढे प्रभूशी अगदी जवळून समरुप होणे हेच आपल्यासाठी सर्वस्वी अशक्य आहे. पण तो सर्वशक्तिमान आहे यावर दृढ विश्वास ठेवण्याच्या टप्प्यावर तुम्ही येणे आवश्यक आहे. येशू सांगतो त्यावर विश्वास ठेवून आणि खुद्द येशूवर भरंवसा ठेवल्याने आमचा विश्वास दृढ होतो. तो सांगतो तेवढेच पाहात राहिलो तर आम्ही कधी विश्वास ठेवू शकणार नाही. येशूला पाहिले की तो आमच्या जीवनात करतो त्या अशक्य गोष्टी श्वास घेण्यासारख्या स्वाभाविक होतात. आमच्या अंतःकरणाच्या उथळपणामुळेच आम्हांला मानसिक यातना होतात. विश्वास ठेवणे आमच्या जिवावर येते. किनाऱ्याशी बांधून ठेवलेली होडीची दोरी सोडून सागरात जाण्यास आम्ही घाबरतो. चिंता करीत बसणे आम्हांला आवडते.

**मार्च १**

## हृदयभेदक प्रश्न

**“माझ्यावर प्रेम करतोस काय?” (योहान २१:१७).**

या हृदयभेदक प्रश्नाला पेत्राने दिलेला प्रतिसाद फारच वेगळा आहे. काही दिवसांपूर्वी याच पेत्राने मोठ्या धिटाईने “आपणांबरोबर मला मरावे लागले तरी मी आपणाला नाकारणार नाही” (मत्तय २६:३५ तसेच ३३–३४ ही वचने पहा). आमचे स्वाभाविक व्यक्तित्त्व मोठ्या धिटाईने स्वतःच्या भावना बोलून दाखवते. परंतु येशू ख्रिस्ताने विचारलेल्या या प्रश्नाचा सल उरी बाळगतच आमच्या अंतरंगातील खऱ्या प्रीतीचा प्रत्यय येतो. स्वाभाविक माणसाने एखाद्या चांगल्या माणसावर करावे तसे प्रेम पेत्र येशूवर करत होता. पण हे केवळ भावनिक प्रेम असते. ते आमच्या स्वाभाविक ‘अहं’मध्ये खोलवर गेले तरी ते एखाद्याचे अंतःकरण भेदत नाही. खरी प्रीती कधीच स्वतःला जाहीर करत नाही. येशूने म्हटले, “जो कोणी मला मनुष्यासमोर *पत्करतो* (आपल्या केवळ शब्दांनी नव्हे तर प्रत्येक कृतीतून प्रीती व्यक्त करतो) त्याला मनुष्याचा पुत्रही देवाच्या दूतांसमोर पत्करील” (लूक १२:८).

आमच्या स्वतःविषयीच्या प्रत्येक फसव्या गोष्टीमुळे होणारे दुःख सोसल्याशिवाय आमच्यामध्ये खुंटलेले देवाच्या वचनाचे कार्य पुढे जाणारच नाही. पापाने होणाऱ्या दुःखापेक्षा देवाच्या वचनाने होणारी दुखापत अधिक तीव्र आहे. कारण पापामुळे आमच्या जाणीवा बोथट होतात. परंतु प्रभूने विचारलेला हा प्रश्न आमच्या जाणीवा तीव्र करतो. येशूने विचारलेल्या या प्रश्नामुळे अंतःकरणाला पीळ पडतो. या प्रश्नाने होणारे दुःख केवळ स्वाभाविकच नव्हे तर अगदी खोल आध्यात्मिक पातळीवर पोचते. “कारण देवाचे वचन सक्रिय, सजीव असून... जीव व आत्मा... ह्यांना भेदून जाणारे आहे...” (इब्री ४:१२). प्रभू आम्हांला हा प्रश्न विचारतो तेव्हा योग्य प्रकारे विचार करुन उत्तर देणे अशक्य होते; कारण प्रभू थेट आमच्याशी बोलतो तेव्हा होणाऱ्या वेदना अति तीव्र असतात. यामुळे एवढ्या प्रचंड वेदना होतात की त्याच्या इच्छेच्या कक्षेबाहेर गेलेल्या आमच्या जीवनाच्या प्रत्येक भागाला हे क्लेश होतात. प्रभूच्या वचनाने लागणारी बोच वेदना त्याच्या मुलांना बरोबर समजतात; कारण वेदना होते त्याच क्षणाला देव आपले सत्य आम्हांला प्रकट करतो.

मार्च २

## प्रभूने दिलेले दुःख तुम्ही अनुभवले आहे?

**"तिसऱ्यांदा तो त्याला म्हणाला, '...माझ्यावर प्रेम करतोस काय?'" (योहान २१:१७).**

प्रभूने विचारलेल्या प्रश्नाने होणारे दुःख तुम्ही अंतरंगात अगदी खोलवर, तुमच्या जीवनाच्या अतिसंवदेनशील भागात अनुभवले आहे काय? सैतान देतो ते दुःख तेथवर पोचत नाही, मानवी भावना किंवा पाप हेही तेथवर जाऊ शकत नाही. फक्त देवाचे वचनच तेथवर जाऊ शकते. "तू माझ्यावर प्रेम करतोस काय?" असे येशूने तिसऱ्यांदा विचारले म्हणून पेत्र दुःखी झाला. परंतु आपल्या वैयक्तिक जीवनाच्या अंतरंगात, केंद्रस्थानी आपण येशूवर प्रेम करतो हे वास्तव पेत्राला आता समजले. आणि येशूने शांतपणे पुन्हापुन्हा विचारलेल्या प्रश्नाचे गूज त्याला आता समजले. आता पेत्राच्या मनात शंकेचा लवलेशही उरला नाही. पुन्हा तो कधी फसणार नव्हता. आता भावनावश होऊन बोलण्याचे काही कारण नव्हते, अगर ताबडतोब काही कृती करायची नव्हती. आपण प्रभूवर किती प्रेम करतो ते आता कोठे त्याला उमगले. आश्चर्यचकित होऊन तो सरळ म्हणाला, "प्रभू, आपणाला सर्व ठाऊक आहे..." आपले प्रभूवर गाढ प्रेम आहे हे आता कोठे पेत्राच्या लक्षात आले. आपल्या प्रीतीचे प्रमाण म्हणून हे अगर ते पहा असे म्हणण्याचे काहीच कारण नव्हते. पेत्राने आता आपल्या अंतरंगात पाहिले आणि प्रभूवर आपले अपार प्रेम आहे हे त्याला उमगले. आता त्याचे नेत्र येशू ख्रिस्तावर खिळले होते. आता त्याला वर स्वर्गात अगर खाली पृथ्वीवर दुसरे कोणीच दिसत नव्हते. परंतु प्रभूने हे शोधक आणि भेदक प्रश्न विचारीपर्यंत हे सत्य त्याला समजले नव्हते. प्रभूच्या अशा शोधक प्रश्नांनी खरा मी मला नेहमी उघड होतो.

अहाहा, येशू ख्रिस्ताने मोठ्या कुशलतेने, सोशिकपणे विचारलेल्या प्रश्नांचे नवल वर्णावे तेवढे थोडेच आहे! आमचा प्रभू योग्य वेळीच प्रश्न विचारतो. क्वचितच पण बहुधा आम्हा प्रत्येकाच्या जीवनात एकदातरी तो आम्हांला कोंडीत गाठून आपल्या शोधक प्रश्नांनी आमचा मर्मभेद करील. मग आमचा लक्षात येईल की आमचे त्याच्यावर अत्यंत गाढ प्रेम आहे आणि ते बोलून दाखवणे शब्दांच्या पलीकडचे आहे.

मार्च ३

## त्याने आमच्यावर सोपवलेली कामगिरी

**“माझी मेंढरे चार” (योहान २१:१७).**

येथे प्रीती आकारास येत आहे. देवाची प्रीती निर्माण केलेली नाही. प्रीती हा त्याचा स्वभाव आहे. आम्हांला पवित्र आत्म्याच्या द्वारे ख्रिस्ताचे जीवन मिळते, तेव्हा तो आम्हांला देवाशी संयुक्त करतो आणि त्याची प्रीती आमच्यामधून प्रकट होते. अंतरंगात वसणाऱ्या पवित्र आत्म्याचे उद्दिष्ट आम्हांला देवाबरोबर संयुक्त करणे एवढेच नाही तर जसा येशू पित्याबरोबर होता तसेच आम्हीही एक असावे. येशू ख्रिस्त पित्याबरोबर कोणत्या प्रकारे एक होता? पित्याशी त्याचा एकपणा असा होता की त्याच्या पित्याने आमच्यासाठी येथे ओतले जाण्यासाठी पाठवले तेव्हा त्याने आज्ञापालन केले. तो आम्हांला सांगतो “जसे पित्याने मला पाठवले आहे तसे मीही तुम्हांला पाठवतो” (योहान २०:२१).

आपण खरोखर येशूवर प्रीती करतो हे प्रभूने विचारलेल्या शोधक व भेदक प्रश्नाने पेत्राच्या लक्षात आले. प्रभूचा पुढला मुद्दा आहे, तुम्ही स्वतःला रिक्त करा, तू माझ्यावर किती प्रीती करतोस ते सांगू नको आणि आताच तुला झालेल्या अद्‌भुत प्रकटीकरणाविषयी बोलू नको, “माझी मेंढरे चार” येशूची काही मेंढरे विचित्र आहेत; काही मेंढरे अस्ताव्यस्त, ओंगळवाणी, घाणेरडी आहेत. काही धसमुसळी, मुसंडी मारुन पुढे येणारी असतात. काही बहकलेली आहेत! पण देवाची प्रीत अपार आहे, ती कधी संपत नाही आणि माझ्यामध्ये असलेल्या देवाच्या आत्म्यापासून प्रीती येत असेल तर तिलाही अंत नाही. आणि माझे माझ्या प्रभूवर प्रेम असेल तर माझ्या स्वाभाविक भावनांना थारा देण्याचे कोणतेच कारण नाही. मला त्याची मेंढरे चारलीच पाहिजेत. त्याने आमच्यावर सोपवलेल्या या कामगिरीपासून आमची सुटका नाही. आपल्या स्वाभाविक मानवी भावनांच्या आहारी जाऊन देवाच्या प्रीतीमध्ये भेसळ करु नका, सावध असा! मानवी सहानुभूती अगर समजुती यामुळे देवाच्या खऱ्या प्रीतीला बाध मात्र येईल.

मार्च ४

## माझ्याबाबतीत हे खरे आहे काय?

**“मी तर आपल्या प्राणाची किंमत एवढीसुद्धा करीत नाही...” (प्रे. कृ. २०:२४).**

दृष्टांत आणि पाचारण झालेले नसताना देवाची सेवा व त्याचे कार्य करणे सोपे आहे; कारण मग त्याच्या काय अपेक्षा आहेत हा विचार करण्याचे कारण नसते. सारासार विचार व त्यावर ख्रिस्ती भावनेचे आवरण हेच तुमचे मार्गदर्शक असते. जगाच्या दृष्टीने तुम्ही अधिक यशस्वी असाल; तुमची सुबत्ता नेत्रदीपक असेल. तुम्हांला बराच फुरसतीचा वेळ मिळेल. तुम्ही देवाचे पाचारण मान्य केले नाही तर हे सर्व आपोआप होईल. पण येशू ख्रिस्ताकडून कामगिरी स्वीकारली की देवाने तुम्हांला सांगितले आहे ही आठवण तुम्हांला स्वस्थ बसू देणार नाही. तुम्हांला त्याच्या इच्छेप्रमाणे करावेच लागेल. तुमच्या सामान्य बुद्धीनुसार तुम्हांला त्याच्यासाठी कार्य करताच येणार नाही.

माझ्या जीवनातील कोणती गोष्ट “अद्याप मी प्रिय समजतो?” येशू ख्रिस्ताने मला कह्यात घेतले नसेल आणि मी त्याला शरण गेलो नसेन तर मग मी देवाला द्यावयाचा वेळ ठरवीन. सेवेविषयीच्या माझ्या कल्पनाच मला प्रिय असतील. माझे स्वतःचे जीवनही “मला प्रिय” असेल, परंतु आपल्याला दिलेली सेवा पूर्ण करता यावी म्हणूनच पौलाने स्वतःचे जीवन प्रिय मानून आपली शक्ती अन्य कोठेही कारणी लावणे नाकारले. या वचनातून पौलाची जणू सात्विक चीड दिसून येते. तो स्वतःचा विचार करत नाही. आपल्याला दिलेली सेवा पूर्ण करण्यापुढे त्याला इतर कोणत्याच गोष्टीची पर्वा नव्हती. आम्ही समंजसपणे करतो त्या कार्याला पुढील मुद्याचा आधार आहे : आम्ही म्हणतो, “येथे तू किती उपयुक्त कार्य करतोस ते विसरु नको. त्या विशिष्ट कामात तू किती मोलामहत्त्वाचा आहेस तेही लक्षात घे.” या प्रकारे विचार केल्याने आम्ही स्वतःच कामाची दिशा ठरवतो. वास्तविक पाहता आम्ही ख्रिस्ताला आपला मार्गदर्शक करुन तो दाखवील त्याप्रमाणे सेवा केली पाहिजे. आपला येथे उपयोग आहे का नाही हे तुम्ही कधीही ठरवू नका. “तुम्ही स्वतःचे मालक नाही” (१ करिंथ ६:१९). हे कधी विसरु नका. तुम्ही त्याचे आहा.

**मार्च ५**

## खरंच तो माझा प्रभू आहे?

**“मी आपली धाव आणि देवाच्या कृपेची सुवार्ता... येशूपासून प्राप्त झाली आहे ती शेवटास न्यावी” (प्रे. कृ. २०:२४).**

एका विशिष्ट कार्यासाठी मला उत्पन्न केले, मी नव्याने जन्मलो, ते पूर्ण केल्याने आनंद होतो. माझ्या स्वतःच्या पसंतीने, यशस्वीपणे पूर्ण केलेल्या कामाचा तसा आनंद होत नाही. देवपित्याने करायला पाठवले ते काम पूर्ण केल्याने आमच्या प्रभूने आनंद अनुभवला. आता तो आम्हांला सांगतो, “जसे पित्याने मला पाठवले आहे तसे मीही तुम्हांला पाठवले आहे” (योहान २०:२१). तुम्हांला प्रभूने सेवा दिली आहे काय? असेल तर तुम्ही ती विश्वासूपणे केली पाहिजे. येशूने करायला पाठवले ते काम पूर्ण केल्यावर तो म्हणेल, “शाबास! भल्या व विश्वासू दासा! चांगले केलेस!” (मत्तय २५:२१). हे ऐकून तुम्हांला धन्य, धन्य वाटणार नाही का? आपणा प्रत्येकाला जीवनात एक प्रयोजन हवे असते आणि प्रभूपासून सेवा मिळाली की आम्हांला आध्यात्मिक दृष्टीने ते मिळते. त्यासाठी आम्हांला येशूबरोबर निकटची सहभागिता हवी असते, शिवाय तो आमचा केवळ वैयक्तिक तारणाराच नव्हे तर त्याहून अधिक आहे याची खात्री पटणे अगत्याचे आहे. प्रेषितांची कृत्ये ९:१६ “.... त्याला **माझ्या नावासाठी** किती दुःख सोसावे लागेल हे मी त्याला दाखवीन.”

“माझ्यावर प्रीती करतोस काय?” होय ना, तर “माझी मेंढरे चार” (योहान २१:१७). आम्ही त्याची कशी सेवा करावी याचा पर्याय तो आम्हांला देत नाही. त्याने सोपवलेली कामगिरी पूर्ण विश्वासाने, निष्ठेने करावी. देवाबरोबर अगदी निकट सहभागितेत असावे हीच त्याची अपेक्षा आहे. तुम्हांला प्रभू येशूने सेवा सोपवली असेल तर ते पाचारण पूर्ण करण्याची गरज आहे हे तुम्हांला समजेल. तुमची त्याच्याबरोबर खरी सहभागिता असताना मिळालेली सेवा विश्वासूपणे करावी. अर्थात वेगवेगळ्या सेवांची एक मालिकाच तुमच्यासाठी ठेवली आहे असे नाही. देवाने तुम्हांला पाचारण केले आहे ते कार्य प्रथम पूर्ण करावे, कदाचित त्यासाठी तुम्हांला इतर भागातील सेवेकडे दुर्लक्ष करावे लागेल.

**मार्च ६**

## पाऊल पुढे टाकणे

**"... फार धीराने संकटांत, विपत्तींत, पेचप्रसंगात" (२ करिंथ ६:४).**

जेव्हा देवाकडून दृष्टांत होत नाही, जीवनात उत्साह नसतो, तुमचे कार्य बघणारा, उत्तेजन देणारा कोणी नसतो तेव्हा देवावरील निष्ठेत पुढे पाऊल टाकण्यासाठी सर्वसमर्थ देवाची कृपाच हवी असते. त्या कृपेनेच तुम्हांला त्याचे वचन वाचून अभ्यास करता येतो. तुमच्या कौटुंबिक जीवनात, त्याच्याविषयीचे कर्तव्य करण्यासाठीही ईश्वरी कृपेचीच गरज आहे. सुवार्ता सांगण्यासाठी आवश्यक असलेल्या कृपेपेक्षा अधिक कृपा व त्या कृपेची जाणीव पुढे पाऊल टाकण्यासाठी गरजेची आहे.

प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला पुढच्या पावलाची वास्तविकता रक्तामांसाच्या स्वरुपात आणण्यासाठी स्वतःच्या हातांनी काम केले पाहिजे. परंतु दृष्टांत नसतो, उत्तेजन नसते आणि सुधारणाही होत नाही, तेव्हा आमचे चित्त विचलित होते आणि आमच्या दैनंदिन जीवनातील नित्याच्या त्याच त्याच कामात गुंतून राहावे लागते. देव आणि देवाचे लोक ह्यांना साक्ष होणारी एकच गोष्ट आहे. आपले काम कोणाला दिसो वा न दिसो ते चिकाटीने करत राहणे हेच महत्त्वाचे आहे आणि कोणत्याही प्रकारे विफल न होता जगायचे तर सतत देवाकडे पाहात राहावे. तुमच्या आत्म्याचे नेत्र पुनरुत्थित ख्रिस्ताकडे लागलेले असावेत यासाठी देवाला विनंती करा. त्यामुळे रोजच्या कष्टांमुळे तुमची निराशा होणार नाही. तुमचे धैर्य खचणार नाही. अमुक काम माझ्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही. तमुक काम अगदी क्षुल्लक आहे, मी ते करणार नाही असे कधीही म्हणू नका. योहान १३:१—१७ मधील ख्रिस्ताचा आदर्श नेहमी लक्षात असू द्या.

## मार्च ७

# विपुल आनंदाचा उगम

**“उलटपक्षी ज्याने आपणावर प्रीती केली त्याच्या योगे ह्या सर्व गोष्टींत आपण महाविजयी ठरतो” (रोम ८:३७).**

पौल येथे विश्वासणाऱ्याला देवाच्या प्रीतीपासून विभक्त करु शकतील अशा गोष्टींविषयी बोलतो. पण विश्वासणारा आणि देवाची प्रीती यांना विभक्त करु शकेल असे काहीही नाही. पौलाने येथे उल्लेख केला आहे त्या गोष्टी देवाबरोबर असलेल्या आमच्या जिवाच्या सहभागितेत बिघाड आणून आमचे स्वाभाविक जीवन त्याच्यापासून विभक्त करु शकतात. पण आध्यात्मिक पातळीवर विश्वासणाऱ्याचा जीव आणि देवाची प्रीती यांच्या आड काहीही येऊ शकत नाही. काल्वरीच्या वधस्तंभावर प्रकट झालेल्या देवाच्या प्रीतीचा अमर्याद चमत्कार हाच ख्रिस्ती विश्वासाचा आधारभूत पाया आहे. कोणतीही पात्रता नसताना मिळालेली ही प्रीती संपादन करता येत नाही आणि “ह्या सर्व गोष्टीत आपण महाविजयी ठरतो” त्याचे हेच कारण आहे. आम्हांला दडपून टाकणार असे वाटणाऱ्या गोष्टी अनुभवल्याचा आनंद उपभोगत आम्ही महाविजयी ठरलो आहो.

सामान्य पोहणाऱ्याच्या उरात धडकी भरवणाऱ्या प्रचंड लाटा त्यांवर स्वारी करणाऱ्याला एक वेगळाच आनंद देतात. आपण टाळू पाहतो आणि झगडतो त्याच, क्लेश, आपत्ती आणि छळवणूक या गोष्टी आम्हांला विपुल आनंद देतात. “ह्या सर्व गोष्टीत”, त्यांना न जुमानता नव्हे, “आपण महाविजयी ठरतो” विश्वासणाऱ्याला छळणुकीला न जुमानल्याने नव्हे तर त्यामुळेच आनंद होतो. पौलाने म्हटले आहे, “आम्हांवर आलेल्या सर्व संकटांत मला आनंदाचे भरते आले आहे” (२ करिंथ ७:४).

उणे न होणारे तेच, हाच विपुल आनंदाचा परिणाम आहे; त्याला बदलणाऱ्या नव्हे तर कधी न बदलणाऱ्या देवाच्या प्रीतीचा आधार आहे. जीवनात येणारे बरे वाईट अनुभव कसेही असले तरी ते “ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करावयाला समर्थ होणार नाही” (रोम ८:३९).

## समर्पित जीवन

**“मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे”** (गलती २:२०).

येशू ख्रिस्ताबरोबर एक होण्यासाठी आपण पाप सोडून देणे पुरेसे नाही. आपली विचार दृष्टी बदलली पाहिजे. देवाच्या आत्म्याने नवा जन्म होणे म्हणजे दुसरे काही घेण्यापूर्वी प्रथम आहे ते सोडण्यास तयार असणे. आमचे ढोंग किंवा फसवणे हे प्रथम सोडले पाहिजे. आमच्या प्रभूला आमच्याकडून आमचे चांगुलपण, सचोटी अगर चांगले होण्याचे आमचे प्रयत्न नकोत, तर आमचे सर्व पापच हवे आहे. आणि प्रत्यक्षात तो एवढेच आमच्यापासून घेऊ शकतो. आमचे पाप घेऊन त्या बदली तो आम्हांला पक्के नीतिमत्त्व देतो. पण प्रथम आपण कोणी आहोत हा अभिनिवेश सोडला पाहिजे; तसेच देवाने आमचा विचार करावा अशी आमची लायकी आहे. असले विचार फेकले पाहिजेत.

एवढे केले आणखी काय समर्पण करायचे ते देवाचा आत्मा दाखवील. या प्रक्रियेत पदोपदी आम्हांला स्वतःचे काही हक्क आहेत हा भ्रम सोडणे जरुर आहे. आमचे स्वतःचे म्हणून जे काही आहे ते, आमच्या इच्छा, आशा व इतर सर्वकाही सोडण्यास तयार आहो? येशू ख्रिस्ताच्या मरणाशी समरुप होण्याची आमची तयारी आहे काय?

संपूर्ण समर्पण करण्याअगोदर आपला दारुण भ्रमनिरास होणे गरजेचे आहे. प्रभू आपल्याला पाहतो तसे आपण स्वतःला पाहिले तर देहाच्या किळसवाण्या पापांनी नव्हे तर येशू ख्रिस्ताला विरोध करणारा स्वतःच्या अंतःकरणातील अहंकार पाहून आपणला धक्का बसतो. प्रभूच्या प्रकाशाने स्वतःला पाहिले की लाज, शरम, भीती आणि निराशा यांचा दारुण प्रत्यय येतो.

आपण आपले समर्पण करायचे का नाही हा प्रश्न पडेल तेव्हा त्या प्रसंगातून धडाडीने पुढे जा, तुमच्याकडे आहे ते व तुम्ही स्वतः यांचे समर्पण करा. देवाला तुमच्याकडून आहेत त्या अपेक्षा पूर्ण करण्यास तोच तुम्हांला सज्ज करील.

**मार्च ९**

## माघारी जायचे का येशूबरोबर चालायचे?

**“तुमचीही निघून जाण्याची इच्छा आहे काय?” (योहान ६:६७).**

केवढा भेदक प्रश्न! आमचा प्रभू अगदी साधे शब्द वापरतो तेव्हा ते आमच्या अंतःकरणाला खोलवर भिडतात, येशू कोण आहे ते आम्हांला माहीत आहे तरी तो विचारतो, “तुमचीही निघून जाण्याची इच्छा आहे?” आम्ही नेहमी त्याच्यासंबंधात साहसी वृत्ती ठेवली पाहिजे, वैयक्तिक धोका असो नसो.

“ह्यावरुन त्याच्या शिष्यांपैकी पुष्कळजण परत गेले आणि ते पुन्हा त्याच्याबरोबर चालले नाहीत” (६:६६). ते येशूबरोबर चालण्याचे सोडून मागे गेले. पापात गेले नसले तरी त्याच्यापासून दूर गेले. आज अनेक लोक येशू ख्रिस्तासाठी जीव ओतून काम करतात, परंतु खरे तर ते त्याच्याबरोबर चालतच नाहीत. आम्ही येशूबरोबर एक असावे हेच एक देवाला आमच्याकडून अपेक्षित आहे. पवित्रीकरणाच्या द्वारे वेगळे केल्यावर आम्ही आमच्या जीवनाला आध्यात्मिक शिस्त लावली पाहिजे. देवाने तुम्हांला आपली इच्छा काय आहे ते नेमकेपणे कळवल्यावर ते नाते एका विशिष्ट पद्धतीने सांभाळण्याची अजिबात गरज नाही. येशू ख्रिस्तावर सर्वस्वी अवलंबून स्वाभाविकपणे जगणेच आवश्यक आहे. देवाबरोबर याखेरीज दुसऱ्या कोणत्याच प्रकारे जगण्याचा प्रयत्न करु नका. त्याचा मार्ग हाच की सर्वस्वी त्याच्याशी एकनिष्ठ राहणे. पुढे येणाऱ्या अनिश्चिततेचा विचारही न करता पुढे जाणे हेच येशूबरोबर चालण्याचे रहस्य आहे.

येशू केवळ आपल्याला आणि जगाला तारण देणाराच आहे, एवढेच पेत्राला त्याच्यामध्ये दिसले. पण आम्ही आमच्या प्रभूबरोबर सहकारी असावे हीच त्याची इच्छा आहे.

वचन ७० मध्ये येशूने पेत्राला मोठ्या आपुलकीने स्मरण दिले की आपल्याबरोबर चालण्यासाठी त्याला निवडले आहे. आता आपल्यापैकी प्रत्येकाने स्वतःसाठी “तुमचीही निघून जाण्याची इच्छा आहे काय?” या प्रश्नाचे उत्तर दिलेच पाहिजे.

मार्च १०

## त्याच्या संदेशाचे आदर्श उदाहरण होणे

**"वचनाची घोषणा करा" (२ तीमथ्य ४:२).**

देवासाठी साधने होण्यासाठीच नव्हे तर त्याचे पुत्र व कन्या होण्यासाठी आमचे तारण केले आहे. तो आम्हांला आध्यात्मिक कृती करणारे नव्हे तर संदेश देणारे करतो. तो संदेश आमच्या व्यक्तित्वाचा भाग झाला पाहिजे. देवाचा पुत्र स्वतःच स्वतःचा संदेश होता. "मी जी वचने तुम्हांला सांगितली ती आत्मा व जीवन अशी आहेत" (योहान ६:६३). त्याचे शिष्य या नात्याने आमची जीवने आमच्या संदेशाच्या सत्यतेचे पवित्र उदाहरण असणे आवश्यक आहे. तारण न पावलेल्या व्यक्तीचे नैसर्गिक अंतःकरणही जरुर पडल्यास हे करु शकेल; पण वास्तविक पाहता यासाठी पापाची खात्री पटल्याने भग्न झालेले, पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा झालेले आणि देवाच्या उद्देशासाठी नमवून अधीन केलेले अंतःकरणच आपले जीवन देवाच्या संदेशाचे आदर्श पवित्र उदाहरण होण्यासाठी आवश्यक आहे.

आपली साक्ष सांगणे आणि संदेश देणे यात फरक आहे. उपदेशकाला देवाने पाचारण केलेले असते. देवाचे सत्य जाहीर करण्यास आपली सर्व शक्ती वेचावी हा त्याचा पक्का निर्धार असतो. देव आम्हांला आमच्या आकांक्षा आणि विचार यांच्यापलीकडे नेतो आणि त्याचा उद्देश साध्य होण्यासाठी आम्हांला आकार देतो. तयार करतो. त्याने पेंटेकॉस्ट नंतर शिष्यांच्या जीवनात असेच कार्य केले. शिष्यांना काही शिकवावे हा पेंटेकॉस्टचा उद्देश नव्हता; तर त्यांचा संदेश त्यांच्या जीवनाशी एकरुप करणे हा होता. त्यामुळे ते स्वतः देवाचा देहधारी संदेश झाले, "... तुम्ही माझे साक्षी व्हाल..." (प्रे. कृ. १:८).

तुम्ही बोलता तेव्हा देवाला तुमच्या जीवनात संपूर्ण स्वातंत्र्य द्या. देवाच्या संदेशाने दुसऱ्या लोकांना मुक्त करण्यापूर्वी त्याची मुक्तता, मोकळीक तुमच्यामध्ये वास्तवात येणे आवश्यक आहे. आपले सर्व साहित्य काळजीपूर्वक मिळवा. एकत्र करा आणि मग देवाला त्याच्या गौरवासाठी "तुमचे शब्द ज्वलंत करु द्या."

**मार्च ११**

## “स्वर्गीय दृष्टांताचे” आज्ञापालन

**“मी तो स्वर्गीय दृष्टांत अवमानिला नाही” (प्रे. कृ. २६:१९).**

देवाने आम्हांला दिलेला “स्वर्गीय दृष्टांत” गमावला तर त्याला आम्हीच जबाबदार आहोत. आमची आध्यात्मिक वाढ झालेली नसते म्हणून आम्ही त्या दृष्टांताला मुकतो. देवाविषयीचा आमचा विश्वास दैनंदिन जीवनाला लागू केला नाही तर देवाने आम्हांला दिलेला दृष्टांत कधीही परिपूर्ण होणार नाही. “स्वर्गीय दृष्टांतानुसार” आज्ञापालन करण्याचा एकच मार्ग, त्याच्या सर्वश्रेष्ठतेसाठी आमचे सर्वोत्तम देणे हाच आहे. यासाठी देवाच्या दृष्टांताचे स्मरण सतत ठेवलेच पाहिजे. अर्थात यासाठी आपण क्षणोक्षणी त्या दृष्टांताचे स्मरण ठेवले पाहिजे. फक्त वैयक्तिक प्रार्थना आणि उपासना सभा या प्रसंगीच दृष्टांताचे स्मरण ठेवणे पुरेसे नाही.

“त्यास विलंब लागला तरी त्याची वाट पाहा...” (हबक्कूक २:३). आमच्या स्व प्रयत्नांनी हा दृष्टांत पूर्ण करणे शक्य नाही. तो स्वतःच परिपूर्ण होईपर्यंत आपण त्याच्या प्रेरणेने जीवनक्रम चालवावा. आम्ही व्यवहारी होऊन दृष्टांत विसरतो. अगदी सुरुवातीस आम्ही दृष्टांत पाहिला, पण त्याची वाट पाहिली नाही. आमचे नित्याचे व्यवहार करण्यासाठी धावपळ केली. दृष्टांत परिपूर्ण झाल्यावर तो आमच्या दृष्टिआड झाला. येण्यास “विलंब” लावणाऱ्या दृष्टांताची वाट पाहणे हीच आम्ही देवाशी विश्वासू आहोत का नाही त्याची कसोटी आहे. जिवाच्या कल्याणाची पर्वा न करता आम्ही प्रपंचात गुरफटून जातो आणि दृष्टांताच्या परिपूर्तीला मुकतो.

देवाच्या वादळांवर लक्ष ठेवा. आपल्या वादळांच्या तुफानी झंझावाताच्या द्वारेच देव आपल्या पवित्रजनांचे रोपण करतो. आपण दाणे नसलेली पोकळ शेंग आहोत का? तुम्ही पाहिलेल्या दृष्टांताच्या प्रकाशात चालत आहात का नाही त्यावरच ते अवलंबून आहे. देव तुम्हांला त्याच्या वादळातून पार नेईपर्यंत जाऊ नका. रोपणासाठी जागेची निवड तुमची असेल तर तुम्ही पोकळ शेंग ठराल आणि देवाला रोपण करु दिलेत तर तुम्ही “विपुल फळ द्याल” (योहान १५:८). देवाने आमच्यासाठी नेमलेल्या दृष्टांताच्या “प्रकाशात आपण चालू” आणि राहू (१ योहान १:७).

मार्च १२

## संपूर्ण समर्पण

**“पेत्र त्याला म्हणू लागला, पाहा, आम्ही सर्वकाही सोडून आपल्या मागे आलो आहे” (मार्क १०:२८).**

हे समर्पण “माझ्याकरता व सुवार्तेकरता” आहे असे आमच्या प्रभूने पेत्राला सांगितले (१०:२९). शिष्यांना यातून काय मिळणार हा विचारच येथे नव्हता. संपूर्ण समर्पण वैयक्तिक लाभाच्या आशेने करु नये. “मला पापापासून मुक्ती हवी, मला पवित्र व्हायचं, म्हणून मी देवाला स्वतःचे समर्पण करणार” असे म्हणू नका. देवाबरोबरचे नाते सरळ झाले की पापापासून सुटका आणि पवित्र होणे हा परिणाम होतो. पण काही मिळेल या आशेने केलेले समर्पण खऱ्या ख्रिस्तीपणाला शोभणारे नाही. वैयक्तिक लाभ आमच्या समर्पणाचा उद्देश कधीही नसावा. काहीतरी मिळावे म्हणून आम्ही देवाकडे जातो देवासाठी नाही. जणू आपण म्हणतो, “हे प्रभू, तू मला नकोस. माझा मी स्वतःला पुरे आहे. आता तू मला शुद्ध कर, तुझ्या पवित्र आत्म्याने परिपूर्ण कर. मला माझे प्रदर्शन मांडायचे आहे. मी म्हणेन, ‘पहा, देवाने माझ्यासाठी हे केले आहे!’” स्वर्ग मिळवणे, पापापासून सुटका होणे आणि देवाच्या उपयोगी पडणे या गोष्टींचा विचारही खऱ्या समर्पणात होऊ नये. ख्रिस्तासाठी स्वच्छेने स्वतःला समर्पण करणे हेच अस्सल संपूर्ण समर्पण आहे.

आमच्या स्वाभाविक नात्यांची आम्ही चिंता करतो त्यात येशू ख्रिस्त नसतोच त्याची साथ सोडताना आम्ही म्हणू, “होय, प्रभू, तुझे पाचारण ऐकले. पण परिवाराला माझी गरज आहे, शिवाय माझीही कामे आहेत. तेव्हा क्षमा कर, यापुढे मला येववत नाही” (पहा लूक ९:५७–६२). त्यावर येशू म्हणेल, “तर मग तुला माझा शिष्य होता येणार नाही” (पहा १४:२६–३३).

संपूर्ण समर्पण स्वाभाविक भक्तीपलीकडचे आहे. आम्ही सर्व सोडले तर स्वतः देवच आमच्या सर्व परिवाराला आपल्या कवेत घेऊन त्यांच्या सर्व गरजा भागवील. संपूर्ण समर्पणाची वाट चालताना मध्येच थांबू नका. याच्या खऱ्या अर्थाचे नेमके चित्र आपल्यापुढे आहे पण खरोखर त्याचा अनुभव कधी घेतलेला नसतो.

मार्च १३

## देवाचे संपूर्ण समर्पण—आमच्यासाठी

**“देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला” (योहान ३:१६).**

तारण म्हणजे केवळ पापापासून सुटका अगर वैयक्तिक पवित्रतेचा अनुभव असे नाही. देवाकडून मिळणारे तारण म्हणजे “अहं” पणा पासून पूर्ण सुटका आणि त्याच्याबरोबर परिपूर्ण ऐक्य होणे. तारणाच्या माझ्या अनुभवाचा मी विचार करतो तेव्हा पापापासून सुटका होऊन वैयक्तिक पवित्रता मिळाली आहे, हेच माझ्या मनात येते. पण तारण याहून खूपच अधिक आहे! देवाच्या आत्म्याने मला प्रत्यक्ष देवाच्या संपर्कात आणले आहे हाच त्याचा अर्थ. देवाला स्वतःचे संपूर्ण समर्पण करताना माझ्याहून काही अफाट थोरपणा अनुभवून मी रोमांचित होतो.

पवित्रीकरणाचा संदेश देण्यासाठी आम्हांला पाचारण झाले आहे असे म्हटल्याने मुख्य मुद्दा बाजूस राहतो. येशू ख्रिस्ताची घोषणा करण्यासाठी आमचे पाचारण आहे (पहा १ करिंथ २:२). तो आमचे पापापासून तारण करतो, आम्हांला पवित्र करतो हा खरे तर त्याने आमच्यासाठी केलेल्या संपूर्ण समर्पणाच्या परिणामाचा एक भाग आहे.

आम्ही खरोखर समर्पित झालेले असू तर तसेच समर्पित राहण्यासाठी चाललेल्या आमच्या प्रयत्नांची जाणीवही होणार नाही. आमचे संपूर्ण जीवन आम्ही ज्याला समर्पित झालो आहो त्याच्यामध्ये गुंतलेले राहील. समर्पण म्हणजे काय ते माहीत नसेल तर त्याविषयी चुकूनही बोलू नका. खरे तर योहान ३:१६ प्रमाणे देवाने स्वतःला सर्वस्वी आम्हांला दिले आहे, हे समजल्याखेरीज समर्पण काय असते ते समजणारच नाही. आणि अगदी त्याच प्रकारे आम्हीही देवाला स्वतःचे संपूर्ण समर्पण केले पाहिजे. हातचे काही न राखता, बिनशर्त समर्पित होणे अगत्याचे आहे. आमच्या समर्पणातून होणारे परिणाम व येणारी परिस्थिती यांचा विचारही कधी आमच्या मनात येणार नाही. कारण आमचे जीवन त्याच्याशी पूर्णपणे एकरुप झालेले असेल.

**मार्च १४**

## स्वाधीन होणे

**"... ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहा..." (रोम ६:१६).**

माझ्यावर कोणाचे वर्चस्व आणि नियंत्रण आहे त्याचा विचार करताना मी स्वतःला ज्याच्या स्वाधीन केले आहे त्याला मीच सर्वस्वी जबाबदार आहे. मी स्वतःचा गुलाम असलो तर त्यात माझाच दोष आहे कारण मीच स्वतःचा दास झालो; तसेच मी देवाचे आज्ञापालन करतो तर माझ्या जीवनात कधीतरी मी स्वतःला त्याच्या स्वाधीन केले आहे.

एखादे मूल स्वार्थाचे दास झाले तर जगात स्वार्थाची गुलामगिरी जुलमी आहे हे त्याला समजेल. स्वाधीन करण्याच्या कृतीने उत्पन्न केलेले दासपण मोडण्यास सक्षम असे मनुष्याच्या अंतरंगात काहीही नाही. उदाहरणार्थ, एक क्षण जरी वासनेच्या आहारी गेलात आणि नंतर तुमचा तुम्हांला वीट वाटला तरीपण तुम्ही त्या गोष्टीचे दास झालाच आहात. (लक्षात ठेवा, "ते मला आता हवे" हीच देहवासना आहे. मग ती वासना देहाची असो वा मनाची). मानवी शक्तीने त्यातून सुटका होणार नाही. तारणाच्या सामर्थ्यानेच सुटका होईल. संपूर्ण नम्रतेने तुम्ही स्वतःला तुमच्यावर वर्चस्व गाजवणाऱ्या शक्तीचा बीमोड करण्यास समर्थ अशा प्रभू येशू ख्रिस्ताच्या स्वाधीन व्हा. "... त्याने मला अभिषेक केला... धरुन नेलेल्यांची सुटका... घोषणा करावी..." (लूक ४:१८ आणि यशया ६१:१).

तुम्ही स्वतःला कोणाच्या तरी स्वाधीन केले की तुमच्यावर त्याचे किती प्रचंड नियंत्रण येते ते नंतरच समजते. "ऊं! त्यात काय! ती सवय मी एका मिनिटात सोडीन" असा तुम्ही कितीही निर्धार केलात तरी तसे होणे दुरापास्तच! तुम्ही स्वच्छेने त्या सवयीच्या आहारी गेलात; तेव्हा आता त्या सवयीचा पगडा काही केले तरी दूर होतच नाही. "तो प्रत्येक बंधन तोडील" हे म्हणणे सोपे आहे. त्याच वेळी आपण स्वतः बंधनात आहो हे तुमच्या ध्यानात येतच नाही. परंतु प्रभू येशूच्या स्वाधीन झाले तर तो आपल्या जीवनातील सर्व प्रकारचे दासपण मोडून काढील.

## भयाचे शासन

**“तेव्हा ते विस्मित झाले आणि मागोमाग येणारे घाबरले...” (मार्क १०:३२).**

येशू ख्रिस्तासह राहताना आरंभी त्याच्यामागे चालणे म्हणजे काय ते आम्हांला पुरेपूर ठाऊक आहे असे वाटले. सर्व सोडून निर्भयपणे प्रीतीने त्याच्यापुढे चालण्यात आम्हांला मोठा आनंद होता. पण आता आम्हांला अस्वस्थ वाटते. येशू आमच्या खूप पुढे गेला आहे. आता तो आम्हांला वेगळा आणि अपरिचित वाटतो. “.... येशू त्यांच्यापुढे चालला होता; तेव्हा ते विस्मित झाले” (१०:३२).

येशूच्या एका पैलूने शिष्याचे अंतःकरणही मुळापासून हादरते, त्याच्या आध्यात्मिक जीवनाला धाप लागते. ही असामान्य व्यक्ती आपले मुख “गारगोटीसारखे” (यशया ५०:७) करुन निर्धाराने माझ्यापुढे चालली आहे. आता तो माझा सल्लागार, मित्र असा वाटतच नाही. आता तो अनोळखीच वाटतो. मी नुसता चकित होऊन त्याच्याकडे टक लावून पाहतो. तो मला समजला आहे असे प्रथम मला त्याच्याशी सलगीने वागता येत नाही. तो कुठे चालला आहे कोण जाणे! त्याचे लक्ष्य मला तर चमत्कारिक आणि दूरचे वाटते.

मनुष्याच्या अनुभवास येणारे प्रत्येक पाप आणि दुःख येशू ख्रिस्ताला पूर्णपणे समजून घेणे गरजेचे होते, त्यामुळेच तो अनोळखी वाटतो. त्याचा हा पैलू समोर आला की आम्ही खरोखर त्याला ओळखत नाही हे जाणवते. त्याच्या जीवनातील एकाही गोष्टीची ओळख पटत नाही. आता त्याच्या मागे चालण्याचा आरंभ कोठून कसा करावा तेही कळत नाही. तो आमच्या फार पुढे गेला आहे. तो अनोळखी नेता वाटतो, आमची त्याच्याशी मैत्री नाहीच!

भयाचे शासन हा धडा प्रत्येक शिष्याने शिकणे आवश्यक आहे. यात धोका एवढाच आहे की आम्ही मागे पाहतो. त्याच्याविषयीचा उत्साह कायम राहावा यासाठी पूर्वीचा त्याग आणि आज्ञापालन मनात आणतो (पहा यशया ५०:१०-११). भयाचे काहूर येईल तेव्हा ते मावळेपर्यंत सहन करा; कारण त्यातूनच येशूच्या मागे खरोखर चालण्याची क्षमता मिळणार आणि त्यातूनच अतिशय अद्‌भुत आनंदाचा अनुभव येणार.

## प्रभू न्यायनिवाडा करील

**“आपणा सर्वांना ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर खऱ्या स्वरुपाने प्रगट झाले पाहिजे”(२ करिंथ ५:१०).**

पौल सांगतो, “आपणा सर्वांना, उपदेशक आणि इतर लोक, ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर प्रगट झाले पाहिजे.” परंतु तुम्ही येथे व आताच ख्रिस्ताच्या शुद्ध प्रकाशात जगण्यास शिकला असाल तर अखेरच्या न्यायाच्या वेळी देवाने तुमच्यामध्ये केलेले कार्य पाहून तुम्हांला आनंद होईल. जीवनक्रम चालवताना ख्रिस्ताच्या न्यायासनाचा विचार सतत मनात असू दे. त्याने तुम्हांला दिलेल्या पवित्रतेचा विसर पडू देऊ नका. दुसऱ्या व्यक्तिविषयी मनात आकस धरल्याने तुम्ही सात्विकपणाचा कितीही आव आणलात तरी खरोखरी सैतानाच्या वृत्तीने चालता. दुसऱ्या व्यक्तीचा ऐहिक न्याय केल्याने तुमच्यातील नरकाचे उद्दिष्ट पुरे होते. केलेली चूक लगेच उजेडात आणून कबुली द्या, “हे प्रभू, मी याबाबतीत दोषी आहे.” असे केले नाही तर तुमचे अंतःकरण दगडासारखे कठीण होईल. पापाचा स्वीकार करणे ही पापाची एक शिक्षाच आहे. फक्त देवच पापामुळे शिक्षा करीत नाही, तर पाप पापी व्यक्तीच्या अंतरंगात आपले बस्तान बसवून आपला वाटा वसूल करते. कितीही खटपट केली, प्रार्थना केल्या तरी काही गोष्टी करण्याचे तुम्ही थांबवू शकणार नाही. मग पुढे हळूहळू पाप अंगवळणी पडते हीच पापाची शिक्षा आहे. शेवटी आपण करतो हे पाप नाहीच अशी धारणा होते. पापामध्ये अंगभूत असलेले दुष्परिणाम कोणत्याच शक्तीला जुमानत नाहीत. ते वाईट परिणाम टाळून त्यांना प्रतिबंध करण्यासाठी पवित्र आत्म्याने परिपूर्ण असणे गरजेचे आहे.

“**... जसा तो प्रकाशात आहे तसे** जर आपण प्रकाशात चालत असलो...” (१ योहान १:७). आमच्यापैकी अनेकांना वाटते की प्रकाशात चालणे, म्हणजे आपण दुसऱ्या व्यक्तीसाठी नेमून दिलेल्या मापदंडानुसार चालणे, आपण आज परुश्यांच्या अत्यंत घातक प्रवृत्तीचे प्रदर्शन करतो तो काही दंभ नव्हे, तर ते लबाडीच्या आधारे जीवनक्रम चालवल्याने नकळत येणाऱ्या घातक मानसिक वृत्तीचे फळ आहे.

## सेवकाचे प्रमुख ध्येय

**“त्याला संतुष्ट करण्याची आम्हांला हौस आहे” (२ करिंथ ५:९).**

“आम्हांला हौस आहे...” आमचे ध्येय सतत डोळ्यांसमोर ठेवण्यासाठी निश्चयी निर्धाराची आवश्यकता आहे. आत्मे जिंकणे, मंडळ्या स्थापन करणे, संजीवन सभा घेणे वगैरे कशालाही अग्रक्रम न देता “त्याला संतुष्ट करणे” हेच आपले ध्येय असले पाहिजे. आध्यात्मिक अनुभवाच्या अभावाने अपयश येते असे नाही पण योग्य ध्येयाकडे दृष्टी न लावल्याने, त्यासाठी न झटल्याने अपयशय येते. देवाने तुमच्यासाठी नेमलेल्या मापदंडानुसार तुमचा जीवनक्रम चालला आहे का नाही ते त्याच्यासमोर दर आठवडी एकदा तपासून पहा. श्रोत्यांच्या पसंतीचा विचार न करणाऱ्या संगीतकारासारखा पौल आहे. मुख्य नियंत्रकाकडून पसंतीचा एक कटाक्ष आपल्या दिशेने आला तरी तेवढे त्याला पुरेसे आहे.

“देवाच्या पसंतीस उतरलेला” होणे (२ तीमथ्य २:१५). या प्रमुख ध्येयापासून किंचित बाजूस नेणारे कोणतेही ध्येय आम्हांला त्याची आणखी सेवा करण्यापासून दूरच ठेवील. हे ध्येय आपल्याला कोठे नेते आहे ते लक्षात आले की मग “येशू ह्याच्याकडे पाहत” असण्याचे (इब्री १२:२) अगत्य का आहे ते लक्षात येईल. आपल्या देहाने आपल्याला भलतीकडे वाहवत नेऊ नये यासाठी त्यावर नियंत्रण ठेवावे असे पौल सांगतो. त्याने म्हटले, “तर मी आपले शरीर कुदलतो व त्याला दास करुन ठेवतो; असे न केल्यास... मी स्वतः पसंतीस न उतरलेला असा ठरेन” (१ करिंथ ९:२७).

प्रत्येक गोष्ट माझ्या प्रमुख ध्येयाकडे वळवण्यास मला शिकले पाहिजे; ध्येय साधण्यामध्ये व्यत्यय येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. माझ्या खाजगी जीवनात मी कसा आहे त्यावरुनच देवाला मी किती मोलाचा आहे ते उघडपणे मापले जाते. त्याला संतोष देणे आणि त्याला मान्य होणे हेच माझ्या जीवनात प्रमुख ध्येय आहे काय? का ते मोठे आहे असे वाटले तरी त्यात किंचित उणेपण आहे?

मार्च १८

## मी स्वतःला या पातळीपर्यंत आणीन काय?

**“देवाचे भय बाळगून पावित्र्याला पूर्णता आणू” (२ करिंथ ७:१).**

“आपणाला ही अभिवचने मिळाली आहेत” मी देवाची अभिवचने माझ्या जीवनासाठी हक्काने घेतो आणि ती पूर्ण होतली असे पाहतो, ते योग्यच आहे. पण यातून मानवी दृष्टीकोनच दिसतो. देवाच्या वचनांच्या द्वारे त्याचा माझ्यावर असलेला मालकी हक्क माझ्या ध्यानात यावा ही देवाची दृष्टी आहे. उदाहरणार्थ, “माझे शरीर पवित्र आत्म्याचे मंदिर आहे” याची जाणीव मला आहे काय, किंवा देवाचा प्रकाश सहन न होणारी अशी काही सवय मला आहे काय (१ करिंथ ६:१९)? त्याचे आज्ञापालन करुन मी माझ्या स्वाभाविक जीवनाचे आध्यात्मिक रुपांतर करणे सुरु केले पाहिजे. देवाने पवित्रीकरणाच्या द्वारे माझ्यामध्ये आपल्या पुत्राला साकार केले आहे. त्याने मला पापापासून एकीकडे ठेवून स्वतःच्या दृष्टीने पवित्र केले आहे (पहा गलती ४:१९). देव मला जीवनाचा बारीक सारीक तपशीलही शिकवतो. तो पापाची खातरजमा करतो तेव्हा “मानवांची मसलत न घेता” त्यापासून स्वतःला ताबडतोब शुद्ध करा (गलती १:१६). तुमच्या रोजच्या वागण्यात स्वतःला शुद्ध ठेवा.

माझा देह आणि आत्मा या दोहोंनाही सर्व मलिनतेपासून शुद्ध करुन त्यांना देवाच्या स्वभावाला शोभणारे केले पाहिजे. माझ्या आत्म्याची वृत्ती माझ्यामध्ये असलेल्या देवपुत्राच्या जीवनाशी मिळती जुळती आहे ना? का मनाने मी उद्धट व बंडखोर आहे? मी माझ्यामध्ये ख्रिस्ताची चित्तवृत्ती साकार होऊ देतो का? (पहा फिलिप्पै २:५). ख्रिस्ताने आपल्या स्वतःवर आपला हक्क कधी सांगितली नाही. परंतु आपला आत्मा आपल्या पित्याच्या अधीन असावा यासाठी तो सतत जागरुक होता. त्याच्या आत्म्याशी माझा आत्मा जुळलेला ठेवण्याची जबाबदारी माझी आहे. हे मी करतो तेव्हा येशू हळूहळू मला तो जगतो त्या, त्याच्या पित्याच्या इच्छेला पूर्णपणे सादर समर्पित असण्याच्या पातळीवर आणतो. येथे मी दुसऱ्या कोणत्याच गोष्टीकडे लक्ष देत नाही. देवाच्या भयात मी या प्रकारचे पावित्र्य पूर्ण करीत आहे का? देव माझ्यामध्ये कार्य करत आहे का? लोकांना माझ्या जीवनातून देव अधिक प्रमाणात दिसत आहे का?

देवाबरोबरची तुमची बांधिलकी गंभीरपणे घ्या. इतर सर्व सोडून द्या. देवाला तुमच्या जीवनात अक्षरशः पहिले स्थान द्या.

**मार्च १९**

## अब्राहामाचे विश्वासाने परिपूर्ण भरलेले जीवन

**“आपण कोठे जातो हे ठाऊक नसताही तो निघून गेला” (इब्री ११:८).**

जुन्या करारामध्ये व्यक्तीचे देवाशी असलेले नाते त्याच्या जीवनातील विभक्तपणाच्या प्रमाणाने मोजले जाई. अब्राहामाच्या जीवनात पाहिले तर तो त्याचा देश व त्याचा कुंटुंबकबिला यांच्यापासून विभक्त झाला होता. आज विभक्तपणाचा विचार करताना कुटुंबातील देवाशी नाते नसणाऱ्या व्यक्तींपासून विभक्त होणे नव्हे तर त्यांच्या विचारापासून मानसिक व नैतिक दृष्टीने विभक्त होणे असे आहे. लूक १४:२६ मध्ये येशू ख्रिस्ताच्या म्हणण्याचा हाच अर्थ आहे.

आपणाला कोठे नेले जात आहे हे कधीच न समजणे हाच विश्वासाचे जीवन जगण्याचा अर्थ आहे. परंतु यात नेणारा आहे त्याची ओळख व त्याच्यावर प्रीती असते. हे खरोखर *विश्वासाचे* जीवन आहे, ते समजण्याचे व बुद्धीचे जीवन नाही. जा म्हणून सांगणाऱ्याला ओळखण्याचे जीवन आहे. व्यक्तीची ओळख हाच विश्वासाचा आधार आहे आणि विश्वास असेल तर देव आम्हांला जगात यशस्वी करील या श्रद्धेच्या फासात गुंतणे हा मोठाच पेच आहे.

शीलस्वभाव दृढ करणे हा विश्वासाच्या जीवनातील अंतिम टप्पा आहे. ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आम्हांला बदलाच्या अनेक टप्प्यातून जावे लागते. आम्ही प्रार्थना करतो तेव्हा भोवताली देवाचे सान्निध्य अनुभवतो, तेव्हा आमच्यात क्षणिक बदल होतो. आम्ही पुन्हा नित्याच्या जीवनाकडे वळतो आणि तेज मावळते. विश्वासाचे जीवन ही काही पर्वतावर आलेल्या गौरवी अनुभवाची पुनरावृत्ती नव्हे. हे गरुडाच्या पंखांवरुन उंचावर विहरणे नव्हे. हे सतत रोजरोज सातत्याने न थकता पुढेपुढे जाणे आहे (पहा यशया ४०:३१). येथे पवित्रीकरण हा मुद्दा नाहीच तर त्याहून खाली सपाटीवर येणारे काही आहे. हा कसोटीस उतरलेला विश्वास आहे. अब्राहाम हे काही पवित्रीकरणाचे उदाहरण नाही, तर विश्वासाच्या जीवनाचे प्रतीक आहे. हा विश्वास खरा, कसास लागलेला आहे. खरा देव हाच त्याचा आधार आहे *“अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला...”* (रोम ४:३).

मार्च २०

## देवाबरोबर मैत्री

**“मी जे करणार आहे ते अब्राहामापासून लपवून ठेवू काय?” (उत्पत्ती १८:१७).**

**त्याच्या मैत्रीचा आनंद.** उत्पत्ती १८ मध्ये देवाबरोबरच्या मैत्रीचा आनंद दिसतो. कधीकधी प्रार्थनेतून जाणवणाऱ्या त्याच्या समक्षतेपेक्षा हा आनंद वेगळाच आहे. या मैत्रीमध्ये आपण देवाच्या एवढे निकट असतो की तुझी इच्छा मला कळव असे शब्दांनी म्हणण्याची गरजच नसते. विश्वासाच्या जीवनात तुम्ही अखेरच्या टप्प्यावर आला आहात. हीच जवळिकीची पातळी येथे दिसते. देवाबरोबरचे आपले नाते सरळ व यथार्थ असते तेव्हा तुमचे जीवन मुक्त, स्वतंत्र आणि आनंदमय असते. देवाची इच्छा तुम्हीच असता. तुम्ही घेतलेले सामान्य निर्णय खरे तर तुमच्यासाठीची त्याची इच्छा असते. त्यात काही चुकत असेल तर तुमचा आत्माच आवर घालतो. देवाबरोबरच्या परिपूर्ण आणि आनंदमय मैत्रीच्या आधाराने तुम्हांला निर्णय करता येतात. त्यात काही अयोग्य असेल तर तो प्रेमाने तुम्हांला आळा घालील; अर्थात मग तुम्ही लगेच थांबले पाहिजे.

**त्याच्या मैत्रीतील अडथळे.** अब्राहामाने प्रार्थना करणे का थांबवले? तो थांबला कारण तोपर्यंत देवाबरोबरच्या त्याच्या नात्याने सलगीची पातळी गाठली नव्हती. सलगी असती तर त्याची मागणी पुरी होईपर्यंत तो धीटपणे विनवीत राहिला असता. प्रार्थना करताना आपण आपली खरी इच्छा बोलण्यापूर्वीच थांबतो आणि म्हणतो, “कोणी सांगावे ही देवाची इच्छा नसेल,” अशा प्रसंगी आम्हांला अजून वरची पातळी गाठायची असते. आम्ही येशूप्रमाणे देवाला अद्याप जवळून ओळखत नाही व त्याच्या इच्छेप्रमाणे झालेले नाही. “आपण एक आहो तसे त्यांनीही एक व्हावे” (योहान १७:२२). हीच येशूची इच्छा आहे. तुम्ही अगदी शेवटी कशासाठी प्रार्थना केलीत ते आठवा. तुमची निष्ठा तुमच्या इच्छेवर होती का देवावर? आत्म्याचे काही कृपादान स्वतःसाठी मिळावे का देवच मिळावा हा तुमचा निश्चिय होता? “... कारण तुमच्या गरजा काय आहेत हे तुमचा पिता, तुम्ही त्याच्यापाशी मागण्यापूर्वीच जाणून आहे” (मत्तय ६:८). देवाची अधिक चांगली ओळख व्हावी हेच विनवणी प्रयोजन असावे. “... परमेश्वराच्या ठायी तुला आनंद होईल; तो तुझे मनोरथ पूर्ण करील” (मत्तय ६:८). देवाचे परिपूर्ण ज्ञान व्हावे यासाठी आपण प्रार्थना करीत राहावे.

मार्च २१

## समरुप झाला आहात का केवळ कुतूहल आहे?

**“मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे”** (गलती २:२०).

आमच्या पापस्वभावाचा मृत्यू झाल्याची घोषणा करणे ही आम्हा प्रत्येकाची अटळ आध्यात्मिक गरज आहे. मला माझी भावनिक मते आणि बौद्धीक मते एकत्र करुन पापस्वभावाचा नैतिक निवडा सुनावला पाहिजे. माझ्या स्वतःवर माझा हक्क आहे हे म्हणणे सोडले पाहिजे. पौलाने म्हटले, “मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे...” “ख्रिस्ताचे अनुकरण करावे हा माझा निश्चय आहे” अगर “त्याला अनुसरण्याचा मी जातीने प्रयत्न करीन” असे तो म्हणाला नाही; परंतु “मी त्याच्या मरणात त्याच्याशी **समरुप** झालो आहे” असे म्हणाला. मी हा नैतिक निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आणला की ख्रिस्ताने माझ्यासाठी वधस्तंभावर साधले ते माझ्यामध्ये साधले आहे. याप्रमाणे मी स्वतःला संपूर्णपणे देवाला समर्पण केले की मग मला येशू ख्रिस्ताची पवित्रता देण्याची संधी पवित्र आत्म्याला संधी मिळते.

“... ह्यापुढे मी जगतो असे नाही...” माझे व्यक्तित्व राहते पण जगण्याची माझी मुख्य प्रेरणा आणि माझ्यावर सत्ता चालवणारा स्वभाव हे आमूलाग्र बदलले आहेत. मला तेच मानवी शरीर आहे पण माझ्यावर माझाच हक्क ही सैतानी वृत्ती नष्ट केली आहे.

“... आणि आता देहामध्ये जे माझे जीवन आहे,” जे जगावे अशी इच्छा आहे ते जीवन नव्हे किंवा जे जगावे अशी विनवणी करतो तेही नाही तर माझ्या मर्त्य देहात जगतो ते, दुसऱ्यांना दिसणारे जीवन, “देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे...” हा विश्वास येशू ख्रिस्तावरील पौलाचा असलेला विश्वास नव्हे. हा विश्वास त्याला देवाच्या पुत्राने दिलेला आहे (पहा इफिस २:८). हा आता विश्वासावरचा विश्वास नाही तर सर्व कल्पनांच्या मर्यादांच्या पलीकडचा विश्वास आहे. हा फक्त देवाच्या पुत्राकडून मिळणारा विश्वास आहे.

## उत्तेजित अंतःकरण

**“आपल्या अंतःकरणाला आतल्या आत उकळी येत नव्हती काय?” (लूक २४:३२).**

उत्तेजित अंतःकरणाचे इंगित आपण जाणून घेणे आवश्यक आहे. अचानक येशू आपल्याला दर्शन देतो. अग्नी प्रज्ज्वलित होतो. आम्हांला अद्‌भुत दृष्टांत होतात. मात्र उत्तेजित अंतःकरणाचे रहस्य राखून ठेवण्यास आपण शिकावे. हे अंतःकरण कोणत्याही परिस्थितीला तोंड देते. नित्याची कर्तव्ये करावी लागणारा भकास दिवस व सामान्य लोक असे अंतःकरण गुदमरुन टाकतात. येशूमध्ये राहण्याचे रहस्य आपण शिकलो असू तर अंतःकरण सहीसलामत राहील.

ख्रिस्ती लोकांच्या अनुभवास येणारे क्लेश पापामुळे येत नाहीत. आमच्या स्वभावाचे नियम आम्हांला ठाऊक नसतात हेच क्लेशांचे कारण आहे. उदाहरणार्थ एखादी विशिष्ट भावना आमच्या जीवनात असावी का नसावी याचा निर्णय त्या भावनेचे फलित लक्षात घेऊनच करावे? मिळणारे फळ देवाला न रुचणारे असेल तर त्या भावनेला मुळातच खुडले पाहिजे. परंतु ती भावना देवाच्या आत्म्यापासून आली असेल तर आणि तुमच्या जीवनातील तिचा प्रवेश खुंटवला तर देवाचा उद्देश एकीकडे राहून त्या भावनेची प्रतिक्रिया खालच्या पातळीवर होईल. अवास्तवपणे भावनांच्या आहारी जाणारे लोक यातूनच आकारास येतात. भावना जेवढी तीव्र तेवढी भ्रष्टतेची पातळी खोल! पण त्या भावनेचा निपटारा योग्य पातळीवर केला असेल तर गोष्ट वेगळी. देवाच्या आत्म्याने तुम्हांला प्रेरणा दिली असेल तर तुमचे जास्तीत जास्त निर्णय अपरिवर्तनीय असावेत मग परिणाम काहीही होवोत.

आपणाला “रुपांतराच्या डोंगरावर” आमच्या पर्वतशिखरावरच्या अनुभवाची ऊब घेत फार काळ राहता येणार नाही (पहा मार्क ९:१-९). मात्र तेथे प्रकाशातून मिळालेल्या आदेशांचे पालन करुन त्यानुसार कार्य केले पाहिजे. देव आम्हांला दृष्टांत देतो तेव्हा आपण कितीही किंमत पडली तरी त्याच पातळीवर त्याच्यासह काम करणे गरजेचे आहे.

## माझी मनोवृत्ती दैहिक आहे काय?

**“ज्याअर्थी तुमच्यामध्ये हेवा व कलह आहे, त्याअर्थी तुम्ही दैहिक आहा की नाही?...” (१ करिंथ ३:३).**

स्वाभाविक, विश्वास न ठेवणाऱ्याला दैहिकता काय तेच माहीत नसते. आत्म्याला विरोध करणाऱ्या देहवासना आणि देहाविरुद्ध झगडणारा आत्माच नवा जन्म झाल्यावर दैहिकतेची जाणीव करुन देतो. पौलाने सांगितले आहे, “आत्म्याच्या प्रेरणेने चाला, म्हणजे, तुम्ही देहवासना पूर्ण करणारच नाही” (गलती ५:१६). थोडक्यात दैहिकता मुळातच नाहीशी होईल.

देवाच्या आत्म्याच्या शोधक नजरेला तुमच्यामध्ये काही वावगे आढळले, तर तो तुम्हांला सुधारण्यास सांगत नाही. तो तुम्हांला सत्याचा प्रकाश स्वीकारण्यास सांगेल आणि तो सर्व बरोबर करील. प्रकाशाचे मूल ताबडतोब पाप पदरी घेईल आणि देवासमोर मोकळ्या मनाने उभे राहिल. परंतु काळोखाचे मूल म्हणेल, “त्यात काय मोठस! मी सांगतो समजावून!” प्रकाश पडतो आणि आत्मा पापाची खातरी पटवतो तेव्हा प्रकाशाचे मूल व्हा. तुमची चूक कबूल करा. देव त्याचा निकाल करील. परंतु तुम्ही स्वतःचे समर्थन करण्याचा यत्न केलात तर आपण काळोखाचे मूल असल्याचे प्रमाण द्याल!

दैहिकता गेली याचे प्रमाण काय? स्वतःला कधी फसवू नका. दैहिकता संपली, गेली तर ते तुम्हांला नक्की कळेल यात अजिबात शंका नाही. देवाच्या कृपेचा अद्‌भुत चमत्कार स्वतःला पटवून देण्यासाठी देव तुम्हांला अनेक संधी देईल. हे प्रमाण पटवणे अगदी सरळ व सोपे आहे. तुम्ही स्वतःच म्हणाल, “हे या पूर्वी घडले असते तर माझा राग भडकला असता!” देवाने तुमच्या अंतरंगात केलेल्या कार्याविषयी तुम्हांला वाटणारे आश्चर्य सतत वाढतेच असेल.

## त्याच्या उद्दिष्टासाठी ऱ्हास होऊ देणे

**“त्याची वृद्धी व्हावी व माझा ऱ्हास व्हावा हे अवश्य आहे” (योहान ३:३०).**

तुम्ही एखाद्याच्या जीवनात आवश्यक ठरलात तर देवाच्या इच्छेच्या बाहेर गेलात असे समजा. तुम्ही सेवक आहा. “वराचा मित्र” होणे (योहान ३:२९) हीच तुमची जबाबदारी आहे. एखादी व्यक्ती ख्रिस्ताचा स्वीकार करण्याच्या बेतात असेल तर तुमच्या प्रभावाचे योग्य काम झाले हे लक्षात येते. त्या व्यक्तीला काही अवघड प्रश्न सतावतात तेव्हा ते सोडवण्यास पुढे जाऊ नका. तर त्याची अडचण दसपट वाढावी यासाठी प्रार्थना करा. या पृथ्वीवरील वा अधोलोकातील कोणतीच शक्ती त्याला येशू ख्रिस्ताकडे जाण्यापासून अडवू शकणार नाही यासाठी विनंती करावी. पुन्हा पुन्हा आम्ही कोणाच्या तरी जीवनात हौशी साहाय्यकर्त्याची भूमिका करु पाहतो, नको तिथे नाक खुपसतो आणि देवाच्या इच्छेला प्रतिबंध करतो, म्हणतो, “या व्यक्तीला ही अडचण यायलाच नको.” वराचा मित्र होण्याऐवजी आमची सहानुभूती वाया जाते. एक दिवस ती व्यक्ती आम्हांला म्हणेल, “तुम्ही चोर आहा; येशूला अनुसरण्याची माझी इच्छाच तुम्ही चोरलीत. तुमच्यामुळे मी येशूला अंतरलो!”

कोणाबरोबर चुकीच्या गोष्टीसाठी आनंद करु नका. योग्य कारणासाठी आनंद करण्यास विसरु नका “... वराचा मित्र... त्याला वराच्या वाणीने अत्यानंद होतो; तसा हा माझा आनंद पूर्ण झाला आहे. त्याची वृद्धी व्हावी व माझा ऱ्हास व्हावा हे आवश्यक आहे” (३:२९–३०). त्याचे बोलणे दुःखाचे नव्हे तर आनंदाचे आहे. त्यांना आता वर दिसणार होता. तोच आपला आनंद आहे असे योहान म्हणाला. हे मार्गातून बाजूस होणे, सेवकाने दूर होणे, त्याची आठवणही राहू नये असे आहे.

दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनातून वराची वाणी कानी पडेपर्यंत नीट कान देऊन ऐका. त्यामुळे कोणत्या अडचणी येतील, आजार येईल वगैरे कशाचाच विचार करु नका. त्याची वाणी कानी पडली म्हणून कृतकृत्य होऊन आनंद करा. एखाद्याचे तारण करण्यापूर्वी त्या व्यक्तीचे जीवन येशू ख्रिस्ताने उद्ध्वस्त केल्याचे तुम्हांला पहावे लागले (पहा मत्तय १०:३४).

**मार्च २५**

## नातेसंबंध योग्य प्रकारे सांभाळणे

**“... तो वराचा मित्र आहे...” (योहान ३:२९).**

चांगुलपणा आणि शुद्धता हे स्वतःकडे लक्ष वेधून घेणार गुण नसावेत. ते येशू ख्रिस्ताकडे आकर्षित करणारे लोहचुंबक व्हावेत. माझ्या पवित्रतेने दुसरे त्याच्याकडे ओढले जात नसतील तर ती योग्य प्रकारची पवित्रता नसून लोकांच्यामध्ये अवास्तव भावना व दुष्ट वासना जागवणारा प्रभावच आहे; त्यामुळे लोक चुकीचा मार्ग धरतात. एखाद्या व्यक्तीची वर्तणूक कितीही चांगली असली आणि तिने खुद्द येशू ख्रिस्ताला सादर न करता, ख्रिस्ताने त्याच्या स्वतःसाठी केले तेच सांगितले तर तो प्रभूकडे जाऊ पाहणाऱ्या लोकांच्या वाटेतील अडथळाच आहे. लोक म्हणतील, “अहाहा! हा माणूस किती चांगला आहे!” परंतु हा काही “वराचा खरा मित्र” नाहीच. सदोदित माझीच, त्याची नव्हे, वृद्धी होते.

वराबरोबरची ही मैत्री आणि विश्वासूपण सांभाळण्यासाठी आपण त्याच्याबरोबरचे आपले नैतिक व जिव्हाळ्याचे नाते सर्वतोपरी राखले पाहिजे. आज्ञापालनापेक्षा हे नाते प्राणपणाने जपण्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. कधीकधी कोणतीच आज्ञा पाळायची नसते. येशू ख्रिस्ताबरोबरचे आमचे जवळचे, जिव्हाळ्याचे नाते सांभाळणे हेच एक काम असते. त्यात काहीही आड येऊ नये याची काळजी घ्यावी. क्वचित प्रसंगी आज्ञापालानाचा प्रसंग येतो. अशा वेळी देवाची इच्छा काय आहे ते पाहणे आवश्यक आहे. आमच्या जीवनात बहुतेक वेळ जाणीवपूर्वक आज्ञाधारक राहण्यात नव्हे तर “वराचा मित्र” असणे हे नाते सांभाळण्यासाठी खर्च होतो. ख्रिस्ती सेवाकार्य एखाद्या व्यक्तीचे लक्ष येशू ख्रिस्तापासून बाजूस वळवण्यास कारण होते. “वराचे” मित्र होण्याऐवजी आपण दुसऱ्या कोणाच्या तरी जीवनात हौसेने दखल देणारे होतो आणि त्याचीच शस्त्रे वापरुन त्याच्या विरोधात कार्य करतो.

## मार्च २६

### वैयक्तिक शुद्धतेच्या द्वारे आध्यात्मिक दृष्टांत

**"'जे अंतःकरणाचे शुद्ध' ते धन्य, कारण ते देवाला पाहतील" (मत्तय ५:८).**

शुद्धता म्हणजे निरागसता नव्हे. शुद्धता त्याहून अधिक आहे. देवाबरोबर आध्यात्मिक पातळीवर सुसंगती राखल्याने शुद्धता येते. शुद्धतेमध्ये आमची वाढ झाली पाहिजे. देवाबरोबरचे आमचे जीवन रास्त, आमची आंतरिक शुद्धता निष्कलंक असेल. परंतु आमचे बाह्य जीवन कधीकधी डागाळेल. अशा प्रसंगातून देव सहेतुक आम्हांला संरक्षण देत नाही; कारण वैयक्तिक शुद्धतेच्या द्वारेच्या आमचा आत्मिक दृष्टांत जतन करण्याची गरज आमच्या लक्षात येते. देवाबरोबरच्या आमच्या आध्यात्मिक जीवनाची बाह्य पातळी किंचित जरी बिघडली असेल तर इतर सर्व गोष्टी एकीकडे ठेवून प्रथम ती पातळी सुधारली पाहिजे. आध्यात्मिक दृष्टांत आमच्या शीलस्वभावावर अवलंबून असतो. लक्षात ठेवा, *अंतःकरणाचे* शुद्ध तेच "देवाला पाहितील."

आपल्या सार्वभौम कृपेच्या द्वारे देव आम्हांला शुद्ध करतो. तरीपण काही गोष्टींकडे आम्ही बारीक लक्ष ठेवले पाहिजे. दुसरे लोक आणि त्यांचे विचार यांच्या संपर्कात आल्याने आम्ही मलीन होतो. आमचे "अतरंग" देवाबरोबर रास्त, सरळ ठेवले पाहिजे. आमचे "बहिरंग" देखील देव आपल्या कृपेच्या द्वारे आम्हांला देतो त्या शुद्धतेशी पूर्णपणे सुसंगत ठेवले पाहिजे. आमचे "बहिरंग" मलीन झाले तर आमचे आध्यात्मिक दृष्टांत आणि ज्ञान लगेच धूसर होते. प्रभू येशू ख्रिस्ताबरोबरची आमची जवळीक शाबूत ठेवायची असेल तर आपण काही गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. त्यांचा विचारही मनात आणता नये. दुसऱ्यांना आवडणाऱ्या, मान्य असणाऱ्या काही गोष्टी आपणाला नावडत्या व अमान्य व्हाव्यात.

दुसऱ्या लोकांच्या संबंधात वैयक्तिक शुद्धता मलिन होऊ द्यायची नसेल तर देव त्यांना पाहतो तसे तुम्हीही पहा. स्वतःला सांगा "तो मनुष्य अगर ती स्त्री *ख्रिस्त येशूमध्ये परिपूर्ण आहे*!" "तो मित्र किंवा तो आप्त *ख्रिस्त येशूमध्ये परिपूर्ण आहे*!"

## मार्च २७

# वैयक्तिक स्वभावाच्या द्वारे आध्यात्मिक दृष्टांत

**"इकडे 'वर ये,' म्हणजे 'ज्या गोष्टी' ह्यानंतर 'घडून आल्या पाहिजेत' त्या मी तुला दाखवीन" (प्रकटी ४:१).**

मनाची उच्चस्थिती राखून आध्यात्मिक दृष्टांताची उच्च पातळी गाठण्यासाठी व्यक्तिगत चारित्र्य अतिशय शुद्ध ठेवणे गरजेचे आहे. तुमच्या जीवनाच्या बाह्य पातळीवर तुम्ही सर्वात उत्तम प्रकारे वर्तन ठेवले तर देव तुम्हांला नेहमी सांगेल "मित्रा, इकडे आणखी वर ये!" मोहामध्ये असेच वर आणखी वर येण्यास सांगितले आहे आणि वर गेल्यावर दिसते आणखी दुसरे मोह आणि चारित्र्य गुण दिसतात. देव आणि सैतान दोघेही उच्च पातळीचा उपयोग करतात. सैतान हा उपयोग भुरळ पाडण्यासाठी करतो, त्याचा परिणाम विपरीतच होतो. सैतानाने उच्च पातळीवर नेले की पवित्रता साध्य करणे या देहाला कधीच शक्य नाही हे मनावर बिंबवतो. मग तुम्ही तेथेच आपला तोल कसाबसा सांभाळता, इकडचे तिकडे होणे जिवावर येते. पण देव तुम्हांला उंचावर स्वर्गीय स्थानात आपल्या कृपेने नेतो तेव्हा तेथे प्रशस्त जागा असते, तुम्हांला सहज इकडे तिकडे फिरता येते.

तुमच्या आध्यात्मिक जीवनातील हा आठवडा आणि गेल्या वर्षातील तोच आठवडा यांची तुलना करा. देवाने तुम्हांला किती वरच्या पातळीवर आणले आहे ते पहा. उच्च विचारदृष्टीने पाहावे यासाठी आम्हांला वर आणले आहे. देवाने दाखवलेले प्रत्येक सत्य लगेच आचरणात आणा, नेहमी प्रकाशात राहा.

कृपेमध्ये तुमची होणारी वाढ तुम्ही मागे गेला नाही यावरुन नव्हे तर तुम्ही आध्यात्मिक दृष्टीने कोठे आहा त्यावरुन मोजली जाते. "इकडे वर ये" हे देवाचे आवाहन तुम्ही अगदी स्पष्टपणे बाहेरुन नव्हे तुमच्या शीलस्वभावाच्या अगदी अंतरंगात ऐकले आहे ना?

"मी जे करणार ते अब्राहामापासून लपवून ठेवू काय?" (उत्पत्ती १८:१७). देव करतो ते आमच्यापासून लपवून ठेवतो. पण आमचा स्वभाव विकसित झाला की मग तो ते आम्हांला उघड करतो.

मार्च २८

## “काही गैरसमज तर झाला नाही ना?”

**“आपण पुन्हा यहूदीयांत जाऊ या. शिष्य त्याला म्हणाले, ... तुम्ही पुन्हा तेथे जाता काय?” (योहान ११:७-८).**

येशू ख्रिस्त सांगतो ते मला समजत नाही, म्हणून बोलण्यात त्याचे काही चुकते आहे असे मला म्हणता येणार नाही. हा चुकीचा विचार आहे आणि मी देवाचे आज्ञापालन केल्याने येशूचा अपमान होईल असे म्हणणे साफ चूक आहे. त्याची अवज्ञा केली तरच त्याचा अपमान होईल. तो मला करायला सांगत आहे ते न करता त्याच्या मानाविषयीचा माझा विचार पुढे आणणे योग्य नाही. त्याच्या कृतीने त्यालाच खाली पाहावे लागू नये असे वाटले तरी मी ते करता नये. सूचना देवाकडून आल्या तर त्या मला समजतीलच. पण मी साधकबाधक विचार करतो तेव्हा मनात शंका येतात आणि देवाचा नाही असा मुद्दा पुढे आणतो. त्यातून होते एवढेच की त्याने दिलेल्या सूचना बरोबर नव्हत्या! आमच्यापैकी कित्येकजण येशू ख्रिस्ताविषयीच्या विचारांशी एकनिष्ठ असतात पण आमच्यापैकी कितीजण स्वतः येशू ख्रिस्ताशी विश्वासू आहेत? येशूवर विश्वास ठेवणे म्हणजे मला काही दिसो न दिसो पुढे गेलेच पाहिजे (पहा मत्तय १४:२९). माझ्या विचारांशी प्रामाणिक राहायचे तर प्रथम मनाची वाट प्रशस्त केली पाहिजे. विश्वास म्हणजे बौद्धिक उमज पडणे नव्हे तर पुढे काय आहे ते दिसले नाही तरी येशू ख्रिस्त ह्या व्यक्तीला जाणूनबुजून समर्पित होणे आहे.

विश्वासाने पाऊल पुढे टाकावे का त्याने सांगितले आहे ते कसे करावे हे समजेपर्यंत थांबायचे असे विचार तुमच्या मनात असतील तर आनंदाने सरळ त्याची आज्ञा पाळा. त्याने तुम्हांला काही सांगितले आणि तुम्ही त्यावर चर्चा सुरु केली तर त्याच्या मानापमानाविषयी तुमचा गैरसमज हेच त्याचे कारण आहे. तुम्ही येशूशी विश्वासू आहात का? येशूविषयीच्या तुमच्या विचारकल्पनांशी विश्वासू आहात का? तो सांगतो त्यावर तुमचा विश्वास आहे का? त्याच्याकडून न आलेले विचार त्याच्या सांगण्यात मिसळून तडजोड करता आहात का? “हा तुम्हांला जे काही सांगेल *ते करा.*” (योहान २:५).

## मार्च २९

### आमच्या प्रभूचे अचानक आगमन

**“तुम्हीही सिद्ध असा…” (लूक १२:४०).**

प्रत्येक वळणावर सर्वत्र येशू ख्रिस्ताला भेटण्यास तयार असणे हीच ख्रिस्ती सेवकाची सर्वात तातडीची गरज आहे. आम्हांला कितीही अनुभव असला तरी हे सोपे नाहीच. हा लढा पाप, अडचणी, परिस्थिती यांच्याशी नाही तर येशूसाठी करत असलेल्या सेवेशी आहे. आम्ही या सेवेत एवढे गुंतलो आहोत की पावलोपावली येशूला भेटण्यास आम्ही तयार नाहीच. आमचे विचार, सिद्धांत, कल्पना यांना तोंड देण्याची गरज नाही तर खुद्द त्यालाच भेटणे गरजेचे आहे.

येशू येईल असे आम्हांला वाटते तेथे तो क्वचितच येतो आणि येणार नाही असे वाटते तेथेच तो नेमका येतो आणि नेहमीच विचित्र प्रसंगात येतो. प्रभूच्या अचानक येण्यासाठी तयार राहिल्याने सेवकाला देवाशी विश्वासू राहता येते. सेवेच्या द्वारे तयार असणे शक्य होते असे नाही, प्रत्येक वळणावर येशू ख्रिस्त भेटेल ही अपेक्षा ठेवल्यानेच ते शक्य होते. अपेक्षेची जाणीव ठेवल्याने आमची वृत्ती बालसुलभ कुतूहलाने सर्व पाहणाऱ्यासारखी होते. आम्ही असेच असावे ही त्याची इच्छा आहे. येशू ख्रिस्तासाठी तयार राहायचे तर आपली धर्मनिष्ठा एकीकडे ठेवली पाहिजे. धर्माचरण उच्च कोटीची जीवन शैली आहे असे म्हणणे थांबवले पाहिजे. आम्ही आध्यात्मिक दृष्टीने वास्तविक झाले पाहिजे.

आजच्या जगाच्या विचारांना डावलून तुम्ही “येशूकडे पाहात” असाल (इब्री १२:२), त्याच्या इच्छेनुसार करण्याकडे चित्त लावले असेल तर ते तुम्हांला व्यवहारशून्य आणि दिवास्वप्ने पाहणारा म्हणतील. पण तो मध्यान्हसमयी कामाच्या गडबडीत सर्व असताना आला तर फक्त तुम्हीच एकटे तयार असाल. तुम्ही कोणावरच भरंवसा ठेवू नये आणि पृथ्वीवरील सर्वात पवित्रजन तुमच्या येशू ख्रिस्ताकडे पाहण्याच्या आड येत असेल तर त्याच्याकडेही दुर्लक्ष करा.

## मार्च ३०

# देवाविषयी पवित्रता का कठोरपणा?

**“कोणी मध्यस्थ नाही म्हणून तो विस्मित झाला” (यशया ५९:१६).**

आमच्यापैकी पुष्कळ जण प्रार्थना करणे आणि देवाविषयी कठोर होतात. आम्हांला प्रार्थनेत फक्त भावनिक स्वारस्य आहे, हेच याचे कारण आहे. आम्ही प्रार्थना करतो असे लोकांना अभिमानाने सांगणे बरे वाटते. आम्ही प्रार्थनेविषयीची पुस्तके वाचतो त्यांत सांगितले आहे प्रार्थना करणे हितावह आहे. त्यामुळे आमचे मन शांत होते. आत्मा उल्लासतो. पण प्रार्थनेविषयीच्या अशा विचारांनी देवाला नवल वाटते असे यशया म्हणतो.

उपासना आणि मध्यस्थी दोन्ही जोडीने व्हावीत. एक दुसऱ्याला पूरक आहे. मध्यस्थी म्हणजे ज्याच्यावतीने प्रार्थना करतो त्याच्याविषयी ख्रिस्ताची चित्तवृत्ती धारण करणे आहे (पहा फिलिप्पै २:५). देवाची उपासना करण्याऐवजी आम्ही प्रार्थनेचे कार्य कसे चालते ते लांबलचक भाषणांतून देवाला ऐकवतो. “हे देवा, तू हे कसे करणार तेच मला समजत नाही,” असे म्हटल्याने आम्ही देवाची उपासना करतो का त्याच्या संबंधात शंका घेतो? यावरुन आम्ही कट्टर सिद्धांतवादी होतो. आमच्या विनंत्या त्याच्या राजासनासमोर फेकतो आणि त्याने काय करावे ते त्याला सांगतो. आम्ही देवाची उपासना करत नाही अगर ख्रिस्ताची चित्तवृत्तीही धारण करत नाही. देवाविषयी आम्ही कठोर झालो तर बाकीच्या लोकांविषयीही कठोरच होतो.

आम्ही योग्य प्रकारे देवाची उपासना करतो का? त्यामुळे आम्ही त्याच्या पातळीपर्यंत जातो का? त्याच्याशी जवळीक साधतो का? आम्ही प्रार्थना करतो त्यांच्याविषयी त्याची मानसिकता कशी आहे हे आम्हांला समजावे एवढी त्याची आमची सलगी आहे का? देवाबरोबरचे आमचे नाते पवित्र व सजीव आहे? अगर आम्ही कठोर आणि सिद्धांतवादी आहोत?

कोणीच व्यवस्थित मध्यस्थी करत नाही असे वाटते का? मग तुम्हीच मध्यस्थ व्हा. देवाची उपासना करा आणि त्याच्याबरोबर पवित्रपणे राहा. मध्यस्थी करणे सोपे नाही. ते सर्वशक्तिनिशी करावे लागते. पण सुवार्ताप्रसारात अडचणी येतात तशा मध्यस्थी करण्यात अजिबात येत नाहीत.

## आम्ही काळजी घेतो का ढोंग करतो?

**“ज्याचा परिणाम मरण नाही असे पाप करिताना आपल्या बंधूला कोणी पाहिले तर त्याने त्याच्याकरता देवाजवळ मागावे म्हणजे तो त्याला जीवन देईल” (१ योहान ५:१६).**

आमच्यामध्ये देवाचा आत्मा कार्य करतो तिकडे दुर्लक्ष केले तर आम्ही आध्यात्मिक ढोंगी होऊ. दुसरे लोक कोठे चुकतात ते पाहून आम्ही त्यांच्यावर उपहासाने शेरेबाजी करु. त्यांच्यासाठी मध्यस्थी करण्याचे सोडून आम्ही त्यांची टवाळी करु. दुसऱ्या लोकांच्या संबंधीचे सत्य आम्हांला देवच आपल्या आत्म्याकडून कळवतो. आमचे लक्ष नसेल तर आम्हांला झालेले ज्ञान कोणाकडून आहे ते न समजल्याने आम्ही टीका करतो. त्याने त्याच्या करता मागावे म्हणजे तो त्याला जीवन देईल. अर्थात ज्याचा परिणाम मरण नाही असे पाप करणाऱ्याला ते देईल. स्वतः देवाची उपासना करण्यापूर्वी दुसऱ्यांना देवासमोर सरळ करण्यात सर्व वेळ घालवून तुम्ही दांभिक होणार नाही याची काळजी घ्या.

दुसऱ्यांच्याविषयी चाणाक्षपणे विचार करण्याची जबाबदारी देव आम्हांला देतो. आम्ही योग्य पारख करावी आणि त्याच्यासमोर या आत्म्यांची जबाबदारी स्वीकारुन त्यांच्याविषयी ख्रिस्ताची चित्तवृत्ती धारण करावी (पहा फिलिप्पै २:५). देवाच्या वचनानुसार आम्ही मध्यस्थी करावी. कारण “ज्याचा परिणाम मरण नाही असे पाप करणाऱ्याला” तो जीवन देईल. आम्ही आमच्या देवाला आमच्या मनाच्या संपर्कात आणू शकत नाही परंतु आम्ही स्वतःला देवासमोर सादर करावे, मग तोच आम्ही ज्यांच्यासाठी मध्यस्थी करतो त्यांच्याविषयी त्याचा मनोदय काय आहे ते आम्हांला कळवील.

आपल्या आत्म्याच्या वेदनांचे प्रतिबिंब येशू ख्रिस्ताला दिसेल का? आम्ही त्याच्याशी समरुप झालो, आम्ही प्रार्थना करतो त्या लोकांविषयी त्याचे आमचे विचार जुळत असले तरच हे शक्य आहे. आम्ही जिवेभावे मध्यस्थी करावी की त्यामुळे मध्यस्थ म्हणून येशू ख्रिस्ताला आमच्याविषयी संपूर्ण समाधान होईल.

**एप्रिल १**

## दुसऱ्यांना साहाय्य करणारे का पाठ फिरवणारे?

**“जो आपल्यासाठी मध्यस्थीही करीत आहे तो ख्रिस्त येशू आहे... आत्मा पवित्रजनांसाठी... मध्यस्थी करतो” (रोम ८:३४, २७).**

मध्यस्थ होण्यासाठी “ख्रिस्त त्यांच्यासाठी मध्यस्थी करण्यास सर्वदा जिवंत आहे” आणि पवित्र आत्मा “पवित्र जनांसाठी मध्यस्थी करतो” एवढे सांगणे पुरेसे नाही का? दुसऱ्यांबरोबरचे आमचे नाते कसे आहे? आम्ही देवाच्या आत्म्याकडून शिक्षण मिळालेली देवाची मुले आहोत म्हणून आनंदाने मध्यस्थी करतो ना? आमच्या परिस्थितीकडे बारकाईने पाहू. आमच्या घरात, व्यवसायात दुसऱ्यांवर अगर देशावर काही पेचप्रसंग आले आहेत? परिस्थिती आम्हांला देवाच्या सान्निध्यापासून बाजूस ढकलते आहे? उपासना करण्याएवढी उसंतही मिळत नाही? तसे असेल तर चित्त विचलित करणाऱ्या गोष्टी दूर करुन देवाशी सक्रिय नाते जोडावे आणि मध्यस्थी करावी. देव चमत्कार करणारा आहे.

देवाची इच्छा पुरी करायच्या नादात दोन पावले देवापुढे जाऊ नका. आपण हजारो बारीकसारीक गोष्टीत देवाला बाजूस ठेवतो. लोक आणि त्यांच्या समस्या या ओझ्यांनी हैराण होतो. उपासना करायला वेळ मिळत नाही; मग मध्यस्थी कोठून? उपासनेची वृत्ती नसेल आणि दडपणे वाढत चालली तर देवाविषयी कठीणपण आणि अंतरंगात निराश हाच परिणाम होणार. देव वरचेवर लोकांना आमच्याकडे आणतो. आम्हांला त्यांच्याशी काही कर्तव्य नसते. आम्ही देवाची उपासना करीत नसू तर आम्ही शास्त्रातले एखादे वचन त्यांच्या तोंडावर फेकून सरळ त्यांच्याकडे पाठ फिरवू. फारच झाले तर जाताजाता त्यांना मनाला येईल तो सल्ला देऊ. निर्दय ख्रिस्ती माणसामुळे आमच्या प्रभूला कल्पनातीत दुःख होईल याचे तरी जरा भान ठेवावे.

आमची जीवने योग्य मार्गावर आहेत ना? असतील तरच आमचा प्रभू आणि पवित्र आत्मा करतात त्या मध्यस्थीमध्ये आम्हीही सहभागी होऊ.

## अनन्य गौरव

**“प्रभू येशूने ... तुला पुन्हा दृष्टी यावी... म्हणून मला पाठविले आहे” (प्रे. कृ. ९:१७).**

पौलाला त्याची दृष्टी पुन्हा मिळाली तेव्हाच येशू ख्रिस्ताच्या व्यक्तित्त्वाचे त्याला सूक्ष्म दर्शन झाले. त्या क्षणापासून पुढे त्याचे संपूर्ण जीवन व सुवार्ताप्रसार सर्वस्वी येशू ख्रिस्ताने व्यापलेला होता. “कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरु नये असा मी ठाम निश्चय केला” (१ करिंथ २:२). पौलाने आपल्या मनमंदिरात येशू ख्रिस्ताशिवाय दुसऱ्या कोणालाही प्रवेश दिला नाही.

आमच्या जीवनात स्वतःचे चारित्र्य शुद्ध राखण्यावर आम्ही भर दिला पाहिजे. आमचे शील आम्हांला झालेल्या येशू ख्रिस्ताच्या दृष्टांताच्या बरोबरीचे असावे.

आपल्या जीवनात प्रभू येशू ख्रिस्ताचे महत्त्व काय आहे ते समजून देवाची उद्दिष्टे दुसऱ्यांना समजावून सांगण्याची क्षमता हेच आध्यात्मिक माणसाचे कायमचे गुणलक्षण आहे. त्याचे संपूर्ण जीवन येशू ख्रिस्ताने व्यापिलेले असते. एखाद्या व्यक्तीमध्ये हा गुण आढळला की लगेच तुमच्या लक्षात येईल की हा मनुष्य खुद्द देवाच्या मनासारखा आहे (पहा प्रे. कृ. १३:२२).

येशूवरील तुमची दृष्टी ढळण्यास काहीही कारण होऊ नये म्हणून नेहमी दक्ष राहा. तुम्ही आध्यात्मिक आहा का नाही त्याची पारख येथेच होते. इतर गोष्टींचे आकर्षण वाटणे हे आत्मिक नसण्याचे लक्षण आहे.

“येशूला पाहिल्यापासून
मला दुसरे काहीच दिसत नाही
क्रूसावर टांगलेल्या त्याच्यावर
माझे नेत्र खिळलेले आहेत.”

## एप्रिल ३

### “तू जाणून घेतले असतेस तर”

**“जर तू, निदान आज शांतीच्या गोष्टी जाणून घेतल्या असत्या तर किती बरे झाले असते! परंतु आता त्या तुझ्या दृष्टीपासून गुप्त ठेवण्यात आल्या आहेत” (लूक १९:४२).**

येशूने यरुशलेममध्ये विजयाने प्रवेश केला. नगरात एकच खळबळ उडाली. तेथे एक अन्य दैवत, परुश्यांचा अहंकार होता. दिसण्यात धर्मनिष्ठ व सरळ वाटणारे हे दैवत येशूच्या दृष्टीने, “चुना लावलेल्या कबरांसारखे,... बाहेरुन सुंदर... पण आतून मेलेल्यांच्या हाडांनी व सर्व प्रकारच्या घाणीने भरलेल्या आहेत” (मत्तय २३:२७).

देवाच्या शांतीकडे तुम्ही डोळेझाक का करता? निदान आज तरी लक्ष द्यायचे होते! तुमचे कोणी अन्य दैवत आहे का? भेसूर नव्हे पण काही अशुद्ध गोष्टींचा तुमच्या जीवनावर पगडा आहे का? देवाने अनेकदा माझ्या जीवनातील अन्य दैवत मला दाखवले आहे. त्याचा त्याग करणे जरुरीचे असूनही मी ते केले नाही. त्या पेचातून कसाबसा वाचलो आणि अजूनही मी त्या अन्य दैवताच्या नियंत्रणात आहे. मला शांती देणाऱ्या गोष्टी मला दिसतच नाहीत. पवित्र आत्म्याने आम्हांला योग्य वळण लावले असते अशा ठिकाणी असूनही आम्ही आमचाच हेका चालवतो. देवाच्या दृष्टीने आम्ही केवळ दोषाचे धनी होतो.

“ते जाणून घेतले असतेस तर...” देवाचे शब्द अंतःकरणाला भिडतात, ते येशूच्या आसवांत भिजलेले आहेत. यात आमच्या दोषाचे खापर आमच्याच माथी फुटते. आम्ही मुद्दाम अगर पापामुळे काही पाहत नाही किंवा पाहू शकत नाही. त्या संबंधात देव आम्हांला जबाबदार धरतो. “आता त्या तुझ्या नजरेपासून गुप्त ठेवल्या आहेत.” तुम्ही कधीच त्याला सर्वस्वी समर्पण केले नाही. एकदा बंद केलेली दारे देव पुन्हा उघडत नाही ही किती दुःखाची गोष्ट आहे! देव दुसरी दारे उघडतो. पण पूर्वी तुमच्यामुळे बंद झालेली दारे उघडत नाही. देव तुमचा भूतकाळ दाखवतो तेव्हा नीट विचार करा. देवाचा सेवक तुमच्या चुका दाखवतो तेव्हा आपण कोठून कसे पडलो त्याचे स्मरण करुन देवाकडे वळा. तो नक्कीच कृपा करील कारण त्याच्या दयेला अंत नाही.

**एप्रिल ४**

## चिरंतन विश्वासाची वाट

**“पाहा, अशी वेळ येत आहे,... की तुमची दाणादाण होऊन...” (योहान १६:३२).**

येथे येशू शिष्यांना बोल लावीत नाही. त्यांचा विश्वास खरा होता. पण तो अव्यवस्थित आणि स्वैर होता. प्रत्येक शिष्याचा हेतू वेगळा होता. येशू ख्रिस्त त्यांचे सर्वस्व नव्हता. पवित्र आत्म्याच्या कार्याने देवाबरोबर आमचे खरे नाते जुळते तेव्हा जीवनात क्षणोक्षणी आम्ही विश्वासाचा आधार घेतला पाहिजे. सेवेमध्ये नव्हे तर आमच्या जीवनाच्या रितेपणात आमची पांगापांग होईल. तेथे आम्हांला नाश आणि ओसाडी या खेरीज काहीच दृष्टीस पडत नाही. देवाच्या आशीर्वादांना कायमचे अंतरणे कसे असते ते येथेच समजेल. याला आम्ही तयार आहोत? हे आम्ही निवडलेले नसते. देवच आम्हांला तेथे नेतो. हा अनुभव येईपर्यंत भावना आणि आशीर्वाद हेच आमच्या विश्वासाचे आधार असतात. परंतु एकदा येथे पोचल्यावर देव आम्हांला कोठेही ठेवो, आमच्या अंतरंगात कितीही रितेपण असो, आमच्या मुखातून सतत देवाची स्तुतीच चालेल. हेच जीवनाच्या वास्तवात विश्वासाने राहणे आहे.

“... तुम्ही... मला एकटे सोडाल.” आमची दाणादाण झाली आहे. येशू आता आमची काळजी घेत नाही, आम्ही त्याला एकटे सोडले आहे? आमच्यावर गुदरलेल्या प्रसंगात देवाचे कार्य दिसत नाही. बिकट प्रसंग देवाच्या सार्वभौमत्वाच्या द्वारे आमच्या वाट्याला आले आहेत? आमच्या बाबतीत करायचे ते देवाला करु देतो का? देवाच्या सुस्पष्ट आशीर्वादांपासून स्वतःला वेगळे करण्याची आमची तयारी आहे काय? येशू ख्रिस्त खरोखर आमचा प्रभू होत नाही तोवर आम्ही प्रत्येक जण आपआपले उद्दिष्ट साधण्यास धडपतो. आमचा विश्वास खरा असला तरी तो अद्याप चिरस्थायी झालेला नाही. देवाला कधीच गडबड नसते. आम्ही वर पाहण्यास तयार असू तर आम्हांला केवळ खुद्द देवामध्ये नव्हे तर त्याच्या आशीर्वादांतच रस आहे. हे तोच दाखवील. परमेश्वराच्या आशीर्वादांची जाणीव मूलभूत आहे.

“... तरी धीर धरा, मी जगाला जिंकले आहे” (१६:३३). आम्हांला सुरक्षित आध्यात्मिक धैर्याचीच गरज आहे.

**एप्रिल ५**

## त्याच्या यातना आमची संधी

**“नंतर येशू शिष्यांबरोबर गेथशेमाने नावाच्या ठिकाणी आला आणि त्यांस म्हणाला, … ‘तुम्ही येथे थांबा व माझ्याबरोबर जागे राहा’”** (मत्तय २६:३६, ३८).

गेथशेमेनी बागेमध्ये ख्रिस्ताचे दुःख काय, कसे होते ते आम्हांला पूर्णपणे कधी उमगणार नाही; पण म्हणून त्याविषयी गैरसमज नको. देव आणि मनुष्य एकाच व्यक्तीमधून पापाच्यासमोर आल्यावर त्याला झालेले दुःख व यातना यांचा हा उल्लेख आहे. गेथशेमेनीविषयी स्वतःच्या अनुभवातून शिकता येते. गेथशेमेनी आणि काल्वरी हे आमच्यासाठी जीवनात जाण्याचे महाद्वार आहे.

गेथशेमेनीमध्ये येशूने वधस्तंभावरील यातना सोसल्या नाहीत. मरणाच्या उद्देशाने आपण आलो आहो हे त्याने स्पष्टपणे सांगितलेच होते. मनुष्याचा पुत्र म्हणून या प्रसंगातून निभावून जाता येईल का? हीच त्याला चिंता होती. देवाचा पुत्र म्हणून तो यातून सहज पार गेला असता. त्यात सैतान त्याला अडवू शकला नसता. आमच्या प्रभूने मनुष्याचा पुत्र म्हणून यातून बाहेर यावे हाच सैतानाचा डाव होता. येशूने तसे केले असते तर तो आमचा तारणारा होणे शक्य नव्हते (पहा इब्री ९:११–१५). अरण्यात झालेली त्याची मोहपरीक्षा आणि गेथेशेमेनीतील त्याच्या वेदना एकत्र पाहाव्या. त्यावेळी “… मग सैतान… संधी मिळेपर्यंत त्याला सोडून गेला” (लूक ४:१३). गेथशेमेनी बागेत सैतान पुन्हा आला आणि पुन्हा तोंडघशी पडला. *मनुष्याचा पुत्र* म्हणून आमच्या प्रभूवर केलेला हा शेवटचा हल्ला होता.

जगाचा तारणारा म्हणून आपले नेमलेले कार्य पूर्ण करणाऱ्या देवाच्या पुत्राच्या यातना हेच गेथशेमेनीमधील दारुण दुःख होते. आम्हांला देवाची मुले करण्यासाठी त्याला किती किंमत मोजावी लागली ते स्पष्ट होण्यासाठी आता पडदा बाजूस केला आहे. त्याच्या यातना हाच आमच्या तारणाच्या सुलभतेचा आधार आहे. ख्रिस्ताचा वधस्तंभ *मनुष्याच्या पुत्राचा* विजय आहे. हे आमच्या प्रभूला मिळालेल्या विजयाचेच नव्हे तर त्याने मानवजातीसाठी साधलेल्या तारणाच्या विजयाचेही चिन्ह आहे. आता प्रत्येक मनुष्याला देवाच्या सान्निध्यात जाण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

## देव आणि पाप यांची टक्कर

**"त्याने स्वतः तुमची आमची पापे स्वदेही वाहून खांबावर नेली..." (१ पेत्र २:२४).**

ख्रिस्ताचा वधस्तंभ देवाने पापाचा न्याय केल्याचे प्रकट सत्य आहे. रक्तसाक्षी होणे आणि ख्रिस्ताचा वधस्तंभ यांचा संबंध जोडण्याचा विचारही नको. हा सर्वोच्च विजय होता. यामुळे अधोलोकाचे पाये हादरले. येशू ख्रिस्ताने केलेल्या कार्याला सर्वकालात तोड नाही. त्याचे कार्य निश्चित व वादातीत आहे. वधस्तंभावर येशू ख्रिस्ताने केलेल्या कार्यामुळे संपूर्ण मानवजातीला देवाबरोबरचे आपले नाते सरळ व योग्य करण्याची संधी मिळाली. त्याने उद्धार हा मानव जीवनाचा आधार केला, म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला देवाबरोबर सहभागिता ठेवता येईल असे केले.

येशूच्या बाबतीत वधस्तंभ सहज घडला नाही. तो मरण सोसण्यासाठीच आला. वधस्तंभ हेच त्याच्या येण्याचे उद्दिष्ट होते. तो जगाच्या स्थापनेपासून वधलेला कोकरा आहे (प्रकटी १३:८). वधस्तंभाशिवाय तर ख्रिस्ताचे देहधारण निरर्थक आहे.

देव *"देहाने प्रगट झाला..."*(१ तीमथ्य ३:१६). या वचनापासून *"... त्याला त्याने तुमच्या आमच्याकरीता पाप असे केले..."*(२ करिंथ ५:२६) हे वचन विभक्त न करण्याची दक्षता घ्या. उद्धार हेच देहधरणाचे उद्दिष्ट आहे. पाप दूर करण्यासाठी देव देहाने आला. त्यात त्याला स्वतःसाठी काही साधायचे नव्हते. वधस्तंभ ही काल व सर्वकाल यांच्यातील मध्यवर्ती घटना आहे. तसेच त्या दोहोंच्या समस्यांचेही तेच उत्तर आहे.

हा वधस्तंभ मनुष्याचा नाही, तर देवाचा आहे. मानवी अनुभवाला त्याचे आकलन कधीही होणार नाही. वधस्तंभातून देव आपला स्वभाव दाखवतो. वधस्तंभ महाद्वार आहे. त्यातून देवाबरोबर एक होण्यासाठी कोणालाही सहज जाता येते. पण यातून पलीकडे न जाता तेथे मिळालेल्या जीवनात वस्ती करायची आहे.

ख्रिस्ताचा वधस्तंभ हे तारणाचे मर्म आहे, तारण सिद्ध करण्यासाठी देवाला फार मोठी किंमत मोजावी लागते म्हणूनच ते मिळवणे सुलभ आहे. देव आणि पापी व्यक्ती ह्यांची वधस्तंभापाशी टक्कर झाली आणि त्यातून जीवनाकडे जाण्याचा मार्ग उघडला. या टक्करीने झालेल्या यातना व हानी सर्व देवाच्या अंतःकरणाने सामावून घेतली.

**एप्रिल ७**

## आम्हांला का समजत नाही

**“... त्याने त्यांस निक्षून आज्ञा केली की, तुम्ही जे पाहिले आहे ते मनुष्याचा पुत्र मृतांमधून पुन्हा उठेपर्यंत कोणालाही कळवू नका” (मार्क ९:९).**

शिष्यांना आज्ञा दिली होती त्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र तुमच्यामध्ये उठेपर्यंत तुम्हीही काही बोलू नका. पुन्हा उठलेल्या ख्रिस्ताचे जीवन तुमचे अंतरंग व्यापून राहिल्यावर त्याने तेथे पृथ्वीवर शिकवले ते सर्व तुम्हांला चांगले समजेल. तोवर स्वस्थ राहा. तुमच्या अंतरंगात योग्य ती तयारी झाली की येशूचे शब्द तुम्हांला सहज समजतील आणि ते यापूर्वीच का समजेल नाहीत असे वाटेल. परंतु त्यावेळी तुमची आध्यात्मिक स्थिती व्हावी तेवढी विकसित झाली नव्हती.

आमचा प्रभू या गोष्टी आमच्यापासून लपवत नाही परंतु त्या समजण्यासाठी आमच्या आध्यात्मिक जीवनात योग्य स्थिती असणे गरजेचे आहे. येशूने म्हटले, “मला अद्याप तुम्हांला पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या आहेत, परंतु आताच तुमच्याने त्या सोसवणार नाहीत” (योहान १६:१२). त्याच्याकडून एखादे सत्य समजून घेण्यासाठी आम्ही त्याच्या पुनरुत्थित जीवनाशी संयुक्त झाले पाहिजे. येशूचे पुनरुत्थित जीवन आमच्या अंतरंगाात आहे हे आम्हांला माहीत आहे का? त्याचे वचन आम्हांला समजते हेच आमच्या अंतरंगातील त्याच्या जीवनाचे प्रमाण आहे. देवाचा आत्मा आमच्यामध्ये नसेल तर तो आम्हांला काहीच प्रकट करणार नाही. आमची स्वतःची कट्टर मते देवाचे सत्य समजण्याच्या आड येतील. परंतु त्याचे पुनरुत्थित जीवन आमच्यामध्ये मुळावले की आमचे उथळ विचार बाजूस पडतील.

“... कोणाला सांगू नका...” परंतु रुपांतराच्या डोंगरावर काय पाहिले ते अनेक जण दुसऱ्यांना सांगतात. डोंगरशिखरावर त्यांनी दृष्टांत पाहिला आणि त्याची साक्ष ते देतात पण त्यांचे बोलणे आणि वागणे यांचा काहीच संबंध नसतो. त्यांचे आचरण आणि बोलणे यांचा मेळ बसत नाही; कारण त्यांच्यामध्ये मनुष्याचा पुत्र अद्याप उठला नाही. त्याचे पुनरुत्थानाचे जीवन आमच्यामध्ये केव्हा आकारास येईल?

**एप्रिल ८**

## त्याच्या पुनरुत्थानाचा उद्देश

**“ख्रिस्ताने ही दुःखे सोसावी आणि आपल्या गौरवात जावे, ह्याचे अगत्य नव्हते काय?” (लूक २४:२६).**

आमच्या प्रभूचा वधस्तंभ त्याच्या जीवनात प्रवेश करण्याचे महाद्वार आहे. आपले जीवन मला देण्याचे सामर्थ्य त्याला आहे हाच त्याच्या पुनरुत्थानाचा अर्थ आहे. मी नव्याने जन्मलो तेव्हा मला खुद्द येशूकडून पुन्हा उठलेल्या प्रभूचे जीवन मिळाले आहे.

“पुष्कळ पुत्रांना गौरवात आणावे” हेच ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे पूर्वनियोजित उद्दिष्ट आहे (इब्री २:१०). त्याच्या उद्देशाच्या परिपूर्तीसाठी आम्हांला देवाची मुले व मुली करण्याचा हक्क त्याला आहे. देवाच्या पुत्राचे देवाशी आहे ते नाते आमचे कधीही होणार नाही. तथापि पुत्राने आम्हांला पुत्रपणाच्या नात्यात आणले आहे. आमचा प्रभू मेलेल्यांतून संपूर्णपणे नव्या जीवनात उठला. तो देहधारी देव झाला त्यापूर्वी हे जीवन तो जगला नव्हता. हे जीवन सर्वस्वी वेगळे होते. आम्हीही त्याच्या पुनरुत्थित जीवनात उठवले गेलो आहो. हाच आमच्यासाठी त्याच्या पुनरुत्थानाचा अर्थ आहे. एक दिवस आम्हांला त्याच्या गौरवी देहासारखा देह मिळेल. परंतु त्याच्या पुनरुत्थानाचे प्रभावी सामर्थ्य येथे व आताच अनुभवून आम्हांला “नवीन प्रकारच्या जीवनात” (रोम ६:४) चालता येते. *“तो व त्याच्या पुनरुत्थाचे सामर्थ्य”* (फिलिप्पै ३:१०), ओळखावे हाच पौलाचा निश्चयी उद्देश होता.

येशूने प्रार्थना केली, “... तू त्याला दिले आहेत त्या सर्वांना त्याने सार्वकालिक जीवन द्यावे म्हणून तू मनुष्यमात्रांवर त्याला अधिकार दिला आहे” (योहान १७:२). मानावांच्यामध्ये येथे व आताच येणाऱ्या सार्वकालिक जीवनाच्या अनुभवाचे पवित्र आत्मा हे दुसरे नाव आहे. पवित्र आत्मा देवाचे देवत्व आहे. तो ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या प्रायश्चित्त अर्पणाचे सामर्थ्य आमच्या जीवनाला लागू करतो. या तेजस्वी आणि गौरवी सत्यासाठी देवाला धन्यवाद द्या कारण आम्ही त्याच्या आज्ञा पाळल्या तर त्याचा आत्मा आमच्यामध्ये येशूचा स्वभाव कार्यरत करील.

**एप्रिल ९**

## "तुम्ही येशूला पाहिले आहे का?"

**"ह्यानंतर त्यांच्यापैकी दोघेजण... चालले असता त्यांना तो दुसऱ्या रुपाने प्रगट झाला" (मार्क १६:१२).**

तारण होणे आणि येशूला पाहणे या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. येशूला न पाहिलेल्या अनेक लोक देवाच्या कृपेचे वाटेकरी झाले आहेत. एकदा त्याला पाहिले की तुम्ही पूर्वीचे राहातच नाही. पूर्वीच्या गोष्टी आता खुणावत नाहीत.

येशू कसा आहे आणि त्याने तुमच्यासाठी काय केले आहे यातील फरक ओळखला पाहिजे. त्याने तुमच्यासाठी केले तेवढेच पाहिलेत तर तुमचा देव पुरेसा मोठा नाही! पण तुम्ही दृष्टांतात येशूला तो आहे तसा पाहिला असेल तर अनुभव येतील आणि जातील आणि तुम्ही मात्र "जो अदृश्य आहे त्याला पाहत असल्यासारखा... धीर धराल" (इब्री ११:२७). जन्मापासून आंधळा असलेल्या माणसाला ख्रिस्ताने प्रत्यक्ष येऊन स्वतःला प्रकट करीपर्यंत तो कोण ते ठाऊक नव्हते (पहा योहान ९). येशूने ज्यांच्यासाठी काही केले आहे त्यांना तो दर्शन देतो. पण त्याने अमुकच वेळी यावे अगर तो या वेळी येईल असे आपण म्हणू शकत नाही. तो अचानक केव्हाही येईल. मग तुम्ही म्हणाल "आता मी त्याला पाहतो" (पहा योहान ९:२५).

येशूने तुम्हांला व तुमच्या मित्राला दर्शन दिले पाहिजे. तुमच्या डोळ्यांनी दुसरा कोणी येशूला पाहू शकणार नाही एकाने त्याला पाहिलेले असते व दुसऱ्याने नसते तेव्हा मतभेद होतात. तुमच्या मित्राला येशू दिसावा असे तुम्ही करु शकत नाही. ते देवानेच केले पाहिजे. तुम्ही येशूला पाहिले आहे? असेल तर दुसऱ्यांनीही त्याला पाहावे असे तुम्हांला वाटेल. *"त्यांनी जाऊन इतरांना सांगितले तरी त्यांनी त्यांच्यावरही विश्वास ठेवला नाही"* (मार्क १६:१३). लोक विश्वास ठेवोत न ठेवोत तुम्ही त्याला पाहिले तर ते दुसऱ्यांना सांगितलेच पाहिजे.

ते मला सांगता येते तर तुम्हीही विश्वास ठेवला असता!
पाहिले ते मला सांगता आले असते तर!
मी ते कसे सांगावे, तुम्हांला ते कसे समजेल?
तुम्हांला त्याने येथे आणले की समजेलच!

**एप्रिल १०**

## पापाविषयी पूर्ण व प्रभावी निर्णय

**"... हे पापाच्या अधीन असलेले शरीर नष्ट होऊन आपण ह्यापुढे पापाचे दास्य करु नये, म्हणून आपल्यातील जुना मनुष्य त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळला गेला" (रोम ६:६).**

**ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर** : पापाविषयी तुम्ही हा निर्णय घेतला आहे? तुमच्यातील पापाचे समूळ निर्मूलन झाले पाहिजे? पापाविषयी हा संपूर्ण प्रभावी निर्णय घेण्यास पुष्कळ वेळ लागतो. पण आपल्यातील पाप पूर्णपणे नाहीस झाले पाहिजे हे ठरवले तो तुमच्या जीवनातील महान क्षण आहे. जगाच्या पापासाठी येशू ख्रिस्त वधस्तंभावर खिळला गेला तसे पापही खिळले पाहिजे. परंतु हा निश्चय दुसरा कोणी करु शकत नाही. मानसिक व आध्यात्मिक या दोन्ही दृष्टींनी आमची खातरी पटली पाहिजे. या वचनातून पौलाने आम्हांला सांगितले त्याप्रमाणे निश्चय केला पाहिजे.

स्वतःला तयार करा. देवाबरोबर एकांतात राहा आणि म्हणा, "हे प्रभू, माझ्यामधील पाप मरेपर्यंत मला तुझ्या मरणाशी समरुप कर." तुमच्यामधील पाप मेलेच पाहिजे हा नैतिक निश्चय करा.

पौलाने येथे काही भावीकाळातील अपेक्षा बोलून दाखवली नाही. त्याने येथे स्वतःच्या जीवनातील पालट करणाऱ्या अनुभवाचा उल्लेख केला आहे. तुमच्यामध्ये पापाची पातळी किती आहे, तुमच्यामध्ये देवाच्या आत्म्याला विरोध करणाऱ्या कोणत्या गोष्टी आहेत त्या देवाच्या आत्म्याने शोधक प्रकाशात पाहू देणार काय? मग देवाने केलेल्या पापाच्या निवाड्याविषयी सहमत व्हाल ना? देवासमोर तुमच्या इच्छेला खीळ घातलीत तरच तुम्हांला "स्वतःस पापाला मेलेले" असे मानता येईल (रोम ६:११).

तुमच्या देहामध्ये असलेले सर्व जाऊन फक्त ख्रिस्ताचे जीवन राहावे यासाठी तुम्ही ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेले आहात का? "मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे आणि या पुढे मी जगतो असे नाही तर ख्रिस्त माझ्यामध्ये जगतो" (गलती २:२०).

**एप्रिल ११**

## संपूर्ण आणि प्रभावी दिव्यत्व

**"जर आपण त्याच्या मरणाच्या प्रतिरुपाने त्याच्याशी संयुक्त झालो आहो, तर त्याच्या उठण्याच्याही प्रतिरुपाने त्याच्याशी संयुक्त होऊ" (रोम ६:५).**

**येशूबरोबर पुनरुत्थान:** माझ्यामध्ये येशू ख्रिस्ताशी समान असे काही आहे हेच मी येशूबरोबर वधस्तंभावर खिळलो गेल्याचे प्रमाण आहे. येशूच्या आत्म्याने माझ्यामध्ये प्रवेश केला आणि त्याने देवासमोर माझ्या जीवनाची पुनर्रचना केली. येशूच्या पुनरुत्थानामुळे देवाचे जीवन मला देण्याचा अधिकार त्याला मिळाला आहे आणि आता माझ्या जीवनातील सर्व अनुभव त्याच्या जीवनाच्या पायावर उभारायचे आहेत. येशूचे पुनरुत्थित जीवन मला येथे व आताच प्राप्त होऊन ते पवित्रतेच्या द्वारे दिसेल.

प्रेषित पौलाने लिहिलेल्या सर्वच लेखांमध्ये येशूबरोबर त्याच्या मरणात समरुप होण्याचा निर्णय घेतल्यावर त्याचे पुनरुत्थित जीवन माझ्या मानवी स्वभावाला व्यापून टाकते. देवाचे संपूर्ण सामर्थ्य, त्याचे देवत्व मानवी देहामध्ये देवाच्या पुत्राचे जीवन जगण्यास कारण होते. पवित्र आत्म्याला माझ्या अंतरंगाच्या एखाद्या कोपऱ्यात राहणे पसंत नाही. तो संपूर्ण अंतरंग व्यापतो. माझ्यातील "जुना मनुष्य" (म्हणजे माझी पापाची चालत आलेली वंशपरंपरा) येशूच्या मरणाशी समरुप व्हावा असे मी ठरवले की पवित्र आत्मा सर्व स्वतःच्या ताब्यात घेतो. मी प्रकाशात चालायचे आणि तो मला प्रकट करतो त्याप्रमाणे आज्ञा पाळायच्या हेच माझे काम आहे. पापाविषयीचा हा निश्चिय केल्यावर मी स्वतःला "पापाला मेलो" असे "मानण्यास" तयार झालो आहे कारण मला सदोदित येशूचे जीवन अनुभवास येते (रोम ६:११). मानवजातीचा एकच प्रकार आहे तसा पवित्रतेचाही एकच प्रकार आहे. येशूची पवित्रता हाच तो प्रकार आणि त्याची पवित्रता मला दिली आहे. देव आपल्या पुत्राची पवित्रता मला देतो आता मला वेगळा नवा आध्यात्मिक दर्जा आहे.

**एप्रिल १२**

## पूर्ण आणि प्रभावी सत्ता

**“त्याच्यावर ह्यापुढे मरणाची सत्ता चालत नाही... तो जगतो तो देवासाठीच जगतो. तसे तुम्हीही ख्रिस्त येशूमध्ये स्वतःस पापाला मेलेले खरे, पण देवाप्रीत्यर्थ जिवंत झालेले...” (रोम ६:९–११).**

**ख्रिस्तासह सार्वकालिक जीवन.** येशू ख्रिस्ताने मानवी पातळीवर सार्वकालिक जीवन प्रकट केले. आणि याच जीवनाची नक्कल नव्हे तर तेच जीवन आम्ही नव्याने जन्मतो तेव्हा आमच्या देहामध्ये स्पष्टपणे दिसते. सार्वकालिक जीवन देवाकडून मिळणारी देणगी नसून *देवाची देणगी* आहे. येशूमध्ये जे सामर्थ्य स्पष्टपणे दिसत होते ते देवाच्या परम सार्वभौम कृपेने आमच्यामध्ये प्रकट होईल, मात्र त्यासाठी आम्ही पापाच्या संबंधात संपूर्णपणे प्रभावी निर्णय घेतला पाहिजे.

“... पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल...” (प्रे. कृ. १:८). पवित्र आत्म्याकडून सामर्थ्याची देणगी असे नाही तर पवित्र आत्माच *सामर्थ्य आहे*. येशूबरोबर समरुप होण्याचा निश्चय केला की त्याच्या वधस्तंभामुळे त्याच्यामध्ये असलेले जीवन आमचे होते. पापाविषयी हा नैतिक निर्णय न घेतल्याने आम्हांला देवाबरोबर सरळ होता येत नाही. पण एकदा का आम्ही हा निर्णय घेतला की देवाचे संपूर्ण जीवन लगेच आमच्यामध्ये येते... आम्हांला जीवनाचा अखंड पुरवठा करण्यासाठी येशू आला. “तुम्ही देवाच्या सर्व पूर्णते इतके परिपूर्ण व्हावे.” काळाचा सार्वकालिक जीवनाशी काही संबंध नाही. येशू येथे असताना जगला तेच हे जीवन आहे आणि प्रभू येशू ख्रिस्त हाच या जीवनाच एकच एक उगम आहे.

अगदी दुर्बळातील दुर्बळ पवित्र जनालाही देवपुत्राच्या देवत्वाचे सामर्थ्य अनुभवास येते. मात्र त्यासाठी त्याने संपूर्ण समर्पण केले पाहिजे. परंतु आपल्या स्वतःच्या शक्तीचा किंचितसा जरी अंश आपण राखून ठेवला तर त्यामुळे आमच्यामधील येशूचे जीवन कमी होईल. आपण सतत “सोडून दिले” पाहिजे. मग हळूहळू देवाचे संपूर्ण महान जीवन आमच्यावर येऊन आमच्या रोमारोमात शिरेल. परिणामी येशूची संपूर्ण सत्ता आमच्यावर प्रभावीपणे असेल आणि आम्ही येशूच्या सहवासात आहोत हे लोकांना सहज समजेल.

**एप्रिल १३**

## ओझे जड होते तेव्हा काय करावे

**“तू आपला भार परमेश्वरावर टाक” (स्तोत्र ५५:२२).**

वाहिली पाहिजेत अशी ओझी आणि वाहू नयेत अशी ओझी यांमधील भेद आपण ओळखला पाहिजे. आपण पापाची अगर शंकांची ओझी कधी उचलू नयेत; परंतु काही ओझी देवाने आमच्यावर लादलेली असतात. ती तो कधी दूर करीत नाही. ती आपण परत देवाकडे सोपवावी ही त्याची इच्छा असते. आपण आपला हा “भार अक्षरशः” परमेश्वरावर टाकावा. आपण देवाची सेवा करण्यासाठी पुढे होतो, त्याचे काम करताना त्याच्याशी संपर्क ठेवला नाही तर आमच्यावरील जबाबदारीचा भार सोसवणार नाही आणि आम्ही पराभूत होऊ. पण देवाने दिलेली ओझी आपण त्याच्याकडे सोपवली तर तो आमच्यावरील जबाबदारी स्वतःकडे घेईल आणि त्याचे स्वतःचे ज्ञान आणि सान्निध्य तर आम्हांला देईल.

अनेक सेवक मोठ्या धैर्याने व रास्त उद्देशाने देवाची सेवा करण्यास पुढे सरसावतात. पण त्यांची येशू ख्रिस्ताबरोबर निकटची सहभागिता नसल्याने ते लवकरच पराभूत होतात. आपल्यावर असलेल्या भाराचे काय करावे ते त्यांना समजत नाही. त्यामुळे ते थकतात, कंटाळतात. हे पाहून दुसरे लोक म्हणतात, “एवढ्या थाटामाटात सुरु केलेल्या कामाचा असा दारुण शेवट व्हावा ना!”

“तू आपला भार परमेश्वरावर टाक....” आजपर्यंत तुम्ही ते सर्व वाहत आहा पण त्यातील एक भाग तुम्ही देवाच्या खांद्यावर ठेवावा. “... त्याच्या खांद्यांवर सत्ता राहील...” (यशया ९:६). देवाने तुमच्यावर टाकलेला भार त्याच्याकडे सोपवून द्या. बाजूला टाकू नका, तर ते त्याच्यावर ठेवा आणि त्याबरोबर तुम्हीही तेथे राहा. सोबत मिळाल्याने आपला भार हलका झाला आहे हे तुम्हांला जाणवेल. पण आपल्या ओझ्यापासून विभक्त होण्याचा विचारही मनात आणू नका.

एप्रिल १४

## आंतरिक अजिंक्यपणा

**"माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका... (मत्तय ११:२९).**

"... ज्यावर परमेश्वर प्रीती करतो त्याला तो शिक्षा करतो..." (इब्री १२:६). आम्ही किती किरकोळ गोष्टीत कुरकूर करतो! आमचा प्रभू आम्हांला त्याच्या सहभागितेत आणू पाहतो तेव्हा आम्ही कुरकुरतो, "हे प्रभू, मला दुसऱ्या लोकांसारखे असू दे!" "माझ्या बाजूला या आणि जुवाचे एक टोक तुमच्या खांद्यावर घ्या आपण दोघे मिळून हे ओढू या," असे तो म्हणतो. आणखी पुढे सांगतो, "माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे" (मत्तय ११:३०). या प्रकारे तुम्ही येशूशी समरुप झाला आहा काय! असाल तर तुमच्यावर त्याच्या हाताचा दाब जाणवला की तुम्ही त्याला धन्यवाद द्याल.

".... तो निर्बलांस विपुल बल देतो" (यशया ४०:२९). देव येऊन आम्हांला आमच्या भावनाविवशतेतून बाहेर काढतो, मग आमची कुरकूर बंद होते आणि मुखातून स्तुतीगीताचे शब्द येतात. देवाचे सामर्थ्य जगण्याचा एकच उपाय आहे. येशूचे जू खांद्यावर घेऊन त्याच्यापासून शिकणे.

"...परमेश्वराविषयीचा जो आनंद तोच तुमचा आश्रयदुर्ग आहे" (नेहम्या ८:१०). पवित्र जनांना आनंद कोठून मिळतो? काही ख्रिस्ती लोकांकडे पाहिले तर वाटते ह्यांना कसलीही चिंता नाही. पण भेदक दृष्टीने पाहिले तर समजेल की त्यांच्यामध्ये दिसणारी देवाची शांती, प्रकाश व आनंद यांच्यामागे ओझेही आहे. देव आमच्यावर टाकतो त्या भारामुळे आमच्यामधील द्राक्षे पिळली जाऊन द्राक्षारस तयार होतो. पण आमच्यापैकी बहुतेकांना द्राक्षारस दिसतो आणि ओझे दिसत नाही. मानवी आत्म्यामध्ये वसती करणाऱ्या देवाच्या आत्म्याला पृथ्वीवरची अगर अधोलोकातील कोणतीही शक्ती जिंकू शकणार नाही. यामुळे आंतरिक अजिंक्यपणा उत्पन्न होतो.

तुमच्या जीवनातून द्राक्षारासाऐवजी कुरकूर कानी येत असेल तर ती ताबडतोब बंद करा. देवाच्या सामर्थ्यात दुर्बल होणे हे ख्रिस्ती माणसाने अपराध करणे आहे.

## एप्रिल १५

### नीट लक्ष देण्यास चुकणे

**“त्याने उच्च स्थाने इस्राएलांतून काढून टाकली नाहीत; तथापि आसाचे हृदय साऱ्या हयातीत सात्विक राहिले” (२ इतिहास १५:१७).**

आपल्या जीवनाच्या बाह्यरुपात आसाने संपूर्ण आज्ञापालन केले नाही. त्याला अतिमहत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टीत त्याने आज्ञापालन केले पण त्याचे सर्वच योग्य नव्हते. माझ्या जीवनात त्या गोष्टीचे काही महत्त्व नाही असे कधी म्हणू नका. तुम्हांला ज्याचे फारसे महत्त्व नसते ते देवाला विशेष महत्त्वाचे वाटते. देवाच्या मुलाने कोणतीच गोष्ट किरकोळ म्हणून सोडून देऊ नये. देवाला आम्ही किती काळ अडवणार? त्याच्याकडून एकही गोष्ट शिकणार नाही? तो मात्र धीराने सर्व सोसून आम्हांला शिकवण्याचा प्रयत्न चालू ठेवतो. तुम्ही म्हणता, “मी देवासमोर सरळ आहे!” परंतु तुमच्या जीवनातील “उच्चस्थाने” अजून तशीच आहेत. अद्याप तुम्ही देवाची अवज्ञा करत आहा. आपले अंतःकरण देवासमोर सरळ, रास्त आहे असे तुम्ही म्हणता. तथापि तुमच्या जीवनात काही तरी आहे त्यावरुन तो तुमच्या मनात संशय उत्पन्न करतो. देवाने तुमच्या मनात काही संशय उत्पन्न केला तर ताबडतोब त्याचा निकाल करा. आमच्या आयुष्यातील कोणतीच गोष्ट देवाला बिनमहत्त्वाची नसते.

तुमच्या शारीरिक व बौद्धिक जीवनातील काही गोष्टींकडे तुमचे संपूर्ण दुर्लक्ष होते का? असेल तर आपण सर्व महत्त्वाच्या गोष्टीत योग्य आहो असे तुम्हांला वाटेल. पण खरे तर तुम्ही बेपर्वा आहात. तुम्ही योग्य लक्ष देत नाही. तुमच्या हृदयाने एखाद दिवस रजा घेतली तर तुमचे काय होईल? मग तुम्ही तुमच्या जीवनावरील आध्यात्मिक लक्ष्यापासून विचलित होऊन कसे चालेल! नैतिकता एक दिवसभर बाजूस ठेवली तर तुम्ही नैतिक कसे राहाल? तसेच आध्यात्मिकतेला एक दिवस रजा दिल्याने कोणी आध्यात्मिक राहात नाही. तुम्ही सर्वस्वी देवाचेच असावे ही त्याची इच्छा आहे. पण त्यासाठी तुम्ही स्वतःला नेहमी तंदुरुस्त ठेवले पाहिजे. त्यासाठी बराच वेळ लागतो. पण आपल्यापैकी काहींना वाटते सगळे प्रश्न बाजूस टाकावे आणि गिरिशिखरावरच्या एका अनुभवापासून लगेच दुसऱ्या अनुभवाकडे जावे आणि त्यासाठी विशेष परिश्रमांची गरज नसावी.

**एप्रिल १६**

## डोंगरावरुन खाली याल का?

**“तुम्हाजवळ प्रकाश असतानाच प्रकाशावर विश्वास ठेवा...” (योहान १२:३६).**

काही वेळा अशा असताता की तेव्हा आपणाला पूर्वीपेक्षा खूपच चांगले वाटते. आपण म्हणतो, “मी कोणतीही गोष्ट करण्यास तयार आहे. नेहमीच मला एवढा उत्साह वाटला तर!” पण तसे होत नाही. हे क्षण सूक्ष्मतेचे क्षण आहेत आणि आपणाला आवडो न आवडो त्यांने साजेल असे जगावेच लागते. आम्ही डोंगर माथ्यावर असतो तेव्हा आमच्यापैकी कित्येकांना नित्याची कामेही व्यवस्थित करता येत नाहीत. पण आम्ही डोंगरमाथ्यावर असताना आम्हांला प्रकट केले आहे त्या पातळीवर आम्ही आमचे नित्याचे जीवन आणले पाहिजे.

डोंगरमाथ्यावर मनात जागवलेला विचार विरुन जाऊ देऊ नका. “मनाच्या अशा उच्च अवस्थेत राहणे किती छान!” असे म्हणत स्वस्थ बसू नका. लगेच कार्य करा. करु नये असे वाटले तरी कृती करा. प्रार्थना सभेमध्ये देवाने तुम्हांला काही करायला सांगितले तर, “मी ते करीन” असे म्हणू नका. सरळ उठा आणि ते करा! आळस सोडून पुढे व्हा. आपण नेहमी डोंगरावर घालवावयाच्या वेळाचे नियोजन करतो; डोंगरावरील अनुभवाची आम्हांला ओढ लागलेली असते. त्यातूनच आळस डोके वर काढतो. डोंगरावर पाहिले ते लक्षात घेऊन आम्हांला रोजच्या “धूसर” जीवनात जगायला शिकले पाहिजे.

एकदा तुम्ही गोंधळलात म्हणून सर्व सोडून देऊ नका. परत कार्य करा. मागची वाट पुसून टाका. स्वतःच्या इच्छेने देवाला समर्पित राहा. आपले निर्णय बदलू नका; पंरतु डोंगरावर तुम्ही जे पाहिलेत व शिकलात त्याप्रमाणे निर्णय घ्या व निश्चय करा.

## एप्रिल १७

### सर्वकाही अगर काहीच नाही?

**“ह्यावरुन ज्या शिष्यावर येशूची प्रीती होती तो पेत्र... अंगरखा घेऊन तो कंबरेशी गुंडाळून घेतला, ... आणि त्याने समुद्रात उडी मारली” (योहान २१:७).**

तुम्ही मागचा पुढचा विचार न करता, जाणून बुजून सर्व तसेच सोडून दिले असा एखादा जबर प्रसंग कधी तुमच्या जीवनात आला आहे? हा इच्छेचा पेच आहे. तुम्ही बाजूबाजूने अनेकदा त्या मुद्यावर आला असाल; पण त्यातून काहीच साधले नसेल. सर्वकाही सोडून देण्याचा संपूर्ण समर्पण करण्याचा सर्वस्वी अधीन होण्याचा खरा गाढ पेच बाहेरुन नव्हे तर आतूनच येतो. फक्त बाह्य गोष्टी टाकून दिल्याने प्रत्यक्षात तुम्ही संपूर्ण बंधनात, दास्यात आहात हेच स्पष्ट होते.

तुम्ही आपली इच्छा जाणूनबुजून येशू ख्रिस्ताला समर्पण केली आहे? हे इच्छेने करावयाचे कार्य आहे, भावनावश व्हायचे नाही. कोणतीही सकारात्मक भावना त्या कार्यातून येणारा वरवरचा आशीर्वाद आहे. कार्य कोणते ते देवाला विचारु नका. तुम्हांला दिसते ते आतून उथळ पातळीवर असो की खोलवर असो त्या संबंधातील तुमची इच्छा पूर्णपणे समर्पण करण्याचा निश्चय करा.

सागराच्या लाटांवर तुम्ही येशू ख्रिस्ताची वाणी ऐकली असेल त्याच्याबरोबरच्या तुमच्या जिव्हाळ्याच्या नात्यावर लक्ष केंद्रित करुन तुमची निश्चित्त मते व तुमचे आचारविचार यांमध्ये सुसंगती ठेवण्याकडे लक्ष लावा.

## एप्रिल १८

### तयार असणे

**“देवाने त्यास हाक मारुन म्हटले... तेव्हा तो म्हणाला, ‘काय आज्ञा’”(निर्गम ३:४).**

देव बोलतो तेव्हा आमच्यातील अनेकजण धुक्यातील लोकांप्रमाणे असतात, आम्ही उत्तरच देत नाही. मोशेने देवाला दिलेल्या उत्तरातून तो काय होता हे त्याला माहीत होते व तो तयार होता हेच स्पष्ट होते. तयार असणे म्हणजे देवाबरोबर योग्य नाते आणि आपण कोठे आहोत ते माहीत असणे. आम्हांला कोठे जाणे आवडेल हे देवाला सांगण्यास आम्ही अगदी तयार असतो. पण देव व त्याचे कार्य यासाठी जो पुरुष अथवा स्त्री तयार असते त्यालाच पाचारण होते तेव्हा बक्षीस मिळते. काही मोठी संधी अगर काही सनसनाटी महत्त्वाचे आमच्या दिशेने येईल तेव्हा आपण लगेच म्हणू, “हा मी येथे आहे!” येशू ख्रिस्त काही मोठे कार्य करण्यास पुढे होतो आहे हे जाणवले की आम्ही लगेच तेथे हजर होतो. परंतु काही सामान्य कर्तव्य करण्यास आम्ही तयार नसतो.

देवासाठी तयार असणे म्हणजे लहान मोठे कोणतेही काम करण्यास तायर असणे. आम्हांला करायचे आहे त्यात निवडानिवड नसते. देवाने नेमले आहे ते करण्यास आम्ही तयार असतो. कोणतेही कर्तव्य करायचे असेल तेव्हा आम्ही देवाची वाणी ऐकतो आणि ते करण्यास त्याच्यावरील आमच्या प्रेमामुळे तयार असतो. आमच्या प्रभूनेही पित्याची वाणी ऐकून असेच केले होते. येशू ख्रिस्ताच्या पित्याने त्याच्याशी केले तसेच वर्तन तो आमच्याशी करतो. त्याच्या इच्छेप्रमाणे तो आम्हांला कोठेही हलके अगर सुखकर काम करण्यास ठेवो त्याचे पित्याबरोबर होते तसेच ऐक्य आमचे त्याच्याशी आहे. “... जसे आपण एक आहो तसे त्यांनीही एक व्हावे...” (योहान १७:२२).

देव अचानक भेट घेईल त्यासाठी तयार असा. नेहमी तयार असणाऱ्याला तयार होण्याची गरज नाही. तो तयारच असतो. देवाने बोलावल्यावर तयार होण्यास किती वेळ वाया जातो त्याचा विचार करा! तयार असणाऱ्याच्या भोवती असलेल्या सर्व गोष्टी जळते झुडूप या प्रतीकातून दिसतात. देवाच्या सान्निध्यामुळे ते पेटलेले आहे.

## एप्रिल १९

### येणाऱ्या क्षुल्लक मोहापासून सावध राहा

**“यवाब हा अबशालोमाच्या पक्षाकडे वळला नव्हता, तरी तो अदोनीयाच्या पक्षाकडे वळला होता”** (१ राजे २:२८).

यवाबाने आयुष्यातील मोठ्या कसोटीला चांगले तोंड दिले. तो दावीदाशी एकनिष्ठ राहिला. महत्त्वाकांक्षी अबशालोमाला त्याने जुमानले नाही. पण आयुष्याच्या अखेरीस तो त्या दुबळ्या आणि भित्र्या अदोनीयाच्या मागे गेला. पण एक व्यक्ती जेथे मागे गेली आहे तेथे दुसऱ्यालाही मागे फिरण्याचा मोह होईल म्हणून सावध राहा (पहा १ करिंथ १०:११-१३). एखादा जबर मोह टाळून तुम्ही पुढे गेला असाल; परंतु आता सावध राहा. ज्याचा मोह पडणार नाही असे वाटते त्याचाच मोह पडेल.

माझ्या आयुष्यातील सर्वात मोठ्या पेचातून मी सुटलो. आता मी लौकिक गोष्टींकडे पाठ “फिरवीन.” मोह कोठून कसा येईल त्याचे भाकित कोण कसे करील? शक्यता नाही असे वाटते तेथूनच मोठा धोका संभवतो. महत्त्वाच्या मोठ्या आध्यात्मिक प्रसंगानंतर शक्य न वाटणाऱ्या गोष्टीच डोकी वर काढतात. त्यांचा तेवढा जोरदार प्रभाव पडला नाही तरी त्या असतातच. आणि तुम्ही प्रथमच सावध झाला नाहीत तर त्या तुम्हांला तोंडघशी पाडतील. मोठ्या आणि कठोर परीक्षांमध्ये तुम्ही देवाला धरुन राहिला. आता किरकोळ गोष्टींपासून सावध राहा. तुम्ही उगाचच भयभीत होऊन भावी गोष्टींचा विचार करु नका. परंतु सावध राहा, देवासमोर आपली स्मरणशक्ती जागृत ठेवा. नियंत्रण नसलेली शक्ती दुप्पट दुबळेपणास कारण होते; कारण त्याच स्थितीत अगदी क्षुल्लक मोह शक्तिपात करण्यास कारण होतात. पवित्र शास्त्रातील व्यक्ती त्यांच्या दुर्बलतेवर नव्हे तर भक्कम मुद्यांवर अडखळून पडले.

“... देवाच्या शक्तीने... रक्षिलेले...” हाच सुरक्षित राहण्याचा उपाय आहे (१ पेत्र १:५).

## एखादा पवित्रजन देवावर खोटा आरोप करु शकेल?

**“देवाची वचने ... त्याच्याठायी होय हे आहे... त्याच्याद्वारे आमेन म्हणतो” (२ करिंथ १:२०).**

येशूने सांगितलेला रुपयांचा दृष्टांत मत्तय २५:१४–३० मध्ये नमूद केला आहे. आमच्या स्वतःच्या क्षमतेविषयी चुकीचे अंदाज करणे शक्य आहे हाच इषारा त्यातून दिला आहे. स्वाभाविक शक्ती आणि क्षमता यांच्याशी या दाखल्याचा काही संबंध नसून पेंटेकॉस्टच्या वेळी प्रथम दिलेल्या पवित्र आत्मा या देणगीशी आहे. आम्ही आमची आध्यात्मिक क्षमता आमची बुद्धी, शिक्षण या मापदंडांनी मोजू नये. आध्यात्मिक बाबतीतील क्षमता देवाच्या अभिवचनांच्या आधारे मोजायची आहे. देवाच्या इच्छेनुसार आम्हांला मिळाले पाहिजे त्याहून कमी मिळाले तर आपल्या धन्यावर खोटा आरोप करणाऱ्या चाकराप्रमाणे आम्हीही देवावर खोटा आरोप करु. चाकर म्हणतो, “तुम्ही मला थोडीशी शक्ती दिली ,तुमची मागणी भरमसाट आहे. मी तुमच्याशी प्रामाणिक राहू शकत नाही.” देवाच्या सर्वसमर्थ आत्म्याचा संबंध येतो तेथे, “मला शक्य नाही” असे म्हणू नका. तुम्हांला पवित्र आत्मा मिळाला आहे तर त्याचे कार्य तुमच्यामधून व्यक्त व्हावे ही देवाची इच्छा व अपेक्षा आहे.

आपल्या धन्याला प्रत्येक बाबतीत दोष देत स्वतःचे समर्थन करीत तो चाकर म्हणाला, “तुम्ही मला दिले त्यापेक्षा मी अधिक द्यावे ही तुमची मागणी अवास्तव आहे!” “तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील” (मत्तय ६:३३). देवाचे वचन ऐकल्यावर चिंता करुन आम्ही देवावर खोटे आरोप करतो काय? या चाकराने सूचकपणे म्हटले, “तुम्ही मला उघडे पाडले, माझी चिंता केली नाही!” तसे आपण करावे का? आळशी मनुष्य नेहमीच दोष देतो, “तुम्ही मला योग्य संधी दिली नाही!”

आध्यात्मिक बाबतीतील आमची क्षमता देवाच्या अभिवचनांवर आधारली आहे. देव आपली अभिवचने पूर्ण करण्यास समर्थ आहे काय? आम्हांला पवित्र आत्मा मिळाला आहे का नाही त्यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे.

**एप्रिल २१**

## प्रभूला दुखवू नका

**“फिलिप्पा, मी इतका काळ तुम्हांजवळ असूनही तू मला ओळखीत नाहीस काय?” (योहान १४:९).**

आमचा मठ्ठपणा पाहून आमच्या प्रभूला वारंवार आश्‍चर्य वाटले आहे. आम्ही स्वतःच्या मतांमध्ये गुरफटून मठ्ठ होतो. पण ती मते बाजूस ठेवली तर आम्हांला समजते. आता आपल्याला काही प्रचंड रहस्याचा उलगडा होईल असे फिलिप्पाला वाटले. येशूला तो ओळखत होता. त्यामुळे ते रहस्य दुसरीकडे आहे असे तो समजला. देवाचे रहस्य पुढे होणार त्यात नाही. ते आताच उघड आहे. पण ते पुढे कधी तरी प्रकट होणार असे आम्हांला वाटते. येशूच्या आज्ञा पाळण्यास आम्ही तयार असतो पण, “प्रभूजी आम्हांला पिता दाखवा...” (१४:८) असे म्हणून तो आमच्याकडून नक्कीच दुखावला जाईल आणि तो लगेच आम्हांला म्हणतो, “काय तो तुम्हांला दिसत नाही? तो तर येथेच आहे.” देवाने त्याच्या मुलांना स्वतःला प्रकट करावे असे आपण म्हणतो; पण देव स्वतःला त्याच्या मुलांमध्ये प्रकट करतो. त्याचे प्रमाण दुसऱ्यांना दिसते पण ते देवाच्या मुलांना दिसत नाही. देव आमच्यामध्ये जे करतो ते पूर्णपणे समजावे ही आमची अपेक्षा असते परंतु आपण तशी अपेक्षा ठेवू नये; देवाने आम्हांला त्या अनुभवांची जाणीव द्यावी असे आम्ही मागत असू आणि ते अनुभव आमच्या मार्गात आड येत असतील तर आम्ही प्रभूला दुखावतो असे होईल. आम्ही विचारतो त्या प्रश्‍नांनी येशू दुखावला जातो; कारण ते बालकाने विचारलेले नसतात.

“तुमचे अंतःकरण अस्वस्थ होऊ नये” (१४:१,२७). आपले अंतःकरण अस्वस्थ होऊ दिल्याने मी येशूला दुखावतो? येशूवर व त्याच्या गुणांवर माझा विश्‍वास आहे तर तसे माझे वागणे आहे का? मी भलतेच प्रश्‍न विचारुन अस्वस्थ होतो? माझे त्याच्याशी असलेले नाते विशुद्ध संशयातीत आहे? देव आम्हांला भविष्यात नव्हे तर येथे व आताच मार्गदर्शन करतो. तुम्हांला लगेच मोकळीक मिळते.

## कधीही न मावळणारा प्रकाश

**"परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्वजण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाहत आहो" (२ करिंथ ३:१८).**

देवाच्या सेवकाने असे एकटे उभे राहावे की त्याला आपले एकटेपण कधी जाणवू नये! ख्रिस्ती जीवनाच्या आरंभी निराश वाटेल. प्रकाश असणाऱ्या व्यक्ती मालवतील. आमच्या बाजूस असणारे पाठ फिरवतील. या सर्वांची सवय करुन घ्यावी. आम्ही एकटे आहोत याची जाणीवही होऊ नये. पौलाने म्हटले, "... माझ्या बाजूस कोणी नव्हता, सर्वांनी मला सोडले होते... तरी प्रभू माझ्याजवळ उभा होता..." (२ तीमथ्य ४:१६–१७). क्षीण होणाऱ्या प्रकाशावर नव्हे तर कधी न मावळणाऱ्या प्रकाशावर आमचा विश्वास उभारावा. "महत्त्वाच्या" व्यक्ती नजरेआड झाल्या की आम्ही खिन्न होतो, पण त्यांना जाणे भाग होते हे समजले की स्वतःच देवाच्या मुखाकडे पाहावे एवढेच आमच्या हाती असते.

देवाच्या मुखाकडे एकटक पाहण्याच्या तुमच्या निश्चयाच्या आड काहीही येऊ देऊ नका. तुम्ही स्वतः आणि तुमची मते एकीकडे ठेवा. तसेच तुम्ही संदेश सांगाल तेव्हा प्रथम त्या संदेशाविषयी देवाच्या मुखाकडे पाहा, विसरु नका. मग त्याचे तेज त्यामध्ये अखेरपर्यंत राहील. सतत देवाचे मुख पाहून दुसऱ्यांशी बोलणाराच ख्रिस्ती सेवक असतो. ख्रिस्ताचे सेवाकार्य चिरंतन तेजाने युक्त असते. पण सेवकाला त्याची जाणीव नसते. "... परमेश्वराशी संभाषण केल्याने आपल्या चेहऱ्यातून तेजाचे किरण निघत आहेत ह्याचे त्याला भान नव्हते" (निर्गम ३४:२९).

देवाबरोबरच्या आमच्या जीवनातील आनंद व सुख उघडपणे बोलून दाखवण्यास आम्हांला कधीही सांगितलेले नाही. सदोदित देवाच्या सुराशी सूर मिळवून राहणे हेच सेवकाच्या जीवनाचे रहस्य आहे.

**एप्रिल २३**

## तुम्ही तुमच्या कामाची उपासना करता का?

**“आम्ही देवाचे सहकारी आहो”** (१ करिंथ ३:९).

देवाचे कार्य करताना सावध असा. ते त्याच्यावरचे लक्ष ढळवण्यास कारण होऊ नये याची दक्षता घ्या. अनेक ख्रिस्ती कार्यकर्ते आपल्या कामाची उपासना करतात. ख्रिस्ती सेवकाने देवाकडे चित्त लावण्याकडे लक्ष दिले पाहिजे. म्हणजेच देवाने आपल्या मुलाला दिलेल्या स्वतंत्रतेमुळे जीवनाच्या इतर मानसिक नैतिक मर्यादा मुक्त आसाव्या. देवाचे मूल बहकलेले नव्हे तर उपासना करणारे असावे. ज्या सेवकाकडे देवावर लक्ष एकाग्र करण्याचे नियंत्रण नसते तो कामाच्य ओझ्याने हैराण होतो. तो स्वतःच्याच मर्यादांचा गुलाम होतो. त्याला मानसिक, शारीरिक आणि आत्मिक स्वातंत्र्य नसते. तो पराभूत होतो. त्याचे संपूर्ण अंतरंग दडपणाखाली असते त्याला देवाचे आशीर्वाद मिळू शकत नाहीत.

पण आम्ही संपूर्णपणे एकचित्त असलो तर आमचे जीवन मुक्त होते, सर्व काही एका देवाच्या नियंत्रणाखाली असते. तुमच्यावर कामाचे ओझे नसते. देवाच्या संपर्कात सतत राहणे आणि त्याच्याशी सहकार्य करण्यात काहीही आड येणार नाही याची दक्षता घ्यावी. पवित्रीकरणानंतर मिळणारे स्वातंत्र्य बालकाचे आहे. तुमचे जीवन दडपणाऱ्या सर्व गोष्टी दूर होतात. एक लक्षात ठेवा तुम्ही तुमच्या सहकाऱ्याशी एकनिष्ठ असले पाहिजे.

आम्हांला कोठे ठेवावे अगर देव आम्हांला कोणत्या कार्यासाठी तयार करत आहे त्याविषयी उगाचच अगोदर कल्पना करु नये. देव सर्व व्यवस्था करतो; तो आम्हांला कोठे ठेवतो हे महत्त्वाचे नाही. तो देईल ते काम जिवेभावे करावे आणि त्याच्याशी अंतःकरणपूर्वक एकनिष्ठ राहणे हेच आमचे ध्येय असावे. “जे काही काम तुझ्या हाती पडेल ते आपले सगळे सामर्थ्य खर्च करुन कर” (उपदेशक ९:१०).

एप्रिल २४

### आध्यात्मिक यश मिळण्याची इच्छा धरु नका.

**"भुते तुम्हांला वश होतात ह्याचा आनंद मानू नका" (लूक १०:२०).**

प्रापंचिक गोष्टींमध्ये गुंतणे हा काही ख्रिस्ती सेवकांना धोकादायक पाश नाही, तसेच ते पापही नाही. आध्यात्मिक यशाची हाव धरणे हेच आम्हांला पाश होते. या धर्मनिष्ठ युगाच्या मतानुसार मिळणारे यश हवे असे आम्ही म्हणू नये. देवाची मान्यता मिळणे महत्त्वाचे, लौकिक यश मिळो न मिळो, "त्याचा अपमान सोसत तळाबाहेर" जाण्याची तयारी ठेवा (इब्री १३:१३). सेवेत यश मिळाले म्हणून आनंद करु नका असे येशूने शिष्यांना सांगितले. पण आपण सर्वच या प्रकारे आनंद करतो. आमची दृष्टी व्यापारी झाली आहे. किती आत्मे जिंकले आणि पवित्र केले त्यांची मोजदाद करतो, देवाचे आभार मानतो आणि म्हणतो सर्व ठीक आहे. देवाच्या कृपेने पाया घातल्यावर आमचे काम सुरु होते. आत्म्यांचे तारण करणे आमचे काम नाही, त्यांना शिष्य करणे हे आमचे कार्य आहे. आणि देवाकडे आलेले लोक पूर्णपणे त्याला समर्पित होईपर्यंत त्यांना शिष्यपणाचे शिक्षण देणे हे आम्हा शिष्यांचे काम आहे. संपूर्णपणे देवाच्या अधीन झालेले एक जीवन त्याच्या आत्म्याने जागृत झालेल्या शंभर जीवनांपेक्षा महत्त्वाचे आहे. देवाचे कार्यकर्ते या नात्याने आम्ही आध्यात्मिक दृष्टीने आमच्यासारखे दुसरे तयार केले पाहिजेत. देव त्याच्या कृपेच्या द्वारे आम्हांला उच्च करतो, आपणही दुसऱ्यांना तसेच केले पाहिजे.

सेवकाचे जीवन "ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त" असले पाहिजे (कलस्सै ३:३). तसे नसेल तर तो स्वतः दुसऱ्यांना आज्ञा करणारा होईल. आमच्यापैकी असे अनेकजण दुसऱ्यांना आज्ञा करणारे आहेत. येशू आम्हांला तशा प्रकारे कधीही आज्ञा करीत नाही. शिष्यपणाविषयी आमचा प्रभू नेहमी "जर तर" च्या भाषेत बोलतो. "कराच" असे म्हणत नाही. शिष्यपणामध्ये हा पर्याय असतो.

## “सदासर्वकाळ तयार”

**“सुवेळी अवेळी तयार राहा” (२ तीमथ्य ४:२).**

आमच्यापैकी अनेकांची विचित्र प्रवृत्ती असते. आम्ही फक्त “अवेळी” तयार असतो. येथे सुवेळी, अवेळी या शब्दांनी वेळेचा नव्हे तर आमचाच बोध होतो. हे वचन सांगते “वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा.” आपल्याला वाटो न वाटो आपण नेहमी तयार असावे. आम्हांला वाटेल तेव्हाच आम्ही काही करणार तर आमच्यापैकी काहीजण कधीच काही करणार नाहीत. काही लोकांना तर आध्यात्मिक क्षेत्रात काम देण्याचीच सोय नाही.  ते आत्मिक दृष्टीने मंद व अशक्त असून अलौकिक प्रेरणा मिळाल्याशिवाय काहीही करण्यास तयार नसतात. प्रेरणा असो वा नसो उत्तम प्रकारे सर्व करणे हेच देवाबरोबर आमचे योग्य नाते असल्याचे प्रमाण आहे.

ख्रिस्ती सेवक आपल्याला क्वचित मिळालेली प्रेरणा उराशी कवटाळून त्याच पाशात पडण्याचा धोका असतो. देवाचा आत्मा तुम्हांला प्रेरणा देऊन मर्म उकलून प्रकट करतो तेव्हा तुम्ही म्हणता, “आता मी हा अनन्य क्षण अनुभवला आहे. आता मी देवासाठी कायम असाच राहीन” नाही तुम्ही असे राहणार नाही हे देवच पाहील. प्रेरणेचा हा क्षण देवाची देणगी आहे. असे क्षण तुम्ही हवे तेव्हा स्वतःच स्वतःला देऊ शकणार नाही. प्रेरणेच्या या अनन्य क्षणी तुम्ही देवासाठी उत्कृष्ट काम केले तसे कायम करता येणार नाही असेच करीन असे तुमचे म्हणणे असेल तर तुम्ही देवाला विनाकारण असह्य ओझे व्हाल. देवाने तुम्हांला सतत आपल्या प्रेरणेची जाणीव दिली तरच तुम्हांला त्याच्यासाठी काही करता येईल. तुम्ही त्या प्रेरणेच्या उत्तम क्षणांना दैवत मानाल तर देव तुमच्या जीवनातून हळुहळू निघून जाईल हे लक्षात घ्या. त्याने तुमच्यावर सोपवलेले काम तुम्ही सचोटीने पूर्ण केले व प्रेरणेच्या त्या क्षणांचा नाद सोडलात तरच देव तुमच्या जीवनात परत येईल.

## पर्वत शिखरावर आरोहण

**“तुझा पुत्र... यास... घेऊन... जा...आणि मी तुला सांगेन त्या डोंगरावर त्याचे होमार्पण कर” (उत्पत्ती २२:२).**

एखादी व्यक्ती देवाच्या इच्छेचा अर्थ कसा लावते ते त्याच्या शीलस्वभावावर अवलंबून असते (पहा स्तोत्र १८:२५–२६). आपल्या पुत्राचा वध केला पाहिजे हाच देवाच्या आज्ञेचा अर्थ असल्याचे अब्राहामाने ठरवले. त्याचा हा विश्वास शुद्ध होण्यास त्याने काही काळ भयंकर मानसिक वेदना सोसल्या. आमच्या श्रद्धेनुसार देव सांगतो ते आम्ही करतो तर तो आम्हांला पारंपरिक श्रद्धा सोडण्यास लावील. अशा अनेक समजुती आहेत. उदाहरणार्थ, आईचे मुलावर जास्त प्रेम असल्यामुळे ते मूल देवाने नेले. हे सैतानाचे खोटे मत आहे आणि देवाच्या खऱ्या स्वभावाचे विडंबन आहे. आमच्या चुकीच्या पारंपरिक समजुती दूर करण्यासाठी डोंगरशिखरावर जाण्यास सैतान प्रतिबंध करु पाहील. पण आपण देवाशी विश्वासू राहिलो तर तो आम्हांला कठीण प्रसंगातून पार नेईल आणि त्याचे योग्य ज्ञान देईल.

अब्राहाम देवासाठी काहीही करण्यास तयार होता हेच त्याच्या देवावरील दृढ विश्वासातून शिकता येते. तो देवाची आज्ञा पाळणारा होता. आज्ञापालनाने आपल्या समजुतींना धक्का लागला तरी त्याला त्याची पर्वा नव्हती. अब्राहाम आपल्या समजुतींना कवटाळून बसला नाही. तसे नसते तर त्याने इसहाकाचा वध केला असता आणि देवदूताची वाणी सैतानाची आहे असे म्हटले असते. ही माथेफिरुची वृत्ती आहे. तुम्ही देवाशी एकनिष्ठ असाल तर तो तुम्हांला नक्की स्वतःचे ज्ञान देईल. पण तुम्ही आपल्या पारंपरिक समजुती सोडल्या पाहिजेत. माझी पारख कर असे देवाला सांगू नका. आपण काहीही करण्यास अगदी “तुरुंगात जाण्यास व मरण्यास तयार आहो” (लूक २२:३३) असे म्हणू नका. अब्राहाम असे काही म्हणाला नाही. तो देवाशी एकनिष्ठ राहिला. देवाने त्याचा विश्वास शुद्ध केला.

## तुम्हांला काय हवे?

**“तू आपणांसाठी मोठाल्या गोष्टींची वांच्छा करतोस काय?” (यिर्मया ४५:५).**

थोर व्यक्ती व्हावे हे सोडून मोठाल्या गोष्टींची आशा करता काय? देवाची दाने स्वीकारुन स्वस्थ राहत देवाशी जवळचे नाते जोडावे हीच त्याची इच्छा आहे. आपल्याला काही मोठे मिळाले तर ते तेवढ्यापुरतेच असते; येते आणि जाते. देव काय देतो त्याची आशा धरण्यापेक्षा त्याच्याशी योग्य नाते जोडणे याहून दुसरे काहीच सुलभ व सोपे नाही.

देवाकडे मागत राहण्यापर्यंत तुम्ही आला असाल तर समर्पण करणे म्हणजे काय ते तुम्हांला समजलेच नाही. तुम्ही स्वतःच्या मनाने ख्रिस्ती झाला आहा. तुम्ही म्हणता “मी देवाकडे पवित्र आत्मा मागितला पण माझ्या अपेक्षेप्रमाणे त्याने मला शांती दिली नाही.” आणि देव लगेच सांगतो, “तुम्ही स्वतःसाठी मागता, तुम्हांला दिले जाईल...” (मत्तय ७:७). तुम्हांला हवे ते देवाला मागा. चुकीच्या गोष्टी मागू नका. त्याच्या निकट गेला की माग तुम्ही वस्तू मागणार नाही. “... तुमच्या गरजा काय आहेत हे तुमचा पिता तुम्ही त्याच्यापाशी मागण्यापूर्वीच, जाणून आहे” (मत्तय ६:८).

स्वतःसाठी मोठ्या गोष्टी मागता काय? “हे प्रभू, तुझ्या पवित्र आत्म्याने मला परिपूर्ण कर” असे कधी म्हणाला आहा का? देवाने तसे केले नाही तर तुम्ही त्याला सर्वस्वी शरण गेला नाहीत. तुम्ही काही तरी राखून ठेवले आहे. देवाकडून हवे ते मागून घेण्यास व ते का हवे हे सांगण्यास तुम्ही तयार आहा? भावी काळात तुम्ही परिपूर्ण होणार हे लक्षात घेऊन देव तुमच्या आताच्या पूर्णतेकडे दुर्लक्ष करतो. तुम्हांला आताच धन्य व सुखी करावे असे देवाला वाटत नाही. अखेरीस तुम्ही परिपूर्ण व्हावे यासाठी तो कार्य करीत आहे. “... जसे आपण एक आहो तसे त्यांनीही एक व्हावे...” (योहान १७:२२).

## तुम्हांला हे मिळेल

**“जेथे जेथे तू जाशील तेथे तेथे तू जिवानिशी सुटशील” (यिर्मया ४५:२५).**

परमेश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यांना तो हे आपले रहस्य प्रकट करतो. “मी तुला तुझे जीवन देईन.” कोणालाही आपल्या जिवापेक्षा अधिक काय हवे असते? “तू जीवनानिशी सुटशील” तुम्ही कोठेही, अगदी अधोलोकात गेला तरी तुम्हांला तुमचे जीवन मिळेल. आमच्यापैकी अनेक जण मालमत्तेचे नव्हे तर मिळालेल्या आशीर्वादांचे प्रदर्शन करतात. पण आपण अभिमानाने दाखवतो ते सर्व नाहीसे होईल. पण त्याहून दुसरे काही अधिक मोठे आहे ते ख्रिस्तासह देवामध्ये गुप्त असलेले जीवन (कलस्सै ३:१) कधी जाणार नाही.

जीवनातील मोठ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करुन तुम्ही देवाला आपल्या स्वतःशी एक करु देण्यास तयार आहात? स्वतःचे संपूर्ण समर्पण करण्यास तयार आहात? “याचे काय? त्याचे काय?” असेल प्रश्न मनात येऊ न देणे हेच संपूर्ण समर्पणाचे प्रमाण आहे. आपल्या स्वतःच्या अटकळी आणि अंदाज एकीकडे ठेवा. “याचे काय?” असे मनात आणले तर तुम्ही पूर्णपणे समर्पण केलेले नाही आणि देवावर तुमचा पूर्ण विश्वास नाही हेच त्यातून दिसते. तुम्ही देवाला एकदा शरण गेला की देव काय करणार हा विचारही करणार नाही. परित्याग म्हणजे कधीही कसलेही प्रश्न न विचारणे. स्वतःला सर्वस्वी देवावर सोपवून दिलेत तर लगेच तो सांगेल, “तुझे जीवन तुला बक्षीस देत आहे...” लोक जीवनाला कंटाळतात कारण देवाने त्यांना काहीही दिलेले नसते त्यांना “देणगी” म्हणून त्यांचे जीवन मिळालेले नसते. त्यातून सुटण्यासाठी स्वतःला सर्वस्वी देवावर सोपवणे हाच एक मार्ग आहे. संपूर्णपणे देवाला शरण गेलात की मग पृथ्वीवर तुमच्यासारखे आनंदी तुम्हीच! तुम्ही सर्वस्वी देवाचे असाल. तो तुम्हांला तुमचे जीवन देईल. येथवर तुम्ही आला नसाल तर तुम्ही साधे सरळ असण्यास नकार दिला असेल आणि आज्ञा पाळली नसेल हेच त्याचे कारण आहे.

## हितकर अनिश्चितता

**"पुढे आपण काय होऊ हे अजून प्रगट झालेले नाही..." (१ योहान ३:२)**

पुढे काय होणार त्याचे अचूक भाकित करण्याकडे आमची स्वाभाविक प्रवृत्ती असते. अनिश्चितता अयोग्य आहे असे आपण म्हणतो. आम्ही पूर्व नियोजित ध्येय गाठले पाहिजे. पण आध्यात्मिक जीवन असे नाही. अनिश्चितता हीच निश्चितता हे आध्यात्मिक जीवनाचे लक्षण आहे. परिणामी आम्ही मुळावत नाही. आम्ही म्हणतो, "मी त्या परिस्थितीत असलो तर?" पूर्वी अज्ञात असलेल्या परिस्थितीत जाण्यास आम्ही तयार नसतो.

निश्चितता हा आमच्या व्यवहारी जीवनाचा स्थायीभाव आहे. हितकर अनिश्चितता आध्यात्मिक जीवनाचे लक्षण आहे देवाची खात्री असणे म्हणजे इतर बाबतीत संदिग्ध असणे. उद्या काय होईल याची शाश्वाती नसते. यामुळे आम्ही उसासे टाकतो पण असे नसावे. पुढे काय हे समजले नाही तरी देव आहे हे मात्र निश्चित असते. स्वतःला देवावर सोपवावे. त्याने दिलेले काम करावे. तो आम्हांला पदोपदी चकित करतो. आपण एखाद्या विशिष्ट विचाराचा पाठपुरावा केला की आमच्यातील काही मरते. हे देवावर नव्हे तर देवाविषयी विश्वास ठेवणे आहे. येशूने म्हटले, "तुम्ही बाळकासारखे झाले पाहिजे" (मत्तय १८:३). आध्यात्मिक जीवन बाळकाचे जीवन आहे. देवाविषयी आपण निश्चिंत असतो पण तो पुढे काय करणार तेच अनिश्चित असते. आमच्या श्रद्धेविषयी आम्हांला खातरी असेल तर आपण ढोंगी होतो, प्रत्येक बाबतीत दोष काढतो पण देवाबरोबर योग्य नाते असले की जीवन आनंदी अपेक्षांनी भरते. येशूने म्हटले, "... माझ्यावर विश्वास ठेवा" (योहान १४:१). "माझ्याविषयीच्या या गोष्टींवर विश्वास ठेवा," असे त्याने सांगितले नाही. सर्वकाही त्याच्यावर सोपवा, त्याच्याशी विश्वासू राहा.

## एप्रिल ३०

# “उत्स्फूर्त प्रीती”

**“प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे...” (१ करिंथ १३:४).**

प्रीती पूर्वनियोजित नव्हे तर उत्स्फूर्त असते. प्रीतीचा अविष्कार कसा कोठून होईल ते सांगता येत नाही. पौलाने प्रीतीचे वर्णन केले आहे त्यात नेमकी निश्चितता नाही. “आता मी वाईट विचार करणार नाही. येशू सांगेल त्या सर्वांवर विश्वास ठेवीन.” असे म्हटल्याने आमच्या विचारांना वळण लागत नाही. उत्स्फूर्तपणा हे प्रीतीचे लक्षण आहे. येशूची विधाने आम्ही स्वतःपुढे आदर्श म्हणून ठेवत नाही. त्याचा आत्मा आमच्या अंतरी असतो तेव्हा आपण नकळत त्याच्या आदर्शाप्रमाणे वागतो. मागे वळून पाहिल्यावर दिसते की आम्ही भावनांचा विचार केला नाही आणि तेच प्रीती तेथे असल्याचे लक्षण आहे. देवाच्या जीवनातील जो काही अंश आमच्यामध्ये असतो तो मागे वळून पाहिल्यावरच दिसतो.

प्रीतीचे निर्झर देवामध्ये आहेत आमच्यामध्ये नाहीत. आमच्याच स्वभावामुळे देवाची प्रीती आमच्यामध्ये आहे असे म्हणणे हास्यास्पद आहे. आमच्या अंतःकरणात “पवित्र आत्म्याच्याद्वारे देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे,” (रोम ५:५). म्हणूनच ती प्रीती आमच्यामध्ये आहे.

आमची देवावर किती प्रीती आहे ते त्याच्यासमोर सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. आमच्या प्रीतीची उत्स्फूर्तता हेच त्याच्यावरील आमच्या प्रीतीचे प्रमाण आहे आणि आमच्यामध्ये असलेल्या त्याच्या स्वभावातून या प्रीतीचा ओघ येतो. काही गोष्टी आम्ही का केल्या ते विचार करुनही आम्हांला सांगता येत नाही. पण आमच्यामधील त्याच्या प्रीतीच्या उत्स्फूर्तपणातून आम्ही त्या गोष्टी केल्या आहेत. या प्रकारे देवाचे जीवन प्रकट होते कारण त्याच्या जीवनाचे झरे पवित्र आत्म्यामध्ये आहेत.

मे १

## भावना नाही—विश्वास

**“आम्ही विश्वासाने चालतो, डोळ्यांनी दिसते त्याप्रमाणे चालत नाही” (२ करिंथ ५:७).**

देवाला आमची काळजी आहे याची काही काळ तरी आपल्याला जाणीव असते. पण पुढे देव आपल्या कार्यामध्ये आमचा उपयोग करुन घेतो तेव्हा आम्ही केविलवाणे होऊन आमच्या अडचणी आणि परीक्षा यांविषयी कुरकूर करतो. आम्ही पडद्याआड राहून काम करावे, प्रसिद्धी टाळावी हा देवाचा प्रयत्न असतो. पण आम्हांला वाटले, तरी आत्मिक दृष्टीने आम्ही दृष्टीआड राहू शकत नाही, देवाने आकाश बंद केले आहे असे वाटले तरी तेव्हाही आम्ही आमचे काम करु का? आमच्यापैकी काहींना नेहमी प्रकाशात राहणे आवडते. भोवती तेजोवलय असावे दुसऱ्यांनी आमची सेवा करावी असे वाटते; पण देवाला असल्यांचे काहीच मोल नाही अशी व्यक्ती व्यवहारात काही कामाची नाही. देवाला साजेशी नाही. आम्ही येथे पुरुष व स्त्रिया असे आहेत, अनुभवी दूत नव्हे. आम्हांला जगात काम करायचे आहे. त्यासाठी लागणारी शक्ती आम्हांला आहे कारण आम्ही वरुन जन्मलो आहो.

प्रेरणेचे ते पूर्वीचे क्षण पुन्हा अनुभवण्याचा आमचा प्रयत्न असेल तर आम्हांला देवाची गरज नाही हेच त्यातून दिसेल. देव आला, आमच्याशी बोलला त्या क्षणांच्या आठवणीतच आम्ही गुंतलो आहो आणि देवाने पुन्हा यावे आणि बोलावे यासाठी आम्ही आतुर आहो हेच त्यातून स्पष्ट होते. परंतु आम्ही “विश्वासाने चालावे” हीच देवाची इच्छा आहे. “देवाने दर्शन दिल्याशिवाय मी काहीही करु शकणार नाही” असे म्हणून किती जणांनी स्वतःला एकीकडे ठेवले आहे? पण देव हे कधीच करणार नाही. प्रेरणा असो वा नसो, देवाचा स्पर्श होवो न होवो आपण उठून पुढे गेले पाहिजे. मग अचानक जाणीव होते. चकित होऊन आम्ही म्हणतो, “अरे! देव तर माझ्याबरोबरच होता. मलाच ते समजलं नाही!” देव आपल्या इच्छेनुसार आम्हांला प्रेरणा देतो. प्रेरणेचे क्षण नव्हे तर आमचे काम हाच आमचा मापदंड आहे.

मे २

## दृष्टांतासाठी धीर धरा, वाट पाहा

**“... त्यास विलंब लागला तरी त्याची वाट पहा...” (हबक्कूक २:३).**

धीर म्हणजे उदासीनता नव्हे. सर्व प्रकारचे टक्केटोणपे सोशिकपणे धीर धरणारी व्यक्तीच धीर या शब्दांनी समोर येते. देवाचा दृष्टांत झाल्याने धीर मिळतो. त्यातूनच देवाची खरी प्रेरणा मिळते. मोशे आपल्या तत्त्वांना धरुन नव्हे तर त्याला देवाचा दृष्टांत झाला म्हणून त्याने धीर धरला. “... जो अदृश्य आहे त्याला पाहत असल्यासारखा त्याने धीर धरला” (इब्री ११:२७). देवाचा दृष्टांत झालेली व्यक्तीची निष्ठा एखाद्या तत्वावर किंवा कार्यावर नसते तर खुद्द देवावरच असते. दृष्टांताबरोबर प्रेरणा येते त्यामुळे दृष्टांत देवाकडून आला हे समजते. मग जीवनातील प्रत्येक गोष्ट सुकर होते कारण त्याला देवापासून शक्ती मिळालेली असते. तो काही काळ तुम्हांला आत्मिक दृष्टीने स्वतःकडून एखादे वचनही देणार नाही. त्याच्या पुत्राला अरण्यात मोहपरीक्षेच्या वेळी झाले तसे तुम्हांलाही होईल. देवाने हे केले की धीर धरा आणि धीर धरण्याची शक्ती मिळेल कारण तुम्ही देवाला पहाल.

“... त्याला विलंब लागला तरी त्याची वाट पाहा...” आपण पूर्वीपेक्षा अधिक जारीने कार्य करतो हेच आम्हांला दृष्टांत झाल्याचे प्रमाण आहे. आपण आत्मिक दृष्टीने कधी समाधानी असू नये. स्तोत्रकर्ता म्हणतो, “मी त्याचा कसा उतराई होऊ? मी तारणाच्या प्याला *हाती घेऊन* ...” (स्तोत्र ११६:१२–१३). आम्ही आपल्याशी म्हणतो, “झाले, आता मी पूर्णपणे पवित्र झालो. आता मी धीर धरीन.” पण हे म्हणणे चूक आहे. पौलाने म्हटले आहे, “एवढ्यातच मी मिळवले, किंवा एवढ्यातच मी पूर्ण झालो आहे असे नाही... मी त्याच्या मागे लागतो आहे” (फिलिप्पै ३:१२). देवाच्या दृष्टांताची प्रेरणा मिळाली असेल तर ते उत्तमच आहे. तरीपण आत्मिक ढिलाई करु नका, सावध राहा.

## मे ३

### अत्यावश्यक मध्यस्थी

**“सर्व प्रकारची प्रार्थना व विनवणी करा, सर्व प्रसंगी आत्म्याच्या प्रेरणेने प्रार्थना करा” (इफिस ६:१८).**

आम्ही दुसऱ्यांसाठी मध्यस्थी करतो तेव्हा मध्यस्थीच्या द्वारे देवाचे आज्ञापालन करण्याची जबर किंमत आम्ही मध्यस्थी करतो त्यांना मोजावी लागते. आमच्या प्रार्थनांना उत्तर म्हणून देव ज्यांना हळूहळू वरच्या पातळीवर आणतो तेव्हा आम्ही सहानुभूतीने त्यांच्यासाठी मध्यस्थी करु लागतो. आमचे देवावरचे लक्ष ढळते आणि आम्ही त्यांच्याविषयी भावनिक सहानुभूती दाखवतो तेव्हा देवाबरोबरचा संपर्क तुटतो. आम्हांला त्यांची वाटणारी काळजी आड येते. हे देवाला बोल लावणे आहे.

आपणाला देवाची संपूर्ण खातरी नसेल, आम्हांला महत्त्वपूर्ण मध्यस्थी करणे अशक्य होते याला कारण आमचे पूर्वग्रह, आमची वैयक्तिक सहानुभूती यामुळे देवाबरोबरच्या नात्यात बिघाड होतो. देवाबरोबर समरुप होण्यात व्यत्यय येतो. देवाबरोबरच्या मध्यस्थीच्या नात्यात पाप आड येणार नाही पण सहानुभूती येईल. सहानुभूती पोटी आपण म्हणतो, “मी ती गोष्ट होऊ देणार नाही” आणि लगेचच देवाबरोबरचा आपला महत्त्वाचा संपर्क तुटतो.

आवश्यक मध्यस्थी करीत राहिल्याने स्वतःसाठी प्रार्थना करण्यास तुम्हांला वेळ मिळत नाही स्वतःविषयीचे विचार बाजूस ठेवण्यासाठी श्रम करण्याचे कारण नाही कारण ते मुळातच मनात नसतात. तुम्ही संपूर्णपणे देवाशी समरुप झालेले असता. देव तुम्हांला दुसऱ्यांसाठी मध्यस्थी करण्यास संधी देतो, त्यांचे दोष काढण्यास नव्हे.

मे ४

## प्रातिनिधिक मध्यस्थी

**“... परमपवित्र स्थानांत येशूच्या रक्ताद्वारे प्रवेश करण्याचे आपल्याला धैर्य आले आहे” (इब्री १०:१९).**

मध्यस्थी म्हणजे देवासमोर आमची स्वतःची सहानुभूती व चिंता आणून त्याला आपली मागणी मान्य करायला सांगणे नव्हे. आमचा प्रभू आमच्याऐवजी पापाशी समरुप झाला त्यामुळेच आम्हांला देवाकडे जाता येते! परम पवित्रस्थानात *येशूच्या रक्ताद्वारे* प्रवेश करण्याचे धैर्य आम्हांला आले आहे.

आत्मिक हट्टीपणा मध्यस्थीच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. यात आपण स्वतःकडे व दुसऱ्यांकडे अनुकंपेने पाहतो व प्रायश्चित्ताची गरज नाहीच असे समजतो. आम्हा प्रत्येकामध्ये व दुसऱ्यांमध्ये काही चांगल्या गोष्टी आहेत व त्यांच्यासाठी ख्रिस्ताने वधस्तंभावर केलेल्या प्रायश्चित्त अर्पणाची गरज नाही असे समजतो. यामुळे आपण मध्यस्थी करु शकत नाही. दुसऱ्यांसाठी देवाला वाटणारी काळजी आणि आस्था यांच्याशी आम्ही समरुप होऊ शकत नाही. आम्ही स्वतःचे विचार घेऊन पुढे होतो. मग आमची मध्यस्थी आमच्याच सहानुभूतीचे गौरवीकरण होते. येशू पापाशी समरुप झाला हे लक्षात घेतल्याने आमचे विचार व अनुकंपा यांत आमूलाग्र बदल होतो. प्रातिनिधिक मध्यस्थी म्हणजे दुसऱ्यांविषयी आम्हांला वाटणारी आस्था बाजूस ठेवून देवाला त्यांच्याबद्दल वाटणारी काळजी व आस्था आणि अनुकंपा यांचा अंगिकार करणे होय.

मी हेकेखोर आहे की बदली बळी आहे? देवाबरोबरचे माझे नाते परिपूर्ण आहे का? मी आत्मिक आहे का चिडखोर? मी माझ्याच मार्गाने जाणार का देवाच्या मार्गाने?

मे ५

## न्याय आणि देवाची प्रीती

**“देवाच्या घरापासून न्यायनिवाड्यास आरंभ होण्याची वेळ आली आहे...” (१ पेत्र ४:१७).**

तारण हा माणसाचा नव्हे तर देवाचा विचार आहे हे ख्रिस्ती सेवकाने कधी विसरु नये आणि म्हणूनच ते अगाध आणि अथांग आहे. तारण हा अनुभव नसून देवाचा महान विचार आहे. अनुभव हे दार आहे त्यातून तारण आमच्या जीवनात येते. अनुभवाची नव्हे तर देवाच्या महान विचाराची घोषणा करा; नरकापासून लोकांचा बचाव कसा होईल, ते शुद्ध कसे होतील एवढेच नव्हे तर देवाची शुभवार्ता आम्ही संदेशातून सांगतो.

येशू ख्रिस्ताच्या शिक्षणात न्यायाचा उल्लेख असतोच. ते देवाच्या प्रीतीचे चिन्ह आहे. देवाकडे येणे कोणाला अवघड वाटले तर त्याला अनुकंपा दाखवू नका; दोष देवाचा नाही. अडचणीचे कारण आपण शोधू नये. आपण देवाचे सत्य सांगावे. चूक कोठे आहे ते देवाचा आत्मा दाखवील. आमच्या उपदेशाने प्रत्येकजण न्यायाकडे ओढला गेला पाहिजे. यावरुनच आमच्या उपदेशाची गुणवत्ता समजेल. सत्य सांगितले की देवाचा आत्मा प्रत्येकाला देवासमोर आणतो.

येशूने आम्हांला दिलेल्या आज्ञा पाळण्यास सज्ज केलेच आहे. आम्हांला काही करता येत नसेल तर त्याचा दोष देवाला देणे चूकच आहे. प्रत्येक प्रकारचे स्वावलंबन समूळ नष्ट केले पाहिजे. त्यासाठी देव आपल्याला शक्ती देईल. आम्ही सर्वस्वी अशक्त आहो. संपूर्णपणे त्याच्यावरच अवलंबून आहो हे जाणवले की त्याच क्षणाला देवाचा आत्मा आपले सामर्थ्य प्रकट करील.

## स्वतंत्रता आणि येशूचे मापदंड

**“ह्या स्वातंत्र्याकरिता ख्रिस्ताने आपल्याला मुक्त केले आहे म्हणून त्यात टिकून राहा...” (गलती ५:१).**

आत्मिक मनोवृत्तीचा मनुष्य “यावर आणि त्यावर विश्वास ठेवा” असे कधीच म्हणणार नाही. तुम्ही आपले जीवन येशूच्या मापदंडानुसार जगावे हेच तो सांगेल. पवित्र शास्त्रावर नव्हे तर ते प्रकट करणाऱ्यावर विश्वास ठेवा असे आपल्याला सांगितले आहे (पहा योहान ५:३९–४०). दुसऱ्यांच्या विवेकबुद्धीसाठी आपण स्वातंत्र्य सादर करावे, त्यांच्या मतांसाठी स्वातंत्र्य जाहीर करायचे नाही. ख्रिस्ताच्या स्वातंत्र्याने आम्ही मुक्त झालो आहो तर दुसऱ्यांनाही त्याच स्वातंत्र्यामध्ये आणले जाईल. संपूर्ण अधिकार येशू ख्रिस्ताला आहे हे समजल्याने स्वातंत्र्य मिळते.

आपल्या जीवनाचे मोजमाप येशूच्या मापदंडाने करा. फक्त त्याचेच जू मानेवर घ्या. येशू ख्रिस्ताचे नाही असे दुसरे कोणतेही जू दुसऱ्यांवर लादू नका. आमच्या मतानुसार लोक वागत नसले तर त्यांचे चूक आहे हा विचार आमच्या मनातून काढून टाकण्यास देवाला बराच काळ लागतो. आमच्या विवेकभावात कार्य करणारे येशूचे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे आम्ही नेहमी योग्य तेच करतो.

दुसऱ्यांविषयी अधीर होऊ नका. देव तुमच्याशी धीराने आणि सौम्यपणे वागला तसेच तुम्हीही दुसऱ्यांशी वागावे. परंतु देवाच्या वचनात कोणत्याही प्रकारे भेसळ करु नका. सत्याला त्याचे कार्य करु द्या. त्याचे समर्थन करण्याचे कारण नाही. “जाऊन शिष्य करा...” (मत्तय २८:१९) असे येशूने सांगितले आहे. “तुमच्या स्वतःच्या मतांकडे आणि विचारांकडे वळणारे असे करु नका!”

## सर्वकालासाठी बांधणे

**“तुमच्यामध्ये असा कोण आहे की त्याला बुरुज बांधावयाची इच्छा असता तो अगोदर बसून व खर्चाचा अंदाज करुन आपल्याजवळ तो पुरा करण्याइतकी ऐपत आहे का नाही हे पाहत नाही?” (लूक १४:२८).**

आमच्या प्रभूने आम्ही मोजावयाच्या किंमतीचा नव्हे तर त्याने अगोदरच मोजलेल्या किंमतीचा उल्लेख केला आहे. नासरेथमधील तीस वर्षे, लोकप्रियता, दूषणे व दोष यांची तीन वर्षे, गेथशेमेनीमधील प्रचंड यातना, काल्वरीवरील हल्ला, याच केंद्रबिंदूवर समय व सर्वकाल फिरतात. येशूने ही किंमत मोजली आहे. “या माणसाने बांधण्यास सुरुवात केली परंतु तो त्याला पुरा करता आला नाही” (पहा लूक १४:३०).

शिष्यपणाच्या अटी आमच्या प्रभूने २६, २७ व ३३ या वचनांतून दिल्या आहेत. त्याच्या बांधकामाच्या प्रकल्पता तो कारणी लावणार त्या स्त्री पुरुषांमध्ये त्याने सर्व कार्य केले आहे. “जर कोणी माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई, बायको, मुले, भाऊ व बहिणी ह्यांचा आणि आपल्या जिवाचाही द्वेष करणार नाही *त्याला माझा शिष्य होता येणार नाही* (१४:२६). आमच्या प्रभूवर सर्वतोपरी भक्तीने आणि निष्ठेने प्रेम करणाऱ्या स्त्रीपुरुषांचा उपयोग तो आपल्या कार्यात करुन घेणार आहे. अटी कठोर असल्या तरी त्या तेजोमय आहेत.

आमचे सर्व बांधकाम देव तपासणार आहे. तो आपल्या शोधक व शुद्ध करणाऱ्या अग्नीने तपासणी करील तेव्हा आम्ही स्वतःच्या पायावर बांधले आहे का येशूच्या तेही पाहील (पहा १ करिंथ ३:१०–१५). आम्ही देवासाठी कार्य करत आहो. हा प्रचंड कार्याचा समय आहे, येथेच पाश आहे सावध राहावे. खरे तर आम्ही देवासाठी कार्य करु शकत नाही. येशू मुख्य बांधणारा आहे. त्याच्या कार्यासाठी तोच आम्हांला हाताशी धरतो.

मे ८

## “चिकाटी धरण्यासाठी विश्वास”

**“धीराविषयीचे माझे वचन तू राखले आहे...” (प्रकटी ३:१०).**

चिकाटी धरणे हे अखेरपर्यंत टिकून राहण्यापेक्षा अधिक आहे. पवित्रजनाचे जीवन तिरंदाजाचे हाती धनुष्यबाण तसे देवाच्या हातात असते. देवाचे लक्ष्य कोठे आहे ते सेवकाला दिसत नाही. आमचा प्रभू दोरी ताणतो. सेवक म्हणतो, “आता पुरे झाले सोसवत नाही” देव लक्ष देत नाही. लक्ष्य टप्प्यात आले की तो बाण सोडतो. स्वतःला देवाच्या हाती सोपवा. तुम्हांला आताच जीवनात चिकाटी धरली पाहिजे काय? चिकाटीच्या विश्वासाने येशू ख्रिस्ताशी नाते जोडावे. ईयोबाप्रमाणे तुम्हीही म्हणा, “तो मला ठार मारणार; तरी मी त्याची आस धरीन” (ईयोब १३:१५).

विश्वास ही काही दुबळी, केविलवाणी भावना नाही. देव पवित्र प्रीती आहे यावर आधारलेला सक्षम व दृढ भरंवसा आहे. तुम्हांला तो आता दिसत नसला तरी तुम्ही त्याला ओळखता. देव पवित्र प्रीती आहे या सत्याचा आधार तुमच्याकडून डळमळीत झाला की संकट कोसळते देवावर सर्व भारंभार घालून त्याच्यावर सर्वस्वी भरंवसा ठेवणे हाच विश्वास आहे.

आमचे तारण करण्यासाठी देवाने येशू ख्रिस्तामध्ये आपले सर्वस्व पणाला लावले. आता आम्हीही आमचे सर्वस्व दृढ भरंवसा धरुन पणास लावावे ही त्याची इच्छा आहे. अद्याप आमच्या जीवनात देवाचे जीवन पोचले नाही अशा काही जागा आहेत. येशू ख्रिस्ताच्या जीवनात असे काही नव्हते आणि आमच्याही नसावे. येशूने प्रार्थना केली : “सार्वकालिक जीवन हेच आहे की,... तुला... त्यांनी ओळखावे” (योहान १७:३). अजिबात न कचरता कोणत्याही प्रसंगाला तोंड देणे हेच सार्वकालिक जीवन आहे. हे लक्षात घेतले तर जीवनात अद्‌भुतता असेल. सदोदित नव्या नवलाच्या गोष्टी दिसतील. या टप्प्यावर आम्हांला आणावे ही देवाची इच्छा आहे.

## मे ९

### आमच्या आवाक्याहून पुढे झेप घेणे

**“ईश्वरी दृष्टांत न झाल्यास लोक अनावर होतात...” (नीती २९:१८).**

एखादे तत्त्व उराशी बाळगणे आणि दृष्टांत पाहणे यात भेद आहे. दृष्टांत नैतिक प्रेरणेतून येतो; तत्त्वाचे तसे नाही. आदर्शवादी तत्त्वे सांभाळणारे लोक निष्क्रिय असतात. देवाविषयीची मते आधारासाठी घेऊन आपल्या कृतीचे समर्थन करता येते. योना अशा लोकांपैकी एक होता. तो देवाला म्हणाला, “... तू कृपाळू, कनवाळू, मंदक्रोध, दयासंपन्न, अरिष्ट आणल्याबद्दल अनुताप करुन घेणारा देव आहेस” (योना ४:२). देव आणि त्याचे गुण याविषयी योग्य ज्ञान आहे म्हणूनच मी माझे कर्तव्य करण्यास चुकतो! जेथे दृष्टांत आहे तेथे सचोटी आहे. दृष्टांताने नैतिक बल मिळते.

आमची आदर्शवादी तत्त्वे आम्हांला सर्वनाशाकडे नेतात. आपल्याकडे तत्त्वे आहेत का दृष्टांत ते नीट तपासावे.

मनुष्याची झेप त्याच्या आवाक्यापलीकडची असावी तर मग स्वर्ग कशासाठी आहे?

“ईश्वरी दृष्टांत न झाल्यास...” देव नजरेआड झाला की आम्ही बेबंद होतो. चुकीच्या गोष्टींवर घातलेली बंधने आम्ही झुगारुन देतो. प्रार्थना करणे थांबवतो. जीवनातील किरकोळ गोष्टीतले ईश्वरी दृष्टांत पहात नाही. स्वतःच्या मनाने कामे करु लागतो. देवाची अपेक्षा न ठेवता आम्ही आपल्याच मनाने काम करु लागलो की अधोगतीस लागलोच असे समजावे. आम्ही दृष्टांत गमावला आहे. आमची आजची प्रवृत्ती देवाच्या दृष्टांतापासून आहे काय? देव पूर्वीपेक्षा अधिक मोठी कृत्ये करील अशी आमची अपेक्षा आहे? आमच्या आत्मिक विचारदृष्टीमध्ये ताजेपणा व उत्साह आहे?

मे १०

## पुढाकार घ्या

### “... आपल्या विश्वासात सात्विकपणे... भर घाला” (२ पेत्र १:५).

*“भर घाला”* म्हणजे आपल्याला काही केले पाहिजे. देव करतो ते आम्ही करु शकणार नाही आणि आम्हांला येते ते देव करणार नाही; हे आपण कधी विसरु नये. आम्ही आपले तारण आणि पवित्रीकरण करु शकत नाही. ते देव करतो. पण चांगल्या सवयी, नीतीने चालणे, शीलस्वभाव हे काही देव देत नाही; ते आपणच केले पाहिजे. आपले ‘तारण’ आपणच साधून घेतले पाहिजे (फिलिप्पै २:१२). *भर घालणे* म्हणजे काम करण्याची सवय स्वतःला लावून घणे. आरंभी हे कठीण वाटेल. पुढाकार घेणे म्हणजे पुढे कोठे जायचे ते ठरवून पहिले पाऊल टाकणे.

रस्ता माहीत असला तरी तो पुन्हा विचारण्याची प्रवृत्ती टाळा. पुढे पाऊल टाका. हेळसांड करु नका. देव सांगतो ते विश्वासाने करण्यास पुढे चाला. एकदा केलेला निश्चय बदलू नका; पुन्हा विचार करु नका. अमुक करा असे देवाने सांगितले आणि तुम्ही टाळाटाळ  केलीत तर त्याच्या कृपेची अवहेलना केली असे होईल. स्वतःच पुढाकार घ्या, लगेच निश्चय करा, परतीच्या वाटा बंद करा. मागीला वाटा बुजवून टाका. ठरवले आहे ते सर्व लगेच करा.

देव सांगतो ते काळजीपूर्वक ऐकण्याची सवय ठेवली पाहिजे. तो सांगतो त्याप्रमाणे केले पाहिजे. पेचप्रसंग आला की आपण देवाकडे वळतो कारण आपण तशी सवय लावून घेतलेली असते. जेथे आहात तेथूनच पुढाकार घ्या आणि पुढे चला, जेथे अद्याप गेलोच नाही त्याचा विचार कशाला?

मे ११

## “एकमेकांवर प्रीती करा”

**“... बंधुप्रेमात प्रीतीची भर घाला” (२ पेत्र १:५,७).**

आपणांपैकी बहुतेकांना प्रेम, प्रीती म्हणजे काय तेच नीटसे समजत नाही. प्रीतीने एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीची अत्यंत आवड आहे हेच समजते. ही सर्वश्रेष्ठ पसंती येशूला असावी हे त्याचे सांगणे (पहा लूक १४:२६). “पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव”होतो तेव्हा येशूला प्रथम स्थान देणे सोपे होते (रोम ५:५). परंतु २ पेत्र मध्ये नमूद केलेल्या गोष्टी आमच्या जीवनात येण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

सर्व प्रथम देव आमच्या जीवनातून खोटेपणा, अभिमान, डामडौल हे काढून टाकतो मी प्रीतीस पात्र आहे म्हणून नव्हे तर प्रीती करणे देवाचा स्वभाव आहे म्हणून तो माझ्यावर प्रीती करतो. आता “... मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी अशी माझी आज्ञा आहे” (योहान १५:१२). ही आज्ञा त्याने आम्हांला दिली आहे “मी काही लोकांना तुमच्या संपर्कात आणीन. तुम्हांला ते आवडतील न आवडतील तरी त्यांच्यावर प्रीती करा.” ही येशूची प्रीती आहे.

“प्रभू... तुमचे धीराने सहन करतो, कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही...” (२ पेत्र ३:९). देवाने माझ्यावर अपार प्रीती केली आहे. नावडत्या व्यक्तीबरोबर राहण्याचा प्रसंग आला तर नाराज होऊ नये. आपण कसे होतो तरी देवाने आपल्यावर प्रीती केली. आता माझ्यामधून येशूची प्रीती व्यक्त व्हावी यासाठी मला त्याच्याशी समरुप झाले पाहिजे. प्रीती उत्स्फूर्त असली तरी ती शिस्तीने राखली पाहिजे.

**मे १२**

## कसलीही सवय नसण्याची सवय

**“कारण हे गुण तुम्हांमध्ये असून ते वाढते असले तर... तुम्ही निष्क्रिय व निष्फळ ठरणार नाही...” (२ पेत्र १:८).**

एखादी सवय आपल्याला लागते तेव्हा तिची पूर्ण जाणीव असते. सात्विकपणे वागतो असे जाणवते पण ती जाणीव काही काळच असते. आपली आध्यात्मिक वाढ झाली की ती जाणीव संपते. आपण प्रभूच्या जीवनाशी समरुप झालो की सात्विक सुभक्तीच्या सवयी त्यात विलीन होतात. आमचे आध्यात्मिक जीवन आम्हांला अंतर्मुख करते, आत्मपरीक्षण करण्यास लावते. आमच्या जीवनात अद्याप काही गुण यावयाचे असतात.

ठराविक वेळी प्रार्थना करणे, पवित्र शास्त्र वाचणे या तुमच्या ख्रिस्ती सवयीच तुमचे दैवत होऊ नयेत. “मी ते आता करणार नाही. आता माझी देवासह एकांती राहण्याची वेळ आहे.” तसे नाही तुम्ही तुमच्या सवयी बरोबर एकांतात राहता तुमच्यामध्ये एक उणीव आहे. आपल्या उणीवा शोध आणि त्या दूर करा.

प्रीती म्हटली की त्यात सवयी आड येऊ नयेत. तुमच्या सवयी प्रभूमध्ये विलीन असाव्या. आणि तुम्ही नकळत त्याप्रमाणे वागता. आपल्या पवित्रतेची सतत जाणीव असली तर तुम्हीच स्वतःवर मर्यादा घालता. प्रभू येशूच फक्त अलौकिक जीवन जगला. तो सदासर्वकाळ देवाच्या संपर्कात, त्याच्याबरोबर होता. तुमचे काय? काही बाबतीत तुम्ही देवाच्या संपर्कात नसता का? देवाला तुमच्यामध्ये कार्य करु द्या. त्याचे गुण तुमच्यामध्ये उतरु द्या. मग तुमचे जीवन लहान मुलाच्या जीवनासारखे साधे व सोपे होईल.

## विवेकभाव शुद्ध राखण्याची सवय

**“देवासंबंधाने व माणसांसंबंधाने माझे मन सतत शुद्ध राखण्याचा मी यत्न करीत असतो...” (प्रे. कृ. २४:१६).**

आमच्यामध्ये देवाच्या पुत्राचे जीवन आहे. या जीवनाला देव आपल्या आज्ञा देतो. परिणामी त्या आज्ञा आमच्या मनुष्य स्वभावाला असतात. त्यामध्येच देवाचा पुत्र साकार झालेला असतो (पहा गलती ४:१९). त्याच्या आज्ञा कठीण असतात परंतु त्या पाळण्यास आरंभ केला की सोप्या होतात.

विवेकभाव अंतरंगात असतो. तो मला नित्य उच्च मापदंडांचे स्मरण देतो. हा आत्म्याचा डोळा आहे तो एकीकडे देवाकडे पाहतो आणि आमच्याकडेही पाहतो. प्रत्येक व्यक्तीला विवेकाचे स्वरुप भिन्न असते. मी नित्य देवाचे मापदंड समोर ठेवले तर विवेकभाव नेहमी देवाच्या परिपूर्ण नियमाच्या आधारे मला योग्य तेच करायला लावील. विवेकभाव शुद्ध राखला तर मी कोणालाही दुखावणार नाही. देवाच्या पुत्राबरोबर मी एकामेळाने राहीन. माझे मन जीवनाच्या प्रत्येक प्रसंगात नवे होईल आणि मला “देवाची उत्तम ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे” हे समजेल (रोम १२:२, तसेच पहा इफिस ४:२३).

देव आम्हांला प्रत्येक बाबतीत मार्गदर्शन देतो. आत्म्याची मंद वाणी ऐकण्यास मी संवेदनशील आहे का? “पवित्र आत्म्याला खिन्न करु नका...” (इफिस ४:३०). तो काही गर्जना करत नाही. त्याची वाणी मंद मधुर आहे. त्याकडे आमचे लक्ष असावे. यासाठी आपण अंतरंगात देवाचे ऐकण्यास सज्ज असावे. त्याच्या आज्ञेविषयी शंका नाही. विवेकभावाने सांगितले त्याविषयी वाद करु नये. आंतरिक दृष्टी साफ ठेवावी.

## संकटातही आनंदी राहण्याची सवय

### "... येशूचे जीवनही आमच्या शरीरात प्रगट व्हावे" ( २ करिंथ ४:१०).

देवाच्या कृपेने आमच्यामध्ये केलेले कार्य दाखवण्यासाठी आम्ही सात्विक सवयी लावून घ्याव्या. येशूचे जीवन आमच्या शरीरात प्रकट व्हावे हाच आमच्या तारणाचा उद्देश आहे. संकटात त्याचे जीवन आमच्या देहात प्रकट होते. देवाच्या पुत्राचे माधुर्य माझ्या जीवनातून प्रकट होते का माझी "स्वतःची चिडचिड." देवाच्या पुत्राचे जीवन माझ्यामधून प्रकट होत असेल तरच संकटातही मला आनंद वाटेल, "हे प्रभू  तुझी ही आज्ञा मी आनंदाने पाळीन" असे आपण म्हटले की देवाचा पुत्र माझ्यामध्ये साकार होईल आणि ते त्याच्या गौरवास कारण होईल.

तुम्ही वाद करु नये. देवाच्या प्रकाशात चाला. संकटातही त्याच्या पुत्राचा प्रकाश तुमच्यामधून चमकत राहील. देवाशी वाद केला तर त्याचा आत्मा खिन्न होईल (पहा इफिस ४:३०). देवाच्या पुत्राचे जीवन तुमच्यामध्ये प्रकट व्हावे यासाठी तुम्ही स्वतःला योग्य स्थितीत ठेवावे. स्वतःच स्वतःची कीव कधी करु नका. देव आमच्या परिस्थितीतूनच त्याचा पुत्र किती असामान्य व सर्वथा विशुद्ध आहे ते दाखवतो. देवाच्या पुत्राला प्रकट करण्यचा नवा मार्ग पाहून आमचा ऊर उत्साहाने भरुन जातो. संकटांची निवड करण्याऐवजी देव सार्वभौम रीतीने आमची परिस्थिती त्याच्या मनाजोगती करतो त्या द्वारे संकटात जाणे केव्हाही श्रेयस्कर. देवाने संकटात नेले तर तो "तुमच्या सर्व गरजा पुरवण्यास समर्थ आहे" (फिलिप्पै ४:१९).

देवाच्या पुत्राचे जीवन प्रकट करण्यासाठी तुमचा आत्मा सुस्थितीत ठेवा. मागील अनुभवांच्या आठवणीवर जगू नका, देवाचे वचन स्वतःमध्ये कार्यकारी ठेवा.

## मे १५

### प्रसंगास पुरे पडण्याची सवय

**“...त्याच्या पाचारणामुळे निर्माण होणारी आशा कोणती... ओळखून घ्यावे” (इफिस १:१८-१९).**

येशूचे जीवन तुमच्या देहामधून प्रकट होण्यासाठी तुमचे तारण झाले आहे (पहा २ करिंथ ४:१०). देवाचे मूल म्हणून तुमची झालेली निवड कारणी लागावी यासाठी प्रत्येक प्रसंगी उठून उभे राहा.

तुमचे तारण व्हावे यासाठी तुम्ही काही केले नसेल तरी ते दाखवण्यासाठी काही केलेच पाहिजे. देवाने तुमच्यामध्ये आकारास आणलेले तारण तुम्ही स्वतः साधून घ्यावे (फिलिप्पै ४:१९). तुम्ही ते साधून घेत आहा याचे प्रमाण तुमचे बोलणे, विचार, भावना इत्यादीमधून पटले पाहिजे. पूर्वीसारखे तुम्ही कष्टी, दुःखी, आपलाच हेका चालवणारे असाल तर देवाने तारण व पवित्र केले हे म्हणणे व्यर्थ आहे.

देव कुशल रचनाकार आहे. तुम्ही सामना करावा म्हणून तो संकटे येऊ देतो. तुम्ही ती उल्लंघावी. “माझ्या देवाच्या साहाय्याने मी तट उडून जातो” (स्तोत्र १८:२९). देवाचा पुत्र अगर कन्या होण्यासाठी आवश्यक गोष्टीपासून देव तुम्हांला राखून ठेवणार नाही. १ पेत्र ४:१२ पहा, “प्रियजनहो, तुमची पारख होण्यासाठी जी अग्निपरीक्षा तुम्हांवर आली आहे तिच्यामुळे... काही अपूर्व झाले असे... मानू नका.” आल्या प्रसंगाला तोंड द्या. दुःखाची चिंता नको. तुमच्या देहात येशूचे जीवन प्रकट करण्याची देवाला संधी मिळाली म्हणून आनंद करा.

आम्ही कधी कुरकूर करु नये. येशूचे जीवन आमच्यामध्ये प्रकट झाले की आम्ही देवाकडे काही मागणार नाही. त्याच्या इच्छेनुसार त्याला आमच्यामधून कार्य करु द्यावे. तो आम्हांला मोडलेली भाकरी व ओतलेला द्राक्षारस असे करील.

मे १६

## देवाची तरतूद ओळखण्याची सवय

**“तुम्ही ... ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी व्हावे” (२ पेत्र १:४).**

आम्हांला “ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी केले आहे.” तो दिव्य स्वभाव आमच्या मानवी स्वभावात समावून घेण्यासाठी आम्ही सात्विक सवयी लावून घ्याव्या. देवाने आम्हासाठी केलेली तरतूद ओळखून घ्यावी. सर्वसमर्थ देवाचे आहे ते सर्व आमचेच आहे. मग हे मला जमणार नाही, ते परवडणार नाही हे म्हणणे चूक आहे. आजचा दिवस गेला उद्या काय होईल? हा विचारही चूकच आहे. आम्ही त्याचे आज्ञापालन केले तर तो आम्हांला निश्चित आशीर्वाद देईल. आमची परिस्थिती कठीण आहे हे म्हणणेही निरर्थक आहे. स्वतःची कीव करुन क्लेशांत आनंद मानायचा असेल तर आम्हीच देवाची संपत्ती जीवनातून दूर लोटतो आणि दुसऱ्यांच्या आड येतो. आत्मदयेच्या पापासारखे दुसरे पाप नाही. यात आम्ही आमच्या जीवनातून देवाला वगळतो आणि आमचा स्वार्थ कवटाळतो. आम्ही तोंड उघडतो ते कुरकूर करायला. आमचा स्वभाव नेहमी घ्यायचे, द्यायचे कधीच नाही; समाधानीही राहायचे नाही असाच होतो. आमची जीवने नीरस व शुष्क होतात.

देवाला आमच्याविषयी समाधान वाटायचे तर तो आमच्या तथाकथित संपत्तीतून काडीकाडी वेचून घेईल. सर्वकाही त्याच्यापासून आहे हे मगच आम्हांला उमगेल. स्तोत्रकर्ता म्हणतो, “माझे सर्व उगम तुझ्याच ठायी आहेत” (स्तोत्र ८७:७). देवाचे वैभव, कृपा व शक्ती आमच्यामधून प्रकट होत नसेल तर त्यासाठी देव आम्हांलाच जबाबदार धरील. सर्व प्रकारची कृपा तुम्हांवर विपुल होऊ देण्यास देव समर्थ आहे. “ह्यासाठी की... तुमच्याजवळ विपुल व्हावे” (२ करिंथ ९:८). देवाची कृपा दुसऱ्यांना द्या, स्वतःला उदारपणे द्या. देवाच्या स्वभावाशी समरुप व्हा; त्याचे आशीर्वाद तुमच्यामधून सदोदित प्रवाहित होतील.

मे १७

## त्याचे स्वर्गारोहण आणि आम्हांला मोकळीक

**“मग असे झाले की तो त्यांना आशीर्वाद देत असताना त्यांच्यापासून वेगळा झाला आणि वर स्वर्गात गेला”** (लूक २४:५१).

रुपांतरानंतर आमच्या प्रभूच्या जीवनात घडलेल्या घटनांशी जुळणारे असे आमचे अनुभव नाहीत. त्या क्षणानंतर त्याचे संपूर्ण जीवन बदली, प्रतिनिधिक झाले. रुपांतराच्या क्षणापर्यंतचे त्याचे जीवन सामान्य, परिपूर्ण मनुष्यजीवन होते. परंतु रुपांतरानंतर गेथशेमेनी, वधस्तंभ, पुनरुत्थान हे सर्व आम्हांला अनोळखी आहे. त्याचा वधस्तंभ या दाराने प्रत्येक मनुष्य देवाच्या जीवनामध्ये प्रवेश करु शकतो. त्याच्या पुनरुत्थानाने कोणालाही सर्वकालचे जीवन देण्याचा अधिकार त्याला आहे. आमच्या प्रभूने स्वर्गारोहण केले आणि तेथे प्रवेश करण्याचे दार उघडून ठेवले.

आरोहणाच्या डोंगरावर रुपांतर पूर्ण झाले. येशू रुपांतराच्या डोंगरावरुनच स्वर्गात गेला असता तर तो एकटाच गेला असता. तो आमच्यासाठी केवळ दिव्य व्यक्ती झाला असता. पण त्याने गौरवाकडे पाठ फिरवली. पतित मानवजातीशी समरुप होण्यासाठी तो डोंगरावरुन खाली आला.

स्वर्गारोहाण रुपांतराची परिपूर्ती आहे. आमचा प्रभू आपल्या गौरवात परतला पण केवळ देवाचा पुत्र म्हणून नव्हे तर *मनुष्याचा पुत्र* म्हणून तो पित्याकडे गेला. मनुष्याचा पुत्र स्वर्गात गेल्याने आता देवाच्या राजासनाकडे थेट जाण्याची मोकळीक प्रत्येकला मिळाली आहे. मनुष्याचा पुत्र म्हणून येशू ख्रिस्ताने आपले सर्व ज्ञान, सर्व सामर्थ्य व सर्व व्यापकता यांवर मर्यादा घातली. पण आता ते पुन्हा सर्वस्वी त्याचे आहे. मनुष्याचा पुत्र म्हणून येशू ख्रिस्ताला आता देवाच्या राजासनावर सर्व अधिकार आहे. तो आता राजांचा राजा व प्रभूंचा प्रभू आहे.

मे १८

## सरळ, साधे पण एकाग्र जीवन जगणे

**“आकाशांतील पाखरांकडे निरखून पाहा...रानातील फुले पाहा...” (मत्तय ६:२६, २८).**

“रानांतील फुले पाहा; ती कशी वाढतात? ती कष्ट करीत नाहीत व सूत कातीत नाहीत” ती नुसती असतात! सागर, हवा, सूर्य, तारे आणि चंद्र पहा. ती सर्व असतात. ती सर्व आमची सेवा करतात! उपयोगी पडावे म्हणून आम्ही जाणीवपूर्वक प्रयत्न करतो आणि देव आमच्या द्वारे दाखवू पाहतो त्या प्रभावाच्या आड येतो. देवावर लक्ष एकाग्र करणे हाच आत्मिक दृष्टीने वाढण्याचा एकच उपाय आहे असे येशूने म्हटले. थोडक्यात येशू सांगत होता “दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची चिंता करु नका. सरळ माझ्यावर विश्वास ठेवा.” उगमाकडे लक्ष ठेवा मग तुमच्यामधून “जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील” (योहान ७:३८). विचार आणि बुद्धिवाद यांच्याद्वारे आम्हांला आमच्या स्वाभाविक जीवनाचा उगम शोधता येणार नाही. आमच्या स्वर्गातील पित्यावर चित्त एकाग्र केल्याने आमच्या आत्मिक जीवनाची वाढ होते हेच येशूने येथे शिकवले आहे. आमच्या स्वर्गीय पित्याला आमची परिस्थिती माहीत आहे, त्याच्यावर लक्ष लावले तर “रानांतील फुलांप्रमाणे” आमची आत्मिक वाढ होईल.

आम्हांला सतत उपदेशाचे डोस पाजणारे लोक आम्हांला प्रभावित करत नाहीत तर जे आकाशातील तारे आणि “रानातील फुले” यांच्याप्रमाणे सरळ, साधे सात्विकपणे जीवन जगणारे लोकच आम्हांला प्रभावित करतात, आकार देतात.

देवाला तुमचा उपयोग व्हावा असे वाटते तर येशू ख्रिस्तावर लक्ष एकाग्र करा, त्याच्याशी योग्य नाते जोडा. तो हर क्षणाला तुमचा उपयोग करुन घेईल पण तुम्हांला ते जाणीवेच्या पातळीवर उमगणारही नाही.

## मे १९

### “विनाशातून मी उदयास येतो”

**“ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील?” (रोम ८ः३५).**

देव आपल्या मुलांना संकटापासून दूर ठेवत नाही. “संकटसमयी मी त्याच्याजवळ राहीन...” (स्तोत्र ९१ः१५). हे देवाचे अभिवचन आहे. संकटे लहान असोत मोठी असोत. देवाशी असलेल्या नात्यापासून काहीही आम्हांला अलग करु शकणार नाही. “...ह्या सर्व गोष्टींत आपण महाविजयी ठरतो...” (रोम ८ः३७). पौलाने येथे काल्पनिक गोष्टींचा नव्हे तर खऱ्या धोकादयक गोष्टींचा उल्लेख केला आहे. या सर्व बाबतीत आपण “महाविजयी” ठरतो. याला आमचे चातुर्य वा धैर्य नव्हे तर ख्रिस्तामध्ये आमचे देवाबरोबरचे नातेच कारण आहे. आपल्या जीवनाच्या परिस्थितीमध्ये ‘अमुक नसावे’ असे म्हणणऱ्या ख्रिस्ती व्यक्तीबद्दल मला खंत वाटते.

“क्लेश...?” ही काही स्वागताची बाब नाही. क्लेशामुळे आम्ही रिक्त होतो पण तेही “ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आम्हांला विभक्त करु शकत नाहीत” क्लेश अगर “संसाराची चिंता” या कशालाही देव तुमच्यावर प्रीती करतो या सत्यापासून विचलित होऊ देऊ नका (मत्तय १३ः२२).

“आपत्ती...?” आमच्या भोवतीची प्रत्येक गोष्ट, प्रत्येक व्यक्ती त्याची प्रीती खोटी आहे असे म्हणतानाही तुम्ही अढळ राहा. उपासमार होत असतानाही आपणाला देवाच्या प्रीतीवर विश्वास ठेवून “महाविजयी” होता येईल?

येशू ख्रिस्त एकतर लबाड आहे, त्याने पौलालाही फसवले अगर सर्वकाही विपरीत असतानाही देवाची प्रीती दृढ धरतो त्याच्या बाबतीत काही असामान्य घडते. त्याच्यावर चालून येणाऱ्या गोष्टी निष्फळ होतात आणि येथे तर्क खुंटतो! याला एकच कारण आहे ते आहे *“ख्रिस्त येशूमध्ये देवाची प्रीती.”* प्रत्येक वेळी मी “विनाशातून उदयास येतो.”

## आपले जीव वाचवणे

**“तुम्ही आपल्या धीराने आपले जीव मिळवाल” (लूक २१:१९).**

एखाद्या व्यक्तीचा नवा जन्म झाला की काही काळ त्याच्या विचारशक्तीमध्ये अगर बुद्धीमध्ये पूर्वीसारखा जोम उरत नाही. आमच्यातील हे नवे जीवन व्यक्त करण्यास आम्हांला शिकले पाहिजे आणि ते ख्रिस्तासारखी चित्तवृत्ती मनात साकार केल्यानेच होते (पहा फिलिप्पै २:५). धीराने आम्ही आमचे जीव दृढ धरतो, मिळवतो हाच लूक २१:१९ च्या अर्थ आहे. परंतु आमच्यापैकी अनेक जण ख्रिस्ती जीवनाच्या प्रवेशद्वारापाशीच थबकतात. देवाने आमच्यामध्ये ठेवलेले नवे जीवन घेऊन त्यानुसार जीवन धारण करण्यास आम्ही चुकतो. देवाने आम्हांला कोणत्या प्रकारे घडले आहे तेच आम्हांला समजत नाही म्हणून आम्ही अपयशी होतो. आमच्या बेशिस्त स्वभावाने आमची हानी होते आणि आम्ही त्याचा दोष सैतानाला देतो. सत्य समजले की आपण कसे होऊ त्याचा जरा विचार करा.

जीवनातील काही गोष्टींविषयी आपणाला प्रार्थना करण्याची गरज नाही. उदाहरणार्थ, मनाची अस्वस्थता, उदासीनता प्रार्थनेने दूर करता येत नाही. तर ती झटकूनच टाकली पाहिजे. मनाची अस्वस्थता शरीराच्या स्थितीवर अवलंबून असते. त्याचा आमच्या अंतरंगाशी संबंध नसतो. मनाच्या विचित्र अवस्था सतत बदलतात. पण आपण त्यांना वश होऊ नये. आपण स्वतःला असल्या लहरीपणाच्या आहारी जाऊ देऊ नये. आमच्या निष्क्रियतेमुळे आमचे नुकसान होते. ख्रिस्ती जीवन आत्मिक धैर्याचे आणि निश्चयाचे जीवन असून ते आमच्या देहातून जगायचे आहे.

## मे २१

### देवावर “अवास्तव” विश्वास ठेवणे

**“तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील” (मत्तय ६:३३).**

येशूचे हे शब्द अतिशय क्रांतीकारी आहेत “देवाचे राज्य प्रथम मिळवा...” संपूर्ण आत्मिक वृत्तीचा माणूसही याच्या उलटच बोलेल. “कसं शक्य आहे? मला जगायचे आहे. चार पैसे मिळवायचेत. कपडे हवेत, अन्नपाणी हवे.” देवाच्या राज्याची चिंता आम्हांला नाही, आमचा चरितार्थ चालवण्यासाठी चिंता आहे पण येशूने हा क्रम उलट केला. देवाशी योग्य नाते प्रथम जोडा. तेच तुमच्या जीवनामध्ये उद्दिष्ट असावे, जीवनातील दुसऱ्या गोष्टी महत्त्वाच्या समजू नये.

“आपल्या जीवाविषयी... चिंता करीत बसू नका...” (६:२५). आपण कसे जगावे त्याची चिंता करीत बसणे रास्त नाहीच. अशी चिंता करणाऱ्याला येशूने धन्य म्हटलेले नाही. वस्तुतः तो मूर्खच आहे. आपल्या शिष्याने देवाबरोबरच्या नात्याला विशेष महत्त्व द्यावे हेच येशूला महत्त्वाचे आहे. “खाणे पिणे यांनाच तुमच्या जीवनात महत्त्व नसावे. देवावर लक्ष केंद्रित करणेच सर्वात महत्त्वाचे आहे. काही लोक खाणे पिणे, कपडेलत्ते वगैरे प्रापंचिक बाबतीत बेफिकीर असतात. देव त्यांनाही जबाबदार धरतो. देवाबरोबरच्या आमच्या नात्याला प्रथम स्थान दिले पाहिजे. इतर सर्व गोष्टी दुय्यम आहेत.

येशूने या वचनांमधून दिलेले शिक्षण आमच्या मनात ठसावे, आम्ही त्या प्रमाणे चालावे यासाठी पवित्र आत्म्याला आमच्यामध्ये कार्य करु देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कठीण आणि अवघड वाटले तरी हे केलेच पाहिजे.

## आमच्या अडचणींचा उलगडा

**“... त्या सर्वांनी एक व्हावे; हे माझ्या बापा, जसा तू माझ्यामध्ये व मी तुझ्यामध्ये तसे त्यांनीही तुझ्यामाझ्यामध्ये एक व्हावे...” (योहान १७:२१).**

आपण सर्वथा एकटे, एकाकी आहो असा प्रसंग आला तर योहान १७ वाचा. त्यामुळे तुमची अशी स्थिती का आहे ते समजेल. येशू व देवपिता एक आहे तसे तुम्हीही पित्याबरोबर एक व्हावे अशी त्याने प्रार्थना केली आहे. या प्रार्थनेला उत्तर देता यावे यासाठी तुम्ही देवाला साहाय्य करत आहा काय? किंवा तुमचे स्वतःचे काही वेगळे उद्दिष्ट आहे? आता तुम्ही शिष्य झाला आहा तर पूर्वीसारखे स्वतंत्र राहता येणार नाही.

योहान १७ मधून देवाने प्रकट केले आहे की आमच्या प्रार्थनांची उत्तरे देणे एवढेच त्याचे उद्दिष्ट नाही तर प्रार्थनेच्याद्वारे आम्ही त्याचे मन ओळखून घ्यावे हेच आहे. पण “... आपण एक आहो तसे त्यांनीही एक व्हावे...” (१७:२२) या प्रार्थनेला देवाने उत्तर दिलेच पाहिजे. आम्ही येशूच्या एवढे निकट आहो का?

आमच्या योजनांशी देवाला काही देणे घेणे नाही. तो स्वतःचे उद्देश साधण्यासाठी आमच्या जीवनात सुख वा दुःख येऊ देतो. आमच्या जीवनात घडणाऱ्या गोष्टींमुळे आम्ही सर्वस्वी देवावर विसंबून राहतो अगर कुरकूर करतो आपलाच हेका चालवतो. आमच्या जीवनासाठी प्रार्थना करताना “तुझ्या इच्छेप्रमाणे होवो” (मत्तय २६:४२) असे आपण म्हटले तर योहान १७ मुळे आम्हांला धीर येईल, समाधान वाटेल. देव योग्य ते करत आहे याची खात्री होईल. देवाचा उद्देश समजला की आम्ही हलक्या मनाचे, दोष काढणारे होणार नाही. येशू आणि देवपिता एक आहेत तसे आम्ही त्याच्याशी एक व्हावे हीच येशूची प्रार्थना आहे.

मे २३

## जाणून बुजून अविश्वास

**"... आपल्या जीवाविषयी म्हणजे काय खावे व काय प्यावे; आणि आपल्या शरीराविषयी म्हणजे आपण काय पांघरावे..." (मत्तय ६:२५).**

शिष्याच्या अंगी असलेल्या साधारण चिंतेला येशूने *अविश्वास* म्हटले आहे. आपण देवाच्या आत्म्याचा स्वीकार केला आहे तर तो आमच्या जीवनात येऊन पावलोपावली विचारील "या नात्यात माझे काय स्थान आहे? तुम्ही सुट्टीला जायचा बेत केला आहे, नवी पुस्तके वाचणार आहा त्यात माझे काय?" त्याचा विचार सगळ्यात अगोदर करीपर्यंत तो आम्हांला असेच विचारणार. आम्ही इतर गोष्टींना महत्त्व दिले की नेहमी गोंधळच होणार.

"... आपल्या जीवाविषयी चिंता करु नका..." दुपारची तरतूद करण्याचे ओझे स्वतःवर घेऊ नका. चिंता करणे चुकीचे आहे. तो तर अविश्वास आहे. चिंता करीत बसणे म्हणजे आमच्या जीवनातील नित्याच्या बाबींकडे देव लक्ष देईल यावर अविश्वास दाखवणे. दैनंदिन जीवनातील तपशीलच आमच्या चिंतेस कारण होतात. येशूने आमच्यामध्ये पेरलेले वचन कशामुळे दबून, गुदमरेल म्हणून सांगितले आहे? सैतानामुळे काय? नाही "या संसाराच्या चिंता" हेच त्याचे कारण आहे (मत्तय १३:२२). आमच्या लहानसहान गोष्टीच चिंतेस कारण होतात. आपण म्हणतो, "मला दिसत नाही त्यावर मी विश्वास ठेवणार नाही." अविश्वासाचा आरंभ येथूनच होतो. आत्म्याचे आज्ञापालन हाच अविश्वासावर उपाय आहे.

चिंता सोडा हेच येशूने आपल्या शिष्यांना सांगितलेले थोर वचन आहे.

**मे २४**

## निराशेचा आनंद

**“मी त्याला पाहिले तेव्हा मी मेल्यासारखा त्याच्या पायांजवळ पडलो” (प्रकटी १:१७).**

प्रेषित योहानाप्रमाणे तुम्हीही येशू ख्रिस्ताला जवळून ओळखत असाल. पण तो अनोळख्यासारखा अचानक दर्शन देतो तेव्हा “त्याच्या पायांजवळ मेल्यासारखे पडणे” एवढेच आपण करु शकतो. कधी देवाला आपल्या वैभवानेच प्रकट व्हावे लागते. त्या भयावह दर्शनाने निराशेतही आनंद होतो आणि यातून देवच उठवू शकेल या जाणीवेने आनंद होतो.

“त्याने आपला उजवा हात माझ्यावर ठेवला..” (१:१७). या भयावह स्थितीत स्पर्श जाणवतो तो येशू ख्रिस्ताच्या उजव्या हाताचा आहे हे तुम्हांला उमगते. हा नियंत्रणाचा अगर शिक्षेचा स्पर्श नाही सनातन पित्याचा उजवा हात आहे हे लक्षात येते. या स्पर्शाने शांती व समाधान लाभते. “त्याच्या सनातन बाहूंचा तुला आधार आहे” (अनु ३३:२७). त्याचा स्पर्श झाला की तुम्हांला पुन्हा कशाचेही भय वाटणार नाही. त्याच्या आरोहणाने प्राप्त झालेल्या गौरवी वैभवात प्रभू येशू एका सामान्य शिष्याशी बोलण्यासाठी येऊन म्हणतो, “भिऊ नको” (प्रकटी १:१७). त्याची मृदू वाणी वर्णनातीत मधुर आहे. मी त्याला या प्रकारे ओळखतो काय?

निराशेस कारण होणाऱ्या काही गोष्टी पाहा आनंद, आशा वगैरे नसलेली निराशा आहे, तिला मर्यादा नाहीच आणि कसलीही आशा नाही. “माझ्या ठायी म्हणजे माझ्या देहस्वभावात काही चांगले वसत नाही” (रोम ७:१८). हे लक्षात आले की निराशेत आनंद होतो. आता मी देवासमोर पालथे पडले पाहिजे आणि मला फक्त देवच उठवू शकेल हे जाणवले की आनंद होतो. मानवी मर्यादा समजतात मग देव अशक्य ते शक्य करतो.

## चांगले का उत्तम?

**“तू डावीकडे गेलास तर मी उजवीकडे जाईन; तू उजवीकडे गेलास तर मी डावीकडे जाईन” (उत्पत्ती १३:९).**

देवावरील विश्वासाचे जीवन जगण्याचा आरंभ केला की तुमच्यासमोर आकर्षक, समाधानकारक भौतिक शक्यतांचे भांडार उघडे होते. या सर्वांवर तुमचा हक्क आहे पण विश्वासाचे जीवन जगताना तुम्ही तुमचे हक्क सोडता आणि तुमच्यासाठी देवालाच निवड करु देता. कधीकधी देव तुम्हांला कसोटी होण्याच्या जागी पाठवतो. विश्वासाचे जीवन जगत नसता तर याठिकाणी जाण्यापूर्वी स्वतःची सोय पाहावी लागली असती. पण ते जीवन जगत असला तरी तुम्ही आनंदाने आपला हक्क सोडून देवाने केलेली निवड स्वीकारता. देवाच्या वाणीला प्रतिसाद देऊन आज्ञापालन केल्याने देव यातूनच स्वाभाविकतेकडून आध्यात्मिकतेकडे नेतो.

आमचा हक्क आमच्या जीवनाला वळण लावतो तेव्हा आमची आत्मिक दृष्टी मंद होते. देवावरील विश्वासाच्या जीवनाचा सर्वात मोठा शत्रू पाप नसून आपण केलेल्या चांगल्या निवडी, वस्तुतः त्या तेवढ्याशा चांगल्या नसतात. जे चांगले ते नेहमीच जे उत्तम त्याचा शत्रू असते. ह्या वचनामध्ये जगाच्या दृष्टीने प्रथम अब्राहामाने निवड करणे इष्ट होते. तो त्याचा हक्क होता त्याने तसे न केल्याने लोकांच्या दृष्टीने तो मूर्ख ठरला असता.

आपल्यापैकी अनेकांची आत्मिक वाढ होत नाही, कारण आम्ही आमच्यासाठी देवाला निवड करु न देता स्वतःचे हक्क जपण्यासाठी स्वतःच निवड करतो. देवावर दृष्टी केंद्रित करुन चालण्यास आपण शिकले पाहिजे. देवाने अब्राहामाला सांगितले तेच तो आम्हांलाही सांगतो *“तू माझ्यासमोर आहेस हे मनात वागवून चाल...”*(उत्पत्ती १७:१).

## येशूने शिकवल्याप्रमाणे प्रार्थनेचा विचार करणे

**“निरंतर प्रार्थना करा”** (**१ थेस्सल ५:१७**).

प्रार्थनेविषयी आमचे विचार, चुकीचे अगर बरोबर, आमच्याच मनावर आधारलेले असतात. प्रार्थना म्हणजे आमचा श्वास आणि रक्त आहे असा विचार करणे रास्त आहे. आमचा श्वास व रक्ताभिसरण सतत “निरंतर” चालू असते. कधी थांबत नाही. आत आम्हांला ते जाणवत नसते. येशू आम्हांला देवाशी संयुक्त ठेवतो याची नेहमीच जाणीव नसते. पण आम्ही त्याचे आज्ञापलान करत असलो तर तो आम्हांला देवाशी संयुक्त करतच असतो. प्रार्थना हा काही व्यायाम नाही. प्रार्थना विश्वासणाऱ्याचे जीवन आहे. प्रार्थना अर्पण करण्यामध्ये खंड पडू देऊ नका. सावध राहा. “निरंतर प्रार्थना करा” सदासर्वकाळ बालसुलभ वृत्तीने अंतःकरणातून देवाला प्रार्थना सादर करा.

येशूने अनुत्तरीत प्रार्थनेचा उल्लेख कधीच केला नाही. प्रार्थनेला नेहमी उत्तर मिळते याची त्याला पक्की खात्री होती. आम्हांलाही देवाच्या आत्म्याच्याद्वारे येशूप्रमाणे प्रार्थनेविषयी अनिर्वचनीय खात्री आहे किंवा आपण देवाने आमच्या प्रार्थनेला उत्तर दिले नाही असे वाटले त्या वेळचा विचार करतो? येशूने म्हटले, “पण... पण...” देव प्रार्थनेचे उत्तर देतो. कधीकधी नव्हे तर नेहमी देतो. कदाचित आम्हांला हवे तसे उत्तर मिळत नसेल. पण मिळते. देव आमच्या प्रार्थनेला उत्तर देईल ही अपेक्षा असते का?

येशूने सांगितले ते आपण स्वतःच्या विचाराशी जुळणारे करुन सांगतो. हे योग्य नाही. येशूने प्रार्थनेविषयी शिकवले ते सर्व अलौकिक सत्य आहे.

## जीवन त्याला जाणून घेण्यासाठी

**“... तुम्ही स्वर्गीय सामर्थ्याने युक्त व्हाल तोपर्यंत ह्या शहरात राहा” (लूक २४:४९).**

शिष्यांना पेंटेकॉस्टच्या दिवसापर्यंत यरुशलेममध्ये थांबायचे होते. यात त्यांची तयारी होणे आणि येशूचे गौरव होणे हे दोन उद्देश होते. त्याचे गौरव झाल्यानंतर काय झाले? “म्हणून तो देवाच्या उजव्या हाताकडे बसवलेला आहे, त्याला पवित्र आत्म्याविषयीचे वचन पित्यापासून प्राप्त झाले आहे आणि तुम्ही जे पाहता व ऐकता त्याचा त्याने वर्षाव केला आहे” (प्रे. कृ. २:३३). “... तोपर्यंत पवित्र आत्मा दिलेला नव्हता; कारण येशूचा तोपर्यंत गौरव झालेला नव्हता” (योहान ७:३९). हे विधान आम्हांला लागू नाही. पवित्र आत्मा दिलेला आहे; प्रभूचे गौरव झाले आहे. आमचे वाट पाहणे देवाच्या तरतुदीवर नाही तर आमच्या आत्मिक पात्रतेवर अवलंबून आहे.

पवित्र आत्म्याचे सामर्थ्य पेंटेकॉस्टपूर्वीही कार्य करतच होते. मात्र *तो* येथे नव्हता. आमच्या प्रभूला स्वर्गारोहणाच्या वेळी गौरविले तेव्हा पवित्र आत्मा या जगात आला. आता तो येथेच आहे. आमच्या जीवनात पवित्र आत्म्याचे सतत स्वागत व स्वीकार झाला पाहिजे. आम्ही पवित्र आत्मा आमच्या प्रभूकडून स्वीकारतो.

पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने लोकांचा पालट होत नाही. तो स्वर्गात गेलेल्या प्रभूचे सामर्थ्य पवित्र आत्म्याच्या द्वारे त्यांच्या जीवनात आल्यामुळे होतो. पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा स्वर्गात गेलेल्या ख्रिस्ताचे प्रमाण आहे.

पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यात सर्वकालाचा विचार करण्याचे कारण नाही. हा अनुभव येथे व *आताच* येतो. “सर्वकालिक जीवन हेच आहे की... तुला त्यांनी ओळखावे...” (योहान १७:३). आताच त्याला ओळखण्याचा आरंभ करा आणि कधीही थांबू नका.

मे २८

## सुस्पष्ट प्रकटीकरण

**“त्या दिवशी तुम्ही मला काही प्रश्न विचारणार नाही...” (योहान १६:२३).**

“तो दिवस” केव्हा येणार? स्वर्गात गेलेला प्रभू तुम्हांला प्रभूशी संयुक्त करील तोच हा “तो” दिवस आहे. त्या दिवशी तुम्हीही येशूप्रमाणे पित्याबरोबर एक व्हाल. त्याने म्हटले, “त्या दिवशी तुम्ही मला काही प्रश्न विचारणार नाही.” येशूचे पुनरुत्थित जीवन तुमच्यामध्ये पूर्णपणे प्रकट होईपर्यंत तुम्हांला अनेक प्रश्न पडलेले असतील. पण आता एकही प्रश्न उरणार नाही. विचारण्यासारखे काहीच नाही हे समजेल. तुम्ही येशूच्या पुनरुत्थानाच्या जीवनावर सर्वस्वी विसंबून राहिल्याने तुम्ही देवाच्या उद्देशांशी एकरुप झाला आहा. तुम्ही हेच जीवन आता जगत आहा काय? नसाल तर का नाही?

“त्या दिवशी” तुम्हांला न समजलेल्या अशा अनेक गोष्टी असतील पण त्या तुमचे अंतःकरण आणि देव यांच्या आड येणार नाहीत. “त्या दिवशी तुम्ही मला काही विचारणार नाही.” विचारण्याची गरजच नाही कारण देव आपल्या इच्छेनुसार सर्व काही तुम्हांला प्रकट करील याची तुम्हांला खात्री असेल. योहान १४:१ या वचनाप्रमाणे शांती आणि विश्वास हीच तुमच्या अंतःकरणाची वृत्ती होईल. प्रश्नच उरणार नाहीत. एखादी गोष्ट गूढ असेल, ती देव आणि तुम्ही यांच्या आड येत असेल तर त्याचा उलगडा आपल्या मनामध्ये नव्हे तर आत्म्यामध्ये पाहा. तुमच्या अंतरंगात डोकावा. तुमचा आंतरीक आत्मिक स्वभाव येशूच्या जीवनाच्या अधीन होण्यास तयार असेल तर तुम्हांला स्पष्टपणे उमज पडेल आणि पिता व त्याचे मूल, तुम्ही ह्यांच्यामध्ये अंतर येणार नाही कारण प्रभूने तुम्हांला एक केले आहे. “त्या दिवशी तुम्ही मला काही विचारणार नाही.”

## सरळ सुलभ नातेसंबंध

**"त्या दिवशी तुम्ही माझ्या नावाने मागाल... पिता स्वतः तुमच्यावर प्रीती करतो" (योहान १६:२६-२७)**

"त्या दिवशी तुम्ही माझ्या नावावे मागाल..." म्हणजे माझ्या स्वभावाने मागाल. "माझ्या शब्दाचा मंत्रासारखा उपयोग करा" असे नाही तर "तुम्ही माझ्या एवढे जवळ असाल की तुम्ही माझ्याबरोबर एक व्हाल." तो दिवस "पुढील जीवनातील दिवस नाही तर येथला व आत्ताचाच दिवस आहे." कारण पिता स्वतः तुमच्यावर प्रीती करतो. येशू बरोबरचे आमचे ऐक्य पूर्ण व पक्के आहे याचे प्रमाण पित्याची प्रीती हेच आहे. अनिश्चितता आणि बाह्य अडचणी यांच्यापासून आमचे जीवन मुक्त असेल. परंतु त्याला पित्याचे मन व अंतःकरण माहीत होते तसे आम्हांलाही पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याच्या द्वारे स्वर्गीय स्थानात ठेवता येईल आणि तेथे देवाची शिकवण आम्हांला प्रकट होईल.

"त्या दिवशी..., तुम्ही पित्याजवळ काही मागाल तर... (१६:२३). "तो दिवस" शांतीचा आणि देव व त्याच्यावर विश्वास ठेवणारा ह्यांच्यातील सरळ नात्याचा आहे. येशू आपल्या पित्याच्या सान्निध्यात शुद्ध व निष्कलंक होता तसे आपणही पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याच्या महासामर्थ्याने व प्रभावी परिणामकारकतेने आम्हांलाही त्याच नात्यामध्ये आणले जाते. "... आपण आहो तसे त्यांनीही एक व्हावे..." (योहान १७:२२).

"तो... तुम्हांला देईल" (योहान १६:२३). येशूने म्हटले त्याच्या नावामुळे देव आमच्या प्रार्थना ओळखील आणि आमच्या प्रार्थनांना प्रतिसाद देईल. त्याच्या नावाने प्रार्थन करण्याचे केवढे हे महान आवाहन आणि आव्हान! येशूचे पुनरुत्थान आणि स्वर्गारोहण यांच्या सामर्थ्याच्या द्वारे आम्हांला या नात्यात उंच केले जाईल. या ठिकाणी ठेवल्यावर आम्हांला येशूच्या नावाने त्याच्या स्वभावाने देवाला विनंती करता येते. ही देणगी पवित्र आत्म्याच्या द्वारे दिली आहे. "... तुम्ही पित्याजवळ माझ्या नावाने काही मागाल तर तो ते तुम्हांला देईल."

**मे ३०**

## “होय... परंतु...?”

**“...मी आपल्यामागे येईल, परंतु...” (लूक ९:६१).**

तुमच्या सामान्य बुद्धीची प्रचंड परीक्षा होईल असे काही करण्यास देवाने तुम्हांला सांगितले तर तुम्ही काय कराल? शारीरिक शक्तीने काही करु पहाल तर तुम्ही ती सवय निर्धाराने मोडून काढाल. आत्मिक बाबतीतही असेच आहे. येशूला हवे ते करण्याच्या बेतास आल्यावर कसोटीच्या क्षणाला तुम्ही मागे फिराल आणि मग निर्धाराने स्वतः देवाला पूर्णपणे शरण जाल. पण आम्ही म्हणतो, “होय, पण समजा या प्रकारे मी देवाच्या आज्ञा पाळल्या तर मग...?” “माझ्या सामान्य बुद्धीला पटणारे असे काही देवाने सांगितले तर ते मी करीन. पण अंधारात पुढे जायला सांगू नका!”

दैहिक मनुष्य दाखवतो तशीच साहसी वृत्ती येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांनी दाखवावी ही त्याची अपेक्षा आहे. एखाद्याला काही उपयुक्त करायचे असेल तर धाडस करुन अंधारात उडी टाकलीच पाहिजे. आत्मिक बाबतीतही असेच आहे. सामान्य बुद्धीला अनुसरुन तुम्हांला वाटते ते एकीकडे ठेवून येशू ख्रिस्त सांगतो ते करण्यास पुढे व्हा. आज्ञापालन केलेत की लगेच तुमच्या लक्षात येईल की तो सांगतो ते सामन्य बुद्धीला पटण्यासारखेच आहे.

सामान्य बुद्धीच्या दृष्टीने येशू ख्रिस्त सांगतो ते वेडेपणाचे वाटेल; परंतु तुम्ही ते विश्वासाने पारखून पाहाल तर दिसेल ती प्रत्यक्ष देवाची वचने आहेत. संपूर्णपणे देवावर भरंवसा ठेवा. पुन्हा संधी मिळाली की जरुर साहस करा.

मे ३१

## देवाला प्रथम स्थान द्या

**“... येशूला स्वतःला त्यांचा भरंवसा नव्हता... कारण मनुष्यांत काय आहे हे त्याला स्वतःला ठाऊक होते” (योहान २:२४–२५).**

*सर्वप्रथम देवावर भरंवसा ठेवा.* आमच्या प्रभूने कधीही कोणा व्यक्तीवर भरंवसा ठेवला नाही. तो संशयी नव्हता, त्याच्यामध्ये कटुता नव्हती, तो कधी निराश झाला नाही; कारण त्याचा देवावर भरंवसा होता. देवाची कृपा लोकांसाठी काय काय करील ते तो जाणून होता. मी मनुष्यांवर भरंवसा ठेवला तर मी निराशच होईल कारण मनुष्यांना अशक्य ते शक्य होईल अशी खोटी आशा धरली. देवाच्या कृपेशिवाय अन्य कशाहीवर अगर कोणाहीवर भरंवसा ठेवू नका.

*देवाच्या इच्छेला प्रथम स्थान द्या.* “... पाहा, मी तुझ्या इच्छेप्रमाणे करावयास आलो आहे” (इब्री १०:९).

कोणीही व्यक्ती गरजेनुसार आज्ञा पाळते. आमच्या प्रभूने पित्याच्या इच्छेनुसार आज्ञा पाळल्या. आजचे आवाहन आहे : “आपण कार्य केले पाहिजे! विधर्मी देवहीन स्थितीत मरताहेत. आपण जाऊन त्यांना येशूची सुवार्ता सांगितली पाहिजे. पण देवाच्या “गरजा” आणि इच्छा व्यक्तिशः आमच्यामधून पूर्ण होत आहेत याची खात्री करुन घेतली, पण येशूने म्हटले, “वरुन सामर्थ्य प्राप्त होईपर्यंत... थांबा...” (लूक २४:४९). देवाच्या “गरजा” व त्याची इच्छा यांच्याशी आमचा योग्य संबंध यावा हेच आमच्या ख्रिस्ती प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. आमच्यामधील देवाच्या “गरजा” पूर्ण झाल्या की आम्ही अन्य ठिकाणी त्याच्या “गरजा” पूर्ण करु.

*देवाच्या पुत्राला प्रथम स्थान द्या.* “... जो कोणी माझ्या नावाने अशा एखाद्या बाळकाला जवळ करतो तो मला जवळ करतो” (मत्तय १८:५).

देव लहान बाळ असा आला. त्याने स्वतःला माझ्यावर सोपवले. माझे व्यक्तीगत जीवन “बेथलहेम” व्हावे ही त्याची अपेक्षा आहे. देवाचा पुत्र माझ्यामधून दिसावा हीच देवाची अपेक्षा आहे.

**जून १**

## आश्चर्यकारक प्रश्न

**“तो मला म्हणाला, मानवपुत्रा, ह्या अस्थी सजीव होतील काय?” (यहेज्केल ३७:३).**

पापी व्यक्ती कधी पवित्रजन होईल का? विकृत जीवन सरळ करता येईल? या प्रश्नांचे एकच उत्तर आहे, “प्रभू परमेश्वरा, हे तुलाच ठाऊक” (३७:३). धर्म आपल्याला कळतो असे बेधडक म्हणून नका “आणखी थोडे पवित्र शास्त्र वाचन, जराशी भक्ती आणि थोडी प्रार्थना केली की हे सहज करता येईल!”

देवावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच काही करणे सोपे आहे. काम व त्याची गडबड पाहून आपणाला वाटते हीच प्रेरणा! म्हणूनच देवाबरोबर अगदी थोडके सहकारी दिसतात आणि देवासाठी काम करणारे अनेकजण आढळतात. देवावर विश्वास ठेवण्यापेक्षा त्याच्यासाठी काम करणे आम्हांला सोयीचे वाटते. मला करता येणार नाही ते देव माझ्यामध्ये करील यावर खरंच माझा विश्वास आहे? देवाने माझ्यासाठी काही केले आहे हे न समजून मी दुसऱ्यांविषयी निराश होतो. मला स्वतःला देवाच्या सामर्थ्याचा अद्‌भुत अनुभव आहे काय? असला तर मला कधीच कोणाहीविषयी निराश वाटणार नाही. स्वतःला कसलाच आत्मिक अनुभव नसेल तर कोणतेही काम करताना माझी धांदल उडणारच.

“माझ्या लोकांनो, पाहा, मी तुमच्या कबरा उघडीन...” (३७:१२). देवापासून विभक्त झालेला मानवी स्वभाव तो तुमच्यामध्येच दाखवतो. देवाचा आत्मा तुमच्यामध्ये कार्य करु लागला की देवाच्या कृपेला पारखे झालेले तुम्ही कसे आहा ते तो दाखवील. देव माझी “कबर” उघडून दाखवील आणि “आणि... माझ्या देहस्वभावात काही चांगले वसत नाही” (रोम ७:१८). हे मला उमगेल देवाच्या कृपेला पारखा झालेला मानवी स्वभाव कसा असतो ते देव सतत आपल्या मुलांना प्रकट करतो.

## जून २

### तुमच्यावर कशाचा प्रभाव आहे?

**“परमेश्वराचे भय धरणारा असा मनुष्य कोण?” (स्तोत्र २५:१२).**

तुमच्यावर कशाचा प्रभाव आहे? तुम्ही म्हणाल, “कशाचाही नाही.” पण प्रत्येकावर कशाचा तरी प्रभाव असतो. आम्ही ख्रिस्ती आहो तेव्हा ख्रिस्ती जीवनाचा प्रभाव आमच्यावर आहे. स्तोत्रकर्ता म्हणतो देवाचा प्रभाव आमच्यावर हवा. देवाविषयीचे केवळ विचार नकोत तर त्याच्याशी समरुप झाले पाहिजे. आमचे जीवन आतून व बाहेरुन देवाच्या सान्निध्याने प्रभावित व्हावे. लहान मुलावर त्याच्या आईचा प्रभाव असतो. ते खेळत असले, आई बाजूस असली तरी त्याचे मन आईच्या विचारांनी प्रभावित झालेले असते. आम्हीही त्याचप्रमाणे “त्याच्याठायी जगतो, वागतो व आहो” (प्रे. कृ. १७:२८). आम्ही त्याची जाणीव मनात ठेवूनच प्रत्येक गोष्टीकडे पाहतो कारण त्याची जाणीव सतत अंतरंगात असते.

आमच्यावर देवाचा प्रभाव असेल तर आमच्या जीवनात चिंता, काळज्या, त्रास, संकटे वगैरे काहीही येऊ शकणार नाही. आमच्या प्रभूने चिंता करण्याला पाप का म्हटले आहे ते आमच्या लक्षात येते. देव आमच्या सभोवार, सर्वत्र असताना आपण अविश्वास दाखवण्याचे धाडस कसे करतो? देवाचा प्रभाव असणे म्हणजे आपल्या भोवती अभेद्य असा संरक्षण कोट उभारणे म्हणजे शत्रूचे सर्व हल्ले विफल होतील.

“त्याचा जीव सुखासमाधानाने राहील...” (स्तोत्र २५:१३). देव आम्हांला “सुखासमाधानात ठेवील.” संकटे, अडचणी, गैरसमज, निंदा असूनही सुख असेल मात्र आमचे जीवन “ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त असावे” (कलस्सै ३:३). देवाची अद्‌भुत सोबत आणि त्याविषयीचे प्रकट सत्य यांची आम्ही उपेक्षा करतो. “देव आमचा आश्रय आहे...” (स्तोत्र ४६:१). त्याच्या सुरक्षित निवाऱ्याच्या आड काहीही येणार नाही.

## जून ३

### परमेश्वराचे सख्य

**“परमेश्वराचे सख्य त्याचे भय धरणाऱ्यांशी असते” (स्तोत्र २५:१४).**

मित्रत्वाची, मैत्रीची खूण कोणती आहे? तो तुम्हांला आपले दुःख सांगतो ही? नाही तो तुम्हांला आपले गुप्त आनंद सांगतो हीच मैत्रीची खूण आहे. आपले दुःख सांगणारे अनेक लोक आहेत पण आपल्या मनातला आनंद बोलून दाखवणाराच जिवलग मित्र असतो. आम्ही कधी देवाकडून त्याचे रहस्य, आनंद व हर्ष जाणून घेतले आहेत? आम्ही सतत देवाला आमच्या अडचणी सांगतो, त्याचे ऐकायला वेळच देत नाही. ख्रिस्ती जीवनाच्या आरंभी आम्ही सतत देवाला विनंत्या करतो. पण देवाला आमच्याशी जवळचे नाते जोडायचे असते हे आमच्या लक्षात येते. आम्ही त्याच्या संकल्पांच्या संपर्कात असावे हीच त्याची इच्छा आहे. येशू ख्रिस्ताच्या प्रार्थनेचा विचार आम्ही आत्मसात केला आहे? “तुझ्या इच्छेप्रमाणे होवो” (मत्तय ६:१०). हे आमचेही म्हणणे आहे? देवाची रहस्ये आम्हांला समजतात? देव आम्हांला कशामुळे विशेष प्रिय होतो? मोठाले आशीर्वाद दिल्याने? नाही. तो करतो त्या लहानसहान गोष्टींमधून आमच्याशी असलेली त्याची अद्भुत जवळीक दिसते.

“त्याने जो मार्ग धरला पाहिजे त्याविषयीचे शिक्षण तो त्याला देईल (स्तोत्र २५:१२). आरंभी आपण देवाच्या सल्ल्याने चालतो. आमची आत्मिक वाढ झाली की त्याची पूर्ण जाणीव असल्याने आम्ही त्याची इच्छा विचारुन घेत नाही. पर्यायी मार्ग असेल हे लक्षातच घेत नाही. आमचे तारण व पवित्रीकरण झाले असेल तर देव आम्हांला रोजच्या निवडीतून मार्ग दाखवतो. त्याला नको असलेले काही निवडले तर तो मनात शंका उत्पन्न करतो. आपण तिकडे लक्ष दिले पाहिजे. आपण त्याची शिकवण व मार्गदर्शन सतत अनुसरावे. तसे केले तर आम्ही कधीही त्याच्या आत्म्याला प्रतिबंध करणार नाही.

## जून ४

### कधीच टाकून न देणारा देव

**“त्याने स्वतः म्हटले आहे, ‘मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही’” (इब्री १३:५).**

माझे विचार कोठे चालले आहेत? मी देव सांगतो तिकडे वळतो का मला वाटणारे भय आणि शंका यांच्या बाजूस जातो? देव सांगतो तेच मी पुन्हा बोलतो का नीट ऐकून पुढे जातो? .... त्याने स्वतः म्हटले आहे, “मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही.” म्हणून आपण धैर्याने म्हणतो, “प्रभू मला साहाय्य करणारा आहे, मी भिणार नाही; मनुष्य माझे काय करणार?” (१३:५–६).

“मी तुला सोडून जाणार नाही...” कोणत्याही कारणाने नाही, माझे पाप, स्वार्थ, हेकटपणा, बहकणे या कशानेही नाही. देव खरेच का मला सोडून जाणार नाही? नसेल तर तेच मला पुन्हा ऐकू दे.

“मी तुला... टाकणार नाही.” केव्हा जीवनातील अडचणींमुळे नव्हे तर कष्टांमुळे वाटते देव मला टाकून देईल. मोठ्या अडचणी नसतात, दृष्टांत नसतो, काही अद्‌भुत, सुंदर नसते, तेच ते नीरस कंटाळवाणे जीवन असते! त्यातही देवाचे आश्वासन कानी पडते?

देव काही मोठी गोष्ट करणार आहे. तो काही महत्त्वाच्या कामासाठी आम्हांला तयार करत आहे असे वाटते. पण त्याच्या कृपेमध्ये आमची वाढ होते तेव्हा जाणवते की देव येथे व आताच, याच क्षणाला आपले गौरव करुन घेत आहे. आम्हांला देवाचे आश्वासन मिळाले आहे तर आम्हांला अद्‌भुत शक्ती मिळते, आम्ही गीते गातो आणि रोजच्या सामान्य जीवनातही त्याचे गौरव करतो.

## जून ५

### देवाचे आश्वासन

**“त्याने स्वतः म्हटले आहे,... म्हणून आपण धैर्याने म्हणतो...” (इब्री १३:५-६).**

देवाने दिलेल्या आश्वासनाच्या आधारानेच मला खात्री मिळते. देव सांगतो, “मी तुला सोडून जाणार नाही. त्यामुळे मी “धैर्याने म्हणतो, प्रभू मला साहाय्य करणारा आहे; मी भिणार नाही” (१३:५–६). मी भयभीत होणार नाही मला भय वाटले तरी देवाचे आश्वासनाचे वचन मला आठवेल. वडिलांनी घालून दिलेल्या मापदंडाने चालणाऱ्या मुलाप्रमाणे मी धैर्य धरीन; मनात भीती आली की अनेकांचा विश्वास डळमळतो. त्यांना देवाच्या आश्वासनाचा विसर पडतो. ते आत्मिक श्वास घेत नाहीत. देवाने आम्हांला दिलेले आश्वासन आठवणे हाच प्रीतीवरचा उपाय आहे.

तुम्हांला कसले भय वाटते? पण न घाबरता त्याला तोंड द्यावे असे ठरवले. तरी भयाची भावना जात नाही. मदतीला कोणी नाही असे वाटेल तेव्हा म्हणा, “पण प्रभू मला साहाय्य करणारा आहे.” याक्षणी माझ्या या परिस्थितीत त्याचे साहाय्य आहे. बोलण्यापूर्वी देवाचे ऐकता ना? अगोदर बोलून मग देवाचे सांगणे त्याला जोडण्याचा खटाटोप करु नका. पित्याचे आश्वासन दृढ धरा आणि धैर्याने म्हणा, “मी भिणार नाही.” काही झाले तरी त्याने स्वतः म्हटले आहे, “मी तुला सोडून जाणार नाही.”

देवाचे आश्वासन आणि आमचे विचार यांच्यामध्ये मानवी दुबळेपण आड येते. अडचणींना तोंड देणे आम्हांला अवघड आहे हे जाणवले की ते अवघडणेच महाकाय होते आणि त्यापुढे आम्ही टोळासारखे होतो. देव नाहीच असे वाटते. देवाचे आश्वासन विसरु नका, *“मी तुला... टाकणार नाही.”* देवाचे आश्वासन ऐकल्यावर आमच्या मुखातून गीताचे सूर उमटले का? आपण धैर्याने “प्रभू मला साहाय्य करणारा आहे,” असे म्हणतो का भयाने गळाठतो?

जून ६

## देवाने तुमच्यामध्ये "साधले आहे" ते "साधून घ्या"

**"... आपले तारण साधून घ्या... कारण तुमच्याठायी... साधून देणारा तो देव आहे" (फिलिप्पै २:१२–१३).**

तुम्ही देवाशी सहमत झाला तरी तुमचा देहस्वभाव जे केले पाहिजे ते करु देत नाही. प्रभू प्रथम आमच्या संपर्कात आला की आमचा विवेक, इच्छा जागृत करतो. आमची इच्छा नेहमी देवाशी सहमत असते. तरी तुम्ही म्हणता, "देवाचे म्हणणे माझ्या इच्छेला मान्य आहे का ते माहीत नाही. येशूकडे पहा. तुमची इच्छा आणि तुमचा विवेक त्याच्याशी सहमत आहे हेच दिसेल. "मी आज्ञा पाळणार नाही" हे तुमच्या इच्छेएवढे सखोल नाही. ही तुमची विकृती आणि हेकटपणा आहे. हे देवाशी कधीही सहमत होत नाहीत. कोणाही व्यक्तीमध्ये पाप नव्हे तर इच्छाच प्रबल असते.

देवाने उत्पन्न केलेल्या मनुष्यांमध्ये इच्छा हे महत्त्वाचे तत्त्व आहे. पाप हा विपरीत भाव असून ते मनुष्यांमध्ये शिरले. नवा जन्म झालेल्या व्यक्तीमध्ये सर्वसमर्थ देवच इच्छेचा स्रोत आहे. "... इच्छा करणे ही तुमच्याठायी आपल्या सत्संकल्पासाठी साधून घेणारा तो देव आहे." नेमके लक्ष लावून बारकाईने देवाने "तुमच्यामध्ये साधले आहे" ते तुम्ही "साधून घेतले पाहिजे." तुमचे तारण साध्य करण्यासाठी, मिळवण्यासाठी काम करायचे नाही तर ते साधून घ्यायचे म्हणजे प्रभूने पूर्णपणे केलेल्या उद्धारावरील दृढ विश्वास जीवनातून व्यक्त करणे आणि हे करताना देवाच्या इच्छेला विरोध करणारी दुसरी इच्छा पुढे करायची नाही. देवाची इच्छा तीच तुमचीही इच्छा आहे. तुमच्या निवडी देवाच्या इच्छेप्रमाणे असणार; मग हे जीवन जगणे सहजसोपे होईल. हट्टीपणा म्हणजे मठ्ठपणा तो ज्ञानप्रकाशाला विरोध करतो आणि पवित्र आत्म्याचे आज्ञापालन केल्याने तो विरोध दूर होईल. माझी इच्छा सर्वसमर्थ देवापासून आहे यावर माझा विश्वास आहे? मी देवाची इच्छा पूर्ण करावी ही त्याची अपेक्षा आहे आणि ते करण्यासाठी तो माझ्यामध्ये आहे.

**जून ७**

## सामर्थ्याचा सर्वात महान स्रोत

**“... तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन” (योहान १४:१३).**

माझ्या अंतरंगात खोलवर दडलेले मध्यस्थीचे कर्तव्य मी पूर्ण करतो आहे काय? मध्यस्थी करणे काही पेच नाही, फसवाफसवी नाही अगर गर्वाचे प्रदर्शनही नाही. या सेवेतून पित्याचे गौरव होते. मी माझे आत्मिक जीवन वाया दवडतो की माझ्या प्रभूच्या प्रायश्चित्तावर मी लक्ष केंद्रित केले आहे? माझ्या जीवनातील प्रत्येक गोष्टीवर प्रभूचा प्रभाव आहे का? माझ्या जीवनातील प्रत्येक प्रभाव प्रभूचे प्रायश्चित्त असेल तर माझ्या जीवनातून त्याच्यासाठी फळ मिळेल.

पण सामर्थ्याचा हा मध्यबिंदू काय आहे ते मला लक्षात घेणे जरुर आहे. प्रत्येक तासातील एकेक मिनिट मी यासाठी खर्च करणार काय? “तुम्ही माझ्यामध्ये राहिला तर...” तुम्ही त्या मध्यबिंदूवर लक्ष लावून विचार व कार्य केले तर “... जे काही तुम्हांला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हांला प्राप्त होईल” (योहान १५:७). मी राहण्यास वेळ देतो? माझ्या जीवनात सामर्थ्याचा सर्वात महान स्रोत कोणता आहे? माझे कार्य, सेवा, दुसऱ्यांसाठी केलेला त्याग आहे का देवासाठी कार्य करण्याची माझी ओढ आहे? प्रभूचे प्रायश्चित्त हेच माझ्या जीवनात महान सामर्थ्याचे कारण असावे. आम्ही ज्यासाठी जास्तीत जास्त वेळ देतो त्याने आम्हांला आकार मिळत नाही तर आमच्यावर सर्वात अधिक प्रभाव पाडणारी गोष्टच आम्हांला आकार देतो. ख्रिस्ताच्या वधस्तंभाने प्रायश्चित्त यावरच आमच्या इच्छा व आशा केंद्रित व्हाव्यात हा निश्चय आपण करावा.

“तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन...” येशूमध्ये राहणारा शिष्य देवाची इच्छा आहे. त्याने मुक्तपणे केलेली निवड देवाचे पूर्वीच नेमलेले आदेश आहेत हे रहस्यमय वाटते? हे तर्कसंगत नाही अगर हास्यास्पद आहे असे वाटते? पण देवाच्या पवित्रजनाला तेच वैभव सत्य आहे.

## पुढे काय करायचे आहे?

**“जर ह्या गोष्टी तुम्हांला समजतात तर त्या केल्याने तुम्ही धन्य आहा” (योहान १३:१७).**

*आपल्या दुसऱ्यांपेक्षा जास्त समजले पाहिजे असा निश्चय करा.* बंदारावर बांधून ठेवणारे बंध तुम्ही सोडणार नाही तर देव वादळाने ते तोडील आणि तुम्हांला समुद्रावर जावे लागेल. देवाच्या संकल्पाच्या भरतीवर तुमच्या जीवनातील सर्व घेऊन पुढे जा. तुमचे नेत्र उघडतील. येशूवर तुमचा विश्वास आहे तर बंदरात संथ पाण्यावर राहू नका. आनंद असला तर बंदराचे बंधन असते. बंदर सोडून चला. देवाच्या अथांग सागरावर पुढे चला. आत्मिक चाणाक्षदृष्टी विकसित होईल.

काही केले पाहिजे हे समजताच ते लगेच केले तर तुम्हांला आणखी समजेल. आपण कोठे आळस करतो, आत्मिक लक्ष कोठे उडाले आहे ते तपासा. तुमच्या लक्षात येईल की आपण काही करायचे होते ते न केल्याने ही अवस्था आली आहे. ताबडतोब केलेच पाहिजे ही आच नसल्याने ते केले नव्हते. पण आता तारतम्य नाही, चाणाक्षपणाही नाही. कठीण प्रसंगी आत्मिक दृष्ट्या सक्षम असण्याऐवजी तुम्ही आत्मिक बाबतीत गलितगात्र झाला आहा. अधिक जाणून घेण्यासाठी शिकण्यास नकार देणे हे भयावह आहे यात धोका आहे.

नकली आज्ञापालनात तुम्ही स्वतःला अर्पण करण्याच्या संधी शोधता तुमचा आवेश आणि उत्साह तारतम्यच आहे असे चुकीने समजता. तुमचे आध्यात्मिक भवितव्य काय कसे आहे ते रोम १२:१–२ मध्ये सांगितले आहे ते पूर्ण करावे. आत्म समर्पणाची महान कार्ये करण्यापेक्षा त्याची इच्छा ओळखून तुमच्या जीवनातील त्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे केव्हाही चांगले. “पहा, यज्ञापेक्षा आज्ञा पाळणे बरे...” (१ शमु १५:२२). तुम्ही आजवर केले नाहीत ते करावे ही देवाची इच्छा असेल तर तेच करा. “जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करावयाची मनीषा बाळगतील त्याला... समजेल” (योहान ७:१७).

जून ९

## मग पुढे काय करायचे आहे?

**“जो मागतो त्याला मिळते...” (लूक ११:१०).**

*जणू काही तुम्हांला मिळालेच नाही.* मागण्याएवढे कठीण काहीच नाही. आम्हांला काही गोष्टींची इच्छा असते. त्या न मिळाल्या तर त्रास होतो. परंतु नाइलाज झाला तरच आम्ही मागतो. आध्यात्मिक तयारी नसल्यानेच आम्ही मागतो. आपले संपूर्ण अपुरेपण आणि दारिद्र्य यांच्या आधाराने कधी मागितले आहे? “जर तुम्हांपैकी कोणी ज्ञानाने उणा असेल तर त्याने ते देवाजवळ मागावे...” (याकोब १:५). पण मागण्यापूर्वी आपण खरेच ज्ञानाने उणे आहो का याची खात्री करुन घ्यावी. तुमच्या इच्छेला येईल तेव्हा आत्मिक वास्तवतेप्रत येणे अशक्य! आपण आत्मिक दृष्टीने खरे नाही हे समजले की येशू ख्रिस्ताच्या अभिवचनाच्या आधारे देवाकडे पवित्र आत्मा मागा (पहा लूक ११:१३). येशूने तुमच्यासाठी केले आहे ते सर्व पवित्र आत्मा तुमच्या जीवनात खरे करतो.

“जो कोणी मागतो...” मागितले नाही तर मिळणार नाही असे नाही. पण मागेपर्यंत देवाकडून *मिळणार* नाही (पहा मत्तय ५:४५). मिळण्यासाठी तुम्हांला देवाशी मुलाचे नाते जोडले पाहिजे आणि सर्वकाही देवापासून मिळते हे मनाने व आत्म्याने समजून घेणे गरजेचे आहे.

“जर तुम्हांपैकी कोणी ज्ञानाने उणा असेल तर...” आत्मिक वस्तुस्थिती ओळखल्याने आपणामध्ये उणेपण आहे हे जाणवते. आता पुन्हा बुद्धिवादाची ढापणे डोळ्यांवर ओढून घेऊ नका. मागणे म्हणजे याचना करणे. काही गरीबांना गरिबीची सवय लागते. आमच्यापैकी काही जण आत्मिक दृष्टीने गरीब असतात. मनाशी काही ठरवून मागितले तर ते आमच्या वासनेसाठी असल्याने कधी मिळणार नाही. दीन गरिबीपोटी मागतो. याचना करण्याची त्याला लाज वाटत नाही. “आत्म्याने *दीन* ते धन्य” (मत्तय ५:३०).

## आणि त्यानंतर पुढे काय करायचे आहे?

**“... शोधा म्हणजे तुम्हांस सापडेल...” (लूक ११:९).**

*सापडले नसेल तर शोधा.* “तुम्ही मागता परंतु तुम्हांस मिळत नाही, कारण तुम्ही अयोग्य प्रकारे मागता...” (याकोब ४:३). तुम्ही मौजमजेसाठी मागता ते चूक आहे. स्वतःसाठी जेवढे जास्त मागाल तेवढे देवाकडे वळणार नाही. देवाला शोधण्यावर लक्ष लावा. पूर्ण मनाने, जिवेभावे देवाचा शोध केला आहे? का, त्याला लाजेकाजेस्तव विनंती केली आहे? “(लक्ष लावा) शोधा म्हणजे सापडेल...”

“अहो, तान्हेल्यांनो, तुम्ही सर्व जलाशयाकडे या...” (यशया ५५:२). तुम्ही कसे आहा तान्हेले का आत्मसंतुष्ट आणि बेपर्वा आहा? देवाकडून काहीही नको आहे काय? अनुभव केवळ दार आहे, अंतिम ध्येय नाही. अनुभव हा विश्वासाचा आधार नसावा. त्याने तुमचे जीवन अवास्तव होईल आणि तुम्ही सतत दोषच पहात राहाल. तुम्हांला सापडले आहे ते कधीच दुसऱ्याला देता येणे शक्य नाही. पण ते मिळावे ही इच्छा त्याला देता येईल.

“... ठोका म्हणजे तुम्हांसाठी उघडले जाईल” (लूक ११:९). “देवाजवळ या...” (याकोब ४:८). ठोका, दार बंद आहे. ठोकताना छातीत धडधडते. “हात निर्मळ करा...” (४:८). जरा जोराने ठोका. हे फारच वैयक्तिक होते. आपण मलिन आहो हे तुमच्या लक्षात येते. “... आपली अंतःकरणे शुद्ध करा...” (४:८). तुम्ही निकरावर येता, गंभीर होता. आता काहीही कराल. “... शोक करा....” (४:९). कधी शोक केला आहे? तुमच्या अंतरंगातील दुःख देवाला सांगितले आहे? आपण कसे आहो ते समजल्याने स्वतःची कीव करणे संपते आणि उरते हृदयभेदी सखेद आश्चर्य. “...नम्र व्हा...” (४:१०). देवाच्या घरावर ठोकणे हा नम्र करणारा अनुभव आहे. वधस्तंभावर खिळलेल्या चोराबरोबर ठोका. “ठोका म्हणजे तुम्हांसाठी *उघडले जाईल.*”

## तेथवर पोचणे

**“तुम्ही सर्व माझ्याकडे या” (मत्तय ११:२८).**

*पाप आणि शोक संपतात आणि पवित्रजनांचे गाणे सुरु होते.* खरेच तेथे जावे असे मला वाटते का? आताच नाही. जीवनात महत्त्वाचे प्रश्न फारच थोडके आहेत. “माझ्याकडे या.” या दोन शब्दांनी सर्वच प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. “हे करा, ते नको” असे आमचा प्रभू म्हणत नाही. “माझ्याकडे या” एवढेच सांगतो. मी येशूकडे आलो तर पापापासून सुटका होईल आणि प्रभूचे संगीत माझ्या जीवनात येईल. तुम्ही कधी येशूकडे आला आहा? अंतःकरण हट्टी आहे. ते काहीही करील पण येशूकडे येणार नाही. पापापासून सुटण्यासाठी येशूकडे आले पाहिजे.

तुमचे खरेपण तपासण्यासाठी येशू स्वतःच कसोटी होतो. अगदी अनपेक्षितपणे प्रभूचे शब्द कानी पडतात, “माझ्याकडे या,” लगेच तुम्ही त्याच्याकडे ओढले जाता. येशूबरोबरच्या संपर्काने सर्व बदलते. या आणि त्याच्या अधीन व्हा. तो सांगतो ते ऐका. त्याच्याकडे येण्यासाठी निश्चय करा, इतर सर्व सोडा आणि जाणून बुजून सर्व त्याला समर्पण करा.

“... मी तुम्हांला विसावा देईन,” म्हणजे “मी तुम्हांला स्थिर करीन.” “तुम्हांला बिछान्यावर ठेवून अंगाई गीत म्हणेन,” असे सांगत नाही. पण तो थोडक्यात सांगत आहे, “मी तुम्हांला सावरीन, तुमच्या अर्धमेल्या अवस्थेतून उठवीन. तुम्हांला जीवनाची प्रवृत्ती देईन, तुम्हांला सक्रिय करीन.” तरी पण आम्ही केविलवाणे होऊन देवाची इच्छा “सहन” करण्याविषयी बोलतो यात देवाच्या पुत्राचे वैभवी सामर्थ्य कुठे आहे?

## जून १२

### तेथवर पोचणे

**"ते त्याला म्हणाले, रब्बी... आपण कोठे राहता? तो त्यांना म्हणाला, या म्हणजे पाहाल" (योहान १:३८–३९).**

*येथे आमचा स्वार्थ एकीकडे राहून खऱ्या आस्थेचा उदय होतो.* "त्या दिवशी ते त्याच्या येथे राहिले..." आमच्यापैकी काही फक्त एवढेच करतात. आम्ही काही काळ त्याच्याजवळ राहतो. मग आमचा स्वार्थ पुढे येतो. त्याच्याबरोबर राहणे संपते. खरे तर जीवनातील प्रत्येक प्रसंगात आपणाला येशूबरोबर राहता येते.

"तू... शिमोन आहेस; तुला केफा म्हणतील" (१:४२). देव आमच्या जीवनातील अहंकार, स्वार्थ, स्वयंपूर्णता पुसून टाकून तेथे आमचे नवे नाव लिहितो. आमच्यापैकी काहीजण हे नवे नाव ठराविक ठिकाणी लिहून घेतात. आमच्या जीवनाच्या या भागात आम्ही उठून दिसतो. आमची गुणवत्ता चकाकते. पण तेवढे क्षण संपले की आमच्याकडे पाहवणार नाही. खऱ्या शिष्यावर नवे नाव सर्वत्र लिहिलेले असते; कारण तो अंतर्बाह्य देवाला समर्पित असतो. स्वतःचे असे काहीही त्याच्यामध्ये उरत नाही. स्वार्थ, अहंकार वगैरेचा लवलेशही उरत नाही.

गर्व म्हणजे 'स्वतः'ला देव समजण्याचे पातक आजही आमच्यातील काहीजण त्या परुश्यासारखे नव्हे तर जकातदारासारखे हे करतात (पहा लूक १८:९-१४). "मी काही पवित्रजन नाही" हे म्हणणे मानवी मापदंडाला धरुनच आहे. पण हे खरे तर अजाणतेपणे केलेले देवाविरुद्ध दुर्भाषण आहे. तुम्ही जणू म्हणता, "मी दुबळा, आशाहीन आहे, वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या प्रायश्चित्ताच्या कक्षेबाहेर आहे." तुम्हांला पवित्रजन व्हायचे नाही म्हणून तुम्ही पवित्रजन नाही. "देवाने माझे तारण करुन थेट स्वर्गात न्यावे," असे तुम्ही म्हणता. पण देव हेच करणार आहे (पहा योहान १४:२३). देवाला कोणत्याही अटी घालू नका. तो तुम्हांला सर्वकाळ स्वतःजवळ ठेवणार आहे.

## तेथेवर पोचणे

**“... चल माझ्यामागे ये” (लूक १८:२२).**

*येशूकडे आले की आमची वैयक्तिक इच्छा संपते आणि पवित्र समर्पण उरते.* आमचा स्वतःचा स्वभावच येशूकडे येण्यास आड येतो. आमच्या स्वाभाविक इच्छा व प्रवृत्ती अडथळे आहेत असे आपण समजतो. परंतु येशूकडे आले की तो आमच्या स्वाभाविक इच्छांकडे दुर्लक्ष करतो. आमच्या अंगचे गुण देवाला सादर करावे असे आपल्याला वाटते. पण जे तुमचे नाही ते तुम्ही कसे देणार? तुमचा स्वतःवरचा अधिकार एवढी एकच गोष्ट तुम्ही देवाला देऊ शकाल (पहा रोम १२:१). तुमचा हक्क देवाला दिला की तो तुमच्यामधून एक पवित्र प्रयोग करील आणि तो यशस्वी होईल. येशू ख्रिस्ताच्या सर्वस्वी अधीन असण्याने आंतरिक सर्जनशीलता येते आणि तीच देवाच्या पवित्रजनाची खरी खूण असते. पवित्रजनाच्या जीवनात अद्‌भुत झरा आहे. तो मूळ जीवनाचा सदा प्रवाही स्रोत आहे. देवाचा आत्मा सतत उसळणाऱ्या ताज्या पाण्याचा झरा आहे. आपले सर्वस्व देवाच्या हाती आहे, तोच आपल्याला चालवतो हे पवित्रजनाला ठाऊक असते. तेथे तक्रार नाही, कुरकूर नाही; सर्वस्व येशूला समर्पण हेच काय ते आहे. तुमचा अनुभव दुसऱ्यांसाठी तत्त्व असा करु नका. तुमच्याबरोबर देवाने सर्व नवे केले तसेच प्रत्येकाच्या बाबतीत करतो.

सर्वकाही येशूवर सोपवून त्याने “ये” म्हटले की आलात तर तो तुमच्याद्वारे सतत “या” असे म्हणत राहील. तुम्ही जगात जाऊन ख्रिस्ताच्या “ये” या शब्दाचे पडसाद लोकांच्या कानी पाडाल. परिणामी प्रत्येक जीवन सर्व सोडून येशूकडे येईल.

मी त्याच्याकडे आलो आहे? नसेन तर आता येणार ना?

## जून १४

### सुरु करा

**“...माझ्यामध्ये राहा...” (योहान १५:४).**

*निश्चय करण्यासंबंधी* ख्रिस्ताच्या वधस्तंभाने प्रायश्चित्ताच्या मिषाने येशूचा आत्मा माझ्यामध्ये ठेवला आहे. आता मला माझे विचार माझ्या प्रभूशी सुसंगत केले पाहिजेत. देव काही मला येशूप्रमाणे विचार करण्यास लावणार नाही. ते माझे मला केले पाहिजे. मलाच “प्रत्येक कल्पना अंकित करुन तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास” लावली पाहिजे (२ करिंथ १०:५). “माझ्यामध्ये राहा” मानवी जीवनाच्या प्रत्येक बाबतीत त्याच्यामध्ये राहणे जरुर आहे.

माझ्या जीवनामध्ये आवश्यक गोष्टी करण्यास मी देवाला प्रतिबंध करतो काय? त्यामुळे त्याच्या माझ्या सहभागितेत बाध येईल अशी सबब सांगतो का? माझी परिस्थिती कशीही असो. कोणत्याही प्रार्थनासभेत असावे तसे मी येशूमध्ये असावे. आमचा प्रभू सतत अंतरंगात देवामध्ये होता. तो सौम्य, लीन व नम्र होता. मी तसेच असावे. आमचे जीवन “ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवले आहे” (कलस्सै ३:३). असे असताना आपण सतत धावपळ करु नये. आमचा प्रभू देवापासून सूचना, सल्ला घेत होता तसे आपणही करावे.

ख्रिस्तामध्ये राहण्यापासून तुम्हांला परावृत्त करणाऱ्या गोष्टींचा विचार करा. तुम्ही म्हणता, “होय, प्रभू एकच मिनिट. मला एवढे हे काम पुरे करु दे. हे संपले की मी तुझ्यामध्ये राहतोच. ते नाहीच जमले तर हा आठवडा संपला की मी येऊन तुझ्यामध्ये राहीन.” पण हालचाल करा, आत्ताच राहायला सुरुवात करा. आरंभी ते अवघड वाटेल पण पुढे गेल्यावर हे आपोआप होईल. आता तुम्ही असाल तेथेच अगर पुढे असाल तेथून येशूमध्ये राहण्याचा निश्चय करा व तो प्रत्यक्षात पाळा.

**जून १५**

## सुरु करा

**"... आपल्या विश्वासात... भर घाला" (२ पेत्र १:५).**

*कंटाळवाण्या कामासंबंधात,* "आम्ही दिव्य स्वभावाचे व्हावे." सात्विक सवयी अंगवळणी पाडण्यास झटण्यावर आम्ही विशेष लक्ष द्यावे (१:४–५). शीलस्वभावाला आवश्यक त्या सर्वच बाबींची आपण आपल्या जीवनात "भर" घालावी. लौकिक अगर अलौकिक प्रकारे शीलस्वभाव घेऊन कोणी जन्मास येत नाही. शीलस्वभाव विकसित केला पाहिजे. जन्मतःच आम्हांला काही सवयी नसतात. चांगल्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत. त्यासाठी देवाने दिलेल्या नवजीवनाचा आधार घ्यावा. आम्ही देवाची आदर्श परिपूर्ण उदाहरणे नसून सामान्य जीवनात त्याच्या कृपेचा चमत्कार दाखवणारे आहो, आम्ही बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष न देता फक्त मोठी कामे करु पाहतो हाच आमच्या आत्मिक जीवनातील अडथळा आहे. पण येशूने... रुमाल कमरेस बांधला... शिष्यांचे पाय धुऊ लागला" (योहान १३:३–५).

प्रकाशझोत नाहीत, जीवनात नावीन्य नाही फक्त रोजचे सामान्य जीवन व कामे असा प्रसंग सर्वांवरच येतो. चाकोरीतला जीवनक्रम आणि पुन्हा प्रेरणेचा काळ ही देवाची रीतच आहे. देव तुम्हांला सतत अद्‌भुत क्षण देईल असे समजून नका. नित्याच्या कामाचे चाकोरीतले दिवसही देवाच्या सामर्थ्याने जगा.

पेत्राने सांगितल्याप्रमाणे "भर" घालणे कठीण आहे. फुलांच्या शय्येवरुन देवाने आम्हांला स्वर्गात न्यावे अशी आमची अपेक्षा नसल्याचे तोंडाने म्हणतो पण मनातून तेच हवे असते. जीवनातील प्रत्येक लहानसहान आज्ञापालनामागे देवाच्या कृपेचे सामर्थ्य आहे हे आपण विसरु नये.

जून १६

## “तू आपला प्राण देशील”

**“आपल्या मित्राकरता आपला प्राण द्यावा ह्यापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही... मी तुम्हांला मित्र म्हटले आहे” (योहान १५:१३, १५).**

मी येशूला माझे जीवन द्यावे असे तो सांगतो. पेत्राने प्रभूला सांगितले, “आपल्यासाठी मी माझा प्राण देईन” (योहान १३:३७). तो वीरासारखे बोलला. पेत्राप्रमाणे आम्हीही असेच म्हणावे, निर्भयपणाने कर्तव्य करावे असे आम्हांला वाटते. “माझ्यासाठी तू आपला प्राण देशील?” असे प्रभूने तुम्हांल विचारले आहे (योहान १३:३८). देवाच्या उच्च पाचारणाला अनुसरुन जीवन दररोज समर्पण करण्यापेक्षा मरणे सोपे आहे. जीवनातील चकाकते क्षण सतत वाटयाला येत नाहीत. तथापि त्याच प्रकाशात रोजची कामे केली पाहिजेत. येशूच्या जीवनात लकलकीत तेजस्वी एकच क्षण होता. तो त्याने डोंगरावर रुपांतर झाले तेव्हा अनुभवला. तेथे त्याने दुसऱ्या खेपेस रिक्त केले. गौरवाचा त्याग केला आणि तो खाली उतरुन भूतग्रस्त प्रदेशात आला (पहा मार्क ९:१–२९). येशूने ३३ वर्षे आपल्या पित्याच्या इच्छेप्रमाणे करण्यास प्राण अर्पण केले. “ख्रिस्ताने आपल्याकरिता स्वतःचा प्राण आर्पिला... तेव्हा आपणही आपल्या बंधू करिता स्वतःचा प्राण अर्पिला पाहिजे” (१ योहान ३:१६). हे आमच्या मानवी स्वभावाच्याविरुद्ध आहे.

मी येशूचा मित्र आहे. मी काळजीपूर्वक माझे जीवन त्याला अर्पिले पाहिजे. हे अवघड आहे. तारण आम्हांला सोपे आहे, देवाला त्यासाठी मोठी किंमत द्यावी लागली पण माझ्या जीवनातून तारण दाखवणे अवघड आहे. देव तारण करतो, पवित्र आत्मा देतो आणि सांगतो, “चारी बाजूला अविश्वासू होण्याचे वातावरण असले तरी तू विश्वासू राहा, तारण साधून घे.” येशू आम्हांला मित्र म्हणतो. मित्राशी विश्वासू राहा.

जून १७

## सावध असा! दुसऱ्यांचे दोष काढू नका

**“तुमचे दोष काढण्यात येऊ नयेत म्हणून तुम्ही कोणाचे दोष काढू नका” (मत्तय ७:१).**

दुसऱ्यांचे दोष काढण्याविषयी येशूचे शिक्षण स्पष्टच आहे. तो म्हणतो, “दोष काढू नका.” सर्वसामान्य ख्रिस्ती व्यक्ती दुसऱ्यांचे दोष काढण्यात तरबेज असते. बहुतेकांचा हाच एक उद्योग असतो. दोष काढल्याने दुसरे दुर्बल होतात पवित्र आत्माच दुसऱ्यांना न दुखावता त्यांचे दोष दाखवतो. दुसऱ्यांवर टीका करावी या विचारात गढल्याने देवाबरोबरची सहभागिता टिकत नाही. सतत टीका केल्याने तुम्ही कठोर, सूड उगवणारे व क्रूर होता आणि स्वतःला श्रेष्ठ समजून आपला अहंकार गोंजारता. येशूचा शिष्य या नात्याने तुमचा स्वभाव शांत, नम्र असावा. त्यात दुसऱ्यांचे उणे काढण्याचा विचाराही नसावा, हेच तो सांगतो. अर्थात हे काही एका दिवसात साधत नाही. त्यासाठी वेळ दिला पाहिजे. पण असा स्वभाव अंती सर्वांच्या हिताचा आहे.

येशू माझ्या जीवनात खोलवर तपासणी करणार हे मी कधी विसरु नये. मला तुमच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण माझ्या डोळ्यातील मुसळ मात्र दिसत नाही! (७:३—५). तुमच्यामध्ये मला दिसते ती प्रत्येक चूक, उणेपण देव माझ्यामध्येही असल्याचे पाहतो. दुसऱ्यांना दोष लावणारा मी स्वतःच दोषी आहे, नाही का? (पहा रोम २:१७—२४). दुसऱ्यांसाठी मापदंड हाती घेऊन फिरु नका. दुसऱ्यांविषयी आपण जाणतो त्याहून प्रत्यक्षात काही अधिक असतेच. देव प्रथम आत्मिक शुद्धता करतो. मग आमच्यामध्ये अहंकार उरत नाही. माझ्यामध्ये देवाच्या कृपेखेरीज दुसरे काही नाही हे समजल्यावर मला कोणाचेच दोष दिसणार नाहीत.

जून १८

## येशूची ओळख ठेवा

**"... पेत्र येशूकडे जाण्यासाठी ... पाण्यावरुन चालू लागला... परंतु वारा पाहून तो भ्याला" (मत्तय १४:२९–३०).**

वारा तुफानी होता, लाटा उंच उसळत होत्या. प्रथम ते पेत्राच्या लक्षात आले नाही. प्रभू आहे म्हणून तो पाण्यावर चालू लागला. मग त्याने इकडेतिकडे पाहिले आणि तो बुडू लागला. प्रभूने त्याला लाटांखाली आणि लाटांवर का चालू दिले नाही? पेत्राने आपले लक्ष सतत प्रभूवर ठेवले असते तर तो बुडाला नसता.

आम्ही काही बाबतीत देवावर विसंबून पुढे होतो. मग स्वतःचा विचार आला की आमचे हातपाय लटपटतात. आम्ही पडण्याच्या बेतात येतो. आपल्या प्रभूला तुम्ही खरोखर ओळखत असाल तर तुमच्या परिस्थितीकडे तुमचे लक्ष जाणारच नाही. आजूबाजूच्या गोष्टी वास्तविक, खऱ्या आहेत पण त्यांच्याकडे लक्ष गेले की आम्ही हतबल होतो. येशूची ओळख विसरतो. मग त्याचे परखड बोल कानी पडतात. "... तू संशय का धरलास?" (१४:३१). परिस्थिती कशीही असली तर येशूवर लक्ष केंद्रित करा.

देव बोलला आहे त्याविषयी किंचित शंका घेतलीत तर सर्व संपलेच! लगेच सर्वस्वी त्याच्यावर विसंबून पुढे चला. त्याची वाणी कधी कानी पडेल ते सांगवत नाही. पण ऐकता क्षणी उठा, कामाला लागा. त्याच्यासाठी सर्व सोडण्याची तयारी ठेवली तर त्याची वाणी अधिक स्पष्टपणे कानी पडेल.

## जून १९

### उत्कट भक्तिपूर्ण सेवा

**“...माझ्यावर प्रीती करतोस काय?... माझी मेंढरे पाळ...” (योहान २१:१६).**

तुमच्या स्वतःच्या विचारांना अनुसरणारे अनुयायी मिळवा असे येशूने सांगितले नाही. पण त्याच्या मेंढरांची काळजी घेण्यास, त्यांना त्याचेच शिक्षण देण्यास सांगितले आहे. आम्ही काही ख्रिस्ती कार्य केले तर ते सेवा समजतो. पण येशू ख्रिस्ताला आम्ही जे व जसे आहोत तीच सेवा आहे. शिष्य होणे हे विशिष्ट श्रद्धा अगर सिद्धांत यांना अनुसरणे नसून येशू ख्रिस्तावरील निष्ठेनेच शिष्यपणा ठरतो. “जर कोणी माझ्याकडे येईल आणि... द्वेष करणार नाही त्याला माझा शिष्य होता येत नाही” (लूक १४:२६). या वचनात येशूच्या मागे जाण्याची सक्ती नाही, दडपण नाही. तो सांगतो आहे, “माझा शिष्य व्हायचे तर तुम्ही माझ्याशी सर्वस्वी एकनिष्ठ असावे.” देवाच्या आत्म्याचा स्पर्श झालेली व्यक्ती एकदम म्हणतो, “येशू कोण आहे ते आता मला समजले!” येथेच निष्ठा उगम पावते.

आज आम्ही वैयक्तिक विश्वासापेक्षा सिद्धांतावरील विश्वासाला महत्त्व देतो. याच कारणाने ध्येयावर निष्ठा ठेवणारे अनेक आहेत आणि येशूवर निष्ठा ठेवणारे अगदी थोडके आहेत! लोकांना येशूवर निष्ठा ठेवायला नको त्याने सुरु केलेल्या कार्यावर ते निष्ठा ठेवतात. आज सुशिक्षित लोकांना येशू मित्र म्हणून हवा त्यांना त्याचे अन्य काही नको. आमचा प्रभू लोकांच्या नव्हे तर त्याच्या पित्याच्या आज्ञा पाळत होता. नुसते मानवतेवर प्रेम केल्याने मी उरी फुटेन पण येशूवर सर्वस्वी प्रेम केले तर मी मानवतेचीही सेवा करीन येशू ख्रिस्तावर निष्ठा, जीवनात नम्रता हेच त्याच्या शिष्याचे रहस्य आहे. येशू ख्रिस्ताचा शिष्य जमिनीत पडून मरणाऱ्या गव्हाच्या दाण्यासारखा आहे. “तो उगवून वर आला की सर्व वातावरणच बदलतो! (योहान १२:२४).

## जून २०

### तुम्ही "जेव्हा"पर्यंत पोचला आहात का?

**"ईयोबाने आपल्या मित्रांसाठी प्रार्थना केली तेव्हा परमेश्वराने ईयोबाच्या दुःखाचा परिहार केला" (ईयोब ४२:१०).**

केविलवाणी, स्वार्थी प्रकारची प्रार्थना आणि देवाबरोबर सरळ, रास्त असण्याचा निर्धारपूर्वक प्रयत्न यांचा मागमूसही नव्या करारात नाही. देवाबरोबर रास्त होण्याचा माझा प्रयत्न म्हणजे ख्रिस्ताच्या प्रायश्चित्त अर्पणाला माझा विरोध! मी प्रार्थना करतो, "माझ्या प्रार्थनेचे उत्तर दिलेस तर माझे अंतःकरण शुद्ध करीन. मला साहाय्य केलेस तर तुझ्यासमोर नीट चालेन." परंतु मी स्वतःला परिपूर्ण करु शकत नाही, शुद्धही करु शकत नाही. येशूचे प्रायश्चित्त अर्पण स्वीकारले तर मात्र मी देवासमोर रास्त, नीट होईन. पण ते स्वीकारण्यासाठी मला माझे हक्क व मागण्या सोडल्या पाहिजेत. स्वतःला सर्वस्वी त्याच्यावर सोपवले पाहिजे. तसे केल्यावर मला जीवेभावे मध्यस्थीचे याजकीय कार्य करता येईल. येशूने आमचे तारण केलेच आहे. तारण कर असे त्याला सांगणे निरर्थक आहे.

येशूने अभिवचन दिल्याप्रमाणे तुम्हांला "अनेकपट" (पहा मत्तय १९:२९). मिळाले नसेल. देवाचे वचन समजत नसेल तर मित्रांसाठी प्रार्थना करा. आंतरिक जीवनातून सेवा करा. *"ईयोबाने आपल्या मित्रांसाठी प्रार्थना केली.* तेव्हा परमेश्वराने ईयोबाच्या दुःखाचा परिहार केला..." (ईयोब ४२:१०). तारण पावलेला जिवात्मा म्हणून मध्यस्थीची प्रार्थना करणे हे तुमचे मुख्य कार्य आहे. तुमच्या मित्रांसाठी आता प्रार्थना करा आणि तुमच्या संपर्कात येणाऱ्या लोकांसाठीही आताच प्रार्थना करा.

## जून २१

### आंतरिक जीवनाचे सेवाकार्य

**“तुम्ही तर... राजकीय याजकगण... आहा” (१ पेत्र २:९).**

आपण कोणत्या हक्काने “राजकीय याजकगण” झालो आहो? ख्रिस्ताच्या वधस्तंभाने झालेल्या प्रायश्चित्ताच्या आधारे हे साध्य झाले आहे. आता स्वतःकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करुन प्रार्थनेची याजकीय सेवा करण्यास आम्ही तयार आहोत काय? आपण सतत अंतरंगात पाहून आम्ही जसे व्हावे तसे आहो का हे पाहिले तर आत्मकेंद्रित ख्रिस्तीपणाच पुढे येईल. देवाच्या मुलाचे सरळ साधे जीवन अनुभवास येणार नाही. देवाबरोबर योग्य नाते जोडले तरच उपयोग नाहीतर आपण कसेबसे निभावून गेलो तरी म्हणतो, “केवढा अद्‌भुत विजय!” परंतु असे म्हणणे निरर्थक आहे त्यात उद्धाराच्या चमत्काराचा पुसटसाही उल्लेख नाही. तारण, उद्धार पूर्ण झाला आहे असा बेधडक विश्वास ठेवा आणि स्वतःविषयी चिंता करणे सोडा आणि येशूने सांगितल्याप्रमाणे प्रार्थना करा. देवाचे पवित्रजन आणि सर्व लोक अशा सर्वांसाठी प्रार्थना करा. त्याच्या सांगण्याचा भावार्थ आहे, मध्यरात्री तुमच्याकडे येणाऱ्या मित्रासाठी, देवाचे पवित्रजन आणि सर्व लोक अशा सर्वांसाठी प्रार्थना करा. “हे प्रभू, मला शक्य ते मी केले आहे कृपा करुन आता माझे ऐक,” असे म्हणून नव्हे तर तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये परिपूर्ण आहा ही जाणीव ठेवून प्रार्थना करा.

फक्त स्वतःचा विचार करण्याच्या हीन सवयीपासून देव आम्हांला केव्हा सोडवील? आपण स्वतःचा विचार करण्याचे सर्वथा सोडले पाहिजे; म्हणजे देव आमच्याविषयी काही सांगेल त्याचे आश्चर्य वाटणार नाही. आमच्या मनाच्या हलकेपणाचा थांग लागणे कठीण आहे. ते आम्हांला जमणारच नाही. देवाबरोबर रास्त, सरळ होण्याची ख्रिस्त येशू ही आम्हांला एकच जागा आहे. येथेच आम्हांला आंतरिक सेवाकार्य करायचे आहे.

## जून २२

### न्यायनिवाड्याचा न बदलणारा नियम

**“कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल” (मत्तय ७:२).**

हा देवाचा सनातन नियम आहे. तुम्ही केलेल्या निवाड्यानेच तुमचाही न्याय होईल. सूड उगवणे आणि शिक्षा करणे यांमध्ये फरक आहे. शिक्षा हा जीवनाचा आधार आहे असे येशूने म्हटले आहे. “ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल.” तुम्ही चतुरपणे दुसऱ्यांची उणीदुणी काढली असतील तर त्याच मापाने तुमचीही मोजणी होईल. ज्या प्रकारे तुम्ही द्याल त्याच प्रकारे तुम्हांला मिळेल. हा सनातन नियम देवाच्या राजासनावरुन आमच्याकडे आला आहे (पहा स्तोत्र १८:२५-२६).

रोम २:१ अगदी नेमके हेच सांगते. दुसऱ्याचे दोष काढणाराही त्याच प्रकारे दोषी असतो. देव केवळ कृतीकडे पाहात नाही तर ती कृती करण्याची शक्यताही पाहतो. त्यासाठी तो आमची अंतःकरणे पाहतो. पवित्र शास्त्र सांगते त्यावर आमचा विश्वास नसतो. दुसऱ्यांचे दोष काढणारे आम्हीही त्याच कारणाने दोषी असतो. हे आम्हांला मान्य आहे? आम्ही दुसऱ्यांमध्ये दंभ, ढोंग, कपट, खोटेपणा पाहतो कारण ते आमच्याहीमध्ये असते. नम्रता हे पवित्रजनाचे महत्त्वाचे लक्षण आहे. “देवाची कृपा नसती तर मीही असाच दोषी ठरलो असतो. मला दोष काढण्याचा अधिकार नाही.”

येशूने म्हटले, “दोष काढू नका म्हणजे तुमचे दोष काढले जाणार नाहीत” (मत्तय ७:१). आम्ही दुसऱ्यांचा न्याय करतो तसा देवाने आमचा न्याय केला तर आमची रवानगी नरकातच होईल; पण ख्रिस्ताच्या वधस्तंभाने प्रायश्चित्त या आधारे देव आमचा न्याय करतो.

## जून २३

### व्याधींशी परिचित

**“… क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष…” (यशया ५३:३).**

आमची “दुःखाशी ओळख नाही” पण आमच्या प्रभूची होती. आम्ही दुःख सोसतो, त्यातून पार जातो पण दुःखाशी आमची जवळीक नसते. जीवनाच्या आरंभी आम्ही पापाचा निपटारा करण्याकडे लक्ष देत नाही. आम्ही विचारपूर्वक म्हणतो एखाद्याने स्वतःच्या उपजत प्रवृत्तींना आळा घातला, शिक्षण घेतले तर त्याचे जीवन हळूहळू देवाच्या जीवनासारखे होईल. पण यात आपण पाप जमेस धरलेले नसते. पाप आमच्या सर्व योजना आणि मनुसबे विफल करते. पापामुळे आमचे विचार अनावर होतात, त्यांना धरबंद राहात नाही.

पाप हे जीवनतील वास्तव आहे. केवळ उणेपण नव्हे, पाप म्हणजे देवाविरुद्ध उघड बंडखोरी; माझ्या जीवनातून पाप अगर देव यातील एक हद्दपार झाले पाहिजे. नवा करार स्पष्टपणे सांगतो माझ्यामध्ये पापाचे राज्य असेल तर माझ्यातले देवाचे जीवन मारले जाईल. याहून दुसरे कोणतेच मूलभूत तत्त्व महत्त्वाचे नाही. माझ्या जीवनात देवाची सत्ता असेल तर पाप जिवे मारण्यात येईल. हे अगदी मूलभूत आहे. पापाची परिणती येशूच्या वधस्तंभावरील मरणात झाली. देवाच्या पृथ्वीवरील इतिहासात जे खरे ठरले तेच तुमच्या आणि माझ्या जीवनात खरे होणार. पाप तुमच्या आणि माझ्यामधील देवाचे जीवन ठार मारील. आपण मनाने पापाची वास्तवता नीट लक्षात घेतली पाहिजे. जीवनातील दुःखाचे व शोकाचे पाप हेच कारण आहे आणि पाप या कारणानेच येशू ख्रिस्ताला पृथ्वीवर यावे लागले.

## जून २४

### पापाचे वास्तव स्वतः जाणून घेणे

**“ही तुमची घटका आणि अंधाराची सत्ता आहे” (लूक २२:५३).**

पापाचे वास्तव ओळखून वेळीच त्याचा निकाल न केल्याने जीवनात अनर्थ ओढवतात. मानवी स्वभावाच्या सद्‌गुणांची कितीही प्रशंसा केली तरी त्यांची टवाळी करणारे असे काही मनुष्यस्वभावातच आहे. मनुष्यात दुष्टपणा आणि स्वार्थ आहे हे तुम्हांला मान्य नसेल तर तुमच्यावर त्याचा हल्ला झाला की तुम्ही त्याच्याशी तडजोड करता. त्याच्याशी दोन हात करण्यात अर्थ नाही असे म्हणता? “घटका आणि अंधाराची सत्ता” हे तुम्ही लक्षात घेतले आहे? का तुमच्या लेखी पाप नाहीच? तसे असेल तर लवकरच तुम्हांला पेच पडेल आणि तडजोड करावी लागेल. पण पापाचे वास्तव जाणून घेतलेत तर धोका ओळखून तुम्ही म्हणाल, “पाप काय असते ते समजले.” पाप ओळखल्याने मैत्री तुटत नाही. पापमय जीवन अनर्थकारी आहे एवढे लक्षात येते. पापाची वस्तुस्थिती न ओळखणाऱ्या जीवनापासून सावध राहा.

येशूने कधी मनुष्यस्वभावर भरंवसा ठेवला नाही पण तो कधी संशयी, सतत दोष काढणारा नव्हता. मानवीस्वभावाविषयी आपण काय करणार त्याविषयी त्याला पुरी खात्री होती. विशुद्ध स्त्री अथवा पुरुष यांचे नुकसानापासून रक्षण होते पण निरपराध व्यक्तीचे होत नाही. निरापराध स्त्री किंवा पुरुष कधीच सुरक्षित असत नाहीत. निरागसता हे बालकाचे लक्षण आहे. पापाची वस्तुस्थिती मान्य नसलेली व्यक्ती दोषास पात्र आहे.

## जून २५

### दुःखाच्या आगीमध्ये स्वतःला स्वीकारणे

**“... मी काय बोलू? ‘हे बापा, ह्या घटकेपासून माझे रक्षण कर; परंतु मी ह्यासाठीच ह्या घटकेत आलो आहे. हे बापा, तू आपल्या नावाचे गौरव कर.’” (योहान १२:२७–२८).**

देवाचा पवित्रजन म्हणून मी शोक आणि अडचणी येऊच नयेत असे त्याच्याकडे मागणार नाही. मी हेच मागेन की त्याने मला ज्यासाठी उत्पन्न केले आहे ते करण्यासाठी त्याने माझ्या दुःखाशोकाच्या आगीपासून रक्षण करावे. आमच्या प्रभूनेही दुःखाच्या अग्नीमध्ये आपले स्थान व उद्दिष्ट लक्षात घेऊन सर्व गोष्टी स्वीकारल्या. त्याला त्या घटकेपासून नव्हे तर घटकेतून वाचवले.

दुःख असूच नये असे आपण म्हणतो. परंतु दुःख, शोक आहेच आणि त्याच्या अग्नीमध्ये आपण स्वतःला स्वीकारले पाहिजे. दुःख सोसण्याऐवजी ते टाळण्याचा प्रयत्न केला तर आपण मूर्ख ठरतो. दुःख हे जीवनातले एक मोठे वास्तव आहे. ते टाळता येत नाही. पाप, शोक आणि दुःख आहेच, ते येथे राहू देण्यात देवाने चूक केली असे म्हणू नये.

दुःखाने आपला उथळपणा संपतो, पण त्यामुळे अधिक चांगले होता येत नाही. यशाने स्वतःचा शोध लागत नाही कारण अहंकाराने दृष्टी धुंद होते. जीवनातील एकसुरीपणा कुरकुरीस कारण होतो. दुःख शोकाच्या आगीमधून स्वतःचा शोध लागतो. आगीमधून स्वतःला स्वीकारलेत तर परमेश्वर तुम्हांला दुसऱ्यांना धीर देणारा करील.

**जून २६**

## आताच परमेश्वराच्या कृपेचा स्वीकार करणे

**“आम्ही... विनंती करतो की, तुम्ही देवाच्या कृपेचा स्वीकार व्यर्थ होऊ देऊ नये” (२ करिंथ ६:१).**

काल तुम्हांला मिळलेली कृपा आज पुरेशी नसणार. कृपा देवाची ओसंडणारी मेहरबानी आहे. हवी तेव्हा भरपूर घ्यावी! “फार धीराने, संकटांत, विपत्तीत, पेच प्रसंगात” येथेच आमचा सोशिकपणा कसास लागतो. या बाबतीत तुम्ही देवाच्या कृपेवर विसंबण्यास चुकता का? येथे मदतीसाठी देवाला विनंती करण्याचा प्रश्नच नाही तुम्ही देवाची कृपा आता स्वीकारता का; हेच महत्त्वाचे. आम्ही प्रार्थनेने सेवेची पूर्व तयारी करतो. परंतु पवित्र शास्त्र तसे सांगत नाही. प्रार्थना म्हणजे देवाच्या कृपेचा लाभ घेणे. “मी जाऊन प्रार्थना करीपर्यंत सर्व सोसेन” असे म्हणू नका. आताच प्रार्थना करा आणि गरजेच्या वेळी कृपा मिळवा. प्रार्थना सर्वसाधारपणे उपयुक्त आहे. प्रार्थनेद्वारे देवाची कृपा मिळवण्यास आपण शिकावे.

“फटके खाण्यात, बंदिवासात, दंग्या धोप्यात, काबाडकष्टात...” (६:५). या सर्व बाबतीत देवाची कृपा मिळवा. यामुळे तुम्ही त्याचा चमत्कार आहात याचे प्रमाण सर्वांना पटेल. त्याची कृपा नंतर नव्हे आताच मिळवा. परिस्थितीच्या रेट्याने कोठेही फेकले गेला तरी देवाच्या कृपेचा आधार सोडू नका. देवाच्या कृपेचा आधार आहे हे तुमच्या विनम्र वृत्तीतून सर्वांना दिसेल.

“दरिद्री मानलेले...” काही राखून ठेवू नका. असेल नसेल ते देत राहा नेहमी गरीबच राहा. देवाने दिलेले भांडार जतन करु नका. द्या. पुन्हा द्या. “कफल्लक मानलेले तरी सर्व वस्तुसंपन्न” हेच विजयी दारिद्र्य आहे (६:१०).

**जून २७**

## देवाच्या व्यक्तिगत सुटकेची छाया

**“... तुझा बचाव करण्यास मी तुझ्याबरोबर आहे, असे परमेश्वर म्हणतो” (यिर्मया १:८).**

“आपण स्वतः तुझा बचाव करु” असे अभिवचन परमेश्वराने यिर्मयाला दिले होते. “तू जिवानिशी सुटशील...” (यिर्मया ३९:१८). परमेश्वर आपल्या मुलांना हेच आश्वासन देतो. तो आमच्या जिवाचे रक्षण करतो. आमची मालमत्ता आम्ही महत्त्वाची समजू नये. आपली त्यावरची पकड ढिली असावी. तसे नसेल तर आमचे आयुष्य चिंतेतच संपणार. योग्य दृष्टी ठेवणे हे देवाच्या व्यक्तिगत सुटकेची छाया आमच्यावर असल्याचे द्योतक आहे.

डोंगरावरील प्रवचनातून दाखवले आहे की आम्ही येशूसाठी कार्य करण्यास निघालो तर स्वतःचा विचार करण्यात वेळ दवडू नये. “तुम्हांला योग्य वागणूक मिळते का याचा विचार करु नये,” हाच येशूच्या सांगण्याचा भावार्थ आहे. न्यायाचा शोध करणे व्यर्थ आहे. त्यामुळे त्याच्यावरील आपली निष्ठा ढळली हेच दिसते. शिवाय या जगात न्याय कधी मिळणार नाही. पण तुम्ही मात्र नेहमी न्यायाने वागा. येशू ख्रिस्तावर आमची निष्ठा असेल तर आपल्यावर न्याय होवो, अन्याय होवो कशाचीच पर्वा करण्याचे कारण नाही. येशूच्या सांगण्याचा भावार्थ आहे, “मी तुम्हांला करायला सांगितले तेच करीत राहा. मी तुमच्या जिवाचे रक्षण करीन. पण स्वतःचे रक्षण करण्याचा यत्न केलात तर माझ्या छायेतून दूर जाल.” आपण स्वतःची सामान्य बुद्धी मनाच्या राजासनावर ठेवून त्याला देव म्हणतो. अंतःकरणापासून देवावर भरंवसा ठेवण्याऐवजी आम्ही आपल्याच बुद्धीवर विसंबून राहतो (पहा नीतिसूत्रे ३:५–६).

## जून २८

### परमेश्वराच्या आश्रयाने राहणे

**“ज्यासाठी ख्रिस्त येशूने मला आपल्या कह्यात घेतले आहे ते मी आपल्या कह्यात घ्यावे म्हणून मी त्यांच्या मागे लागतो आहे” (फिलिप्पै ३:१२).**

देवासाठी काम करणे निवडून घेऊ नका. पण देवाने तुम्हांला पाचारण केले असेल तर “उजवीडावीकडे वळू नका” (अनुवाद ५:३२). आमची इच्छा आहे म्हणून आम्ही येथे देवासाठी काम करणारे असे नाही तर त्यानेच आम्हांला कामासाठी बोलावले आहे. पण एकदा हे झाले की मग “मला हे काम जमणार नाही” असे म्हणू नका. तुम्ही कोणता संदेश द्यावा. उपदेशातून काय सांगावे हे तुमच्या स्वाभाविक इच्छेनुसार होत नाही तर तेही देवानेच ठरवलेले असते. आपला आत्मा सतत देवाच्या संपर्कात ठेवा. तुम्हांला केवळ तुमची साक्ष सांगण्यासाठी पाचारण झाले नसून सुवार्ता सांगण्यासाठीही हे पाचारण आहेच. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने देवाच्या सत्याची साक्ष दिली पाहिजे. पण उपदेश करण्यास पाचारण झाले असेल तर देवाच्या हाताची पकड तुमच्यावर हवीच हवी. त्याच उद्देशाने त्याची पकड तुमच्यावर आहे. तुम्हांला त्याच्या आश्रयानेच राहिले पाहिजे. या प्रकारे किती जण राहतात?

देवाच्या वचनात भेसळ करु नका. ते आहे तसे निर्भेळ व कडक प्रकारे सांगा. देवाच्या वचनातील काना मात्राही बाजूस होऊ देऊ नका. दुसऱ्यांबरोबर वैयक्तिक पातळीवर वागायचे असेल तर आपली ओळख विसरु नका. तुम्ही स्वर्गामध्ये निर्माण केलेले कोणी खास व्यक्ती नाही तर कृपेने तारलेली पापी व्यक्ती आहा. “बंधूनो, मी अद्यापि ते कह्यात घेतले असे मानीत नाही; तर ख्रिस्त येशूच्या ठायी देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचे बक्षीस मिळवण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे मी धावतो; हेच एक माझे काम” (फिलिप्पै ३:१३–१४).

## अत्यंत कडक शिस्त

**“तुझा उजवा हात तुला पापास प्रवृत्त करीत असेल तर तो तोडून टाकून दे; कारण तुझे संपूर्ण शरीर नरकात पडावे; ह्यापेक्षा तुझ्या एका अवयवाचा नाश व्हावा हे तुझ्या हिताचे आहे” (मत्तय ५:३०).**

प्रत्येकानेच आपला उजवा हात कापावा असे येशूने सांगितले नाही. “तुझा उजवा हात तुला पापास प्रवृत्त करीत असेल तरच तो कापून टाकावा हे चांगले.” अनेक गोष्टी करणे योग्य असले तरी देवाकडे चित्त लावायचे असेल तर त्या गोष्टी करता येणार नाहीत. तुमचा उजवा हात तुमच्या जवळच्या उत्कृष्ट गोष्टींपैकी एक आहे. पण येशूला अनुसरण्यात त्याचा अडथळा होत असेल तर तो सरळ “तोडून टाकावा” येथे शिकवलेले हे तत्त्व माणसाला लावून दिलेली कठोर व कडक शिस्त आहे.

नव्या जन्माच्या द्वारे देव तुमचा पालट करतो, आध्यात्मिक नवीन जन्माच्या द्वारे नवजीवन देतो तेव्हा प्रथम तुमचे जीवन दुर्बल केले जाते. करण्याचा विचारही मनात आणू नये अशा अनेक गोष्टी समोर येतात; कारण त्या गोष्टी तुमच्यासाठी पाप असतात. तुम्हांला ओळखणाऱ्या लोकांनाही त्या पापच वाटतील. पण तुमच्या आसपास असणारे, आत्मिकतेशी देणेघेणे नसलेले लोक म्हणतील, “त्या करण्यात काय चूक आहे? तुम्ही फारच चमत्कारिक बुवा!” आरंभी जीवन दुर्बल केले नव्हते असा एकही पवित्रजन नाही. दुर्बल होऊन जीवनात प्रवेश करुन माणसांच्या दृष्टीने आकर्षक पण देवाच्या दृष्टीने पंगू ठरण्यापेक्षा माणसांना पंगू पण देवाला आकर्षक होणे केव्हाही चांगले. प्रथम येशू ख्रिस्त आपल्या आत्म्याच्या द्वारे तुमच्यावर नियंत्रण ठेवील पण त्या आधारे दुसऱ्यावर टीका करु नका. वचन ४८ मध्ये सांगितल्याप्रमाणे तुमचा स्वर्गीय पिता आहे तसे परिपूर्ण व्हा.

## जून ३०

### ते आत्ताच करा

**“वाटेवर तुझा वादी तुझ्याबरोबर आहे तोच त्याच्याशी सलोखा कर...” (मत्तय ५:२५).**

या वचनामध्ये येशू ख्रिस्ताने एक महत्त्वाचे तत्त्व सांगितले आहे, “जे करायचे ते आत्ताच करा.” तसे न केले तर पुढे “दमडीन् दमडी फेडीपर्यंत सुटका होणार नाही” (५:२६). क्लेश, वेदना सोसणे भाग पडेल! देवाचे नियम बदलत नाहीत. त्यांच्यापासून सुटका नाही. येशूचे शिक्षण नेहमीच मर्मभेदक असते ते अंतःकरणापर्यंत भिनते.

माझ्या वाद्याने माझे हक्क मला द्यावे असे वाटणे स्वाभाविक आहे. पण माझ्या ऋणकोचे देणे देऊन टाकावे हे महत्त्वाचे आहे. आमच्या प्रभूच्या दृष्टीने दुसऱ्यांनी मला फसवले तरी हरकत नाही, पण मी मात्र दुसऱ्याला फसवू नये. मी माझ्या हक्काविषयी आग्रही आहे का? येशू ख्रिस्ताच्या दृष्टीने मी दुसऱ्याला द्यायचे ते सर्व दिले आहे काय?

करायचे ते ताबडतोब आणि आत्ताच करा. नैतिक व आत्मिक बाबतीत करायचे असेल ते ताबडतोब करणे आवश्यक आहे. तसे केले नाही तर कठोर प्रतिक्रिया होणे अटळ आहे. देवाला आपले मूल बर्फासारखे शुभ्र, शुद्ध व निष्कलंक असावे असे वाटते. आज्ञाभंगाची प्रत्येक बाब तो मोडून काढील आणि आज्ञापालन करण्यास भाग पाडील. आपले तेच बरोबर म्हणणे हे अवज्ञा करीत असल्याचे द्योतक आहे. देवाचा आत्मा आम्हांला सतत प्रकाशात चालण्याचा आग्रह करतो यात नवल ते कोणते? (पहा योहान ३:१९—२१).

“तुमचा वादी तुमच्याबरोबर आहे तोच त्याच्याशी सलोखा कर...” तुमच्या मनात कोणाविषयी संताप, आकस घर करुन आहे काय? देवासमोर योग्य ते करा. त्या व्यक्तीशी आताच समेट—सलोखा करा.

## अढळ शिक्षा

**“मी तुला खचित सांगतो दमडीन् दमडी फेडीपर्यंत तू त्याच्यातून सुटणारच नाहीस” (मत्तय ५:२६).**

स्वर्गामध्ये एक कोपरा नरकासाठी ठेवला आहे असे मुळीच नाही. तुम्हांला पवित्र, सरळ करावे हे देवाने ठरवले आहे. तो पवित्र आत्म्याच्या शोधक नजरेखाली सतत ठेवील. त्याने तुमची खातरजमा केली तेव्हाच लगेच न्यायासाठी येण्यास सांगितले पण तुम्ही गेला नाही. मग शिक्षा अटळच होती. आता तुम्ही तुरुंगात पडला आहा... (आणि) “दमडीन् दमडी फेडीपर्यंत तू त्याच्यातून सुटणार नाहीस” (मत्तय ५:२५–२६). आणि तुम्ही म्हणता, “हाच का तो दयेचा व प्रीतीचा परमेश्वर?” देवाच्या दृष्टीने त्याचे कार्य प्रीतीचे आहे. तो तुम्हांला शुद्ध, निष्कलंक करणार आहे. परंतु तुम्ही आपला स्वतःवरचा हक्क सोडावा हीच त्याची इच्छा आहे. तुम्ही स्वतःचा स्वभाव बदलण्यास तयार झालात की तो तुम्हांला विशुद्ध करु लागेल. तुमच्याशी यथार्थ नाते जोडावे ही देवाची इच्छा असल्याचे जाणवले की तो तुमचे स्वतःशी आणि दुसऱ्यांशी योग्य नाते जोडण्यास सर्व प्रकारे कार्य करील. तुम्हांला सरळ मार्गाने चालायला लावील. आताच निश्चय करा. परमेश्वराला सांगा “होय, प्रभू, मी आताच ते पत्र लिहितो; त्या व्यक्तीशी लगेच समेट करतो.”

येशू ख्रिस्ताचे हे उपदेश तुमच्या बुद्धीसाठी नसून ते तुमची इच्छा आणि विवेकभाव यांच्यासाठी आहेत. तुम्ही डोंगरावरील प्रवचनातील या वचनांना बुद्धीने आक्षेप घ्याल तर अंतःकरणावर त्यांचा व्हावा तो परिणाम होणार नाही.

“देवाबरोबर आत्मिकतेमध्ये माझी वाढ होत नाही” असे वाटते ना? तुम्ही तुमचे कर्ज देवाच्या दृष्टीने चुकते करता का ते पाहा. उद्या करायचे ते आजच करा.

## जुलै २

### शिष्यपाणाच्या अटी

**“जर कोणी  माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई, बायको, मुले, भाऊ व बहिणी ह्यांचा आणि आपल्या जिवाचाही द्वेष करणार नाही... जो कोणी स्वतःचा वधस्तंभ घेऊन माझ्यामागे येत नाही... जो कोणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करीत नाही त्याला माझा शिष्य होता येत नाही” (लूक १४:२६–२७, ३३).**

शिष्याचे जीवन आणि येशू ख्रिस्ताचे मागणे यात ऐक्य नसेल तर ताबडतोब आमच्या प्रभूच्या आज्ञा पाळाव्या हेच त्याचे सांगणे आहे. शिष्यपणा म्हणजे एका व्यक्तीवर सर्वस्वी उत्कटपणे निष्ठा ठेवणे, ही व्यक्ती आमचा प्रभू येशू ख्रिस्त आहे. तत्त्वांवर निष्ठा आणि व्यक्तीवर निष्ठा यांमध्ये फरक आहे. आमच्या प्रभूने स्वतःवर निष्ठा ठेवून भक्ती करण्यास सांगितले आहे. शिष्य होणे म्हणजे प्रभू येशूवरील प्रीतीने प्रेरित झालेला त्याचा निष्ठावंत दास होणे. आमच्यापैकी अनेकजण स्वतःला ख्रिस्ती म्हणवतात पण खरोखरी ते येशू ख्रिस्ताचे भक्त नसतात. पवित्र आत्म्याने साहाय्य केल्याशिवाय या जगातील कोणीही प्रभू येशूवर उत्कट प्रीती करु शकत नाही. फक्त पवित्र आत्माच प्रभू येशूवर खरी प्रीती करणारा आहे आणि त्यानेच “देवाच्या प्रीतीचा वर्षाव आमच्या अंतःकरणात केला आहे” (रोम ५:५). तुमच्या द्वारे येशूचे गौरव करण्याची संधी मिळाली की तो तुमच्या जिवाची पकड घेऊन येशू ख्रिस्तावरील निष्ठेने भरुन व भारुन टाकतो.

खरी उत्स्फूर्त सर्जनशीलता ही ख्रिस्ती जीवनाची खूण आहे. येशू ख्रिस्तावर केले तसे विसंगतीचे आरोप शिष्यावरही होतात. पण येशू ख्रिस्ताचे देवाबरोबरचे नाते सुसंगत होते. त्याचप्रमाणे ख्रिस्ती व्यक्तीनेही त्याच्यामध्ये असलेल्या देवाच्या पुत्राबरोबरचे आपले नाते सुसंगत ठेवले पाहिजे. त्याने कडक सिद्धांतांशी सुसंगत असलेच पाहिजे असे नाही. लोक स्वतःचे सिद्धांत उराशी कवटाळून बसतात आणि ते येशू ख्रिस्ताशी एकनिष्ठ सेवक होण्यासाठी देव त्यांच्या कल्पित सिद्धांताच्या पाशातून बाहेर काढतो.

## जुलै ३

### व्यक्तिगत पापाचे केंद्रीकरण

**“हाय हाय! माझे आता वाईट झाले, कारण मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे...” (यशया ६:५).**

मी देवाच्या सान्निध्यातून आलो की मी पापी आहे हे मला जाणवते. माझ्या जीवनातील पापाकडे माझे लक्ष नसते. “होय, मी पापी आहे, मला माहीत आहे” पण देवाच्या समक्षतेमध्ये आल्यावर आमच्या विशिष्ट पापावर आमचे लक्ष केंद्रित होते आणि आम्ही खरे कोण आहो हे यशयाप्रमाणे समजते. देवाच्या समक्षतेमध्ये असल्याची हीच खूण आहे. पापाची नक्की जाणीव होते. आत्म्याने आमचे लक्ष वेधून घेतलेले असते आणि देव त्याविषयीच आमची खातरजमा करतो. आपण त्या विशिष्ट पापाविषयी त्याला स्वतःचे समर्पण केले तर तो आम्हांला पापाचे व्यापक स्वरुप दाखवील. देवाच्या समक्षतेची जाणीव झाली की देव आम्हांला याच प्रकारे वागवतो.

वैयक्तिक पापाकडे आमचे लक्ष या प्रकारे वेधून घेतले जाणे हे प्रत्येकाच्या जीवनात अनुभवास येते. अनुभवाच्या पायऱ्या एका मागोमाग एक अशा चढत गेलो की आपण म्हणू, “माझे कुठे चुकले तेच मला समजत नाही.” परंतु देवाचा आत्मा काही विशिष्ट गोष्ट निश्चितपणे आपल्याला दाखवील. परमेश्वराच्या पवित्रतेच्या दृष्टांताचा परिणाम म्हणून आपण “अशुद्ध ओठांचा माणूस” आहो हे त्याला जाणवले. “तो माझ्या ओठास लावून त्याने म्हटले, पाहा, याचा स्पर्श तुझ्या ओठास झाला म्हणून तुझा दोष दूर झाला आहे, तुझ्या पापाचे प्रायश्चित्त झाले आहे” (६:७) पाप एकवटले होते ते अग्नीने शुद्ध करणे आवश्यक होते.

## जुलै ४

### परमेश्वराच्या महान “करु नका” पैकी एक

**“जळफळू नको, अशाने दुष्कर्माकडे प्रवृत्ती होते” (स्तोत्र ३७:८).**

जळफळत राहणे म्हणजे मानसिक व आत्मिक अशा दोन्ही दृष्टींनी “विकलांग” होणे! “जळफळू नका” हे सांगणे सोपे आहे. पण न जळफळणे, शांत राहणे हे फार कठीण आहे. “परमेश्वराच्या अधीन होऊन स्वस्थ राहा, त्याची प्रतीक्षा शांतपणे करीत राहा” (३७:३) हे बोलणे सोपे आहे; पण जेव्हा आमचे छोटेस जग उलटे होते आणि दुसऱ्या अनेकांप्रमाणे आम्हांला गोंधळलेल्या दुःखकारक स्थितीत राहावे लागते तेव्हा “परमेश्वराच्या आधीन होऊन स्वस्थ राहाणे!” जमेल काय? पण हे “करु नका” येथे कामी आले नाही तर ते कोठेच येणार नाही. हे “करु नका” आमच्या शांत, स्वस्थतेच्या दिवसात कामी येते तसे कठीण काळातही येणे गरजेचे आहे आणि ते तुमच्या उपयोगी पडले नाही तर कोणाच्याच उपयोगी पडणार नाही. परमेश्वरावर विसंबून स्वस्थ राहाणे हे तुमच्या बाह्य परिस्थितीवर नव्हे तर परमेश्वराबरोबरच्या तुमच्या नात्यावर अवलंबून आहे.

चिंता करण्याने पापच पदरी येते. थोडी चिंता, किंचित काळजी हे खरे तर आमच्या शहाणपणाचे सूचक चिन्ह आहे. परंतु खरे पाहिले तर ते आमच्या दुष्टपणाचे चिन्ह आहे. आमचे तेच खरे करण्याच्या निश्चयातूनच जळफळणे येते. आमच्या प्रभूने कधी काळजी केली नाही आणि तो कधीच चिंतातुर नव्हता; कारण आपल्या स्वतःच्या नव्हे तर देवाच्या योजना पूर्ण करणे हाच त्याचा उद्देश होता. जळफळणे हे देवाच्या मुलासाठी दुष्टपणाचे आहे.

देवाला तुमची परिस्थिती हाताळता येणार नाही असा तुमचा समजत आहे? तुमची मते व अंदाज एकीकडे ठेवा आणि “सर्वसमर्थाच्या सावलीत राहा” (स्तोत्र ९१:१). जळफळणार नाही असे परमेश्वराला स्पष्टपणे सांगा. परमेश्वराला जमेस न धरल्याने आम्ही जळफळतो आणि चिंता करतो.

## जुलै ५

### योजना करताना परमेश्वराचे मार्गदर्शन घ्या

**“आपला जीवितक्रम परमेश्वरावर सोपवून दे; त्याच्यावर भाव ठेव म्हणजे तो तुझी कार्यसिद्धी करील” (स्तोत्र ३७:५).**

*परमेश्वराखेरीज योजना करु नका.* परमेश्वराला जमेस न धरता केलेल्या आमच्या योजना तो मजेने विफल करतो. आम्ही विचित्र परिस्थितीत सापडलो की ही स्थिती देवाने निवडलेली नाही हे आमच्या लक्षात येते. आम्ही तो महत्त्वाचा घटक आहो, हे न ओळखता त्याला योजनेतून खड्यासारखे वगळले आहे हे समजते. परंतु आमच्या नियोजनात परमेश्वराला मुख्य घटक केल्यावर चिंतेचे कारणच उरत नाही.

आत्मिक बाबतीत देवाला प्रथम स्थान देण्याची परंपरा आहे. परंतु आमच्या रोजच्या जीवनात त्याला प्रथम स्थान देणे अयोग्य व अनावश्यक आहे असे समजतो. परमेश्वराकडे जाताना “आपला चेहरा” आत्मिक केला पाहिजे असे वाटते तर आपण कधीच त्याच्या जवळ जाऊ शकणार नाही. आपण आहो तसेच त्याच्याकडे जावे.

*मनात दुष्ट हेतू धरुन मागू नका.* आमच्या आजूबाजूस असलेल्या दुष्टतेकडे लक्ष न देता योजना करावी अशी परमेश्वराची इच्छा आहे? “प्रीती... अपकार स्मरत नाही” (१ करिंथ १३:४-५). प्रीतीला दुष्टतेची जाणीव आहे. पण नियोजनातील हा घटक होत नाही. आम्ही देवहीन होतो तेव्हा दुष्टता हिशेबी धरुन योजना करीत होतो व त्याच दृष्टीने काम करीत होतो.

*योजना करताना वाईट दिवसाचा विचार नको.* ख्रिस्तावर तुमचा खरेच भरंवसा असेल तर पुढल्या काळाची चिंता नको. येशूने म्हटले, “तुमचे अंतःकरण अस्वस्थ होऊ नये...” (योहान १४:१). तुमचे अंतःकरण अस्वस्थ होण्याला परमेश्वर प्रतिबंध करत नाही. तुम्ही अस्वस्थ होऊ नका ही आज्ञा आहे.

**जुलै ६**



## दृष्टांत खरे ठरतात

**“तृषित भूमीचे ठिकाणी उपळते झरे होतील...” (यशया ३५:७).**

एखादी गोष्ट आमच्या जीवनात वास्तवात खरी होण्यापूर्वी आम्ही ती दृष्टांतात पाहतो. दृष्टांत वास्तव असला तरी अद्याप तो आमच्यामध्ये खरा झाला नाही हे आमच्या लक्षात येते तेव्हा सैतान येऊन मोह घालतो आणि आम्ही म्हणतो, पुढे जाण्यात काही अर्थ नाही. दृष्टांत खरा होण्याऐवजी आम्ही मानखंडनेच्या खोऱ्यात पडतो.

देव आम्हांला दृष्टांत देतो मग त्या दृष्टांताला योग्य होण्यासाठी आम्हांला खोऱ्यात नेऊन ठीकठाक करतो. पण या खोऱ्यातच आमच्यापैकी कित्येक जण हतबल होतात. आम्ही धीर धरला तर देवाने दिलेला प्रत्येक दृष्टांत खरा होईल. देवाला भरपूर मोकळा वेळ असतो. आम्ही गडबडीत असतो. देव कधीच गडबडीत नसतो. त्या दृष्टांताच्या तेजाच्या प्रकाशात आम्ही उत्साहाने पुढे सरसावतो परंतु तो दृष्टांत आमच्यामध्ये अद्याप खरा झालेला नसतो. देवाने आम्हांला खोऱ्यात नेऊन अग्नी व महापूर यातून नेऊन ठीकठाक करावे लागते आणि आमच्यावर त्या दृष्टांताची सत्यता सोपवून देतो. आमच्यासाठी नेमलेल्या उद्दिष्टासाठी तो आम्हांला योग्य करीत आहे तथापि आम्ही मात्र पुन्हा, पुन्हा शिल्पकाराच्या हातून निसटतो व आमचेच उद्दिष्ट साधण्याची खटपट करतो.

देव आम्हांला देतो तो दृष्टांत आकाशपुष्प खुडण्यासारखा काल्पनिक नाही. येथे प्रत्यक्षात येऊ शकणारा दृष्टांतच देव आम्हांला देतो. कुंभाराला त्याच्या चाकावर तुम्हांला आकार देऊ दे. तुमच्यातून त्याला त्याच्या मनाजोगते पात्र घडवू दे. मग तुम्ही त्या दृष्टांताशी समरुप व्हाल. पण या प्रक्रियेत खचून जाऊ नका. देवाने दिलेल्या दृष्टांतानुसार तो कार्य करील.

## जुलै ७

### श्रेष्ठतेसाठी प्रयत्न करणे कठीण असते

**“अरुंद दरवाजाने आत जा... जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद व मार्ग संकोचित आहे...” (मत्तय ७:१३–१४).**

येशूचे शिष्य म्हणून राहयचे असेल तर उत्तम ते करण्याचे आमचे सर्व प्रयत्न कठीण आहेत हे आपण विसरु नये. ख्रिस्ती जीवन अवघड आहे पण त्यामुळे आम्ही खचून जात नाही तर जिंकण्यास तयार होतो. येशू ख्रिस्ताने साधलेले अद्‌भुत तारण आम्हांला प्रिय आहे तर त्या श्रेष्ठतेसाठी आमचे सर्वोत्तम असलेच पाहिजे.

येशूने केलेल्या प्रायश्चित्त अपर्णाच्याद्वारे परमेश्वर आपल्या सार्वभौम कृपेने लोकांचे तारण करतो “कारण इच्छा करणे व कृती करणे ही तुमच्यासाठी आपल्या सत्संकल्पासाठी साधून घेणारा तो देव आहे” (फिलिप्पै २:१३). तथापि आमच्या रोजच्या जीवनात आम्ही ते तारण साधून घेतले पाहिजे (फिलिप्पै २:१२). त्याच्या उद्धाराच्या आधाराने तो सांगतो ते करण्यास आरंभ केला तर ते आपणाला करता येते हे दिसेल. आमचे चुकले तर देवाने आमच्यामध्ये ठेवले आहे त्यानुसार करु लागलो नाही हाच त्याचा अर्थ आहे. देवाच्या आत्म्याचे ऐकून त्याने आमच्या आत्म्यामध्ये ठेवले आहे तसे करु लागलो आणि कठीण पेच पडला तर आमचा स्वभाव आणि देवाची कृपा आम्हांला आधार देतील.

देवाची स्तुती असो! तो आम्हांला कठीण गोष्टी करायला देतो! त्याचे तारण आनंदमय आहे, त्यासाठी शौर्य, धैर्य व पवित्रता आवश्यक आहे; ते आमची परीक्षा घेते. येशू “पुष्कळ पुत्रांना गौरवात आणतो” (इब्री २:१०). देव आम्हांला पुत्रपणाच्या जबाबदाऱ्यांपासून राखून ठेवणार नाही. देवाची कृपा लोकांना येशू ख्रिस्ताशी समरुप करते. हे स्त्री, पुरुष सक्षम असतात, लाडावलेले, वाया गेलेले नसतात. आपणही जीवन उपयुक्त व उत्तम करावे.

# जुलै ८

## विश्वासपात्र होण्याची इच्छा

**"... तुम्ही कोणाची सेवा करणार हे आजच ठरवा..." (यहोशवा २४:१५).**

व्यक्तीच्या कृतीतून तिची इच्छा व्यक्त होते. मी माझी इच्छा टाकता नये तिचा उपयोग केला पाहिजे. आज्ञा पाळणे, देवाचा आत्मा स्वीकारणे हे मला माझ्या इच्छेनेच केले पाहिजे. देव मला सत्याचा दृष्टांत देतो. तो काय करणार हा प्रश्न कधीच येत नाही. मी काय करणार हाच प्रश्न आहे. देव आम्हा प्रत्येका समोर मोठे प्रस्ताव आणि योजना ठेवतो. तुम्ही येशूला ओळखले, देवाने पहिला स्पर्श केला ते आठवा. तेव्हा देवाला अनुसरणे सहज सोपे होते. देवाचा आत्मा तुमच्यासमोर नवा प्रस्ताव ठेवतो तेव्हा ते क्षण पुन्हा आठवा, लक्षात आणा.

"... तुम्ही कोणाची सेवा करणार हे आजच ठरवा..." हे आपोआप होणार नाही. तुम्ही जाणूनबुजून हे ठरवले पाहिजे. निर्णय होईपर्यंत तुमच्या जीवनातील इतर सर्व तटस्थ राहील. हे तुम्ही देवासमोर ठरवायचे आहे. त्यात "मानवांची मसलत घेऊ नका" (गलती १:१६). प्रत्येक नवा प्रस्ताव समोर आला की लोक आम्हांला अधिकच दुरावतात असे भासेल. मग तणाव येतात. देव तुम्हांला दुसऱ्या पवित्र जनांचा सल्ला महत्त्वाचा वाटू देतो. तुम्ही उचलेली पावले इतरांना समजतात का असा संभ्रम होतो. देव कोठे नेतो आहे हे शोधू नका. ते देव स्वतः तुम्हांला उकलून सांगेल.

"मी विश्वासू राहीन" असे उघड त्याला सांगा. येशू ख्रिस्ताशी विश्वासू राहण्याचे ठरवलेत की, "तुमचे तुम्ही साक्षी होता..." (यहोशवा २४:२२). दुसऱ्या ख्रिस्ती लोकांशी मलसत करु नका. "मी तुझी सेवा करणार" विश्वासू होण्याचे ठरवा आणि दुसऱ्यांना विश्वासू होण्याचे श्रेय द्या.

## जुलै ९

### आत्मपरीक्षण कराल का?

**“यहोशवा लोकांना म्हणाला, तुम्हांला परमेश्वराची सेवा करवणार नाही...” (यहोशवा २४:१९).**

देवाखेरीज तुम्ही दुसऱ्या कशावर तरी किंचित का होईना पण अवलंबून आहा काय? तुमच्यातील स्वभावगुण अगर विशिष्ट परिस्थिती यांवर अवलंबून आहात? देवाने तुमच्यासमोर हा नवा प्रस्ताव अगर ती नवी योजना ठेवली आहे त्यासंबंधात कोणत्या तरी प्रकारे स्वतःवर भरंवसा ठेवता आहात? शोधक प्रश्न विचारुन आत्मपरीक्षण कराल का? “मी पवित्र जीवन जगू शकत नाही?” हे म्हणणे खरे आहे? परंतु आपल्याला पवित्र करण्यास येशूला सांगावे हे तुम्हांला म्हणता येते ना? “तुम्हांला परमेश्वराची सेवा करता येणार नाही...” परंतु देवाचे सामर्थ्य तुमच्यामधून प्रवाहित व्हावे अशा मोक्याच्या ठिकाणी तुम्ही राहू शकता. देवाबरोबरचे तुमचे नाते त्याचे अद्‌भुत जीवन तुम्हांमधून व्यक्त व्हावे एवढे पुरे पडण्याजोगे आहे?

“लोक यहोशवाला म्हणाले, “आमचा देव परमेश्वर ह्याचीच आम्ही सेवा करणार!” (२४:२१). हे उतावळीने केलेले बोलणे नाही, हे स्वतःला नेमकेपणे बांधून घेणे आहे. आपण म्हणतो, “देवाने मला यासाठी पाचारण केलेच नसणार मी सर्वस्वी अपात्र आहे. *हे माझ्यासाठी* नाहीच! “हे तुमच्याचसाठी आहे आणि तुम्ही जेवढे अशक्त व दुबळे आहात तेवढे चांगले... स्वतःवर किंचितसा विसंबणारा माणूस, “मी परमेश्वराची सेवा करणार” असे म्हणू शकणार नाही.

आम्ही म्हणतो, “माझा विश्वास असता तर!” पण आपण विश्वास ठेवणार का हाच सवाल आहे. येशूने अविश्वासाच्या पापावर भर दिला आहे त्यात नवल काहीच नाही. “तेथे त्यांच्या अविश्वासामुळे त्याने फारशी अद्‌भुत कृत्ये केली नाहीत” (मत्तय १३:५८). देवाचे सांगणे यथार्थ असेल तर आम्ही कसे असू याची कल्पनाच न केलेली बरी! देव सांगतो ते स्वीकारण्यास माझी तयारी आहे?

## जुलै १०

### आत्मिक दृष्टीने आळशी पवित्रजन

**“प्रीती व सत्कर्मे करावयास उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष देऊ... एकत्र मिळणे न सोडता एकमेकांस बोध करावा...” (इब्री १०:२४-२५).**

आपण सर्वच आत्मिक दृष्टीने आळशी पवित्रजन होऊ शकतो, जीवनात सर्व शांत, चांगले असावे. एकांतात सुखाने आराम करता यावा हेच आपले उद्दिष्ट असते. पण इब्री १० मधील या वचनांमधून एकमेकांना उत्तेजन देऊन सर्वांनी एक व्हावे हेच सांगितले आहे. या दोहोंसाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. ख्रिस्ताचा साक्षात्कार, त्याची प्राप्ती होण्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलेले पाहिजे; एकांतवास करणे हे येशूने शिकवलेल्या आध्यात्मिकतेशी विसंगत आहे.

अन्याय, अधःपात, कृतघ्नपणा आणि गोंधळ या गोष्टी आम्हांला आत्मिक दृष्टीने आळशी करतात. हीच आत्मिकतेची कसोटी आहे. अशा प्रसंगी आपण प्रार्थना आणि पवित्र शास्त्र वाचन यात एकांतात स्वस्थता शोधतो. शांतता आणि आनंद याचसाठी आम्हांला देवाची गरज असते. येशू ख्रिस्त आम्हांला मौजेसाठी हवा, खरोखरी त्याची प्राप्ती व्हावी असे वाटत नाही. हे चुकीच्या दिशेने उचलेले पहिले पाऊल आहे.

पेत्राने म्हटले, “... तुम्हांस आठवण देऊन जागृत ठेवणे हे मला उचित वाटते” (२ पेत्र १:१३). आत्मिक उत्साहाने सळसळणाऱ्या व्यक्तीकडून याप्रकारे आमच्या मर्मावर आघात व्हावा हे नक्कीच अस्वस्थ करणारे आहे. प्रत्यक्ष कार्य आणि आत्मिक कृती या दोन्ही भिन्न गोष्टी आहेत. प्रत्यक्ष कार्य हे आत्मिक कृतीची नक्कल असू शकते. आम्हांला कोणी जागे केलेले आवडत नाही हाच आत्मिक आळशीपणातील खरा धोका आहे. जगापासून आत्मिक निवृत्ती आपण मागतो. पण येशू ख्रिस्त हे मान्य करीत नाही. तो म्हणतो, “जा, माझ्या भावांस सांगा...” (मत्तय २८:१०).

## जुलै ११

### आत्मिक दृष्टीने उत्साही पवित्रजन

**"... हे अशासाठी आहे की... मी ओळख करुन घ्यावी" (फिलिप्पै ३:१०).**

पवित्रजनाने आत्मसाक्षात्काराकडे नव्हे तर येशूला ओळखण्याकडे लक्ष द्यावे. आत्मिक दृष्टीने उत्साही पवित्रजन परिस्थिती आपोआप घडते असे म्हणत नाही आणि आपल्या जीवनाचे लौकिक व धार्मिक असे दोन भाग असल्याचे मानत नाही. प्रत्येक परिस्थिती येशू ख्रिस्ताचे अधिक ज्ञान मिळवण्याची संधी आहे असे तो मानतो. तो येशू ख्रिस्ताला सर्वार्थांनी शरण गेलेला असतो. आमच्या जीवनाच्या प्रत्येक भागात येशू ख्रिस्ताचा साक्षात्कार व्हावा हा पवित्र आत्म्याचा दृढ निश्चय आहे आणि हे साध्य होईपर्यंत तो आमची पाठ सोडत नाही. आत्मसाक्षात्काराने चांगल्या कामाचा गौरव होतो तर देवाचा पवित्रजन आपल्या चांगल्या कामांच्या द्वारे येशू ख्रिस्ताचे गौरव करतो. आम्ही खाणे, पिणे, शिष्यांचे पाय धुणे वगैरे काहीही करत असलो तरी त्यात येशू ख्रिस्ताचे सान्निध्य पाहणे आवश्यक आहे. आमच्या जीवनातील प्रत्येक भाग येशूच्या जीवनाचा एक अंशच आहे. आमच्या प्रभूने अगदी हलक्या कामातही पित्याशी असलेले नाते दाखवले. "... आपण देवापासून आलो व देवाकडे जातो हे जाणून... रुमाल घेऊन... शिष्यांचे पाय धुऊ लागला..." (योहान १३:३–५).

"मी त्याची ओळख करुन घ्यावी" हेच आत्मिक दृष्टीने उत्साही पवित्र जनाचे उद्दिष्ट असते. आज मी आहे तेथे त्याला ओळखतो का? नसेल तर मी त्याला उणा पडतो. आत्मसाक्षात्कारासाठी नव्हे तर येशू ख्रिस्ताला ओळखण्यासाठी मी येथे आहे. ख्रिस्ती कार्यात आमचा पुढाकार व प्रेरणा काम करायचे आहे व ते केले पाहिजे असेच असते. पण आत्मिक दृष्टीने उत्साही पवित्रजनाची वृत्ती अशी नसते. प्रत्येक प्रसंगात व परिस्थितीत येशू ख्रिस्ताचा साक्षात्कार साध्य करणे हेच त्याचे ध्येय असते.

## आत्मिक दृष्टीने स्वार्थी मंडळी

**“... ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा... मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहचू तोपर्यंत दिले” (इफिस ४:१३).**

समेट करणे म्हणजे संपूर्ण मनुष्यजात आणि देव ह्यांच्यामधील नातेसंबंध पुन्हा देवाने योजिले होते त्याप्रमाणे करणे. खंडणी भरुन प्राप्त केलेल्या उद्धारात येशू ख्रिस्ताने हेच साध्य केले आहे. मंडळी स्वार्थ साधण्यावर भर देते, आपल्याच संस्थांच्या विकासावर लक्ष लावते तेव्हा हेच घडते. मानवजातीचा समेट करण्यात त्याची योजना आमच्या वैयक्तिकच नव्हे तर सामुदायिक जीवनामध्येही पूर्ण व्हावी हाच उद्देश आहे. येशू ख्रिस्ताने याच हेतून प्रेषित व शिक्षक पाठवले. ख्रिस्त आणि त्याची मंडळी आणि अनेक अवयवांनी, सभासदांनी साकार झालेले ख्रिस्ताचे सामुदायिक व्यक्तित्व अस्तित्वात यावे, सर्वांस ज्ञात व्हावे, स्वतःचे आध्यात्मिक जीवन विकसित करावे, आत्मिक एकांतात मजेत राहावे यासाठी आम्ही येथे नाही. येशू ख्रिस्ताची मंडळी रचण्यासाठी त्याचा संपूर्ण साक्षात्कार मिळवावा यासाठी आम्ही येथे आहोत.

मी ख्रिस्त शरीराची रचना करत आहे का फक्त माझा विकास साधत आहे? “मी त्याला ओळखावे” (फिलिप्पै ३:१०). याचसाठी माझे त्याचे नाते असावे. देवाने माझ्यासाठी केलेली योजना पूर्ण करण्यासाठी मी स्वतःला सर्वस्वी त्याच्यावर सोपवले पाहिजे. सर्व काही माझ्यासाठी हवे असे म्हटले की हे नाते बिघडते. येशू ख्रिस्ताची अधिक ओळख करुन घेण्यात मला रस नाही तर त्याने माझ्यासाठी केले तेच जाणून घ्यायचे असेल तर माझी मोठी मानखंडना होईल. स्वतः देव हेच माझे ध्येय आहे काय? त्याच्याशिवाय अन्य मला काहीच नको असे आहे काय? हाच माझा मापदंड आहे का दुसरे काही आहे?

## जुलै १३

### दृष्टांताची किंमत

**“उज्जीया राजा मरण पावला त्या वर्षी प्रभूस... मी पाहिले...” (यशया ६:१).**

देवाबरोबर आमच्या आत्म्याचा वैयक्तिक इतिहास पाहिला तर त्यात आमच्या आदर्श व्यक्तींच्या मृत्यूचा वृत्तांतच दिसेल. देवाला वरचेवर आमच्या मित्रांना बाजूस सारुन स्वतःसाठी जागा करुन घेणे भाग पडते. अशा प्रसंगी आम्ही अडखळतो, अपुरे पडतो, निराश होतो. याचा व्यक्तिशः विचार करु या. देवासमान असलेली व्यक्ती माझ्या जीवनातून कायमची गेली तेव्हा जीवनातील सर्वकाही मी सोडून दिले? मी निराश होऊन आजारी पडलो का यशयाने पाहिले तसे प्रभू परमेश्वराला पाहिले?

देवाविषयीचा माझा दृष्टांत माझ्या स्वभावाच्या स्थितीवर अवलंबून आहे व सत्य माझ्यामध्ये प्रकट होईल का तेही माझ्या स्वभावावरुन ठरते. “मी प्रभूला पाहिले” असे म्हणण्यापूर्वी देवाशी समरुप असे काही माझ्या स्वभावामध्ये असणे आवश्यक आहे. मी नव्याने जन्मेन आणि खरोखर देवाचे राज्य पाहू लागेन तोवर मी फक्त माझ्याच पूर्वग्रह दूषित दृष्टीने पाहणार, देवाने शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे, त्याने बाह्य परिस्थितीच्या द्वारे आंतरिक शुद्धीकरण केले पाहिजे.

देव पहिल्याने, दुसऱ्याने देव आणि तिसऱ्यानेही देवच हे तुमचे अग्रक्रम असावे. तुमचे जीवन सतत देवासमोर उघडे असावे. तेथे अन्य काहीही जमेस धरलेले नसावे. तुमची प्रार्थना, “संपूर्ण जगात, हे प्रिय देवा, तुझ्याशिवाय दुसरे काहीही नाही. तुझ्याशिवाय अन्य कोणीही नाही.” किंमत चुकती करीत राहा, दृष्टांताला अनुरुप असे तुमचे जीवन आहे हे देवाला दिसू दे.

## जुलै १४

### क्लेश सोसणे आणि दोन कोस जाणे

**“मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर” (मत्तय ५:३९).**

खिस्ती असण्यातील मानखंडना या वचनातून उघड केली आहे. लौकिक क्षेत्रामध्ये एखाद्याने उलट प्रतिकार केला नाही तर तो भित्रा असतो म्हणून गप्प बसतो. पण आत्मिक जगामध्ये कोणी उलट प्रतिकार केला तर तो त्याच्यामध्ये देवाचा पुत्र असल्याचे प्रमाण आहे. तुमचा अपमान होतो तेव्हा तुम्ही त्यावर संतापून काही करु नये. ती संधी साधून देवाचा पुत्र आपल्यामध्ये असल्याचे प्रमाण दिले पाहिजे आणि येशूच्या स्वभावाची नक्कल कोणालाच करता येत नाही. येशूचा स्वभाव एकतर तुमच्यामध्ये असतो अगर नसतो. व्यक्तिगत अपमान ही आपल्यामधील प्रभू येशूची अद्‌भुत मधुरता प्रकट करण्याची सुसंधी पवित्रजनाला मिळते.

“आपले कर्तव्य करा” हे डोंगरावील प्रवचनातून शिकवलेले नसून “तुमचे कर्तव्य नसेल ते करा” हे शिकवले आहे. एका कोसाऐवजी दोन कोस जाणे, दुसरा गाल पुढे करणे हे तुमचे कर्तव्य नाही पण येशूने सांगितले आहे की आम्ही त्याचे शिष्य आहोत तर आम्ही नेहमी असल्या गोष्टी केल्या पाहिजेत. “याहून अधिक काही करता येणार नाही, माझ्याविषयी सर्वांनी गैरसमज करुन घेतले आहेत” असे आम्ही म्हणणार नाही. माझ्या हक्कांचा आग्रह धरला तर मी देवाच्या पुत्राला दुखावतो पण मी ते ठोसे स्वतःवर घेतले त्यातही येशूला इजा होते, त्याला मी आळा घालू शकत नाही. “खिस्ताच्या क्लेशातले जे उरले आहे ते मी आपल्या देहाने... भरुन काढीत आहे” (कलस्सै १:२४). याचा हाच खरा अर्थ आहे. आपल्या जीवनात स्वतःचा नव्हे तर खिस्ताचा मानसन्मान पणास लागला आहे हे शिष्य ओळखतो.

दुसऱ्यांच्यामध्ये नीतिमत्व शोधू नका पण स्वतः मात्र नेहमी नीतिमान राहा. आपण नेहमी न्यायाची मागणी करतो परंतु न्यायाची अपेक्षा करु नका, पण नेहमी न्याय देत राहा, न्यायाने वागा.

## जुलै १५

### माझ्या जीवनाचा आत्मिक सन्मान आणि कर्तव्य

**"हेल्लेणी व बर्बर... ह्यांचा मी ऋणी आहे"** (रोम १:१४).

आपण येशू ख्रिस्ताचे कायमचे ऋणी आहो याची तीव्र जाणीव पौलाला होती आणि त्याने आपल्या संपूर्ण आयुष्यात हेच पुन्हा पुन्हा व्यक्त केले आहे. येशू ख्रिस्त आपला आध्यात्मिक सावकार आहे हीच पौलाच्या जीवनाची महान प्रेरणा होती. तारण न झालेल्या प्रत्येक आत्म्याबद्दल आपण ख्रिस्ताचे ऋणी आहो अशी जाणीव होते का? पवित्रजन म्हणून या हरवलेल्या आत्म्यांच्या संबंधात माझ्यावर असलेले ख्रिस्ताचे कर्ज मी फेडावे हाच माझ्या जीवनाचा आत्मिक सन्मान आणि कर्तव्य आहे. माझ्या जीवनात जे काही मोलाचे आहे ते सर्व येशू ख्रिस्ताने साधलेल्या उद्धारामुळे मला मिळाले आहे. दुसऱ्यांच्या जीवनातही त्याला हाच उद्धार आणता यावा यासाठी मी काही करीत आहे काय? माझ्यामध्ये या कर्जची जाणीव देवाच्या आत्म्याने ठेवली की मी हे करु शकेन.

मी लोकांमधील एक श्रेष्ठ नाही. मी तर प्रभू येशूचा दास आहे. पौलाने म्हटले आहे, "... आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही... तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा..." (१ करिंथ ६:१९–२०). पौल स्वतः येशू ख्रिस्ताला विकलेला होता. त्याच्या सांगण्याचा भावार्थ असा, "येशूच्या सुवार्तेमुळे मी या पृथ्वीवरील प्रत्येकाचा ऋणी आहे; मी सर्वस्वी येशूचा दास व्हावे एवढ्याचसाठी मोकळा आहे." आत्मिक मान आणि कर्तव्य यांचे वास्तव रुप स्पष्ट झाले की ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनाचे हेच लक्षण होते. स्वतःसाठी प्रार्थना करण्याचे सोडून द्या आणि येशूचा दास म्हणून दुसऱ्यांसाठी तुमचे जीवन खर्च करा. मोडलेली भाकर व ओतलेला द्राक्षारस याचा वास्तव जीवनात हाच अर्थ आहे.

## जुलै १६

### ईश्वरी नियंत्रणाची संकल्पना

**"... तर तुमच्या स्वर्गातील पित्याजवळ जे मागतात त्यांना तो किती विशेषेकरुन चांगल्या देणग्या देईल?" (मत्तय ७:११).**

येशूचा आत्मा ज्यांच्याठायी आहे त्यांच्यासाठी त्याने येथे वर्तणुकीचे नियम लावून दिले आहेत. प्रत्येक गोष्टीवर देवाचे नियंत्रण आहे ही जाणीव कायम मनीमानसी वागवावी हेच तो आम्हांला सांगतो आहे. शिष्याने पूर्ण भरंवसा ठेवून मागण्यास व शोधण्यास सतत तयार असले पाहिजे.

देव समीप आहे हा विचार मनात भरलेला असावा. या विचाराने तुमचे मन पूर्णपणे व्यापले की अडचणी आल्या तर माझ्या "स्वर्गीय पित्याला याविषयी सर्व माहित आहे," हे तुम्ही सहज म्हणाल. प्रत्येक गोष्टीवर देवाचे नियंत्रण आहे हे तुम्ही मनाशी दृढ धरले की पूर्वी अडचणी आल्या की तुम्ही चार लोकांना सल्ला विचारीत होता, पण आता तसे करणार नाही. सरळ ते देवाला सांगाल. येशूचा आत्मा ज्यांना आहे त्यांच्यासाठी त्याने वर्तणुकीचे नियम लावून दिले आहेत. त्यामागील तत्व आहे : देव माझा पिता आहे, तो माझ्यावर प्रीती करतो, तो मला कधीच विसणार नाही; मग मी चिंता कशाला करु?

येशूने म्हटले, काही वेळा अशा येतील की तेव्हा देव अंधकाराचे पटल दूर करणार नाही. त्यावेळी त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे. केव्हा देव निर्दय मित्र आहे असे भासेल, कधी तो पित्याला शोभणार नाही असा वागेल, केव्हा तो अन्यायी न्यायाधीशासारखा वाटेल पण वस्तुतः असा तो कधीच नसतो. तेव्हा परिपूर्ण भरंवशाने त्याच्यावर विसंबून राहा. सर्व गोष्टींच्या मागे देवाचा मनोदय आहे हा विचार मनी ठेवावा. सर्वकाही त्याच्या इच्छेने घडते. प्रार्थना मनाची प्रवृत्ती असते आणि त्यात मागणे स्वाभाविकच असते, "मागा, म्हणजे तुम्हांस दिले जाईल..." (७:७).

जुलै १७

## विश्वासाचा चमत्कार

**“माझे भाषण व माझी घोषणा ज्ञानयुक्त अशा मन वळविणाऱ्या शब्दांची नव्हती” (१ करिंथ २:४).**

पौल विद्वान आणि उत्तम वक्ता होता. तो येथे अतिशय नम्रपणे बोलत नाही, तर लोकांबरोबर बोलताना वक्तृत्वकलेचा आधार घेतला तर आपण देवाचे सामर्थ्य झाकून ठेवल्यासारखे होईल; येशूवरील विश्वास चमत्कार असून तो प्रभावी उद्धाराने साध्य होतो. प्रभावी भाषण, अगर मन धरणी केल्याने विश्वासाचा उद्‌भव होत नाही तर तो केवळ देवाच्या सामर्थ्याने उगम पावतो. उद्धाराची सर्जनशील शक्ती सुवार्तेची घोषणा केल्याने साकार होतो, ती उपदेशकाच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे कधी येत नाही.

उपदेशकाने खरोखर प्रभावी उपास करावा; या उपासात अन्न सेवन करायचे नाही असे नाही तर हा उपास वक्तृत्वाचा आहे; प्रभावी शब्दयोजना आणि देवाची सुवार्ता लोकांच्यापर्यंत पोचण्यास अडथळा येईल अशा सर्व बाबींविषयी हा उपास असेल. उपदेशक केवळ देवाचा प्रतिनिधी असतो म्हणजे “देवच आम्हांकडून विनवत असल्यासारखे” (२ करिंथ ५:२०). देवाची सुवार्ता सादर करणे हेच उपदेशकाचे काम असते. केवळ माझा उपदेश ऐकून आपण सुधारावे असे लोकांना वाटले तर ते कधीच येशू ख्रिस्ताजवळ येणार नाहीत. माझ्या सुवार्ता सांगण्यामध्ये माझी “वाहवा” झाली तर मी येशूबरोबर द्रोह केला असे होईल आणि त्याच्या उद्धारकार्याच्या नवनिर्मितीक्षम शक्तीला मी तिचे कार्य करण्यापासून रोखले असे होईल.

*“आणि मला पृथ्वीपासून उंच केले तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन” (योहान १२:३२).*

## जुलै १८

### विश्वासाचे रहस्य

**“तेव्हा तो म्हणाला, प्रभो, तू कोण आहेस?” (प्रे. कृ. ९:५).**

तारणाच्या चमत्काराने निग्रही, परुशी असणाऱ्या तार्सकर शौलाचा पालट झाला. तो प्रभू येशूचा नम्र, निष्ठावान दास झाला. उलगडा करता येतो अशा गोष्टीत अद्‌भुत आणि रहस्यमय असे काहीच नसते. आम्हांला उलगडून सांगता येते त्यावर आमचे नियंत्रण असते आणि प्रत्येक गोष्टीची उकल व्हावी असे म्हणणे स्वाभाविक आहे. आज्ञापालन करणे स्वाभाविक नाही आणि अवज्ञा करणे हे पाप असतेच असेही नाही. आज्ञा देणारा कोण आहे, त्याचा अधिकार काय आहे हे लक्षात येते. अशी स्थिती नसेल तर दुसऱ्याने केलेला आज्ञाभंग आज्ञा देणाऱ्याला “हे त्याचे स्वातंत्र्य आहे,” असेच वाटेल. “तू हे केले पाहिजे” “तुला ते करावे लागेल,” असे बोलून एक दुसऱ्यावर अधिकार गाजवतो तर तो त्याचा हिरमोड करतो त्यामुळे तो देवाला योग्य राहात नाही. आज्ञापालन करण्यामागे पवित्र देवाचा अधिकार नसेल तर अशा आज्ञा पाळणारा केवळ गुलाम असतो!

लोकांनी धर्मनिष्ठपणा सोडला तर ते देवाकडे येऊ लागतात कारण मानवी हृदयाचा एकच स्वामी आहे तो धर्म नव्हे तर येशू ख्रिस्त आहे. परंतु त्याला पाहिल्यानंतर त्याचे आज्ञापालन केले नाही तर “मला हाय! हाय!” (यशया ६:५ तसेच ६:१ पहा). मी आज्ञापालन केलेच पाहिजे असा येशूचा आग्रह नाही. पण आज्ञापालन केले नाही तर माझ्या आत्म्यामध्ये मी देवाच्या पुत्राच्या मृत्यूच्या प्रमाणपत्रावर सही केलीच असे समजावे. येशू ख्रिस्तासमोर उभे राहून म्हणतो, “मी आज्ञा पाळणार नाही” तर तो आग्रह धरणार नाही मात्र हे करुन मी त्याच्या तारणदायी सामर्थ्याकडे पाठ फिरवतो आणि मी प्रकाश नाकारला तर मला “हाय, हाय!” (पहा योहान ३:१९–२१).

## जुलै १९

### विश्वासणाऱ्याची शरणागती

**"तुम्ही मला गुरु व प्रभू असे संबोधिता आणि ते ठीक बोलता कारण मी तसा आहेच" (योहान १३:१३).**

आमच्यावर अधिकार चालवण्याविषयी आमचा प्रभू आग्रही नाही. "तुम्ही माझ्या अधीन व्हा," असे तो कधीही सांगत नाही. तो आम्हांला निवडीचे स्वातंत्र्य देतो. आम्ही वाटल्यास दुसऱ्यांसारखे त्याला ठार करावे. तो शब्दही बोलणार नाही. तारणाच्या द्वारे माझ्यामध्ये त्याचे जीवन आले की त्याचा अधिकार माझ्यावर चालतो. मी म्हणतो, *"हे प्रभू, तू योग्य आहेस..."* (प्रकटी ४:११). माझ्यातील अपात्रतेमुळे मी त्याच्यासमोर नतमस्तक होत नाही. माझ्यापेक्षा अधिक पवित्र असा कोणी भेटला तर माझ्यातील अपात्रतेमुळे मी त्याचे ऐकत नाही. अशा लोकांच्या द्वारे देव आम्हांला शिकवीत असतो. आम्ही आपण होऊन अधीन होईपर्यंत तो याप्रकारे आम्हांला शिकवतो. मग आज्ञा पाळण्याकडे आमची प्रवृत्ती होते.

आज्ञापालनाविषयी आमचा प्रभू आग्रही असता तर तो केवळ सक्तीने काम करुन घेणारा धनी झाला असता. आम्ही त्याला ओळखले की मग आम्ही लगेच आज्ञा पाळतो. तो आमच्या जीवनाचा प्रभू होतो. आम्ही सतत त्याच्याविषयी मनी पूज्य भाव ठेवतो. आज्ञापालन केल्याने माझी कृपेमध्ये वाढ होते. पिता आणि पुत्र ह्या नात्यात पुत्र सतत आज्ञापालन करतो. आपल्या प्रभूच्या नात्याचेही असेच आहे. धनी व चाकर यांच्यातील नाते वेगळे असते तेथे खुशीने आज्ञापालनाचा प्रश्न येतच नाही. "मी आणि माझा पिता एक आहो..." (योहान १०:३०). या शब्दांनी येशूने हे नाते दाखवले आहे. "तो पुत्र असूनही त्याने जे दुःख सोसले तेणेकरुन तो आज्ञाधारकपणा शिकला" (इब्री ५:८).

जुलै २०

## देवाच्या समक्षतेवर अवलंबून असणे

**“परमेश्वरावर आशा धरून राहणारे... चालतील तरी थकणार नाहीत” (यशया ४०:३१).**

चालण्यामध्ये काही कौतुक नाही! चालले तरी थकायचे नाही हे शक्तीचे एक गमक आहे. पवित्र शास्त्रामध्ये चालण्यावरुन व्यक्तीचा स्वभाव व्यक्त झाला आहे. “... योहान... येशूला जाताना... पाहून म्हणाला, हा पाहा देवाचा कोकरा” (योहान १:३५-३६). देव कधी “आत्मिक हो” असे म्हणत नाही तर *“तू माझ्यासमोर आहेस हे मनात वागवून चाल...”*(उत्पत्ती १७:२) हे तो सांगतो.

आम्ही शारीरिक आणि भावनिक दृष्टीने अस्वस्थ असतो तेव्हा आम्ही काही चित्तथरारक हवे असे म्हणतो. आत्मिक जीवनात आम्ही “गरुडाच्या पंखांनी” (यशया ४०:३१) उडण्याचा प्रयत्न करतो, त्यात आमची नैतिकता व आत्मिकता दोन्ही धुळीस मिळतात. देवाच्या सान्निध्याचे वास्तव अनुभवणे हे विशिष्ट परिस्थितीत अगर ठिकाण आणि समय यांवर अवलंबून नसते. त्याची समक्षता हवी तर प्रभूला सतत आमच्यासमोर ठेवले पाहिजे. त्याच्या समक्षतेच्या वास्तवावर आमचा भरंवसा उरला नाही की मग समस्या येतात. स्तोत्रकर्त्याचा अनुभव पाहा, “... तरी आम्ही भिणार नाही...” (स्तोत्र ४६:२, ३). त्याच्या समक्षतेचे सत्य आमच्या अंतरंगात ठसले की मग आम्हांला समजेल. “तो सर्वकाळ येथेच आहे!” आमच्या जीवनातील कठीण प्रसंगात देवाचे मार्गदर्शन घेणे आवश्यकच असते. परंतु प्रत्येक बाबतीत, “हे प्रभू, यात मला मार्ग दाखव, त्यात मला सल्ला दे!” असे म्हणणे योग्य नाही. वस्तुतः तो हे करीतच असतो. आमचे रोजचे निर्णय त्याच्या इच्छेप्रमाणे नसतील तर तो आम्हांला आवरुन धरील अशा वेळी त्याची प्रतीक्षा करणे हेच श्रेयस्कर.

## जुलै २१

### स्वर्गराज्याचे प्रवेशद्वार

**"जे आत्म्याने 'दीन' ते धन्य..." (मत्तय ५:३).**

आमचा प्रभू केवळ शिक्षक आहे असा चुकीचा समज नको. येशू ख्रिस्त केवळ शिक्षकच असेल तर त्याने समोर ठेवलेल्या मापदंडाला मी पुरे पडणार नाही. माझ्या पदरी कायम निराशाच येईल. तो मापदंड माहीतच नसता तर बरे झाले असते असे वाटते. जे कधी होणे शक्य नाही ते मला सांगण्यास काय हाशील? अंतःकरणाने शुद्ध व्हा (५:८). माझ्या कर्तव्याहून अधिक करा, देवाशी पूर्णपणे एकनिष्ठा असा हे मला सांगून काय फायदा? येशू ख्रिस्ताचे शिक्षण समजण्यासाठी प्रथम मी त्याला तारणारा म्हणून ओळखले पाहिजे. देवाच्या आत्म्याने माझा नवा जन्म झाला म्हणजे लक्षात येते की येशू ख्रिस्त फक्त शिक्षण देण्यासाठी आला नाही, तर मी जसे व्हावे हे तो शिकवतो त्याप्रमाणे मला करण्यासाठी आला आहे. येशू ख्रिस्ताच्या जीवनावर नियंत्रण ठेवणारा त्याचा स्वभाव त्याच्याकडे येणाऱ्यामध्ये ठेवणे हाच तारणाचा अर्थ आहे. देवाने आम्हांला दिलेले सर्व मापदंड याच स्वभावावर आधारलेले आहेत.

डोंगरावरील प्रवचनातील शिकवण दैहिक मनुष्यामध्ये निराशा उत्पन्न करते. आमच्या प्रभूचे शिक्षण आम्ही अमलात आणू अशा काही कल्पना आमच्या मनात असल्या तर आम्ही स्वतःचे अज्ञान प्रकट करीपर्यंत देव आम्हांला आमच्या वाटेने जाऊ देतो. मग आम्ही दीन असे त्याच्याकडे आलो की त्याच्याकडून मिळते ते घेतो. "... आत्म्याने दीन ते धन्य..."देवाच्या राज्याचे हेच पहिले तत्त्व आहे. दारिद्र्य हे येशू ख्रिस्ताच्या राज्याचे आधारतत्त्व आहे. हेच स्वर्गराज्याचे प्रवेशद्वार आहे. आमच्या गरीबीचे ज्ञान झाले की मग येशू ख्रिस्त आमच्यामध्ये आपले कार्य करतो.

## जुलै २२

### पवित्रीकरण

**“कारण देवाची इच्छा ही आहे की, तुमचे पवित्रीकरण व्हावे...” (१ थेस्सल ४:३).**

*मरणाची बाजू.* पवित्रीकरणामध्ये देव आमच्यामध्ये जीवन व मरण अशा दोन्ही बाजूंनी कार्य करतो. पवित्रीकरणात आपण मरणापर्यंत आले पाहिजे. पवित्रीकरण होण्यापूर्वी अंतरंगात प्रचंड संघर्ष होतो. पवित्रीकरण म्हणजे काय ते पवित्र आत्म्याने सांगितले की हा संघर्ष सुरु होतो. येशूने म्हटले, “जर कोणी माझ्यामागे येईल... आणि आपल्या जिवाचाही द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही” (लूक १४:२६).

पवित्रीकरणाच्या प्रक्रियेमध्ये देव माझ्यामधील सर्वकाही दूर करुन फक्त मला स्वतःला ठेवील. हेच मृत्युस्थल आहे. मी फक्त स्वतः एवढाच होण्यास तयार आहे? मित्र, आई, बाप, भाऊ, बहिणी, स्वार्थ नको म्हणण्यास तयार आहे? मरण पुरेसे आहे असे म्हणतो? हीच पवित्रीकरणाची अट आहे. येशूने म्हटले, “मी पृथ्वीवर शांतता आणावयास नव्हे तर तरवार चालवावयास आलो आहे” (मत्तय १०:३४). येथे आम्ही अडखळतो. येशू ख्रिस्ताच्या मरणाशी समरुप होण्याचे आम्ही नाकारतो; म्हणतो हे फारच कठोर आहे. तो माझ्याकडून नक्कीच हे मागत नाही. पण आमचा प्रभू खरेच कडक आहे. प्रत्येकाकडून त्याला हेच हवे आहे.

मी फक्त “मी” होण्यास तयार आहे. एकदा मी केवळ स्वतःला त्याच्या स्वाधीन केले की तो लगेच मला संपूर्णपणे पवित्र करील आणि माझे जीवन इतर सर्व फापटपसाऱ्यापासून मुक्त होऊन केवळ देवासाठी असेल (पहा १ थेस्सल ५:२३—२४).

“हे प्रभू, पवित्रीकरण म्हणजे काय ते मला दाखव,” अशी प्रार्थना केली की तो मला ते दाखवील. पवित्रीकरणात येशू माझ्यामध्ये काही ठेवतो असे नाही तर तो स्वतः माझ्यामध्ये येतो (पहा १ करिंथ १:३०).

## जुलै २३

### पवित्रीकरण

**“त्याच्याकडून तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहा, तो... आपल्याला... पवित्रीकरण असा झाला आहे” (१ करिंथ १:३०).**

*जीवनाची बाजू.* येशू ख्रिस्त माझ्यासाठी पवित्रीकरण झाला आहे हे विश्वासाने मी स्वीकारल्यावर लगेचच त्याचे परिपूर्ण गुण देणगी म्हणून मला मिळतात. पवित्रीकरण म्हणजे येशूची पवित्रता माझी होऊन माझ्या जीवनातून प्रकट होते.

पवित्र जीवन जगण्याचे अद्भुत रहस्य येशूचे अनुकरण करणे हे नसून येशूचे परिपूर्ण गुण माझ्या मानवी देहातून प्रकट होऊ देणे हेच आहे. पवित्रीकरण म्हणजे, “तुम्हामध्ये ख्रिस्त...” (कलस्सै १:२७). पवित्रीकरणामध्ये त्याचे अद्भुत जीवन देवाच्या सार्वभौम कृपेचा देणगी म्हणून विश्वासाने स्वीकारायचे आहे. देवाच्या वचनामध्ये आहे त्याप्रमाणे पवित्रीकरण माझ्या जीवनात खरे, वास्तव करण्यास माझी तयारी आहे काय?

पवित्रीकरण म्हणजे येशू ख्रिस्ताचे पवित्र गुण मला देणे. पवित्र झालेल्या प्रत्येक आत्म्यामध्ये येशूचे धीर, प्रीती, पवित्रता, शुद्धता आणि सात्विकता हे गुण दिसून येतात. पवित्रीकरणात येशूकडून पवित्र होण्याची शक्ती मिळवणे नव्हे तर त्याच्यामध्ये असलेले पावित्र्य त्याच्याकडून घेणे. पवित्रीकरण मला दिले आहे. प्रत्येक गोष्टीची परिपूर्णता येशू ख्रिस्तामध्ये आहे. त्याच्यामध्ये असलेली सर्व परिपूर्ण गुणवत्ता मला उपलब्ध आहे. त्यामुळे मी हळुहळू नेमकेपणे सुव्यवस्था, निर्दोषता आणि पवित्रता यांचे जीवन जगतो आणि मी “देवाच्या शक्तीने विश्वासाच्या योगे रक्षिलेले आहा” (१ पेत्र १:५).

## जुलै २४

### त्याचा स्वभाव आणि आमचे हेतू

**“... शास्त्री व परुशी ह्यांच्यापेक्षा तुमचे नीतिमत्व अधिक झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुमचा प्रवेश होणारच नाही” (मत्तय ५:२०).**

चांगले करणे नव्हे तर चांगले हेतू असणे हेच शिष्याचे गुणलक्षण आहे; कारण त्याला देवाच्या अद्‌भुत कृपेने चांगले केलेले असते. योग्य करण्यासाठी प्रथम योग्य असणे गरजेचे आहे. जो कोणी स्वीकारील त्याच्याठायी नवा वारसा ठेवण्यासाठी येशू ख्रिस्त आला. या नव्या वारशामधील नीतिमत्व शास्त्री व परुशी ह्यांच्याहून अधिक आहे. येशू जणू सांगतो आहे, “तुम्ही माझे शिष्य आहात तर तुमची कृत्ये योग्य हवीत आणि तुमचे हेतू, आकांक्षा, अंतरंगातील विचार हे सर्वच योग्य, रास्त असले पाहिजे. तुमचे हेतू अत्यंत शुद्ध असावेत, देवाला त्यात नाव ठेवण्यास अजिबात वाव मिळता नये. देवाच्या सनातन प्रकाशात उभे राहणे, त्याला नाव ठेवण्यास काडीइतकाही वाव मिळू नये हे कोणाला शक्य आहे? देवाचा पुत्र येशू ख्रिस्त ह्यालाच ते शक्य आहे. त्याने साधलेल्या तारणाच्या द्वारे तो कोणाहीमध्ये आपला स्वतःचा स्वभाव ठेवून त्या व्यक्तीला निरागस बालकासारखे शुद्ध व साधेसरळ करु शकतो. देवाला अपेक्षित असलेली शुद्धता मला आतून नवे केले तरच शक्य आहे आणि आपल्या तारणाच्या द्वारे येशू नेमके हेच करतो.

नियम पाळल्याने कोणी स्वतःला शुद्ध करु शकत नाही. येशू ख्रिस्त आम्हांला नियम आणि कायदे लावून देत नाही. तो आम्हांला आपली सत्य शिकवण देतो. त्याने आमच्यामध्ये ठेवलेल्या आपल्या स्वभावाच्या द्वारे त्या सत्यांचा अर्थ समजतो. तो आमची वंशपरंपरा बदलतो. मानवी स्वभाव न बदलता तो त्याचा स्रोत बदलतो व परिणामी हेतूही बदलतात.

## जुलै २५

### मी असा धन्य आहे?

**"... ते धन्य..." (मत्तय ५:३-११).**

येशूने केलेली ही विधाने पहिल्याने अगदी साधी वाटतात. त्यात चकित होण्यासारखे काहीच दिसत नाही. ती आमच्या अंतर्मनात राहतात. हे धन्यवाद प्रथम मनाला शांती देणारे आहेत. ते खूपच आत्मिक असून निष्क्रिय लोकांच्या कामाचे आहेत असे वाटते. पण आमच्यासारख्या सतत कामात असणाऱ्या धावपळीच्या जगातील लोकांसाठी त्यांचा काही उपयोग नाही. तथापि ह्या "धन्यवादांमध्ये पवित्र आत्म्याची" स्फोटक शक्ती आहे असे दिसते आणि आमच्या जीवनातील परिस्थितीनुसार त्यांचा "स्फोट" होतो. पवित्र आत्मा त्यातील एखाद्या धन्यवादाचे स्मरण देतो तेव्हा आपण म्हणतो, "किती अद्भुत विधान." त्याच्या आज्ञा पाळल्याने आमच्या परिस्थितीत जी आत्मिक उलथापालथ होईल ती स्वीकारायची का नाही त्याचा निकाल आपणच केला पाहिजे. देवाचा आत्मा असेच कार्य करतो. डोंगरावरील प्रवचनाचे शब्दशः पालन करण्यासाठी आम्ही नव्याने जन्मण्याची गरज नाही. डोंगरावरील प्रवचनाचा शब्दशः अर्थ एखाद्या मुलाला पण करता येईल. पण प्रभूची ही वचने देवाचा आत्मा आमच्या परिस्थितीला लागू करतो त्याचा नेमका अर्थ लावणे हे कठीण काम पवित्रजनच करु जाणे.

आम्ही एकंदर गोष्टींकडे स्वाभाविक दृष्टीने पाहतो, त्याच्याशी तुलना करता येशूची शिकवण सहज पचनी पडण्यासारखी नाही. आरंभी त्यामुळे आम्ही बेचैन होतो. हे शिक्षण पवित्र आत्मा आम्हांला लागू करतो तेव्हा हळूहळू आम्ही त्याला अनुरुप वर्तन ठेवले पाहिजे. डोंगरावरील प्रवचनामध्ये नियम आणि कायदे एवढेच नाही तर पवित्र आत्मा आमच्या जीवनात मुक्तपणे कार्य करु लागला की आपणाला जगता येईल त्या जीवनाचे चित्रण आहे.

## जुलै २६

### शुद्धतेचा मार्ग

**“जे तोंडातून निघते ते अंतःकरणांतून येते... कारण अंतःकरणांतूनच दुष्ट कल्पना, खून, व्यभिचार, जारकर्मे, चोऱ्या, खोट्या साक्षी, शिव्यागाळी हे निघतात. ह्या गोष्टी माणसाला विटाळवितात” (मत्तय १५:१८—२०).**

आपण आपल्या अज्ञानाला भोळसटपणा समजतो आणि पुढे या भोळसटपणालाच शुद्धता म्हणतो. पुढे आमच्या प्रभूची ही कठोर विधाने कानी पडतात तेव्हा म्हणतो, “माझ्या अंतःकरणात या गोष्टी असतील याची मला कल्पनाही नव्हती.” त्याचे परखड बोलणे आम्हांला रुचत नाही. येशू ख्रिस्त मनुष्याच्या अंतःकरणावर सर्वश्रेष्ठ अधिकारी आहे. अगर त्याच्याकडे लक्ष देण्याची गरजच नाही. हे दोनच पर्याय आहेत. माझ्या अंतःकरणाचा भेद करणारे त्याचे वचन खरे मानावयास मी तयार आहे? का मला माझे “निरागस आज्ञानच” पसंत आहे? स्वतःकडे प्रामाणिकपणे पाहिले आणि माझे तथाकथित निरागसपण कसोटीस लावले तर मी लगेच भानावर येईन आणि येशू ख्रिस्त सांगतो ते खरे असल्याची खात्री पटेल आणि माझ्यामध्ये असलेल्या दुष्टतेच्या शक्यता लक्षात आल्या की मलाच भयाने कापरे भरेल. पण माझ्या “निरागसतेच्या” आवरणाखाली मी असतो तेव्हा मी मूर्खांच्या नंदनवनात राहत असतो. मी उद्धटपणे न वागता शांत राहतो तर त्याला माझे भित्रेपण आणि सभ्यपणे राहिल्याने मिळणारे सरंक्षण हेच कारण आहे, परंतु देवासमोर पूर्णपणे उघड झालो तर येशू ख्रिस्ताने माझे योग्य निदान केले आहे हेच लक्षात येईल.

येशू ख्रिस्ताने साधलेले तारणच मला सुरक्षित ठेवते. मी सर्वस्वी त्याला शरण गेलो की मग मला कसलेच भय नाही. माझ्या प्रयत्नांनी मला शुद्ध होणे शक्य नाही. पवित्र आत्मा माझ्यामध्ये आला की तो येशू ख्रिस्ताची वृत्ती माझ्यामध्ये आणतो आणि तो स्वतःच ही वृत्ती आहे.

जुलै २७

## ज्ञानाचा मार्ग

**“जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करावयाची मनीषा बाळगील त्याला ही शिकवण देवापासून आहे किंवा मी आपल्या मनचे बोलतो हे समजेल” (योहान ७:१७).**

आत्मिक समज येण्यासाठी बौद्धिक खटपट करण्याची गरज नाही त्यासाठी आज्ञापालन पुरेसे आहे. विज्ञान समजण्यासाठी बौद्धिक कुतूहल आवश्यक आहे. पण येशू ख्रिस्ताची शिकवण समजण्यासाठी आज्ञापालनच आवश्यक आहे. आत्मिक गोष्टी समजण्यात अडचण आली तर जीवनात कोठेतरी आज्ञाभंग झाला हे लक्षात घ्यावे. अज्ञानाने बौद्धिक अंधार येतो, आत्मिक अंधार मी आज्ञा न पाळल्याने येतो.

देवाकडून वचन मिळण्यासाठी त्याविषयीच्या परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. आज्ञा मोडून आमची आत्मिक वाढ का होत नाही हा प्रश्न विचारणे व्यर्थ आहे. येशूने म्हटले, “ह्यास्तव तू आपले दान अर्पिण्यास वेदीजवळ आणीत असता आपल्या भावाच्या मनात आपल्याविरुद्ध काही आहे असे तुला स्मरण झाले, तर तेथेच वेदीपुढे आपले दान तसेच ठेव आणि निघून जा; प्रथम आपल्या भावाबरोबर समेट कर मग येऊन आपले दान अर्पण कर” (मत्तय ५:२३–२४). जणू तो सांगतो आहे, “एक शब्दही बोलू नको; प्रथम सर्व ठीक कर, आज्ञा पाळ.” येशूची शिकवण आमच्या अंतःकरणाचा ठाव घेते. त्याच्यासमोर आमच्या ढोंगाचा बुरखा नक्कीच फाटणार. तो आम्हांला संपूर्ण शिक्षण देतो. देवाचा आत्मा आत्मसमर्थनाची आमची वृत्ती उखडून टाकतो आणि आम्हांला प्रत्येक बाबतीत संवेदनशील करतो.

येशू आपल्या वचनातून तुम्हांला काही कळवतो तेव्हा त्याप्रमाणे करा. नाहीतर तुम्ही ढोंगी धार्मिक व्हाल. आजवर उपेक्षा केलेल्या गोष्टींचा फेरविचार करा मग आपली वाढ का होत नाही ते तुम्हांला समजेल. येशूने म्हटल्याप्रमाणे “प्रथम... निघून जा...” देव सांगतो ते केलेच पाहिजे. मग कोणी काहीही म्हणो.

## जुलै २८

### उद्देश परमेश्वराचा का माझा?

**“तुम्ही मचव्यात बसून पलीकडे बेथसैदा येथे जा, असे सांगून त्याने लागलेच शिष्यांना लावून दिले” (मार्क ६:४५).**

येशू ख्रिस्ताने आम्हांला काही करण्यास भाग पाडले; आम्ही त्याप्रमाणे केले तर तो आम्हांला मोठे विजय मिळवून देईल असे आम्हांला वाटते. विजयाची आमची स्वप्ने हाच देवाचा आमच्यासाठी उद्देश आहे असा विचार कधीही मनात आणू नये. आम्हांला वाटते देव आम्हांला विशिष्ट ध्येयाकडे नेत आहे. पण तसे नसते. आम्ही एखादे विशिष्ट ध्येय साध्य करतो का हे महत्त्वाचे नाही. एखादे विशिष्ट ध्येय साधण्याची प्रक्रिया हेच देवाच्या दृष्टीने उद्दिष्ट असते.

देवाने माझ्यासाठी नेमलेल्या उद्देशाविषयी माझी दृष्टी काय आहे? मी त्याच्यावर अवलंबून राहावे, त्याच्या शक्तीवर विसंबावे हाच त्याचा माझ्यासाठी उद्देश आहे. जीवनाच्या धकाधकीत मी शांत, विश्वासू आणि स्थिर राहिलो तर माझ्यामध्ये देवाचा उद्देश साध्य झालाच. मी त्याला “पाण्यावरुन चालताना” पाहावे हीच त्याची इच्छा आहे (६:४९). परिणामाने नव्हे तर चालू असणाऱ्या प्रक्रियेनेच देवाचे गौरव होते.

देव आत्तासाठीच शिक्षण देतो, ते नंतरसाठी नसते. त्याचा उद्देश भविष्य काळासाठी नसून आत्तासाठीच आहे. आज्ञापालन केल्यावर काय होणार त्याची चिंता नको. लोक ज्याला तयारी म्हणातात तेच देवाच्या दृष्टीने ध्येय असतो.

माझ्या जीवनाच्या वादळावरुन त्याला चालताना पाहावे हीच देवाची इच्छा आहे. आमच्या मनात दुसरेच ध्येय असेल तर सध्याच्याकाळाकडे आम्ही लक्ष देत नाही असे होईल. क्षणोक्षणी आज्ञापाळणे हा उद्देश असेल तर प्रत्येक क्षण बहुमोलाचा होईल.

## जुलै २९

### तुमच्या मेघांमध्ये तुम्हांला येशू दिसतो?

**“पाहा, तो मेघांसहित येतो...” (प्रकटी १:७).**

पवित्र शास्त्रामध्ये नेहमी मेघांचा संबंध परमेश्वराशी जोडलेला आहे. मेघ आमची दुःखे, क्लेश, परिस्थिती आहेत. ते देवाच्या सार्वभौमत्वाला छेद देणारे आहेत असे वाटते. परंतु याच मेघांच्याद्वारे देवाचा आत्मा आम्हांला विश्वासाने चालण्यास शिकवतो. आमच्या जीवनात मेघ नसते तर विश्वासही नसता. “... मेघ त्याच्या चरणांची धूळ आहेत” (नहूम १:३). मेघ परमेश्वराच्या अस्तित्वाचे दर्शक आहेत. दुःख, शोक आणि क्लेश हे देवाबरोबर येणारे मेघ आहेत? हे प्रकटीकरण अद्‌भुत आहे. देव मेघातूनच आमच्याकडे येतो.

आमच्या अडचणी, संकटे यातून देव आम्हांला काही शिकवतो हे म्हणणे खरे नाही. आमच्याकडे तो आणतो त्या प्रत्येक मेघातून आम्ही शिकलेले काही विसरावे हाच त्याचा उद्देश असतो. मेघांच्या साहाय्याने तो आमचा विश्वास सरळ सोपा करतो. परिणामी आमचे देवाबरोबरचे नाते एखाद्या बालकासारखे होते. दुसरे लोक आम्हांला सावल्यांसारख होईतो अधूनमधून आमच्या वाट्याला मेघ आणि अंधार येईलच. देवाबरोबरचे आमचे नाते पूर्वीपेक्षा अधिक साधे होत आहे?

देव आमच्यावर येऊ देतो ती विचित्र परिस्थिती आणि आम्हांला असलेले त्याचे ज्ञान यात काही संबंध आहे. देवाविषयीच्या आमच्या ज्ञानातून आम्हांला जीवनाच्या रहस्यांचा अर्थ लावला पाहिजे. देवाचा स्वभाव लक्षात ठेवून आपण जीवनातील अंधारे वास्तव समजून घेतले पाहिजे.

“... ते मेघात शिरले तेव्हा ते भयभीत झाले” (लूक ९:३४). तुमच्या मेघामध्ये येशूखेरीज दुसरे कोणी आहे? असेल तर मग “येशूशिवाय... आणखी कोणी नाही...” असे होईपर्यंत अंधार अधिक गडद होईल (मार्क ९:८; २–७ ही वचने पहा).

## जुलै ३०

### भ्रमनिरासाची शिकवण

**“पण येशूला स्वतःला त्यांचा भरंवसा नव्हता… कारण मनुष्यात काय आहे हे त्याला स्वतःला  ठाऊक होते” (योहान २:२४–२५).**

भ्रमनिरास होणे म्हणजे सर्व गैरसमज दूर होणे. जीवनात फसवणूक न होणे. फसवणूक संपली तरी भ्रमनिरासामुळे पाहण्याची दृष्टी तुच्छतेची आणि फक्त दोष पाहणारी होते. पण देवाकडून होणाऱ्या भ्रमनिरासामुळे आम्हांला लोक खरे आहेत तसे दिसतात. त्यात तुच्छतेची अगर दोषच काढण्याची वृत्ती नसते. जीवनात जास्तीतजास्त हानी करणाऱ्या, दुःखकारक गोष्टी भ्रमातूनच येतात. आम्ही एकमेकांकडे वास्तव नजरेने पाहात नाही. गैरसमजाच्या दृष्टीनेच आम्ही दुसऱ्यांकडे पाहतो. आमच्या विचाराने प्रत्येक गोष्ट आनंददायी आणि चांगली असते अगर दुष्ट, आकसखोर आणि भित्री असते.

भ्रमनिरास होऊ देण्यास नकार देणे हेच आमच्या बहुतेक क्लेशांचे कारण आहे. आम्ही कोणावर तरी प्रीती करतो पण देवावर प्रीती करत नाही. परंतु त्या प्रिय व्यक्तीकडून पूर्णतेची व नीतिमत्त्वाची अपेक्षा करतो आणि ते मिळाले नाही की आम्ही क्रूर, सूड उगवणारे होतो. खरे तर ते आम्ही स्वतः देऊ शकत नाही त्याची दुसऱ्याकडून अपेक्षा ठेवतो. प्रभू येशू ख्रिस्त हा एकच मानवी अंतःकरणाच्या तीव्र दुःखावर फुंकर घालू शकतो. आमचा प्रभू कधीच तडजोड करत नाही. कोणी येशूवर विश्वास ठेवीत नाही तर त्याची मानवी नाती अखेर दुःख देऊनच संपणार. आमच्या प्रभूने कोणावर भरंवसा ठेवला नाही, लोकांच्यावर विश्वास ठेवला नाही. पण तो संशयी अगर मनी कटुता वागवणारा नव्हता. आमच्या प्रभूचा देवावर पूर्ण भरंवसा होता. देवाची कृपा किती महान कार्य करते ते त्याला पूर्ण माहीत असल्याने तो कधी निराश झाला नाही. माणसावर भरंवसा ठेवला तर पदरी निराशाच येणार.

## सर्वस्वी त्याचे होणे

**“आणि धीराला आपले कार्य पूर्ण करु द्या, ह्यासाठी की, तुम्ही कशातही उणे न होता तुम्हांला अखंड परिपूर्णता प्राप्त व्हावी” (याकोब १:४).**

आपणापैकी अनेकजण बहुधा योग्य असतात, तथापि काही बाबतीत आम्ही बेपर्वा आणि आळशी असतो. यात पाप नसले तरी ही वृत्ती आमच्या दैहिक जीवनाचा अवशेष असते; परिणामी आम्ही बेपर्वा होतो. हे उदासीपण पवित्र आत्म्याचा अपमान आहे. आपण देवाची उपासना करतो, खातो पितो या कशातच बेपर्वा वृत्ती नसावी.

देवाबरोबरचे आमचे नाते सुयोग्य पाहिजे तसेच त्या नात्याचा बाह्य आविष्कार देखील योग्यच हवा. आमच्या जीवनाचा बारीकसारीक तपशीलही त्याच्या नजरेतून सुटत नाही. देव आम्हांला त्याच त्याच गोष्टींकडे वारंवार मागे आणील अखेर योग्य वस्तू तयार करावी हा त्याचा उद्देश असल्याने तो आम्हांला सर्व पूर्णपणे शिकवतो. आमच्या जीवनातील चुकीच्या गोष्टी आम्ही दूर करीपर्यंत तो एकच धडा आम्हांला पुन्हा पुन्हा शिकवतो.

देवाने प्रकट केलेल्या सत्याचा तारणाचा धडा शिकताना. हळूहळू आमचे अंतःकरण पूर्णपणे त्याच्याकडे लागले आहे. आमच्यामध्ये त्याने केलेल्या कार्यामुळे आम्ही साधारपणे त्याला सुयोग्य झालो आहोत. “आणि धीराला आपले कार्य करु द्या...” याकोबाच्या द्वारे पवित्र आत्म्याने सांगितले, “तुम्हांला अखंड परिपूर्णता प्राप्त व्हावी” जीवनातील लहानसहान गोष्टींकडे लक्ष द्या. “ते सध्या राहू दे, हे काही विशेष महत्त्वाचे नाही” असे म्हणू नका. आम्ही सर्वस्वी परमेश्वराचे होईपर्यंत तो आम्हांला या बारीकसारीक गोष्टी दाखवणार.

**ऑगस्ट १**

## त्याच्या चालीरीतीविषयी शिकणे

**"... येशूने आपल्या बारा शिष्यांना आज्ञा सांगण्याचे समाप्त केल्यावर तो तेथून त्यांच्या नगरात शिकवावयास व उपदेश करावयास गेला" (मत्तय ११:१).**

*तो आम्हांला जेथून जाण्यास सांगतो तेथे तो स्वतः येतो.* तुमच्या घरच्या लोकांच्या काळजीने तुम्ही जा म्हणून सांगितले तरी गेला नाही तर तुम्ही त्यांना प्रत्यक्ष ख्रिस्ताच्या शिक्षणापासून वंचीत ठेवाल. आज्ञेप्रमाणे सर्व देवावर सोपवून तुम्ही गेलात की शिक्षण देण्यासाठी प्रभू तुमच्या गावात जातो. आज्ञा न पाळल्याने तुम्हीच त्याला अडवता. त्याच्याशी वाद घालू नका. तुमचे कर्तव्य आणि त्याची आज्ञा यात वाद नसावा. "त्याने जायला सांगितले खरे पण माझे कर्तव्य येथेच आहे" असे म्हणालात तर येशूच्या सांगण्यावर तुमचा विश्वास नाही हेच दिसेल.

*शिकवू नका असे तो आम्हांला सांगतो तेथे तो शिकवतो.* "गुरुजी... आम्ही तीन मंडप करु..." (लूक ९:३३). आम्ही भलताच दूरदर्शीपणा दाखवतो? दुसऱ्याच्या जीवनात देवाची भूमिका करतो? आम्ही दुसऱ्यांना जोरजोराने ओरडून शिकवतो. त्या गोंगाटात तो त्यांच्यापर्यंत पोचत नाही. आपण तोंड बंद ठेवून आत्मा सावध ठेवावा. देव आम्हांला आपल्या पुत्राविषयी शिकवतो. आमची प्रार्थनेची वेळ रुपांतराचा पर्वत व्हावी ही त्याची इच्छा आहे. देव ज्याप्रकारे एकदा कार्य करतो त्याच प्रकारे पुन्हा करत नाही.

*आम्हांला प्रतीक्षा करण्यास सांगतो तेथे तो कार्य करतो.* "... तोपर्यंत... राहा" (लूक २४:४९). "परमेश्वराची प्रतीक्षा करा" तो कार्य करील (स्तोत्र ३७:३४). पण आत्मिक दृष्टीने कुढत बसून स्वतःला दोष देऊ नका. स्वतःच्या आत्मिक अस्मितेपासून विभक्त होऊन "परमेश्वराच्या अधीन होऊन त्याची प्रतीक्षा करण्यास" आम्ही तयार आहो? (३७:७). हात जोडून वाट पाहयची नाही तर आम्हांला करण्यास सांगितले आहे ते करण्यास शिकणे हेच वाट पाहणे आहे. या त्याच्या काही चालीरिती आपण नीट समजून घ्याव्या.

ऑगस्ट २

## आपत्तीची शिकवण

**"... जगात तुम्हांला क्लेश होतील, तरी धीर धरा; मी जगाला जिंकले आहे" (योहान १६:३३).**

खिस्ती जीवन म्हणजे आपत्तीचा मागमूस नसणे, सर्वत्र आनंद असणे. पण आपत्तीत मुक्तता हा त्याचा खरा अर्थ आहे. "जो परात्पराच्या गुप्त स्थली वसतो तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील... कोणतेही अरिष्ट तुझ्यावर येणार नाही. कोणतीही व्याधी तुझ्या तंबूजवळ येणार नाही..." (स्तोत्र ९१:१, १०). येथे तुमचे देवाबरोबर ऐक्य आहे.

तुम्ही देवाचे मूल आहात तर क्लेश होणार, आपत्ती येणारच. पण यात नवल वाटून घेऊ नका असे येशू सांगतो. "जगात तुम्हांल क्लेश होतील, तरी धीरा धरा. मी जगाला जिंकले आहे." तो सांगतो, "भिऊ नका". तारण होण्यापूर्वी जे लोक संकटांविषयी चकार शब्द काढत नव्हते ते नवा जन्म झाल्यावर कुरकूर आणि तक्रारी करतात; कारण पवित्रजनांच्या जीवनाविषयी त्यांच्या चुकीच्या कल्पना असतात.

देव आम्हांला जिंकणारे जीवन देत नाही. आम्ही जिंकत राहिलो की तो जीवन देतो. जीवनातील ताणतणावांनी आम्हांला शक्ती मिळते. ताणतणाव नसतील तर शक्ती मिळणार नाही. देवाकडे तुम्ही जीवन, स्वतंत्रता आणि आनंद मागत आहा? ताणतणाव स्वीकारण्यास तयार असाल तरच तुमची मागणी पूर्ण होईल; अन्यथा नाही. तणावांना सामोरे जा, लगेच शक्ती मिळेल. पहिले पाऊल उचला. देव तुमचे पोषण करील. "जो विजय मिळवतो त्याला... जीवनाचे झाड आहे त्यावरचे फळ खावयास देईन" (प्रकटी २:७). आत्मिक रीतीने समर्पण केल्याने शक्ती मिळते. देव आम्हांला उद्या, परवासाठी नाही तर आत्ता व येथेच शक्ती देतो.

**ऑगस्ट ३**

## देवाचा भाग पाडणारा उद्देश

**“तेव्हा त्याने... त्यांना म्हटले, पाहा, आपण वर यरुशलेमेस चाललो आहो...”** (लूक १८:३१).

आमच्या प्रभूच्या जीवनात यरुशलेम ही पित्याची इच्छेची परिसमाप्ती होण्याची जागा होती. येशूने म्हटले, “... मी स्वतःच्या इच्छेप्रमाणे नव्हे तर ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करावयाला पाहतो” (योहान ५:३०). पित्याची इच्छा पूर्ण करणे हेच आमच्या प्रभूचे इतिकर्तव्य होते. या वाटचालीत यशापयशाची त्याला फिकीर नव्हती. “... त्याने यरुशलेमेस जाण्याच्या दृढ निश्चयाने तिकडे आपले तोंड वळवले” (लूक ९:५१).

आपणाला स्वतःचा नव्हे तर देवाचा उद्देश पूर्ण करण्यास यरुशलेमला जायचे आहे. लौकिक जीवनात स्वतःच्या आकांक्षा असतात पण ख्रिस्ती जीवनात स्वतःची ध्येये नसतात. ख्रिस्तासाठी आमचे अमुक, तमुक वगैरे आम्ही म्हणतो पण नव्या करारात मात्र देवाचा सक्तीने भाग पडणारा एकच उद्देश आढळतो. “तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले...” (योहान १५:१६).

देवाने स्वतःच्या उद्देशाविषयी आमची अगोदर संमती घेतली नाही. तर त्याने सरळ आम्हांला त्यात सामावून घेतले. देवाचे उद्दिष्ट काय आहे ते आम्ही जाणत नाही पुढे जाताना त्याचा उद्देश अधिकच अस्पष्ट होतो. देवाच्या उद्देशाविषयी प्रथम आमच्या काही कल्पना असतात. आपण म्हणतो, “देवाने मला खास काम दिले आहे.” पण पुढे पाहावे तर आमचे काम केवळ चौकट,आधाराचा सांगाडा आहे हे समजते. त्याचे कार्य व योजना गुप्त राहतात, “... त्याने बाराजणांस जवळ घेऊन...” (लूक १८:३१). देव आम्हांला सतत जवळ घेत असतो. अद्याप भाग पाडणाऱ्या त्याच्या उद्देशाचे संपूर्ण ज्ञान आम्हांला मिळायचे आहे.

## ऑगस्ट ४

### परमेश्वराची धाडसी मैत्री

**“तेव्हा त्याने बाराजणांस जवळ घेऊन...” (लूक १८:३१).**

आमच्यावर भरंवसा ठेवण्याचे केवढे धाडस देवाने केले आहे! “त्याने मला चुकीने निवडले, मी कवडी किमतीचाही नाही, माझ्यात काहीही चांगले नाही,” असे तुम्ही म्हणता काय? तुम्ही मोलाचे असाल तर तुम्हांला तुमची स्वतःची ध्येये असल्याने देव तुम्हांला निवडणार नाही. आपल्या परिपूर्णतेचे खूळ डोक्यातून काढलेत की तो स्वतःबरोबर यरुशलेमला जाण्यासाठी तुम्हांला निवडील (१८:३१). यात त्याचे उद्देश पूर्ण होतील; अर्थात ते काय आहेत ते तो तुम्हांला सांगणार नाही.

एखाद्याच्या अंगी स्वाभाविक क्षमता आहे म्हणून तो चांगला ख्रिस्ती होईल असे आपण म्हणतो. परंतु आमचे सज्ज असणे नव्हे तर सज्ज नसणे हेच महत्त्वाचे आहे. आमच्या स्वाभाविक गुणांपेक्षा देव आमच्यामध्ये कोणते गुण घालतो ते महत्त्वाचे आहे. आमची बुद्धी, ज्ञान, शक्ती यांना येथे किंमत नाही. देवाच्या भाग पाडणाऱ्या उद्देशामध्ये सहभाग मिळणे हेच मोलाचे आणि महत्त्वाचे आहे (पहा १ करिंथ १:२६–३१). आपल्या गरीबीची, उणेपणाची जाणीव असणारेच देवाचे मित्र होतात, अशा लोकांबरोबर त्याची मैत्री असते. माझा देवाला उपयोग आहे असे म्हणणारा देवाच्या कामी येत नाही. आम्ही ख्रिस्ती लोक येथे स्वतःच्या नव्हे तर देवाच्या उद्देशांसाठी आहोत. पण देवाचा उद्देश आम्हांला माहीत नाही. देवाबरोबरच्या आमच्या संबंधात बिघाड होऊ देऊ नये आणि जर काही बिघडले तर ते लगेच पूर्ववत करावे. ख्रिस्ती जीवनात आमचे काम नव्हे तर देवाशी असलेले आमचे नातेच महत्त्वाचे आहे.

## मति गुंग करणारे देवाचे पाचारण

**"... मनुष्याच्या पुत्राविषयी संदेष्ट्यांच्या द्वारे लिहिण्यात आलेल्या सर्व गोष्टी पूर्ण होणार आहेत... त्यांस ह्या गोष्टींपैकी काहीच कळले नाही" (लूक १८:३१, ३४).**

देवाने येशूला केलेले पाचारण संपूर्णपणे अनर्थकारक आहे असे वाटले आणि येशू ख्रिस्ताने आपले मरण पाहण्यास शिष्यांना पाचारण केले. त्यामुळे त्यांची अंतःकरणे भंग पावली. त्याचे जीवन लौकिक दृष्टीने सर्वथा वाया गेले असले तरी देवाच्या दृष्टीने ते महाविजयी ठरले. कारण माणसाचे उद्दिष्ट आणि देवाचे उद्दिष्ट यांत जमीन अस्मानाचा फरक आहे.

मति गुंग करणारे देवाचे पाचारण आमच्याही वाट्याला येते. देवाचे पाचारण बाह्य साधनांनी कधी उमजत नाही; ते आमच्या खऱ्या आंतरिक वृत्तीनेच समजते. देवाचे पाचारण सागराच्या पाचारणासारखे आहे. ज्याच्या अंतरंगात सागराचा स्वभाव आहे त्यालाच ते पाचारण समजते. देव कशासाठी पाचारण करतो ते नेमकेपणे सांगता येत नाही. त्याचे स्वतःचे उद्देश पूर्ण करण्यासाठी आम्ही फक्त त्याचे मित्र असावे याचसाठी त्याचे पाचारण असते. देवाची इच्छा त्यालाच माहीत यावर आम्ही भरंवसा ठेवावा हेच उचित.

देवाबरोबर आमची सहभागिता असेल आणि तो आपल्या उद्देशांमध्ये आमचा समावेश करत आहे हे लक्षात आले की आम्ही त्याचे उद्देश जाणण्याची खटपट करणार नाही. ख्रिस्ती जीवनात आमची वाढ होत राहिली की प्रत्येक गोष्टीच्या मागे देवाचे उद्दिष्ट आहे हे जाणवते आणि त्याच्या उद्देशाशी आमचे ऐक्य साधण्याऐवजी तो आम्हांला आकार देतो आहे हेही लक्षात येते.

## ऑगस्ट ६

### प्रार्थनेत वधस्तंभ

**“त्या दिवशी तुम्ही माझ्या नावाने मागाल...” (योहान १६:२६).**

आम्हांला वाटते ख्रिस्ताच्या वधस्तंभामधून पार गेले पाहिजे. परंतु आपण त्यात जाण्यासाठीच त्यामधून जातो. आमच्या दृष्टीने वधस्तंभ—प्रभू येशू ख्रिस्ताबरोबर सर्वस्वी समरुप होणे एवढेच आहे. ही समरुपता प्रार्थनेत विशेषे करुन प्रत्ययास येते.

“... तुमच्या गरजा काय आहेत हे तुमचा पिता तुम्ही त्याच्यापाशी मागण्यापूर्वीच जाणून आहे” (मत्तय ६:८). मग मागायचे कशासाठी? देवाकडून उत्तरे मिळवणे हा प्रार्थनेचा उद्देश नाही तर त्याच्याशी सर्वस्वी पूर्णपणे समरुप होणे हा हेतू आहे. फक्त उत्तरांसाठी प्रार्थना केली तर नेहमीच आमच्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने आम्ही चिडतो आणि संतापतो आणि प्रार्थनेतून आमच्या प्रभूबरोबर समरुप होण्याचे नाकारतो हेच स्पष्ट होते. देव प्रार्थनेचे उत्तर देतो हे सिद्ध करण्यास नव्हे तर देवाच्या कृपेची विजय चिन्हे म्हणून आम्ही येथे आहो.

“... मी तुमच्यासाठी पित्याजवळ विनंती करीन, असे मी तुम्हांस म्हणत नाही, कारण पिता स्वतः तुमच्यावर प्रीती करतो” (योहान १६:२६—२७). तुमचे प्रार्थनाजीवन येशूच्या प्रार्थनाजीवनाशी एकरुप होण्याएवढी देवाची आणि तुमची जवळीक झाली आहे काय? आमच्या प्रभूने तुमचे जीवन स्वतःच्या जीवनात बदलले आहे? असेल तर “त्या दिवशी” तुम्ही येशूशी एवढे एकरुप व्हाल की सर्व भेदाभेद मिटतील; प्रार्थनेचे उत्तर न मिळाल्यास त्याचा दोष कोणाला तरी देऊ नका. सैतानाच्या सापळ्यात सापडू नका. प्रार्थनेचे उत्तर न मिळण्याचे कारण असते. या प्रसंगी देव तुम्हांला सखोल व्यक्तिगत शिक्षण देतो आणि ते फक्त तुमच्यासाठी असते.

**ऑगस्ट ७**

## पित्याच्या घरात प्रार्थना

**“...तो त्यांना मंदिरात... सापडला... तो त्यांना म्हणाला... माझ्या पित्याच्या घरात मी असावे हे तुमच्या ध्यानात आले नाही काय?” (लूक २:४६, ४९).**

आमच्या प्रभूचे लहानपण प्रौढ मनुष्यपणाप्रत जाण्यासाठी वाट पाहणारे बालपण नव्हते. त्याचे बालपण सनातन वास्तव आहे. माझा प्रभू आणि तारणारा ह्याच्याशी समरुप झाल्याने मी देवाचे पवित्र, निरागस मूल आहे काय? देवाचा पुत्र माझ्यामध्ये असलेल्या त्याच्या पित्याच्या घरात राहात आहे काय?

स्वतः देवच चिरंतन सत्यता आहे. मला क्षणोक्षणी त्याचे आदेश मिळतात. मी सदोदित देवाच्या सत्यतेच्या संपर्कात आहे काय? किंवा परिस्थिती बिघडली की मगच मी प्रार्थना करतो काय? मी स्वतःला माझ्या प्रभूबरोबर पवित्र सहभागितेत समरुप होणे जरुरीचे आहे. आमच्यापैकी अनेकांना अद्याप हे माहीतच नाही. “... माझ्या पित्याच्या घरात मी असावे.” मलाही जीवनाच्या प्रत्येक क्षणाला माझ्या पित्याच्या घरात राहिले पाहिजे.

आपल्या परिस्थितीचा विचार करा. प्रभूच्या जीवनाशी तुम्ही केवळ देवाचे मूल असण्याएवढे समरुप झाला आहात? तुम्ही सर्वकाही त्याच्याकडून येते हे जाणून सतत त्याच्याशी बोलत आहा? तुमच्यामधील सनातन बालक त्याच्या पित्याच्या घरात राहात आहे? त्याची कृपा तुमचे जीवन, काम, मित्रपरिवार, कुटुंब ह्यांना व्यापून आहे? त्याला तुमच्या जीवनात कार्य करु द्या.

तुमच्या प्रभूचे जीवन हेच तुमचे सरळसाधे जीवन असावे. ज्याप्रकारे त्याने येथे राहून लोकांमध्ये कार्य केले तसेच तुमच्यामधून त्याने कार्य केले पाहिजे.

**ऑगस्ट ८**

## पित्याच्या सन्मानासाठी प्रार्थना

**“ज्याचा जन्म होईल त्याला पवित्र, देवाचा पुत्र, असे म्हणतील” (लूक १:३५).**

देवाचा पुत्र माझ्या मानवी देहाने जन्मला आहे तर मग मी त्याचे पवित्र निर्दोषपण, साधेपणा आणि देवपित्याबरोबरचा एकपणा माझ्यामध्ये प्रतीत होऊ देतो काय? देवाच्या पुत्राच्या जन्माच्या इतिहासात कुमारी मरियेमध्ये या पृथ्वीवर खरे होते तेच देवाच्या प्रत्येक पवित्रजनाच्या संबंधात खरे आहे. देवाच्या कृतीने देवाचा पुत्र माझ्यामध्ये जन्मला आहे तर प्रार्थनेच्या द्वारे माझ्या पित्याच्या सन्मुख राहण्याचा मूल म्हणून माझा हक्क मी बजावलाच पाहिजे. माझ्या जीवनाच्या सर्वसामान्य भागाला मी नेहमी विचारत आहे काय? येथे मी का वळावे? तिकडे का जावे? “माझ्या पित्याच्या घरात मी असावे हे तुमच्या ध्यानात आले नाही काय”(लूक २:४९). आमची परिस्थिती कशीही असो देवाचे पवित्र, निरागस आणि चिरंतन मूल आपल्या पित्याच्या संपर्कात असलेच पाहिजे.

या प्रकारे माझ्या प्रभूशी समरुप होण्याएवढा मी साधा, सरळ आहे का? देवाच्या पुत्रामध्ये परिपूर्ण होणारी त्याची इच्छा माझ्यामध्ये साकार झालेल्या त्याच्या पुत्रामध्ये पूर्ण होत आहे काय? (गलती ४:१९ पहा). का मी त्याला अगदी सहजपणे एकीकडे ठेवले आहे? लोक एवढे मोठ्याने का ओरडतात? देवाच्या पुत्राला ठार मारा असे ते ओरडत आहेत. येथे देवाच्या पुत्राला जागा नाही. पित्याबरोबर पवित्र एकपण कोणाला नको.

देवाचा पुत्र माझ्यामध्ये प्रार्थना करीत आहे का मी माझ्या मागण्या त्याला सांगत आहे? माझ्यामधील देवाचा पुत्र क्लेश, दुःख सोसून आपले उद्देश पूर्ण करत आहे? देवाच्या अनुभवी पवित्रजनांचे आंतरिक जीवन “ख्रिस्ताच्या क्लेशातले उरले आहे ते भरुन काढीत आहे” (कलस्सै १:२४). हे लक्षात आले की अद्याप काही करायचे आहे हे समजते.

ऑगस्ट ९

## परमेश्वराची कानी पडेल अशी प्रार्थना

**“तेव्हा येशूने दृष्टी वर करुन म्हटले, ‘हे बापा, तू माझे ऐकले म्हणून मी तुझे आभार मानतो’” (योहान ११:४१).**

देवाचा पुत्र प्रार्थना करतो तेव्हा त्याला फक्त आपल्या पित्याची जाणीव असते. देव नेहमी आपल्या पुत्राच्या आणि देवाचा पुत्र माझ्यामध्ये साकार झाला असेल तर (पहा गलती ४:१९) माझ्याही प्रार्थना ऐकतो. पण माझ्या मानवी देहातून देवाचा पुत्र दिसून येण्याकडे मी लक्ष दिले पाहिजे. तुमचे शरीर पवित्र आत्म्याचे मंदिर आहे (१ करिंथ ६:१९). ते देवपुत्राचे बेथलहेम आहे. देवपुत्राला माझ्यामध्ये कार्य करण्याची संधी मिळते का? या पृथ्वीवर त्याच्या जीवनात होता तो त्याचा साधेपणा माझ्यात उतरला आहे? जीवनात रोजचे सामान्य अनुभव घेताना देवाच्या सनातन पुत्राने त्याच्या पित्याला केलेली प्रार्थना माझ्यामध्ये होते का? येशूने म्हटले, “त्या दिवशी तुम्ही माझ्या नावाने मागाल...” (योहान १६:२६). पवित्र आत्मा येऊन मला माझ्या प्रभूशी संयुक्त करील तोच हा दिवस आहे.

तुमच्या जीवनाने प्रभू येशू ख्रिस्ताचे भरपूर समाधान झाले आहे? तुम्ही त्याच्यासमोर आत्मिक गर्वाचे प्रदर्शन करीत नाही ना? परमेश्वराने आम्हा सर्वांना सामान्य बुद्धीची देणगी दिली आहे. पण या बुद्धीला महत्त्व देऊन देवाच्या पुत्राला एकीकडे ठेवू नका. या बुद्धीला महत्त्व देऊ नका. ती काही देवाच्या पुत्राने दिलेली नाही. आमच्या स्वाभाविक शक्ती देवपुत्र करतो तशी पित्याचे आज्ञापालन करु शकत नाही. अंतरंगात वसणाऱ्या देवपुत्राने या बुद्धीचा पालट केला पाहिजे. आम्ही सर्वस्वी येशू ख्रिस्तावर अवलंबून राहतो काय? क्षणोक्षणी त्याचे जीवन आमच्यामधून प्रकट होत आहे काय?

## पवित्रजनाचे पवित्र कष्ट

**"... देवाच्या इच्छेप्रमाणे दुःख भोगणाऱ्यांनी सत्कृत्ये करीत आपले जीव विश्वासू निर्माणकर्त्याला सोपवून द्यावे" (१ पेत्र ४:१९).**

देवाच्या इच्छेचा स्वीकार करुन दुःख सोसणे रास्तच आहे. दुःख कोणी निवडून घेत नाही, आपण येशूप्रमाणे देवाची इच्छा अंगिकारावी. मग त्यात दुःख, क्लेश सोसणे आले तर आले.

येशूच्या अंतःकरणाचे समाधान करणारा पवित्रजन दुसऱ्या पवित्रजनांना देवासाठी परिपक्व आणि सक्षम करतो. आम्हांला सहानुभूती दाखवणारे लोक आम्हांला सशक्त नाही तर अशक्त करतात. येशूशी जवळीक असणाऱ्या पवित्रजनालाच दुसऱ्या पवित्रजनाची अवस्था समजते. दुसऱ्या पवित्रजनाने दाखवलेल्या सहानुभूतीचा स्वीकार केला तर आम्हांला वाटते, "देव माझ्याशी फारच कठोरपणे वागतो. त्याने जीव नकोसा केलाय!" याच कारणाने आत्मदया सैतानाकडून आहे असे येशूने म्हटले (पहा मत्तय १६:२१–२३). आपण देवाची प्रतिष्ठा जपली पाहिजे. त्याला दोष देणे कठीण नाही. तो उलटून बोलत नाही; स्वतःचे कधी समर्थन करीत नाही. त्याने लोकांची सहानुभूती स्वीकारली नाही. त्याच्या श्रेष्ठ सुज्ञानामुळे या पृथ्वीवर आपले उद्देश कोणाला समजत नाहीत हे त्याने ओळखले होते (पहा मत्तय १६:२३). त्याने फक्त आपला पिता व दिव्यदूत ह्यांची सहानुभूती स्वीकारली (पहा लूक १५:१०).

देव पवित्रजनांना कसे वाया दवडतो पहा. जगाच्या दृष्टीने देव आपल्या पवित्रजनांना अति अवघड जागी ठेवतो. आम्ही म्हणतो, "देवाला मी उपयोगी आहे म्हणूनच त्याने मला येथे ठेवले आहे." आपण देवाला उपयोगी आहो का नाही हा विचार कधी येशूने केला नाही. देवाचे जास्तीत जास्त गौरव होईल अशा ठिकाणी तो आपले पवित्रजन ठेवतो आणि ते कोठे असावेत हे आपणाला ठरवता येत नाही.

ऑगस्ट ११

## हा अनुभव आलाच पाहिजे

**“एलीया वावटळीतून स्वर्गात गेला... तो पुन्हा अलीशाच्या नजरेस पडला नाही” (२ राजे २:११–१२).**

देवाने तुम्हांला दिलेल्या “एलीयावर” तो तुमच्याकडे असेपर्यंत विसंबून राहणे चूक नाही. पण वेळ आली की त्याला गेलेच पाहिजे. तो तुमचा मार्गदर्शक व नेता असणार नाही कारण त्याने राहावे ही देवाची इच्छा नाही “एलीयाशिवाय मी कसा राहणार” असे म्हणणे व्यर्थ आहे. तुम्ही पुढे गेलेच पाहिजे. ही देवाची इच्छा आहे.

*तुमच्या “यार्देन” वर एकटे* (२:१४). यार्देन नदी विभक्तपण दर्शवते. येथे तुमची कोणाशीही सहभागिता नसते. “एलीया”बरोबर असताना शिकलात ते पारखण्याची वेळ आली आहे. “एलीया”बरोबर यार्देनवरुन अनेकदा जा ये केली आहे. आता तुम्हांलाच पलीकडे जायचे आहे. देव तुमच्या विश्वासाचा देव आहे का हे पाहयचे तर यार्देन ओलांडणे अगत्याचे आहे.

*तुमच्या “यरीहो” पाशी एकटे* (२:१५). यरीहो येथे तुम्ही एलीयाने केलेल्या मोठ्या गोष्टी पाहिल्या आहेत. पण आता तुमच्या “यरीहो”पाशी तुम्ही एकटे आहा देवावर भरंवसा ठेवण्यास तुम्ही कां कू करता. दुसऱ्या कोणी हे करावे असे तुम्हांला वाटते. पण तुमच्या “एलीया”बरोबर असताना शिकला ते दृढ धरुन राहिला तर देव तुमच्याबरोबर आहे याची खूण अलीशाप्रमाणे तुम्हांलाही मिळेल.

*तुमच्या “बेथेल”पाशी एकटे* (२:२३). तुमच्या बेथेलजवळ तुमचे शहाणपण संपून देवाचे सुज्ञान उदयास आल्याचे जाणवेल. तुमचे चातुर्य संपले तर गडबडू नका! देवाला दृढ धरुन राहा. तो तुमचे जीवन उपासनेचा आविष्कार असे करील. “एलीया” बरोबर असताना शिकलात ते प्रत्यक्षात आणा. त्याचा झगा घेऊन प्रार्थना करा (२:१३-१४). देवावर विश्वास ठेवण्याचा निश्चय करा. एलीयाचा शोध करु नका.

**ऑगस्ट १२**

## परमेश्वरामध्ये विसावा घेण्याचे ईश्वर परिज्ञान

**“अहो, अल्पविश्वासी, तुम्ही भित्रे कसे?” (मत्तय ८:२६).**

आम्हांला भय वाटले तर परमेश्वराची प्रार्थना करावी. पण आमच्या प्रभूचे नाव धारण करणाऱ्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा ही त्याची रास्त अपेक्षा आहे. आपल्या मुलांनी त्याच्यावर दृढ भरंवसा ठेवावा. कोणत्याही पेच प्रसंगात त्यांनी ढळू नये हीच त्याची इच्छा आहे. पण देवावर आमचा पूर्ण विश्वास नसतो. आम्ही घाबरलेले, देवाला न ओळखणारे लोक जिवाच्या आकांताने देवाचा धावा करतात तसे आम्हीही करु लागतो. आम्ही सर्वथा हताश होतो. त्याच्यावर आमचा भरंवसा उरलेला नसतो. जगावर त्याचे सार्वभौम नियंत्रण आहे हेही आम्हांला पटत नाही. आम्हांला वाटते तो झोपी गेला आहे. सागराच्या गर्जून उसळणाऱ्या महाकाय लाटांखेरीज आम्हांला दुसरे काही दिसत नाही.

“... अहो अल्पविश्वासी!” या शब्दांनी शिष्यांच्या अंतःकरणाला जणू इंगळ्या डसल्या! “पुन्हा आमचे चुकलेच!” आणि आमच्यासमोर आहे ते नजरेआड केले असते, सर्वस्वी त्याच्यावर भरंवसा ठेवला असता तर त्याला किती आनंद झाला असता या जाणीवेने आमचाही थरकाप होतो; कारण आम्हीही त्यांच्याच पंक्तीला बसतो!

अनेकदा आमचे जीवन संथ असते, वादळवारे नसतात. माणसाला शक्य ते सर्व आम्ही आनंदाने करतो, पण काही प्रसंग ओढवला की आम्ही कोणावर विसंबतो ते क्षणात उघड होते. परंतु आम्ही परमेश्वराची उपासना करण्यास शिकलो असू तर त्याजवर आमचा भरंवसा असेलच. पेचप्रसंगाने मोडण्याची वेळ आली तरी आमचा त्याजवरचा भरंवसा मोडणार नाही!

आम्ही पवित्रीकरणाविषयी पुष्कळ बोलतो, पण आमच्या जीवनात त्याचा परिणाम काय असेल! आम्ही त्याच्याशी पूर्णपणे एक होऊन त्याच्यामध्येच विसावू का? असे केल्याने त्याच्या नजरेत आम्ही निर्दोष व त्याला आनंद देणारे होऊ.

**ऑगस्ट १३**

## आत्म्याला विझवू नका

**“आत्म्याला विझवू नका” (१ थेस्सल ५:१९).**

देवाच्या आत्म्याची वाणी वाऱ्याच्या झुळकी सारखी अगदी हळुवार असते. ती एवढी कोमल असते की तुम्ही देवाच्या संपूर्ण सहभागितेत एक असला तरच ती कानी पडेल. आत्मा देतो ते इशारे अगदी हळुवारपणे येतात. त्याची वाणी जाणण्याएवढे तुम्ही संवेदनशील नसाल तर तुम्ही त्याला विझवाल आणि तुमचे आत्मिक जीवन गोत्यात येईल. नियंत्रणाची ही जाणीव “मंदवाणी” अशीच येईल (१ राजे १९:१२). एवढी मंद की केवळ देवाच्या पवित्रजनालाच ती उमगेल.

आपली वैयक्तिक साक्ष सांगताना नेहमी मागचे उल्लेख नकोत. “बऱ्याच वर्षांपूर्वी माझे तारण झाले” असे म्हणू नये. “नांगराला हात घातला आहे,” प्रकाशात चालत आहा, आता “मागे पाहणे” नको. देवाबरोबरची अद्‌भुत सहभागिता आणि ऐक्य यातच भूतकाळ सामावला आहे (लूक ९:३२, आणखी पहा योहान १:६–७). तुम्ही प्रकाशाची साथ सोडलीत तर भावविवश ख्रिस्ती म्हणून फक्त आठवणींवर जगाल आणि तुमची साक्ष निर्जीव होईल. पूर्वी “प्रकाशात चालत होता” तेव्हाच्या अनुभवांच्या शिळ्या कढीला ऊत आणू नका (१ योहान १:७). नियंत्रणाची जाणीव आत्मा देईल तेव्हा थांबा, सर्व ठीकठाक करा नाहीतर तुम्ही नकळत त्याला विझवाल आणि खिन्न कराल.

समजा देवाने तुम्हांला अवघड स्थितीत आणले आणि ते तुम्ही बहुत करुन सोसलेत, पण पूर्णपणे नाही; तर देव पुन्हा तीच स्थिती आणील. मात्र त्याची तीव्रता बरीच कमी झाली असेल. अवज्ञा केलीत तर भरपूर मानहानी अनुभवास येईल आणि तरीही त्याच्या आत्म्याला खिन्न केलेत ती अवघड स्थिती पुन्हा येणार नाही; कारण तुम्ही त्याला पूर्णपणे विझवले आहे. देव दुखावला जाईल अशा कोणत्याच गोष्टीला चिकटून राहू नका.

**ऑगस्ट १४**

## परमेश्वराचे अनुशासन

**“माझ्या मुला परमेश्वराच्या शिक्षेचा अनादर करु नको आणि त्याच्याकडून दोष पदरी पडला असता खचू नको” (इब्री १२:५).**

देवाच्या आत्म्याला खिन्न करणे सोपे आहे; परमेश्वराच्या शिक्षेचा अनादर केला अगर तो बोल लावतो तेव्हा निराश होण्याने हे करता येते. पापापासून वेगळे करुन पवित्रीकरणाने पवित्र होण्याचा आमचा अनुभव उथळ असेल तर देवाची सत्यता समजतच नाही. देव आम्हांला इशारा देतो, तेव्हा आम्ही गैरसमजाने म्हणतो, “हे बहुधा सैतानाकडूनच असणार.”

“आत्म्याला विझवू नका” (१ थेस्सल ५:१९) आणि त्याचे मार्गदर्शन तुच्छ मानू नका. तुम्हांला वाटते तशी तुमची आत्मिक प्रगती झालेली नाही. आतापर्यंत हे उघड केले नव्हते पण आता उघड केले आहे. या प्रकारे परमेश्वर तुम्हांला शिस्त लावतो तेव्हा त्याला ती लावू द्या.

“... त्याच्याकडून दोष पदरी पडला असता खचू नको.” अशा वेळी आपण देवावर चिडतो आणि म्हणतो, “ठीक आहे. मी तरी काय करणार? मी प्रार्थना केली पण व्हावा तसा उपयोग झाला नाही, सर्व बिघडले! आता मी सगळे सोडून देतो.” आमच्या जीवनाच्या अन्य क्षेत्रांमध्ये आम्ही असेच वागलो तर काय होईल त्याचा विचार करा!

देवाने मला हाती धरावे, त्याच्या सामर्थ्याने त्याला साजेसे कार्य माझ्यामध्ये करावे यासाठी माझी तयारी आहे? देवाने माझ्यासाठी काय करावे ते पवित्रीकरणातून मी त्याला सांगत नाही तर पवित्रीकरणामध्ये देव माझ्यामध्ये काय करणार आहे त्याचा विचार आहे. माझी मानसिक व आत्मिक तयारी करुन मी पूर्णपणे पवित्र व्हावे अशा स्थितीला त्यानेच मला आणावे त्यासाठी कितीही किंमत द्यावी लागली तरी तयारी आहे (पहा १ थेस्सल ५:२३–२४).

**आॅगस्ट १५**

## नव्या जन्माचा पुरावा

**“तुम्हांला नव्याने जन्मले पाहिजे…” (योहान ३:७).**

“म्हातारा झालेला मनुष्य कसा जन्म घेऊ शकेल?” या निकदेमाच्या प्रश्नाचे उत्तर आहे, तो आपल्या जीवनातील प्रत्येक गोष्टीला मरण्यास तयार असेल; आपले हक्क, गुण, धर्म ह्यांवर पाणी सोडण्यास आणि पूर्वी कधी न अनुभवलेले नवजीवन स्वीकारण्यास तयार असेल तरच हे शक्य आहे (३:४). जाणीवपूर्वक केलेला पश्चात्ताप आणि आमचा सुप्त पवित्रपणा यांच्याद्वारे हे जीवन प्रकट होते.

*“परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला…”* (योहान १:१२). येशूविषयीचे माझे ज्ञान माझ्या स्वतःच्या आंतरिक आत्मिक जाणीवेतून आले आहे का ते मी दुसऱ्यांचे ऐकून शिकलो आहे? प्रभू येशू माझा व्यक्तिगत तारणारा आहे ही खूणगाठ बांधणारे असे काही माझ्या जीवनात आहे काय? नव्याने जन्मणे म्हणजे येशूला पाहणे. येशू ख्रिस्ताचे वैयक्तिक ज्ञान हाच माझ्या आत्मिक इतिहासाचा आधार आहे.

*“… नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येणार नाही”* (योहान ३:३). मला काय हवे आहे? देवाच्या राज्याचे प्रमाण का त्याचे सार्वभौम नियंत्रण? नवा जन्म झाल्याने नवी दृष्टी मिळते त्यामुळे देवाचे नियंत्रण ओळखता येते. त्याचे सार्वभौमत्व आहे तेथेच आहे पण देवाचा स्वभाव मिळेपर्यंत मला ते ओळखता येत नव्हते.

*“जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करीत नाही…”* (१ योहान ३:९). मी पाप करणे थांबवले आहे का तसा विचार आहे? देवापासून जन्मल्याने त्याची अलौकिक शक्ती प्राप्त होते त्यामुळे हातून पाप होत नाही. “ख्रिस्ती व्यक्तीने पाप करावे का?” असे पवित्र शास्त्र विचारीत नाही. ते ठामपणे सांगते, *“ख्रिस्ती व्यक्तीने पाप करता नये.”* आमच्या हातून पाप होत नाही तेव्हा आमच्यामध्ये नव्या जन्माचे प्रभावी कार्य होते. आम्ही पाप करु शकत नाही असा १ योहान ३:९ चा अर्थ नाही; त्याचा सरळ अर्थ आहे, आमच्यामध्ये असलेल्या देवाच्या जीवनाचे ऐकले तर हातून पाप होणार नाही.

## तो मला ओळखतो...?

**“... तो आपल्या मेंढरांना ज्याच्या त्याच्या नावाने हाक मारतो...” (योहान १०:३).**

*त्याच्याविषयी माझा गैरसमज झाल्यावर* (पहा योहान २०:११-१८). सर्व सिद्धांत माहीती पण येशूची ओळख नाही हे शक्य आहे. अशा प्रसंगी आपला आत्मा धोक्यात येतो. मरीया का रडत होती? तिला सिद्धांत व पायाखालचे गवत दोन्ही सारखेच होते. सिद्धांताने कोणताही परुशी मरीयेला वेडी ठरवू शकला असता. पण येशूने तिच्यामधून सात भूते काढली होती हा चेष्टेचा विषय नव्हता (पहा लूक ८:२). येशूला ओळखणे तिला महत्त्वाचे होते तेवढे त्याचे आशीर्वाद नव्हते.

... ती पाठमोरी फिरली; तो तिला येशू उभा असलेला दिसला, परंतु तो येशू आहे हे तिने ओळखले नाही... येशूने तिला म्हटले “मरीये!” (योहान २०:१४,१६). त्याने मरीयेला नावने हाक मारली तेव्हा आपली ह्याची ओळख आहे हे तिला जाणवले. ती वळून म्हणाली, “रब्बूनी!” (२०:१६).

*मी हेकटपणे संशय घेतला?* (पहा योहान २०:२४-२९). दुसरे सांगतात पण तो अनुभव मला आला नाही म्हणून मी येशूविषयी काही संशय घेतला आहे? दुसऱ्या शिष्यांनी थोमाला सांगितले, “आम्ही प्रभूला पाहिले” (२०:२५). पण त्याने संशय धरला, “पाहिल्यावाचून... मी विश्वास धरणारच नाही” (२०:२५). थोमाला येशूचा वैयक्तिक स्पर्श हवा होता. त्याचा स्पर्श केव्हा होईल सांगता येत नाही. पण तो होईल तेव्हा अतोनात मौल्यवान असेल. “थोमाने त्याला म्हटले, ‘माझा प्रभू व माझा देव!’” (२०:२८).

*मी स्वार्थीपणाने त्याला नाकारले आहे?* (पहा योहान २१:१५—१७). पेत्राने शाप आणि शपथा उच्चारुन येशूला नाकारले (पहा मत्तय २६:६९—७५) आणि तरीही पुनरुत्थानानंतर येशू एकट्या पेत्राला प्रकट झाला. प्रथम त्याने पेत्राला एकांतात पूर्व पदावर आणले आणि मग दुसऱ्यांसमोर सार्वजनिक रीतीने पूर्वपदावर आणले. पेत्राने म्हटले, “प्रभू, आपणाला सर्व ठाऊक आहे मी आपणांवर प्रेम करतो” (योहान २१:१७). माझे काय? मी व्यक्तिशः येशू ख्रिस्ताला ओळखतो? त्याच्याशी एकपणाची जवळीक असणे हेच खऱ्या शिष्यपणाचे लक्षण आहे. येशूचे हे ज्ञान कधीही लोपणार नाही.

## तुम्ही निराश आहात का समर्पित

**“...येशूने त्याला म्हटले, अद्यापि तुझ्यात एक गोष्ट उणी आहे; तुझे असेलनसेल ते विकून... आणि चल माझ्या मागे ये. पण हे ऐकून तो अतिशय खिन्न झाला, कारण तो फार श्रीमंत होता ” (लूक १८:२२-२३).**

प्रभूने तुम्हांला कधी काही अति कठीण असे सांगितले आहे? नसेल तर तुम्ही त्याला बोलताना खरेच ऐकले आहे काय असे विचारावेसे वाटते. येशू आम्हांला खूप काही सांगतो. ते आमच्या कानी पडते पण ऐकू येत नाही आणि आम्ही ऐकतो तेव्हा त्याचे बोलणे कठोर व असह्य असते.

आपण सांगितले, ते श्रीमंत तरुणाने करावे याची चिंता येशूला नव्हती. त्याने त्याला आपल्याबरोबर ठेवण्याचा यत्न केला नाही. त्याने एवढेच म्हटले, “असेल नसेल ते विक आणि माझ्यामागे ये.” आमच्या प्रभूने त्याची मनधरणी केली नाही. तो परखड शब्द बोलला आणि थांबला.

येशू कधी माझ्याशी असे काही कठीण बोलला आहे? त्याने मलाच व्यक्तिशः काही सांगितले आहे? या माणसाने येशूचे बोलणे ऐकले त्याच्या सांगण्याचा अर्थ त्याला नीट समजला. त्याचे अंतःकरण दुभंगले. निराश आणि खिन्न व उदास होऊन तो निघून गेला. तो मोठ्या उत्साहाने येशूकडे आला होता पण येशूच्या शब्दांनी त्याच्या आवेशी उत्साहावर पाणी पडले. येशूच्या अधीन होण्याऐवजी तो खचून गेला. येशूने त्याला जाऊ दिले. तो त्याच्यामागे गेला नाही. आपले वचन एकदा नीटपणे ऐकले की ते यथावकाश फळ देईल हे येशू जाणून आहे. पण आपणापैकी काहीजण त्याचे शब्द याच जीवनात सफल होऊ देत नाहीत. पण पुढे आम्ही त्याचे आज्ञापालन करु तेव्हा तो काय म्हणेल कोण जाणे. पण गतकाळतील आमच्या चुका तो आमच्या तोंडावर फेकणार नाही हे निश्चित.

## कधी दुःखामुळे मुखातून शब्द फुटत नाही असे झाले आहे?

**"पण हे ऐकून तो अतिशय खिन्न झाला, कारण तो फार श्रीमंत होता" (लूक १८:२३).**

तो श्रीमंत तरुण येशूपासून मोठ्या दुःखाने शब्दही न बोलत निघून गेला. येशूने सांगितले ते सर्व त्याला व्यवस्थित समजले होते. ते ऐकून दुःखामुळे त्याच्या तोंडून शब्दही फुटेना. देवाचे वचन या प्रकारे तुमचे अंतःकरण भेदून गेले आहे? तुमच्या जीवनातील एखादा भाग अद्याप त्याला समर्पण केलेला नाही काय? तुमच्यामधील काही नको असलेल्या गोष्टी तुमच्या नजरेस आणल्या आहेत? आणि ते ऐकून दुःखाने तुम्ही आवाक् झाल आहात? प्रभू तुमच्या पाठीस लागणार नाही. तुमचे मन वळवणार नाही पण प्रत्येक वेळी याच ठिकाणी भेटल्यावर तो तेच शब्द पुन्हा उच्चारील; म्हणेल, "तुमच्या म्हणण्याप्रमाणे करायचे तर प्रथम हे करा."

"तुझे असेल नसेल ते विकून टाक..." (१८:२२). देवासमोर फक्त जाणीव असणारा मानव असे उभे राहा. याच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टी दूर करा आणि देव मागतो ते त्याला द्या. येथेच तुमची इच्छा देवाला सोपवून द्या. तुम्हांला काय अधिक प्रिय आहे? येशूला जे हवे त्याचा विचार का स्वतः येशू? विचार अधिक प्रिय असेल तर नक्कीच त्याच्या शब्दांनी तुम्ही दुःखी होणार. ज्यांच्यामध्ये त्याचा स्वभाव आहे त्यांना ते सर्व सोपे वाटेल. दुसऱ्यांना फार कठीण!

माझ्या गरीबीत आणि मी कोणी नाही यातच मला धन्यता वाटत असेल तर मी येशूचा शिष्य कधीच होऊ शकणार नाही आणि मी स्वतःला श्रीमंत वाटलो तरी येशूचा शिष्य होणार नाही. मी दीन व दरिद्री झालो आणि ही जाणीव सदोदित ठेवण्यास तयार आहे? तसे नसेल तर मी निराशच होणार. निराश म्हणजे भ्रमनिरास झालेली आत्मप्रीती ही माझी येशूवरची निष्ठा असेल, त्यात खुद्द येशूवरील प्रीती नसणारच!

ऑगस्ट १९

## स्वतःची जाणीव असणे

### "... तुम्ही सर्व माझ्याकडे या..." (मत्तय ११:२८).

आम्ही ख्रिस्त येशूमध्ये परिपूर्ण जीवन जगावे ही देवाची इच्छा आहे. पण कधीकधी या जीवनावर बाहेरुन हल्ले होतात. मग आपण आत्मपरिक्षण करतो. ही पूर्वीची सवय पुन्हा समोर येते. स्वतःची जाणीव हीच सर्वप्रथम देवामधील आमच्या परिपूर्ण जीवनात उलथापालथ करते. स्वतःची जाणीव झाल्याने, जीवनात नेहमीच खळबळ माजते. आत्मजाणीव हे काही पाप नाही. एकदम नव्या परिस्थितीला तोंड देताना नेहमीच स्वतःची जाणीव होते. परंतु देवामध्ये आम्ही नेहमी परिपूर्ण असावे हीच त्याची इच्छा आहे. त्याच्यामधील आमच्या विश्वासाला धक्का देणारे काही घडले तर लगेच ते नीट केले पाहिजे आणि ते नीट करायचे तर प्रभू येशूकडेच आले पाहिजे. त्याच्याकडे येऊन आमच्यामध्ये ख्रिस्ताची जाणीव उत्पन्न कर अशी विनंती केली तर तो त्याप्रमाणे करील त्यामुळेच आम्ही त्याच्यामध्ये पूर्णपणे राहण्यास शिकू.

ख्रिस्ताबरोबर तुमचे जीवन एक झालेले असते. या एकपणात भेद आणणारे, ते नष्ट करणारे काही येऊ देऊ नका. तुमचे मित्र, तुमची परिस्थिती या कशाचाही परिणाम ख्रिस्तामधील तुमच्या जीवनावर होऊ देऊ नका. तसे झाले तर तुमची शक्ती ओसरुन तुमची आत्मिक वाढ खुंटेल. त्याच्या तुमच्या एकपणात बिघाड होणार नाही याची काळजी घ्या. स्वतःला त्याच्यापासून विभक्त होऊ देऊ नका. आत्मिक दृष्टीने योग्य असणे हेच महत्त्वाचे आहे. "तुम्ही सर्व माझ्याकडे या..." हाच उत्तम उपाय आहे. याच शब्दांनी आमच्या बौद्धिक, नैतिक आणि आत्मिक खोलीचे मोजमाप होते. तरीपण आमच्या जीवनातील बारीकसारीक गोष्टीत आम्ही वाद करतो, येशूकडे येतच नाही!

ऑगस्ट २०

## ख्रिस्ताची जाणीव

**"... म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन" (मत्तय ११:२८).**

येशू ख्रिस्तामधील तुमचे जीवन डळमळीत होऊ लागले तर लगेच त्याच्याकडे वळा आणि तुमचा विसावा परत मिळावा म्हणून त्याला विनंती करा. ऐक्यामध्ये ही फूट कशाने पडते आहे ते तपासून पाहा. प्रभूला विनंती करुन त्याची जाणीव स्वतःमध्ये घ्या मग तोच तुमचे सर्वस्व असेल. आपली स्वतःची जाणीव तशीच राहू देऊ नका; कारण त्यातूनच स्वतःची कीव येऊ लागते आणि ही कीव सैतानी आहे, असे कधी म्हणू नका. "माझ्याविषयी त्यांचा गैरसमज झालाय. त्यांनी याबद्दल माझी माफी मागितली पाहिजे आणि हे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले आहे." पण या बाबतीत दुसऱ्यांना करायचे ते करु दे. तुम्ही प्रभूपासून ख्रिस्ताची जाणीव मागून घ्या. तुम्ही त्याच्यामध्ये एकरुप होईपर्यंत तो तुम्हांला स्थिर करील.

बालकाचे जीवन परिपूर्ण असते. ख्रिस्ताची जाणीव मला पूर्णपणे झाली तर काहीतरी चुकते असे समजावे. रोगी माणसालाच आरोग्य कसे असते ते समजते. देवाच्या मुलाला देवाच्या इच्छेची जाणीव नसते कारण ते स्वतःच देवाची इच्छा असते. देवाच्या इच्छेपासून किंचित जरी ढळलो तरी आम्ही विचारु लागतो, "हे प्रभू, तुझी इच्छा काय आहे?" देवाचे मूल देव प्रार्थनेचे उत्तर देतो याची जाणीव व्हावी असे कधीच विनवणार नाही; कारण देव नेहमी प्रार्थनेचे उत्तर देतो याची त्याला खात्री असते. आमच्याच बुद्धीने आम्ही आत्मजाणीव पुसण्याचा प्रयत्न केला तर आम्ही ती जाणीव अधिकच बळकट करु. येशू म्हणतो, "माझ्याकडे या... मी तुम्हांला विसावा देईन" म्हणजे ख्रिस्ताची जाणीव स्वतःच्या जाणीवेची जागा घेईल. येशू येतो तेथेतेथे तो विसावा देतो. आमच्या जीवनातील सर्व कार्ये संपल्याचा विसावा तो आम्हांला देईल.

ऑगस्ट २१

## दुर्लक्षितांनी केलेली सेवा

**“जे आत्म्याने ‘दीन’ ते धन्य...” (मत्तय ५:३).**

आमच्या मापदंडानुसार पात्र नसलेल्या गोष्टींकडे नव्या करारात लक्ष दिले आहे. “जे आत्म्याने दीन ते धन्य” म्हणजे “दरिद्री धन्य आहेत!” गरीब तर सर्वत्र असतात! आजकालच्या उपदेशातून व्यक्तींच्या जीवनातील ठळक गोष्टींचा उल्लेख असतो. उदाहरणार्थ, शीलस्वभाव किंवा तिची इच्छाशक्ती! “येशू ख्रिस्ताविषयी निर्णय घ्या” हे शब्द आम्ही ऐकतो. त्यात आमच्या प्रभूने कधी भरंवसा ठेवला नाही त्यालाच महत्त्व दिले जाते. तो आम्हांला त्याच्यासाठी निर्णय करण्यास सांगत नाही तर त्याच्या अधीन होण्यास सांगतो. सर्वसामान्यांची अस्सल मोहकता हाच येशू ख्रिस्ताच्या राज्याचा पाया आहे. माझ्या गरिबीत मी खरेच धन्य आहे. मला इच्छाशक्ती नसेल आणि अतिसामान्य स्वभाव असेल तर येशू म्हणतो, “तू धन्य आहेस कारण तू तुझ्या गरीबीच्या द्वारे माझ्या राज्यात येऊ शकतोस.” माझ्या चांगुलपणामुळे नव्हे तर गरीबीमुळेच त्याच्या राज्यात मी जाईन.

देवाच्यावतीने साक्ष देणारी मोहकता ज्याच्यासाठी असते त्याला ती समजत नाही. जाणीवपूर्वक टाकलेला प्रभाव अहंकारी आणि ख्रिस्ताला न शोभणारा आहे. माझा देवाला काही उपयोग आहे का असा प्रश्न आला तर लगेच मी प्रभूचे सौंदर्य आणि त्याचा ममत्त्वाचा स्पर्श यांना मुकतो.

आम्हांला विशेष प्रभावित करणारे कोण आहेत? आमचा प्रभाव आहे असे म्हणणाऱ्यांचा अजिबात प्रभाव पडत नाही. पण प्रभावाची कल्पनाही नसते तेच आम्हांला प्रभावित करतात. ख्रिस्ती जीवनात सात्विक प्रभाव कधीच स्वतःची जाणीव ठेवत नाही. आम्हांलाही आमच्या प्रभावाची जाणीव झाली तर येशूचा स्पर्श असलेली अस्सल मोहकता नावालाही उरत नाही. येशूचे कार्य चालू आहे हे आम्हांला समजते कारण तो सामान्यांमध्येही काही प्रेरणादायक उत्पन्न करतो.

## “मी करतो खरा... परंतु... तो”

**“मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा... करतो खरा... परंतु... तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे” (मत्तय ३:११).**

तुम्ही आपल्या जीवनात कधी “मी करतो... परंतु... तो...” असे म्हणण्याच्या टप्प्यावर आला आहा? तो क्षण येईपर्यंत पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा म्हणजे काय ते तुम्हांला समजणारच नाही. माझी पराकाष्ठा झाली आहे. पण त्याचे कार्य येथेच सुरु होते. कोणी कधी करणार नाही अशा गोष्टी तो करतो. त्याच्या आगमनासाठी माझी तयारी आहे काय? काहीतरी योग्य वा अयोग्य आड येत असेल तर तो माझ्यामध्ये येऊ शकणार नाही. तो येईल तेव्हा माझ्या हातून घडलेल्या सर्व गोष्टी प्रकाशात आणील त्याला माझी तयारी आहे? येथेच तो येतो. माझ्यातील प्रत्येक अशुद्ध गोष्टीवर तो आपले पाय रोवून उभा राहील आणि मी शुद्ध आहे असे वाटते तेथे तो आपला पाय न टाकता निघून जाईल.

पश्चात्तापात पापाची जाणीव नसते त्यात अपात्रतेची जाणीव होते. मी पश्चात्ताप करतो तेव्हा माझ्या असाहाय्यतेची खात्री पटते. त्याची पादत्राणे उचलण्यास मी अपात्र आहे हे मला समजते. अशा प्रकारे पश्चात्ताप मी केला आहे? का माझ्या कृत्यांचे समर्थन करायची पुसटशी आशा आहे? मी संपूर्ण पश्चात्ताप केला नसेल तर देव माझ्या जीवनात येऊ शकणार नाही.

“पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे.” योहानाने येथे पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याचा उल्लेख अनुभव म्हणून नव्हे तर येशू ख्रिस्ताने केलेले कार्य असा केला आहे. “तो... तुमचा बाप्तिस्मा करणार आहे” पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा झालेल्यांना आपल्या संपूर्ण अपात्रतेची जाणीव होते. *“मी करतो”* हे भूतकाळात आहे *“पण तो”* आला आणि काही अद्‌भुत घडले. काहीही करता येणार नाही अशा टप्प्यावर या, तो सर्वकाही करील.

**ऑगस्ट २३**

## प्रार्थना “गुप्तस्थळी” लढाई

**“तू तर जेव्हा जेव्हा प्रार्थना करतोस तेव्हा तेव्हा ‘आपल्या खोलीत जा व दार लावून घेऊन’ आपल्या गुप्तवासी पित्याची ‘प्रार्थना कर’ म्हणजे तुझा गुप्तदर्शी पिता तुला तिचे फळ देईल” (मत्तय ६:६).**

“गुप्तस्थळी असलेल्या तुमच्या पित्याची स्वप्ने पाहा” असे येशूने म्हटले नाही, मात्र त्याने म्हटले, “... गुप्तवासी पित्याची प्रार्थना करा...” प्रार्थना इच्छेचा प्रयत्न आहे. खोलीत जाऊन दार बंद केले की प्रार्थना ही कठीण गोष्ट करायची आहे. सर्वप्रथम आमच्या उधळणाऱ्या विचारांना खीळ घातली पाहिजे. चौफेर धावणाऱ्या विचारांच्या वारूला लगाम घालणे हे कठीण काम प्रथम करुन स्वच्छेने जाणीवपूर्वक प्रार्थना करण्यावर चित्त एकाग्र केले पाहिजे.

प्रार्थनेसाठी योग्य जागा निवडावी, पण तेथे गेले की विचारचक्र सुरु होते. आपण मनात म्हणतो, “आज हे केले पाहिजे. ते कालच करायला हवे होते!” येशू म्हणतो, “दार लावून घ्या.” देवासमोर एकांतात स्तब्ध राहणे म्हणजे आमचे विचार बंधनात ठेवून फक्त परमेश्वराचा विचार करणे. परमेश्वर “गुप्तवासी” आहे. त्या “गुप्त ठिकाणाहून” तो आम्हांला पाहतो. आम्ही या “गुप्तस्थळी” खरोखरी राहतो तेव्हा आमच्या मनात परमेश्वराविषयी शंका येतच नाही. आम्हांला त्याची पूर्ण खात्री वाटते. “गुप्तस्थळी” प्रवेश करा. परमेश्वर नित्याच्या परिस्थितीत उपस्थित आहे हे तुम्हांला दिसून येईल. प्रत्येक गोष्टीत परमेश्वराला जमेस धरण्यास शिका. दररोज आपल्या जीवनाचे दार उघडून देवाला जीवनात घ्या. तसे न केले तर तुम्ही संपूर्ण दिवस चुकीच्या पातळीवर कामे कराल, जीवनाचे दार पूर्ण उघडा आणि आपल्या “गुप्तवासी पित्याची” प्रार्थना करा. तुम्ही कराल त्या प्रत्येक कार्यावर देवाच्या सान्निध्यात कायमचा ठसा उमटेल.

ऑगस्ट २४

## आत्मिक शोध

**“आपल्या मुलाने भाकर मागितली तर त्याला धोंडा देईल... असा तुमच्यात कोण माणूस आहे?” (मत्तय ७:९–१०).**

आमच्या प्रभूने येथे दिलेले उदाहरण चांगले मूल काही चांगले मागते आहे असे आहे. देवाबरोबर आमचे नाते कसेही असो तो आमची प्रार्थना ऐकतो हे आम्ही गृहीत धरले आहे (पहा मत्तय ५:४५). तुम्ही मागितले ते मिळाले नाही तर देवाची तशी इच्छा नाही असे म्हणू नका. खचून न जाता का मिळाले नाही त्याचे कारण शोधा. पुरावे शोधा. घरात, कुटुंबात, तुमची पत्नी, तुमची मुले, मुली, मित्र, विद्यार्थी वगैरेंबरोबरचे तुमचे संबंध सरळ आहेत काय ते पहा. ह्या सर्व नात्यांमध्ये तुम्ही “चांगले मूल” आहात? तुम्ही प्रभूला हे सांगाल, “मी संतापी आहे, सगळ्यांना बोलतो तरीपण मला आत्मिक आशीर्वाद हवेत.” “चांगल्या मुलाची” वृत्ती तुमच्यामध्ये येईपर्यंत तुम्हांला आशीर्वाद मिळणार नाहीत.

आम्ही अवज्ञेला निष्ठा समजत अधीन होण्याऐवजी वाद करतो. आमच्या चुका दाखवणारे पुरावे आम्ही पहात नाही. मी दुसऱ्याचे देणे चुकते न करता देवाकडे पैसे मागतो. मी दुसऱ्याला क्षमा करण्यास नकार दिला आहे? माझे आप्त, मित्र ह्यांच्यामध्ये मी देवाचे मूल म्हणून राहतो काय? (पहा मत्तय ७:१२).

नवा जन्म झाल्यानेच मी देवाचे मूल आहे आणि “मी प्रकाशात चालत असलो” (१ योहान १:७) तरच मी चांगला आहे. आमच्यातील अनेकांना प्रार्थना ही किरकोळ गोष्ट वाटते. ती देवाबरोबरची गूढ, भावनिक सहभागिता आहे असे वाटते. आमच्या दृष्टीसमोर अंधारी आणणारे आत्मिक धुके उत्पन्न करण्यात आम्ही चांगले तरबेज आहोत. आम्ही बारकाईने शोध घेतला तर चूक कोठे आहे, न फेडलेले कर्ज, चिडखोर वृत्ती, वगैरे कोठे चुकते ते समजते. आम्ही देवाची मुले नसलो तर प्रार्थना करणे निरर्थक आहे. आपल्या मुलांविषयी येशूने म्हटले आहे, “जो कोणी मागतो त्याला मिळते” (मत्तय ७:८).

## आत्मत्याग आणि मैत्री

**"... मी तुम्हांला मित्र म्हटले आहे..." (योहान १५:१५).**

आमचे जीवन सर्वस्वी समर्पण केल्याशिवाय आत्मत्यागाचा आनंद समजणार नाही. पण संपूर्णपणे शरण जाणे फार कठीण आहे. आम्ही यात अटी घालतो. "अमुक झाले तर मी शरण जाईन," "देवाला माझे जीवन समर्पण केले पाहिजे असे वाटते", वगैरे. अशा रीतीने आत्मसमर्पणाचा आनंद कधी मिळणार नाही.

परंतु आम्ही सर्वथा येशूला शरण गेलो की पवित्र आत्मा आम्हांला त्याचा आनंद देतो. आमच्या मित्रासाठी प्राण देणे हे आत्मसमर्पणाचे अंतिम उद्दिष्ट आहे (पहा १५:१३–१४). पवित्र आत्मा आमच्या जीवनात आला की येशूसाठी प्राण अर्पण करणे हीच इच्छा असते. त्यात आत्मसमर्पणाचा विचार नसतो. अर्पण पवित्र आत्म्याच्या प्रीतीचा आविष्कार आहे.

आमच्या प्रभूचे जीवन आत्मसमर्पणाचे उदाहरण आहे. स्तोत्र ४०:८ "हे माझ्या देवा तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यात मला आनंद आहे..." या वचनाचा प्रत्यय येशूच्या जीवनातून येतो. त्याने आनंदाने महान त्याग केला. मी येशू ख्रिस्ताला माझे संपूर्ण समर्पण केले आहे? तोच माझा मार्गदर्शक नसेल तर माझे अर्पण व्यर्थ आहे. त्याच्यावर दृष्टी ठेवून मी त्याच्या स्वाधीन झालो तर त्याचा प्रभाव माझ्या जीवनामध्ये निश्चित दिसेल (पहा इब्री १२:१–२).

तुमच्या देहवासना देवापुढे चालण्यास आड येऊ नयेत. प्रभू येशू हीच पवित्रजनाची इच्छा आहे. देवावरील प्रीती भावनिक नसते. देव करतो तशीच प्रीती पवित्रजन करतात.

"मी तुम्हांला मित्र म्हटले आहे." येशूने आमच्यामध्ये उत्पन्न केलेले नवीन जीवन हाच आमच्या मैत्रीचा आधार आहे. याचा जुन्या जीवनाशी काही संबंध नसतो तर देवाच्या  जीवनाशी असतो; हे जीवन नम्र, शुद्ध आणि देवाशी एकनिष्ठ असते.

## तुम्ही कधी अस्वस्थ झाला आहात?

**“मी तुम्हांस शांती देऊन ठेवतो; मी आपली शांती तुम्हांला देतो...” (योहान १४:२७).**

काही वेळा आमची शांती आमच्या अज्ञानावर आधारलेली असते. जीवनातील वास्तव समोर आले की खरी आंतरिक शांती येशूपासून नसेल तर ती मिळणे अशक्यच आहे. आमचा प्रभू शांतीवचन उच्चारतो तेव्हा शांती मिळते. त्याचे शब्द “आत्मा आणि जीवन” आहेत (योहान ६:६३). येशूने म्हटल्याप्रमाणे त्याची शांती मला मिळाली आहे? त्याच्याकडे पाहिल्यानेच संतोष आणि शांती मिळते.

आता तुम्ही अस्वस्थ आहा? तुमच्या जीवनात देवाने येऊ दिलेल्या लाटांनी अस्वस्थ झाला आहा? विश्वासाचा आधार घेता घेता निराधार झाल्यासारखे वाटते? शांतीचा ठेवा आढळत नाही? आपले जीवन ओसाड झालेसे वाटते? आता वर पाहा आणि प्रभू येशूकडून स्थिर संतोष मिळवा. त्याची शांती देवाबरोबर सरळ असण्याचे चिन्ह आहे. आता तुम्ही आनंदाने आपले मन त्याजकडे लावू शकता. येशू ख्रिस्ताच्या चेहऱ्याच्या आड काहीही येऊ देऊ नका. तसे झालेच तर तुम्ही नक्की अस्वस्थ व्हाल अगर सुरक्षिततेची खोटी जाणीव होईल.

तुमच्यासमोर आता आहे त्या प्रश्नाविषयी सांगायचे तर तुम्ही येशूकडे पाहात आहा काय? (इब्री १२:२). त्याच्याकडून शांती मिळवत आहा? असाल तर कृपेचा थोर आशीर्वाद तुमचाच आहे, तुम्हांला पूर्ण शांती मिळेल. आम्ही त्याला जमेस धरले नाही की आमच्या समस्या वाढतात. येशू ख्रिस्ताला कबूल केले की गोंधळ संपतो, कारण त्याच्यामध्ये गोंधळ नाही. सर्व त्याच्यासमोर ठेवा. तुम्हांला अडचणी येतील, शोक, दुःखाचे प्रसंग येतील तेव्हा त्याचे हे शब्द ऐका “तुमचे अंतःकरण अस्वस्थ होऊ नये...” (योहान १४:२७).

**ऑगस्ट २७**

## आपल्या ईश्वरज्ञानाला अनुसरुन जगणे

**“तुम्हांला अंधकाराने गाठू नये म्हणून तुम्हांजवळ प्रकाश आहे तोपर्यंत चाला… ” (योहान १२:३५).**

देवाबरोबर डोंगरमाथ्यावर असतानाच्या अनमोल क्षणांचा उपयोग करा ते वाया दवडू नका. प्रकाशात चालला नाहीत तर अंधकार येईलच. “ह्यास्तव तुझ्यातील प्रकाश जर अंधार असला तर तो अंधार केवढा!” (मत्तय ६:२३). तुम्ही ज्याक्षणी पवित्रीकरण अगर देवाने तुम्हांला दिले असेल त्याकडे दुर्लक्ष केलेत तर तुमचे आध्यात्मिक जीवन बिघडलेच असे समजा. नेहमी सत्य तुमच्या वास्तव जीवनात आणा. देवाने दिलेला प्रकाश प्रत्येक भागात कारणी लावा तसे न कराल तर तुमचा प्रकाशही तुम्हांला शापवत होईल.

मागील अनुभवाच्या आत्मसमाधानाला कवटाळून बसणाऱ्या व्यक्तीला हिताचा बोध करणे अवघड आहे. त्याने तो पूर्व अनुभव जीवनातून व्यक्त केला पाहिजे. मी पवित्र झालो आहे असे केवळ म्हणू नका. पवित्रीकरणाचा अनुभव तुमच्या जीवनातून दिसू दे. तुम्हांला आत्मसंतुष्ट, समाधानी करणाऱ्या अनुभवापासून सावध राहा. हा विचार कितीही सुंदर वाटला तरी तो नरकाच्या खाचेतून आला असणार हे विसरु नका.

तुमचे ईश्वरज्ञान कृतीतून व्यक्त व्हावे. आमच्या प्रभूने म्हटले आहे, “… शास्त्री व परुशी ह्यांच्यापेक्षा तुमचे नीतिमत्व अधिक झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुमचा प्रवेश होणारच नाही” (मत्तय ५:२०). तुमच्या माहितीच्या नैतिक व्यक्तीपेक्षा तुमची नैतिकता अधिक झाली पाहिजे. पवित्रीकरणाचा सिद्धांत तुम्हांला माहीत असेल पण तुम्ही तो सिद्धांत रोजच्या जीवनात कारणी लावत आहात? तुमच्या जीवनातील प्रत्येक गोष्ट ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या प्रायश्चित्ताच्या मापदंडाने मोजली पाहिजे मग ती गोष्ट लौकिक, आत्मिक अगर नैतिक असो.

## प्रार्थनेचा उद्देश

**"... त्याच्या शिष्यांतील एकाने त्याला म्हटले प्रभुजी.... प्रार्थना करावयास शिकवले तसे आपणही आम्हांला शिकवा" (लूक ११:१).**

दैहिक माणसाच्या जीवनात सामान्यपणे प्रार्थनेला स्थान नसते. प्रार्थना नच केली तर व्यक्तिजीवनात क्लेश येतात असे म्हटले जाते. खरेतर यात क्लेश होतील ते त्याच्यामधील देवपुत्राच्या जीवनाला. या जीवनाचे पोषण अन्नाने नव्हे तर प्रार्थनेने होते. वरुन नवा जन्म झाला की त्याच्यामध्ये देवाच्या पुत्राचे जीवन जन्मते मग नवा जन्म झालेली व्यक्ती या जीवनाचे पोषण करील, अगर त्याची उपासमार करील. आमच्यामधील देवाच्या जीवनाचे पोषण प्रार्थनेने होते. प्रार्थनेविषयी आमचे सामान्य विचार नव्या करारात आढळत नाहीत. प्रार्थना म्हणजे देवाकडून हवे ते मिळवण्याचे साधन असे आपण समजतो. पण देवाला ओळखणे हाच प्रार्थनेचा उद्देश असल्याचे पवित्र शास्त्र सांगते.

"... मागा म्हणजे तुम्हांस मिळेल..." (योहान १६:२४). आम्ही देवासमोर कुरकूर करतो, काही वेळा क्षमा मागतो, केव्हा बेपर्वा असतो. आम्ही त्याच्याकडे फारच थोडे मागतो. लहान मूल अगदी धीटपणे मागते. आमच्या प्रभूने म्हटले, "तुम्ही बाळकासारखे झाल्याशिवाय..." (मत्तय १८:३). विनंती करा. देव ते करील. येशू ख्रिस्ताला संधी द्या, पण आपण हताश झालो तरच हे करतो. अशा वेळी प्रार्थना करणे हा एकच उपाय असतो. याच मार्गाने देवापर्यंत पोचू शकतो. देवासमोर सरळ राहा आणि आपल्या सर्व समस्या त्याला सांगा. आपण स्वयंपूर्ण आहो आणि देवाजवळ काही मागण्याची गरज नाही असे तुम्हांला वाटते, हे थांबले पाहिजे.

प्रार्थनेने सर्व बदलते यापेक्षा "प्रार्थना मला बदलते व मी बदल करतो" असे म्हणावे. देवाने योग्य व्यवस्था केली आहे. तारणाच्या आधारे प्रार्थना एकंदर गोष्टीकडे पाहण्याची आपली दृष्टी बदलते. प्रार्थनेने बाह्य बदल होत नाहीत तर व्यक्तीच्या अंतरंगात चमत्कार होतात.

## ऑगस्ट २९

### कसोटीस उतरलेल्या विश्वासाची अद्वितीय जवळीक

**“येशूने तिला म्हटले, तू विश्वास ठेवशील तर देवाचे गौरव पाहशील असे मी तुला सांगितले नव्हते काय?” (योहान ११:४०).**

विश्वासाच्या जीवनात पुढे पाऊल टाकलेत की परिस्थितीनुसार सामान्य दृष्टीने विश्वासाच्याविरुद्ध काही झाल्याचे दिसेल. पण सामान्य दृष्टी आणि विश्वास यांचा संबंध नाही. स्वाभाविक जीवन आणि आत्मिक जीवन यातल्याप्रमाणे या दोहोत फरक आहे. तुमच्या सामान्य दृष्टीला येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवता येत नाही तेथे तुम्ही विश्वास ठेवाल? तुमचे व्यावहारिक शहाणपण नको म्हणत असताना तुम्ही येशू ख्रिस्ताच्या शब्दांवर विश्वास ठेवून धाडसाने पुढे जाल? डोंगरमाथ्यावर असताना तुम्ही म्हणता, “माझा विश्वास आहे देव हे करील.” पण तुम्हांला डोंगरावरुन खाली भूतग्रस्त खोऱ्यात यावे लागेल. येथे रुपांतराच्या डोंगरावरील अनुभवाचा उपहास करणाऱ्यांना तोंड द्यावे लागेल (पहा लूक ९:२८-४२). माझे ईश्वरज्ञान माझ्या मनात स्पष्ट झाले की त्याच्या उलट काही समोर येते. “माझा देव (माझ्या) सर्व गरजा पुरवील” (फिलिप्पै ४:१९). यावर विश्वास ठेवला की माझ्या विश्वासाची परीक्षा होते. माझी शक्ती ओसरते डोळ्यांपुढे अंधारी येते तेव्हा मी परीक्षेत विजयी होईन का पराभव पत्करावा लागेल?

विश्वासाची पारख झाली पाहिजे. संघर्षातून तो तुमच्या स्वतःचा होईल. आता तुमच्या विश्वासापुढे कोणते आव्हान आहे? या कसोटीत तुमचा विश्वास कसास उतरेल अगर तो नामशेष होईल. “येशूने म्हटले, ‘जो कोणी माझ्यासंबंधाने अडखळत नाही तो धन्य’” (मत्तय ११:६). येशूवर भरंवसा ठेवणे महत्त्वाचे आहे. “कारण जर आपण आपला आरंभीचा भरंवसा दृढ धरला तरच आपण ख्रिस्ताचे भागीदार झालो आहो” (इब्री ३:१४). त्याच्यावर दृढ विश्वास ठेवा तुम्हांला आव्हान देणाऱ्या प्रत्येक गोष्टीने तुमचा विश्वास अधिक दृढ होईल. आम्हांला शारीरिक मरण येईपर्यंत आमच्या विश्वासाची पारख होतच असते. विश्वास देवावर संपूर्ण भरंवसा ठेवणे होय. तो आम्हांला कधीच टाकणार नाही ही खात्री (इब्री १३:५—६).

**ऑगस्ट ३०**

## उपयुक्तता का नातेसंबंध

**“तथापि भुते तुम्हांला वश होतात ह्याचा आनंद मानू नका; तर तुमची नावे स्वर्गात लिहिलेली आहेत ह्याचा आनंद माना” (लूक १०:२०).**

येशू ख्रिस्त येथे सांगतो आहे “माझ्यासाठी यशस्वीपणे सेवा केली म्हणून आनंदून जाऊ नका तर माझ्याबरोबर तुमचे योग्य नाते आहे म्हणून आनंद करा.” ख्रिस्ती सेवाकार्य करताना देवाने आपला उपयोग करुन घेतला म्हणून आनंद करणे हा एक सापळा आहे. यात सापडू नका. देवापुढे योग्य प्रकारे उभे राहाल तरच देव तुमचा किती व कसा उपयोग करुन घेणार ते समजेल. देवाबरोबर तुमचे नाते रास्त असले तर तुमची परिस्थिती कशीही असो, दररोज तुम्हांला कोणाशीही सामना करावा लागो, तो तुमच्यामधून “जिवंत पाण्याच्या नद्या वाहत्या ठेवील” (योहान ७:३८) आणि त्याच्या दयेमुळेच तो तुम्हांला याची जाणीव होऊ देत नाही. तारण आणि पवित्रीकरण ह्यांच्यायोगे देवाबरोबर योग्य नाते जुळले की तुमची परिस्थिती कशीही असो देवानेच तुम्हांला त्यामध्ये ठेवले आहे हे लक्षात घ्या. तुमच्या परिस्थितीविषयीची तुमची प्रतिक्रिया घेऊन देव आपला उद्देश पुरा करतो. “तो प्रकाशात आहे तसे तुम्ही प्रकाशात चाललात” तर तो हे करीलच (१ योहान १:७).

आज आम्ही सर्वस्वी सेवेवर भर देतो. एखाद्याच्या उपयुक्ततेच्या आधारे लोक साहाय्यासाठी विनंती करतात. उपयुक्तता ही कसोटी ठेवली तर ख्रिस्त या कसोटीला उतरणार नाही तो महाअपयशी ठरेल. पवित्रजनासाठी मार्गदर्शन व मसलत देवाकडून येते, त्या पवित्र जगाची उपयुक्तता आणि तो स्वतः यांचा तसा संबंध नाही. देव आमच्या द्वारे करतो ते कार्य महत्त्वाचे ठरते, आम्ही त्याच्यासाठी करतो ते महत्त्वाचे नाही. कोणाही व्यक्तीचे देवाशी असलेल्या नात्यावरच परमेश्वर लक्ष ठेवतो. प्रभूला हेच बहुमोलाचे असते. येशू “अनेक पुत्रांना गौरवात आणतो…” (इब्री २:१०).

## ऑगस्ट ३१

### “माझा आनंद... तुमचा आनंद”

**“माझा आनंद तुम्हांमध्ये असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत” (योहान १५:११).**

येशूला कोणता आनंद झाला? आनंद वेगळा आणि सुख वेगळे. येशू ख्रिस्ताविषयी सुख हा शब्द वापरणे हे त्याचा अपमान करणे होय. येशू ख्रिस्ताने आपल्या पित्याला स्वतःचे संपूर्ण समर्पण आणि आत्मत्याग केला हाच त्याचा आनंद. पित्याने ज्यासाठी पाठवले ते करणे हाच त्याचा आनंद आहे. “... जो आनंद त्याच्यापुढे होता, त्याकरता... त्याने वधस्तंभ सहन केला...” (इब्री १२:२). “हे माझ्या देवा, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यात मला आनंद आहे” (स्तोत्र ४०:८). आमचा आनंद त्याचा व्हावा तोपर्यंत तो पूर्ण होत राहावा अशी येशूने प्रार्थना केली. मी येशूला त्याचा आनंद मला देऊ दिला आहे काय?

भरभरुन जीवन जगणे हे शारीरिक तंदुरुस्तीवर अवलंबून नाही. देवाचे कार्य यशस्वीपणे पूर्ण व्हावे यातही ते नाही तर देवाला पूर्णपणे समजून घेणे आणि येशूप्रमाणे त्याच्याशी एक होऊन तीच सहभागिता ठेवणे यात ते जीवन आहे. आमच्या परिस्थितीकडे अधिक लक्ष दिल्याने या आनंदाला अडथळा होतो. येशूने म्हटले, “... प्रपंचाची चिंता, द्रव्यलोभ, मोह... ही... वचनाची वाढ खुंटवतात आणि ते निष्फळ होते” (मार्क ४:१९) आणि काय घडत आहे ते समजण्याआधीच आम्ही काळजी व चिंता यात अडकतो. देवाने आमच्यासाठी केले आहे ते केवळ प्राथमिक आहे, आम्ही अजून पुढे यावे, त्याचे साक्षी होऊन येशू कोण आहे ते जाहीर करावे हीच त्याची इच्छा आहे.

देवाबरोबर योग्य नाते जोडा, तेथे आनंद मिळवा आणि तुमच्यामधून “जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील” (योहान ७:३८). येशूला आपले जिवंत पाणी ओतता यावे असे झरे व्हा. दांभिक, अहंकारी, स्वार्थी होणे सोडा आणि “ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आपले जीवन जगा” (कलस्सै ३:३). तुम्हांला महान आशीर्वाद झालेली जीवने आपण आशीर्वाद आहो हे ठाऊक नसणाऱ्यांची जीवने आहेत.

**सप्टेंबर १**

## पवित्र होण्यासाठी नेमलेले

**“कारण असा शास्त्रलेख आहे की, तुम्ही पवित्र असा, कारण मी पवित्र आहे” (१ पेत्र १:१६).**

आपण सतत स्वतःला जीवनाच्या उद्देशाचे स्मरण दिले पाहिजे. आम्ही सुखी, निरोगी होण्यास नव्हे तर पवित्र होण्यास नेमलेले आहोत. आज अनेक इच्छा व वासना आमचे लक्ष वेधून घेतात. आमची जीवने त्यांच्यामुळे वाया जात आहेत. त्यांच्यातील अनेक इच्छा उत्तम, उदात्त असतील; पुढे पूर्णही होतील पण दरम्यानच्या काळात आमच्या लेखी त्यांचे महत्त्व कमीच झाले पाहिजे. पवित्र करणाऱ्या देवाचा आम्ही अंगिकार करतो का हाच महत्त्वाचा सवाल आहे. काही झाले तरी आपले देवाशी सरळ व योग्य नाते असलेच पाहिजे.

मी पवित्र झालेच पाहिजे? देव माझ्या जीवनात येऊन मला पवित्र करील यावर माझा विश्वास आहे? तुम्ही आपल्या उपदेशातून मी अपवित्र असल्याची खात्री देता? तर मला तुमचा उपदेश मान्य नाही. सुवार्तेच्या उपदेशाने मला मोठी चीड येते. त्यातून एकतर माझी अपवित्रता उघड होते आणि एक तीव्र इच्छा मनात उत्पन्न होते. देवाने मानव जातीसाठी पवित्रता हीच एक गोष्ट नेमलेली आहे. पवित्रजन निर्माण करणे हाच त्याचा उद्देश आहे. देव काही सदोदित आशीर्वादांचा वर्षाव करणारे यंत्र नाही. लोकांनी बटण दाबून भरपूर आशीर्वाद मिळवावे असे नाहीच. करुणेने आमचे तारण करण्यासाठी तो आला नाही. त्याने आम्हांला पवित्र होण्यासाठी उत्पन्न केले आहे म्हणूनच तो आमचे तारण करण्यास आला. ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्याद्वारे प्रायश्चित्त म्हणजे येशू ख्रिस्ताच्या मरणाच्या द्वारे देव मला पुन्हा त्याच्याबरोबर एक करील. आमच्यामध्ये काहीही आड येणार नाही.

पवित्र देवाला न रुचणारे कधीही करु नका. पवित्रता म्हणजे देवासमोर पूर्ण शुद्धतेने राहणे, चालणे. तुमच्या मुखातून येणारा प्रत्येक शब्द, मनातील प्रत्येक विचार, जीवनातील प्रत्येक गोष्ट यांवर देवाची शोधक नजर असते. पवित्रता एवढेच देवाने दिले असे नाही तर त्याची ही देणगी जीवनातून उघड होताना दिसते.

**सप्टेंबर २**

## शुद्ध आणि पवित्र समर्पित जीवन

**“जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याच्यातून... पाण्याच्या नद्या वाहतील” (योहान ७:३८).**

“माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्याला देवाच्या परिपूर्णतेचे सर्व आशीर्वाद मिळतील” असे येशूने म्हटले नाही. “माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्याला माझ्याकडून मिळेल ते सर्व त्याच्यामधून निसटेल” हाच त्याच्या म्हणण्याचा अर्थभाव आहे. व्यक्तीविकास हे त्याचे उद्दिष्ट नसून. व्यक्तीला आपल्यासारखे करावे हीच त्याची इच्छा आहे. स्वतःला देणे हेच देव पुत्राचे लक्षण आहे. आम्ही येशूवर विश्वास ठेवतो तर आम्हांला काय लाभ होणार याकडे आमचे लक्ष नसावे. तो आमच्याद्वारे कशाची वृष्टी करणार तेच महत्त्वाचे आहे. तो आम्हांला सुंदर रसरशीत द्राक्षांसारखे करणार नाही तर आमच्यातून माधुरी पिळून काढता यावी अशा द्राक्षांसारखे करणार आहे. आमच्या आत्मिक जीवनाचे यश जगाच्या मापदंडाने मोजता येणार नाही. देव आमच्यामधून करतो त्या वृष्टीने ते मोजावे; पण खरे तर ते अशक्य आहे.

बेथानी येथील मरीयेने “फार मौल्यवान सुगंधी तेलाने भरलेली... कुपी... फोडून (येशूच्या) मस्तकावर ओतली.” असे करण्याचे काही विशेष कारण नव्हते असेच प्रत्येकाला वाटले. खरे तर “तेव्हा कित्येक जण... म्हणाले, ह्या सुंगधी तेलाची अशी नासाडी कशासाठी केली?” (मार्क १४:३–४). परंतु तिच्या या त्यागमय भक्तीची येशूने प्रशंसा केली, “... जेथे जेथे सुवार्तेची घोषणा करण्यात येईल तेथे तेथे... सांगण्यात येईल” (मार्क १४:९). मरीयेने केले तसे दुसऱ्या कोणी केले की आमच्या प्रभूला अतीव आनंद होतो. त्यांचे करणे विशिष्ट नियमांनुसार नसते तर त्याला केलेल्या स्वतःच्या संपूर्ण समर्पणातून ते केलेले असते. आपल्या पुत्राच्या द्वारे जगाचे तारण व्हावे यासाठी देवाने त्याचे जीवन ओतले (योहान ३:१७). आम्ही त्याच्यासाठी आपली जीवने ओतण्यास तयार आहोत काय?

“जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याच्यातून... जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील” आणि दुसरी अनेक जीवने सतत ताजीतवानी होतील. आमच्या जीवनाची “अलाबास्र कुपी” फोडण्याची हीच वेळ आहे. आत्मसमाधानाचा खटाटोप सोडा आणि आपली जीवने त्याच्यासमोर ओता. आमच्या प्रभूसाठी हे कोण करणार हाच त्याचा सवाल आहे.

**सप्टेंबर ३**

## समाधान देणारे पाणी ओतणे

**“तो ते पिईना; त्याने ते परमेश्वराच्या नामाने ओतले” (२ शमुवेल २३:१६).**

अलीकडे तुम्हांला कोणती गोष्ट “बेथलेहेम येथील विहिरीतील पाण्यासारखी झाली आहे?” प्रीती, मैत्री का एखादा आत्मिक आशीर्वाद (२३:१६). काहीही होवो आपले समाधान व्हावे यासाठी तुम्ही काही केले आहे? असेल तर ते “परमेश्वरासाठी ओतता” येणार नाही. आपले समाधान व्हावे म्हणून तुम्ही काही आणले तर ते देवासाठी वेगळे ठेवणे शक्य नाही. देवाकडून आशीर्वाद मिळवून स्वतःचे समाधान कराल तर ते तुमचा नाश करील. त्याचा देवाला त्याग केला पाहिजे. वाया गेले असे वाटले तरी ते देवासमोर ओतावे.

स्वाभाविक प्रेम आणि आत्मिक आशीर्वाद “परमेश्वरासमोर” मला कसे ओतता येतील? तसे दृढ निश्चयाने करणे हेच एक मार्ग आहे. दुसरे लोक काही गोष्टी करतात. देवाला न ओळखणारा त्या स्वीकारु शकत नाही. तसे करणे माणसाला शक्य नाही. एखादी गोष्ट अद्‌भुत आहे, ती स्वीकारण्यास मी अपात्र आहे असे असेल तर मी ती लगेच “परमेश्वराच्या नामाने” ओतली पाहिजे. मग माझ्याकडे आलेल्या सर्व गोष्टी “जिवंत पाण्याच्या नद्या” म्हणून माझ्या सभोवार ओतल्या जातील (योहान ७:३८). मी या गोष्टी देवासमोर ओतत नाही तोपर्यंत त्या मला तसेच मी प्रीती करतो त्यांना धोकादायक आहेत; कारण त्यांचे रुपांतर वासनेत होईल. वाईट, घृणास्पद नसलेल्या गोष्टींच्या संबंधात आम्ही उत्कट इच्छा धरावी. अगदी प्रीती देखील “परमेश्वराच्या नामाने ओतून” रुपांतर करणे अगत्याचे आहे.

तुमच्यामध्ये कटुता, आंबटपणा आला असेल तर देवाने तुम्हांला दिलेला आशीर्वाद तुम्ही साठवून ठेवलात हेच त्याचे कारण आहे. तुम्ही तो त्याच्या नावाने ओतला असता तर तुमच्यासारखी दुसरी मनमिळाऊ व्यक्ती या पृथ्वीवर नसती. देवाचे आशीर्वाद नेहमी स्वतःसाठी ठेवत असाल “परमेश्वराच्या नामाने” ओतण्यास कधी शिकला नाहीत तर दुसऱ्या लोकांच्या दृष्टांतांचा वाढविस्तार तुमच्यामधून कधीही होणार नाही.

## त्याचे!

**“... ते तुझे होते आणि तू ते मला दिले” (योहान १७:६).**

मिशनरी व्यक्तीला पवित्र आत्म्याने “तुम्ही स्वतःचे मालक नाही!” हे कळवलेले असते (१ करिंथ ६:१९). “मी माझा धनी नाही” म्हणजे उच्चकोटीची आत्मिकता प्राप्त करणे. या जीवनाचे खरे स्वरुप रोजच्या जीवनात स्वतःला निर्धाराने दुसऱ्याच्या अधीन करण्याने दिसते. ही दुसरी व्यक्ती येशू ख्रिस्त आहे. मला माझ्या प्रभूबरोबर एक करण्यासाठी पवित्र आत्मा मला येशूचे स्वरुप, स्वभाव समजावून सांगतो. येशूने त्यांच्यासाठी केले होते त्या आधाराने एकाही शिष्याला बाहेर पाठवले नाही. पुनरुत्थान झाल्यानंतरच शिष्यांना पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने येशू कोण आहे, त्याला “जा” म्हणण्याचा काय अधिकार आहे ते त्यांना समजेल (मत्तय २८:१९; आणखी पहा लूक २४:४९ आणि प्रे. कृ. १:८).

“जर कोणी माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई, बायको, मुले, भाऊ बहिणी ह्यांचा आणि आपल्या जिवाचाही द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही” (लूक १४:२६). ती व्यक्ती चांगली, नेकीची नाही असे तो म्हणत नाही, पण येशू त्याच्यावर “माझा” असा शिक्का मारु शकणार नाही. या वचनामध्ये नमूद केलेले कोणतेही नाते आमच्या त्याच्या नात्याला आड येऊ शकते. मी माझी आई, माझी पत्नी अगर मी स्वतः यांनाच बिलगून राहण्याचे ठरवीन. पण असे असेल तर येशू सांगतो, “(तुम्ही) माझा शिष्य होऊ शकत नाही.” माझे तारण होणार नाही असा याचा अर्थ नाही. पण मी सर्वस्वी *“त्याच्या”* होणार नाही हाच याचा अर्थ आहे.

आमचा प्रभू आपल्या शिष्यांना स्वतःच्या मालकीचे करतो, मग आम्ही त्याला जबाबदार असतो. “... तुम्ही माझे साक्षी व्हाल...” (प्रे. कृ. १:८). येशूच्या शिष्याची इच्छा त्याच्यासाठी काहीही करावे ही नसून त्याला पूर्ण आनंद देणारे व्हावे हीच असते. मिशनरी सेवकाला हे म्हणता यावे हेच त्याचे रहस्य आहे, “मी त्याचा आहे, तो माझ्याद्वारे त्याचे कार्य व उद्देश साध्य करीत आहे.”

सर्वस्वी त्याचे व्हा!

**सप्टेंबर ५**

## येशूबरोबर जागे राहणे

**"तुम्ही येथे थांबा व माझ्याबरोबर जागे राहा" (मत्तय २६:३८).**

येशूने म्हटले, "माझ्याबरोबर जागे राहा." येशूच्या सांगण्याचा मथितार्थ होता, "स्वतःचा दृष्टीकोन नको, पण सर्वस्वी माझ्याबरोबर जागे राहा, लक्ष ठेवा!" आमच्या ख्रिस्ती जीवनाच्या आरंभकालात आम्ही येशूबरोबर जागे राहात नाही तर येशूसाठी जागे राहातो. आमच्या स्वतःच्या जीवनाच्या परिस्थितीतदेखील आम्ही पवित्र शास्त्राच्या प्रकट सत्याच्या द्वारे त्याच्याबरोबर जागे राहात नाही. आमच्या स्वतःच्या "गेथशेमाने" अनुभवातून त्याच्याशी समरुप व्हावे हाच आमच्या प्रभूचा प्रयत्न आहे. पण आम्ही म्हणतो, "नाही, प्रभू, मला याचा अर्थ समजत नाही, शिवाय हे फारच वेदनाकारक आहे." जो अगम्य आहे त्याच्याबरोबर आम्ही जागे कसे राहणार? येशूला दुःख, क्लेश का सोसावे लागतात ते न समजताच त्याच्या गेथशेमेनीमध्ये आम्ही त्याच्याबरोबर जागे कसे राहायचे? आणि त्याच्याबरोबर जागे कसे राहायचे ते आम्हांला कुठे माहीत आहे? येशू आमच्याबरोबर जागा असतो हे आम्हांला चांगले माहीत आहे.

शिष्य त्यांच्या नैसर्गिक क्षमतेप्रमाणे येशू ख्रिस्तावर प्रीती करत होते; पण त्यांना त्याचा उद्देश माहीत नव्हता. गेथशेमेनी बागेमध्ये ते सर्वजण झोपी गेले. त्यांना फार दुःख झाले होते. तीन वर्षांच्या अगदी घनिष्ट व जिव्हाळ्याच्या संबंधांनंतर "ते सर्वजण त्याला सोडून पळून गेले" (२६:१६).

"तेव्हा ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले..." (प्रे. कृ. २:४). "ते" या सर्वनामाने त्याच लोकांचा बोध होतो. पण या दोन घटनांच्या दरम्यान काही अद्‌भुत घटना घडल्या आमच्या प्रभूचा मृत्यू, पुनरुत्थान आणि आता शिष्य पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले होते. आमच्या प्रभूने सांगितले होते, "परंतु पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल..." (प्रे. कृ. १:८). उरलेल्या आयुष्यात ते त्याच्याबरोबर जागे राहण्यास शिकले हाच याचा अर्थ आहे.

**सप्टेंबर ६**

## दूरवर पोचणाऱ्या जीवनाच्या नद्या

**“जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याच्यातून... जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील” (योहान ७:३८).**

नदी वाहात वाहात पुढे जाते, ती कुठेकुठे जाते ते तिच्या उगमाला माहीत नसते. येशूने म्हटले आहे, “आम्हांला त्याची परिपूर्णता मिळाली असेल तर” जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील! त्यांचे आशीर्वाद “पृथ्वीच्या दिगंतापर्यंत” पोचतील (प्रे. कृ. १:८). त्यात आमच्या जीवनाचे परिणाम कितीही नगण्य असोत ओसंडून वाहणाऱ्या प्रवाहांशी आमचा काही संबंध नाही. “... देवाचे काम हेच आहे की... विश्वास ठेवावा” (योहान ६:२९). आपण दुसऱ्यांना किती मोठे आशीर्वाद आहोत हे देव क्वचित आमच्या दृष्टीत्पत्तीस आणतो.

नदी वाटेतील सर्व अडथळ्यांना न जुमानता नेटाने पुढे वाहात जाते. वाटेत मोठा अडथळा येऊन प्रवाह कुंठित झाला तर काही काळ थांबून त्या अडथळ्याच्या बाजूने पुढे जाईल आणि तिचा प्रवाह अधिक विशाल व गतिमान होतो. दुसरे जोमाने सेवा करताना तुम्ही पाहता पण तुमच्या जीवनात काही अडथळा येऊन तुमची प्रगती खुंटते. आता देवाला आपला काही उपयोग नाही असे वाटते पण उगमस्रोताकडे पाहात राहा. देव तुम्हांला अडथळ्यातून पलीकडे नेईल अगर तो दूर करील. अडथळ्यावर लक्ष लावू नका. नदी अडथळ्यांचा विचार करीत नाही. ती वेगाने वाहात असते. तुम्ही उगमावर लक्ष केंद्रित करा. तुम्ही आणि येशू ख्रिस्त ह्यांच्यामध्ये काहीच येऊ देऊ नका. तुमच्या सार्वभौम उगमाला बिलगून राहा.

आमच्यामधून येणाऱ्या आरोग्यदायी नद्यांचा विचार करा. देव अद्भुत सत्ये आमच्या मनांमध्ये प्रकट करतो. त्याने उघड केलेले प्रत्येक सत्य आमच्यामधून वाहणाऱ्या नदीची व्यापक शक्ती दाखवते. येशूवर तुमचा विश्वास आहे तर दुसऱ्यांना आशीर्वाद होणाऱ्या शक्तिशाली, वेगवान नद्या तुमच्यामधून वाहतील यात शंकाच नाही.

## आशीर्वादांचे झरे

**“जे पाणी मी त्याला देईल ते त्याच्यामध्ये सार्वकालिक जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा असे होईल.” (योहान ४:१४).**

आमच्या प्रभूने येथे पाण्याच्या साध्या झऱ्याचे नव्हे तर ओसंडून वाहणाऱ्या झऱ्याचे चित्र दाखवले आहे. “परिपूर्ण व्हा, होत राहा” (इफिस ५:१८). म्हणजे येशूबरोबर असलेल्या तुमच्या नात्याची मधुरता तुमच्यामधून प्रवाहित होईल. त्याचे जीवन तुमच्यामध्ये उसळत नाही असे आढळले तर त्याचा दोष तुमचाच आहे. प्रवाहात काही अडथळा आला असणार. “तुमच्यामधून जिवंत पाण्याच्या नद्या” वाहण्यासाठी उगमावर लक्ष केंद्रित करा (योहान ७:३८).

आम्ही झरे व्हावे, मग येशू आमच्यामधून “जिवंत पाण्याच्या नद्यांप्रमाणे” वाहात राहील. आमच्यातील काही मृत समुद्राप्रमाणे फक्त घेणारे आहेत. ते एक थेंब पाणीही देत नाहीत. प्रभू येशूबरोबर त्यांचे योग्य नाते नसते. आम्हांला त्याच्यापासून आशीर्वाद मिळतात तसे तो आमच्या द्वारे आशीर्वादांचा वर्षाव करील. परंतु आशीर्वाद मिळतात त्याच मानाने त्यांची वृष्टी झाली नाही तर त्याच्या आमच्या नात्यात अंतराय आला असे समजावे. तसे नसेल तर येशू म्हणतो तशा “जिवंत पाण्याच्या नद्या तुमच्यामधून वाहतील. हा आशीर्वाद दुसऱ्याला देता येत नाही, हा अनुभव दुसऱ्यांना सांगता येत नाही. ही तुमच्यामधून सतत वाहणारी नदी आहे; येशूला बिलगून राहा, विश्वास व त्याच्याशी असलेले नाते नीट ठेवा. मग तुमच्यामधून दुसऱ्यांच्या जीवनात संथपणे नदीचा प्रवाह वाहात राहील. कोठेही कोरडेपणा अगर निर्जीवपणा जाणवणार नाही.

एकाच व्यक्तीमधून नद्या वाहतील असे म्हणणे अतिशयोक्तिचे नाही का? स्वतःकडे पाहून “अरे नद्या कुठे दिसत नाहीत” असे म्हणू नका. देवाच्या कार्याचा इतिहास पाहा. तो अज्ञात, उपेक्षित, अबोध अशा पण निश्चयाने येशू ख्रिस्ताशी विश्वासू राहिलेल्या लोकांपासून कार्याचा आरंभ करतो.

**सप्टेंबर ८**

## तुमचे तुम्हीच करा

**“तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्वकाही पाडून टाकून” (२ करिंथ १०:५).**

*निर्धारपूर्वक काही गोष्टी नामशेष करा.* पापासून सुटका आणि मानवी स्वभावापासून सुटका हे दोन्ही एकच नाही. मानवी स्वभावामध्ये पूर्वग्रहासारख्या काही गोष्टी असतात. त्या पवित्रजन फक्त उपेक्षेनेच दूर करु शकतो. दुसऱ्या काही गोष्टी आहेत त्या देवाच्या आत्म्याकडून मिळणाऱ्या दिव्य शक्तीनेच नष्ट कराव्या लागतात. काही गोष्टींबरोबर आम्ही झगडू नये तर “स्थिर उभे राहा आणि देव तुमचे... तारण करील ते पाहा” (निर्गम १४:२३). एवढेच करावे. परंतु देवाच्या ज्ञानाविरुद्ध उभा राहणरा प्रत्येक विचार तडजोडीने नव्हे, मानवी शक्तीने नव्हे तर देवाच्या सामर्थ्याने जमीनदोस्त करायचा आहे (पहा २ करिंथ १०:४).

देवाने आमच्या स्वभावाचा पालट केला आणि पवित्रीकरणाचा अनुभव येऊ लागला की झगडा सुरु होतो. हा लढा पापाविरुद्ध नाही, आपणाल पापाविरुद्ध कधीच लढता येणार नाही. आमचा उद्धार करताना ख्रिस्ताने पापावर विजय मिळवला आहे. आमचे स्वाभाविक जीवन आत्मिक जीवनात रुपांतरित व्हावे. यावरुन संघर्ष होतो. हे काही सहज होत नाही, तशी देवाची इच्छाही नाही. ते अनेक नैतिक पर्याय स्वीकारुन होते. देव आमचा स्वभाव पवित्र करत नाही. तो आम्हांला स्वतःसमोर निरपराध ठरवतो आणि त्या अर्थाने पवित्र करतो आणि मग आपण नीतिमार्गाने चालून स्वभाव पवित्र केला पाहिजे. आमची निवड स्वाभाविक जीवनाशी वैर ठेवणारी असते. यातूनच “देवाच्या ज्ञानाविरुद्ध” तटबंदी उभारली जाते. या वेळी आपण देवाच्या राज्यासाठी कुचकामी होऊन मागे फिरावे अगर निर्धाराने ही तटबंदी उध्वस्त करावी आणि येशूला आणखी एका पुत्राला गौरवात आणू द्यावे (पहा इब्री २:१०).

## तुमचे तुम्हीच करा

**“... आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करुन तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावतो...” (२ करिंथ १०:५).**

*निर्धाराने दुसऱ्या गोष्टींना शिस्त लावा.* पवित्रजन असण्याच्या कठीण स्वरुपाचे हे आणखी एक अवघड अंग आहे. याच वचनाच्या मोफॅटकृत अनुवादात पौलाने म्हटले आहे “... मी प्रत्येक योजनेला कैद करुन तिला ख्रिस्ताचे आज्ञापालन करायला लावतो.” आज बहुतेक ख्रिस्ती कार्याला शिस्त नाही, बऱ्याच कार्यांचा आरंभ प्रबळ आवेगातून झाला आहे! आमच्या प्रभूच्या जीवनात प्रत्येक कार्य त्याच्या पित्याच्या इच्छेनुसारच होत असे. पित्याची इच्छा बाजूस ठेवून आपल्या मनाप्रमाणे करावे असे पुत्राला कधीच वाटले नाही! “... (पुत्राला) स्वतः होऊन काही करता येत नाही” (योहान ५:४९). आता आम्ही काय करतो ते पाहा. आमच्या मनात येणारा “विचार” घेऊन ताबडतोब कृती करतो. स्वतःला शिस्त लावत नाही, ख्रिस्ताच्या आज्ञा पाळत नाही.

आज ख्रिस्ती लोकांनी प्रत्यक्ष कृती करण्यावर विशेष भर दिला आहे आणि “प्रत्येक कल्पना (व योजना) अंकित करणाऱ्या” पवित्रजनांवर टीका करतात. त्यांना सांगतात, “तुमचा दृढ निश्चय नाही; देवाविषयी आवेश नाही. आत्मे जिंकण्याकडे लक्ष नाही.” परंतु देवाचे आज्ञापालन करण्यातच खरा निश्चय, उत्साह व आवेश आहे. आमच्या बेशिस्त मानवी स्वभावातून येणाऱ्या देवाची सेवा करावी या विचारात कसलाच आवेश नाही. हे पचनी पडणे कठीण असले तरी खरे आहे. पवित्रजन प्रत्येक कल्पना (व योजना) अंकित करीत नसले तरी सरळ देवासाठी कार्य करतात. त्यांना त्यांच्याच मानवी स्वभावातून प्रेरणा मिळते. ते काही निश्चयी शिस्तीने आत्मिक झालेले नसतात.

आपण नेहमी हे विसरतो की कोणतीही व्यक्ती तारणासाठी येशू ख्रिस्ताला समर्पित आहे. त्याचप्रमाणे देव, जग आणि पाप व सैतान यांच्यासंबंधी येशू ख्रिस्ताच्या विचारदृष्टीलाही बांधील आहे. थोडक्यात प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी आणि “मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रुपांतर होऊ द्यावे...” (रोम १२:२).

**सप्टेंबर १०**

## सुवार्ताप्रसाराची शस्त्रे

**“तू अंजिराच्या झाडाखाली होतास, तेव्हाच मी तुला पाहिले” (योहान १:४८).**

*प्रत्येक प्रसंगी उपासना करणे.* मोठा पेचप्रसंग आला तर आम्ही लढाईस तयार असू हे आम्ही गृहीत धरतो. पण पेचप्रसंगामुळे आमच्यामध्ये काही उभारले जात नाही तर आम्ही अगोदरच कसे आहोत ते अशा प्रसंगातून उघड होते. तुम्ही स्वतःशी म्हणता का “देवाने मला लढाईसाठी बोलावले तर मी पुढे होईन.” पण देवाकडून प्रशिक्षण मिळाले नसेल तर तुम्हांला पुढे होता येणार नाही. देवाने तुम्हांला दिलेले काम तुम्ही करीत नसाल तर पेचप्रसंग येईल तेव्हा तुम्ही लढाईस योग्य नाही हेच दिसेल व प्रसंग पडला की व्यक्तीचे खरे स्वरुप लगेच दिसते.

आत्मिक सज्जतेसाठी देवाची वैयक्तिक उपासना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या शास्त्रपाठात नथनेलला आलेल्या अनुभवावरुन “अंजिराच्या झाडाखालचे” एकांतातील जीवन या पुढे शक्य होणारच नाही. सर्वकाही उघड होईल आणि तुम्ही स्वतःच्या घरात नित्य उपासना करीत नसला तर आपण कवडीकिंमतीचेही नाही हे समजेल. देवाबरोबरच्या तुमच्या नात्यात तुमची उपासना योग्य असेल तर तो तुम्हांला मुक्त करील तेव्हा तुम्ही तयार असाल. फक्त देवाला दिसणाऱ्या तुमच्या जीवनात पूर्णपणे सज्ज होता. पेच पडला की देवाला तुमच्यावर विसंबता येते.

तुम्ही असे म्हणता काय “माझ्या सध्याच्या स्थितीत मी पवित्र जीवन जगू शकत नाही. सध्या प्रार्थना, पवित्र शास्त्र अभ्यास, उपासना वगैरेसाठी वेळ नाही. शिवाय माझी लढण्याची वेळ अजून आली नाही. ती येऊ दे, तेव्हा मी तयार असेन.” तुम्हांला असे म्हणणे शक्य नाही. तुम्ही दररोज उपासना करीत नसाल तर देवाच्या कार्यामध्ये आलात की तुम्ही कुचकामी ठराल आणि दुसऱ्यांना अडखळण व्हाल.

देव प्रशिक्षण देतो तेथेच सुवार्ता प्रसाराची शस्त्रे आहेत. पवित्रजनाचे गुप्त, खासगी, उपासनामय जीवन हेच प्रशिक्षणाचे ठिकाण आहे.

सप्टेंबर ११

## सुवार्ताप्रसाराची शस्त्रे

**“म्हणून मी प्रभू व गुरु असूनही जर तुमचे पाय धुतले तर तुम्हीही एकमेकांचे पाय धुतले पाहिजेत” (योहान १३:१४).**

*दररोज मिळणाऱ्या संधी साधून सेवा करणे.* या संधी आपल्याच परिसरात मिळतात. यासाठी परिसराची निवड आपण करायची नाही. देव आपल्या इच्छेने आम्हांला ठेवतो त्यात मिळणाऱ्या संधींचा उपयोग करणे. सध्या ज्या परिसरात आम्ही काम करतो त्यावरुन अन्यत्र कसे काम करु ते समजते.

येशूने अगदी हलकी कामेही केली आणि या प्रकारे मलाही माझ्यामधील देवाच्या शक्तीने अशी कामे केली पाहिजेत. त्याने कमरेला बांधला तसा रुमाल मला बांधता येईल? रुमाल, ताटे, वाट्या, चपला आणि इतर अनेक साध्या वस्तू यांच्यावरुन आम्ही कसे आहोत ते लगेच लक्षात येते. देहधारण केलेला सर्वसमर्थ देवच आमच्यामधून हलकी कामे करतो.

येशूने म्हटले, “... जसे मी तुम्हांला केले तसे तुम्हीही करावे म्हणून मी तुम्हांला कित्ता घालून दिला आहे” (१३:१५). देव तुमच्याकडे कोणते लोक आणतो ते पाहा. आपला अपमान झाला असे वाटेल पण याच प्रकारे तुम्ही दुसऱ्यांना कसे करावे ते त्याने दाखवून दिले आहे. यातूनच तुम्ही त्याच्यासाठी काय, कसे व्हावे ते त्याने दाखवले आहे.

“सुवार्ता क्षेत्रावर गेलो की मी हे करीन,” असे म्हणता? हे बोलणे म्हणजे लढाईसाठी खंदकात दबा धरुन असताना हत्यारे तयार करण्यासारखे आहे. हत्यारे तयार होण्यापूर्वीच तुमचे प्राण जातील!

आपण देवाबरोबर “आणखी एक कोस” गेले पाहिजे (मत्तय ५:४१). पण आमच्यापैकी काहीजण पहिल्या पाच दहा पावलात दमतील. मग आपण म्हणू “माझ्या जीवनातील पुढचा मोठा प्रसंग येईतो मी वाट पाहीन.” दररोज मिळणाऱ्या संधींचा उपयोग सेवेसाठी केला नाही तर पेचप्रसंग येईल तेव्हा आमच्या हातून काहीही होणार नाही.

**सप्टेंबर १२**

## आत्मिक गोंधळातून पुढे जाणे

**“येशू म्हणाला, तुम्ही काय मागता हे तुम्हांस समजत नाही” (मत्तय २०:२२).**

तुमच्या आत्मिक जीवनात कधीकधी गोंधळाची परिस्थिती ओढवते. गोंधळून जाऊ नका असे सांगणे हा त्यावरचा उपाय नाही. देवच तुम्हांला हा अनुभव देत असतो, पण सध्या तो तुम्हांला समजत नाही. आत्मिक गोंधळातून पुढे गेल्यावर तुमच्यासाठी देवाची इच्छा काय आहे ते समजेल.

*त्याची झाकलेली मैत्री (पहा लूक ११:५-८).* येशूने येथे आपल्या मित्राची उपेक्षा करतो असे वाटणाऱ्या एका मित्राचे उदाहरण दिले आहे. स्वर्गीय पित्याची वागणूकही केव्हा अशीच असल्याचे आढळेल. तो निर्दय आहे असे वाटेल पण तो तसा नाही. योग्य वेळी सर्व खुलासा होईल. मैत्रीवर सावट आल्याचे भासते आणि पूर्ण सहभागिता अनुभवण्यासाठी प्रीतीलाही वेदना सोसत आसवे गाळीत वाट पाहावी लागते. देव असा झाकलेला असतो तेव्हा विश्वासाने तुम्ही त्याला धरुन राहाल?

*त्याच्या पितृत्वावर सावट (पहा लूक ११:११-१३).* तुमचा पिता कधीकधी निर्दय आहे. तो पिता नाहीच असे कधी वाटेल. पण तसे नाही हे नीट लक्षात ठेवा. “जो कोणी मागतो त्याला मिळते...” (लूक ११:१०). आता पित्याच्या मुखावर छाया दिसली तरी निराश होऊ नका, त्याने तुमच्या जीवनात येऊ दिले आहे त्या सर्वांविषयी स्वतःचे संपूर्ण समर्थन करील.

*त्याच्या विश्वासूपणाचा विचित्रपणा (पहा लूक १८: १-८).* “तरी मनुष्याचा पुत्र येईल तेव्हा त्याला पृथ्वीवर विश्वास आढळेल काय?” (लूक १८:८). गोंधळ असला तरी त्याची आशा धरुन राहणारा विश्वास त्याला आढळले काय? देव काय करतो आहे ते समजले नाही तरी येशूने सांगितले ते सत्य आहे यावर भरंवसा ठेवून विश्वासात स्थिर राहाल? तुम्ही त्याला आता मागत आहात त्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या गोष्टींकडे त्याचे लक्ष लागले आहे हे विसरु नका.

**सप्टेंबर १३**

## समर्पणानंतर काय?

**“जे काम तू मला करावयास दिले ते पुरे करुन मी पृथ्वीवर तुझे गौरव केले आहे” (योहान १७:४).**

खरे समर्पण आमच्या बाह्यजीवनाचे समर्पण नसून  ते आमच्या इच्छेचे समर्पण आहे. हे झाले की संपूर्ण समर्पण होते. इच्छा समर्पित करणे अवघड जाते. तथापि देव कोणाही व्यक्तीची इच्छा सक्तीने अधीन करुन घेत नाही. तो कधी विनंती करीत नाही. संबंधित व्यक्ती आपण होऊन अधीन होईतो तो वाट पाहतो. ही लढाई एकदा केली की पुन्हा लढण्याचे कारण नाही.

*सुटकेसाठी समर्पण :* “... माझ्याकडे या... मी तुम्हांला विसावा देईन,” (मत्तय ११:२८). तारणाचा खरा अर्थ समजला की मग आमची इच्छा विसाव्यासाठी येशूला समर्पण करतो. आम्हांला अनिश्चितता भासते तेव्हा खरोखर आमच्या इच्छेला “माझ्याकडे या” हे आवाहन केलेले असते आणि हे आपण होऊन स्वेच्छेने यावयाचे असते.

*भक्तीसाठी समर्पण :* “माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःचा *त्याग करावा...*” (मत्तय १६:२४). हे माझ्या जीवित्वाच्या केंद्रस्थानी विसावा घेऊन येशूला “स्वतःचे” समर्पण आहे. तो सांगतो, “माझा शिष्य व्हायचे असेल तर आपला स्वतःवरचा हक्क माझ्या स्वाधीन कर.” एकदा हे केले की तुम्हांला कसलीच चिंता उरत नाही. तुमच्या जीवनातून या समर्पणाचीच साक्ष पटेल. तुमची परिस्थिती कशीही असो येशू सर्वस्वी पुरेसा आहे (पाहा २ करिंथ १२:९ व फिलिप्पै ४:१९).

*मरणासाठी समर्पण :* “... आणि माणूस तुझी कंबर बांधून...” (योहान २१:१८ आणखी वचन १९ पहा). मरणासाठी कंबर बांधणे म्हणजे काय ते माहीत आहे? उत्साहाच्या भरात केलेले समर्पण तुम्ही परत घेता तसे करु नका. खरे समर्पण “त्याच्या (येशूच्या) मरणाच्या प्रतिरुपाने त्याच्याशी संयुक्त” होणे आहे (रोम ६:५). मग त्याला प्रिय तेच तुम्हांलाही प्रिय असते.

समर्पण केल्यावर पुढे काय? पुढे तुमचे संपूर्ण जीवन देवाबरोबर अखंड सहभागिता व ऐक्य ठेवण्यास उत्सुक असते.

**सप्टेंबर १४**

## वादविवाद का आज्ञापालन?

**“... ख्रिस्ताविषयीचे सरळपण...”** (२ करिंथ ११:३).

सर्वकाही स्पष्टपणे पाहण्याचे रहस्य सरळपणा हेच आहे. पवित्रजनाला दीर्घकाळ सरळ विचार करता येत नाही, पण त्याला स्पष्टपणे पाहण्यास काहीच अडचण नसते. आत्मिक गोंधळात सुस्पष्टपणे विचार करता येत नाही. एकंदरीत सर्व स्पष्ट होण्यासाठी आज्ञापालन करावे. बौद्धिक बाबतीत विचाराने निकाल करतो पण आत्मिक बाबतीत तुमचे विचार भलतीकडे भरकटत जातील आणि गोंधळ वाढेल. तुमच्या जीवनातील एखादी गोष्ट काढून टाकण्यास देव सांगतो तर त्याचे ऐका व काढून टाका. तुमचे “तर्कवितर्क... व प्रत्येक कल्पना अंकित करुन तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावतो” मग सर्वकाही स्पष्ट होईल (२ करिंथ १०:५). तुमचा बुद्धिवाद नंतर पाहता येईल पण बुद्धिवादाने प्रश्न सुटत नाहीत. आम्ही लहान मुलांसारखे पाहतो, वागतो आणि शहाणपणा दाखवतो तेव्हा आम्ही काहीच पाहू शकत नाही.

पवित्र आत्म्याच्या नियंत्रणाखाली नसलेल्या अगदी लहानशा गोष्टीही आम्ही जीवनात येऊ दिल्या तर आत्मिक गोंधळ उडणार यात शंकाच नाही. आत्मिक गोंधळ दूर करण्यासाठी आज्ञापालन हाच उपाय आहे. आज्ञापालनाने तारतम्य मिळते. अन्यथा विचार करकरुन मेंदू शिणला तरी गोंधळ दूर होणार नाही. हे अपमानास्पद आहे आम्ही गोंधळतो त्याचे कारण आमच्या मनाच्या अवस्थेत असते हे आपण जाणतो. आमची स्वाभाविक दृष्टी पवित्र आत्म्याचा स्वाधीन केली तर त्याच दृष्टीच्या योगे आम्हांला देवाची इच्छा पाहता येते आणि मग आमचे संपूर्ण जीवन सरळ होते.

## कोणत्या गोष्टी सोडून द्याव्या

**“आम्ही लाजिरवाण्या गुप्त गोष्टी वर्ज्य केल्या आहेत...” (२ करिंथ ४:२).**

तुम्ही “लाजिरवाण्या गुप्त गोष्टी वर्ज्य केल्या आहेत” काय? तुमचा मान, प्रतिष्ठा यांना सांभाळण्यासाठी उजेडात येऊ द्यायच्या नाहीत अशा गोष्टी सोडल्या आहेत? अशा गोष्टी लपवणे सोपे असते. दुसऱ्या कोणाविषयी वाईट विचार तुमच्या मनात आहेत. ते उघड करणे कठीण आहेत? मग ते विचार मनात आले की लगेच सोडून द्या. मनामध्ये कावेबाजपणा, खोटेपणा यांचा लवलेशही राहू देऊ नका. द्वेष, मत्सर, कलह हे तुमच्या पापस्वभावातूनच येतात असे नाही तर गतकाळात सर्व गोष्टींना लालचावलेल्या तुमच्या देहस्वभावातून येते (पहा रोम ६:१९ व १ पेत्र ४:१–३). तुम्हांला लाजेस कारण होईल असे काहीही जीवनात येऊ नये यासाठी सतत डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवले पाहिजे.

“... आम्ही कपटाने चालत नाही...” (२ करिंथ ४:२). आपलेच म्हणणे खरे करण्यासाठी वाटेल ते करायचे नाही. हा भयानक सापळा आहे. देव तुम्हांला फक्त एकाच मार्गाने सत्याच्या मार्गाने चालू देईल. तेव्हा कपटाच्या फसवेगिरीच्या मार्गाने लोकांना पकडण्याचा कधी विचारही करु नका. काळजी घ्या. फसवणूक केलीत, कपटाने चाललात तर देव तुमच्यावर ठपका ठेवील आणि तुम्ही सर्वनाशाकडे जाल. तुम्हांला कपट वाटते ते तसे दुसऱ्यांना वाटणार नाही. देवाने तुमच्यासाठी उच्च मापदंड ठेवला आहे. त्याच्या सर्वश्रेष्ठतेसाठी तुमचे सर्वोत्तम हे ध्येय नजरेआड होऊ देऊ नका. त्याच्या गौरवासाठी तुमचे उत्तम असू दे. तुम्ही कपट या नावाखाली येतील अशा काही गोष्टी भलत्याचा उद्देशाने आल्या असतील तर त्यामुळे देवाने तुम्हांला दिलेली प्रेरणा मंदावेल. देवाच्या दृष्टीने एकंदर गोष्टींकडे पाहणे अवघड गेल्याने बरेच लोक पाठ फिरवून निघून गेले. एखाद्या व्यक्तीने मुळात स्वीकारलेल्या श्रद्धांपेक्षा विश्वासात आणखी पुढे जाण्याचा प्रसंग आला की मोठाच आत्मिक पेच पडतो.

## एकांतात देवाची प्रार्थना करणे

**"तू तर जेव्हा जेव्हा प्रार्थना करतोस तेव्हा तेव्हा आपल्या खोलीत जा व दार लावून घेऊन आपल्या गुप्तवासी पित्याची प्रार्थना कर" (मत्तय ६:६).**

धर्माच्या संबंधात आपली दृष्टी लोकांवर नव्हे तर देवावर ठेवणे हाच मुख्य विचार आहे. प्रार्थना करणारी व्यक्ती म्हणून लोकांनी ओळखावे ही इच्छा कधी धरु नये. तुम्ही प्रार्थना करीत आहात हे कोणाला कळू नये म्हणून आतल्या खोलीत जा, दार लावून घेऊन एकांतात देवाशी बोला. आपल्या स्वर्गातील पित्याशी बोलावे याहून अन्य उद्देश तुमच्या मनात नसावा. एकांतात प्रार्थना करण्याच्या निश्चित वेळा ठरवा न पेक्षा शिष्य म्हणून कालक्रमणा करणे अवघड आहे.

"तुम्ही प्रार्थना करता तेव्हा... व्यर्थ बडबड करु नका..." (६:७). आम्ही कळवळून प्रार्थना करतो म्हणून देव आमचे ऐकतो असे नाही. तो आमच्या तारणाच्या आधारानेच आमचे ऐकतो. आमच्या आस्थेने तो प्रभावित होत नाही. प्रार्थना म्हणजे देवाकडून काही मिळवणे नव्हे. तशी प्रार्थना अगदीच प्राथमिक स्वरुपाची आहे. देवाच्या परिपूर्ण सहभागितेत व एकपणात आल्याचे प्रार्थना हे द्योतक आहे. पुनरुज्जीवनाच्या द्वारे देवाचा पुत्र आमच्यामध्ये निर्माण झाला असेल (पहा गलती ४:१९) तर तो आमच्या सामान्य बुद्धीचा पलीकडे जाऊन आम्ही प्रार्थना करतो त्या गोष्टींविषयी आमची वृत्ती पालटतो.

"जो कोणी मागतो त्याला मिळते..." (मत्तय ७:८). आमची इच्छा जमेस न धरता आम्ही धर्मविषयक निरर्थक शब्दांनी प्रार्थना करतो आणि मग म्हणतो देवाने उत्तर दिले नाही. खरे पहता आम्ही काहीच मागितलेले नसते. येशूने म्हटले, "... जे काही तुम्हांला *पाहिजे असेल* ते मागा..." (योहान १५:७). विनंती करणे, मागणे यात आमच्या इच्छेचा संबंध येतो. येशू प्रार्थनेविषयी बोलला तेव्हा तो लहान मुलासारखे अगदी सरळपणे बोलला. पण आम्ही टीकाखोर वृत्तीने म्हणतो, "होय पण आम्ही मागितले पाहिजे असे येशूनेही म्हटले आहे." पण लक्षात ठेवा येशू ख्रिस्ताने प्रकट केलेल्या देवाला अनुरुप अशाच गोष्टी त्याच्याकडे मागाव्या.

**सप्टेंबर १७**

## मोहपरीक्षेत काही चांगले असते का?

**“मनुष्याला सहन करता येत नाही अशी परीक्षा तुम्हांवर गुदरली नाही...”** (१ करिंथ १०:१३).

मोहपरीक्षा या शब्दाचा अर्थ आज चांगला नाही. तरी पण आपण हा शब्द चुकीने वापरतो. मोह हे काही पाप नव्हे. माणसांना सहज मोह पडतो. आम्ही माणसेच आहोत. मोह पडत नाही असे म्हणणे म्हणजे आम्ही अगोदरच एवढे लाजिरवाणे आहो की आम्ही तिरस्कारासही अपात्र आहो. मोह पडण्याचे कारण नसताना आम्ही मोहात पडतो कारण स्वतःला उच्च पातळीवर नेण्यास देवाला नकार दिलेला असतो. अर्थात येथे वेगळ्या प्रकारच्या मोहाला तोंड द्यावे लागते.

कोठेही व्यक्तीच्या आत्मिक भागामध्ये जे असते त्यावरुन त्याला बाहेर कोणते मोह पडतील ते ठरते. मोहातून त्या व्यक्तीचा खरा स्वभाव उघड होतो. खरे तर प्रत्येकजण आपल्या स्वतःच्या मोहपरीक्षेची मर्यादा अगर पातळी ठरवत असतो. कारण नियंत्रण ठेवणाऱ्या त्याच्या आंतरिक स्वभावाच्या पातळीनुसार मोह येत असतो.

माझ्या उच्च ध्येयाप्रत जाण्याचा जवळचा मार्ग दाखवणारा मोह माझ्यावर येतो. तो मला वाईटाकडे नेत नाही तर माझ्या मते चांगल्याकडेच नेतो. मोहामुळे मी जरासा गोंधळतो, चांगले का वाईट ते समजत नाही. मोहाला बळी पडलो की मी वासनेलाच देवस्वरुप देतो आणि अगोदरच पापात पडण्यापासून मागे राहण्यास माझे भयच कारण होते याचे मोह हेच प्रमाण मिळते.

मोहातून कोणाचीच सुटका नसते. खरे तर, व्यक्तिच्या परिपूर्ण जीवनासाठी मोह आवश्यक असतो. आपल्याला मोह झाला तर काही विशेष झाले असे समजू नये. मोह मानवजातीचा समान वारसा आहे. देव मोहापासून आमचा बचाव करत नाही, मोहातही तो आम्हांला सावरतो (पहा इब्री २:१८ आणि ४:१५-१६).

## परीक्षा त्याची आणि आमची

**“कारण आपल्या सर्वांच्या दुर्बलतेविषयी ज्याला सहानुभूती वाटत नाही असा आपला प्रमुख याजक नाही, तर तो सर्व प्रकारे आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला” (इब्री ४:१५).**

आमचा नवा जन्म होईपर्यंत आम्हांला याकोब सांगतो तोच मोह माहीत असतो, “प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो व भुलविला जातो तेव्हा मोहात पडतो” (याकोब १:१४). नवा जन्म झाल्याने आम्ही वरच्या पातळीवर जातो. तेथे आमच्या प्रभू पुढे होते तसे मोह आमच्यावर येतात. येशूचे मोह आम्हा विश्वास न ठेवणाऱ्यांना समजत नाहीत कारण ते आमच्या मानव स्वभावात नसतात. आमचा नवा जन्म होऊन आम्ही प्रभू येशूचे भाऊ झालो की त्याचे मोह आपले होतात. येशूला पडलेले मोह सामान्य माणसाचे नव्हते, ते मनुष्य म्हणून देवाला पडले होते. नव्या जन्माच्या द्वारे देवाचा पुत्र आमच्यामध्ये साकार होतो (पहा गलती ४:१९). आमच्या दैहिक जीवनात त्याला पृथ्वीवर होते तेच कोंदण मिळाले आहे. आम्ही वाईट गोष्टी कराव्या म्हणून सैतान आम्हांला मोह घालत नाही तर देवाने आमच्यमध्ये नव्या जन्माच्या द्वारे ठेवले आहे ते घेण्याचा, त्याचा यत्न असतो. मग देवाला आमचा उपयोग होणार नाही. तो आम्हांला पाप करण्याचा मोह घालत नाही तर आमची विचारदृष्टी बदलतो आणि हा सैतानाचा मोहपाश आहे हे फक्त देवाचा आत्माच ओळखू शकतो.

मोह म्हणजे आमच्या जीवित्वाच्या आतील, आत्मिक भागामध्ये आहे ते आमच्या बाहेरची परकी शक्ती हिरावून घेण्याचा प्रयत्न. यामुळे आमच्या प्रभूच्या मोहाचा उलगडा करता येतो. येशूचा बाप्तिस्मा झाला. “जगाचे पाप हरण करणारा” हे आपले कार्यकर्तव्य त्याने स्वीकारले (योहान १:२९). नंतर “आत्म्याने त्याला अरण्यात नेले” (मत्तय ४:१). तेथे त्याला सैतानाच्या युक्त्यांना तोंड द्यावे लागले. तथापि तो थकला नाही, दमला नाही तो “पापरहित” असाच मोहातून गेला. त्याच्या आध्यात्मिक स्वभावाची सर्व मालमत्ता होती तशी सुरक्षित ठेवली.

## येशूबरोबर पुढे जात आहात ना?

**“माझ्या परीक्षांमध्ये माझ्याबरोबर टिकून राहिलेले तुम्हीच आहा” (योहान २१:१६).**

आमच्या मोहपरीक्षेच्या वेळी येशू ख्रिस्त आमच्याबरोबर असतो. परंतु त्याच्या मोहपरीक्षेमध्ये आम्ही त्याच्याबरोबर असतो का? तो काय करु शकतो त्याचा किंचितसा अनुभव आला तरी त्या क्षणापासून आमच्यापैकी अनेकजण त्याच्याकडे पाठ फिरवून निघून गेले. तुम्ही येशूबरोबर पुढे जात आहा का जगाकडे व देहाकडे वळलात, सैतानाशी हातमिळवणी केली का ते पाहण्यास देवाने तुमच्या परिस्थितीत बदल केला तर लक्ष ठेवा. त्याचे नाव धारण करणारे आम्ही त्याच्याबरोबर चालतो? “ह्यावरुन त्याच्या शिष्यांपैकी पुष्कळजण परत गेले आणि ते पुन्हा कधी त्याच्याबरोबर चालले नाहीत” (योहान ६:६६).

प्रभू येशूच्या येथील जीवनात त्याच्या मोहपरीक्षा सुरुच होत्या आणि देवाच्या पुत्राच्या आमच्यामधील जीवनात त्या होतच राहणार. आताच्या आमच्या जीवनात आम्ही येशूबरोबर पुढे जातो काय?

देव आमच्यावर आणतो त्यातील काही गोष्टींपासून स्वतःला एकीकडे ठेवावे असे वाटते. पण तसे करु नका. आमच्या परिस्थितीला देवच वळण लावतो. जे येईल त्याला तोंड देत आम्ही त्याच्या मोहांमध्ये सदोदित त्याच्याबरोबर राहिले पाहिजे. या त्याच्या मोहपरीक्षा आहेत आमच्या नाहीत पण आमच्यामध्ये असलेल्या देवपुत्राच्या जीवनातील परीक्षा आहेत. आमच्यामधील त्याच्या जीवनावर हल्ला होत असता आम्ही देवपुत्राशी विश्वासू राहतो काय?

तुम्ही येशूबरोबर पुढे जात आहा? हा मार्ग गेथशेमेनीमधून, नगराच्या वेशीतून “तळाबाहेर” जातो (इब्री १३:३). हा मार्ग एकाकी आहे पुढे जाणारी एकही पाऊलखुण दिसत नाही फक्त “माझ्यामागे ये” ही वाणी “कानी पडते” (मत्तय ४:१९).

## जीवनाची दिव्य आज्ञा

**"... जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे 'तुम्ही पूर्ण व्हा'" (मत्तय ५:४८).**

३८–४८ या वचनांतून आमच्या प्रभूने आम्ही सर्वांच्याबरोबर उदारपणे वागावे असा बोध केला आहे.

आपल्या स्वभावगुणांना अनुसरुन आचरण ठेवू नका. प्रत्येकालाच स्वाभाविक आवडी नावडी असतात. आम्हांला काही लोक आवडतात काही आवडत नाहीत. पण ख्रिस्ती जीवनात अशी वृत्ती ठेवू नये. "पण जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालत असलो तर आपली एकमेकांबरोबर सहभागिता आहे (योहान १:७).

आमच्या प्रभूने येथे आम्हांला चांगल्या व्यक्तीचे अगर चांगल्या ख्रिस्ती व्यक्तीचे उदाहरण दिलेले नाही तर खुद्द देवाचे उदाहरण दिले आहे, "... जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे तुम्ही पूर्ण व्हा." देवाने तुम्हांला दाखवले आहे तेच तुम्ही दुसऱ्या व्यक्तीला दाखवावे. मग "तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे तुम्ही पूर्ण आहात" की नाही ते प्रत्यक्ष दाखवण्यासाठी जीवनात देव तुम्हांला भरपूर संधी देईल. शिष्य होणे म्हणजे देवाला लोकांबद्दल वाटणाऱ्या आस्थेशी आपणही समरुप होणे. येशू म्हणतो, "मी तुम्हांस नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी, जशी मी तुम्हांवर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी. तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरुन सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहा" (योहान १३:३४–३५).

चांगले करण्यामध्ये नव्हे तर देवासारखे असणे हाच ख्रिस्ती स्वभावाचा खरा आविष्कार आहे. देवाच्या आत्म्याने तुमचा आंतरिक पालट केला असेल तर तुमच्या जीवनातून फक्त चांगली मानवी वैशिष्ट्येच नव्हे तर दिव्य गुणलक्षणे दाखवाल. आमच्यामधील देवाचे जीवन *देवाचे जीवन* म्हणून व्यक्त होते. अलौकिक ते स्वाभाविक होणे हेच ख्रिस्ती जीवनाचे रहस्य आहे; कारण देवाची कृपा आणि याचे प्रमाण रोजच्या जीवनातून मिळते. गोंधळ गडबडीच्या प्रसंगी आम्ही स्थिर व शांत असतो याचे मग आपणालाच नवल वाटते.

**सप्टेंबर २१**

## मिशनरीचा पूर्वनियोजित उद्देश

**“... आपला सेवक होण्यासाठी ज्या परमेश्वराने मला गर्भाशयात घडले... तो परमेश्वर म्हणतो” (यशया ४९:५, ६).**

देवाने ख्रिस्त येशूमध्ये आम्हांला निवडले आहे हे जाणवले की प्रथम आमच्या पूर्व कल्पना, आमचे संकुचित विचार आणि आमच्या निष्ठा हे सर्व नष्ट होते आणि आम्ही केवळ देवाच्या उद्देशांचे सेवक होतो. देवाचे गौरव करावे आणि त्याचा आनंद घ्यावा यासाठी संपूर्ण मानव वंश उत्पन्न केला आहे. पापामुळे मानववंश बहकून दुसऱ्या मार्गाला लागला परंतु त्यामुळे देवाचा उद्देश अजिबात विफल झाला नाही. आम्ही नव्याने जन्मलो की मानव वंशासाठी देवाने नेमलेल्या उद्देशाकडे आम्ही परते येतो. देवाच्या या प्रचंड सर्जनशील उद्देशावर आम्ही विसंबून राहावे. देव संपूर्ण जगाचे हित आमच्या अंतःकरणाच्या माध्यमातून कसे साध्य होईल हेच पाहतो. देवाची प्रीती व त्याचा स्वभाव आमच्यामध्ये येतो. *“देवाने जगावर एवढी प्रीती केली”* (योहान ३:१६). यावर देवाचा स्वभाव सर्वथा केंद्रित झाला आहे हे आम्ही अनुभवतो.

देवाच्या सर्जनशील उद्देशासाठी आम्ही आमचा आत्मा सदोदित खुला ठेवला पाहिजे. त्यात आमचे उद्देश कोंबून त्याची गळचेपी करता नये. आम्ही आमचेच घोडे पुढे दामटले तर देव आमचे उद्देश बळाने एकीकडे ठेवील. देवाचा सेवक व्हावे यासाठीच मिशनरीला उत्पन्न केले आहे. त्याच्यामधून देवाचे गौरव होते. येशू ख्रिस्ताच्या तारणाच्या द्वारे आम्ही देवाचे उद्देश साधण्यास यथायोग्य केलेले आहो. हे लक्षात घेतले की येशू ख्रिस्त आपल्या मागण्यांमध्ये एवढा कठोर व कडक का आहे ते समजेल. आपल्या सेवकाकडून त्याला पूर्ण नीतिमत्त्वाची अपेक्षा आहे कारण देवाचा स्वतःचा स्वभाव त्यानेच त्यांच्यामध्ये ठेवला आहे.

तुमच्या जीवनासाठीचा देवाचा उद्देश कधी विसरु नका.

**सप्टेंबर २२**

## मिशनरीचा स्वामी आणि गुरु

**“तुम्ही मला गुरु व प्रभू असे संबोधिता आणि ते ठीकच बोलता; कारण मी तसा आहेच... मी तुम्हांला खचित खचित सांगतो, दास आपल्या धन्यापेक्षा थोर नाही...” (योहान १३:१३, १६).**

प्रभू आणि गुरु असणे आणि प्रभुत्व गाजवून शिकवणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. प्रभू आणि गुरु असणे म्हणजे मी स्वतःला ओळखतो त्याहून अधिक मला ओळखणारा कोणी आहे हे समजते. तो मित्राहून अधिक जवळचा आहे. तो माझ्या अंतःकरणाच्या आशा ओळखतो व त्यांचे समाधान करतो. त्याने माझे सर्व संशय, शंका व समस्या सोडवल्या आहेत. “... तुमचा स्वामी एक आहे, तो ख्रिस्त आहे” (मत्तय २३:८).

आमचा प्रभू मी त्याच्या इच्छेप्रमाणे करावे यासाठी काही इलाज करत नाही. कधीकधी वाटते देवाने माझ्याकडून सक्तीने आपल्या इच्छेप्रमाणे करुन घ्यावे. पण तो तसे करणार नाही. केव्हा वाटते त्याने माझ्याकडे लक्ष देऊ नये पण तसे होत नाही.

“तुम्ही मला गुरु व प्रभू म्हणता...” पण तो खरेच तसा आहे? *गुरु, स्वामी,* आणि *प्रभू* ह्यांना आमच्या शब्दसंग्रहात जागा नाही. आम्हांला *तारक, पवित्र करणारा* व *आरोग्यदाता* हे शब्द अधिक प्रिय आहेत. *प्रीती* हाच शब्द गुरुचा अनुभव अधिक प्रिय करतो. देवाने आपल्या वचनातून उलगडलेल्या प्रीतीचा आपल्याला विशेष माहिती नाही. *आज्ञा पाळणे* या शब्दांवरुन ते लक्षात येते. पवित्र शास्त्रात आज्ञापालन हे दोघा समानांमध्ये असते, जसे पुत्र व पिता. आमचा प्रभू केवळ देवाचा सेवक नव्हता तो त्याचा पुत्र होता. *“तो पुत्र असूनही... आज्ञाधारकपणा शिकला”* (इब्री ५:८). आमच्यावर कोणी धनीपणा चालवते अशी सतत जाणीव झाली तर आम्हांला धनीच नसतो! येशू आमचा सहजगत्या प्रभू व गुरु असावा असे नाते त्याला हवे आहे. त्याची आम्हांला जाणीव होऊ नये तर आम्ही त्याचे आहोत म्हणून आज्ञा पाळायच्या एवढीच जाणीव हवी.

सप्टेंबर २३

## मिशनरीचे ध्येय

**“त्याने... त्यांना म्हटले, पहा, आपण वर यरुशलेमेस चाललो आहो” (योहान १८:३१).**

आमच्या जीवनात आम्ही लहानाचे मोठे होतो तशा आमच्या आकांक्षा बदलतात. पण ख्रिस्ती जीवनात ध्येय आरंभीच नक्की केलेले असते. तेथे आरंभ व अखेर खुद्द आमचा प्रभूच असतो. ख्रिस्तापासून आरंभ आणि ख्रिस्तामध्ये शेवट. “ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा... मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहचू तोपर्यंत दिले” (इफिस ४:१३). आमच्या ख्रिस्ती जीवनाच्या कल्पनेप्रमाणे हे नाहीच. उपयोगी पडावे हरवलेल्यांना जिंकावे हे नव्हे तर देवाच्या इच्छेप्रमाणे करावे हेच मिशनरीचे ध्येय आहे. मिशनरी उपयुक्त आहे, तो आत्मे जिंकतो पण हे त्याचे ध्येय नाही. आपल्या प्रभूच्या इच्छेप्रमाणे करणे हेच त्याचे ध्येय आहे.

आमच्या प्रभूच्या जीवनामध्ये यरुशलेम या ठिकाणी वधस्तंभावर त्याच्या पित्याच्या इच्छेची परिसमाप्ती झाली. येशूबरोबर तेथे गेलो तरच आमची त्याची मैत्री आणि सहभागिता आहे. यरुशलेमच्या वाटेवर आमचा प्रभू कशानेही ढळला नाही. त्याचा छळ झाला त्या गावातून तो लगबगीने गेला नाही आणि त्याचे स्वागत झाले तेथे तो रेंगाळला नाही. कृतज्ञता अगर कृतघ्नता कशानेही “यरुशलेमला जाण्याच्या” उद्दिष्टापासून तो ढळला नाही.

“गुरुपेक्षा शिष्य थोर नाही आणि धन्यापेक्षा दास थोर नाही” (मत्तय १०:२४). थोडक्यात आमच्या “यरुशलेमला” जाताना प्रभूला घडल्या त्याच गोष्टी आम्हांला घडतील. देवाची कार्ये आमच्या द्वारे होतील. एक दोघे कृतज्ञता दाखवतील तर बाकी सर्व कृतघ्न होतील पण आम्हांला आमच्या “यरुशेमला गेलेच” पाहिजे.

“तेथे त्यांनी त्याला... वधस्तंभावर खिळले...” (लूक २३:३३). आमचा प्रभू यरुशलेमला पोचला तेव्हा हे घडले. ही घटना आमच्या तारणाचे दार आहे. परंतु पवित्रजन वधस्तंभावर जात नाहीत, त्यांची अखेर गौरवात होते; प्रभूची कृपा! “दरम्यानच्या काळात मीही यरुशलेमला जात आहे,” हेच प्रत्येकाचे ब्रीद असावे.

**सप्टेंबर २४**

## पूर्वतयारीचा "जा"

**"ह्यास्तव तू आपले दान अर्पिण्यास वेदीजवळ आणत असता आपल्या भावाच्या मनात आपल्याविरुद्ध काही आहे असे तुला स्मरण झाले तर तेथेच वेदीपुढे आपले दान तसेच ठेव आणि निघून जा; प्रथम भावाबरोबर समेट कर, मग येऊन आपले दान अर्पण कर" (मत्तय ५:२३—२४).**

जीवनात अचानक आमची तयारी झाल्याची कल्पना करता येते. पण तयारी काही अचानक होत नाही. ही प्रक्रिया सतत चालू असते. आताच्या अनुभवाने संतुष्ट राहाणे इष्ट नाही. ख्रिस्ती जीवनात सतत तयारी आणि तयारी करीत राहणे आवश्यक आहे.

ख्रिस्ती जीवनात त्यागाची संकल्पना नव ख्रिस्ती व्यक्तीला रुचते. मानवी दृष्टीने धाडस आणि प्रभूच्या वचनांनी आमची कसून पारख हेच आम्हांला येशू ख्रिस्ताकडे आकर्षित करते. पण प्रभूच्या या शब्दांनी आमची पारख होते! "निघून जा प्रथम आपल्या भावाबरोबर समेट कर." तयारीच्या "जा" या शब्दाने देवाच्या वचनाला तुमची कसून पारख करण्याची संधी मिळते. पवित्र आत्म्याला तुमच्या जीवनामध्ये आढळेल ते त्याच्या सेवेच्या कारणी येणार नाही. धाडसी त्यागाची कल्पना आकर्षक वाटली तरी पुरेशी नाही. हा स्वभाव तुमच्यामध्ये देवच पाहू दे. जीवनात पाप असेल तर ते कबूल करा, पदरी घ्या. स्वतःवरचा हक्क सोडून तुम्ही तुमचा प्रभू व गुरु ह्याचे आज्ञापालन करण्यास तयार आहात?

पवित्र आत्मा सांगतो त्याची उपेक्षा करु नका. देवाच्या आत्म्याने ते तुमच्या मनात आणले तर ते नक्कीच सोडले पाहिजे. काही मोठ्या गोष्टीचा त्याग करावा असे वाटेल. पण देव तुम्हांला अगदी किरकोळ गोष्ट सोडण्यास सांगत असेल. त्या लहानशा गोष्टीमागे तुमचा हेकटपणा आहे. तुम्ही म्हणता "माझ्यावरचा माझा अधिकार मी कसा सोडणार?" पण येशू ख्रिस्ताचा शिष्य व्हायचे तर तो अधिकारच सोडणे गरजेचे आहे.

## नातेसंबंधाचा "जा"

**"जो कोणी तुला वेठीस धरून एक कोस नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जा" (मत्तय ५:४१).**

आमचा प्रभू आम्हांकडून ज्याची अपेक्षा करतो ते नातेसंबंध त्याने आमच्यामध्ये अलौकिक कार्य केले तरच शक्य आहे. हेच आमच्या प्रभूच्या शिक्षणाचे सार आहे. येशू ख्रिस्ताच्या शिष्याने जुलूम आणि अन्याय सोसताना मनात जराही राग धरु नये ही त्याची अपेक्षा आहे. येशू ख्रिस्त आपल्या सेवकावर लादतो त्या ताणतणावाला कितीही उत्साह असला तरी पुरे पडणार नाही. येशू ख्रिस्ताबरोबरचे वैयक्तिक नातेच हा ताण सोसू शकेल. हे नाते पारखून, शुद्ध करुन कसास लावलेले असते आणि त्याचे एकच ध्येय असते. "मी येथे देवासाठी आहे. त्याने मला कोठेही पाठवावे." इतर सर्व अस्पष्ट अंधुक झाले तरी येशू ख्रिस्ताबरोबरचे नाते नेहमी शुद्ध, स्वच्छ असावे.

डोंगरावरील प्रवचन काही असाध्य ध्येय नाही. येशू ख्रिस्ताने आपला स्वभाव माझ्यामध्ये घालून माझा स्वभाव बदल्यावर काय घडले त्याचे चित्रण येथे आहे. डोंगरावरील प्रवचन पूर्ण करणे येशू ख्रिस्तालाच शक्य आहे.

आम्ही येशू ख्रिस्ताचे शिष्य व्हायचे तर आम्हांला अलौलिक रीतीने शिष्य केले तरच ते शक्य आहे. आणि त्याचे शिष्य होण्याचा निश्चय आम्ही सतत मनात वागवतो तोपर्यंत आम्ही त्याचे शिष्य होणारच नाही हे पक्के समजावे. येशूने म्हटले आहे, "तुम्ही मला निवडले नाही पण *मी तुम्हांला निवडले आहे* ..." (योहान १५:१६). देवाच्या कृपेचा आरंभ याच प्रकारे होतो. या दडपणापासून सुटका नाही. आम्ही तिची अवज्ञा करु शकतो. पण ही कृपा आम्हांला स्वतःमध्ये उत्पन्न करता येत नाही. देवाच्या आलौकिक कृपेने आम्ही देवाकडे ओढले जातो. कृपेचे कार्य कोठे कसे सुरु झाले त्याचा थांगपत्ता कधीच लावता येणार नाही. देव सहज करता येतील अशा गोष्टी करण्यास सांगत नाही. त्याच्या कृपेने साध्य होणाऱ्या गोष्टीच आम्हांला केल्या पाहिजेत. येथेच आम्हांला वाहावा लागणारा वधस्तंभ समोर येतो.

सप्टेंबर २६

## समेटाचा “जा”

**“आपल्या भावाच्या मनात आपल्याविरुद्ध काही आहे असे तुला स्मरण झाले” (मत्तय ५:२३).**

हे वचन सांगते, “... तू आपले दान अर्पिण्यास वेदीजवळ आणीत असता आपल्या भावाच्या मनात आपल्याविरुद्ध काही आहे...” “शोध करुन आपल्या अस्थिर संवेदनशीलतेमुळे काही आढळले तर...” असे म्हटलेले नाही. देवाच्या आत्म्याने तुम्हांला काही जाणीव दिली तर, “प्रथम आपल्या भावाबरोबर समेट कर, मग येऊन आपले दान अर्पण कर” (५:२४).

“प्रथम आपल्या भावाबरोबर समेट कर...” ही आमच्या प्रभूची सूचना सरळ आहे. तो म्हणतो, “ज्या वाटेने आलास त्या वाटेने परत जा. वेदीपाशी तुमची खातरजमा झाली त्यानुसार मनाची व आत्म्याच्या प्रवृत्तीने मागे पहा ज्याच्या मनात तुमच्याविषयी काही आकस आहे आणि सरळ त्याच्याशी समेट करा. हे समेट करणे अगदी स्वाभाविक असावे. येशूने दुसऱ्या व्यक्तीचा उल्लेख केलेला नाही फक्त तुम्हांला “जा” असे सांगितले आहे. यात तुमच्या हक्कांचा प्रश्नच नाही. आपले हक्क एकीकडे ठेवून प्रभू येशूचे आज्ञापालन करणे हे पवित्रजनाचे लक्षण आहे.

“... मग येऊन आपले दान अर्पण कर.” समेटाची प्रक्रिया सुस्पष्ट आहे. प्रथम आत्मा आणि त्यागाची वीरोचित वृत्ती आहे. मग पवित्र आत्म्याच्या संवेदनशीलतचे नियंत्रण मग आमची खातरजमा होते. त्यानंतर देवाच्या वचनानुसार आज्ञापालन त्यामुळे दुसऱ्याला दोष न देण्याकडे मनाची प्रवृत्ती होते आणि सरशेवटी तुमचे दान देवाला अर्पण करण्याच्या निखळ, सरळ आनंद!

## त्यागाचा “जा”

**“... कोणाएकाने त्याला म्हटले, आपण जेथे कोठे जाल तेथे मी आपल्या मागे येईन” (लूक ९:५७).**

या माणसाला निराश करण्याकडेच आमच्या प्रभूची प्रवृत्ती होती, कारण “मनुष्यामध्ये काय आहे ते त्याला स्वतःला ठाऊक होते” (योहान २:२५). आम्हांला म्हणावेसे वाटते, “त्या माणसाला स्वतःकडे आणण्याची संधी त्याने गमावली! तो त्याच्याशी अतिशय कोरडेपणाने वागला आणि त्याला निराशेच्या गर्तेत टाकले!” आमच्या प्रभूसाठी अशी माफी मागू नका. प्रभूचे शब्द तीव्र मानखंडना करणारे व दुःखकारक आहेत. एखाद्याच्या अंतःकरणात देवाच्या सेवेत व्यत्यय आणणारे काही असेल तर त्या व्यक्तीशी येशू कोमल शब्दांनी बोलतच नाही. आमचा प्रभू आपल्या लहरीनुसार बोलत नव्हता तर “मनुष्यामध्ये काय आहे ते त्याला ठाऊक होते” म्हणूनच तो असे बोलला. देवाचा आत्मा तुमच्या मनात प्रभूचे झोंबणारे वचन आणील तुमच्यामध्ये काही आहे ते काढून टाकण्यासाठीच तो कठोर वचन बोलतो.

*लूक ९:५८* : येशूची सेवा करणे सुखद आहे या विचाराला या शब्दांनी सुसंग लागतो आणि नाकारले जाण्यातील कठोरपण माझ्या जीवनात माझा प्रभू, मी स्वतः आणि निकटाची आशा एवढेच उरते. इतर प्रत्येकजण येवो अथवा जावो माझे त्याचे नाते हेच माझे मार्गदर्शक असावे आणि तो म्हणतो, “... मनुष्याच्या पुत्राला डोके टेकावयास जागा नाही.”

*लूक ९:५९* : हा माणूस येशूला निराश करत नाही तसेच आपल्या वडिलांविषयीचा आदरही ठेवतो. आम्ही आमच्या आप्तांवरच्या निष्ठेला प्रथम स्थान देतो, येशू ख्रिस्ताला शेवटचे स्थान घेणे भाग पडते. निष्ठांमध्ये संघर्ष झाला तर कितीही किंमत द्यावी लागली तरी येशू ख्रिस्ताच्या आज्ञा पाळा.

*लूक ९:६१* : “प्रभू, मी आपल्या मागे येईन, परंतु...,” असे म्हणणारा, जाण्यास तयार असतो पण कधी जात नाही. पण जावे का न जावे अशा विचारात हा गुंतला आहे. येशूच्या पाचारणात निरोप घेण्याला अवसर नाही. देवाचे पाचारण झाले की थांबू नका लगेच निघा.

## सप्टेंबर २८

### संपूर्ण समरुपतेचा “जा”

**“(येशू) त्याला म्हणाला, तुझ्यात एका गोष्टीची उणीव आहे; जा, तुझे असेल नसेल ते विकून गोरगरीबांना देऊन टाक... आणि चल, माझ्यामागे ये” (मार्क १०:२१).**

या श्रीमंत तरुणाला परिपूर्ण व्हायचे होते. येशू ख्रिस्ताला पाहताक्षणी त्याला वाटले आपण याच्यासारखे झाले पाहिजे. शिष्याला पाचारण केल्यावर त्याची व्यक्तिगत पवित्रता महत्त्वाची मानत नाही. माझा स्वतःचा हक्क पुसून टाकावा; मी त्याच्याशी समरुप व्हावे आणि अन्य सर्व नाती सोडून फक्त त्याच्याशी नाते ठेवावे हेच येशूचे सांगणे आहे. लूक १४:२६ या वचनात तारणाचा-पवित्रीकरणाचा काही संबंध नाही. त्याचा रोख आहे येशू ख्रिस्ताशी संपूर्णपणे, विनाअट समरुप होण्याकडे. संपूर्ण समरुपतेचा “जा” आणि सर्व सोडून येशूला समर्पित होणे म्हणजे काय हे फारच थोड्यांना समजते.

“येशूने त्याच्याकडे पाहिले व त्याच्यावर प्रीती केली...” (मार्क १०:२१). येशूच्या एका दृष्टीक्षेपाने तुमच्या अंतःकरणात दुसऱ्या व्यक्तीशी अगर वस्तूशी असलेले बंध-अनुबंध तुटले पाहिजेत. या प्रकारे येशूने कधी तुमच्याकडे पाहिले आहे? येशूच्या या नजरेने पालट होतो, अंतःकरणाचा भेद होतो आणि त्याची पकड बसते. प्रभूने तुम्हांला पाहिले तेव्हा तुम्ही देवाबरोबर एक, कोमल आणि वळवण्याजोगे होता का? तुम्ही कठीण आणि स्वतःच्या हक्काबद्दल आग्रही असाल, दुसऱ्याचे नेहमी चुकते असे म्हणाल तर त्याच्या नजरेने तुमचा पालट झालेलाच नाही.

“तुझ्यात एका गोष्टीची उणीव आहे...” येशू ख्रिस्ताच्या दृष्टीने त्याच्याशी एक असणे हीच चांगली गोष्ट आहे, “... तुझे असेल नसेल ते विक.” मी केवळ जीव धरुन राहणारा व्हावे येथवर मी स्वतःला नम्र केले पाहिजे. मी सर्व मालमत्तेचा त्याग केला पाहिजे. तारणासाठी नव्हे (येशू ख्रिस्तावर सर्वस्वी विश्वासाने विसंबून राहणे हाच तारणाचा मार्ग आहे) आणि येशूच्या मागे चालले पाहिजे! “...चल माझ्यामागे ये.” तो गेला त्याच मार्गाने गेले पाहिजे.

सप्टेंबर २९

## पाचारणाची जाणीव

**“मला ती सांगणे भाग आहे; कारण मी सुवार्ता सांगितली नाही तर माझी केवढी दुर्दशा होणार!” (१ करिंथ ९:१६).**

देवाच्या अलौकिक आणि गाढ आत्मिक स्पर्शाचा आम्हांला सहज विसर पडतो. देवाचे पाचारण झाले तेव्हा तुम्ही नेमके कुठे होता आणि त्याने काय सांगितले ते सर्व उलगडून सांगता येत असेल तर तुम्हांला खरेच पाचारण झाले का हा माझा प्रश्न आहे. देवाचे पाचारण विशेषेकरुन अलौलिक असते. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात पाचारण मेघगर्जनेसारखे अगर हळूहळू येते. पण ही जाणीव वेगाने येवो अगर मंदगतीने, त्याच्याबरोबर नेहमी अलौकिकत्वाची पार्श्वभूमी असते आणि ते अवर्णनीय आणि ते सोप आहे. या चकित करणाऱ्या अलौकिक अपरिमित पाचारणाची जाणीव अचानक होते, “मी तुम्हांला निवडले आहे...” (योहान १५:१६). देवाचे पाचारण आणि तारण व पवित्रीकरण यांचा काही संबंध नाही. तुमचे पवित्रीकरण झाले आहे म्हणून तुम्हांला सुवार्ता सांगण्यास पाचारण केलेले नाही. सुवार्ता सांगण्यासाठी होणारे पाचारण सर्वस्वी वेगळे आहे. आपल्यावर ही सक्ती केली आहे असे पौल म्हणतो.

तुमच्या जीवनातील प्रभूच्या महान, अलौकिक पाचारणाकडे दुर्लक्ष करुन ते रद्द केलेत तर तुमच्या परिस्थितीचा आढावा घ्या. देवाच्या पाचरणाची उपेक्षा करुन सेवेच्या तुमच्या कल्पना आणि विशिष्ट क्षमता यांना अधिक महत्त्व दिले आहे ते तपासून पहा. पौलाने म्हटले, “मी सुवार्ता सांगितली नाही तर माझी केवढी दुर्दशा होणार!” त्याग देवाच्या पाचारणाची जाणीव झाली “सुवार्ता सांगण्याची त्याची” इच्छा अतिशय तीव्र होती, या इच्छेशी स्पर्धा करील असे त्याच्यामध्ये अन्य काहीही नव्हते.

एखाद्या स्त्री अगर पुरुषाला देवाचे पाचारण झाले तर परिस्थिती कितीही कठीण असली तर ते महत्त्वाचे नाही. देव प्रत्येक शक्ती, प्रत्येक बाब अखेर आपल्या उद्देशाच्या सिद्धीसाठी कारणी लावतो. देवाच्या उद्देशाशी तुम्ही सहमत असाल तर देव तुमची जाणीव आणि सखोल पातळीवरची नेणीव सर्व सुसंगत करील.

**सप्टेंबर ३०**

## पाचारणाचा कार्यभार सोपवणे

**“तुम्हांसाठी जी माझी दुःखे त्यामध्ये मी आनंद करतो, आणि ख्रिस्ताच्या क्लेशातले जे उरले आहे ते मी आपल्या देहाने, त्याचे शरीर जी मंडळी...” (कलस्सै १:२४).**

आम्ही स्वतःचे आत्मिक समर्पण करतो आणि त्यातून देवाचे पाचारण पाहण्याचा यत्न करतो. परंतु देवाशी आमचा संबंध सरळ झाला की तो आमचे सर्व विचार बाजूस सारतो. आमचे लक्ष दुसरीकडे खिळवतो आणि हे देवाचे पाचारण असेल असे स्वप्नातही आम्हांला वाटले नव्हते आणि मग एका तेजोमय, लखलखत्या क्षणी त्याचा उद्देश दिसतो आणि आपण म्हणतो, “हा मी येथे आहे! मला पाठव” (यशया ६:८).

वैयक्तिक पवित्रीकरणाचा आणि या पाचारणाचा काही संबंध नाही तर मोडलेली भाकर आणि पेयार्पण यांच्याकडे त्याचा संबंध आहे. पण आम्हांला चुरडण्यासाठी देवाने वापरलेल्या बोटांना आम्ही आक्षेप घेतला तर तो आमचा द्राक्षारस करणार नाही. आम्ही म्हणतो, “देवाने खास स्वतःच्या बोटांनी मला भाकरीसारखे मोडावे आणि ओतलेला द्राक्षारस करावे मग मी नाही आक्षेप घेणार!” पण आम्हांला मोडण्यासाठी तो आम्हांला न आवडणारी, न रुचणारी परिस्थिती यांचा उपयोग करतो तेव्हा आम्ही आक्षेप घेतो. हुतात्मा होण्याची रीत व ठिकाण आम्ही निवडू नये. आमचा द्राक्षारस करायचा तर आम्हांला चिरडले, चुरडले पाहिजे. द्राक्षे पिता येतात काय? द्राक्षे पिळली की मगच त्यांचा रस होतो.

तुम्हांला पिळण्यासाठी देव कोणती बोटे आणि अंगठा वापरीत आहे? तुम्ही गोटीसारखे कठीण होऊन निसटलात काय? तुम्ही अद्याप पक्व झाला नाही तरीही देवाने तुम्हांला पिळले असेल तर मिळालेला द्राक्षारस कडू झाला असता. पवित्र व्यक्ती होण्यासाठी आमच्या स्वाभाविक जीवनाची सत्त्वे देवाच्या सेवेमध्ये मोडली आहेत. प्रथम आम्हांला देवामध्ये ठेवून त्याच्याशी सहमत केले पाहिजे मगच आम्ही त्याच्या हातांनी मोडलेली भाकर होऊ. देवाला बिलगून राहा आणि त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे करु द्या आणि मग त्याच्या दुसऱ्या मुलांना लाभदायक अशी भाकर व द्राक्षारस तो उत्पन्न करील.

**ऑक्टोबर १**

## उत्पन्न करण्याचे स्थान

**"... येशूने... ह्यांना आपणांबरोबर एका उंच डोंगरावर एकीकडे नेले..." (मार्क ९:२).**

डोंगरमाथ्यावर देवाच्या दृष्टीने, एकंदर दृश्य पाहून अत्यानंदाने येथेच राहावे असे आपणा सर्वांनाच वाटते. परंतु देव आम्हांला तेथे राहू देणार नाही. डोंगरावरुन खाली येण्याचे साहस करणे हीच आमच्या आत्मिक जीवनाची खरी कसोटी आहे. आम्हांला फक्त वर जाण्यास शक्ती असेल तर काही चुकले आहे. देवाबरोबर डोंगरावर राहणे चांगले आहे. पण नंतर परत खाली येऊन खोऱ्यातील भूतग्रस्तांना सोडवण्यासाठीच वर जायचे असते (पहा ९:१४–१८). डोंगर, सूर्योदय आणि जीवनातील सुंदर आकर्षणे हे सर्व केवळ प्रेरणेसाठी असते. या गोष्टींमध्ये हरवण्यासाठी आम्हांला नेमले नाही. दऱ्या, खोरी, जीवनातील सामान्य गोष्टी हेच आमचे कार्यक्षेत्र. येथेच आम्ही आमची ताकद, कुवत दाखवावी. पण आमचा आत्मिक स्वार्थ आम्हांला वरचेवर डोंगरावर जाण्यास धडपडतो. आम्ही डोंगर माथ्यावरच राहिलो तर दिव्यदूतांसारखे परिपूर्ण होऊन बोलू, चालू! हे अत्यानंदाचे क्षण कधीकधी अनुभवास येतात. त्यामुळे देवाबरोबरचे आमचे जीवन अर्थपूर्ण होते. पण आपण आत्मिक स्वार्थाच्या आहारी जाऊ नये.

आम्हांला वाटते घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीतून काही महत्त्वाचे शिकावे. खरेतर याचा उपयोग शिक्षणाकडे नव्हे तर आमचा शीलस्वभाव विकसित करण्याकडे झाला पाहिजे. डोंगरमाथा आम्हांला शिक्षण देण्यासाठी नसून आम्हांला चारित्र्यसंपन्न करण्यासाठी आहे. "ह्या अनुभवाचा उपयोग काय?" या प्रश्नाच्या सापळ्यात आपण अडकता नये. आत्मिक बाबींचे मोजमाप या प्रकारे करता येत नाही. डोंगरामाथ्यावरचे क्षण क्वचितच अनुभवास येतात. देवाचा उद्देश पूर्ण होण्याचे कामी ते आवश्यक आहेत.

**ऑक्टोबर २**

## मानहानीचे स्थान

**“आपल्या हातून काही होणे शक्य असेल तर आम्हांवर दया करा व आम्हांला साहाय्य करा” (मार्क ९:२२).**

उंचावर जाण्याच्या प्रत्येक प्रसंगानंतर आम्हांला अचानक वास्तवात आणले जाते. येथे सुंदर, रमणीय काव्यमय काहीच नसते. डोंगराची उंची दरीतल्या उदासवाण्या कष्टांनी मोजली जाते. पण देवाच्या गौरवासाठी आम्हांला दरीतच राहावे लागते. डोंगरावर आम्हांला त्याचे गौरव दिसते परंतु त्याच्या गौरवासाठी आम्ही तेथे राहात नाही. मानहानीच्या ठिकाणीच आमचे विश्वासूपण उघड होते आणि देवाला आमचे मोल किती आहे तेही समजते. काही धाडस दाखवायचे असले तर आम्ही केव्हाही नवनव्या गोष्टी करु. कारण आमचे अंतःकरण मूळचेच स्वार्थी असते. पण आम्ही त्याच्याबरोबरच्या आमच्या वैयक्तिक संबंधामुळे दरीमध्ये नित्याचे काम करतो देवाची तीच इच्छा आहे. डोंगरावरच राहावे असा पेत्राचा मानस होता परंतु ख्रिस्ताने शिष्यांना वरुन खाली सपाटीवर आणले. तेथेच त्या दृष्टांताचा खरा अर्थ त्यांना उलगडून सांगितला (पहा ९:५–६; १४:२३).

“आपल्या हातून काही होणे शक्य असेल तर...” आमची संशयखोरवृत्ती जाण्यासाठी मानहानीचे खोरेच हवे. मागे वळून तुमचा स्वतःचा अनुभव पहा. येशू खरा कोण आहे ते समजेपर्यंत तुम्हांलाही त्याच्या शक्तीविषयी शंका होती. डोंगरमाथ्यावर असताना तुमचा कशावरही विश्वास बसला असता. पण खोऱ्यामधील वस्तुस्थिती समोर आल्यावर? आपल्या पवित्रीकरणाची साक्ष सहज द्याल. पण आताच्या मानहानीचे काय? तुम्ही शेवटी देवाबरोबर डोंगरावर होता, तेव्हा स्वर्ग आणि पृथ्वी येथील सर्व सामर्थ्य येशूचे आहे हे पाहिले पण आता मानहानीच्या दरीत असलात तरी अजून संशयखोर आहात?

**ऑक्टोबर ३**

## सेवाकार्याचे स्थान

**"तो त्यांस म्हणाला, ही जात (अशुद्ध आत्मा) प्रार्थना व उपास यावाचून दुसऱ्या कशानेही निभावणार नाही " (मार्क ९:२९).**

त्याच्या शिष्यांनी त्याला एकांतात विचारले, "आम्हांला तो का काढता आला नाही?" (९:२८). येशू ख्रिस्ताशी व्यक्तिगत संबंध असणे हेच याचे उत्तर आहे ही जात फक्त त्याच्यावर चित्त एकाग्र करुन ते पुन्हा पुन्हा त्याच्याकडे लावल्यानेच जाते. शिष्यांनी देवाचे कार्य करताना त्याच्या सामर्थ्यावर लक्ष केंद्रित केले नाही, आमच्या स्वतःच्या विचारकल्पनांनी पुढे चाललो तर आम्ही कायमचे शक्तीहीन राहणार. देवाला न ओळखता त्याच्या सेवेसाठी हिरिरीने पुढे सरसावलो तर आम्ही त्याची निंदा आणि अनादर करतो.

तुमच्यापुढे कठीण परिस्थिती येते आणि काहीच घडलेले दिसत नाही तरी तुम्ही येशू ख्रिस्तावर लक्ष लावले असल्याने योग्य वेळी सर्व प्रश्न सुटतील, उलगडा होईल याची खात्री ठेवावी. येशू आणि तुम्ही ह्यांच्या दरम्यान काहीही आड येत नाही हे पाहणे सेवा व सेवाकार्य करताना तुमचे कर्तव्य असावे. आता या क्षणाला येशू आणि तुम्ही यांच्या दरम्यान काही आहे काय? असेल तर त्याकडे दुर्लक्ष करु नका त्यातून पुढे जा, ते ओलांडून जाऊ नका तर त्याचा निपटारा करा. त्याला सामोरे जा, येशूच्या सान्निध्यात त्यामधून पुढे जा. मग ती सर्व समस्या आणि त्याबाबतीत तुम्हांला आलेला अनुभव येशू ख्रिस्ताचे गौरव करील. हा गौरव कसा झाला ते तुम्हांला तो प्रत्यक्ष भेटेल तेव्हाच समजेल.

आम्हांला "गरुडांप्रमाणे पंखांनी वर उडता" आले पाहिजे (यशया ४०:३१). पण खाली कसे उतरायचे तेही माहीत हवे. पवित्रजनाचे सामर्थ्य खाली येण्यात आणि दरीमध्ये राहण्यात आहे. पौलाने म्हटले, "मला जो सामर्थ्य देतो त्याच्याकडून मी सर्व काही करावयास शक्तीमान आहे" (फिलिप्पै ४:१३). "सर्वकाही" मध्ये अतिमानहानी करणाऱ्या गोष्टी आल्याच. मानहानी होण्यास नकार देऊन आम्ही म्हणू, "जमणार नाही, मी देवाबरोबर डोंगरावरच राहीन" येशू ख्रिस्ताच्या सत्यतेच्या प्रकाशात समोर येणाऱ्या गोष्टींना मी सामोरा जाईन का त्याच्यावरील माझा विश्वास नष्ट करणाऱ्या गोष्टी करुन स्वतःला गोत्यात आणीन?

## दृष्टांत आणि वास्तवता

**"... पवित्र जन होण्यास बोलावलेल्या..." (१ करिंथ १:२).**

तुम्ही आतापर्यंत कधी पाहिले नाही ते पाहण्याच्या शक्तीबद्दल देवाला धन्यवाद द्या. तुम्ही दृष्टांत पाहिला पण त्यातील वास्तवता अद्याप पाहिली नाही. आम्ही दरीमध्ये असतो, पसंतीस उतरलेला होणार का ते समजण्यापूर्वी आमच्यापैकी अनेकजण माघारे फिरतात. त्या दृष्टांतानुसार आकार मिळण्यास आवश्यक ते धक्के आणि झटके सोसण्यास आमची तयारी नसते. आम्ही कसे नाही ते समजते. आमच्यासाठीची देवाची इच्छाही कळते. पण देवाला उपयोगी पडण्यासाठी तो आम्हांला तावून सुलाखून तयारी करील; त्यासाठी आमची तयारी आहे? टक्केटोणपे सामान्य लोकांकडून नेहमीच्या रीतीने मिळतील.

देवाचा उद्देश आम्हांला समजतो; पण तो दृष्टांत प्रत्यक्षात आणायचा का नाही ते देवावर नव्हे तर आमच्यावर अवलंबून आहे. डोंगरावर आराम करीत त्या दृष्टांताच्या आठवणीवर जगायचे असेल तर मानवी जीवनाला आवश्यक असणाऱ्या सामान्य गोष्टींच्या बाबतीत आम्ही निरुपयोगी ठरतो. दृष्टांतात पाहिले त्यावर विसंबून जगण्यास शिकले पाहिजे. नुसते हर्षानंदाने देवाचे चिंतन करीत राहू नये, म्हणजेच त्या दृष्टांताचे सत्य आमच्यामध्ये आकारास येईपर्यंत त्याच दृष्टांताच्या प्रकाशात राहणे. आमचे सर्व प्रशिक्षण त्याच दिशेने होत असते. आपल्या मागण्या आम्हांला कळवल्याबद्दल देवाचे आभार मानण्यास शिका.

देव "करा" असे सांगतो तेव्हा आमचा अहंकार नाक मुरडतो. पण तुमचा अहंकार देवाच्या क्रोधाच्या अंतरंगात आकसून जावो. *"मी जो आहे तो आहे...* 'मी आहे' याने मला तुम्हांकडे पाठवले आहे" (निर्गम ३:१४). त्याची सत्ता चालली पाहिजे. आम्ही कोठे राहतो हे देव जाणतो आणि आम्ही कोणत्या खड्यात पडतो तेही त्याला माहीत आहे. ही जाणीव मर्मभेदक नाही का? तो आम्हांला निमिषार्धात शोधून काढील. देव ओळखतो तसा कोणताच माणूस माणसाला ओळाखत नाही.

## अधःपाताचे स्वरुप

**“एका माणसाच्या द्वारे पाप जगात शिरले आणि पापाच्या द्वारे मरण शिरले आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशा प्रकारे मरण पसरले” (रोम ५:१२).**

एका माणसाच्या पापामुळे देवाने संपूर्ण मनुष्यजातीला शिक्षा केली असे पवित्र शास्त्र सांगत नाही. पण पापस्वभाव म्हणजे माझ्यावर माझाच हक्क हा विचार एका माणसाच्या द्वारे मनुष्यजातीमध्ये शिरला असे सांगितले आहे. पण दुसऱ्या एका माणसाने मनुष्यजातीचे पाप स्वतःवर घेतले आणि ते दूर केले. हे प्रकटीकरण पूर्ण आहे (इब्री ९:२६). पापाचे स्वरुप अनीती व अपकृत्ये नाही. स्वतःला महत्त्व देण्यामुळे आपण म्हणतो, “मीच माझा देव आहे.” हे स्वरुप योग्य नैतिकतेमधून अगर अयोग्य अनीतीमधून व्यक्त होते. परंतु माझ्या स्वतःवर माझाच हक्क हाच दोहोंचाही समान आधार आहे. आमच्या प्रभूसमोर सर्वस्वी दुष्ट लोक आले अगर सरळमार्गी, न्यायनीतीने जगणारे लोक आले, तेव्हा त्याने एकाच्या नैतिक अधःपाताकडे अगर दुसऱ्याच्या नैतिकतेकडे लक्ष दिले नाही. त्याने पाहिले ते आम्ही पाहू शकत नाही म्हणजे माणसाच्या स्वभावकडे (पहा योहान २:२५).

मी पापात जन्मलो पापाला स्पर्श करता येत नाही. फक्त देवालाच उद्धाराच्या द्वारे पापाला स्पर्श करता येतो. ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या द्वारे देवाने संपूर्ण मनुष्यजातीचा पापाच्या वारशामुळे व्हावयाच्या नाशापासून उद्धार केला. पापाचा वारसा आहे म्हणून देव कोणाला शिक्षा करत नाही. मला पापाच्या या वारशापासून मुक्त करण्यासाठी येशू ख्रिस्त आला हे जाणूनही मी त्याला नाकारतो, मला मुक्त करु देत नाही. तेव्हा मी शिक्षेस पात्र होतो. त्या क्षणापासून माझ्यावर दंड शिक्षेची मोहोर उमटू लागते. “निवाडा हाच आहे (आणि हाच निर्णायक क्षण आहे) की, जगात प्रकाश आला आहे आणि मनुष्यांनी प्रकाशापेक्षा अंधाराची आवड धरली...” (योहान ३:१९).

ऑक्टोबर ६

## नवीकरणाचे स्वरुप

**“(देवाला) आपल्या पुत्राला माझ्याठायी प्रकट करणे बरे वाटले...” (गलती १:१५–१६).**

येशू ख्रिस्त मला नवा करणार असेल तर त्याच्यासमोर कोणती समस्या आहे? ही समस्या सरळ आहे माझी वंशपरंपरा आड येते. या बाबतीत मला काहीच करता येत नाही. मी पवित्र नाही, तसा होण्याची शक्यता नाही. मी पवित्र झाले पाहिजे. हेच येशू ख्रिस्त सांगणार असेल तर, त्याच्या शिक्षणातून माझी घोर निराशाच होते. येशू ख्रिस्त खरेच पुनरुज्जीवन करणारा असेल, आपली स्वतःची पवित्रतेची वंशपरंपरा माझ्यामध्ये घालणार असेल तर मग मी पवित्र असले पाहिजे व त्याच्या म्हणण्याचा अर्थ मला समजतो. तारण म्हणजे त्याच्यामध्ये असलेला वंशपरंपरेचा स्वभाव येशू ख्रिस्त कोणाहीमध्ये घालू शकतो. तो देतो ते सर्व मापदंड त्याच्या या स्वभावर आधारलेले आहेत. *तो आमच्यामध्ये घालतो त्या जीवनालाच त्याची शिकवण लागू करायची आहे.* देवाने ख्रिस्ताच्या वधस्तंभवार पापाचा न्याय केला त्या निवाड्याशी सहमत होणे हीच योग्य कृती मला करायची आहे.

नवीकरण, पुनरुज्जीवन यांच्याविषयीच्या नव्या करारातील शिक्षणाप्रमाणे एखाद्या व्यक्तीला आपल्या गरजेची तीव्रतेने जाणीव झाली की देव आपला पवित्र आत्मा त्याच्या आत्म्यात घालील. त्याचा आत्मा देवाच्या पुत्राच्या आत्म्याने शक्तिमान होईल, “तुमच्यामध्ये ख्रिस्ताचे स्वरुप निर्माण होईतो” हे असेच चालेल (गलती ४:१९). देव माझ्यामध्ये नवा स्वभाव घालील आणि त्याच्या योगे मला सर्वस्वी नवे जीवन जगता येईल हाच तारणाचा नैतिक चमत्कार आहे. माझ्या गरजेची हद्द झाली, माझ्या मर्यादा माझ्या लक्षात आल्या म्हणजे “तुम्ही धन्य...” (मत्तय ५:११) असे येशू म्हणतो. पण मी तेथेवर पोचले पाहिजे. मी जबाबदार नैतिक व्यक्ती आहे तेव्हा येशू ख्रिस्तामध्ये असलेल्या स्वभावाची मला गरज आहे हे ओळखल्याशिवाय देव तो स्वभाव मला देणार नाही.

एका माणासाच्या द्वारे मनुष्यजातीमध्ये पाप स्वभाव पसरला त्याचप्रमाणे दुसऱ्या एका माणसाच्या द्वारे पवित्र आत्मा मनुष्यजातीमध्ये आला (पहा रोम ५:१२–१९) आणि तारण, उद्धार म्हणजे पापाच्या वंशपरंपरेपासून माझी सुटका होईल आणि येशू ख्रिस्ताच्या द्वारे मला पवित्र आत्म्याचा शुद्ध व निष्कलंक वारसा मिळेल.

**ऑक्टोबर ७**

## समेटाचे स्वरुप

**“ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे” (१ करिंथ ५:२१).**

पापाचा मूलभूत संबंध आहे हे वाईट करणे नाही तर वाईट असणे आहे. हे मुद्दाम समजून उमजून निश्चयपूर्वक देवापासून स्वतंत्र होणे आहे. ख्रिस्ती विश्वासात सर्वकाही पापाच्या अत्यंत टोकाच्या आत्मविश्वासपूर्ण स्वरुपावर आधारतो. इतर विश्वासात पापांविषयी विचार असतो, तर पवित्र शास्त्रात पापाचा विचार केला आहे. येशू ख्रिस्त सर्वप्रथम लोकांना पापाच्या परंपरेविषयी छेडतो. सुवार्ता सांगताना आम्ही याकडे दुर्लक्ष केले आहे त्यामुळे सुवार्तेचा जोर व स्फोटक शक्ती ओसरली आहे.

पवित्र शास्त्रातील प्रकट सत्य येशू ख्रिस्ताने आमची दैहिक पापे स्वतःवर घेतली हे नसून कोणाही माणसाला अशक्य अशी पापाची परंपरा स्वतःवर घेतली. पापी व्यक्तीला पवित्र करण्यासाठी देवाने आपल्या पुत्राला “पाप असे केले,” आमच्या प्रभूने आमच्याशी समरुप होऊन जगाचे पाप स्वतःवर घेतले ते आमच्याविषयी कणव वाटली म्हणून नव्हे. त्याने पाप जाणूनबुजून आपल्या खांद्यांवर घेतले आणि मानवजातीचे संपूर्ण, एकत्रित पाप स्वतःच्या देहामध्ये सहन केले. “ज्याला पाप माहीत नव्हते त्याला त्याने आमच्यासाठी पाप असे केले” आणि हे करुन संपूर्ण मानव वंशासाठी उद्धाराच्या आधारावरच तारण साध्य केले. मनुष्यजात देवाच्या योजनेप्रमाणे जेथे असावी तेथेच ठेवून येशू ख्रिस्ताने मनुष्यजातीचा समेट केला. आमच्या प्रभूने वधस्तंभावर जे केले त्याच्या आधारे देवाबरोबरच्या एकपणाने साधलेल्या समेटाचा अनुभव आता कोणालाही घेता येईल.

कोणताही मनुष्य स्वतःचा उद्धार करु शकणार नाही. तारण, उद्धार हे देवाचे कार्य आहे. ते सर्वतोपरी पूर्ण झाले आहे आणि ते व्यक्ती व्यक्तीला लागू करणे हे प्रत्येकावर अवलंबून आहे. उद्धाराचे प्रकट सत्य आणि व्यक्तीच्या जीवनात तारणाचा जाणीवपूर्वक अनुभव या दोहोमध्ये भेद केलाच पाहिजे.

**ऑक्टोबर ८**

## येशूकडे येणे

**“... तुम्ही सर्व माझ्याकडे या...” (मत्तय ११:२८).**

आम्ही येशूकडे आले पाहिजे हे सांगणे मानहानीकारक नाही का? ज्यासाठी आपण येशू ख्रिस्ताकडे येणार नाही अशा गोष्टींचा विचार करा. आपण किती खरे आहो ते पाहण्यासाठी “माझ्याकडे या...” या शब्दांनी आपली पारख करा. ज्या ज्या बाबतीत तुम्ही खरे नाही त्याविषयी तुम्ही आक्षेप घ्याल अगर गप्प राहाल. पुढे येण्यापेक्षा दुःख सोसण्यातच तुम्हांला मौज वाटेल. धावेचा शेवटचा टप्पा ओलांडण्यापेक्षा म्हणाल “मी आहे तसा येतो.” आत्मिक अवमानाचा लवलेश तुमच्यामध्ये असेल तर तो नेहमी उघड होईल. देवाने आपल्याला काही मोठे करण्यास सांगावे ही तुमची अपेक्षा; पण तो तुम्हांला सांगतो, “माझ्याकडे या...”

“माझ्याकडे या...” हे शब्द ऐकले की तुम्ही येण्यापूर्वी तुमच्यामध्ये काही घडणे आवश्यक आहे हे तुम्हांला समजेल. तुम्ही काय करावे ते पवित्र आत्मा तुम्हांला दाखवील आणि येशूकडे येण्याच्या वाटेत आड येणारे जे काही असेल ते उखडून टाकावेच लागेल आणि हे करण्याची तुमची तयारी होईतो तुमची जराही प्रगती होणार नाही. तुमच्यामधील ही अभेद्य तटबंदी पवित्र आत्मा शोधून काढील. पण तुम्ही त्याला हे करु दिले तरच तो पुढे पाऊल टाकील.

तुम्ही आपल्या मागण्या, विनंत्या घेऊन देवाकडे किती वेळा आला. आहात? “मला हवे ते मिळाले!” असा विचार कितीदा केला आहे? आणि पाहावे तर तुम्ही रिकाम्या हातानी माघारी गेला. तिकडे देव आपले हात पसरुन उभा आहे. तुम्हांला घेण्यासाठी आणि तुम्ही त्याला घ्यावे यासाठी वाट पाहात आहे. येशूच्या अजिंक्य, दुर्दम्य व न थकणाऱ्या धीराबद्दल जरा विचार करा. तो प्रेमाने आवाहन करतो, “माझ्याकडे या...”

## प्रायश्चित्ताच्या आधारे उभारणी करणे

**“... आपले अवयव नीतीची साधने होण्याकरिता देवाला समर्पण करा” (रोम ६:१३).**

मला माझे स्वतःचे तारण करता येत नाही, तसेच पवित्रही करता येत नाही. पापासाठी मला प्रायश्चित्त करणे शक्य नाही, जगाचा उद्धार करणे माझ्या शक्ती बाहेरचे आहे. चूक ते बरोबर करणे मला जमत नाही, अशुद्ध ते शुद्ध व अपवित्र ते पवित्र करणे मला येत नाही. हे सर्व देवाचे सार्वभौम कार्य आहे. येशू ख्रिस्ताने केले आहे त्यावर माझा विश्वास आहे? त्याने पापाचे प्रायश्चित्त पूर्ण केले आहे. यावर सतत विश्वास ठेवण्याची सवय मला आहे का? आम्ही काही करणे नव्हे तर विश्वास ठेवणेच गरजेचे आहे. ख्रिस्ताचे तारण अनुभव नसून ते देवाने ख्रिस्ताच्या द्वारे केलेले महान कार्य आहे. हाच माझ्या विश्वासाचा आधार आहे. मी माझ्याच अनुभवावर माझा विश्वास उभारला तर माझे जीवन सर्वस्वी अशास्त्र होईल. या जीवनात माझे नेत्र माझ्याच पवित्रतेकडे लागलेले असतील. प्रभूच्या प्रायश्चित्तावर न आधारलेल्या मानवी पवित्रतेपासून सावध असा. हे एकाकी जीवन, देवाच्या कामी येत नाही आणि मानवाला त्रासदायक आहे. तुम्हांला येणाऱ्या प्रत्येक अनुभवाचे मोजमाप आमच्या प्रभूनेच करावे. ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील प्रायश्चित्तावर आधारलेले असेल तेच देवाला संतोषदायक असते.

येशूचे प्रायश्चित्त माझ्या नित्याच्या जीवनातून प्रगट झाले पाहिजे. मी आज्ञा पाळली की प्रत्येक वेळी देवाचे परमदेवत्व माझ्या पक्षाचे असते. देवाची कृपा आणि माझे स्वाभाविक आज्ञापालन यांची एकवाक्यता असते. आज्ञापालन म्हणजे मी प्रायश्चित्तावर सर्वस्वी भरंवसा ठेवला आहे. माझ्या आज्ञापालनाला कृपेच्या अलौकिक आनंदाचा प्रतिसाद मिळतो.

स्वाभाविक जीवनाची सत्यता नाकारणाऱ्या मानवी पवित्रतेपासून सावध असा. प्रायश्चित्ताच्या कसोटीवर सतत स्वतःची पारख करा आणि विचारा “यात आणि त्यात प्रायश्चित्ताची पारख कुठे आहे?”

## मला कसे समजेल

**“येशू असे बोलू लागला हे पित्या, स्वर्गाच्या व पृथ्वीच्या प्रभो, मी तुझे स्तवन करतो; कारण ज्ञानी व विचारवंत ह्यांच्यापासून ह्या गोष्टी गुप्त ठेवून त्या तू बाळकांस प्रगट केल्या” (मत्तय ११:२५).**

आत्मिक नातेसंबंधात आमचा टप्प्याटप्प्याने वाद होत नाही. आम्हांला असे नाते असते अगर नसते. देव काही आम्हांला सतत पापापासून अधिक शुद्ध करीत नाही. “पण… आपण प्रकाशात चालतो” तर आम्ही “सर्व पापांपासून” शुद्ध झालो आहो (१ योहान १:७). आपण आज्ञा पाळल्या तर आमचे नाते लगेच परिपूर्ण होते. परंतु आज्ञापालन करण्यास एक क्षण चुकलो तरी अंधकार आणि मरण यांचे कार्य पुन्हा सुरु होते.

देवाची सर्व प्रकट सत्ये मोहोरबंद असतात. आज्ञापालनाने ती उघड होतात. तत्वे, बुद्धी, विचार यांनी ती उघडता येणार नाहीत. पण आज्ञा पाळली की लगेच प्रकाश पडतो. देवाचे सत्य चहू बाजूनी कवटाळून तुमच्यामध्ये कार्य करो. चिंतेने काही साधणार नाही. देवाचे सत्य समजण्यासाठी ते शोधणे थांबवा आणि नव्याने जन्मास या. पहिल्या बाबतीत देवाची आज्ञा पाळली तर तो लगेच त्या पुढचे सत्य तुम्हांला प्रकट करतो. पवित्र आत्म्याच्या कार्याविषयी कितीही ग्रंथ वाचता येतील परंतु केवळ पाच मिनिटे बिनशर्त आज्ञापालन करा सर्व गोष्टी सूर्य प्रकाशासारख्या स्पष्ट होतील. “या गोष्टी पुढे कधीतरी समजतील,” असे म्हणू नका. त्या तुम्हांला आताच समजतील. ही समज अभ्यासाने येत नाही तर आज्ञापालनाने सर्व समजते. अगदी किंचित आज्ञापालनाने स्वर्ग उघडतो आणि देवाची गूढ व गाढ सत्ये तुमची होतात. जे माहीत आहे त्यानुसार आज्ञापालन केले तरच देव तुम्हांला आणखी सत्ये प्रगट करील. “ज्ञानी व विचारवंतांच्या” पंक्तीस बसू नका. “जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करण्याची मनीषा बाळगील… त्याला समजेल” (योहान ७:१७).

**ऑक्टोबर ११**

## देवाचे मौन—पुढे काय?

**“… तो आजारी आहे हे त्याने ऐकले तरी तो होता त्या ठिकाणीच आणखी दोन दिवस राहिला” (योहान ११:६).**

देवाने आपले मौन तुम्हांला सोपवले आहे? या मौनाला फार मोठा अर्थ आहे. देवाची मौने म्हणजे त्याची उत्तरेच होय. बेथानी येथील घरामधील पूर्ण स्तब्धतेच्या दिवसांचा विचार करा. त्या दिवसांशी तुलना करण्याजोगे काही तुमच्या जीवनात आहे? देव अशा प्रकारे तुमच्यावर भरंवसा ठेवतो? तुम्ही त्याच्याकडे दृश्य उत्तराची मागणी करता का? आशीर्वादांशिवाय पुढे जाण्यास नकार दिलात तर तो तुम्हांला निश्चित आशीर्वाद देईल. पण तो तुम्हांला स्वतःची अधिक सखोल जाणीव देतो आहे हीच त्याच्या मौनाची खूण आहे. देवाने तुम्हांला स्पष्ट प्रतिसाद दिला नाही म्हणून तुम्ही त्याच्यासमोर दुःख करता का? देवाचे ऐकता येत नाही तेव्हा त्याने तुमच्याकडे अगदी मोठ्या जिव्हाळ्याने संपूर्ण मौन सोपवले आहे. हे मौन निराशेचे नसून सुखाचे आहे. तुम्ही अधिक मोठे प्रकटीकरण सहन करु शकाल हे लक्षत आल्यानेच त्याने हे केले आहे. देवाने तुम्हांला मौन दिले आहे तर त्याची स्तुती करा. तो तुम्हांला त्याच्या उद्देशांच्या मुख्य प्रवाहामध्ये आणत आहे. उत्तराचे प्रत्यक्ष प्रमाण योग्य वेळी देवाच्या सार्वभौमत्वाने मिळेलच. देवाला काळवेळ सर्व सारखेच आहे. कदाचित तुम्ही म्हणाला असाल, “मी देवाकडे भाकर मागितली पण त्याने मला धोंडा दिला!” (पहा मत्तय ७:९). त्याने तुम्हांला धोंडा दिला नाही आणि आता तर त्याने तुम्हांला “जीवनाची भाकर” दिली आहे (योहान ६:३५) हे आज तुम्हांला समजेल.

देवाचे मौन जणू सांसर्गिक आहे. ही एक अद्‌भुत गोष्ट आहे. ते मौन तुमच्यामध्ये भिनते. तुम्हांला निश्चयाने म्हणता येते, “देवाने माझे ऐकलेच आहे” आणि त्याचे मौन हेच त्याने ऐकल्याचे प्रमाण आहे. प्रार्थनेचे उत्तर म्हणून देव आपल्याला आशीर्वाद  देईल हा विचार तुमच्या मनात असतो तोवर देणार नाही. प्रार्थना हे देवपित्याचे गौरव करणे आहे हे येशू ख्रिस्त तुम्हांला शिकवीत असेल तर तो आपल्या जवळिकीचे पहिले चिन्ह-मौन तुम्हांला देईल.

## देवाच्या पावलावर पाऊल टाकणे

**“हनोख देवाबरोबर चालला...?”** (उत्पत्ती ५:२४).

एखाद्या व्यक्तीच्या आत्मिक जीवनाची आणि स्वभावाची खरी पारख तो जीवनातील असामान्य क्षणी काय करतो त्यावरुन नव्हे तर तो नित्याच्या सर्वसाधारण प्रसंगी सर्व शांत असते तेव्हा काय करतो त्यावरुनच होते. जीवनातील सामान्य स्थितीत तो जे करतो त्यावरुन त्याचे मोल ठरते (पाहा योहान १:३५–३७ आणि ३:३०). देवाच्याबरोबरीने चालणे आणि चालत राहाणे वाटते तेवढे सोपे नाही. यासाठी तुम्हांला आत्मिक बल हवे. देवाबरोबर चालण्यास शिकण्यात त्याच्या पावलावर पाऊल टाकणे अवघड आहे. पण एकदा हे केले की मग प्रत्यक्ष देवाच्या जीवनाचे गुणविशेषच पुढे येतात. व्यक्ती देवाच्या व्यक्तिमत्वात विलीन होते आणि मग फक्त देवाची चाल आणि सामर्थ्य हेच दिसते.

देवाच्या चालीने चालणे कठीण आहे. आम्ही त्याच्याबरोबर चालू लागतो आम्ही दोन तीन पावले चाललो नाही तोच तो आमच्या पुढे गेल्याचे आढळते. कार्य करण्याचे त्याचे विविध मार्ग आहेत. त्याच्या मार्गाविषयी आम्ही शिकून घ्यावे आणि शिस्त लावून घ्यावी. येशूविषयी म्हटले आहे, “पृथ्वीवर न्याय स्थापीपर्यंत तो मंदावणार नाही, भंगणार नाही...” (यशया ४२:४). त्याने कधीही स्वतःच्या दृष्टीने कार्य केले नाही तर त्याच्या पित्याच्या दृष्टीनेच कार्य करतो. आम्हीही तसेच करण्यास शिकले पाहिजे. आत्मिक सत्य बुद्धिवादातून नव्हे तर आमच्या भोवतालच्या वातावरणापासून शिकले पाहिजे. देवाचा आत्मा आमच्या दृष्टीत बदल करतो मग पूर्वी अशक्य वाटणारे सर्व आता शक्य होऊ लागते. देवाच्या बरोबरीने चालणे म्हणजे त्याच्याशी एक होणे. तेथवर पोचण्यास वेळ लागतो, पण नेटाने गेले पाहिजे आणि आपल्याला नवी दृष्टी आणि नवे उद्दिष्ट मिळाल्याचे लक्षात येईल.

## व्यक्तिगत निराशा आणि वैयक्तिक वाढ

**“... मोशे मोठा झाल्यावर त्याने आपल्या भाऊबंदांकडे जाऊन त्यांचे काबाडकष्ट पाहिले” (निर्गम २:११).**

आपल्या लोकांवर होणारा जुलूम मोशेने पाहिला. त्यांची आपणच सुटका करणार असे त्याच्या मनाने घेतले. आपल्या आत्म्याच्या सात्विक संतापाने तो त्याच्यावरील अन्याय दूर करण्यास पुढे सरसावला. देवासाठी त्याने पहिला हल्ला केला तो त्याच्या दृष्टीने चांगल्यासाठी होता पण देवाने त्याला निराशेच्या खाईत लोटले. रानात जाऊन त्याला ४० वर्षे मेंढरे चारावी लागली. ती वर्षे संपल्यावर देवाने मोशेला सांगितले, “तू आता चल, मिसर देशातून माझे लोक... बाहेर काढावे!” त्यावर मोशे देवाला म्हणाला, “... इस्राएलवंशजांस मिसरातून... आणणारा मी कोण?” (निर्गम ३:१०–११). आरंभी लोकांना सोडवणारे आपणच आहो अशी मोशेची समजूत होती. परंतु प्रथम त्याला देवाने शिस्त लावून प्रशिक्षण देणे गरजेचे होते. व्यक्तिगत दृष्टीने त्याचे बरोबर होते; परंतु त्या कार्यासाठी योग्य नव्हता. त्यासाठी त्याला देवाबरोबरचा एकपणा आणि खरी सहभागिता शिकणे आवश्यक होते.

आम्हांला देवाचा दृष्टांत झाला असेल, देवाची इच्छा काय आहे ते स्पष्टपणे समजले पण आम्ही ते करु पाहतो तेव्हा मोशेला रानात काढाव्या लागलेल्या ४० वर्षांसारखे काहीतरी आड येते. जणू देव सर्वस्वी दुर्लक्ष करतो आणि आम्ही सर्वस्वी निराश झालो की परत येऊन देव पाचारण करतो. मग आपण थरथर कापत म्हणतो, “मीच जावे असा मी कोण आहे?” देवाची महान आज्ञा “*मी आहे तो आहे* याने मला पाठवले आहे” (निर्गम ३:१४). या शब्दांत एकवटली आहे. देवासाठी केलेल्या व्यक्तिगत प्रयत्नांतून त्याच्याविषयीचा अनादरच दिसून येतो. देवाबरोबरच्या वैयक्तिक नात्यातून आमचे व्यक्तित्त्व उजळते. आम्हांला योग्य दृष्टीकोन मिळतो. “मी हेच करावे” ही देवाची इच्छा असल्याचे समजते. तुम्ही निराश झाला असाल तर चिंता नको. देवाच्या बरोबरीने चालण्यास शिकले पाहिजे. पुढे वैयक्तिक वाढ होणार आहे.

**ऑक्टोबर १४**

## मिशनरीच्या कार्याची किल्ली

**“तेव्हा येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलताना म्हणाला, ‘स्वर्गांत आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे; तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा...’” (मत्तय २८:१८–१९).**

मिशनरीच्या कार्याची किल्ली येशू ख्रिस्ताचा अधिकारच आहे, हरवलेल्यांच्या गरजा नाही. देवासाठी आम्ही करतो त्या प्रयत्नांत आमचा प्रभू आम्हांला साहाय्य करतो असे आपण म्हणतो. पण आमचा प्रभू स्वतः त्याच्या शिष्यांवर सार्वभौम आणि सर्वश्रेष्ठ स्वामी आहे. आम्ही गेलो नाही तर हरवलेल्यांचे तारण होणार नाही असे तो म्हणत नाही. तो सरळ सांगतो, “तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा...” तो सांगतो, “माझे सार्वभौमत्व, शिकवण आणि उपदेश याविषयी तुमच्या अनुभवाच्या प्रकट सत्याच्या आधारे पुढे जा.”

“इकडे अकरा शिष्य... जो डोंगर येशूने सांगून ठेवला होता त्यावर गेले” (२८:१६) येशूचे सार्वत्रिक सार्वभौमत्व जाणून घ्यायचे तर मी स्वतः त्याला ओळखले पाहिजे. मी ज्याचे नाव धारण करतो त्याची उपासना केली पाहिजे. येशू म्हणतो, “अहो, कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या...” (मत्तय ११:२८). त्यातले मिशनरी किती आहेत! जगाच्या सर्वसमर्थ सार्वभौमाचे हे शब्द आम्ही लक्षात घेत नाही. पण येशूचे हे शब्द येथे व आताच त्याच्या शिष्यांसाठी आहेत.

“तेव्हा जाऊन...” “जाणे” म्हणजे राहणे. कसे जायचे ते प्रे. कृ. १:८ मध्ये सांगितले आहे. येशूने येथे “यरुशलेम, यहूदीया आणि शोमरोन येथे जाण्यास सांगितले नाही तर (या सर्व ठिकाणी) तुम्ही माझे साक्षी व्हाल” असे सांगितले आहे. तो स्वतःच आम्हांला पाठवतो.

“तुम्ही माझ्यामध्ये राहिला व माझी वचने तुम्हांमध्ये राहिली...” (योहान १५:७). याच प्रकारे पुढे जात राहायचे. आम्हांला कोठे ठेवले आहे हे महत्त्वाचे नाही. देव आपल्या सार्वभौमत्वाने आमचे जाणे निश्चित करतो. “मी तर आपल्या प्राणांची किंमत एवढीसुद्धा करीत नाही, ह्यासाठी मी आपली धाव आणि देवाच्या कृपेची सुवार्ता... सेवा मला प्रभू येशूपासून प्राप्त झाली आहे, ती शेवटास न्यावी” (प्रे. कृ. २०:२४). या जीवनातून जाईपर्यंत अशीच सेवा करावी.

## मिशनरीच्या संदेशाची किल्ली

**“आणि तोच आपल्या पापांबद्दल प्रायश्चित्त आहे; केवळ आपल्याच पापांबद्दल नव्हे तर सर्व जगाच्याही पापांबद्दल आहे” (१ योहान २:२).**

खिस्त येशूचे प्रायश्चित्त अर्पण हीच मिशनरीच्या संदेशाची किल्ली आहे. त्याने केलेल्या अर्पणाने देवाच्या क्रोधाचे संपूर्ण शमन व समाधान झाले. खिस्ताच्या कार्याचा कोणताही पैलू पहा, आरोग्य देणे, तारण करणे अगर पवित्रीकरण. यातील काहीच अमर्याद नाही. पण “जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा” हे अमर्याद आहे (योहान १:२९). आमच्या पापांसाठी प्रायश्चित्त अर्पण म्हणून येशू खिस्ताचे अमर्याद महत्त्व हाच मिशनरीचा संदेश आहे. मिशनरी तर या सत्याच्या प्रकटीकरणाने ओतप्रोत भरलेला असतो.

मिशनरीच्या संदेशाची खरी किल्ली येशूच्या जीवनाची “क्षमाशीलता” हा पैलू आहे. त्याची दयाशीलता, त्याचे चांगुलपण अगर देवाचे पितृत्व आम्हांला प्रकट करणे यातील काहीही ती किल्ली नाही. “सर्व राष्ट्रांना त्याच्या नावाने पश्चात्ताप व पापक्षमा घोषित करण्यात यावी” (लूक २४:४७). “तोच आमच्या पापांबद्दल प्रायश्चित्त आहे” हाच सर्वात अपार महत्त्वाचा संदेश आहे. मिशनरीचा संदेश राष्ट्रवादी नाही. तो राष्ट्रे अगर व्यक्ती यांचे महत्त्व सांगणारा नाही तर “सर्व जगासाठी” आहे. पवित्र आत्मा माझ्यामध्ये येतो तेव्हा तो माझी मते, आवडी निवडी लक्षात घेत नाही. तो मला प्रभू येशूबरोबर एकपणात आणतो.

मिशनरी आपला प्रभू व स्वामी ह्याच्या कार्यध्येयाशी बांधलेला असतो. त्याने स्वतःचे विचार सांगायचे नाहीत. फक्त “देवाच्या कोकऱ्याची” घोषणा करायची. येशू खिस्ताने माझ्यासाठी काय केले आहे ते सांगणाऱ्या गटात सामील होणे आणि दिव्य आरोग्यदानाचा भक्त होणे अगर विशेष प्रकारचे पवित्रीकरण अगर पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा यांचा पुरस्कर्ता होणे अगदी सोपे आहे. “खिस्ताने माझ्यासाठी केले आहे ते सांगितले नाही तर माझी केवढी दुर्दशा होणार” असे पौलाने म्हटले नाही “मी सुवार्ता सांगितली नाही तर माझी केवढी दुर्दशा होणार!” (१ करिंथ ९:१६). आणि सुवार्ता हीच आहे, “जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा!” (योहान १:२९).

ऑक्टोबर १६

## प्रभूच्या आदेशांची किल्ली

**“ह्यास्तव पिकाच्या धन्याने आपल्या कापणीस कामकरी पाठवून द्यावेत म्हणून त्याची प्रार्थना करा” (मत्तय ९:३८).**

मिशनरीच्या कठीण कार्याची किल्ली प्रार्थना असून ती देवाच्या हाती आहे. आज कार्य या शब्दाने सूचित होणारा अर्थ ही किल्ली नाही. कार्यावर लक्ष ठेवल्याने आमचे लक्ष देवावरुन ढळते. सर्वसामान्य बुद्धी, औषध उपचार, सभ्यता, शिक्षण आणि सुवार्ताप्रसार यात मिशनरीच्या अवघड कार्याची किल्ली नाही. प्रभूच्या आदेशांचे पालन हीच ती किल्ली आहे. “पिकाच्या धन्याची प्रार्थना करा...” प्रार्थना हीच ती किल्ली आहे. लौकिक जगात प्रार्थनेला महत्त्व नाही. सर्वसामन्य दृष्टीने प्रार्थना मूर्खपण आहे हे आपण लक्षात घ्यावे.

येशू ख्रिस्ताच्या दृष्टीने वेगवेगळी राष्ट्रे नाहीत तर एकच जग आहे. अनेक नव्हे तर एकाच व्यक्तीवर येशू ख्रिस्तावर लक्ष लावून आपणांपैकी कितीजण प्रार्थना करतात? दुःख शोक आणि खातरजमा होणे यांमधून तयार झालेल्या पिकाचा तोच धनी आहे. याच पिकाची कापणी करण्यासाठी कामकरी पाठवावेत म्हणून आम्हांला प्रार्थना करायची आहे. आम्ही आमच्या कामात दंग राहतो. आमच्या आजूबाजूने सर्व लोक पिकून कापणीसाठी तयार आहेत. आम्ही त्यातील एकाचीही कापणी करीत नाही आणि अधिक शक्ती खर्चून कार्यक्रम करतो, मेळे भरवतो. प्रभूचा वेळ सरळ वाया दवडतो. समजा तुमचे वडील अगर भाऊ ह्यांच्यावर काही प्रसंग गुदरला तर तेव्हा तुम्ही येशू ख्रिस्तासाठी पीक गोळा करीत राहता? “पण मला खास काम करायचे आहे, आता वेळ नाही,” असे म्हणता? कोणाही ख्रिस्ती व्यक्तीला विशेष काम करावे लागत नाही. येशू ख्रिस्ताचा स्वतःचा होण्यासाठी ख्रिस्ती व्यक्तीला पाचारण केलेले असते. तो “त्याच्या धन्यापेक्षा थोर नसतो” (योहान १३:१६). दास कधी धन्याला-येशू ख्रिस्ताला आपण काय करणार ते सांगत नाही. आमच्या प्रभूने आम्हांला विशेष कामासाठी नव्हे तर स्वतःसाठी पाचारण केले आहे. “पिकाच्या धन्याची प्रार्थना करा” आणि तो नियोजन करुन आपला कामकरी म्हणून तुमची पाठवणी करील.

## याहून मोठ्या कामांची किल्ली

**“मी तुम्हांला सांगतो, मी जी कृत्ये करतो ती... माझ्यावर विश्वास ठेवणाराही... त्यापेक्षा मोठी (कृत्ये) करील, कारण मी पित्याकडे जातो ” (योहान १४:१२).**

प्रार्थनेन आम्ही मोठ्या कामांसाठी सज्ज होत नाही. प्रार्थना हेच मोठे काम आहे. आम्हांला वाटते प्रार्थना आम्ही आमच्या उच्च शक्तीने करतो, त्यामुळे मोठ्या कामांसाठी आमची तयारी होते. येशू ख्रिस्ताच्या शिक्षणानुसार प्रार्थना हे माझ्यामधील उद्धारकार्याच्या चमत्काराचे फलित आहे. त्यामुळेच दुसऱ्यांच्यामध्ये देवाच्या सामर्थ्याच्या द्वारे उद्धाराचा चमत्कार घडतो. प्रार्थनेद्वारे फळ टिकून राहते. परंतु तारणाच्या कार्यात ख्रिस्ताने सोसलेल्या यातनांवर प्रार्थना आधारली आहे हे लक्षात ठेवा. देवाचे मूल म्हणूनच आम्ही त्याच्याकडे गेले पाहिजे. मुलाच्या विनवणीला उत्तर मिळते, “शहाण्या” माणसाला मिळत नाही (पहा मत्तय ११:२५).

प्रार्थना लढाई आहे. तुम्ही कोठे असता हे महत्त्वाचे नाही. प्रार्थना करणे तुमचे कर्तव्य आहे. परिस्थिती बदलणे देवाच्या इच्छेवर आहे. परंतु “मी आहे तेथे माझा काहीच उपयोग नाही” असले विचार मनात आणू नका. जेथे तुम्हांला अद्याप ठेवलेले नाही तेथे तुमचा उपयोग कसा होणार? देवाने तुम्हांला ठेवले आहे तेथे तुमची परिस्थिती कशीही असो तुम्ही सतत प्रार्थना करावी आणि ती त्याला समर्पण करावी, त्याने अभिवचन दिले आहे “तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन...” (१४:१३). तथापि काही नावीन्य असले तरच आम्ही प्रार्थना करतो एरवी स्वस्थ बसतो. अर्थात हा आमचा घोर आत्मिक स्वार्थ आहे. देवाच्या सूचनांनुसार तो प्रार्थना करण्यास सांगतो, “ह्यास्तव पिकाच्या धन्याने आपल्या कापणीस कामकरी पाठवून द्यावेत म्हणून त्याची प्रार्थना करा” (मत्तय ९:३८).

कामकरी करतो त्या कामात रोमांचक काहीच नसते. पण कामकरी व्यक्तीच प्रतिभावंताच्या विचारकल्पना प्रत्यक्षात आणतो. कष्ट करणारा कार्यकर्ता आपल्या प्रभूचे विचार साकार करतो. आवरण दूर होईल तेव्हा तुम्ही जिंकलेले आत्मे पाहाल. तुम्ही येशू ख्रिस्ताचे आदेश पाळलेत म्हणून यशस्वी झालात हे समजेल.

**ऑक्टोबर १८**

## मिशनरीच्या भक्तीची किल्ली

**“ते... ख्रिस्ताच्या नावासाठी बाहेर पडले आहेत” (३ योहान ७).**

आमच्या प्रभूने, “माझ्यावर प्रीती करतोस काय?” हा प्रश्न विचारुन त्याच्यावरील आमची प्रीती कशी व्यक्त व्हावी ते सुचवले आहे (योहान २१:१७). मग त्याने म्हटले, “माझ्या मेंढरांस चार” म्हणजेच, “दुसऱ्या लोकांविषयी मला असलेल्या आस्थेशी समरुप व्हा.” या प्रीतीची लक्षणे १ करिंथ ३:४–८ मधून दाखवली आहेत. खरे तर हा देवाच्या प्रीतीचा अविष्कार आहे. प्रत्यक्ष कृती हीच येशूवरील माझ्या प्रीतीची कसोटी आहे, बाकी सर्व भावनावश बोलणे आहे.

येशू ख्रिस्तावरील विश्वास हे पवित्र आत्म्याने माझ्यामध्ये केलेले तारणाचे कार्य आहे. “... आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे” (रोम ५:५). तीच प्रीती माझ्यामधून प्रभावीपणे कार्य करुन माझ्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाशी संपर्क साधते. माझ्या जीवनाच्या सामान्य दृष्टीने त्याला नाकारल्यासारखे वाटले तरी मी मात्र त्याच्या नावाशी विश्वासू राहतो.

मिशनरी आमच्या प्रभूशी जडलेला आहे अन्य कोणाशीही नाही. हीच त्याच्या भक्तीची किल्ली आहे. आम्ही आमच्या भोवतालच्या गोष्टींपासून अलिप्त राहावे असे मुळीच नाही. आमचा प्रभूही जीवनातील साध्यासाध्या गोष्टींकडे लक्ष देत असे पण अंतरंगात तो फक्त देवाशी जडलेला होता. बाह्यात्कारी अलिप्त असणे हे बाह्यात्कारी अलिप्त आहो असे वाटणाऱ्या गोष्टींची आंतरिक ओढ असल्याचे लक्षण आहे.

प्रभू येशू  ख्रिस्ताच्या स्वरुपाला आपला आत्मा कायम खुला ठेवणे हेच विश्वासू मिशनरीचे कर्तव्य आहे. आमचा प्रभू आपल्या कार्यासाठी सामान्य स्त्री, पुरुषांना पाठवतो. ह्या लोकांची त्याच्यावर संपूर्ण निष्ठा असते. ही निष्ठा पवित्र आत्म्याच्या द्वारे त्यांना मिळालेली असते.

**ऑक्टोबर १९**

## या रहस्याकडे लक्ष दिले नाही

**“येशूने उत्तर दिले, माझे राज्य ह्या जगाचे नाही...” (योहान १८:३६).**

आज प्रात्यक्षिक कामाचा विचार हाच येशू ख्रिस्ताचा सर्वात मोठा शत्रू आहे. हा विचार जगातील व्यवस्थांमधून येतो. नव्या करारात याला कोणताच आधार नाही. यात अखंडपणे काम करण्यावर भर असून देवाबरोबर एकांतात जीवनाला वाव नाही. चुकीच्या गोष्टीवर भर देण्यात येतो. येशूने म्हटले, “देवाचे राज्य दृश्य स्वरुपात येत नाही. कारण पहा, देवाचे राज्य तुम्हांमध्ये आहे” (लूक १७:२०–२१). ही गुप्त अदृश्य चीज आहे. कृतीशील ख्रिस्ती सेवक अनेकदा दुसऱ्यांनी पाहावे अशी खटपट करतो. पण आंतरिक, वैयक्तिक भागातूनच व्यक्तीच्या जीवनाची शक्ती प्रकट होते.

आपण या धार्मिक युगात राहतो, येथील वृत्तीचा ससेमिरा आपण झटकून टाकावा. आज आपण सतत कार्य करण्यावर भर देतो पण आमच्या प्रभूच्या जीवनात असे कोणतेच दडपण अथवा धांदल आणि गडबड नव्हती. शिष्याने आपल्या गुरुसारखे असले पाहिजे. येशू ख्रिस्ताबरोबर वैयक्तिक नातेसंबंध हेच येशू ख्रिस्ताच्या राज्याचे मर्म आहे. तेथे सर्वांना उपयोगी पडण्याला महत्त्व नाही.

ह्या बायबल कॉलेजची शक्ती तेथील नित्याच्या कार्यातून येत नाही. देवासमोर तुम्ही त्याच्या सत्यांचे कसे व किती ग्रहण केले आहे त्यातूनच सर्व शक्ती मिळते. तुमच्या भावी परिस्थितीला देव कसे कोठून वळण लावणार त्याची तुम्हांला किंचितही कल्पना नसते. स्वदेशात अगर परदेशात तुम्हांला कोणते ताणतणाव सोसावे लागणार त्याची अगोदर जराही कल्पना नसते. उगाच जास्त कामात मग्न राहून आपला वेळ वाया घालवण्याऐवजी उद्धाराची मूलभूत सत्ये जाणून घ्या आणि तसे केले नाही तर ताणतणावांनी तुम्ही मोडून पडाल. देवासमोर गढून असण्याच्या या वेळामध्ये तुम्ही त्याच्यामध्ये मुळावलात, त्याच्या आधाराने स्थिर राहिलात काही झाले तरी त्याच्याशी विश्वासू राहाल.

## देवाची इच्छा माझी इच्छा आहे काय?

**"देवाची इच्छा ही आहे की, तुमचे पवित्रीकरण व्हावे..." (१ थेस्सल ४:३).**

पवित्रीकरणात मला पवित्र करण्याची देवाची इच्छा आहे का नाही हा प्रश्नच येत नाही. ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या प्रायश्चित्ताने जे साध्य झाले आहे ते सर्व माझ्या जीवनात घडावे अशी माझी इच्छा आहे काय? येशूने मला पवित्रीकरण व्हावे ही माझी इच्छा आहे? त्याचे जीवन माझ्या मानवी देहातून व्यक्त होऊ देण्यास मी तयार आहे? (पहा १ करिंथ १:३०). "पवित्रीकरण व्हावे यासाठी मी उत्सुक नाही. आपली गरज ओळखा पण इच्छा करणे थांबवा आणि कृती करा. परम विश्वासाने, कोणतीही शंका न धरता आपले पवित्रीकरण व्हावे यासाठी येशू ख्रिस्ताचा स्वीकार करा आणि येशूच्या प्रायश्चित्ताचा मोठा चमत्कार तुमच्यामध्ये प्रत्ययास येईल.

ख्रिस्ताने वधस्तंभवार जे केले त्याच्या आधारे देवाच्या प्रेमळ व विनामूल्य देणगीच्या द्वारे येशूने शक्य केले ते माझे होते आणि तारलेला व पवित्र केलेला आत्मा म्हणून माझी प्रवृत्ती परिपूर्ण विनम्र पवित्रतेची आहे (अहंकारी पवित्रता असे काही मुळीच नाही). या पवित्रतेला तीव्र पश्चात्तापाचा आधार असून त्याच्या बरोबरीने हीनता आणि अत्यंत लाजिरवाणेपणा हेही आहे. त्याचप्रमाणे यातून मला त्याची अजिबात पर्वा नसताना देवाची प्रीती माझ्याठायी प्रकट झाली ही अद्‌भुत जाणीवही आहेच (पहा रोम ५:८). माझे तारण व पवित्रीकरण यांसाठी आवश्यक ते सर्व त्याने पूर्ण केले आहे. "ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करावयाला समर्थ होणार नाही" (रोम ८:३९) असे पौलाने म्हटले त्यात नवल काहीच नाही.

पवित्रीकरणामुळे मी येशू ख्रिस्ताशी एक होतो आणि त्याच्यामध्ये देवाबरोबर एक होतो. हे ख्रिस्ताच्या तेजस्वी प्रायश्चित्तानेच शक्य झाले आहे. येथे परिणाम व कारण यांची सरमिसळ करु नका. ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्याद्वारे केलेल्या प्रायश्चित्ताने माझ्यावर आज्ञापालन करणे, सेवा आणि प्रार्थना आणि पवित्रीकरणाच्या चमत्काराबद्दल अवर्णनीय धन्यवाद आणि पूज्यभाव एवढा प्रभावी परिणाम माझ्यावर झाला आहे.

## भावनावशता का शिष्यपणा

**“प्रियजनहो, तुम्ही तर आपल्या परमपवित्र विश्वासावर स्वतःची रचना करा” (यहूदा २०).**

आमच्या प्रभूने कधी भावनावश होऊन अविचाराने काही केले नाही, जे केले ते शांतपणे केले. आमचे ख्रिस्तीपण आम्ही स्वतःच्या स्वभावाला अनुरुप करुन घेतो. ते देवाला अनुरुप करीत नाही. भावनावश होणे हा लौकिक जीवनाचा कल आहे. आमचा प्रभू त्याकडे नेहमी दुर्लक्ष करतो, कारण त्यामुळे शिष्याच्या जीवनाची प्रगती खुंटते. आपण भावनावश झालो तर देवाचा आत्मा आवर घालतो. मग आम्हांला आमचे मूर्खपण लक्षात येते. आम्ही स्वतःचे समर्थन करु पाहतो. भावनावश होणे लहान मुलाला शोभते पण प्रौढ स्त्री पुरुषामध्ये त्यामुळे अनवस्थाप्रसंग ओढवतो. असे होऊ नये म्हणून स्वतःला शिस्त लावली पाहिजे.

देवाची अलौकिक कृपा हाच शिष्यपणाचा आधार आहे. पाण्यावरुन चालणे धीट व्यक्तीला शक्य आहे पण येशूचा शिष्य म्हणून कोरड्या भूमीवरुन चालणे सर्वस्वी वेगळे आहे. येशूकडे जाण्यासाठी पेत्र पाण्यावरुन चालला पण कोरड्या भूमीवर तो “दुरुनच त्याच्यामागे चालत गेला” (मार्क १४:५४). पेचप्रसंगातून निभावण्यास आम्हांला देवाच्या कृपेची गरज नाही. हा ताण सोसण्यास मानवी स्वभाव आणि अहंकार पुरेसा आहे. परंतु येशूचा शिष्य म्हणून दररोज चोवीस तास सामान्य, उपेक्षित, कष्टमय जीवन जगण्यासाठी, चोवीस तास याप्रकारे टिकून राहण्यासाठी देवाची सर्वश्रेष्ठ कृपाच आवश्यक आहे. आम्ही मोठमोठ्या गोष्टी कराव्या हे आमच्यामध्ये भिनवले आहे पण आम्ही त्या गोष्टी करत नाही. आम्ही सामान्य गोष्टीत असामान्य झाले पाहिजे आणि सर्वसामान्य रस्त्यांवर, सामान्य लोकांच्यामध्ये पवित्र असले पाहिजे परंतु हे काही पाच मिनिटात शिकता येत नाही!

**ऑक्टोबर २२**

## आत्म्याची साक्ष

**"तो आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो..." (रोम ८:१६).**

आम्ही देवाबरोबर सौदेबाजी करण्यापासून सावध राहावे. आम्ही त्याजकडे येतो तेव्हा तो सांगतो ते करण्यापूर्वी आम्हांला आत्म्याची साक्ष हवी असते.

देव तुम्हांला का प्रकट होत नाही? तुम्ही संपूर्ण शरणागती पत्करुन सर्वस्वी त्याच्या अधीन झाला नाहीत, तर तो तुम्हांला प्रकट होणार नाही कारण तुम्हीच त्यातील अडथळा आहा. एकदा तुम्ही हे केले की लगेच देव स्वतःची साक्ष देतो त्याचा स्वतःचा स्वभाव तुमच्यामध्ये व्यक्त होतो. आज्ञापालनातून सत्य उघड होण्यापूर्वीच तुम्हांला आत्म्याची साक्ष मिळाली तर ती केवळ भावविवश भावनाच असते. परंतु तुम्ही तारणाच्या आधारे कार्य केलेत आणि देवाबरोबर वाद करण्याचा घाट घालून त्याचा अनादर थांबवलात तर लगेच स्वतःची साक्ष देतो. तुम्ही स्वतःची तर्कटे व प्रतिपादने थांबवा की लगेच देव आपण केले त्याची साक्ष देईल आणि त्याला तिष्ठत ठेवून त्याचा अपमान केल्यामुळे तुम्ही खंत कराल. देव पापापासून सुटका करील का नाही असा विचार केलात तर एकतर त्याला ते करु द्या अगर हे तुला जमणार नाही हे स्पष्टपणे सांगा. दुसऱ्या व्यक्तींच्या साक्षींचा आधार देऊ नका. मत्तय ११:२८ मधील आज्ञा पाळा, "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या..." तुम्ही थकला असाल तर या आणि आपण वाईट आहोत हे माहीत आहे तर मागा (पहा लूक ११:९–१३).

आमच्या प्रभूच्या उद्धाराला देवाचा आत्मा साक्ष आहे. तो इतर कशाची साक्ष देत नाही. तो आमच्या बुद्धीला साक्ष देत नाही. सामान्य बुद्धीने केलेले निर्णय पवित्र आत्म्याची साक्ष आहे असे आपण समजतो. पण आत्मा केवळ त्याच्या स्वतःच्या स्वभावाला आणि तारणाच्या कार्याला साक्ष देतो. तो आमच्या बुद्धीला कधीच साक्ष देत नाही. तसा प्रयत्न आपण केला तर आपण अंधारात राहू. सर्व सोडून त्याच्यावर विश्वास ठेवा. तो तुम्हांला आत्म्याची साक्ष देईल.

**ऑक्टोबर २३**

## जुन्या जीवनातील काहीच नाही!

**"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे" (२ करिंथ ५:१७).**

आमचा प्रभू आमचे पूर्वग्रह कधीच सहन करत नाही. तो त्यांना ठार करतो. आम्हांला वाटते आमचे विशिष्ट पूर्वग्रह देव तसेच ठेवील कारण त्याला दुसऱ्यांच्याकडे लक्ष द्यायचे आहे असे म्हणतो. आपण स्वतःशी म्हणतो, "दुसऱ्या लोकांचा समाचार घ्यायचा आहे पण माझे पूर्वग्रह ठीक आहेत हे तो जाणून आहे!" पण देव जुन्या जीवनातील काहीच स्वीकारत नाही. आमचे पूर्वग्रहही तो काढून टाकीत असतो. त्याच्या नैतिक तरतुदीनुसार आमचे पूर्वग्रह मारले जाताना पाहणे हाही आमच्या नैतिक शिक्षणाचा भाग आहे. आम्ही देवाकडे आणतो ते तो घेत नाही. त्याला आमचे संपूर्ण समर्पण हवे असते.

आमचा नवा जन्म झाला की पवित्र आमच्यामध्ये आपले सृजनाचे कार्य सुरु करतो. जुन्या जीवनातील काहीही उरणार नाही. आमची जुनी निराशेची प्रवृत्ती जाते. जुन्या गोष्टी आम्हांला रुचत नाहीत "सर्व गोष्टी देवाच्या असतात" (५:१८). वासना, स्वार्थ नसलेले आणि दुसऱ्यांच्या निंदेने रंजीस न येणारे जीवन आम्हांला कसे मिळेल? "गैरशिस्त न वागणारे, परोपकारी, स्वार्थ न पाहणारी "अशी प्रीती कोठे मिळेल?" (१ करिंथ १३:४—५ पहा). यासाठी जुन्या जीवनातील काहीही उरु न देणे आणि देवावर सरळ पूर्णपणे भरंवसा ठेवणे. यात देवाकडून आशीर्वादांची नव्हे तर खुद्द देवाची इच्छा करावी. देव कार्य करताना आपण पाहिले की मग आपण कसलीच चिंता करत नाही कारण आम्ही खरोखर आमच्या स्वर्गातील पित्यावर भरंवसा ठेवून असतो. जग त्याला पाहू शकत नाही.

**ऑक्टोबर २४**

## यथार्थ दृष्टीकोन

**“जो देव आम्हांस सर्वदा ख्रिस्ताच्या ठायी जयोत्सवाने नेतो...त्याची स्तुती असो” (२ करिंथ २:१४).**

जवळजवळ उच्च नव्हे तर सर्वस्वी उच्चतेप्रत जावे हेच देवाच्या सेवकाचे रास्त उद्दिष्ट असावे. देवाचा दृष्टीकोन उत्साहाने अंगिकारावा व टिकवावा यासाठी जागरुक असा आणि हे एकच दिवस नव्हे तर दररोज थोडे थोडे करायचे आहे. मर्यादित चाकोरीत विचार करणे सोडा. योग्य, यथार्थ दृष्टीकोनाला कोणतीही बाह्य शक्ती स्पर्श करु शकत नाही.

आम्ही ख्रिस्ताच्या विजयी मिरवणुकीत कैदी म्हणून चालत आहोत हीच यथार्थ विचारदृष्टी राखली पाहिजे. आम्ही काही देवाच्या संग्रहातील प्रदर्शनीय वस्तू नाही. आम्ही फक्त एकच गोष्ट दाखवण्यासाठी येथे आहो, “ख्रिस्ताच्या आज्ञापालनासाठी आमचे जीवन अंकित केले आहे” (पहा २ करिंथ १०:५). यापुढे इतर सर्व विचार किती क्षुद्र आहेत! उदाहरणार्थ, हे विचार, “मी एकटाच ख्रिस्तासाठी लढतो आहे!” किंवा “ख्रिस्ताच्या ध्येयासाठी मलाच झगडले पाहिजे. त्याचा गड मलाच सुरक्षित ठेवायचा आहे.” पण पौलाने थोडक्यात असे म्हटले, “मी विजयी वीराच्या मिरवणुकीत चालतो आहे!” हा विचार प्रत्यक्षात आमच्यामध्ये उतरला आहे? देवाने आपल्याला येशू ख्रिस्ताविरुद्ध बंड करणारा म्हणून कैद केले आहे यातच पौलाला आनंद आहे. याशिवाय स्वर्गात आणि पृथ्वीवर त्याला दुसरे काहीच प्रिय नाही. ख्रिस्ती माणसाने विजय मिळाल्याच्या वल्गना करणे लाजिरवाणे आहे. आम्ही सर्वस्वी जिंकणाऱ्या वीराचे असावे. विजय आमचा नव्हे तर त्याचाच आहे आणि “त्याच्याद्वारे महाविजयी ठरतो...” (रोम ८:३७). “... आम्ही देवाला संतोषदायक असा ख्रिस्ताचा परिमल आहो” (२ करिंथ २:१५). येशूच्या मधुर सुगंधाने वेढलेले आहो आणि आम्ही जाऊ तेथे देवाला संतोष देणारे होतो.

**ऑक्टोबर २५**

## परमेश्वराच्या उद्देशाच्या अधीन होणे

**“मी सर्वांना सर्वकाही झालो आहे, अशा हेतूने की, मी सर्व प्रकारे कित्येकांचे तारण साधावे” (१ करिंथ ९:२२).**

अगदी सामान्य, अर्थहीन गोष्टींच्या पसाऱ्यात अतिमोलवान आणि उत्कृष्ट असा देवाचा सेवक स्त्री किंवा पुरुष कसा व्हावे हेच ख्रिस्ती कार्यकर्त्याने शिकले पाहिजे. “मी दुसरा कोणी तरी असायला हावे होतो” अशी कुरकूर करु नका. देवाचे सर्वच लोक सामान्य असतात. देव त्यांना नेमून देतो त्या उद्देशामुळे ते असामान्य होतात. आमच्या बुद्धीने मनामध्ये आणि प्रीतीने अंतःकरणामध्ये योग्य उद्दिष्ट नसेल तर आम्ही देवाला उपयोगी पडणार नाही. आम्ही निवड करुन देवाचे सेवक झालो नाही. अनेक लोक देवाचे सेवक होण्याचे ठरवतात; पण त्यांच्यामध्ये देवाच्या सर्वसमर्थ कृपेचे उद्दिष्ट अगर त्याचे शक्तिशाली वचन नसते. येशू ख्रिस्त जे करण्यासाठी आला त्या महान उद्देशाने पौलाचे संपूर्ण अंतःकरण मन आणि आत्मा हे सर्व व्यापले होते. या एका गोष्टीवरुन त्याचे लक्ष कधी ढळले नाही. आपणही सतत “... वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त” ही वस्तुस्थिती सतत समोर ठेवावी” (१ करिंथ २:२).

“मी तुम्हांस निवडले आहे...” (योहान १५:२६). तुमच्या ईश्वरज्ञानामध्ये या शब्दांची स्मृती सतत जागृत ठेवा. तुम्ही देव मिळवला नाही देवाने तुम्हांला मिळवले आहे. देव आपल्या मर्जीस येईल त्याप्रमाणे वाकवणे, मोडणे, आकार देणे करत असतो. तो हे का बरे करतो? यात “हा माझा मी निवडलेला मनुष्य, ही मी निवडलेली स्त्री आहे” असे म्हणता यावे हाच त्याचा उद्देश आहे. आम्ही देवाच्या हाती असले पाहिजे म्हणजे त्याने आम्हांला ठेवले तसे आणखी दुसऱ्यांना येशू ख्रिस्त ह्या खडकावर ठेवता येईल.

सेवक होण्याची निवड करु नका. पण देवाने तुम्हांला पाचारण केले की मग “... उजवी डावीकडे वळू नका.” बहकलात (अनु २८:१४). तर तुमचे वाईट होणारच. पाचारण होण्यापूर्वी त्याने केले नाही ते आता करील.

**ऑक्टोबर २६**

## मिशनरी कोण आहे?

**“येशू पुन्हा त्यांना म्हणाला, जसे पित्याने मला पाठविले आहे तसे मीही तुम्हांला पाठवितो” (योहान २०:२१).**

येशूला देवाने पाठवले तसे येशू ख्रिस्त ज्याला पाठवतो त्याला मिशनरी म्हटले आहे. यात लोकांच्या गरजा नाहीत तर येशूची आज्ञा महत्त्वाची आहे. देवासाठी सेवा करताना आमच्या प्रेरणेचा स्रोत आमच्यापुढे नसून मागे आहे. आज प्रेरणास्रोत आणि इतर सर्व समोर ठेवण्याची प्रवृत्ती आहे आणि ते सर्व मिळून आमच्या यशाची व्याख्या आम्ही करु पाहतो. नव्या करारामध्ये स्वतः प्रभू येशू हा प्रेरणास्रोत असून तो आमच्या मागे आहे. त्याच्या योजनांप्रमाणे करणे हाच उद्देश आहे.

प्रभू येशू आणि त्याची दृष्टी ह्यांना व्यक्तीशः जडून राहणे महत्त्वाचे आहे. मिशनरी कार्यात देवाचे पाचारण एकीकडे ठेवून लोकांच्या गरजांना महत्त्व देण्याचा धोका संभवतो. या गरजांकडे सर्व लक्ष दिल्याने येशूने पाठवले हा अर्थ कोपऱ्यात पडतो. गरजा प्रचंड आहेत की त्या पुरे करण्यास मानसिक शक्ती अपुरी पडते. सर्व मिशनरी कार्याचा उद्देश लोकांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे शिक्षण, त्यांच्या गरजा हा नसून “जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा...” ही येशू ख्रिस्ताची आज्ञा पूर्ण करणे हाच उद्देश आहे (मत्तय २८:१९).

देवाच्या स्त्रीपुरुषांची चरित्रे पाहिली तर सर्वच म्हणतात, “अहाहा, किती त्यांचे शहाणपण, देवाची इच्छा त्यांना पूर्णपणे समजली होती!” पण त्यांचे सक्षम मन, सुज्ञान हे मानवी नसून दिव्य होते. देवाच्या दिव्य मार्गदर्शनाला श्रेय देण्याऐवजी आम्ही मानवी ज्ञानाची स्तुती करतो! बालसुलभ वृत्तीच्या, देवाच्या सुज्ञानावर भरंवसा ठेवणाऱ्या “मूर्ख“ लोकांच्यामधूनच देवाचे सामर्थ्य प्रकट होते.

## मिशनसंस्थांची कार्यपद्धती

**“तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा ...” (मत्तय २८:१९).**

“जा आणि आत्म्यांचे तारण करा,” असे येशू ख्रिस्ताने म्हटले नाही. (आत्म्यांचे तारण हे देवाचे अलौकिक कार्य आहे). “जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा,” असे त्याने म्हटले. तुम्ही स्वतः शिष्य असलात तरच तुम्ही शिष्य करु शकाल. पहिल्या मिशन सेवेवरुन माघारी आल्यावर त्यांना फार आनंद झाला होता कारण, भुते त्यांना वश झाली होती. येशूने त्यांना सांगितले, “सेवा यशस्वी झाली त्यात आनंद मानू नका. तुमचे माझ्याशी योग्य नाते आहे याचाच आनंद माना!” (पहा लूक १०:१७–२०). देवाच्या पाचारणाला चिकटून राहणे हेच मिशनरीसाठी अति आवश्यक आहे. स्त्रीपुरुषांना येशूचे शिष्य करणे हाच आपला एकमेव उद्देश आहे. आत्मे जिंकण्याचा उत्साह देवाकडून येत नाही तर आमच्या दृष्टीकोनाला अनुरुप असे लोक मिळवण्याच्या इच्छेतून तो उत्साह येतो.

लोकांना तारणाप्रत आणणे अवघड आहे मागे गेलेल्या लोकांना पुन्हा ख्रिस्ताकडे आणणे कठीण आहे अगर उपेक्षेचा अडसर आहे हे मिशनरीला आव्हान नाही. मिशनरीचे येशू ख्रिस्ताशी असलेले व्यक्तिगत नाते हेच आव्हान आहे. “हे करावयास मी समर्थ आहे असा तुम्ही विश्वास धरिता काय?” (मत्तय ९:२८). आमचा प्रभू स्पष्टपणे हा प्रश्न आम्हांला विचारतो. पुन्हा उठलेल्या माझ्या प्रभूला मी ओळखतो काय? हेच मोठे आव्हान आहे. अंतरंगात वसणाऱ्या त्याच्या आत्म्याचे सामर्थ्य मी जाणतो? देवाच्या दृष्टीने मी शहाणा पण जगाच्या शहाणपणानुसार मूर्ख आहे? येशू ख्रिस्ताने सांगितले त्यावर भरंवसा ठेवतो? ख्रिस्त येशूवरील अमर्याद विश्वासाचे अलौकिक स्थान मी टाकले आहे? खरे तर तेच देवाचे पाचारण आहे. आमच्या प्रभूने सांगितलेल्या, “स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे... तेव्हा जाऊन...” (मत्तय २८:१८–१९) या पद्धतीशिवाय दुसरी पद्धत घेतली आहे?

## ऑक्टोबर २८

### विश्वासाने नीतिमान

**“कारण आपण शत्रू असता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्युद्वारे आपला समेट झाला, तर आता समेट झालेला असता त्याच्या जीवनाने आपण विशेषेकरुन तारले जाणार आहो” (रोम ५:१०).**

विश्वास ठेवल्याने माझे तारण होत नाही. विश्वास ठेवल्याने माझे तारण झाल्याचे समजते. पश्चात्तापाने माझे तारण होत नाही. देवाने ख्रिस्त येशूच्या द्वारे जे केले आहे ते मला समजते याची पश्चत्ताप ही खूण आहे. येथे कारणापेक्षा परिणामावर भर देण्याचा धोका आहे. माझे आज्ञापालन, पवित्रीकरण आणि समर्पण यांमुळे मी देवाबरोबर सरळ होतो का? असे होत नाही. या सर्वांच्या पूर्वी येशू मरण पावला त्यामुळेच मी देवाबरोबर सरळ झालो आहे. देवाकडे वळून मी देवाने प्रकट केलेले विश्वासाने स्वीकारतो; तेव्हा ख्रिस्ताच्या वधस्तंभाने केलेल्या अद्‌भुत प्रायश्चित्ताने लगेच माझे देवाबरोबर रास्त नाते जुळते. देवाच्या कृपेच्या अद्‌भुत चमत्काराने मी नीतिमान ठरतो. माझ्या पापाबद्दल मला दुःख वाटले, मी पश्चात्ताप केला यामुळे नव्हे तर ख्रिस्ताने जे केले आहे त्यामुळेच मी नीतिमान ठरतो. देवाचा आत्मा तेजस्वी, भेदक प्रकाशातून नीतिमान ठरतो. देवाचा आत्मा तेजस्वी, भेदक प्रकाशातून नीतिमान ठरवतो. माझे तारण झाल्याचे मला समजते पण ते कसे साध्य झाले ते समजत नाही.

देवाकडून येणारे तारण मानवी तर्कावर नव्हे तर येशूच्या प्रायश्चित्तार्पणात्मक मृत्यूवर आधारले आहे. आमच्या प्रभूच्या प्रायश्चित्तानेच आमचा नवा जन्म होऊ शकतो. पापी स्त्रिया आणि पुरुष हे त्यांच्या पश्चात्ताप अगर विश्वास यांच्यामुळे नव्हे तर आमच्या सर्व अनुभवांच्या पूर्वीच देवाने ख्रिस्त येशूमध्ये केलेल्या कार्यामुळे नवी उत्पत्ती होऊ शकतात (पहा २ करिंथ ५:१७–१९). नीतिमत्त्व आणि पवित्रीकरण यांच्यातील अजिंक्य सुरक्षितता स्वतः देवच आहे. या गोष्टी आम्हांला कराव्या लागत नाही. ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील प्रायश्चित्ताने हे सर्व साध्य झाले आहे. देवाच्या चमत्काराच्या द्वारे अलौकिक ते लौकिक होते, कारण देवाचा चमत्कार *“पूर्ण झाले आहे”* (योहान १९:३०) याचा प्रत्यय येतो.

ऑक्टोबर २९

## बदली

**“ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे” (२ करिंथ ५:२१).**

आमच्याविषयी वाटणाऱ्या सहानुभीतीने येशू आमच्या पापांसाठी मरण पावला हा येशूच्या मरणाविषयी आधुनिक विचार आहे. पण सहानुभीतीच्या पोटी नव्हे तर आमच्याशी समरुप झाल्याने त्याने आमचे पाप स्वतःवर घेतले. “त्याला आमच्यासाठी... पाप असे केले.” ... येशूच्या मरणाने आमची पापे नाहीशी झाली कारण त्याने आपल्या पित्याच्या आज्ञा पाळल्या. यात सहानुभूतीचा प्रश्नच नाही. आम्ही आज्ञा पाळल्या, वाईट गोष्टी सोडण्याचे वचन दिले म्हणून नव्हे तर ख्रिस्ताचे मरण याच कारणाने आम्ही देवाला मान्य झालो आहो. आपण म्हणतो देवाचे पितृत्व आणि प्रेमळपणा प्रकट करण्यासाठी येशू ख्रिस्त आला; परंतु तो “जगाचे पाप हरण करण्यासाठी आला” असे नवा करार सांगतो (योहान १:२९) आणि ज्यांना “तारणारा” अशी येशू ख्रिस्ताची ओळख दिली आहे त्यांना तो देवाचे पितृत्व प्रगट करतो. जगाशी बोलताना येशू ख्रिस्ताने स्वतःला कधी पित्याला प्रकट करणारा म्हटले नाही पण अडखळण होण्याविषयी तो बोलला (पहा योहान १५:२२–२४). “ज्याने मला पाहिले त्याने पित्याला पाहिले आहे” (योहान १४:९). हे तो शिष्यांशी बोलला.

ख्रिस्ताने माझ्यासाठी मरण सोसले, म्हणून आता मी शिक्षेपासून सर्वस्वी मुक्त आहे हे नव्या करारात कुठेच शिकवलेले नाही. “तो सर्वांसाठी मरण पावला” (२ करिंथ ५:१५). हे तेथे शिकवले आहे. “माझे मरण तो मेला” असे सांगितलेले नाही. त्याच्या मरणाशी समरुप झाल्याने मला पापापासून मुक्त होता येते आणि देणगी म्हणून त्याचे नीतिमत्व मला मिळते. बदली विषयीचे नव्या करारातील शिक्षण दुहेरी आहे. “ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्या करता पाप असे केले, ह्यासाठी की, आपण त्याच्याठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे” (आणखी पहा गलती ४:१९).

**ऑक्टोबर ३०**

## विश्वास

**“विश्वासावाचून त्याला ‘संतोषविणे’ अशक्य आहे” (इब्री ११:६).**

सामान्यज्ञानाला प्रत्यक्ष विरोध करणारा विश्वास अनाठायी उत्साह आणि संकुचित मनोवृत्ती आहे. विश्वासाला विरोध करणारे सामान्यज्ञान हे सत्याला आधार म्हणून बुद्धीवर अनाठायी विसंबणे आहे. विश्वासाच्या जीवनातून या दोहोंचा यथार्थ संबंध जोडला आहे. सामान्यज्ञान आणि विश्वास हे दोन्ही लौकिक जीवन आणि आत्मिक जीवन यांच्याप्रमाणे सर्वस्वी भिन्न भिन्न आहेत उत्स्फूर्तपणा आणि प्रेरणा यांतील फरकासारखा हा फरक आहे. येशू ख्रिस्त सामान्य रीतीने बोलला, सामान्य ज्ञान येथे उणे पडते. परंतु विश्वास तुमच्या जीवनात वास्तव होण्यापूर्वी तो पारखून कसास लावला पाहिजे. “परंतु आपल्याला ठाऊक आहे की,... सर्व गोष्टी मिळून कल्याणकारी होतात” (रोम ८:२८). काही झाले तरी पालट करणारी देवाची शक्ती परिपूर्ण विश्वास सत्यतेत पालटते. आपल्या मुलांच्या जीवनात परिपूर्ण विश्वास वास्तवात यावा हा देवाचा उद्देश असल्याने विश्वास नेहमी व्यक्तिगत रीतीने कार्य करतो.

देव कसा आहे त्याविषयी आमचा विश्वास आमच्या प्रत्यक्ष अनुभवातून सिद्ध करता येतो. विश्वास कृतीशील तत्व असून ते येशू ख्रिस्ताला आद्य स्थान देते. विश्वासाचे जीवन म्हणते, “हे प्रभू, तू म्हणतोस ते विसंगत वाटले तरी तुझ्या वचनावर भरंवसा ठेवून मी पुढे जात आहे” (पहा मत्तय ६:३३). बुद्धिवादी विश्वास वैयक्तिक करणे यासाठी कधी कधी नव्हे तर नेहमीच संघर्ष करावा लागतो. आमच्या विश्वासाचा विषय नेहमी खरा करणे ही त्याची रीतच आहे तेव्हा आमच्या विश्वासाला शिक्षण देण्यासाठी देव आम्हांला विशिष्ट परिस्थितीत आणतो. येशूची ओळख होईपर्यंत आम्हांला देव ही केवळ संकल्पना असते आणि त्यावर आम्हांला विश्वास ठेवता येत नाही. परंतु “ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे” (योहान १४:९). हे येशूचे शब्द कानी पडताक्षणी आम्हांला काही वास्तव मिळते आणि आमचा विश्वास अमर्याद होतो. येशू ख्रिस्ताच्या आत्म्याच्या सामर्थ्याच्या द्वारे परमेश्वराबरोबर योग्य संबंध ठेवणारी संपूर्ण व्यक्ती विश्वास आहे.

**ऑक्टोबर ३१**

## विश्वासाची परीक्षा

**"जर तुम्हांमध्ये मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असला तर... तुम्हांला काहीच असाध्य नाही" (मत्तय १७:२०).**

आमच्या विश्वासामुळे देव आम्हांला प्रतिफळ देतो असे आम्हांला वाटते. आरंभी हे खरे असेलही. पण विश्वासामुळे काही मिळत नाही. विश्वासाने आमचे देवाशी योग्य नाते जुळते आणि त्याला कार्य करण्याची संधी मिळते. तथापि देवाबरोबर संबंध यावा यासाठी तुमच्या अनुभवाला धक्का देणे गरजेचे असते. जीवन विश्वासावर आधारले आहे, ते भावनावश होऊन देवाचे आशीर्वाद अनुभवत बसण्यासाठी नाही. हे तुम्ही शिकले पाहिजे. आरंभी तुमचे विश्वासाचे जीवन संकुचित आणि प्रखर होते. भावना आणि विश्वास ही दोन्ही त्यात समान होती. ते प्रकाश आणि मधुरता ह्यांनी भरलेले होते. मग "विश्वासाने कसे चालावे" ते शिकवण्यासाठी देवाने आपला आशीर्वाद काढून घेतला (२ करिंथ ५:७). तुमच्या उत्साही साक्षीने आनंदमय झालेल्या दिवसात तुमचे मोल होते त्यापेक्षा आज ते अनेकपटीने अधिक झाले आहे.

विश्वासाची पारख होऊन तो कसास लागला पाहिजे. आम्हांला देवावर भरंवसा ठेवणे अवघड होणे ही विश्वासाची परीक्षा नाही तर देव विश्वासपात्र आहे ही मनोमन खात्री पटणे हीच परीक्षा आहे. विश्वास वास्तवात येताना अखंड एकांतवास सोसावा लागतो. विश्वासाची पारख आणि जीवनातील शिस्त यांची गल्लत करु नका. विश्वासाची परीक्षा हा जिवंत असण्याचा अटळ परिणाम आहे. "देवाने काही केले तरी मी देवाच्या स्वभावाशी प्रामाणिक राहीन. संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये विश्वासाचे सर्वश्रेष्ठ व सर्वोच्च विधान हे आहे, "तो मला ठार मारणार तरी मी त्याची आस धरीन" (ईयोब १३:१५).

**नोव्हेंबर १**

## “तुम्ही स्वतःचे मालक नाही”

**“तुम्हांस ठाऊक नाही काय? आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही” (१ करिंथ ६:१९).**

या जगामध्ये खासगी जीवन अगर लपून बसण्याची जागा नाहीच. येशू ख्रिस्ताचे क्लेश माहीत असून त्याच्या दुःखात सहभागी होणाऱ्या स्त्री पुरुषांच्या बाबतीत हे विशेषेकरुन प्रत्ययास येते. देव आपल्या पवित्रजनांच्या जीवनाचे विभाजन करुन ते एका बाजूस जगासाठी महामार्ग करतो आणि दुसऱ्या बाजूस स्वतःसाठी करतो. येशू ख्रिस्ताशी समरुप झाल्याशिवाय हे कोणालाही सोसवत नाही. आमचे पवित्रीकरण स्वतःसाठी नाही. सुवार्तेशी जवळीक साधण्यास आम्हांला पाचारण केले आहे आणि घडणाऱ्या गोष्टींचा आमच्याशी काही संबंध नसतो. देव आम्हांला स्वतःबरोबर सहभागितेत आणत आहे. त्याला त्याच्या मनाप्रमाणे करु द्या. तुम्ही नकार दिलात तर देवाला तुमचे महत्त्व उरणार नाही. जगामधील त्याच्या उद्धारकार्यात तुम्हांला वाटा नाही. तुम्ही केवळ अडखळण व्हाल.

सर्वप्रथम देव आम्हांला वास्तवाच्या आणि सत्यतेच्या भक्कम पायावर स्थिर करील. आमच्या स्वतःच्या काळज्या त्याच्या उद्धार कार्याच्या उद्देशाला समर्पित करीपर्यंत तो आम्हांला वळण लावील. अंतःकरण भग्न होण्याचा अनुभव आम्हांला का येऊ नये? त्या दरवाजांमधून देव आपल्या पुत्राबरोबर सहभागिता साधण्याचे मार्ग प्रशस्त करतो आहे. वेदनेच्या पहिल्याच कळीने आपणांपैकी बहुतेक जण गळाठतात. आम्ही हताश होऊन देवाच्या उद्देशाच्या दारात बसतो आणि आत्मदयेच्या द्वारे हळूहळू मरणाच्या दारात पडतो. सर्व तथाकथित ख्रिस्ती सहानुभूती आम्हांला मृत्यूशय्येवर पोचवते. पण देव तसे करत नाही. तो आपल्या पुत्राचा खिळयाचा वण असलेला हात पुढे करतो आणि जणू म्हणतो, “माझ्याबरोबर सहभागितेत ये. ऊठ, प्रकाशमान हो.” भंगलेल्या हृदयाच्या द्वारे देव या जगामध्ये आपले उद्देश सिद्धीस नेतो तर आपले हृदय भग्न केल्याबद्दल त्याचे उपकार का मानत नाही?

## नोव्हेंबर २

### आज्ञापालन का स्वतंत्रता

**“माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल” (योहान १४:१५).**

आम्ही आज्ञा पाळाव्या यासाठी आमचा प्रभू आग्रही नाही. आम्ही काय करावे ते तो निश्चितपणे सांगतो. पण ते केलेच पाहिजे याविषयी त्याची सक्ती नाही. त्याच्याबरोबर आत्म्याच्या एकपणामुळे आम्हांला त्याची आज्ञा पाळली पाहिजे. म्हणूनच आमच्या प्रभूने शिष्यत्वाविषयी नेहमी “जर तर” च्या भाषेत सांगितले. म्हणजे “तुमची हे करण्याची इच्छा असली तर हे करा.” इच्छा नसेल तर करु नका. “जर कोणी माझ्यामगे येऊ पाहतो तर त्याने आत्मत्याग करावा...” (लूक ९:२३). म्हणजेच “माझा शिष्य होण्यासाठी आपल्या स्वतःवरचा हक्क मला अर्पण केला पाहिजे.” आमचा प्रभू आमच्या सार्वकालिक स्थानाविषयी बोलत नाही तर येथे व आताच त्याला आता उपयोगी पडण्याविषयी बोलत नाही, तर तेथे व आताच त्याला आता उपयोगी पडण्याविषयी बोलत आहे. याच कारणाने तो एवढ्या कठोरपणे बोलतो (पहा लूक १४:२६). हे शब्द बोलणाऱ्यापासून वेगळे करुन त्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करु नका.

प्रभूने आम्हांला नियम दिलेले नाहीत. पण त्याने आपले मापदंड स्पष्ट केले आहेत. माझे त्याचे नाते प्रीतीचे असेल तर तो सांगेल ते मी कां कू न करता लगेच करीन. मी हायगय केली तर मी त्याच्या जोडीला दुसरा कोणी प्रेमविषयी ठेवला असून तो मीच आहे! येशू ख्रिस्त माझ्यावर आज्ञापालनाची सक्ती करणार नाही. तरीपण मला आज्ञा पाळणे भाग आहे. जेवढ्या लवकर मी आज्ञा पाळीन तेवढ्या लवकर माझे आत्मिक भवितव्य मी पूर्ण करीन. माझे वैयक्तिक जीवन लहानसहान किरकोळ घटनांनी भरलेले असेल पण जीवनाच्या सामान्य परिस्थितीत येशू ख्रिस्ताच्या आज्ञा पाळल्या तर त्यायोगे मला देवाच्या मुखाचे दर्शन होते. पुढे मी देवासमोर उभा राहीन तेव्हा माझ्या आज्ञापालनाने हजारो लोकांना आशीर्वाद मिळाल्याचे मला समजेल. देवाच्या तारणाने मानवी आत्मा आज्ञापालनाप्रत येतो. येशू ख्रिस्ताचे आज्ञापालन केले तर देवाच्या तारणाचा प्रवाह माझ्यामधून दुसऱ्यांच्या जीवनापर्यंत पोचतो कारण आज्ञापालनाच्या मागे सर्वसमर्थ देवाची सत्यता आहे.

**नोव्हेंबर ३**

## येशूचा दास

**“मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो...” (गलती २:२०).**

या शब्दांनी माझे स्वातंत्र्य संपते, मोडते आणि प्रभू येशूच्या सर्व श्रेष्ठतेला माझे जीवन शरण जाते. हे दुसरे कोणी माझ्यासाठी करणार नाही, ते माझे मलाच केले पाहिजे. या टप्प्यावर देव मला वर्षभर दररोज एकूण तीनशे पासष्ट वेळा स्वतंत्र करील. पण तो मला त्यात पुढे पाठवणार नाही. माझ्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे बाह्य कवच मोडले पाहिजे. माझा स्वभाव त्याच्याशी एकरुप होण्यास सामावतो. माझ्या कल्पना बाजूस ठेवून सर्व निष्ठा येशूला समर्पण करायची. या टप्प्यावर आल्यावर गैरसमजाला जागा उरत नाही. ख्रिस्तावरील निष्ठा, आणि “... माझ्यामुळे” (मत्तय ५:११) या येशूच्या शब्दाचा अर्थ जाणणारे फारच थोडे आहेत. हे जाणल्यानेच पवित्रजन दृढ होतो.

माझे स्वातंत्र्य मोडणे पूर्ण झाले आहे? इतर सर्व गोष्टी धार्मिक कपट, फसवेगिरी आहे. मी ते सोडून देईन का? हाच कळीचा प्रश्न आहे. मी येशू ख्रिस्ताला शरण जाईन काय? हे मोडणे कसे होईल याचा विचार न करता विनाअट समर्पित होईन काय? माझ्या स्वतःच्या समजुतीपासून मला ओढून काढले पाहिजे. या टप्प्यावर आलो की लगेच येशू ख्रिस्ताबरोबर अलौकिक समरुपता साध्य होते. “मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे...” ही देवाच्या आत्म्याची साक्ष स्पष्टपणे प्रत्ययास येते.

ख्रिस्तीपणाचा उत्साही आवेश आपले स्वतःचे हक्क सोडून येशू ख्रिस्ताचा दास झाल्याने येतो हे करीपर्यंत मी पवित्रजन होणारच नाही.

## सत्याचा अधिकार

**"देवाजवळ या म्हणजे तो तुम्हाजवळ येईल" (याकोब ४:८).**

देवाच्या सत्यानुसार निर्णय घेण्याची संधी आपण लोकांना देणे आवश्यक आहे. ही जबाबदारी वैयक्तिक आहे. दुसऱ्यासाठी तुम्ही निर्णय करु शकत नाही. ही कृती त्याने स्वतः केली पाहिजे सुवार्ता संदेशाने तो कृती करण्यास प्रवृत्त झाला पाहिजे. कृती करण्याचे नाकारण्याने ती व्यक्ती दुर्बल होऊन जागीच राहते. पण त्याने कृती केली की तो बदलतो, देवाच्या आत्म्याकडून खातरजमा झालेले अनेकजण सत्य मूर्खपण आहे असे समजून गोंधळात राहतात. एकदा मी कृती केली की लगेच माझे जगणे सुरु होते. याहून कमी ते केवळ पोकळ अस्तित्व आहे. मी माझ्या सर्व शक्तिनिशी, इच्छेसह कार्य करतो त्याच काळात मी जगात असतो.

देवाचे सत्य तुमच्या आत्म्याला समजले की त्यानुसार लगेच कृती करा. ही कृती बाह्य जीवनात झाली पाहिजे असे नाही. तुमच्या अंतरंगात इच्छेने कृती करा. ती तुमच्या जीवनात सामावून घ्या. अगदी अशक्त पवित्रजनाने येशू ख्रिस्ताबरोबर अशी कृती केली की लगेच देवाचे सामार्थ्य त्याला मिळते. आम्ही देवाच्या सत्याप्रत येतो. आमच्या चुका कबूल करतो आणि पुन्हा माघारी जातो. मग पुन्हा पुढे येतो, मागे जातो. मागे जाण्याची गरज नाही हे समजेपर्यंत हे असेच मागे पुढे जाणे येणे सुरुच राहते. आमच्या उद्धारकर्त्या प्रभूपासून सत्याचे वचन ऐकल्यावर लगेच कृती केली पाहिजे. "... माझ्याकडे या..." (मत्तय ११:२८). तो "या" म्हणतो त्याचा अर्थ आहे "कृती करा." पण येणे हेच आम्हांला नकोसे असते. पण येणाऱ्या प्रत्येकाला समजते की लगेचच देवाच्या देहाची आणि सैतानाची शक्ती आता नाकाम होते. हे तुमच्या कृतीने होत नाही तर तुमच्या कृतीने तुम्ही देवाशी संयुक्त झाला आहा आणि तुम्हांला त्याची तारणदायी शक्ती मिळाली आहे.

## त्याच्या दुःखांचे वाटेकरी

**"... ज्याअर्थी तुम्ही ख्रिस्ताच्या दुःखांचे वाटेकरी झाला आहा त्याअर्थी आनंद करा" (१ पेत्र ४:१३).**

देवाला तुमचा उपयोग करुन घ्यायचा असेल तर व्यक्तिशः तुमच्यासाठी नसलेल्या अनेक अनुभवांमधून नेईल. तुम्ही त्याला उपयुक्त व्हावे आणि दुसऱ्यांच्या जीवनात काय घडते ते तुम्हांला दिसावे हाच यात उद्देश आहे. या प्रक्रियेमुळे तुमच्या जीवनात काहीही आले तरी त्याचे आश्चर्य नाही. तुम्ही म्हणता, "मला त्या व्यक्तीबरोबर काम करता येत नाही." पण कारण काय? त्या समस्येविषयी सर्वकाही शिकण्यासाठी देवाने पुरेशी संधी दिली होती; पण तुम्ही तिकडे दुर्लक्ष केलेत कारण या प्रकारे वेळ खर्च करणे तुम्हांला मूर्खपणाचे वाटले.

ख्रिस्ताची दुःखे सामान्य लोकांची नव्हती. "त्याने देवाच्या इच्छेनुसार दुःख सोसले" (१ पेत्र ४:१९). दुःखाकडे पाहण्याची त्याची दृष्टी आमच्याहून वेगळी होती. आमचे येशू ख्रिस्ताबरोबर नाते आहे त्यामुळेच देव आमच्याबरोबर असा का वागतो ते आम्हांला समजते. दुःखाच्या बाबतीत सांगायचे तर त्या मागचा देवाचा उद्देश जाणून घेणे आमच्या ख्रिस्ती संस्कृतीचा भाग आहे. ख्रिस्ती मंडळीच्या इतिहासात येशू ख्रिस्ताच्या क्लेशांबरोबर समरुप होण्याचे टाळण्याची प्रवृत्ती आहे. लोक देवाच्या आज्ञा आपल्या मनाच्या जवळच्या मार्गाने पाळतात. देवाचा मार्ग हा नेहमीच दुःखाचा, क्लेशाचा "लांबचा मार्ग" आहे.

आम्ही ख्रिस्ताच्या दुःखांचे वाटेकरी आहो. देवाने आमच्या व्यक्तिगत आकांक्षा शून्य कराव्यात यासाठी आमची तयारी आहे? आमचे निर्णय अलौकिकपणे बदलून ते रद्द करु देण्यास आमची तयारी आहे? देव असे का करतो ते नाही समजले तरी हरकत नाही ते आम्हांला मान्य आहे? कारण, ते जाणण्याने आमचा आत्मिक अहंकार फोफावेल. देव आम्हांला अशा अनुभवांतून का नेतो ते न समजताही आम्ही त्यातून जातो. मग योग्य वेळी प्रकाश पडतो, देवाने आम्हांला शक्तिमान केले आणि ते आम्हांला समजलेही नाही हे लक्षात येते.

## परिपूर्ण ईश्वरज्ञान

**“... हे तू खरे मानतोस काय?” (योहान ११:२६).**

येशू ख्रिस्ताला किती सामर्थ्य आहे ते मार्थाला माहीत होते, तिचा विश्वास होता. तो येथे असता तर त्याने तिच्या भावाला बरे केले असते तसेच त्याचा देवाशी अति निकटचा संबंध आहे. तो देवाकडे मागेल ते त्याला मिळेल यावरही तिचा विश्वास होता. पण तिला येशूबरोबर व्यक्तिशः अधिक जवळिक हवी होती. मार्थाचे ईश्वरज्ञान भावी काळात पुरे व्हायचे होते. पण तिचा विश्वास जिव्हाळ्याचा व्हावा यासाठी येशू तिला आकर्षित करीत होता. मग तो हळुहळू वैयक्तिक वारसा झाला, “होय, प्रभूजी, आपणच ख्रिस्त आहा जसा मी विश्वास धरला आहे” (११:२७).

प्रभू तुमच्याशी असाच वागतो आहे? आपल्याबरोबर जवळकीचे नाते जोडा असे येशू सांगतो आहे? “यावर तुझा विश्वास आहे?” हा प्रश्न तुम्ही नीट समजून घ्या. तुमचे ईश्वरज्ञान व्यक्तिगत विश्वास होण्याच्या बेतात आहे असे मार्थाप्रमाणे तुमच्या अनुभवास आले आहे? तुम्ही चौरस्त्यावर उभे आहा? व्यक्तिगत समस्या आमच्या वैयक्तिक गरजेची जाणीव देते तेव्हाच हे असे घडते.

विश्वास ठेवणे म्हणजे बांधून घेणे. बौद्धिक शिक्षणात मी मानसिक तयारी करतो आणि त्या माझ्या विश्वासाशी संबंध नसलेले सर्व मी नाकारतो. व्यक्तिगत विश्वासात मला पटलेल्या गोष्टींशी माझी नैतिक बांधिलकी असते. मी कसलीच तडजोड करत नाही. जवळिकीच्या वैयक्तिक विश्वासात मी आत्मिक दृष्टीने येशू ख्रिस्ताशी बांधलेला असतो आणि फक्त त्याच्या वर्चस्वाखाली राहावे हा माझा निश्चय असतो. पुढे येशू ख्रिस्तासमोर उभा राहिलो की तो मला म्हणतो, “यावर तुझा विश्वास आहे?” मग मला विश्वास ठेवणे श्वास घेण्याएवढे स्वाभाविक आहे. मी त्याच्यावर अगोदरच विश्वास का ठेवला नाही हा माझा मूर्खपणा होता हे मला जाणवते.

नोव्हेंबर ७

## परिस्थितीतील अज्ञात पवित्रता

**“पंरतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांस... सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात” (रोम ८:२८).**

पवित्रजनाच्या जीवनातील परिस्थितीचे नियमन देवाकडून होते. त्याच्या जीवनात योगायोगाला स्थान नाही. आपल्या योजनेला अनुसरुन देव तुम्हांला आणतो ती परिस्थिती तुम्हांला समजत नाही, पण ती देवाच्या आत्म्याला समजते. तुमच्यामध्ये असलेल्या आत्म्याच्या मध्यस्थीच्या द्वारे निश्चित उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तो तुम्हांला वेगळ्या ठिकाणी, लोकांच्यामध्ये विशिष्ट परिस्थितीत आणतो. आपल्या परिस्थितीपुढे जाऊन “येथे मीच माझी तरतूद करुन घेणार, त्यापासून रक्षण करण्यासाठी मी यावर बारीक नजर ठेवणार” असे कधी म्हणू नका. तुमची सर्व परिस्थिती देवाच्या हातात आहे. म्हणूनच परिस्थिती असामान्य आहे असे म्हणण्याचे काहीच कारण नाही. मध्यस्थीच्या प्रार्थनेत मध्यस्थी कशी करावी म्हणून तळमळण्याची काही गरज नाही. देव तुमच्या भोवती आपल्या इच्छेनुसार ठेवतो ते लोक आणि ती परिस्थिती घेऊन सर्वांना त्याच्या राजासनापुढे न्या आणि तुमच्यामध्ये असलेल्या आत्म्याला त्यांच्यासाठी मध्यस्थी करण्याची संधी द्या. याप्रकारे देव आपल्या पवित्रजनांबरोबर संपूर्ण जगाशी संपर्क ठेवणार आहे.

मी अस्पष्ट व चंचल होऊन पवित्र आत्म्याचे कार्य अवघड करत आहे? त्याचे काम करण्याचा माझा प्रयत्न आहे? मध्यस्थीमधील मानवी बाजूची जबाबदारी मलाच पार पाडायची आहे. मी आहे ती परिस्थिती आणि माझ्या आसपासचे लोक यांचा उपयोग केला पाहिजे. माझे जाणीवेतील जीवन मी पवित्र आत्म्यासाठी पवित्र जगा असे केले पाहिजे. मी वेगवेगळ्या लोकांना प्रार्थनेतून देवाकडे उंचावतो तेव्हा पवित्र आत्मा त्यांच्यासाठी मध्यस्थी करतो. तुमची मध्यस्थी माझी होणार नाही व माझी तुमची होणार नाही. “... परंतु आत्मा स्वतः मध्यस्थी करतो” (रोम ८:२६). ती मध्यस्थी नसेल तर दुसऱ्यांची जीवने दारिद्र्यात राहून त्यांचा सर्वनाश होईल.

**नोव्हेंबर ८**

## प्रार्थनेचे अद्वितीय सामर्थ्य

**"... आपण यथायोग्य प्रार्थना कशासाठी केली पाहिजे हे आपल्याला ठाऊक नाही; पण आत्मा स्वतः अनिर्वाच्य कण्हण्याने मध्यस्थी करितो" (रोम ८:२६).**

प्रार्थना करण्यास पवित्र आत्मा आम्हांला शक्ती देतो हे आपण जाणून घ्यावे. आत्म्याच्या मार्गदर्शनानुसार प्रार्थना कशी करावी ते आपण जाणतो. परंतु पवित्र आत्मा आमच्यामध्ये प्रार्थना करतो त्या आम्ही करु शकत नाही हे आपणाला ठाऊक आहे? देवापासून आम्ही नव्याने जन्मलो, आमच्या अंतरंगात आत्म्याने वस्ती केली की तो आमच्या अनिर्वचनीय प्रार्थना करतो. "हा आत्मा पवित्रजनांसाठी देवाच्या मर्जीप्रमाणे मध्यस्थी करतो" (८:२७). जाणीवपूर्वक तुम्ही केलेल्या प्रार्थना पाहण्यासाठी नव्हे तर पवित्र आत्म्याची प्रार्थना काय आहे ते समजण्यासाठी देव आमच्या अंतःकरणात शोध करतो.

विश्वासणाऱ्याचा स्वभाव मंदिर म्हणून घेऊन देवाचा आत्मा मध्यस्थीच्या प्रार्थना सादर करतो. "... तुमचे शरीर पवित्र आत्म्याचे मंदिर आहे..." (१ करिंथ ६:१९). ख्रिस्ताने मंदिर शुद्ध केले तेव्हा, "... त्याने कोणालाही भांड्यांची मंदिरामधून ने-आण करु दिली नाही" (मार्क ११:१६). देवाचा आत्मा तुम्हांला तुमच्या शरीराचा उपयोग तुमच्या सोयीसाठी करु देणार नाही. मंदिरात क्रय-विक्रय करणाऱ्या सर्वांना येशूने कठोरपणे बाहेर घालवले. त्याने म्हटले, "माझ्या घराला... प्रार्थना मंदिर म्हणतील... परंतु तुम्ही तर ही लुटारुंची गुहा करुन टाकली आहे" (मार्क ११:१७).

आमचे शरीर "पवित्र आत्म्याचे मंदिर आहे" हे आम्हांला समजले आहे? असेल तर आम्ही ते त्याच्यासाठी होईल तितके करुन शुद्ध ठेवले पाहिजे. आमचे जागृत जीवन आमच्या व्यक्तित्वाचा लहानसा भाग आहे तरीही ते "पवित्र आत्म्याचे मंदिर" मानले पाहिजे हे आपण विसरु नये. आम्हांला अज्ञात अशा नेणिवेतील जीवनाची जबाबदारी त्याच्यावर आहे पण जाणीवेतील जीवनाची जबाबदारी आमची असल्याने आम्ही ते काळजीपूर्वक जतन करुन जपले पाहिजे.

## पवित्र सेवा

**“तुम्हांसाठी जी माझी दुःखे त्यांमध्ये मी आनंद करतो आणि ख्रिस्ताच्या क्लेशातले जे उरले आहे ते मी आपल्या देहाने...भरुन काढीत आहे” (कलस्सै १:२४).**

ख्रिस्ती सेवकाने पवित्र “मध्यस्थ” असले पाहिजे. त्याने आपला प्रभू व त्याने साधलेला उद्धार ह्यांच्याशी एवढे समरुप असावे की ख्रिस्ताने त्याच्यामधून आपले सर्जनशील जीवन सतत त्याच्या द्वारे पुढे आणावे. येथे एकाचे व्यक्तित्व त्याच्या शक्तीसह दुसऱ्यावर लादावे असे मुळीच नाही, परंतु त्या सेवकांच्या जीवनाच्या प्रत्येक अंगातून ख्रिस्ताची वास्तविक समक्षता प्रतीत व्हावी. आम्ही आमच्या प्रभूच्या जीवनातील सत्य गोष्टी नव्या कराराच्या आधाराने सांगतो तेव्हा आमचे शब्द पवित्र होतात. देव हे शब्द घेऊन ऐकणाऱ्यामध्ये आपल्या तारणाच्या आधारे काही निर्माण करतो. एरवी ते शक्य झाले नसते, खुद्द येशूविषयीचे प्रकट झालेले दिव्य सत्य न सांगता आम्ही मानवी जीवनावर तारणाचे परिणाम याविषयी सांगितले तर ऐकणाऱ्या लोकांचा नव्याने जन्म होणारच नाही. फक्त धर्माविषयी कुतूहल असलेली जीवनशैली आकारास येईल आणि हे संदेश देणे देवाच्या आत्म्याच्या कक्षेबाहेरचे असल्याने तो याविषयी साक्ष देणार नाही. आम्ही देवाबरोबर एकामेळाने राहात आहो याची खातरी करुन घ्यावी त्यामुळे आम्ही त्याचे सत्य सांगतो तेव्हा तो श्रोत्यांच्यामध्ये त्यालाच करता येणाऱ्या गोष्टी करील.

“काय प्रसन्न व्यक्तित्व! केवढी प्रभावी व्यक्ती, कशी त्याची सूक्ष्म दृष्टी!” असे आपण म्हणतो पण आमच्या बोलण्यातून देवाच्या सुवार्तेला काही संधी मिळते काय? तो संदेश मनात पोचणारच नाही कारण प्रभाव संदेशाचा नव्हे तर संदेश वाहकाचाच पडतो. एखादी व्यक्ती आपल्या व्यक्तित्वाने प्रभावित करते तर तो त्याचाच प्रभाव असतो. परंतु तो प्रभूशी समरुप झाला तर तो येशू ख्रिस्ताचा प्रभाव होईल. मनुष्यांनी गौरवाने चढून जाण्याचा धोका आहे परंतु फक्त येशू ख्रिस्तालाच उंच करावे असे त्यानेच सांगितले आहे (पहा योहान १२:३२).

**नोव्हेंबर १०**

## सुवार्तेमध्ये सहभागिता

**"... ख्रिस्ताच्या सुवार्तेत देवाचा सेवक..." (१ थेस्सल ३:२).**

पवित्रीकरणानंतर जीवनात तुमचे ध्येय काय ते सांगणे कठीण आहे. देवाने आपल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे तुम्हांला आपल्या उद्दिष्टामध्ये आणले आहे. आता आपल्या उद्देशासाठी तुम्हांला संपूर्ण जगामध्ये कारणी लावले आहे. त्याने याच प्रकारे तारणासाठी आपल्या पुत्राचा उपयोग करुन घेतला. "देवाने मला यासाठी व त्यासाठी पाचारण केले आहे," असे म्हणून तुम्ही स्वतःसाठी मोठमोठ्या गोष्टी मिळवू पाहता तर तुमचा उपयोग करुन घेण्याचे कामी तुम्हीच देवाला आड येता. तुम्ही स्वतःच्या आकांक्षा आणि इच्छा यांना कवटाळून बसता तोपर्यंत देवाच्या इच्छेशी समरुप होणारच नाही. आपल्या योजना कायमच्या बाजूस ठेवल्या आणि स्वतःला देवावर सोपवले तरच तो जगातील आपल्या उद्देशांसाठी तुमचा उपयोग करुन घेईल. तुमचे विचार आणि वाटा देखील समर्पण केल्या पाहिजेत कारण ते सर्व आता प्रभूचे आहे.

माझ्या जीवनाचा उद्देश देवाचा आहे, माझा नाही. देव आपल्या स्वतःच्या थोर विचारदृष्टीने माझा उपयोग करुन घेत आहे आणि मी फक्त त्याच्यावर भरंवसा ठेवावा हेच त्याचे सांगणे आहे. "प्रभू याने माझ्या अंतःकरणाला वेदना होतात" असे मी कधीच म्हणू नये, असे म्हटल्याने आपणच अडखळण होतो. माझी इच्छा काय आहे ते देवाला सांगणे थांबवले की तो आपली इच्छा माझ्यामध्ये विनाअडथळा पूर्ण करील. तो मला चिरडून टाको किंवा उन्नत करो; त्याची इच्छा पूर्ण करा! त्याचे चांगुलपण आणि तो स्वतः यांवर मी दृढ विश्वास ठेवावा हेच त्याचे मागणे आहे. आत्मदया सैतानापासून आहे त्यातच मी खितपत पडलो तर जगातील देवाच्या उद्देशात माझा काही उपयोग होणार नाही असे केल्याने जगात माझे "सुखद जग" निर्माण होते आणि "हिमदंश" होईल या भयाने देव मला तेथून हलू देणार नाही.

## सर्वोच्च आरोहण

### “देव म्हणाला, तुझा पुत्र... यास घेऊन... जा” (उत्पत्ती २२:३).

“तुझा पुत्र यास घेऊन” ही देवाची आज्ञा आहे. ते नंतर नाही आताच केले पाहिजे. तरी आम्ही किती वाद घालतो! योग्य काय ते माहीत असते; परंतु आम्ही वेळ काढण्यासाठी सबबी शोधतो. देव दाखवतो त्या उंचीवर जाण्यासाठी उशीर करुन चालणार नाही. ते आताच केले पाहिजे. यज्ञार्पण करण्याअगोदर ते आमच्या इच्छेला आले पाहिजे.

“तेव्हा अब्राहामाने मोठ्या पहाटेस उठून... देवाने सांगितलेल्या ठिकाणाकडे तो निघाला” (२२:३). अब्राहामाचा केवढा हा साधेपणा! देवाने सांगितले तेव्हा त्याने “मानवांची मसलत” घेतली नाही (गलती १:१६). “मानवांची मसलत घ्यावी” अगर स्वतःचे मन, बुद्धी आणि विचार यांचा सल्ला घ्यावा असे वाटेल तेव्हा सावध राहा. देवाबरोबरच्या वैयक्तिक संबंधाबाहेरचे काही असेल तर तिकडे लक्ष देऊ नका. या गोष्टीमुळे देवाचे आज्ञापालन करण्यात अडथळा येतो.

यज्ञार्पण काय आहे ते अब्राहामाने ठरवले नाही. देवासाठी स्वतःची सेवा निवडून घेऊ नका. आत्म-समर्पण या रोगाने तुमची सेवा दूषित होईल. देवाने तुमचा पेला मधुर केला असेल तर आनंदाने त्याचे सेवन करा. त्याने तो कडू केला असेल तर त्याच्या सहभागितेत तो घ्यावा. देवाच्या इच्छेनुसार तुम्हांला कठीण आणि अवघड काळाला तोंड द्यावे लागले तर ते सहन करुन पुढे जा. आपल्या हौतात्म्याची जागा तुम्ही ठरवू नका. “मी येथवरच जाईन त्यापुढे जाणार नाही,” असे म्हणू नका. अब्राहामाची परीक्षा देवाने घेतली. अब्राहामाने विलंब लावला नाही. आक्षेप न घेता त्याने सरळ आज्ञा पाळली. देवाच्या संपर्कात नसाल तर त्याला दोष देणे सहज शक्य आहे. परीक्षेतून गेल्यावर देवाची अधिक चांगली ओळख होते. ती झाल्याशिवाय तुम्हांला त्याच्याविरुद्ध बोलण्याचा हक्कच नाही. आम्हांला आपली उच्च ध्येये शिकवावी यासाठी देव कार्य करीत आहे. त्याचा व आमचा उद्देश एक होईपर्यंत तो आम्हांला शिकवणारच.

## पालटलेले जीवन

**"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते सर्व नवे झाले आहे" (२ करिंथ ५:१७).**

तुमच्या आत्म्याच्या तारणाविषयी तुम्हांला काय समजले आहे? तारणाचे कार्य म्हणजे तुमच्या वास्तव जीवनात एकंदरीत नाट्यमय पालट झाला आहे. आता तुमचा दृष्टिकोन बदलला आहे. तुम्ही आता एकंदर गोष्टींकडे पूर्वीप्रमाणे पाहात नाही. तुमच्या इच्छा आता नव्या आहेत. पूर्वीचे आकर्षण आता उरलेले नाही. तुमच्या जीवनात झालेले तारणाचे कार्य अस्सल आहे का ते पाहण्याची एक कसोटी आहे. तुमच्या जिव्हाळ्याच्या गोष्टी देवाने बदलल्या आहेत? पूर्वीच्याच गोष्टींचा मोह अजून गेला नसेल तर नवा जन्म झाल्याची बढाई मारणे व्यर्थ आहे. तसे म्हणून तुम्ही आत्मवंचना करताहात. तुम्ही नव्याने जन्मला असाल तर देवाचा आत्मा तुमच्यातील बदल स्पष्टपणे जीवनात आणि विचारात दाखवतो. पेचप्रसंग आला तर तुमच्यात झालेला बदल पाहून तुम्हांलाच आश्चर्य वाटते. आपण हे केले अशी कल्पना करण्याचे काही कारण नाही ते प्रत्यक्षात घडलेले असते. हा संपूर्ण व आश्चयकार्यक बदलच तुमचे तारण झाल्याचा पुरावा आहे.

माझे तारण आणि पवित्रीकरण यांमुळे काय फरक पडला आहे? १ करिंथ १३ मधील शिक्षण माझ्या पचनी पडले आहे? त्या प्रकाशात मी चालतो आहे? का मी कसेही करुन हा मुद्दा टाळण्याचा प्रयत्न करतो? पवित्र आत्म्याकडून माझ्यामध्ये झालेले तारणाच्या खऱ्या कार्याने मला पूर्णपणे मुक्त केले आहे. "तो प्रकाशात आहे तसा मीही जोवर प्रकाशास चालतो" (१ योहान ३:७), तोवर मला बोल लावण्यास देवाला जागा नाही. कारण त्याचे जीवन माझ्या आस्तित्वाच्या प्रत्येक भागात कार्य करत आहे. हे कार्य जाणीवेच्या पातळीवर होत नाही तर माझ्या जाणीवेपलीकडे अधिक खोलात हे कार्य होते आहे.

**नोव्हेंबर १३**

## विश्वास हा अनुभव

**“त्याने (देवाच्या पुत्राने) माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरता दिले” (गलती २:२०).**

आमच्या भावभावना एकीकडे सारुन आम्ही प्रभू येशूवर परमनिष्ठा ठेवली पाहिजे. आमच्या अनुभवाचे संकुचित जग सोडून त्याच्यावर अमर्याद निष्ठा ठेवणे अगत्याचे आहे. येशू ख्रिस्त कोण आहे ते नव्या करारातून पाहून समजून घ्यावे आणि मग आमच्या क्षुद्र व क्षुल्लक विश्वासाचा विचार करावा. आम्ही म्हणतो, “मला हा आणि तो अनुभव आलाच नाही.” येशू ख्रिस्तावरील विश्वासाने काय साध्य होते पहा. तो आम्हांला पूर्णपणे नीतिमान, निर्दोष, पूर्णपणे शुद्ध असे देवाच्या राजासनासमोर उभे करतो. आम्ही प्रीतीपूर्ण विश्वासात ख्रिस्त येशूमध्ये उभे राहतो. तो आम्हांला “देवापासून आपल्याला तो (ख्रिस्त) ज्ञान... नीतिमत्व आणि पवित्रीकरण आणि खंडणी भरुन प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे” (१ करिंथ १:३०). असे असताना आम्ही ख्रिस्तासाठी त्याग केला असे म्हणण्याला काही आधार आहे काय? नरक आणि संपूर्ण विनाश यांपासून आमचा बचाव झाला आहे. आम्ही त्याग करण्याबद्दल कसे बोलावे?

आम्ही येशूवर सतत विश्वास ठेवला पाहिजे. “प्रार्थना सभेतील” येशू ख्रिस्त नव्हे अगर “पुस्तकी” येशू ख्रिस्त नाही तर देहधारी देव असा नव्या करारातील येशू ख्रिस्त; खरे तर त्याने आम्हांला आपल्या पायापाशीच ठार केले पाहिजे. ज्याच्यापासून आमचे तारण येते त्याच्यावर आम्ही विश्वास ठेवला पाहिजे. येशू ख्रिस्ताला आमची संपूर्ण निष्ठा हवी आहे. आम्हांला येशू ख्रिस्ताचा अनुभव कधीच घेता येणार नाही. अगर स्वार्थीपणाने त्याला आमच्या अंतःकरणात बांधून ठेवता येणार नाही. आमचा विश्वास त्याच्यावरच्या भक्कम व निश्चित निश्चयावर आधारलेला असावा.

आम्ही अनुभवावर भरंवसा ठेवतो त्यामुळे अविश्वासाविरुद्ध पवित्र आत्म्याचे कडक धोरण आपण पाहतो. आमची सर्व भये पापमय आहेत. विश्वासाने पोषण करण्यास नकार देऊन आम्हीच आपली भये निर्माण करतो. येशू ख्रिस्ताशी समरुप झालेल्या व्यक्तीला कसलीच शंका व भीती वाटता नये. आमचे जीवन देवाला स्तुतीगीत व्हावे, विश्वास विजयी असावा.

**नोव्हेंबर १४**

## दिव्य योजनेचा शोध घेणे

**"... परमेश्वराने मला नीट वाट दाखवून... पोचवले आहे" (उत्पत्ती २४:२७).**

आम्ही देवाबरोबर एवढे एकरुप व्हावे की सतत मार्गदर्शनासाठी विनंती करण्याची गरज ऊरु नये. पवित्रीकरणातून आम्ही देवाची मुले झाल्याचे समजते. लहान मूल साधारणपणे नेहमी आज्ञा पाळते, मग ते मुद्दाम अवज्ञा करते. अवज्ञा करताना त्याच्या अंतरंगात संघर्ष होतो. आध्यात्मिक पातळीवर आंतरिक संघर्ष हा देवाने दिलेला इशारा आहे. असा इशारा मिळाला की आम्ही लगेच थांबून मनाचे नवीकरण करुन देवाची इच्छा समजून घेतली पाहिजे (पहा रोम १२:२). देवाच्या आत्म्याने आम्ही नव्याने जन्मलो तर त्याच्यावरील आपल्या निष्ठेत व्यत्यय येतो अगर ती खुंटते, कारण आम्ही सतत देवाकडे मार्गदर्शनाची याचना करतो.

आपणा सर्वांनाच देव नवनव्या, अनोख्या गोष्टीत दिसतो. प्रत्येक बाबतीत देव पाहण्यासाठी आमची आध्यात्मिक शिस्त अधिक दृढ झाली पाहिजे. जीवनातील किरकोळ घटना देवाच्या नेमलेल्या व्यवस्थेहून कमी आहेत असे समजण्याचे कारण नाही. त्याच्या दिव्य योजना कोठेही आणि सर्वत्र पाहण्यास तयार राहा.

देवावर निष्ठा ठेवण्याऐवजी आपल्याच निश्चयांशी चिकटून राहण्यापासून सावध असा. तुम्ही पवित्रजन असलात आणि "मी हे आणि ते कधीही करणार नाही" असे म्हणाल, तर बहुत करुन देव तुम्हांला तेच करायला सांगेल. या पृथ्वीवर आमच्या प्रभूएवढी विसंगत व्यक्ती दुसरी नव्हती परंतु तो आपल्या पित्याशी नेहमीच सुसंगतपणे वागला. पवित्रजनाच्या जीवनात तत्वाशी नव्हे तर दिव्य जीवनातूनच दिव्य जीवनाविषयी सतत अधिकाधिक शोध लागतात. सातत्याने विश्वासू असण्यापेक्षा दुराग्रही असणे केव्हाही चांगले. आम्ही देवाशी विश्वासू असलो की तो आमचा धर्मविषयक गर्व क्षणात नमवील.

## “तुला त्याचे काय?”

**“पेत्र येशूला म्हणाला, ‘प्रभू ह्याचे काय?’ येशूने त्याला म्हटले,... तुला त्याचे काय? तू माझ्यामागे ये” (योहान २१:२१-२२).**

दुसऱ्यांच्या जीवनात नाक खुपसणे सोडून देण्यास नकार देणे अवघड असते. हौशी तरतूद करणारे होण्यामधील धोका ओळखला पाहिजे. दुसऱ्यांच्या योजनेत ढवळाढवळ करणे योग्य नाही. कोणी क्लेश भोगतो आहे असे दिसले तर तुम्ही म्हणता “त्याला क्लेश होणार नाहीत हे मी पाहीन.” यात तुम्ही देवाच्या इच्छेच्या आड येता, तेव्हा देव तुम्हांला म्हणतो, “तुला त्याचे काय?” तुमचे आत्मिक जीवन ठप्प झाले आहे? तसे राहू देऊ नका. देवाच्या सान्निध्यात जा आणि कोठे चुकले ते पाहा. कदाचित तुम्ही दुसऱ्याच्या जीवनात लुडबूड करता. अशक्य गोष्टी सुचवता, अधिकार नसताना सल्ला देता. तुम्हाला कोणाला तरी सल्ला द्यायचा असेल तर आपल्या आत्म्याच्या साहाय्याने तो तुम्हांला निश्चित सल्ला देईल. देवाबरोबरचे नाते सरळ ठेवणे हेच तुमचे कर्तव्य आहे. त्यामुळे दुसऱ्या कोणाला तरी आशीर्वाद देण्यासाठी देव तुम्हांला आपली तारतम्य बुद्धी देईल.

आमच्यापैकी बहुतेक जाणीवेच्या पातळीवरच राहतात. ते जाणीवपूर्वक देवाची सेवा करतात, देवावर निष्ठा ठेवतात. यावरुन आम्ही खरे ख्रिस्ती जीवन अजून जगत नाही हेच सिद्ध होते. देवाच्या मुलाच्या अंतरंगात अबोधपणाच्या पातळीवर परिपक्वता येते. मग आम्ही देवाला सर्वस्वी एवढे समर्पित होतो की तो आमचा उपयोग करतो तेही आम्हांला समजत नाही. आम्ही मोडलेली भाकर व ओतलेला द्राक्षारस आहो असे जाणवते. तेव्हा आम्ही आणखी वरच्या पातळीवर जाणे जरुरीचे असते. येथे आम्ही स्वतः आणि देव आमच्यामधून करतो त्या कशाचीही जाणीव उरत नाही. पवित्रजनाला आपल्या पवित्रतेची जाणीवही नसेत तो जाणीवपूर्वक देवावर अवलंबून असतो.

**नोव्हेंबर १६**

## अद्याप मानवीच!

**"... जे काही करता ते सर्व देवाच्या गौरवासाठी करा" (१ करिंथ १०:३१).**

शास्त्रलेखांमध्ये देहधारणेचा महान चमत्कार बालकाच्या जीवनातून प्रतीत होतो. रुपांतराचा महान चमत्कार विरुन जातो आणि भूतग्रस्तांची दरी समोर येते. पुनरुत्थानाचे गौरव सागरतीरावरील न्याहारीत विलीन होते. हे उदात्ताकडून अनुदात्ताकडे येणे नसून ते देवाचे थोर प्रकटीकरण आहे.

आम्हांला अद्‌भुताचा अनुभव हवा असतो. वीरोचित कृत्ये करणारा वीर आम्ही शोधतो. एखाद्या पेचप्रसंगात शैर्याने पुढे जाणे चांगले आहे. पण साक्ष नाही, स्तुती नाही, कोणी आम्हांला पाहात नाही अशा स्थितीत देवाचे गौरव करीत राहणे अवघड आहे. आम्हांला मस्तकामागे तेजोवलय हवे, ते नसेल तर "किती हा प्रार्थनाशील गृहस्थ!" अगर "किती हा थोर निष्ठावंत भक्त!" असे कोणीतरी म्हणावेसे सतत वाटते. तुमची प्रभू येशूवर यथार्थ निष्ठा असेल तर तुम्ही केव्हाच त्या उच्चतेप्रत पोचला आहात. तेथे व्यक्तिशः तुमच्याकडे कोणाचेच लक्ष जाणार नाही. सदोदित तुमच्यामधून येणारी देवाची शक्तीच दिसेल.

"मला देवाकडून अद्‌भुत पाचारण झाले आहे!" असे म्हणावयाला आम्हांला फार आवडते. परंतु देवाच्या गौरवासाठी अगदी साध्यातले साधे काम करण्यासाठी आमच्यामध्ये कार्य करणाऱ्या देहधारी सर्वसमर्थ देवाची गरज लागते. कोणाच्या लक्षात येऊ नये यासाठी आमच्यामधील देवाचा आत्मा सर्वस्वी त्याचा झाला पाहिजे. ख्रिस्ती कार्यातील आमचे यशच आमचा उद्देश करण्याकडे आमचा कल असतो. यश ही पवित्रजनाच्या जीवनाची कसोटी नसून मानवी जीवनात देवाचे गौरव दाखवणे, "ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले" जीवन (कलस्सै ३:३) सामान्य परिस्थितीत जगणे हाच आमचा उद्देश आहे. आमच्या मानवी नात्यागोत्यात देवाचे आदर्श जीवन व्यक्त व्हावे हेच आवश्यक आहे.

नोव्हेंबर १७

## सार्वकालिक ध्येय

**“परमेश्वर म्हणतो, मी स्वतःची शपथ घेऊन सांगतो की तू हे कृत्य केले;... यास्तव मी तुला आशीर्वादित करीन”** (उत्पत्ती २२:१६–१७).

या वेळी अब्राहामाने देवाच्या स्वभावस्वरुपाच्या संपर्कापर्यंत मजल मारली आहे. आता देवाची सत्यता त्याला उमजली आहे.

“माझे ध्येय खुद्द देवच आहे... प्रिय प्रभू, कोणत्याही वाटेने, कितीही किंमत पडली तरी...”

कोणत्याही वाटेने... कितीही किंमत पडली तरी म्हणजे देवाच्या मार्गाच्या आधीन होऊन ध्येयाप्रत जाणे.

देव बोलतो तेव्हा त्याला उलट प्रश्न करणे शक्य नाही. तो माझ्यातील स्वतःच्या स्वभावाशी बोलतो तेव्हा लगेच आज्ञापालन करणे भाग आहे. येशू म्हणतो, “या” तेव्हा, मी येता. तो सांगतो “जाऊ दे” मग मी जाऊ देतो. “या बाबतीत देवावर भरंवसा ठेव” असे तो म्हणतो तेव्हा मी भरंवसा ठेवतो. या आज्ञापालनाने देवाचा स्वभाव माझ्यामध्ये आहे हे स्पष्ट होते.

देवाचे स्वतः मला प्रकट होण्यावर देवाचा नव्हे तर माझ्याच स्वभावाचा प्रभाव असतो. “मी सामान्य आहे म्हणून तुझे मार्ग मला सामान्यच वाटतात.” अब्राहाम पोचला होता त्याठिकाणी मीही आज्ञापालनाच्या द्वारेच जातो. देव कोण आहे ते मला समजते. येशू ख्रिस्तामध्ये देवाच्यासमोर आल्याशिवाय तो मला खरा वाटणारच नाही. मग मी आवेशाने घोषणा करीन, “माझ्या देवा, संपूर्ण जगात तुझ्याशिवाय अन्य कोणी नाही!”

आज्ञापालनाने देवाचा स्वभाव समजला की त्याच्या अभिवचनांचे मोल समजते. आम्ही रोज पवित्र शास्त्र वाचले तरी आज्ञापालन केल्याशिवाय ते उमजणार नाही. “देवाची वचने कितीही असोत, त्याच्याठायी “होय” हे आहे...” (२ करिंथ १:२०). आमचा होकार आज्ञापालनातून यावा आणि आज्ञा पाळून “आमेन” म्हणून देवाच्या अभिवचनला अनुमती देतो.

## जिंकून स्वतंत्रतेमध्ये येणे!

**“म्हणून जर पुत्र तुम्हांला बंधमुक्त करील तर तुम्ही खरेखुरे बंधमुक्त व्हाल” (योहान ८:३६).**

व्यक्तिगत आत्मसमाधानाचा काही लवलेश आमच्यामध्ये राहिला तर मी असेच म्हणेन “मी नाही शरण जाणार!” पण आमच्या अस्तित्वाचा आत्मिक भाग “जमणार नाही” असे कधीही म्हणत नाही. तो भाग आसपासचे सर्व सामावून घेतो. आमच्या आत्म्याची भूक मोठी आहे. आमची जडणघडण तशीच केली आहे. देवाकडे जाण्याची ओढ आम्हांला असते. पण पाप, आमचे व्यक्तित्त्व व चुकीचे विचार आम्हांला त्याच्याकडे पोचू देत नाहीत. देव पापापासून आमची सुटका करतो पण आमच्या व्यक्तित्त्वाचा निपटारा आम्हालाच करावा लागतो. देवाने आमचे जीवन आज्ञापालनाने पालटावे यासाठी आम्ही आज्ञा पाळून आमचे स्वाभाविक जीवने त्याला अर्पण केले पाहिजे.

आमच्या आत्मिक जीवनाचा विकास करताना देव आमच्या स्वाभाविक व्यक्तित्वाला काही महत्त्व देत नाही. त्याची योजना आमचे स्वाभाविक जीवन भेदून जाते. आम्ही देवाला साहाय्य केले पाहिजे. “मी हे करणार नाही” असे म्हणू नये. देव आम्हांला शिस्त लावणार नाही. आम्हीच स्वतःला शिस्त लावावी. आमचा प्रत्येक विचार आणि “तर्कवितर्क कैद करुन देव त्यांना ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावणार नाही” (२ करिंथ १०:५). ते आमचे आम्हीच केले पाहिजे. “हे प्रभू, माझे विचार स्वैर भटकतात” असे म्हणू नका. तुमच्या स्वाभाविक जीवनाचा जुलूम झुगारुन द्या, आत्मिक जीवनाचे स्वातंत्र्य मिळवा.

“पुत्र तुम्हांला बंधमुक्त करील तर...” येथे पुत्राऐवजी “तारणारा” म्हणू नका. “तारणाऱ्याने” आम्हांला पापापासून मुक्त केले आहे पण ही स्वतंत्रता “पुत्राने” माझ्यापासून मला स्वतंत्र केल्याने येते. गलती २:२० मध्ये “मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे” या पौलाच्या म्हणण्याचा हाच अर्थ आहे. त्याचे व्यक्तित्व मोडून त्याचा आत्मा त्याच्या प्रभूशी एक झाला आहे. “तुम्ही खरेखुरे बंधमुक्त अंतर्बाह्य स्वतंत्र व्हाल येशू ख्रिस्ताशी समरुप झाल्याने मिळणाऱ्या शक्तीने समर्थ व्हा!

## तो येईल तेव्हा

**"तो येऊन पापाविषयी... जगाची खातरी करील" (योहान १६:८).**

पापाविषयी खातरी पटण्याचा विचार क्वचितच कोणी करतो. चुका केल्याने वाटणारी अस्वस्थता आपण सर्वच अनुभवतो. पण पवित्र आत्म्याने पापाविषयी खातरी केली की त्यामुळे येथील सर्व नाती बाजूस राहून, "तुझ्याविरुद्ध, तुझ्याविरुद्धच मी पाप केले आहे..." (स्तोत्र ५१:४) या प्रकारे आपली पापाविषयी खातरी पटवली की त्याल आपल्या विवेकबुद्धीनुसार वाटेल की परमेश्वर आपल्याला क्षमा करणारच नाही. देवाने क्षमा केली तर ह्या व्यक्तीला देवापेक्षा न्यायाची अधिक जाणीव आहे असे होईल. देव क्षमा करतो पण हे करण्यासाठी त्याला आपल्या एकुलत्याएक पुत्राच्या मरणाचे अपार दुःख सोसावे लागले. त्याचे हृदय दुःखाने भग्न झाले. देवाच्या कृपेचा महान चमत्कार हाच आहे की तो पापाची क्षमा करतो, येशू ख्रिस्ताच्या मरणानेच दिव्य स्वभाव क्षमा करुनही हे करण्यात स्वतःशी खरा राहू शकतो. देव प्रीती आहे म्हणून आम्हांला क्षमा करतो हे म्हणणे उथळपणाचे लक्षण आहे. पापाची खातरी झाली की आम्ही कधी असे म्हणणार नाही. देवाची प्रीती अन्यत्र कोठेही नसून ती वधस्तंभावर कोरली आहे. देव मला फक्त ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या आधारेच क्षमा करतो. यामुळे त्याच्या विवेकबुद्धीचे समाधान होते.

नरकापासून माझा बचाव झाला, आता स्वर्गासाठी माझी तयारी झाली (या पातळीवर क्षमा कोणीही स्वीकारणार नाही). हा क्षमेचा अर्थ नाही. क्षमा म्हणजे मला क्षमेने एका नव्या नात्यात आणले आहे त्यामुळे मी ख्रिस्तामध्ये देवाशी समरुप झालो आहे. मी जो अपवित्र त्याला देव आपल्या स्वतःच्या जो पवित्र त्याच्याबरोबरीचा करतो, हाच खंडणी भरुन प्राप्त केलेल्या उद्धाराचा चमत्कार आहे. हे करण्यासाठी तो माझ्यामध्ये नवा स्वभाव येशू ख्रिस्ताचा स्वभाव घालतो.

**नोव्हेंबर २०**

## देवाची क्षमा

**“आपल्या अपराधांची क्षमा आपल्याला मिळाली आहे” (इफिस १:७).**

देवाच्या पितृत्वाचा मनोहर दृष्टीविचार करु नका. देव दयाळू आहे, अर्थातच तो आम्हांला क्षमा करील. भावनेवर आधारलेल्या या विचाराला नव्या करारात स्थान नाही. ख्रिस्ताच्या वधस्तंभाची घोर शोकात्मिका याच आधाराने देव आम्हांला क्षमा करतो. अन्य कोणत्याही आधाराने क्षमा झाली असे म्हणणे हे देवाविरुद्ध न कळत केलेले दुर्भाषण आहे. ख्रिस्ताचा वधस्तंभ या एकाच आधाराने आम्हांला क्षमा मिळून आम्ही पुन्हा देवाच्या कृपेस पात्र होतो. अन्य मार्ग नाही! आम्ही सहजपणे क्षमेचा स्वीकार करतो पण त्यासाठी काल्वरीवरील यातनांची किंमत द्यावी लागली आहे. पापक्षमा, पवित्र आत्म्याची देणगी आणि आमचे पवित्रीकरण हे साध्या विश्वासाने कधी घेऊ नये, त्यासाठी देवाला द्याव्या लागलेल्या प्रचंड किंमतीचा विसर आम्हांला पडू नये.

क्षमा कृपेचा दिव्य चमत्कार आहे. यासाठी देवाला ख्रिस्ताचा वधस्तंभ ही किंमत द्यावी लागली. पवित्र देव राहून पापक्षमा करण्यासाठी ही किंमत देणे आवश्यक होते. प्रायश्चित्त अर्पण पाप पुसून टाकत असेल तर देवाचे पितृत्व या संकल्पनेचा स्वीकार करु नका. देवाचे प्रकट सत्य हेच आहे की प्रायश्चित्त अर्पणाशिवाय पापक्षमा नाहीच. तो क्षमा करु शकत नाही कारण तसे केले तर त्याने आपल्या स्वभावाविरुद्ध कृती केली असे होईल. वधस्तंभाच्या प्रायश्चित्ता द्वारे देवाकडे परत माघारी आणल्यानेच आम्हांला क्षमा मिळू शकेल. अलौकिक क्षेत्रातच देवाकडून क्षमा मिळणे शक्य आहे.

पापक्षमेच्या चमत्काराच्या तुलनेत पवित्रीकरणाचा अनुभव लहानसाच आहे. पवित्र जीवन हे मानवी जीवनात पापांची क्षमा झाल्याचे प्रमाण आहे. देवाने माझ्या पापांची क्षमा केली या जाणीवेनेच माणसाला कृतज्ञतेचे पाझर फुटतात. पौलाला याची कायम जाणीव होती. तुम्हांला क्षमा करण्यासाठी देवाला किती किंमत मोजावी लागली ते समजले की देवाची प्रीती तुम्हांला आवरुन धरील.

**नोव्हेंबर २१**

## “पूर्ण झाले आहे”

**“जे काम तू मला करावयास दिले ते पुरे करुन मी पृथ्वीवर तुझे गौरव केले आहे” (योहान १७:४).**

येशू ख्रिस्ताच्या मृत्यूने इतिहासात देवाच्या उद्देशाची आणि मनोदयाची परिपूर्ती झाली. येशू ख्रिस्त काही हुतात्मा नव्हता. त्याचे मरण टाळणे शक्य नव्हते. अगर ते घडून आले असे मुळीच नाही. तो तर मरण्यासाठीच आला होता. देव आमचा पिता आहे; त्याची आमच्यावर प्रीती आहे म्हणून तो आम्हांला क्षमा करील असे कधी म्हणू नका. येशू ख्रिस्तामध्ये प्रकट झालेल्या देवाच्या सत्याशी हे विसंगत आहे. यामुळे वधस्तंभ अनावश्यक होतो आणि खंडणी भरुन प्राप्त केलेली मुक्ती उगाच वायफळ यत्न होतो. ख्रिस्ताच्या मरणामुळेच देव पापाची क्षमा करु शकतो. देवाला आपल्या पुत्राच्या मरणाखेरीज अन्य कोणत्याही मार्गाने क्षमा करु शकत नाही आणि येशूला त्याच्या मरणामुळेच त्याला तारणारा म्हणून उन्नत केले आहे, “... तो येशू मरण सोसल्यामुळे गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडीत केलेला असा आपण पाहतो” (इब्री २:९). चकित झालेल्या विश्वाच्या कानी ख्रिस्ताच्या वधस्तंभावरुन “पूर्ण झाले आहे!” हीच विजयी घोषणा पडली (योहान १९:३०). मानवजातीच्या उद्धाराविषयी हा अखेरचा शब्द आहे.

देवाच्या प्रीतीविषयी चुकीच्या दृष्टीकोनामुळे देवाच्या पवित्रतेला धक्का पोचतो अगर ती पुसली जाते असे म्हणणे येशू ख्रिस्ताने प्रकट केलेल्या देवाच्या सत्याच्या विपरीत आहे. येशू ख्रिस्त दया आणि करुणा यांच्यामुळे आमच्या बाजूने देवाविरुद्ध उभा आहे अगर आमच्याविषयीच्या सहानुभूतीने तो आमच्यासाठी शाप झाला यावर विश्वास ठेवू नका. दिव्य हुकूमाने येशू ख्रिस्त आमच्यासाठी शाप झाला. पापाची खातरी झाल्याने त्याच्या शापाचा मोठा गहन अर्थ समजून घेणे हे आमच्याकडे आहे. पश्चात्ताप आणि लज्जा यांची देणगी म्हणून आम्हांला पापाची खातरी दिली आहे. ही देवाची महान दया आहे. येशू ख्रिस्त लोकांच्या पापांचा द्वेष करतो आणि काल्वरी त्याच्या द्वेषाचे माप आहे.

**नोव्हेंबर २२**

## उथळ आणि अथांग

**"म्हणून तुम्ही खाता, पिता किंवा जे काही करता ते सर्व देवाच्या गौरवासाठी करा" (१ करिंथ १०:३१).**

जीवनाचे उथळ पैलू देवाने नेमलेले नाहीत असे समजू नका. अथांग पैलूंप्रमाणे उथळ पैलूही देवानेच नेमलेले आहेत. अनेकदा आम्ही उथळ नाही हे दुसऱ्यांना दाखवण्यासाठी आम्ही उथळ होण्यास नकार देतो. या मागे देवावरील सखोल निष्ठा नसून लोकरंजन हाच उद्देश आहे हे आत्मिक अहंकाराचे स्पष्ट लक्षण आहे. येथे आम्ही काळजी घ्यावी; कारण यामुळेच आमच्या जीवनात दुसऱ्यांविषयीचा तिरस्कार फोफावतो. आम्ही लोकांना दोष देणारे ठरतो, कारण ते आमच्याहून उथळ असतात! अथांग व्यक्तित्वाचा दिमाख दाखवू नका. देव तर तान्हे बाळ झाला.

उथळ असणे हे काही पापी असल्याचे चिन्ह नाही तसेच उथळपणामुळे तुमच्या जीवनाला खोली नाही असे होत नाही. सागराला किनारा आहेच ना! जीवनातील उथळ गोष्टी जसे, खाणेपिणे, चालणेबोलणे देवानेच नेमले आहे. आमच्या प्रभूने व सर्व गोष्टी केल्या, देवाचा पुत्र म्हणून केल्या आणि म्हटले, "शिष्य गुरुपेक्षा मोठा नाही..." (मत्तय १०:२४).

जीवनातील उथळ गोष्टी आपले रक्षण करतात. आम्हांला सामान्य प्रकारे सामान्य जीवन जगायचे आहे. देव आम्हांला सखोल गोष्टी देतो त्या उथळ गोष्टीपासून वेगळ्याच असतात. तुमच्या जीवनाची अथांगता फक्त देवाला दाखवा इतर कोणाला दाखवू नका. आम्ही आमचा शीलस्वभाव आणि लौकिक यातच नको तेवढे कंटाळा येईतो गढलेले असतो. जीवनाच्या उथळ बाबतीत आम्ही ख्रिस्ती आचरण ठेवण्याचे नाकारतो. देवाखेरीज अन्य कोणाला गंभीरपणे घेऊ नका. सर्वात अधिक लबाडी करणारे तुम्ही स्वतःच असाल हे कधी विसरु नका.

## तिरस्काराने मनोभंग

**“हे परमेश्वरा, आमच्यावर कृपा कर, आमच्यावर कृपा कर; कारण आमची पुरी नालस्ती होत आहे” (स्तोत्र १२३:३).**

देवावरील आमच्या विश्वासाची हानी होण्यापासून सावध न राहता आमची मनाची अवस्था अगर ख्रिस्ती स्वभाव यांच्या हानीपासून सावध राहावे. “...तुम्ही आपल्या आत्म्यास जपा, विश्वासघाताने वागू नका” (मलाखी २:१६). आमची मनाची अवस्था प्रभावी परिणाम करणारी आहे. हा शत्रू थेट आमच्या आत्म्यात शिरुन आमचे चित्त देवापासून विचलित करतो. आम्ही पुन्हा त्याच्यासमोर मनाच्या शांत अवस्थेत येईपर्यंत आमचा विश्वास कवडी मोलाचा असतो; या वेळी मानवी देह आणि मानवी बुद्धी यांच्याकडून आमच्या जीवनाचे नियंत्रण होते!

“प्रपंचाची चिंता...” करण्यापासून सावध राहा (मार्क ४:१९). याच गोष्टी आमच्या आत्म्यामध्ये अपप्रवृत्ती फैलावतात. देवापासून आमचे चित्त विचलित करणाऱ्या लहानसहान गोष्टींमध्ये अडवणूक करण्यात किती सामर्थ्य आहे त्याची कल्पनाही करवणार नाही. “प्रपंचाच्या चिंतांनी” दडपले जाऊ नका. प्रत्येक बाबतीत स्वतःचे समर्थन करण्याची आमची उत्कट इच्छाच आमचे चित्त विचलित करते. संत ऑगस्टिनची प्रार्थना पाहा, “हे प्रभू सदोदित स्वतःचे समर्थन करण्याच्या वासनेपासून माझी सुटका कर!” सतत समर्थन करण्याच्या इच्छेने आमच्या आत्म्याचा देवावरील विश्वास कमी होतो. मी स्वतःचे स्पष्टीकरण दिले पाहिजे, अगर लोकांनी समजून घेतले पाहिजे असे म्हणण्याचे काही कारण नाही. आमच्या प्रभूने कशाचेही स्पष्टीकरण दिले नाही. लोकांचे गैरसमज आपोआप दूर होण्यासाठी त्याने ते तसेच राहू दिले. दुसऱ्या लोकांची आध्यात्मिक वाढ होत नाही; आपल्या तारतम्याचा उपयोग ते टीका करण्यासाठी करतात. परिणामी आम्ही देवाबरोबरच्या सहभागितेत व्यत्यय आणतो. देव आम्हांला मर्मदृष्टी देतो ती टीका करण्यासाठी नव्हे तर मध्यस्थी करावी म्हणून दिलेली असते.

**नोव्हेंबर २४**

## लक्ष्य लावण्याची दिशा

**“पाहा, जसे दासांचे डोळे आपल्या धन्याच्या हाताकडे असतात तसे आमचा देव परमेश्वर... त्याच्याकडे आमचे डोळे लागलेले असतात” (स्तोत्र १२३:२).**

या वचनातून देवावर संपूर्णपणे अवलंबून राहण्याविषयी सांगितले आहे. दासाचे डोळे धन्याकडे असतात तसे आमचे डोळे देवावर खिळलेले असावेत. याच प्रकारे त्याच्या मुखाचे ज्ञान होते आणि तो आम्हांला प्रकट होतो (यशया ५३:१). आम्ही त्याच्याकडे वर नजर करुन पाहणे थांबवले की आमची आत्मिक शक्ती ओसरु लागते. आमची ताकद नाहीशी होते ती बाह्य गोष्टींमुळे नाही तर आमच्या विचारांमध्ये समस्या आल्याने. आम्ही चुकीने म्हणतो, “मी स्वतःची खूपच ओढाताण करतो सामान्य नम्र व्यक्ती न राहता उगाचच देवासारखे दिसण्याचा खटाटोप चालवला आहे.”

तुमच्या जीवनात काही पेच येतो, तुम्ही देवाचा पक्ष घेता, तुम्ही केलेत ते योग्यच अशी आत्म्याची साक्षही मिळते. पण आता आठवडेच्या आठवडे, वर्षेच्या वर्षे गेली; आता अखेर तुम्ही म्हणता, “मी फारच उथळ होतो, अहंकारी झालो, मी घेतला तो पवित्रा मला झेपणारा नव्हता.” तुमचे “बुद्धिवादी” मित्र म्हणतात “उगाच बावळटपणा नको. आत्मिक जागरणाविषयी तू प्रथम बोललास तेव्हाच आम्ही ओळखले होते हा तात्पुरता आवेश आहे, त्यातील ताण तुला सोसवणार नाही आणि तुम्ही सहन करावे अशी देवाची इच्छा नाही.” मग तुम्ही म्हणता, “होय मी खूपच अपेक्षा ठेवून होतो.” हे वरकरणी नम्रपणाचे वाटते पण देवावरचा तुमचा भरंवसा संपला असेच चित्र यातून समोर येते. आता तुम्ही जगाच्या विचारावर विसंबून राहता. देवावर भरंवसा नसला की तुम्ही त्याच्याकडे पाहात नाही. देव तुम्हांला थांबवतो तेव्हा आपले सर्व चुकले ही जाणीव होते. आत्मिक शक्ती ओसरु लागली तर लगेच सावध व्हा, सुधारणा करा. देव आणि तुम्ही ह्यांच्यामध्ये काही आड येत असेल तर ते काढून टाका.

**नोव्हेंबर २५**

## आत्मिक सुसंगतीचे रहस्य

**“आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो” (गलती ६:१४).**

कोणी व्यक्ती नव्याने जन्मते तेव्हा त्याच्या असंबद्ध भावना आणि बाह्य गोष्टी आणि जीवनातील परिस्थिती यांमुळे त्याला सर्वच विसंगत वाटते. प्रेषित पौलाच्या जीवनात सक्षम आणि सुस्थिर सुसंगती होती. परिणामी त्याला कोणत्याही ताणतणावाशिवाय त्याचे बाह्य जीवनात पालटता येत होते; कारण तो देवामध्ये रोपलेला आणि मुळावलेला होता. आमच्यापैकी बहुतेकजण आत्मिक दृष्टीने सुसंगत नसतात कारण बाह्यता सुसंगत असण्याचा त्यांचा सततचा प्रयत्न असतो. बाह्य गोष्टींच्या संबंधात बोलायचे तर पौल तळघरात राहात होता आणि त्याचे टीकाकार उच्च पातळीवर राहत होते. या दोन पातळ्या परस्परांना स्पर्श करीत नाहीत. परंतु पौलाचा सुसंगतपणा अत्यंत खोलवरचा होता. जगाच्या मुक्तीसाठी देवाने सोसलेल्या यातना म्हणजे ख्रिस्ताचा वधस्तंभ हाच त्याच्या सुसंगतपणाचा मुख्य मोठा आधार होता.

तुमचा विश्वास पुन्हा स्वतःला सांगा. ख्रिस्ताचा वधस्तंभ या आधाराकडे परत या, त्यावर न आधारलेला विश्वासाचा पैलू दूर करा. लौकिक इतिहासात वधस्तंभ अगदीच क्षुल्लक गोष्ट आहे, परंतु पवित्र शास्त्राच्या दृष्टीने जगातील सर्व साम्राज्यांपेक्षा तो अधिक महत्त्वाचा आहे. उपदेश करताना आम्ही वधस्तंभावरील देवाची शोकात्मिका वजा केली तर आमचा उपदेश निष्फळ ठरणार. उपदेश आकर्षक असेल, पण त्यातून देवाची ऊर्जा माणसापर्यंत येणार नाही कारण उपदेश शक्तीहीन असेल, पण आम्ही वधस्तंभाचा संदेश देतो तेव्हा देवाची ऊर्जा प्रसारित व वितरित होते. “... गाजवलेल्या वार्तेच्या मूर्खपणाच्या योगे विश्वास ठेवणाऱ्या लोकांचे तारण करणे देवाला बरे वाटले... आम्ही तर वधस्तंभावर खिळलेला ख्रिस्त गाजवतो...” (१ करिंथ १:२१, २३).

**नोव्हेंबर २६**

## आत्मिक शक्तीचा केंद्रबिंदू

**“आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाशिवाय...” (गलती ६:१४).**

तुम्हांला देवाचे सामर्थ्य (म्हणजे येशूचे पुनरुत्थित जीवन) आपल्या मानवी देहात जाणून घ्यायचे असेल तर तुम्ही देवाच्या शोकांतिकेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तुमच्या स्वतःच्या आत्मिक स्थितीची काळजी करणे सोडा आणि अगदी मोकळ्या मनाने देवाच्या शोकांतिकेचा विचार करा. क्षणार्धात देवाचे सामर्थ्य तुमच्यामध्ये येईल. “मजकडे वळा...” (यशया ४५:२२). बाह्य स्रोताकडे लक्ष द्या आंतरिक सामर्थ्य मिळेलच. आम्ही योग्य व उचित गोष्टीकडे लक्ष देत नाही म्हणून आम्ही सामर्थ्य गमवतो. तारण, पवित्रीकरण, आरोग्य वगैरे वधस्तंभाचे परिणाम आहेत. पण आपण यातील कोणत्याच बाबीवर उपदेश करायचा नाही. आम्ही फक्त “येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त...” ह्याचाच संदेश द्यावा. येशूची घोषणा केल्याने इष्ट ते कार्य आपोआप साधेल. उपदेश करताना देवाच्या केंद्रबिंदूवर लक्ष केंद्रित करा, तुमचे श्रोते लक्ष देत नाहीत असे वाटले तरी उपदेश ऐकल्यावर ते परत पूर्वीसारखे कधीच राहणार नाहीत. माझी स्वतःची वचने सांगितली तर तुमची वचने मला जेवढी महत्त्वाची आहेत तेवढीच माझीही त्यांना वाटतील. त्यांचा प्रभाव पडणार नाही. पण देवाचे सत्य एकमेकांना सांगितले तर त्याचा प्रभाव पुन्हापुन्हा प्रत्ययास येईल. आत्मिक शक्तीच्या महान मुद्यावर म्हणजे वधस्तंभावर आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे. तर त्याचे सामर्थ्य आमच्या जीवनात कार्यकारी होते. पवित्रता, चळवळ आणि आत्मिक अनुभव सभांमध्ये ख्रिस्ताच्या वधस्तंभावर नव्हे तर वधस्तंभाच्या परिणामांवर लक्ष केंद्रित केलेले असते.

आता मंडळीच्या दुर्बलतेवर टीका केली जाते, ही टीका रास्तच आहे. आत्मिक सामर्थ्याच्या खऱ्या केंद्रावर लक्ष लावलेले नसते हे याचे एक कारण आहे. खंडणी भरुन प्राप्त केलेल्या मुक्तीचा अर्थ आणि काल्वरीची शोकांतिका यावर आम्ही पुरेसे लक्ष दिलेले नाही.

## आध्यात्मिक सामर्थ्याचा अभिषेक

**"... त्याच्या द्वारे जग मला वधस्तंभावर खिळलेले आहे व मी जगाला खिळलेला आहे" (गलती ६:१४).**

मी ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे चिंतन, मनन केले तर मी अंतरंगात केवळ भक्तिपरायण होत नाही आणि सर्वस्वी माझ्या पवित्रतेकडे लक्ष दिले तर मी येशू ख्रिस्ताच्या हिताकडे सर्वस्वी लक्ष देतो. आमचा प्रभू संन्यासी अगर आत्मत्याग करणारा कट्टर साधू नव्हता. त्याने स्वतःला समाजापासून अलग ठेवले नाही पण अंतरंगात तो नेहमीच अलिप्त होता. तो तुसडा नव्हता. तो दुसऱ्याच जगात राहात होता. खरे तर तो सर्वसामान्य जगातच एवढा गढलेला होता की त्याकाळच्या धर्म पुढाऱ्यांनी तो खादाड व मद्यपी असल्याचा आरोप केला. पण आमच्या प्रभूने त्याच्या आत्मिक सामर्थ्याच्या अभिषेकात कसलाही व्यत्यय येऊ दिला नाही.

पुढे वापरण्यासाठी आत्मिक शक्ती जपून ठेवण्यासाठी आता देवाच्या सेवेस नकार देणे योग्य नाही. ही घोर चूक आहे. देवाच्या आत्म्याने अनेक लोकांना त्यांच्या पापांपासून मुक्त केले आहे; तरीही त्यांना स्वतंत्रतेचा खरा अनुभव आलेला नाही; आज आम्ही पाहतो ते धर्मनिष्ठ जीवन येशू ख्रिस्ताच्या जोरदार पवित्रतेच्या जीवनापेक्षा सर्वस्वी वेगळे आहे. "तू त्यांना जगातून काढून घ्यावे अशी विनंती मी करीत नाही तर तू त्यांना वाईटापासून राखावे अशी विनंती करतो" (योहान १७:१५) आम्ही जगात असलो तरी जगाचे व्हायचे नाही बाह्यतः नाही तर आतून वेगळे असावे (पहा योहान १७:१६).

आत्मिक सामर्थ्याच्या आमच्या अभिषेकात आम्ही कशाचाही व्यत्यय येऊ देऊ नये. देवाच्या सेवेसाठी वाहून घेणे ही आमची जबाबदारी आहे. पवित्रीकरण ही देवाची जबाबदारी आहे. देवाला महत्त्वाचे तेच आम्हांला महत्त्वाचे करण्याचा आम्ही जाणून बुजून निश्चय केला पाहिजे. हे करणे सोपे जावे यासाठी स्वतःला विचारावे, "या गोष्टीत येशू ख्रिस्ताला रस आहे का यात येशूला विरोध करणाऱ्या आत्म्याला रस आहे?"

## कंगालाची संपत्ती

**“देवाच्या कृपाने... ते विनामूल्य नीतिमान ठरतात” (रोम ३:२४).**

देवाच्या कृपेची सुवार्ता मानवी अंतःकरणात तीव्र इच्छा जागृत करते त्याबरोबर तेवढीच तीव्र नाराजीही पुढे येते; कारण येथे प्रकट होणारे सत्य सहजी पचनी पडणारे नसते. लोकांमध्ये असणाऱ्या अहंकारापोटी ते देत राहतात. पण पुढे येऊन देणगी स्वीकारणे त्यांना जमत नाही. रक्तसाक्षी होण्यासाठी मी माझे प्राण अर्पण करीन, अन्य काहीही करीन पण नरकात जाण्यास पात्र असलेल्या पाप्याच्या पातळीवर आणून माझा अपमान करु नका. येशू ख्रिस्ताच्या द्वारे तारणाची देणगी स्वीकारण्यास मला सांगू नका.

आमच्या स्वतःच्या प्रयत्नांनी आम्हांला देवाकडून काही मिळवणे किंवा जिंकून घेणे अशक्य आहे हे समजून घ्यावे. आम्ही ते देणगी म्हणूनच घ्यावे नाहीतर स्वस्थ बसावे. आम्ही कंगाल दरिद्री आहो ही जाणीव झाली की सर्वात महान आशीर्वादाची प्राप्ती होते. तेथे जाईपर्यंत आमचा प्रभू शक्तिहीन असतो. आमचे आम्ही पुरुन उरणारे आहोत असे म्हणत राहिलो तर तो आमच्यासाठी काहीही करु शकणार नाही. दारिद्र्याच्या दाराने आम्ही त्याच्या राज्यात प्रवेश केला पाहिजे. आम्ही विशेषेकरुन अभिमान व स्वतंत्रता या बाबतीत स्वतःला “सधन” समजतो तोवर देव आमच्यासाठी काहीही करु शकणार नाही. आत्मिक दृष्टीने भुकेले झालो की आम्हांला पवित्र आत्मा मिळतो. पवित्र आत्मा आमच्यामध्ये देवाचा स्वभाव घालून प्रभावी करतो. नवजीवन देणारे येशूचे जीवन तो आम्हांला देतो आणि आम्ही खरोखरी जिवंत होतो. आमच्या “पलीकडचे” असलेले तो “आमच्यामध्ये” आणतो. “पलीकडे” होते ते “अंतरंगात” आले की ते लगेच वर “अंतराळात” चढते आणि येशू राहतो व राज्य करतो तेथवर आम्हांला वर उचलण्यात येते (पहा योहान ३:५).

**नोव्हेंबर २९**

## येशू ख्रिस्ताची सर्वश्रेष्ठता

**“तो माझे गौरव करील...” (योहान १६:१४).**

आजच्या पवित्रता चळवळींमध्ये नव्या करारातील कणखर वास्तवता नाही. तेथे येशू ख्रिस्ताच्या मरणाची गरज आढळत नाही. सात्विक, भक्तिमय वातावरण, प्रार्थना आणि भक्ती एवढेच पुरेसे आहे. या प्रकारचा अनुभव नाही अलौकिक, नाही अद्‌भुत! यासाठी देवाला दुःख सोसण्याचे कारण नाही आणि यावर “कोकऱ्याच्या रक्ताचे” डागही नाहीत (प्रकटी १२:११). तसेच येथे अस्सलपणाबद्दल पवित्र आत्म्याची मोहोरही उठवलेली नाही, “हे सर्वसमर्थ देवाचे कार्य आहे!” असे चकित होऊन म्हणण्यास लोकांना जागा नाही. नवा करार तर सर्वस्वी देवाच्या कार्याविषयीच आहे.

ख्रिस्ती अनुभवाचे नव्या करारातील उदाहरण म्हणजे येशू ख्रिस्तावर व्यक्तिशः उत्साही निष्ठा. इतर प्रत्येक प्रकारचा तथाकथित ख्रिस्ती अनुभव ख्रिस्ताच्या व्यक्तित्वापासून वेगळा केलेला आहे. त्यात पुनरुज्जीवन नाही. ख्रिस्त राहतो व राज्य करतो तेथे नव्याने जन्मून जाणे नाही. तो आमचा आदर्श आहे एवढा फक्त विचारच आहे. पण नव्या करारामध्ये येशू आदर्श असण्या अगोदर तो तारणारा आहे. आज एका धर्माचा नामधारी प्रमुख म्हणून त्याचे वर्णन करतात. केवळ आदर्श! आदर्श तर तो आहेच पण तो त्याहून अधिक आहे. तो प्रत्यक्ष तारण आहे, देवाची सुवार्ता आहे!

येशूने म्हटले, “तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा... तो माझे गौरव करील” (योहान १६:१३-१४). नव्या करारातील प्रकट सत्याच्या मी अधीन होतो तेव्हा मला देवाकडून पवित्र आत्मा ही देणगी मिळते. येशूने केले ते मला तो आत्मा उलगडून सांगतो. येशूने माझ्यासाठी बाह्यत्कारी केले ते सर्व देवाचा आत्मा माझ्या अंतरंगात करतो.

**नोव्हेंबर ३०**

## येशू ख्रिस्ताची सर्वोच्चता

**“तरी जो काही मी आहे तो देवाच्या कृपेने आहे आणि माझ्यावर त्याची जी कृपा झाली आहे ती व्यर्थ झाली नाही...” (१ करिंथ १५:१०).**

आमच्या अक्षमतेविषयी आम्ही बोलतो तो प्रकार आमच्या निर्माणकर्त्याचा अपमान करणारा आहे. आमच्या अकार्यक्षमतेविषयी कुरकूर करणे हे आमच्याकडे दुर्लक्ष केले असा खोटा आरोप देवावर केल्यासारखे आहे. माणसांना क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींकडे देवाच्या दृष्टीने पाहण्यास शिकावे. आपले बोलणे त्याचा अनादार करणारे व अनाठायी आहे “हे पाहून तुम्हीच चकित व्हाल. आम्ही म्हणतो, “मी काही पवित्र नाही माझे पवित्रीकरण झाले आहे असे मी तरी म्हणणार नाही.” हेच देवासमोर बोलणे म्हणजे, “नाही, प्रभू, माझे तारण करुन मला पवित्र करणे तुला शक्य नाही. मला काही संधी मिळाली नाही, माझ्या मेंदूमध्ये आणि देहामध्ये अनेक अपूर्णता आहेत तेव्हा प्रभू, ते शक्यच नाही” हे दुसऱ्यांना नम्रपणाचे वाटेल परंतु देवासमोर उद्धटपणाचा पवित्रा आहे.

उलटपक्षी, देवासमोर नम्रतेच्या वाटणाऱ्या गोष्टी लोकांना नेमक्या विरोधी वाटतात, “हे देवा मी तुझा आभारी आहे. मला माहीत आहे माझे तारण आणि पवित्रीकरण झाले आहे.” हे म्हणणे देवाच्या दृष्टीने सर्वस्वी नम्रपणाचे आहे. तुम्ही सर्वस्वी देवाला शरण गेला आहात आणि तो सत्य असल्याचे तुम्हांला समजले आहे; हाच तुमच्या बोालण्याचा अर्थ आहे. तुम्ही म्हणता ते दुसऱ्यांना नम्रतेचे वाटते का नाही याची चिंता करु नका. नेहमी देवासमोर नम्र राहा. त्याला तुमचे होऊ द्या.

तुमचा वैयक्तिक तारणारा आणि प्रभू ह्याच्याशी तुमचे व्यक्तिगत नाते हे एकच नाते महत्त्वाचे आहे. हे एकच नाते सांभाळा आणि सर्व सोडून द्या; देव आपले उद्दिष्ट तुमच्या जीवनातून पूर्ण करील. देवाच्या उद्दिष्टासाठी एक वैयक्तिक जीवन मोलवान आहे, ते जीवन तुमचेच असेल.

**डिसेंबर १**

## नियमशास्त्र आणि सुवार्ता

**“कारण जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो तो सर्वांविषयी दोषी होतो” (याकोब २:१०).**

नीतिनियमात मनुष्यप्राणी म्हणून आमच्या दुर्बलतेचा विशेष विचार केलेला नाही. खरे तर त्यात आमची आनुवंशिकता आणि अशक्तपण यांचा विचारच नाही. आम्ही सर्वस्वी नीतीने वागावे हेच त्याचे म्हणणे आहे. समाजातील उच्च वर्गातील लोक अगर जगातील दरिद्री अशा कोणाहीसाठी हा नियम बदलत नाही. हा सदासर्वकाळचा कधीच न बदलणारा नियम आहे. तो देवाने नेमला आहे. आमचे उणेपण जाणून तो दुर्बलांसाठी दुर्बल होत नाही. तो सर्वकाळ परम राहतो. हे लक्षात आले की लगेच आमचे जीवन घातक शोकांतिका होते. “मी नियमशास्त्र विरहित होतो तेव्हा जगत होतो; पण आज्ञा आल्यावर पाप संजीवित झाले आणि मी मरण पावलो” (रोम ७:९). हे लक्षात आले की लगचे देवाचा आत्मा पापाविषयी माझी खातरजमा करतो. येथवर आलेल्या व्यक्तीला आपल्याला आशाच नाही हे जाणवेपर्यंत ख्रिस्ताचा वधस्तंभ त्याला अप्रस्तुत वाटतो. पापाची खातरी पटल्याने नियमांच्या बंधनांचे भय पडते. परिणामी ही व्यक्ती आशाहीन “पापाला विकलेली” होते (रोम ७:१४). मी पापदोषी, अपराधी देवाबरोबर सरळ होण्यासाठी मला कधीच काही करता येणार नाही. येशू ख्रिस्ताचे मरण या एकाच मार्गाने परमेश्वराबरोबर माझा संबंध सरळ होईल. आज्ञापालनाने मी परमेश्वराशी सरळ होईन ही भलतीच कल्पना सोडली पाहिजे. देवाचे परिपूर्ण आज्ञापालन कोणालाच करता येत नाही.

नैतिक नियमासोबत अट व अभिवचन आहे हे समजले की आपणाला त्याचे सामर्थ्य समजते. देव आमच्यावर सक्ती करत नाही. आम्हांलाच कधी वाटते त्याने आम्हांला आज्ञाधारक करावे, कधी वाटते आम्हांला तसेच सोडावे देवाची इच्छा सर्व दडपणे दूर करु शकते. त्याच्या आज्ञा पाळाव्या असा निश्चय केला की तो आकाशपातळ एककरुन आपल्या पूर्ण समार्थ्याने आम्हांला साहाय्य करतो.

**डिसेंबर २**

## ख्रिस्ती परिपूर्णता

**“एवढ्यातच मी मिळवले किंवा एवढ्यातच मी पूर्ण झालो आहे असे नाही...” (फिलिप्पै ३:१२).**

आपल्या कर्तृत्वाचे आदर्श परिपूर्ण नमुने लोकांपुढे ठेवावे ही देवाची इच्छा असल्याचा समज चुकीचा आहे. आम्हांला स्वतःशी समरुप करावे हेच त्याचे उद्दिष्ट आहे. आपल्या संग्रहालयात ठेवण्यासाठी पवित्रतेचे नमुने देव तयार करतो. यावर पवित्रता चळवळींचा भर आहे. व्यक्तिगत पवित्रतेची संकल्पना स्वीकारली तर तुमच्या जीवनाचे निर्धारित उद्दिष्ट देवासाठी नव्हे तर आपल्या जीवनात देवाचे प्रमाण दिसण्यासाठीच आहे असे होईल. “मी आजारी पडावे असे देवाला वाटणे शक्य नाही” हे आपण कसे म्हणावे? कारण आपल्या पुत्राला “ठेचावे असे परमेश्वराच्या मर्जीस आले” (यशया ५३:१०). मग त्याने तुम्हांला का ठेचू नये? पवित्रजन कसा असावा या सततच्या विचाराने तुमच्या जीवनातून देव प्रकट होतो असे नाही. तुम्ही आजारी अगर निरोगी कसेही असला तरी येशू ख्रिस्ताबरोबरचे तुमचे नाते यातूनच देव प्रकट होतो.

ख्रिस्ती परिपूर्णता कधीही मानवी परिपूर्णता होणार नाही. ख्रिस्ती परिपूर्णता मानवीजातीच्या बिनमहत्त्वाच्या बाबतीतही देवाबरोबरच्या परिपूर्ण नात्यातून प्रत्ययास येते. येशूच्या पाचारणाला होकार दिलात की तुम्हांला कराव्या लागणाऱ्या गोष्टींची निरर्थकता तुम्हांला जाणवते. मग दुसरे लोक सुसंगत जीवन जगताना आढळतात. यामुळे तुम्हांला वाटेल देवाची काही गरज नाही. तुमचे स्वतःचे प्रयत्न आणि निष्ठा यांच्यायोगे तुम्हांला तुमच्या जीवनासाठी देवाचा मापदंड ठेवता येईल. पण पतित जगामध्ये हे कधीही शक्य नाही. देवाबरोबर अशा काही परिपूर्ण नात्यात राहण्यास मला पाचारण आहे की त्यामुळे माझ्या जीवनातून दुसऱ्यांच्या जीवनात देवाची ओढ निर्माण व्हावी. त्यात माझी प्रशंसा मुळीच नसावी. स्वतःविषयी केलेल्या विचारांनी देवाला माझी उपयुक्तता कमी होते. आपल्या महालात, कपाटात विजयचिन्ह म्हणून मला ठेवावे ही देवाची इच्छा नाही. तर माझा उपयोग व्हावा. यासाठीच तो मला परिपूर्ण करत आहे. त्याच्या इच्छेला येईल ते तो करो.

**डिसेंबर ३**

## “बलाने नव्हे, पराक्रमाने नव्हे...”

**“... माझे भाषण व माझी घोषणा ज्ञानयुक्त अशा मन वळवणाऱ्या शब्दांची नव्हती तर आत्मा व सामर्थ्य ह्यांची निदर्शक होती” (१ करिंथ २:४–५).**

सुवार्ता सांगताना सुवार्तेच्या सामर्थ्यावर भरंवसा असावा यासाठी तारणाच्या मार्गाचे तुमचे ज्ञान तुम्ही बदली म्हणून घातले तर लोकांना सत्याकडे येण्यास प्रतिबंध होतो. तारणाच्या मार्गाचे तुमचे ज्ञान सांगताना आपला स्वतःचा देवावरील विश्वास दृढ आहे याची खात्री करुन घ्या. आपल्या उपदेशामध्ये स्पष्टपणावर विसंबून राहू नका तर पवित्र आत्म्यावर विसंबून संदेश द्या. देवाच्या तारणदायी सामर्थ्यावर भरंवसा ठेवा; तो स्वतःच लोकांच्यामध्ये स्वतःचे जीवन उत्पन्न करील.

एकदा तुम्ही सत्यतेमध्ये मुळावलात की मग तुम्ही कशानेही ढळणार नाही. तुमचा विश्वास अनुभवांवर असेल तर घडणाऱ्या कोणत्याही गोष्टीने तो विश्वास डळमळीत होईल. पण देव आणि तारणाची सत्यता यांमध्ये कशानेही बदल होणार नाही. यावरच तुमचा विश्वास आधारलेला असावा. मग तुम्ही देवाएवढेच सर्वकालात दृढ असाल. येशू ख्रिस्ताशी वैयक्तिक नाते जोडलेत की तुम्ही कशानेही ढळणार नाही. हाच पवित्रीकरणाचा अर्थ आहे. पवित्रीकरण हा केवळ अनुभव आहे या कल्पनेला चिकटून राहणारे आमचे मानवी प्रयत्न देवाला पसंत नाहीत. कारण पवित्रीकरणही पवित्र केले पाहिजे हे आपण विसरतो (पहा योहान १७:१९). मी माझे पवित्र झालेले जीवन समजून उमजून देवाच्या सेवेसाठी त्याला दिले पाहिजे; त्यामुळे आपले हात व पाय म्हणून तो माझा उपयोग करुन घेईल.

डिसेंबर ४

## विरोधाचा नियम

**“... जो विजय मिळवतो त्याला...” (प्रकटी २:७).**

लौकिक किंवा अलौकिक क्षेत्रांमध्ये लढाईशिवाय जीवन अशक्य आहे. जीवनाच्या भौतिक, मानसिक, नैतिक आणि आत्मिक विभागात द्वंद्व सतत चालूच आहे. माझ्या देहाचे भौतिक शारीरिक भाग आणि माझ्या भोवती असलेली बले आणि वस्तू यांच्यामध्ये आरोग्य समतोल साधते. आरोग्य उत्तम राहण्यासाठी बाह्य गोष्टींशी सामना करण्यासाठी पुरेशी आंतरिक शक्ती असणे गरजेचे आहे. माझ्या शारीरिक जीवनाच्या बाहेरची प्रत्येक गोष्ट माझ्या मृत्यूसाठी योजिलेली आहे. मी जिंवत असताना मला आधार देणारी मूलतत्वे शरीर मेले की ते कुजवण्यास व त्याची माती करण्यास कारण होतात. पुरेशी आंतरिक शक्ती असेल तर आरोग्यासाठी आवश्यक तो समतोल मला साधता येतो. मानसिक जीवनाचेही असेच आहे. सक्षम, क्रियाशील मानसिक जीवनासाठी मला लढले पाहिजे. या संघर्षातून विचार हा मनासिक समतोल आकारास येतो.

नैतिक दृष्टीनेही असेच आहे. नैतिक दृष्ट्या सक्षम न करणारी प्रत्येक गोष्ट माझ्यातील सद्‌गुणाचा शत्रू आहे आणि माझ्या जीवनात नैतिकतेची पातळी उच्च असेल तर सद्‌गुण पुढे आणून मी जिंकतो. नैतिकतेने वागण्या– राहण्यास संघर्ष केलाच पाहिजे. नैतिकता योगायोगाने येत नाही, नैतिक सद्‌गुण मिळवावा लागतो.

आत्मिक दृष्टीनेही असेच आहे, येशूने म्हटले, “जगात तुम्हांला क्लेश होतील...” (योहान १६:३३). म्हणजे आत्मिक नसलेली प्रत्येक गोष्ट माझ्या अधःपातास कारण होते. येशूने पुढे म्हटले, “... तरी धीरा धरा मी जगाला जिंकले आहे.” माझ्या पवित्रतेचा समतोल साधला की विरोधाशी व्यवस्थित सामना करता येतो. माझा स्वभाव आणि येशू ख्रिस्तामध्ये व्यक्त झालेला देवाचा नियम या दोहोंमधील पवित्रता हा समतोल आले.

डिसेंबर ५

## “पवित्र आत्म्याचे मंदिर”

### “... राजासनापुरताच काय तो मी तुजपेक्षा मोठा” (उत्पत्ती ४१:४०).

देवाच्या अधिकाराखाली मी माझ्या देहावर नियंत्रण कसे ठेवतो त्याबद्दल मी देवाला उत्तरदायी आहे. “मी देवाची कृपा व्यर्थ करीत नाही” (गलती २:२१) असे पौलाने म्हटले आहे. देवाची कृपा निरपवाद आणि अमर्याद आहे. येशूच्या द्वारे तारणाचे कार्य कायमचे पूर्ण झाले आहे. माझे तारण होते आहे असे नसून ते झाले आहे. देवाचे राजासन आहे तसे तारणही सार्वकालिक आहे. देवाने माझ्यामध्ये ठेवले आहे ते मला कारणी लावले पाहिजे. “आपले (माझे) तारण साधून घ्या” (फिलिप्पै २:१२). म्हणजे त्याने दिले आहे त्याचा उपयोग करण्यास मी जबाबदार आहे. गुप्तपणे अगर गूढपणे नव्हे तर धीट धैर्याने, उघडपणे माझ्या जीवनातून मी प्रभू येशूचे जीवन दाखवले पाहिजे. “मी आपले शरीर कुदलतो व त्याला दास करुन ठेवतो” (१ करिंथ ९:२७). प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला आपले शरीर देवासाठी संपूर्ण नियंत्रणाखाली ठेवता येते. देवाने आपल्याला आमचे विचार आणि इच्छा यांच्यासह “पवित्र आत्म्याच्या संपूर्ण मंदिरावर” सत्ता ठेवण्याची जबाबदारी दिली आहे (१ करिंथ ६:१९). आम्ही यासाठी जबाबदार आहोत आणि दुसऱ्यांच्या आहारी कधी जाता नये. आम्ही दुसऱ्यांच्या जीवनातील गोष्टींबद्दल त्यांना दोष देतो आणि आमच्यामधील त्याच गोष्टीविषयी सबबी सांगतो.

“पौलाने म्हटले, “... मी... तुम्हांला विनवतो की तुम्ही आपली शरीरे जिवंत यज्ञ म्हणून समर्पण करावी...” (रोम १२:१). माझे शरीर खरोखर त्याचे मंदिर होईल का नाही याविषयी मी माझा प्रभू आणि स्वामी ह्याच्याशी सहमत आहे का याचाच निर्णय मला करायचा आहे. एकदा मी होकार दिली की नियमशास्त्राचे सर्व कायदेकानू व आवश्यकता, माझ्या शरीराच्याबाबतीतील सर्व प्रतिबंध माझे शरीर “पवित्र आत्म्याचे मंदिर आहे” या प्रकट सत्यात सामावले आहे.

**डिसेंबर ६**

## “मेघांमध्ये माझे धनुष्य”

**“मी मेघांत धनुष्य ठेवले आहे, ते पृथ्वीच्या व माझ्यामधल्या कराराचे चिन्ह होईल” (उत्पत्ती ९:१३).**

सर्व मनुष्यांनी देवाबरोबर न्याय्य व रास्त संबंध ठेवावेत ही त्याची इच्छा आहे. त्याच्या सर्व करारांचा उद्देश हाच आहे. देव माझे तारण का करीत नाही? त्याने तारण साधले आहे, तरतूदही केली आहे. परंतु मी अद्याप त्याच्याशी नाते जोडलेले नाही. आम्ही सांगतो ते सर्व देव का करीत नाही? त्याने सर्व केले आहे. मी कराराचे ते नाते स्वीकारीन का? देवाचे सर्व महान आशीर्वाद पूर्ण व संपूर्ण झाले आहेत. परंतु त्याच्या कराराच्या आधाराने त्याच्याशी नाते जोडीपर्यंत मला त्यांचा लाभ मिळणार नाही.

देवाने कार्य करावे यासाठी प्रतीक्षा करणे हा दैहिक अविश्वास आहे. म्हणजे माझा त्याच्यावर विश्वास नाही हाच अर्थ यातून पुढे येतो. त्याने माझ्यासाठी काही करावे म्हणजे मला त्याच्यावर भरंवसा ठेवता येईल. पण देव तसे करणार नाही कारण देव आणि मानव ह्यांच्या नात्याचा तो आधार नाहीच. माणसाने आपले शरीर आणि भावना यांच्यापलीकडे देवाबरोबरच्या करारात गेले पाहिजे. कारण देवही स्वतःपलीकडे जाऊन आपल्या करारातून माणसाशी संपर्क साधतो. देवावर विश्वास असणे महत्त्वाचे आहे. आम्ही तर आमच्या भावनांवर विश्वास ठेवतो. देवाने मला स्पर्शनीय असे काही माझ्या हाती दिल्याशिवाय मी देवावर विश्वास ठेवतच नाही. मग मी म्हणतो, “आता मी विश्वास ठेवतो.” यात कसला आला आहे विश्वास! देव म्हणतो, “... मजकडे वळा, उद्धार पावा...” (यशया ४५:२२). मी देवाबरोबर त्याच्या कराराच्या आधारे काही व्यवहार केला, इतर सर्व सोडून दिले तर त्यात व्यक्तिशः काही साधल्याची जाणीव नसते, त्यात मानवी घटक नसतो. परंतु देवाशी संयुक्त झाल्याची सघन जाणीव असते. माझे जीवन पालटते, शांती व आनंद यांचा अनुभव येतो.

## पश्चात्ताप

**“ईश्वरप्रेरित दुःख तारणदायी पश्चात्तापास कारणीभूत होते…” (२ करिंथ ७:१०).**

“माझी पापे, माझी पापे, हे माझ्या तारका ती तुझ्यावर पडली ही केवढी दुःखाची गोष्ट!” या कवितापंक्तीतून पापाची खातरी वर्णन केली आहे. पापाची खातरी पटणे ही व्यक्तीच्या जीवनात घडणारी असाधारण गोष्ट आहे. येथे देव समजण्याचा आरंभ होतो. पवित्र आत्मा येईल तेव्हा तो पापाविषयी लोकांची खातरी करील (योहान १६:८). पवित्र आत्मा आपला विवेक जागा करतो, आपल्याला देवाच्या सान्निध्यात नेतो; आम्हांला इतरांबरोबरच्या नात्याची नव्हे तर देवाबरोबरच्या नात्याची टोचणी लागते. “तुझ्याविरुद्ध, तुझ्याविरुद्धच मी पाप केले आहे, तुझ्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे…” (स्तोत्र ५१:४). पापाची खातरी, क्षमा आणि पवित्रता हे सगळे इतके घट्ट विणलेले आहे की फक्त क्षमा झालेली व्यक्तीच खरोखर पवित्र असते. त्याच्या पालटलेल्या स्वभावावरुन तो आपल्याला क्षमा झाल्याची साक्ष पटवतो. पश्चात्तापाने व्यक्तीला मी पाप केले आहे ही कबुली देण्यास प्रेरणा मिळते. या त्याच्या म्हणण्यावरुन देव त्याच्या जीवनात कार्य करत आहे हे दिसते.

पश्चात्तापाच्या वेदनांतूनच देवाच्या राज्यात प्रवेश करायचा असतो. त्यात माणसाच्या चांगुलपणाला काही स्थान नसते. यानंतर पवित्र आत्मा त्या व्यक्तीच्या जीवनात देवाच्या पुत्राला साकार करु लागतो (पहा गलती ४:१९). या नवजीवनातून पश्चात्ताप होऊन अबोध पवित्रता मिळते. पश्चात्ताप हाच ख्रिस्ती विश्वासाचा पाया आहे. कोणालाही वाटेल तेव्हा पश्चात्ताप करता येत नाही. पश्चात्ताप ही देवाची देणगी आहे. पूर्वीचे प्युरिटन पंथी “अश्रूंचे दान” मिळावे म्हणून विनंती करीत. पश्चात्तापाच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष केलेत तर तुम्ही अद्याप पापातच आहात असे होईल. खरे पश्चात्तापी आहात का नाही ते तपासून पाहा.

**डिसेंबर ८**

## देवाचे निःपक्षपाती सामर्थ्य

**"... पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळाचे पूर्ण केले आहे" (इब्री १०:१४).**

आमच्या पापांबद्दल आम्हांला वाईट वाटते म्हणून आम्हांला क्षमा झाली आहे असे आपण समजलो तर देवाच्या पुत्राचे रक्त पायदळी तुडवले असे होईल. येशू ख्रिस्ताचे मरण याच कारणाने देव आमची पापे क्षमा करुन ती कायमसाठी विसरतो. त्याने आमच्यासाठी केलेल्या तरतुदीचा म्हणजे ख्रिस्ताच्या वधस्तंभाने साधलेले पापार्पण स्वीकारल्याने आमचा पश्चात्ताप कार्यकारी होतो. "... ख्रिस्त येशू... आपल्याला ज्ञान म्हणजे नीतिमत्त्व आणि पवित्रीकरण आणि खंडणी भरुन प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे" (१ करिंथ १:३०). आमच्यासाठी ख्रिस्त हे सर्व झाला याची जाणीव झाली की देवाचा अपार आनंद आमच्यामध्ये येतो आणि देवाचा आनंद जेथे नसेल तर तेथे मरणदंड अद्याप प्रभावी असतो.

आम्ही कोणीही, कसेही असलो तरी देव स्वतःशी आमचे नाते योग्य प्रकारे जोडतो हे तो येशू ख्रिस्ताच्या मरणाच्या द्वारे करतो. येशू असे करण्यासाठी त्याला विनवतो म्हणून नव्हे तर ख्रिस्ताच्या मरणाने देव हे करतो, हे मिळवता येत नाही. केवळ स्वीकारायचे असते ख्रिस्ताच्या वधस्तंभाची उपेक्षा करुन तारणप्राप्तीसाठी कितीही विनवण्या केल्या तरी त्या निरर्थक आहेत. येशूने उघडलेल्या दाराने आत जाण्याऐवजी भलत्याच्या दारावर ठोकत राहण्यासारखे हे वायफळ आहे. आपण म्हणतो, "पण मी इकडून येणार नाही, त्यात अपमान आहे, मी पापी म्हणू येऊ काय?" देवाने पेत्राच्या द्वारे सांगितलेच आहे "जेणेकरुन आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव... नाही" (प्रे. कृ. ४:१२). देवाचे कठोरपण भासते ते वस्तुतः त्याचे हृद्गत आहे. "त्या प्रियकराच्याठायी त्याच्या रक्ताच्याद्वारे खंडणी भरुन मिळवलेली मुक्ती... आपल्याला मिळाली आहे" (इफिस १:७). येशू ख्रिस्ताच्या मरणाशी समरुप होणे म्हणजे तो वगळून इतर सर्व गोष्टींना मरणे. ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या प्रायश्चित्त अर्पणाने देव अपवित्र लोकांना पवित्र करतो. आम्ही सगळे वाईट असताना आम्ही सर्व चांगले आहे असा बहाणा देव करीत नाही.

डिसेंबर ९

## स्वाभाविकतेचा विरोध

**"जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी विकार व वासना ह्यांच्यासह देहस्वभाव वधस्तंभावर खिळला आहे" (गलती ५:२४).**

तसे पाहता नैसर्गिक-स्वाभाविक जीवन पापी नाही. परंतु आम्ही पाप सोडावे, कोणत्याही प्रकारे त्याच्याशी संपर्क ठेवू नये. पाप नरकाचे आणि सैतानाचे आहे. मी देवाचे मूल असून स्वर्गाचा व देवाचा आहे. येथे केवळ पाप सोडण्याचाच प्रश्न नाही, मी स्वतःवरचा हक्क, माझे स्वाभाविक स्वातंत्र्य आणि स्व इच्छा या सर्वांचा त्याग केला पाहिजे. लढाईचा प्रसंग येथेच येतो. स्वाभाविक दृष्टीने योग्य, रास्त व उदात्त आणि चांगल्या वाटणाऱ्या गोष्टीच आम्हांला देवाचे सर्वोत्तम होण्यापासून वंचित ठेवतात. स्वाभाविक नैतिक चांगुलपणा आमच्या देवाला समर्पित होण्याच्या आड येतो हे आमच्या लक्षात आले की आम्ही आमचा आत्मा थेट रणभूमीवर आणतो. जे वाईट, ओंगळ त्याविषयी दुमत असणार नाही, परंतु चांगल्याविषयी मात्र आमचे एकमत होत नाही. पण चांगले तेच जे उत्तम त्याला विरोध करते. नैतिक चांगुलपणाची उच्च पातळी गाठली की येशू ख्रिस्ताला तेवढा हिरिरीने विरोध होतो. "जे येशू ख्रिस्ताचे आहेत त्यांनी... देहस्वभाव वधस्तंभावर खिळलेला आहे." यात तुमच्या स्वाभाविक जीवनाला एक दोन गोष्टींचा त्याग करुन चालणार नाही तुम्हांला सर्व सोडले पाहिजे. येशूने म्हटले, "माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने *स्वतःचा त्याग* करावा" (मत्तय १६:२४). त्याने स्वतःवरचा हक्क सोडावा आणि येशू ख्रिस्त कोण आहे ते नीट समजून घ्यावे. आपल्या स्वातंत्र्याच्या अंत्ययात्रेस गैरहाजर राहू नका!

स्वाभाविक जीवन आत्मिक नसते. ते त्यागाने आत्मिक करावे लागते. आम्ही जाणीवपूर्वक स्वाभाविकाचा त्याग केला तरच अलौकिक आपणाला लौकिक होईल. हे करण्याचा उपाय आपल्याच हाती आहे. यात प्रार्थनेचा नव्हे तर त्याग करुन त्याची इच्छा पूर्ण करणे हे महत्त्वाचे आहे.

## स्वाभाविकतेचे अर्पण

**“कारण शास्त्रांत असे लिहिले आहे की, अब्राहामाला दोन मुलगे होते, एक दासीपासून झालेला व एक स्वतंत्र स्त्रीपासून झालेला” (गलती ४:२२).**

येथे पौल पापाचा नव्हे तर स्वाभाविक आणि आत्मिक यांच्यातील संबंधाविषयी सांगत आहे. अर्पणाच्या द्वारेच स्वाभाविक ते आत्मिकात बदलता येते हे नसेल तर व्यक्तिचे जीवन द्विधा होईल. स्वाभाविकाचा त्याग करावा असे देवाने का सांगितले? ही देवाची परिपूर्ण इच्छा नसून केवळ अनुमती आहे. आज्ञापालनाच्या द्वारे स्वाभाविक ते आत्मिकात बदलावे ही देवाची इच्छा आहे. स्वाभाविक ते सोडून देण्याची पाळी पापामुळे आली.

इसाहाकाचे अर्पण करण्यापूर्वी अब्राहामाला इश्माएलाचे अर्पण करावे लागले (पहा उत्पत्ती २१:८–१४). देवाला स्वाभाविक ते अर्पण करण्यापूर्वी आत्मिक ते अर्पण करण्याचा प्रयत्न आमच्यातले काहीजण करतात. आत्मिक अर्पण करण्याचा एकच मार्ग आहे. देवाला “आपली शरीरे जिवंत... यज्ञ म्हणून समर्पण करावी...” (रोम १२:१). पापापासून सुटका करणे एवढाच पवित्रीकरणाचा अर्थ नाही. माझ्या तारणकर्त्या देवाला माझे स्वतःचे जाणीवपूर्वक अर्पण करुन पडेल ती किंमत देण्यास तयार असणे हाच त्याचा अर्थ आहे,

जे लौकिक ते आत्मिकाला समर्पित केले नाही तर स्वाभाविक जीवन आमच्यामधील देवपुत्राच्या जीवनाला विरोध करील मग सततचा गोंधळ उडेल. आत्मिक स्वभावाला शिस्त नसली की नेहमी असेच होते. आम्ही स्वतःला कोणत्याच प्रकारे शिस्त लावीत नाही. लहानपणी शिस्त लावली नसेल तर आता लावा; नाहीतर आयुष्याचा नाश होईल. स्वाभाविक जीवनावर नियंत्रण ठेवावे असे आपण ठरवले तर देव आम्हांला सर्व प्रकारे साहाय्य करील आणि स्वाभाविकासाठीची सर्व अभिवचने पूर्ण करील (पहा उत्पत्ती २१:१५–१९).

**डिसेंबर ११**

## स्वतंत्र व्यक्तित्व

**“मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःचा त्याग करावा...” (मत्तय १६:२४).**

आंतरिक आत्मिक जीवनावरचे बाह्य कठीण कवच म्हणजेच स्वतंत्र व्यक्तित्व! या व्यक्तित्वामुळे लोक एकमेकापासून विभक्त होतात. हे व्यक्तित्व लहान मुलांमध्ये उठून दिसते. स्वतंत्र व्यक्तित्व बरोबर आत्मिक जीवन असे समीकरण मांडले तर आपण एकाकी होतो. आत्मिक जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी देवाने या कवचाची योजना केली आहे. आमचे आत्मिक जीवन देवाला अनुसणारे असावे यासाठी हे व्यक्तित्व देवाला समर्पण केले पाहिजे. स्वतंत्र व्यक्तित्व आत्मिक असल्याचा बहाणा करते. देवाने मानवी स्वभाव स्वतःसाठी नेमला आहे पण हे व्यक्तित्व तो स्वार्थासाठी वापरतो.

स्वतंत्रता आणि स्वार्थ ही स्वतंत्र व्यक्तित्वाची लक्षणे आहेत. आमच्या व्यक्तित्वाचे घोडे सतत पुढे दामटले की आम्हीच आमची आत्मिक वाढ खुंटवतो. “मी विश्वास ठेवू शकत नाही,” असे म्हणता तेव्हा तुमचे व्यक्तित्वच आड येते. हे व्यक्तित्व कशाहीवर विश्वास ठेवीत नाही. पण आमचा आत्मा विश्वास ठेवण्यास उत्सुक असतो. देवाचा आत्मा तुमच्यामध्ये कार्य करतो तेव्हा सावध राहा. हा आत्मा तुम्हांला निवड करण्यास लावतो. तुम्हांला शरणागती पत्करावी लागते. अगर मख्खपणे स्वस्थ बसावे लागते. व्यक्तित्वाचे कठीण कवच भेदिले की आत्मिक जीवन पुढे येते. पवित्र आत्मा ते एकाच गोष्टीस साजेसे करतो (पहा मत्तय ५:२३−२४). तुमच्या भावाशी समेट करण्याच्या आड तुमचे हे व्यक्तित्वच येते (५:२४). देव आपल्याशी तुमचे ऐक्य करणार आहे. पण प्रथम तुम्ही स्वतःवरचा आपला हक्क सोडला पाहिजे. “त्याने स्वतःचा त्याग करावा.” स्वतःवरचा स्वतंत्र हक्क सोडला की मग खरे जीवन, आत्मिक जीवन वाढू लागेल.

**डिसेंबर १२**

## व्यक्तिमत्व

**“... ह्यासाठी की, जसे आपण एक आहो तसे त्यांनीही एक व्हावे...” (योहान १७:२२).**

आमच्या व्यक्तिमत्वामुळे आपण दुसऱ्यापेक्षा वेगळे होतो. व्यक्तिमत्वाचा विचार करावा तेवढा थोडाच! हा विषय अथांग आहे. सागरामधील एखादे बेट एखाद्या पर्वताचा माथाही असू शकेल. आमचे व्यक्तिमत्व या बेटासारखे आहे. आमच्या जीवित्वाचा थांग आपल्याला लागत नाही; म्हणूनच आम्हांला आपले मोजमाप करता येत नाही. आम्ही विचार करुन थकतो आणि मग लक्षात येते आम्हांला समजून घेणारा एकच आहे– तो आहे आमचा निर्माणकर्ता!

व्यक्तिमत्व हे आंतरिक, आत्मिक मनुष्याचे लक्षण आहे. स्वतंत्र व्यक्तित्व हे स्वाभाविक मनुष्याच्या बाह्यस्वरुपाचे लक्षण आहे. आमच्या प्रभूचे वर्णन स्वतंत्र व्यक्तित्व, स्वतंत्रता अशा शब्दांनी कधीच करता येणार नाही. ते वर्णन त्याच्या संपूर्ण व्यक्तित्वाच्या संबंधात केले पाहिजे. “मी आणि पिता एक आहो” (योहान १०:३०). व्यक्तिमत्व विलीन होते. तुम्ही दुसऱ्या व्यक्तीमध्ये विलीन झालात की तुमची खरी ओळख पटते. प्रीती किंवा देवाचा आत्मा व्यक्तीवर येतो तेव्हा त्याचा पालट होतो. मग तो आपले व्यक्तिमत्व जपण्याविषयी आग्रही असणार नाही. आमच्या प्रभूने कोणाचाही उल्लेख स्वतंत्र व्यक्तित्व म्हणून केला नाही. तो संपूर्ण व्यक्तित्वाच्या संबंधात बोलला. “आपण एक आहोत तसे त्यांनीही एक व्हावे...” आपले स्वतःवरचे हक्क देवाच्या स्वाधीन केले की तुमचा खरा वैयक्तिक स्वभाव देवाला लगेच प्रतिसाद देऊ लागतो. येशू ख्रिस्त तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्व स्वतंत्र करतो तुमच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा पालट होतो. हा पालट प्रीतीने येशूवरील वैयक्तिक निष्ठेने होतो. एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीशी सहभागिता असली की त्याची परिणती प्रीतीत होते.

**डिसेंबर १३**

## मध्यस्थीची प्रार्थना

**“त्यांनी सर्वदा प्रार्थना करावी व खचू नये...” (लूक १८:१).**

तारणाच्या सत्यतेवर तुमचा विश्वास असला तरच प्रार्थनेच्या द्वारे खरी मध्यस्थी करता येते. तसे नसेल तर मध्यस्थी कितीही केली तरी ती निरर्थक ठरेल आणि आपण देवाच्या संपर्कातून दूर राहिलो म्हणून ते अधिकच संतोष पावतील. खऱ्या मध्यस्थीमध्ये तुमच्यावर भारभूत झालेली व्यक्ती, परिस्थिती वगैरे देवासमोर आणायची आणि तुम्ही ती व्यक्ती अगर परिस्थिती यांच्याविषयीच्या त्याच्या वृत्तीने बदलेपर्यंत मध्यस्थी करीत राहावे. मध्यस्थी म्हणजे “ख्रिस्ताच्या क्लेशातले जे उरले आहे ते... भरुन काढणे” (कलस्सै १:२४). मध्यस्थी करणारे फार थोडके आहेत याचे हेच कारण आहे. “मध्यस्थी करणे म्हणजे आपण दुसऱ्याची जागा घेणे.” पण हे खरे नाही! मध्यस्थी म्हणजे स्वतःला देवाच्या ठिकाणी कल्पिणे, त्याच्या मनाने व दृष्टीने मागणी करणे.

मध्यस्थ म्हणून तुम्ही प्रार्थना करता त्याविषयी अधिक माहितीची अपेक्षा देवाकडून करु नका, तुम्ही उगाच जेरीस याल. देवाने नेमले आहे त्याहून अधिक माहिती मिळवलीत तर तुम्हांला प्रार्थना करता येणार नाही. लोकांची परिस्थिती पाहून तुमचा गोंधळ उडेल आणि तुम्ही त्यातील सत्व जाणू शकणार नाही. आमच्या या कामात आम्हांला प्रत्येक गोष्टीविषयी देवाचे मनोगत समजणे जरुर आहे. पण आम्ही ती जबाबदारी टाळतो. मध्यस्थीमध्ये देवाबरोबरचे आमचे नाते उघड असते.

मध्यस्थी करताना केवळ “कलह मिटवणे” हा विचार टाळावा. आपण प्रार्थनेतून त्या व्यक्तीला देवाच्या जीवनाच्या संपर्कात आणले पाहिजे. देवाने आमच्या संपर्कात आणलेल्या अनेक व्यक्तींचा विचार करा-आपण सरळ त्यांना टाकले! तारणाच्या आधारे आम्ही प्रार्थना करतो तेव्हा देव काही निर्माण करतो आणि त्याला हे फक्त मध्यस्थीच्या प्रार्थनेच्या द्वारे साध्य होते.

**डिसेंबर १४**

## महान जीवन

**“मी तुम्हांस शांती देऊन ठेवतो, मी आपली शांती तुम्हांसा देतो; जसे जग देते तसे मी तुम्हांला देत नाही. तुमचे अंतःकरण अस्वस्थ अथवा भयभीत होऊ नये” (योहान १४:२७).**

आमच्या वैयक्तिक जीवनात एखाद्या कठीण गोष्टीचा अनुभव आला की लगेच आम्ही देवाला दोष देतो. पण चूक देवाची नाही तर आमचीच आहे. देवाला दोष देणे यावरुन आमच्या जीवनात कोठेतरी केलेल्या अवज्ञेचे निराकरण करण्यास आमची तयारी नसते. पण आम्ही आमचा हट्ट सोडला की सर्व सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट होते. आम्ही स्वतः आणि देव या दोन धन्यांची सेवा करु पाहतो तोवर संशय, शंका आणि गोंधळ यांच्यासह अडचणी येतात. आपण सर्वस्वी देवावर विसंबून राहावे. येथे पोचलो की मग पवित्रजनाचे जीवन जगणे सोपे होते. पवित्र आत्म्याचा अधिकार आम्ही स्वार्थासाठी बळकावतो तेव्हा नाना अडचणी येतात.

देवाच्या आज्ञा पाळल्या की तो शांती देऊन पसंती दर्शवतो. ही शांती अपार असते. नैसर्गिक, “जग देते तशी शांती” नसते, ही येशूची शांती असते. शांती मिळत नाही तेव्हा त्याचे कारण शोधून काढा. शांतीची प्रतीक्षा करा. स्वार्थासाठी शांती मिळणार नाही. प्रेम, शुद्धता, साधेपणा, ऐक्य ही वृत्ती तुमच्या नव्हे तर पवित्र आत्म्यापासून येते आपल्या निर्णयातून येत नाही. देव आमच्या स्वार्थी निर्णयाला आक्षेप घेऊन साधेपणा व ऐक्य राखण्याचे आवाहन करतो.

आज्ञापालन करण्याचे थांबवले की नाना प्रश्न डोके वर काढतात. हे देव आणि मी ह्यांच्यातले प्रश्न नसतात पण देवाचे सत्य पारखून पाहण्यासाठी माझ्या मनाला आवाहन करणारे असतात. मी आणि देव ह्यांच्या दरम्यान येणाऱ्या समस्या अवज्ञेमुळे येतात. मी आज्ञा पाळल्या की आनंद होतो, माझा स्वर्गीय पिता जाणतो. तो माझ्या समस्या सोडवीलच.

**डिसेंबर १५**

## “देवाच्या पसंतीस उतरलेला”

**“तू सत्याचे वचन नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी, असा स्वतःला सादर करण्यास होईल तितके कर” (२ तीमथ्य २:१५).**

तुमच्या प्रत्येक श्रद्धेविषयी तुम्ही स्पष्टपणे तपशीलवार सांगू शकत नसाल तर ते शक्य होईपर्यंत झटून अभ्यास करा. तुम्ही तसे केले नाहीत तर सत्य जाणल्याने मिळणाऱ्या आशीर्वादांना दुसरे लोक मुकतील. देवाचे सत्य दुसऱ्यांना सांगण्याआधी स्वतःला पुन्हापुन्हा सांगून पक्के करा. तुम्ही दुसऱ्या कोणाला ते सत्य सांगाल तेव्हा देव त्याच सत्याचा उपयोग करुन घेईल. पण तुम्ही देवाच्या द्राक्षकुंडातून द्राक्षे तुडवली जातात त्या अनुभवातून गेले पाहिजे. तुम्ही संघर्ष प्रयोग आणि वारंवार उजळणी करुन देवाचे सत्य स्पष्टपणे सांगण्यास शिकावे. मग योग्य वेळ आली की तेच शब्द देवाचा शक्तिमान द्राक्षारस होईल आणि दुसऱ्याला उपयोगी पडतील. परंतु तुम्ही म्हणाल, “मला अभ्यास करायचा नाही. हे सत्य माझ्याच शब्दात कशाला सांगू मी दुसऱ्यांचे चांगले शब्द शोधून घेईन.” ते शब्द कोणाच्याच उपयोगी पडणार नाहीत. देवाचे परमसत्य तुमच्या शब्दांनी सांगा आणि देवाला संधी द्या. देव तुमच्या द्वारे ते सत्य दुसऱ्याला कळवील.

तुम्ही विश्वास ठेवला तर त्यावर विचार करण्याची सवय ठेवा. तुम्हांला समजलेले सत्य अभ्यासाने आत्मसात केले पाहिजे तर त्याचा उपयोग आहे. एखादा लेख, एखादा वक्ता ह्यांच्यापासून तुम्ही जे शिकला ते सरावाने आणि अभ्यासाने आत्मसात करा म्हणजे तुम्हांला त्याचा नीट उपयोग करता येईल.

**डिसेंबर १६**

## देवासमोर कुस्ती करणे

**"देवाची शस्त्रसामग्री घ्या... प्रार्थना व विनवणी करा..." (इफिस ६:१३, १८).**

देवाबरोबरच्या संवादात व्यत्यय आणणाऱ्या गोष्टींच्या विरोधात झुंज देण्यास तुम्ही शिकून घ्यावे. दुसऱ्या लोकांसाठी झुंजावे, पण प्रार्थनेत देवाबरोबर झगडणे अशास्त्र आहे. कधी देवाबरोबर झोंबी केलीच तर आयुष्यभर निकामी व्हाल! याकोबाप्रमाणे तुम्हीही देवाबरोबर कुस्ती कराल तर तुम्ही तुमचा पाय सांध्यातून उखडून घ्याल! (पहा उत्पत्ती ३२:२४–२५). देवाच्या मार्गाला आड येऊन झगडून अपंग होऊ नका. या जगातील गोष्टींबद्दल देवासमोर झगडणारे व्हा कारण आम्ही त्याच्या योगे महाविजयी ठरतो (रोम ८:३७). देवासमोर कुस्ती केल्याने त्याच्या राज्यात प्रभाव पडतो. तुम्ही मला तुमच्यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले आणि मी ख्रिस्तामध्ये परिपूर्ण नसेन तर माझ्या प्रार्थनेचा प्रभाव पडणार नाही. मी ख्रिस्तामध्ये परिपूर्ण असलो तर माझ्या प्रार्थनेने नेहमी विजय मिळतो. परिपूर्णता असेल तरच प्रार्थना उपयुक्त होते. "देवाची शस्त्रसामग्री घ्या..."

देवाची परिपूर्ण इच्छा व त्याची अनुमती यातील भेद लक्षात घ्यावा. अनुमतीने तो आमच्या जीवनात आपले दिव्य उद्दिष्ट साध्य करतो. तो आमच्या जीवनात विविध गोष्टी येऊ देतो त्याच्यासाठी आपण त्याच्यासमोर झगडले पाहिजे. यातूनच आम्हांला त्याची परिपूर्ण इच्छा काय आहे ते समजते. "परंतु आपल्याला ठाऊक आहे की देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांस..." (रोम ८:२८). देवाच्या परिपूर्ण इच्छेला धरुन राहणारे ख्रिस्त येशूमधील त्याच्या पाचारणाप्रमाणे वागणारे. आपले पुत्र व कन्या ह्यांना तो आपल्या अनुमतीदायी इच्छेने प्रकट करतो. आपण केवळ, "होय, ही देवाची इच्छा आहे" असे म्हणू नये तर देवासमोर झुंजावे मग त्याची शक्ती तुम्हांला मिळेल.

## तारणाची गरज उत्पन्न करुन ती पुरी करणे

**“स्वाभाविक वृत्तीचा माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारीत नाही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात” (१ तीमथ्य २ः१४).**

देवाची सुवार्ताच सुवार्तेच्या गरजेची जाणीव निर्माण करते. सेवक आहेत त्यांना सुवार्ता गुप्त ठेवली आहे? नाही, पौलाने म्हटले आहे, “परंतु आमची सुवार्ता आच्छादिलेली असल्यास ज्यांचा नाश होत आहे त्यांच्याठायी ती आच्छादिलेली आहे... विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने ह्या युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत...” (२ करिंथ ४ः३—४). आम्ही नीतीने वागतो, आम्हांला सुवार्तेची गरज नाही असे अनेक लोक म्हणतात. पण स्वतः देवच सुवार्तेची गरज माणसामध्ये उत्पन्न करतो; तोवर त्या व्यक्तीला अशी जाणीवच नसते. येशूने म्हटले, “मागा म्हणजे तुम्हांला दिले जाईल” (मत्तय ७ः७). देऊ नये असे देवाला वाटत नाही पण मागितल्यावरच द्यावे ही त्याची योजना आहे. तारणासाठी त्याची हीच योजना आहे. आम्ही मागितल्यावर देव आमच्यासाठी नसलेले उत्पन्न करुन देतो. तारणाची निर्मिती सतत होत असते हीच त्याची आंतरिक सत्यता आहे. तारणाने आमच्यामध्ये देवाचे जीवन उत्पन्न होते तसे त्या जीवनासाठी असलेल्या गोष्टीही निर्माण केल्या जातात. गरज उत्पन्न करणारी वस्तूच आमचे समाधान करु शकते. तारणाचा अर्थ हाच आहे, निर्माण करणे व सामाधान करणे.

येशूने म्हटले, “आणि मला पृथ्वीपासून उंच केले तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन” (योहान १२ः३२). आम्ही स्वतःचे अनुभव सांगितले तर लोक ते ऐकतात, पण त्यातून गरजेची जाणीव होत नाही. पण येशू ख्रिस्ताला “उंच केले” तर देवाचा आत्मा त्याची गरज आहे ही जाणीव उत्पन्न करतो. सुवार्ता संदेश सांगितल्यानेच माणसांच्या आत्म्यांमध्ये देवाची तारणदायी सृजनशील शक्ती कार्य करते. वैयक्तिक अनुभव सांगितल्याने, ऐकल्याने कोणाचे तारण होत नाही, तारणाच्या सत्याने लोक तारणाप्रत येतात. “मी जी वचने तुम्हांला सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत” (योहान ६ः६३).

## पारख विश्वासूपणाची

**“परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांस... सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात” (रोम ८:२८).**

आपल्या परिस्थितीवर देवाचे सार्वभौम नियंत्रण आहे यावर विश्वासू व्यक्तीचाच खरा भरंवसा असतो. आम्ही आमची परिस्थिती गृहीत धरतो आणि म्हणतो सर्व देवाच्या हाती आहे पण मनात यावर विश्वास नसतोच! घडणाऱ्या गोष्टींवर लोकांचे नियंत्रण आहे असे आपणाला वाटते. प्रत्येक परिस्थितीत विश्वासू असणे म्हणजे आमची निष्ठा सर्वस्वी प्रभू येशू ख्रिस्तावर आहे. देव अचानक आमच्या परिस्थितीमध्ये बदल करतो तेव्हा आमचा अविश्वास उघडकीस येतो कारण ही परिस्थिती देवानेच नेमली होती हे आम्ही लक्षात घेतलेले नसते. या घटनेतून त्याला काय साध्य करायचे आहे ते आम्हांला कधीच कळणार नाही. कारण ती घटना तशीच आमच्या जीवनात पुन्हा कधीही घडणार नाही. येथेच आमच्या विश्वासाची पारख होते. आम्ही कठीण परिस्थितीतही देवाची उपासना करीत राहिलो तर तो त्याच्या इच्छेनुसार आमची परिस्थिती क्षणार्धात बदलेल!

येशू ख्रिस्ताशी विश्वासू राहणे ही सर्वात कठीण गोष्ट करण्याचा आमचा प्रयत्न असतो. आमचे काम, दुसऱ्यांची सेवा अशा गोष्ट आम्ही विश्वासूपणे करतो पण येशू ख्रिस्ताशी विश्वासू राहण्याचा विचारही नकोसा वाटतो. जगापेक्षा ख्रिस्ती सेवकच ख्रिस्ताला पदच्युत करतात. देव म्हणजे आम्हांला आशीर्वाद देणारे यंत्र असे आम्ही समजतो आणि इतर सेवकांप्रमाणे येशूही सेवकच आहे असे म्हणतो. आम्ही देवासाठी काम करावे हे विश्वासूपणे ध्येय नाही तर त्याने आमच्याकडून काम करावे हेच ध्येय आहे. देव आम्हांला सेवेसाठी पाचारण करतो, आमच्यावर मोठी जबाबदारी सोपवतो. आपल्या पुत्राचा केला तसाच आमचा उपयोग करायचा आहे.

## आमच्या संदेशाचे केंद्र

**“... मी शांतता आणावयास नव्हे तर तरवार चालवावयास आलो आहे” (मत्तय १०:३४).**

देव एखाद्याशी कठोरपणे वागतो असे तुम्हांला वाटते त्या व्यक्तीला कधी सहानुभूती दाखवू नका. देव आमच्या कल्पनेपलीकडे मवाळपणाने वागू शकतो आणि तो अधून मधून एखाद्याशी ठामपणे वागू देतो आणि तो किती मवाळपणे वागतो हे आम्हांला दिसते. एखादी व्यक्ती देवाकडे जात नाही कारण त्याच्या अंतरंगी काही गुप्त असते ते सोडून देण्याची त्याची तयारी नसते. तो आपल्या पापाची कबुली देईल पण काही झाले तरी ते सोडणार नाही. या प्रकारच्या लोकांशी सहानुभुतीने वागणे शक्य नाही. आपण त्यांच्या अंतरंगात जाऊन समस्येचा ठाव घेतला पाहिजे, पण त्यामुळे त्यांना संदेश रुचणार नाही विरोध डोके वर काढील. लोकांना देवाचे आशीर्वाद हवे असतात पण त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेऊन टोचणी लावणारे काहीही नको असते.

देवाच्या मार्गाविषयी संवेदनशील असाल तर त्याचा सेवक या नात्याने तुमचा संदेश दयाहीन आणि आग्रही, मुळावर घाव घालणारा असेल. आम्ही जोरदारपणे संदेश सांगितला पाहिजे, ऐकणाऱ्या व्यक्तीने त्यातील सत्यानुसार आचरण केले पाहिजे. लोक असतील तेथेच त्यांना संदेश सांगा, त्यामुळे त्यांना त्यांची खरी गरज समजेल. मग त्यांच्या जीवनात येशूचा मापदंड लावा. त्यावर ते म्हणतील आम्ही तसे कधीच होणार नाही. त्यावर तुम्ही सांगा “येशू ख्रिस्त म्हणतो तुम्ही हे केलेच पाहिजे” “पण आम्ही ते कसे करावे?” “त्यासाठी तुम्हांला नवा आत्मा हवा” (पहा लूक ११:१३).

तुमचा संदेश उपयुक्त होण्याची गरज आहे अशी जाणीव झाली पाहिजे. या जगात हजारो लोक आपण देवाशिवाय सुखी आहोत असे समजतात. पण आम्ही येशूशिवाय खरोखर सुखी व न्यायी होणार असू तर त्याच्या येण्याचे कारणच काय? तो आला कारण त्यांचे सुख व शांती वरवरची, उथळ आहे. येशू ख्रिस्त त्याच्यावर न आधारलेल्या प्रत्येक प्रकाराच्या “शांतते वर तरवार चालवण्यास आला आहे.”

## डिसेंबर २०

### योग्य प्रकारचे साहाय्य

**“आणि मला पृथ्वीपासून उंच केले तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन” (योहान १२:३२).**

येशू ख्रिस्त का मरण पावला त्याचे कारण आपणांपैकी फारच थोड्यांना समजते. मानवांना फक्त सहानुभूती हवी असेल तर ख्रिस्ताचा वधस्तंभ हास्यास्पद असून त्याची अजिबात गरजच नाही. खरे तर जगाला “इवलेसे प्रेम” नको तर त्याच्यावर मोठी शस्त्रक्रियाच केली पाहिजे!

आत्मिक दृष्टीने हरवलेला माणूस तुमच्यासमोर येतो, तेव्हा वधस्तंभावरील येशू ख्रिस्ताचे स्वतःला स्मरण द्या. त्या व्यक्तीला अन्य कोणत्या वाटेने देवाकडे जाता आले तर ख्रिस्ताचा वधस्तंभ अप्रस्तुत व अनावश्यक आहे. आपल्या सहानुभूतीने व ज्ञानाने आपण हरवलेल्या लोकांना साहाय्य करतो असे तुम्हांला वाटते तर तुम्ही येशू ख्रिस्ताशी द्रोह करता! तुमचे त्याचे नाते योग्य पायावर आधारलेले असावे आणि त्याच मार्गाने तुम्ही स्वतःचे जीवन दुसऱ्यांच्या सेवेसाठी खर्ची घातले पाहिजे. जगाचा धर्म सर्वांना सुखाची लालूच दाखवण्यात धन्यता मानतो. तो कोणालाच जाब विचारीत नाही.

आम्ही नेहमी वधस्तंभावर खिळलेला ख्रिस्त सादर करतो, त्याला सदोदित उंच करणे हेच आमचे कर्तव्य आहे (पहा १ करिंथ २:२). ख्रिस्ताच्या वधस्तंभावर न आधारलेली प्रत्येक श्रद्धा लोकांना भलतीकडे नेईल. सेवकाचा येशू ख्रिस्तावर विश्वास असेल, तारणाची सत्यता त्याला मान्य असेल तर त्याचे शब्द लोकांना प्रभावित करतील. नव्या करारातील सेवकाला पाप उघड करणे व येशू ख्रिस्ताला प्रकट करणे यासाठी पाचारण आहे. आम्हांला देवाने येशू ख्रिस्ताला उंचावण्यासाठी पाठवले आहे, सुंदर भाषणे देण्यासाठी पाठवले नाही. देवाने आमची केली तशी सखोल परीक्षा आम्ही दुसऱ्यांची केली पाहिजे. सत्य सांगणाऱ्या शास्त्रवचनांचा शोध घेऊन ती आम्ही धैर्याने लागू केली पाहिजेत.

**डिसेंबर २१**

## अनुभव का देवाचे प्रकट सत्य?

**"... आपल्याला देवापासून निघाणार आत्मा मिळाला आहे; ह्यासाठी की, जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे" (१ करिंथ २:१२).**

माझ्या अनुभवाने तारण खरे होत नाही, तारणच सत्यता आहे. माझ्या जागृत जीवनातून ते कार्यकारी होत नाही तोवर त्याला काही खरा अर्थ नाही. मी नव्याने जन्मलो की देवाचा आत्मा मला मी स्वतः आणि माझे अनुभव यांच्यापलीकडे नेऊन येशू ख्रिस्ताशी समरुप करतो. माझ्याकडे फक्त माझेच अनुभव असले तर त्यामुळे काही माझे तारण झालेले नसते. तारणातून उद्‌भवणाऱ्या अनुभवातून अनुभव येतात. माझे अनुभव मला सत्याच्या उगमापाशी म्हणजे येशू ख्रिस्ताजवळ ठेवत नसतील तर त्यांना काही किंमत नाही.

तुमच्यामधील पवित्र आत्म्याला आवरुन धरायचा प्रयत्न करुन आंतरिक आत्मिक अनुभव घ्यावे असे ठरवले तर तो बंधन तोडून तुम्हांला परत ऐतिहासिक ख्रिस्ताकडे नेईल. देवामध्ये उगम आणि देवावरील विश्वास हा परिणाम नसेल तर अशा अनुभवाला थारा देऊ नये आणि तुम्ही तसे केलेच तर कितीही दृष्टांत झाले, अगर स्वप्ने पडली असली तरी तुमचे अनुभव ख्रिस्तविरोधीच आहेत. येशू ख्रिस्त तुमच्या अनुभवांचा प्रभू आहे का तुम्ही अनुभवांना प्रभू येशूपेक्षा अधिक महत्त्वाचे आहात? तुम्ही त्याला तुमचा प्रभू म्हणून स्वीकारावे आणि ज्यांचा तो प्रभू नाही त्यांच्या अनुभवांना महत्त्व देऊ नका. मग पुढे तुम्हांला अनुभवांचे महत्त्व वाटणारच नाही असे देव करील आणि तुम्ही म्हणाल, "मला कसलाही अनुभव येऊ दे मला त्याची- देवाची खातरी आहे!" आपल्या अनुभवांबद्दलच बोलण्याची सवय तुम्हांला असेल तर ती सोडून द्या. अनुभवावर आधारलेला विश्वास, विश्वास नसतोच देवाच्या प्रकट सत्यावर आधारलेला विश्वासच खरा आहे.

**डिसेंबर २२**

## पित्याचे आकर्षण

**“ज्याने मला पाठवले त्या पित्याने आकर्षिल्याशिवाय कोणीही माझ्याकडे येऊ शकत नाही...” (योहान ६:४४).**

देव मला स्वतःकडे ओढून घेतो तेव्हा लगेचच माझ्या इच्छेची समस्या पुढे येते. देवाने प्रकट केलेल्या सत्याचे मी विधायक रीतीने स्वागत करीन का? मी त्याजकडे येईन काय? देव पाचारण करतो तेव्हा आध्यात्मिक बाबींची चर्चा करणे अयोग्य व देवाचा अवमान करण्यासारखे आहे. देव बोलतो तेव्हा त्याची चर्चा करु नका तुम्ही स्वतःच प्रतिसाद द्या (पहा गलती १:१५–१६). विश्वास बौद्धिक कृतींतून येत नाही तर माझ्या इच्छेचा परिणाम आहे, त्यायोगे मी स्वतःला बांधून घेतो. पण मी स्वतःला पूर्णपणे देवाकडे सोपवतो का? तो सांगतो त्याप्रमाणे करतो का? मी तसे केले तर मला सत्यतेचा पूर्ण आधार आहे आणि देवाच्या राजासनाप्रमणे मी स्थिर आहे.

सुवार्ता सांगताना इच्छेकडे लक्ष ठेवा. विश्वास ठेवण्याच्या इच्छेतूनच विश्वास दृढ होतो. इच्छा समर्पित केली आहे, समर्थ प्रतिपादनाचे समर्पण काही उपयोगाचे नाही. मी जाणीवपूर्वक पुढे जाऊन देव व त्याचे सत्य यांवर विश्वास ठेवावा. माझ्या स्वतःच्या कार्यावर नव्हे तर फक्त देवाच्या कार्यावर विश्वास ठेवला पाहिजे. मी माझ्या भावनांकडे दुर्लक्ष करुन त्या एकीकडे ठेवाव्या. मी माझे जुने मार्ग सोडून नव्या मार्गाने चालण्याचा निश्चय केला पाहिजे आणि सर्वस्वी शरण गेले पाहिजे.

प्रत्येकाला आपल्या आवाक्या बाहेर जाण्याची क्षमता दिली आहे. देवच मला स्वतःकडे घेतो. माझे त्याचे नाते वैयक्तिक आहे, बौद्धिक नाही. देवाचे चमत्कार आणि विश्वास ठेवण्याची माझी इच्छा यातून माझ्या जीवनात पालट झालेला पाहून मी आश्चर्यचकित होतो.

**डिसेंबर २३**

## प्रायश्चित्त अर्पणात वाटेकरी होणे

**“आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो...” (गलती ६:१४).**

ख्रिस्ताची सुवार्ता आमच्या इच्छेला निर्णय घेण्यास भाग पाडते. ख्रिस्ताच्या वधस्तंभावर देवाने केलेला पापाचा निवाडा मी स्वीकारला आहे? येशूच्या मरणात मला थोडा तरी रस आहे का? मला त्याच्या मरणाशी समरुप व्हायचे आहे? पाप, लौकिक वृत्ती, स्वतः या सर्वांना पूर्णपणे मरण्यास मी तयार आहे? येशू आणि त्याचे कार्य व उद्देश यांच्याखेरीज माझे अन्य कशालाही महत्त्व उरु न देण्याएवढा मी त्याच्याशी एकरुप झालो आहे? वधस्तंभाच्या झेंड्याखाली येऊन पापाला मरुन स्वतःला समर्पण करणे हाच शिष्य होण्यात मोठा लाभ आहे. तुम्ही येशूला एकांतात भेटून त्याला स्पष्टपणे सांगा की मला माझ्यातले पाप संपूर्ण नाहीसे होऊ नये असे वाटते किंवा झाले तरी त्याच्या मरणाशी समरुप व्हायचे आहे. आमच्या प्रभूने वधस्तंभावर ते साध्य केले त्यावर दृढ विश्वास ठेवला की लगेच त्याच्या मरणाशी अलौकिक प्रकारे समरुप होता. तुमचे जुने जीवन त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळले आहे याचे उच्च ज्ञान होईल (रोम ६:६). तुमचे जुने जीवन मेले आहे, ते “ख्रिस्ताबरोबर वधस्तंभाला खिळले आहे” (गलती २:२०). याचे प्रमाण हेच की आता तुमच्यामधील देवाचे जीवन तुम्हांला येशूच्या वाणीचे आज्ञापालन सहज करता येते.

आमचा प्रभू वेळोवेळी तो नसता तर आमचे काय झाले असते याचे ओझरते दर्शन घडवतो. “... माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हांला काही करता येत नाही” (योहान १५:५). यावरुन वरील बाब सहज समजते. प्रभू येशूवर वैयक्तिक अढळ निष्ठा हाच ख्रिस्तीपणाचा मुख्य आधार आहे. आम्हांला देवाच्या राज्यात घेण्याचा देवाचा उद्देश हाच आहे की येशू ख्रिस्ताबरोबर समरुप होण्याचा संपूर्ण अर्थ आम्हांला समजावा.

**डिसेंबर २४**

## गुप्त ठेवलेला जीवन

**"... तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे" (कलस्सै ३:३).**

"ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेल्या" जीवनाची साधी पण सर्वसमर्थ सुरक्षिततेची देवाचा आत्मा साक्ष देतो व ती कायम करतो. नव्या करारामधील पत्रांतून पौलाने हेच सत्य परोपरीने सांगितले आहे. पवित्र जीवन जगणे अतिशय डळमळीत व असुरक्षित आहे असे वाटते. तथापि हेच सर्वात सुरक्षित आहे; कारण याला चहूबाजूंनी सर्वसमर्थ देवाचे संरक्षण आहे. देवाशिवाय राहण्याचा प्रयत्न करणे हे सर्वात असुरक्षित व धोकादायक आहे. नव्याने जन्मलेल्या व्यक्तीला देवाबरोबर सरळपणे राहणे सोपे आहे. मात्र त्यासाठी देवाच्या सूचना व इशारे लक्षात घेऊन नेहमी "प्रकाशात चालावे" (१ योहान १:७).

पापापासून सुटका होणे, "आत्म्याने परिपूर्ण होणे" (इफिस ५:१८). आणि "प्रकाशात चालणे" याविषयी विचार करताना आपल्यापुढे प्रचंड मोठे पर्वतशिखर दिसते. मोठे भव्य आणि सुंदर दिसते ते, आपण देवाच्या कृपेने तेथे वर गेलो तर शिखर नसून मोठी सपाट जागा आहे असे दिसते. तेथे सहज राहता येते. "तू माझ्या पावलांसाठी प्रशस्त जागा केली आहे, माझे पाय घसरले नाहीत" (स्तोत्र १८:३६).

तुम्ही खरोखर येशूला पाहिले की तुम्ही त्याची शंका कधीच घेणार नाही. "तुमचे अंतःकरण अस्वस्थ होऊ नये..." असे म्हणताना तुम्ही ऐकलेत (योहान १४:२७) की चिंतेचे कारण उरणार नाही. तुम्ही त्याच्या संपर्कात आलात की प्रत्येक वेळी "मी आपली शांती तुम्हांला देतो" (योहान १४:२७). ही शांती तुम्हांला नखशिखांत व्यापते. "... तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवले आहे" आणि कधी विचलित न होणारी येशू ख्रिस्ताची शांती तुम्हांला दिली आहे.

## त्याचा जन्म आणि आमचा नवा जन्म

**“पाहा, कुमारी गर्भवती होईल व तिला पुत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील; ह्या नावाचा अर्थ, ‘आम्हांबरोबर देव’” (मत्तय १:२३).**

**त्याचा जन्म इतिहासात** “... ज्याचा जन्म होईल, त्याला पवित्र देवाचा पुत्र असे म्हणतील” (लूक १:३५). येशू ख्रिस्त *जगापासून* नव्हे तर *जगामध्ये* जन्मला. तो इतिहासातून उद्‌भवला नाही तर बाहेरुन इतिहासात आला. येशू ख्रिस्त काही मनुष्य जातीने अभिमान वाहावा असा मानव नाही. मानववंशाला श्रेय घेता येणार नाही असे जीवित्व तो आहे. तो देव झालेला मनुष्य नसून देहधारी देव मानवी देहाबाहेरुन त्यामध्ये येणारा देव आहे. त्याचे जीवित सर्वोच्च आणि सर्वथा पवित्र असून तो अतिशय नम्र द्वाराने आला. आमच्या प्रभूचा जन्म—आगमन होते. मानवी स्वरुपात देव प्रकट झाला.

**माझ्यामध्ये त्याचा जन्म** : “माझ्या मुलांनो, तुम्हांमध्ये ख्रिस्ताचे स्वरुप निर्माण होईपर्यंत मला पुन्हा तुमच्यासंबंधी प्रसूतिवेदना होत आहेत” (गलती ४:१९). प्रभू बाहेरुन मानवी इतिहासामध्ये आला तसे तो बाहेरुनच माझ्यामध्ये आला पाहिजे. माझे व्यक्तिगत मानवी जीवन मी देवाच्या पुत्रासाठी “बेथलेहेम” होऊ दिले आहे? दैहिकापेक्षा सर्वस्वी वेगळ्या जन्माने वरुन जन्म झाल्याशिवाय देवाच्या राज्यात माझा प्रवेश होणारच नाही. “तुम्हांला नव्याने जन्मले पाहिजे” (योहान ३:७). ही काही आज्ञा नाही पण देवाच्या अधिकारावर आधारलेली वस्तुस्थिती आहे. “ख्रिस्त माझ्यामध्ये आकारास यावा” यासाठी मी देवाला सर्वस्वी शरण जातो हाच नव्या जन्माचा प्रमाण पुरावा आहे. “ख्रिस्त माझ्यामध्ये साकार झाला” की माझ्यामधून त्याच्या स्वभावाचे कार्य होताना दिसेल.

**देहामध्ये देवाचे प्रमाण** : येशू ख्रिस्ताने साधलेल्या मनुष्याच्या तारणाद्वारे हे तुमच्या व माझ्यासाठी शक्य केले आहे.

**डिसेंबर २६**

## “प्रकाशात चाला”

**“जसा तो प्रकाशात चालत आहे तसे जर आपण प्रकाशात चालत असलो तर... येशू ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापापांसून शुद्ध करील” (१ योहान १:७).**

खिस्ताच्या वधस्तंभाच्या द्वारे प्रायश्चित्त अर्पणाने आमच्या जीवनाच्या जाणीवेच्या पातळीवरच पापापासून संपूर्णपणे मुक्तता हिच पापापासून स्वतंत्रता समजणे चुकीचे आहे. नवा जन्म होईतो पाप म्हणजे काय ते कोणालाच समजत नाही. येशू ख्रिस्ताला काल्वरीवर पापालाच तोंड द्यावे लागले. पापापासून माझी सुटका झाली आहे याचे प्रमाण म्हणजे आता माझ्यामधील पापाचे खरे स्वरुप मला समजले हेच आहे. पाप म्हणजे काय ते एखाद्याला समजून घ्यायचे असेल तर त्यासाठी येशू ख्रिस्ताच्या प्रायश्चित्ताचा गाढ स्पर्श आणि परिपूर्ण कार्य यांची म्हणजे त्याची परम परिपूर्णता मिळणे आवश्यक आहे.

पवित्र आत्मा प्रायश्चित्त अर्पणाचे कार्य अंतरंगातील सखोल सुप्त क्षेत्रात तसेच जागृत क्षेत्रात लागू करतो. आत्म्याची आमच्यामधील अद्वितीय शक्ती आमच्या लक्षात आली की आम्हांला १ योहान १:७ मधील *“... त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करते”* याचा अर्थ समजतो. या वचनात फक्त जाणीवेतील पापाचाच उल्लेख नाही तर पाप म्हणजे काय त्याचे सम्यक ज्ञानही समाविष्ट आहे. हे ज्ञान फक्त पवित्र आत्म्याकडूनच मिळते.

“तो प्रकाशात आहे तसे मीही प्रकाशात चालले पाहिजे...” माझ्या विवेकाच्या नव्हे तर देवाच्या प्रकाशात चालले पाहिजे. काहीही राखून न ठेवता मी त्याप्रमाणे चाललो तर “त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याचे रक्त (मला) सर्व पापांपासून शुद्ध करते” हे सत्य मला समजते. प्रकाशात चालणे म्हणजे अंधार व त्याचे सर्व मला प्रकाशाच्या केंद्राकडे अधिक जवळ घेऊन जातात.

**डिसेंबर २७**

## जेथे लढाईत जिंकतो किंवा हरतो

**“परमेश्वर म्हणतो, हे इस्राएल, जर तू मजकडे वळशील...” (यिर्मया ४:१).**

आमच्यात लढाया जगासमोर नव्हे तर देवाच्या सान्निध्यात आमच्या इच्छेच्या गुप्तस्थळी प्रथम जिंकल्या किंवा हरल्या जातात. देवाचा आत्मा माझी पकड घेतो आणि सक्तीने देवासमोर नेऊन तेथेच लढण्यास लावतो. हे करीपर्यंत प्रत्येक वेळेस माझीच हार होईल. ही लढाई एका मिनिटात संपेल अगर वर्षभर चालेल. पण ते देवावर नव्हे तर माझ्याचवर अवलंबून राहील. कितीही वेळ लागला तरी देवासमक्ष एकट्याने झुंज दिली पाहिजे. देवासमोर झुंज देऊन जिंकलेल्यावर कोणाची शक्ती चालत नाही.

“कठीण परिस्थिती येईपर्यंत मी थांबेन आणि मग देवाची परीक्षा पाहीन” असे कधी म्हणू नका. यात यश येणार नाही. सर्वप्रथम मी माझ्या आत्म्याच्या गुप्त स्थळी, जेथे तिसरे कोणीच नसेल अशा ठिकाणी प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे. मग लढाई निश्चित जिंकली आहे या खात्रीने मी नेटाने पुढे जाईन. तेथे हरलात तर संकट, अरिष्ट, जगासमोर पराभव या सर्वांचा अनुभव घ्यावाच लागेल. प्रथम बाह्य जगात लढल्यामुळे मला लढाईत हरावे लागले. देवासह एकांतात राहा आणि या प्रश्नाचा कायमचा निकाल करा.

दुसऱ्या लोकांशी वागताना त्यांना त्यांच्या इच्छेनुसार निर्णय घेण्यास लावणे यावर आपण भर द्यावा. ही देवाच्या अधीन होण्याची सुरुवात आहे. वारंवार नाही पण एकदा तरी देव आम्हांला जीवनपथाच्या चौरस्त्यावर उभे करतो. येथून आम्ही आळसात ख्रिस्ती जीवनाकडे जाऊ किंवा उत्साहाने त्याच्या सर्वोच्चतेसाठी आमचे सर्वश्रेष्ठ ते देण्यास हिरिरीने पुढे जाऊ त्याच्या गौरवासाठी आमचे सर्वोत्तम देऊ.

**डिसेंबर २८**

## सतत होणारा पालट

**“... तुमचा पालट होऊन तुम्ही बाळकांसारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुमचा प्रवेश होणारच नाही” (मत्तय १८:३).**

आमच्या प्रभूचे हे शब्द आमच्या आरंभीच्या पालटाविषयी आहेत. पण आम्ही लहान मुलांप्रमाणे सतत देवाकडे वळले पाहिजे. आणि आमच्या जीवानात दररोज पालट झाला पाहिजे. देवाऐवजी आम्ही आमच्याच शक्तीवर विसंबून राहिलो तर त्यातून होणाऱ्या, परिणामांविषयी देव आम्हांलाच जबाबदार धरील. आपल्या सार्वभौमत्वातून देव आम्हांला नव्या प्रसंगात आणतो तेव्हा आमचे स्वाभाविक जीवन आत्मिक जीवनाच्या अधीन होते आणि देवाच्या आत्म्याच्या आज्ञा पाळते याची खात्री करुन घ्यावी. गतकाळामध्ये आम्ही योग्य तो प्रतिसाद दिला आहे यावरुन पुन्हा आम्ही तसेच करु अशी हमी मिळत नाही. जे स्वाभाविक त्याचा आत्मिकाला प्रतिसाद सतत पालट होणे हाच असावा. पण या बाबतीत आपण बहुधा आज्ञापालन करीत नाही. आमची परिस्थिती कशीही असली तरी देवाचा आत्मा बदलत नाही त्याचे तारण होते ते तसेच राहते. आम्ही मात्र “नवा माणूस धारण केला पाहिजे” (पहा इफिस ४:२४). स्वतःला पालटण्यास नकार दिला तर प्रत्येक वेळी देव आपल्याला जबाबदार धरीलच. आमचा नकार जाणून बुजून, हट्टाने केलेली अवज्ञा आहे असे तो समजतो. आमच्यावर आमच्या स्वाभाविक जीवनाची नव्हे तर देवाची सत्ता असावी.

पालट होण्यास सतत नकार दिल्याने आमच्या आत्मिक जीवनाच्या वाढीस खीळ बसते. आमच्या जीवनात काही ठिकाणी आमचा गर्व देवाच्या राजासनाची उपेक्षा करुन म्हणतो, “मी अधीन होणार नाही” आमच्या जीवनात असे अनेक भाग आहेत, ते अधीन करण्यासाठी सतत पालट होण्याची गरज आहे. देवाला आमचा हट्टी हेकटपणा वाटतो तो आम्हांला आमची सक्ती वाटतो. सततच्या पालटाने संपूर्ण जीवन देवाच्या आत्म्याच्या अधीन करता येईल.

डिसेंबर २९

## पळपुटे का शिष्य?

**"ह्यावरुन त्याच्या शिष्यापैकी पुष्कळ जण परत गेले आणि ते पुन्हा कधी त्याच्याबरोबर चालले नाहीत" (योहान ६:६६).**

देव तुम्हांला आपल्या आत्म्याने वचनाच्या द्वारे आपल्या इच्छेची स्पष्ट जाणीव करुन देतो तेव्हा त्या जाणीवेच्या प्रकाशात चालले पाहिजे (१ योहान १:७). यामुळे तुमचे मन व आत्मा रोमांचित झाला असेल आणि तुम्ही "प्रकाशात चालला" नाहीत तर आमच्या प्रभूच्या मनातही कधी आले नसेल अशा दासपणाच्या पातळीवर तुमचा अधःपात होईल. तो "स्वर्गीय दृष्टांत" (प्रे. कृ. २६:१९) मनोमन नाकारला तर येशू ख्रिस्ताशी संबंधित नसलेल्या विचारकल्पनांचे तुम्ही गुलाम व्हाल. "त्यांचे विचार असेच आहेत तरी त्यांची भरभराट होते आहे, मग माझीच का नाही?," असे दुसऱ्यांकडे पाहून म्हणू नका. तुम्हांला दिलेल्या दृष्टांताच्या "प्रकाशात तुम्ही चाललेच" पाहिजे. आपली तुलना दुसऱ्यांशी करु नका. केलात तर मालमत्ता, वैयक्तिक हक्क हे मुद्दे तुमच्या अंतरंगांत डोकेवर काढतील. येशूने या गोष्टींना कडाडून विरोध केला आहे. कारण हे सर्व त्याला परक्या असलेल्या गोष्टींच्या विरुद्धच होते. "कारण कोणाजवळ पुष्कळ संपत्ती असली तर ती त्याचे जीवन होते असे नाही" (लूक १२:१५). हे आमच्या लक्षात आले नाही आणि समजले नाही तर आमच्या प्रभूच्या शिक्षणातील तत्वांकडे आम्ही दुर्लक्ष करतो हेच याचे कारण आहे.

देवाने आपली इच्छा आम्हांला प्रकट केली त्या अनुभवाच्या आठवणींनी सतत मोहरुन जाण्यातच आम्हांला समाधान वाटते. नव्या करारातील एखादा मापदंड प्रकट केला आणि देवाच्या प्रकाशात त्याचा विचार केला नाही तर आम्ही मागे जाऊ लागतो. सत्य उघड केल्यावर तुम्ही पहिले उरत नाही. तुमची शिष्य म्हणून निष्ठा अधिक दृढ होते अगर पळपुटे म्हणून तुमची संभावना होते.

**डिसेंबर ३०**

## “आमच्यामध्ये असलेला प्रत्येक सद्‌गुण”

**“... माझे सर्व उगम तुझ्याच ठायी आहेत” (स्तोत्र ८७:७).**

आमचा प्रभू आमची स्वाभाविक मूल्ये म्हणजे आमचे गुण, आमचा स्वभाव, कधी झाकून टाकत नाही. तो व्यक्तीला अंतरंगातून नवा करतो. “... नवा मनुष्य धारण करा” (इफिस ४:२४). तुमच्या स्वाभाविक मानवी नवीन जीवनात साजेल, शोभेल ते सर्व धारण करीत आहे. देवाने तुम्हांमध्ये ठेवलेले नवीन जीवन आपले नवे सद्‌गुण विकसित करते. आदामाच्या संतानाचे सद्‌गुण(?) विकसित केले जात नाहीत तर येशू ख्रिस्ताच्या गुणांचा विकास होतो. देवाने तुमच्यामध्ये पवित्रीकरणाचे कार्य सुरु केल्यावर तुमच्या स्वतःच्या स्वाभाविक गुणांवरील तुमचा भरंवसा कसा ओसरतो ते लक्षात घ्या. येशूच्या पुनरुत्थित जीवनाच्या साठ्यातून तुम्ही आपले जीवन घेण्यास शिकेपर्यंत तो तुम्हांला शिकवील. जुने संपण्याच्या या अनुभवाबद्दल देवाचे आभार माना.

देव आमच्या जीवनात कार्य करीत आहे याची खूण हीच आहे की तो आमच्या स्वाभाविक गुणांवरचा आमचा भरंवसा संपुष्टात आणीत आहे. हे गुण आम्ही काय होऊ त्याचे दर्शक नाहीत तर देवाने माणसाला उत्पन्न करण्याचा उद्देश वाया गेल्याचे दर्शक आहेत. देव आम्हांला येशू ख्रिस्ताच्या जीवनाच्या संपर्कात आणीत आहे आणि इकडे आम्हांला आमचे स्वाभाविक गुण दृढ धरायचे आहेत. येशूचे जीवन व स्वाभाविक गुण यांचा कसलाच संबंध नाही. देव आमचे स्वाभाविक गुण पालटत नाही कारण ते येशू ख्रिस्ताला जे हवे त्याच्या जवळपासही येत नाहीत. आमची स्वाभाविक प्रीती, सोशिकपणा, धीर, शुद्धता यांच्या साहाय्याने देवाची सेवा करता येणार नाही. आम्ही आमच्या शारीरिक जीवनाचा प्रत्येक भाग देवाने आमच्यामध्ये ठेवलेल्या नव्या जीवनाशी सुसंगतपणे जोडतो तेव्हा तो प्रभू येशूचे सद्‌गुण आमच्यामधून प्रकट करील. आमच्यामध्ये असणारा प्रत्येक गुण सर्वस्वी त्याचाच आहे.

## “काल” म्हणजे भूतकाळ

**“तुम्हांला घाईघाईने निघावे लागणार नाही,… कारण परमेश्वर तुमचा पुढारी आहे, इस्राएलाचा देव तुमचा पाठीराखा आहे” (यशया ५२:१२).**

**भूतकाळापासून सुरक्षितता** “… देव गत गोष्टी पुन्हा आपल्यापुढे आणतो” (उपदेशक ३:१५). वर्षाच्या अखेरीस देवाने भविष्यकाळासाठी काय नेमले आहे त्याकडे उत्सुकतेने लक्ष लावतो; पण आम्ही आमच्या गेलेल्या “काल” ची आठवण करतो तेव्हा चिंताक्रांत होतो, कालच्या चुका आणि पापे आठवल्याने देवाच्या कृपेचा लाभ कमी होतो. पण देव आमच्या गेलेल्या कालचाही देव आहे आणि तो त्याची आठवण भावीकाळासाठी आत्मिक वाढीसाठी ठेवतो. वर्तमानकाळातील अतिशय उथळ सुरक्षिततेपासून सरंक्षणासाठीच देव आम्हांला भूतकाळाची आठवण देतो.

**उद्यासाठी सुरक्षितता** “…. परमेश्वर तुमचा पुढारी आहे…” हे कृपापूर्ण प्रकटीकरण आहे. आम्हांला अपयश आले आहे तेथे देव आपले सैन्य पाठवील. त्याच अपयशाने आम्ही तोंडघशी पडू नये यासाठी तो लक्ष ठेवील. तो आमचा पाठीराखा नसेल तर अपयश नक्कीच आले असते. देवाचा हात भूतकाळातही पोचतो. आमच्या विवेकबुद्धी विरुद्ध असणाऱ्या सर्व गोष्टींचा निपटारा करतो.

**आजसाठी सुरक्षितता** “तुम्हांला घाईघाईने निघावे लागणार नाही…” आम्ही नव्या वर्षात घाईगडबडीने अगर गडबडीत अविचाराने प्रवेश करु नये. इस्राएलाचा देव आमच्या पुढे जाईल या जाणीवेच्या शक्तीने पुढे जावे आमच्या गेलेल्या “काल”मध्ये मोडक्या तोडक्या गोष्टी आहेत. अर्थातच, गेलेल्या काही चांगल्या संधी पुन्हा मिळणार नाहीत. परंतु देव ह्या पोखरणाऱ्या चिंतेचा पालट करुन भावीकाळासाठी रचनात्मक विचारीपण आणील. भूतकाळ विसावू द्या पण तो ख्रिस्ताच्या मधुरमिठीत विसावलेला बरा! मोडका, अपरिवर्तनीय भूतकाळ त्याच्या हातात राहू द्या आणि तुम्ही त्याच्याबरोबर अजेय भविष्यकाळात पुढे पाऊल टाकत चाला.

# शास्त्रवचनांची सूची


**उत्पत्ती**

| | |
|---|---|
| ५:२४ | १०/१२ |
| ९:१३ | १२/६ |
| १२:८ | १/६ |
| १३:९ | ५/२५ |
| १५:१२ | १/१९ |
| १६:१–१५ | १/१९ |
| १७:१ | १/१९, ५/२५, ७/२० |
| १८:१७ | ३/२०, ३/२७ |
| २१:८–१४ | १२/१० |
| २१:१५–१९ | १२/१० |
| २२:२ | ४/२६, ११/११ |
| २२:३ | ११/११ |
| २२:९ | १/८ |
| २२:१६–१७ | ११/१७ |
| २४:२७ | ११/१४ |
| ३२:२४–२५ | १२/१६ |
| ४१:४० | १२/५ |

**निर्गम**

| | |
|---|---|
| २:११ | १०/१३ |
| ३:४ | ४/१८ |
| ३:१०–११ | १०/१३ |
| ३:१४ | १०/४, १०/१४ |
| १४:१३ | ९/८ |
| १६:२० | १/६ |
| २०:१९ | २/१२ |
| ३४:२९ | ४/२२ |

**अनुवाद**

| | |
|---|---|
| ५:३२ | ६/२८ |
| २८:१४ | १०/२५ |
| ३३:२७ | ५/२४ |

**यहोशवा**

| | |
|---|---|
| २४:१५, २२ | ७/८ |
| २४:१९, २१ | ७/९ |

**१ शमुवेल**

| | |
|---|---|
| ३:९, १५ | १/३० |
| ३:१० | २/१३ |
| १५:२२ | ६/८ |

**२ शमुवेल**

| | |
|---|---|
| २३:१६ | ९/३ |

**१ राजे**

| | |
|---|---|
| २:२८ | ४/१९ |
| १९:५ | २/१७ |
| १९:१२ | ८/१३ |

**२ राजे**

| | |
|---|---|
| २:११–१२, १३–१५, २३ | ८/११ |

**२ इतिहास**

| | |
|---|---|
| १५:१७ | ४/१५ |

**नहेम्या**

| | |
|---|---|
| ८:१० | ४/१४ |

**ईयोब**

| | |
|---|---|
| १३:१५ | ५/८, १०/३१ |
| ४२:१० | ६/२० |

**स्तोत्रसंहिता**

| | |
|---|---|
| १८:२५–२६ | ४/२६, ६/२२ |
| १८:२९ | ५/१५ |
| १८:३६ | १२/२४ |
| २५:१२ | ६/२, ६/३ |
| २५:१३ | ६/२, ६/३ |
| २५:१४ | ६/३ |
| ३७:४ | ३/२० |
| ३७:५ | ७/५ |
| ३७:७ | ७/४, ८/१ |
| ३७:८ | ७/४ |
| ३७:३४ | ८/१ |
| ४०:८ | १/२९, ८/२५, ८/३१ |
| ४६:१ | २/२७ |
| ४६:२ | ७/२० |
| ४६:१० | २/२२ |
| ५१:४ | ११/१९, १२/७ |
| ५५:२२ | ४/१३ |

# शास्त्रवचनांची सूची


| | |
|---|---|
| ८७:७ | २/९, ५/१६, १२/३० |
| ९१:१ | ७/४ |
| ९१:१, १० | ८/२ |
| ९१:१५ | ५/१९ |
| ९७:२ | १/३ |
| १०६:६–७ | २/११ |
| ११६:१२–१३ | ५/२ |
| ११८:२७ | २/६ |
| १२३:२ | ११/२४ |
| १२३:३ | ११/२३ |
| १३९ | १/९ |

**नीतिसूत्रे**

| | |
|---|---|
| ३:५–६ | ६/२७ |
| २९:१८ | ५/९ |

**उपदेशक**

| | |
|---|---|
| ३:१५ | १२/३१ |
| ९:१० | ४/२३ |

**यशया**

| | |
|---|---|
| १:१०–११ | ३/१५ |
| ६:१ | ७/१३ |
| ६:१, ५ | ७/१८ |
| ६:५ | ७/३ |
| ६:७ | ७/३ |
| ६:८ | १/१४, १/१६, ९/३० |
| ८:११ | १/२९, १/३० |
| ९:६ | ४/१३ |
| २६:३ | २/११ |
| ३५:७ | ७/६ |
| ४०:२६ | २/१० |
| ४०:२८ | २/९ |
| ४०:२९ | ४/१४ |
| ४०:३१ | ३/१९, ७/२०, १०/३ |
| ४२:४ | १०/१२ |
| ४५:२२ | १/२२, २/२, २/११, ११/२६, १२/६ |
| ४९:२ | १/१९, २/१४ |
| ४९:५ | ९/२१ |
| ५०:७ | ३/१५ |
| ५०:१०–११ | १/१९ |
| ५२:१२ | १२/३१ |
| ५३:१ | ११/२४ |
| ५३:३ | ६ /२३ |
| ५३:१० | १२/२ |
| ५५:१ | ६/१० |
| ५९:१६ | ३/३० |
| ६०:१ | २/१९ |
| ६१:१ | ३ /१४ |

**यिर्मया**

| | |
|---|---|
| १:८ | ६/२७ |
| २:२ | १/२१ |
| ४:१ | १२/२७ |
| ३९:१८ | ६/२७ |
| ४५:५ | ४/२७, ४/२८ |

**यहेज्केल**

| | |
|---|---|
| ३७:३ | ६/१ |
| ३७:१२ | ६/१ |

**योना**

| | |
|---|---|
| ४:२ | ५/९ |

**नहूम**

| | |
|---|---|
| १:३ | ७/२९ |

**हबक्कूक**

| | |
|---|---|
| २:३ | ३/११, ५/२ |

**मलाखी**

| | |
|---|---|
| २:१६ | ११/२३ |

**मत्तय**

| | |
|---|---|
| १:२३ | १२/२५ |
| ३:११ | १/२८, ८/२२ |
| ३:१७ | १०/१३ |
| ४:१ | ९ /१८ |
| ४:१९ | १/१४, ९/१९ |
| ५:३ | ६/९ ,७/२१, ८/२१ |
| ५:३–११ | ७/२५ |
| ५:८ | ३/२६ |
| ५:८,११ | ७/२१ |
| ५:११ | १०/६, ११/१३ |

# शास्त्रवचनांची सूची


| | |
|---|---|
| ५:२० | ७/२४, ८/२७ |
| ५:२३ | ९/२६ |
| ५:२३–२४ | ७/२७, ९/२४, १२/११ |
| ५:२४ | ९/२६ |
| ५:२५ | ६/३० |
| ५:२५–२६ | ७/१ |
| ५:२६ | ६/३०, ७/१ |
| ५:२९–३० | १/३० |
| ५:३० | ६/२९ |
| ५:३९ | ७/१४ |
| ५:४१ | ९/११, ९/२५ |
| ५:४५ | ६/९, ८/२४ |
| ५:४८ | ६/२९, ९/२० |
| ६:६ | ८/२३, ९/१६ |
| ६:७ | ९/१६ |
| ६:८ | ३/२०, ४/२७, ८/६ |
| ६:१० | ६/३ |
| ६:२३ | ८/२७ |
| ६ :२५ | १/२७, ५/२१, ५/२३ |
| ६:२६ | १/२६ |
| ६:२६, २८ | ५/१८ |
| ६:२८ | १/२६ |
| ६:३० | १/२६, १/२७, |
| ६:३३ | ४/२०, ५/२१, १०/३० |
| ६:३४ | १/२७ |
| ७:१ | ६/१७, ६/२२ |
| ७:२ | ६/२२ |
| ७:३–५ | ६/१७ |
| ७:७ | ४/२७, ७/१६, १२/१७ |
| ७:८ | ५/२६, ८/२४, ९/१६ |
| ७:९ | ८/२४, १०/११ |
| ७:११ | ७/१६ |
| ७:१२ | ८/२४ |
| ७:१३–१४ | ७/७ |
| ८:२६ | ८/१२ |
| ९:२८ | १०/२७ |
| ९:३८ | १०/१६, १०/१७ |
| १०:२४ | ९/२३, ११/२२ |
| १०:२७ | २/१४ |
| १०:३४ | ३/२४, ७/२२, १२/१९ |
| ११:१ | ८/१ |
| ११:६ | ८/२९ |
| ११:२५ | ९/१४,१०/१०,१०/१७ |
| ११:२८ | ६/११, ८/१९, ८/२०, ९/१३, १०/८, १०/१४, १०/२२, ११/४ |
| ११:२९ | १/२८, ४/१४ |
| ११:३० | ४/१४ |
| १२:१३ | २/१६ |
| १३:२२ | १/२६, १/२७, ५/१९, ५/२३ |
| १३:५८ | ७/९ |
| १४:२९ | ३/२८ |
| १४:२९–३० | ६/१८ |
| १४:३१ | ६/१८ |
| १५:१८–२० | ७/२६ |
| १६:२१–२३ | ८/१० |
| १६:२४ | ९/१३, १२/९, १२/११ |
| १७:२० | १०/३१ |
| १८:३ | ४/२९, ८/२८, १२/२८ |
| १८:५ | ५/३१ |
| १९:२९ | ६/२० |
| २०:२२ | ९/१२ |
| २०:२८ | २/२३ |
| २२:१४ | १/१४ |
| २३:८ | ९/२२ |
| २३:११ | २/२५ |
| २३:२७ | ४/३ |
| २५:१४–३० | ४/२० |
| २५:२१ | ३/५ |
| २६:३३–३५ | ३/१ |
| २६:३६, ३८ | ४/५ |
| २६:३८ | ९/५ |
| २६:४२ | ५/२२ |
| २६:४६ | २/१८ |
| २६:५६ | ९/५ |
| २६:६९–७५ | १/५, ८/१६ |
| २८:१० | ७/१० |
| २८:१६ | १०/१४ |
| २८:१८–१९ | १०/१४, १०/२७ |
| २८:१९ | ५/६, ९/४, १०/२६, १०/२७ |


**मार्क**


| | |
|---|---|
| ४:१० | १/१३ |
| ४:१९ | ८/३१, ११/२३ |
| ४:३४ | १/१२ |

| | |
|---|---|
| ६:३१ | २/२० |
| ६:४५ | ७/२८ |
| ६:४९ | ७/२८ |
| ९:१–९ | ३/२२ |
| ९:१–२९ | ६/१६ |
| ९:२ | १०/१ |
| ९:२–८ | ७/२९ |
| ९:५–६ | १०/२ |
| ९:९ | ४/७ |
| ९:१४–१८ | १०/१ |
| ९:१४–२३ | १०/२ |
| ९:२२ | १०/२ |
| ९:२८–२९ | १०/३ |
| १०:२१ | ९/२८ |
| १०:२८ | ३/१२ |
| १०:२९ | ३/१२ |
| १०:३२ | ३/१५ |
| ११:१६ | ११/८ |
| ११:१७ | ११/८ |
| १४:३–४ | ९/२ |
| १४:६ | २/२१ |
| १४:९ | ९/२ |
| १४:५४ | १०/२१ |
| १६:१२ | ४/९ |
| १६:१३ | ४/९ |

**लूक**

| | |
|---|---|
| १:३५ | ८/८, १२/२५ |
| २:४६, ४९ | ८/७ |
| २:४९ | ८/८ |
| ४:१३ | ४/५ |
| ४:१८ | ३/१४ |
| ८:१–३ | १/११ |
| ८:२ | ८/१६ |
| ९:२३ | ११/२ |
| ९:२८–४२ | ८/२९ |
| ९:३३ | ८/१ |
| ९:३४ | ७/२९ |
| ९:५१ | ८/३ |
| ९:५५ | १/२९ |
| ९:५७ | ९/२७ |
| ९:५७–६२ | ३/१२ |
| ९:५८–५९, ६१ | ९/२७ |
| ९:६१ | ५/३० |
| ९:६२ | ८/१३ |
| १०:१७–२० | १०/२७ |
| १०:१८–२० | १/७ |
| १०:२० | ४/२४, ८/३० |
| ११:१ | ८/२८ |
| ११:५–८ | ९/१२ |
| ११:९ | ६/१० |
| ११:९–१३ | १०/२२ |
| ११:१० | ६/९, ६/१०, ९/१२ |
| ११:११–१३ | ९/१२ |
| ११:१३ | १/३०, ६/९, १२/१९ |
| १२:८ | ३/१ |
| १२:१५ | १२/२९ |
| १२:२२ | १/२ |
| १२:४० | ३/२९ |
| १४:२६ | २/२, ३/१९, ५/७, ५/११, ६/१९, ७/२२, ९/२८, ११/२ |
| १४:२६–३३ | ३/१२ |
| १४:२६–२७, ३३ | ५/७, ७/२ |
| १४:२८ | ५/७ |
| १४:३० | ५/७ |
| १५:१० | ८/१० |
| १७:२०–२१ | १०/१९ |
| १८:१ | १२/१३ |
| १८:१–८ | ९/१२ |
| १८:९–१४ | ६/१२ |
| १८:२२ | ६/१३, ८/१८ |
| १८:२२–२३ | ८/१७ |
| १८:२३ | ८/१८ |
| १८:३१ | ८/३, ८/४, ९/२३ |
| १८:३१, ३४ | ८/५ |
| १८:३९, ४१ | २/२९ |
| १९:४२ | ४/३ |
| २१:१९ | ५/२० |
| २२:२७ | २/२३ |
| २२:२८ | ९/१९ |
| २२:३३ | १/८, ४/२६ |
| २२:५३ | ६/२४ |
| २३:२६ | १/११ |
| २३:३३ | ९/२३ |

# शास्त्रवचनांची सूची


| | |
|---|---|
| २४:२१ | २/७ |
| २४:२६ | ४/८ |
| २४:३२ | ३/२२ |
| २४:४७ | १०/१५ |
| २४:४९ | ५/२७, ५/३१, ८/१, ९/४ |
| २४:५१ | ५/१७ |


**योहान**


| | |
|---|---|
| १:१२ | ८/१५ |
| १:२९ | ९/१८, १०/१५, १०/२९ |
| १:३५–३६ | ७/२० |
| १:३५–३७ | १०/१२ |
| १:३८–३९ | ६/१२ |
| १:४२ | ६/१२ |
| १:४८ | ९/१० |
| २:५ | ३/२८ |
| २:२४–२५ | ५/३१, ७/३० |
| २:२५ | ९/२७, १०/५ |
| ३:३ | १/२०, ८/१५ |
| ३:४ | ८/१५ |
| ३:५ | ११/२८ |
| ३:७ | ८/१५, १२/२५ |
| ३:१६ | ३/१३, ९/२१ |
| ३:१७ | ९/२ |
| ३:१९ | १०/५ |
| ३:१९–२१ | ६/३०, ७/१८ |
| ३:२९ | ३/२४, ३/२५ |
| ३:३० | ३/२४, १०/१२ |
| ४:७ | १/१८, १/२१ |
| ४:११ | २/२६, २/२७ |
| ४:१४ | ९/७ |
| ५:१९ | ९/९ |
| ५:३० | ८/३ |
| ५:३९–४० | ५/६ |
| ६:२९ | ९/६ |
| ६:३५ | १०/११ |
| ६:४४ | १२/२२ |
| ६:६३ | १/३, ३/१०, ८/२६,१२/१७, |
| ६:६६ | ३/९, ९/१९, १२/२९ |
| ६:६७, ७० | ३/९ |
| ७:१७ | ६/८, ७/२७, १०/१० |
| ७:३८ | ५/१८, ८/२१, ८/३०, ९/२, ९/३, ९/६, ९/७ |
| ७:३९ | ५/२७ |
| ८:३६ | ११/१८ |
| ९:१–४१ | ४/९ |
| ९:२५ | ४/९ |
| १०:३ | ८/१६ |
| १०:३० | ७ /१९, १२/१२ |
| ११:६ | १०/११ |
| ११:७–८ | ३/२८ |
| ११:२६–२७ | ११/६ |
| ११:४० | ८/२९ |
| ११:४१ | २/१३, ८/९ |
| १२:२४ | ६/१९ |
| १२:२७ –२८ | ६/२५ |
| १२:३२ | २/१, ७/१७, ११/९, १२/१७, १२/२० |
| १२:३५ | ८/२७ |
| १२:३६ | ४/१६ |
| १३ | २/१९ |
| १३:१–१७ | ३/६ |
| १३:३–५ | ६/१५, ७/११ |
| १३:१३ | ७/१९ |
| १३:१३, १६ | ९/२२ |
| १३:१४ | २/१९, ९/११ |
| १३:१५ | ९/११ |
| १३:१६ | १०/१६ |
| १३:१७ | ६/८ |
| १३:३४–३५ | ९/२० |
| १३:३६ | १/५ |
| १३:३७–३८ | १/४, ६/१६ |
| १४:१ | २/२७, ४/२९, ५/२८, ७/५ |
| १४:१, २७ | ४/२१, १२/२४ |
| १४:८ | ४/२१ |
| १४:९ | १/७, ४/२१, १०/२९, १०/३० |
| १४:१२, १३ | १०/१७ |
| १४:१३ | ६/७ |
| १४:१५ | २/१२, ११/२ |
| १४:२३ | ६/१२ |
| १४:२६ | १/१३ |
| १४:२७ | ८/२६, १२/१४, |
| १४:३१ | २/२० |
| १५:१–४ | १/७ |

# शास्त्रवचनांची सूची


| | |
|---|---|
| १५:४ | ६/१४ |
| १५:५ | १२/२३ |
| १५:७ | ६/७, ९/१६, १०/१४ |
| १५:८ | ३/११ |
| १५:११ | ८/३१ |
| १५:१२ | ५/११ |
| १५:१३ | २/२४ |
| १५:१३–१४ | ८ /२५ |
| १५:१३, १५ | ६/१६ |
| १५:१४ | २/१३ |
| १५:१५ | १/७, ८/२५ |
| १५:१६ | १/२४, ८/३, ९/२५, ९/२९, १०/२५ |
| १५:२२–२४ | १०/२९ |
| १६:७ | १/७ |
| १६:८ | ११/१९, १२/७ |
| १६:१२ | ४/७ |
| १६:१३–१४ | ११/२९ |
| १६:२३ | ५/२८, ५/२९ |
| १६:२४ | ८/२८ |
| १६:२६ | ८/६, ८/९ |
| १६:२६–२७ | ५/२९, ८/६ |
| १६:३०–३२ | २/२८ |
| १६:३२ | ४/४ |
| १६:३३ | ४/४, ८/२, १२/४ |
| १७ | ५/२२ |
| १७:२ | ४/८ |
| १७:३ | ५/८, ५/२७ |
| १७:४ | ९/१३, ११/२१ |
| १७:६ | ९/४ |
| १७:१५–१६ | ११/२७ |
| १७:१९ | २/८, १२/३ |
| १७:२१ | ५/२२ |
| १७:२१–२३ | २/८ |
| १७:२२ | १/२०, ३/२०, ४/१८, ४/२७, ५/२२, ५/२९, १२/१२ |
| १८:३६ | १०/१९ |
| १९:३० | १०/२८, ११/२१ |
| २०:११–१८ | ८/१६ |
| २०:१४, १६ | ८/१६ |
| २०:२१ | ३/३, ३/५, १०/२६ |
| २०:२२ | १/५ |
| २०:२४–२९ | ८/१६ |
| २०:२५ | ८/१६ |
| २०:२८ | १/१८, ८/१६ |
| २१:७ | ४/१७ |
| २१:१५–१७ | ८/१६ |
| २१:१६ | ६/१९ |
| २१:१७ | २/९, ३/१, ३/२, ३/३, ३/५, ८/१६, १०/१८ |
| २१:१८–१९ | १/५, ९/१३ |
| २१:२१–२२ | ११/१५ |


### प्रेषितांची कृत्ये


| | |
|---|---|
| १:८ | १/१८, २/४, २/१५, ३/१०, ४/१, ९/४, ९/५, ९/६, १०/१४ |
| २:४ | ९ / ५ |
| २:३३ | ५/२७ |
| ४:१२ | १२/८ |
| ९:५ | ७/१८ |
| ९:१६ | ३/५ |
| ९:१७ | ४/२ |
| १३:२२ | ४/२ |
| १७:२८ | ६/२ |
| २०:२४ | ३/४, ३/५, १०/१४ |
| २४:१६ | ५/१३ |
| २६:१४ | १/२८ |
| २६:१५ | १/२९ |
| २६:१६ | १/२४ |
| २६:१७–१८ | १/१० |
| २६:१९ | १/२४, ३/११, १२/२९ |


### रोमकरांस पत्र


| | |
|---|---|
| १:१ | १/३१, २/२, २/३ |
| १:१४ | ७/१५ |
| २:१ | ६/२२ |
| २:१७–२४ | ६/१७ |
| ३:२४ | ११/२८ |
| ४:३ | ३/१९ |
| ५:५ | २/२४, ४/३०, ५/११, ७/२, १०/१८ |
| ५:८ | १०/२० |
| ५:१० | १०/२८ |

# शास्त्रवचनांची सूची


| | |
|---|---|
| ५:१२ | १०/५ |
| ५:१२–१९ | १०/६ |
| ६:३ | १/१५ |
| ६:४ | १/१५, ४/८ |
| ६:५ | ४/११, ९/१३ |
| ६:६ | ४/१०, १२/२३ |
| ६:९–११ | ४/१२ |
| ६:११ | ४/१०, ४/११ |
| ६:१३ | १०/९ |
| ६:१६ | ३/१४ |
| ६:१९ | ९/१५ |
| ७:९, १४ | १२/१ |
| ७:१८ | ५/२४, ६/१ |
| ८:१६ | १०/२२ |
| ८:२६ | ११/७, ११/८ |
| ८:२७, ३४ | ४/१ |
| ८:२७ | ११/८ |
| ८:२८ | १०/३०, ११/७, १२/१६, १२/१८, |
| ८:३५ | ५/१९ |
| ८:३७ | ३/७, ५/१९, १०/२४, १२/१६ |
| ८:३९ | ३/७, १०/२० |
| ९:३ | १/३१, २/२४ |
| १२:१ | १/८, ६/१३, १२/५, १२/१० |
| १२:१–२ | ६/८ |
| १२:२ | ५/१३, ९/९, ११/१४ |
| १४:७ | २/१५ |

**१ करिंथ**

| | |
|---|---|
| १:२ | १०/४ |
| १:१७ | २/१ |
| १:२१, २३ | ११/२५ |
| १:२६–३१ | ८/४ |
| १:३० | ७/२२, ७/२३, १०/२०, ११ /१३, १२/८ |
| २:२ | १/२४, ३/१३, ४/२, १०/२५, ११/२६, १२/२० |
| २:४ | ७/१७, १२/३ |
| २:१२ | १२/२१ |
| २:१४ | १२/१७ |
| ३:३ | ३/२३ |
| ३:९ | ४/२३ |
| ३:१०–१५ | ५/७ |
| ४:९–१३ | २/३ |
| ६:१९ | २/१९, ३/४, ३/१८, ८/९, ९/४, ११/१, ११/८, १२/५ |
| ६:१९–२० | ७/१५ |
| ९:१६ | २/२, ९/२९, १०/१५ |
| ९:२२ | २/२४, १०/२५ |
| ९:२७ | २/१५, ३/१७, १२/५ |
| १०:११–१३ | ४/१९ |
| १०:१३ | ९/१७ |
| १०:३१ | ११/१६, ११/२२ |
| १२:२६ | २/१५ |
| १३ | १/२९, ११/१२ |
| १३:४ | ४/३० |
| १३:४–५ | ७/५, १०/२३ |
| १३:४–८ | १०/१८ |
| १५:१० | ११/३० |

**२ करिंथ**

| | |
|---|---|
| १:२० | ४/२०, ११/१७ |
| २:१४–१५ | १०/२४ |
| ३:५ | २/१५ |
| ३:१८ | १/२३, ४/२२ |
| ४:२ | ९/१५ |
| ४:३–४ | १२/१७ |
| ४:५ | २/२३ |
| ४:१० | ५/१४, ५/१५ |
| ५:७ | ५/१, १०/३१ |
| ५:९ | ३/१७ |
| ५:१० | ३/१६ |
| ५:१४ | २/४ |
| ५:१५ | १०/२९ |
| ५:१७ | ११/१२ |
| ५:१७–१८ | १०/२३ |
| ५:१७–१९ | १०/२८ |
| ५:२० | ७/१७ |
| ५:२१ | ४/६, १०/७, १०/२९ |
| ६:१ | ६/२६ |
| ६:४ | ३/६ |
| ६:४–५, १० | ६/२६ |
| ७:१ | ३/१८ |
| ७:४ | ३/७ |
| ७:१० | १/२१, १२/७ |

| | |
|---|---|
| ८:९ | २/२५ |
| ९:८ | ५/१६ |
| १०:४ | ९/८ |
| १०:५ | २/११, ६/१४, ९/८, ९/९, ९/१४, १०/२४, ११/१८ |
| ११:३ | ९/१४ |
| १२:९ | ९/१३ |
| १२:१५ | २/२४, २/२५ |
| १३ | ११/१२ |

**गलतीकरांस पत्र**

| | |
|---|---|
| १:१५ | १/२५, १/३१ |
| १:१५–१६ | १/१७, १०/६, १२/२२ |
| १:१६ | १/३०, २/३, ३/१८, ७/८, ११/११ |
| २:२० | ३/८, ३/२१, ४/१०, ११३, १/१३, ११/१८, १२/२३ |
| २:२१ | १२/५ |
| ४:१९ | ३/१८, ५ /१३, ८/८, ८/९, ९/१६, ९/१८, १०/६, १०/२९, १२/७, १२/२५ |
| ४:२२ | १२/१० |
| ५:१ | ५/६ |
| ५:१६ | ३/२३ |
| ५:२४ | १२/९ |
| ६:१४ | ११/२५, ११/२६, ११/२७, १२/२३ |

**इफिसकरांस पत्र**

| | |
|---|---|
| १:७ | ११/२०, १२/८ |
| १:१८ | ५/१५ |
| २:६ | २/१५ |
| २:८ | ३/२१ |
| ३:१९ | ४/१२ |
| ४:१३ | ७/१२, ९/२३ |
| ४:२३ | ५/१३ |
| ४:२४ | १२/२८, १२/३० |
| ४:३० | ५/१३, ५/१४ |
| ५:१४ | २/१६ |
| ५:१८ | ९/७, १२/२४ |
| ६:१३, १८ | १२/६ |
| ६:१८ | ५/३ |

**फिलिप्पैकरांस पत्र**

| | |
|---|---|
| १:२०–२१ | १/१ |
| २:५ | ३/१८, ३/३०, ३/३१, ५/२० |
| २:१२ | ५/१०, ५/१५, १२/५ |
| २:१२–१३ | ६/६, ७/७ |
| २:१७ | २/५ |
| ३:१० | ४/८, ७/११, ७/१२ |
| ३:१२ | ५/२, ६/२८, १२/२ |
| ३:१३–१४ | ६/२८ |
| ४:१२ | २/५, २/२३ |
| ४:१३ | १०/३ |
| ४:१९ | ५/१४, ८/२९, ९/१३ |

**कलस्सैकरांस पत्र**

| | |
|---|---|
| १:२४ | २/३, ७/१४, ८/८, ९/३०, ११/९, १२/१३ |
| १:२७ | ७/२३ |
| ३:३ | १/२३, ४/२४, ४/२८, ६/२, ६/१४, ८/३१, ११/१६, १२/२४ |

**१ थेस्सल**

| | |
|---|---|
| ३:२ | ११/१० |
| ४:३ | १/१५, ७/२२, १०/१२ |
| ५:१७ | ५/२६ |
| ५:१९ | ८/१३, ८/१४ |
| ५:२३ | १/९, १/३०, २/८ |
| ५:२३–२४ | ७/२२, ८/१४ |

**१ तीमथ्य**

| | |
|---|---|
| १:१३ | २/२३ |
| ३:१६ | ४/६ |

**२ तीमथ्य**

| | |
|---|---|
| २:१५ | ३/१७, १२/१५ |
| ४:२ | ३/१०, ४/२५ |
| ४:६ | २/६ |
| ४:१६–१७ | ४/२२ |

**इब्रीलोकांस पत्र**

| | |
|---|---|
| २:९ | ११/२१ |

# शास्त्रवचनांची सूची


| | |
|---|---|
| २:१० | ४/८, ७/७, ८/३०, ९/८ |
| २:१८ | ९/१७ |
| ३:१४ | ८/२९ |
| ४:१२ | ३/१ |
| ४:१५ | ९/१८ |
| ४:१५–१६ | ९ /१७ |
| ५:८ | ७/१९, ९/२२ |
| ७:२५ | ४/१ |
| ९:११–१५ | ४/५ |
| ९:२६ | १०/५ |
| १०:९ | ५/३१ |
| १०:१४ | १२/८ |
| १०:१९ | ५/४ |
| १०:२४–२५ | ७/१० |
| ११:६ | १०/३० |
| ११:८ | १/२, ३/१९ |
| ११:२७ | ४/९, ५/२ |
| १२:१–२ | ८/२५ |
| १२:२ | ३/१७, ३/२९, ८/२६, ८/३१ |
| १२:५ | ८/१४ |
| १२:६ | ४/१४ |
| १३:५ | ६/४ |
| १३:५–६ | ६/४, ६/५, ८/२९ |
| १३:१३ | ४/२४, ९/१९ |

**याकोबाचे पत्र**

| | |
|---|---|
| १:४ | ७/३१ |
| १:५ | ६/९ |
| १:१४ | ९/१८ |
| २:१० | १२/१ |
| ४:३ | ६/१० |
| ४:८ | ११/४ |
| ४:८–१० | ६/१० |

**१ पेत्र**

| | |
|---|---|
| १:५ | ४/१९, ७/२३ |
| १:१६ | ९/१ |
| २:९ | ६/२१ |
| २:२४ | ४/६ |
| ४:१–३ | ९/१५ |
| ४:१२ | २/३, ५/१५ |
| ४:१३ | ११/५ |
| ४:१७ | ५/५ |
| ४:१९ | ८/१०, ११/५ |

**२ पेत्र**

| | |
|---|---|
| १:४ | ५/१६ |
| १:४–५ | ६/१५ |
| १:५ | ५/१०, ६/१५ |
| १:५, ७ | ५/११ |
| १:८ | ५/१२ |
| १:१३ | ७/१० |
| ३:९ | ५/११ |

**१ योहान**

| | |
|---|---|
| १:६–७ | ८/१३ |
| १:७ | १/९, १/२०, २/२८, ३/११, ३/१६, ८/१३, ८/२४, ८/३०, ९/२०, १०/१०, ११/१२, १२/२६, १२/२९ |
| २:२ | १०/१५ |
| ४:१८ | २/२१ |
| ३:२ | ४/२९ |
| ३:९ | ८/१५ |
| ३:१६ | ६/१६ |
| ५:१६ | ३/३१ |

**३ योहान**

| | |
|---|---|
| ७ | १०/१८ |

**यहुदा**

| | |
|---|---|
| २० | १०/२१ |

**प्रकटीकरण**

| | |
|---|---|
| १:७ | ७/२९ |
| १:१७ | ५/२४ |
| २:७ | ८/२, १२/४ |
| ३:१० | २/२२, ५/८ |
| ४:१ | ३/२७ |
| ४:११ | ७/१९ |
| १२:११ | ११/२९ |
| १३:८ | ४/६ |

**Other Oswald Chambers books from Discovery House Publishers:**

*Biblical Ethics*
*Biblical Psychology*
*Christian Disciplines*
*Complete Works of Oswald Chambers*
*Conformed to His Image and The Servant As His Lord*
*Faith: A Holy Walk*
*If You Will Ask*
*The Love of God*
*Our Brilliant Heritage*
*Our Ultimate Refuge (formerly Baffled to Fight Better)*
*Prayer: A Holy Occupation*
*So Send I You*
*Studies in the Sermon on the Mount*

*My Utmost for His Highest Daily Devotional Journal:*
A Journal Companion to the Golden Book of Oswald Chambers

*Oswald Chambers-Abandoned to God:*
The Life Story of the Author of My Utmost for His Highest
(by David McCasland)

**My Utmost For His Highest is also available in**
*- Hindi, Telugu, Malayalam, Khasi, Kannada, Tamil ,Gujarati , Oriya and more recently in Bengali, Mizo and Marathi* (all Paperback)

- in Updated English Version

For further details visit http://www.dhp.org,
http://www.christianbooksindia.com/

or write to generalsecretary@iemoutreach.org,
yohankjohn@gmail.com